

E 48

3.82

PUBLISHED FOR THE EDUGATIONAL DEPARTMENT.

A MARÁTHÍ VERSION

OF

MURRAY'S HISTORY OF BRITISH INDIA,

BY

TRANSLATION EXHIBITIONERS.

PART THE THIRD.

BY

VISHNU PARASHURÁM SHÁSTRÍ.

Published by Order of the Director of Public Instruction.

BOMBAY:

PRINTED AT THE "EXCHANGE PRESS," FORT.

1861.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० ४
दान सन १८९

हिंदुस्थानाचा इतिहास.

मूळ पुस्तक इंग्लिश भाषेंत मेरेसाहेब ह्यांनीं केलें.

त्याचें मराठी भाषांतर

मराठी ग्रंथ संग्रहालय

ट्रान्स्लेशन एक्जामिनर ह्यांनीं केलें.

त्याचा

भाग तिसरा.

विष्णुशास्त्री पंडित

ह्यांनीं केला. तो

मेहेरबान डैरेक्तर आफ् पब्लिक इन्स्त्रक्शन् ह्यांच्या हुकुमावरून

मुंबई मध्यें
एक्सचेंज छापखान्यांत छापविला.
शके १७८२.
सन १८६२.

NOTICE.

This book has not received European revision; but it has been carefully revised by the translator, and also looked over by the Pandit of the Maráthí Translator in the Educational Department.

This Third Part comprises five chapters (10—14) of the original Englishwork, embracing the British conquest of the Carnatic, the British conquest of Bengal, the war with Mysore, the conquest of Mysore, the Maráthá war, and the conquest of Central Hindustan.

सूचना.

पहिल्या भागाची जी प्रस्तावना तीच ह्या तिसऱ्या भागास लागू आहे. विशेष इतकाच कीं प्रकरण १० पासून प्रकरण १४ पावेतों पांच प्रकरणांचा हा भाग केला आहे. ह्यांत इंग्लिशांस करनाटकांत, म्हैसूर प्रांतांत, बंगाल्यांत वगैरे जय कसे मिळाले त्यांचें वर्णन आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ५३
ठाणे स. १८९

प्रकरण १०.

करनाटकांत ब्रिटिश लोकांचा जय.

इंग्लिशांस प्रथम कांहीं मुलूख मिळतो. इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्यामध्यें लढाई– फ्रेंच लोकांनीं आरंभीं घातलेलीं ठाणीं– त्यांचें पौंदेशरी येथील ठाणें– लाबर्डोने ह्यानें केलेल्या लढाया– तो मद्रास घेतो– त्याच्या जागेवर डुप्ली येतो– पौंदेशरीचा वेढा– तह होतो– तंजावरावर इंग्लिशांची स्वारी– दक्षिण हिंदुस्थानांतील नबाबीकरितां कज्जे– फ्रेंच लोक मध्यें पडतात– त्यांस जय मिळतो– त्यांस नासिरजंग हांकून देतो– इंग्लिश त्यास मिळतात– त्याचा मृत्यु– मीरजाफर गादीवर बसतो व त्याचा अंत होतो– सलाबतजंग– क्लैव साहेबाच्या लढाया– फ्रेंचांपेक्षां इंग्लिशांस आनुकूल्य– दक्षिणेंत फ्रेंचांचें वजन– ते इंग्लिशांच्या विरुद्ध कट करतात– त्रिचनापल्लीचा वेढा– फ्रेंचांस प्रांत मिळतात– फ्रान्सास परत येण्याकरितां डुप्लीस बोलावणें– तह होतो– कोलरी लोक– इ० स० १७५६ तील लढाई– लाली सेनेचें काम पाहूं लागतो– सेंटडेविड ह्या नांवाचा किल्ला घेतो– मद्रासेचा वेढा– तो उठविला– वांदिवाश येथें फ्रेंचांचा पराजय– पौंदेशरीचा वेढा– ती हस्तगत होते– फ्रान्सांत लाली ह्याचे हाल करून त्यास ठार मारतात:

पांचव्या प्रकरणांत इंग्लिशांच्या जलपर्यटनाविषयींचा वृत्तांत लिहिला आहे. समुद्रावर लूट करावी, व्यापार करावा, व नवीन देश अथवा बेटें शोधून काढावीं ह्या उद्देशानें ते लोक हीं जलपर्यटनें करीत असत; राज्य मिळवावें अथवा अधिकार मिळवावा

प्र० १०
इ० स०
१६८९
इंग्लिशांची पहिली सफर.

प०।१० असा त्यांचा मूळचा उद्देश नव्हता. म्हणून त्यांनीं जे किले बां-
इ० स० धिले ते माल ठेवण्याकरितां बांधिले, म्हणजे तेणेंकरून व्यापार क-
१६८९ रावयास सोपें पडावें असा त्यांचा हेतु होतो; केवळ ते राज्य मि-
ळवावयास उपयोगी पडावे असा त्यांचा उद्देश नव्हता. इ० स०
१६८९ पर्यंत आपण राज्य मिळवावें हें इंग्लिशांच्या मनांत आलें
होतें असें दिसत नाहीं. त्या वर्षीं ईस्ट इंडिया अधिकाऱ्यांस जे त्यांचे
हुकूम आले त्यांत त्यांस असें लिहून कळविलें होतें कीं आजपर्यंत
व्यापाराकडे जसें भांडी लक्ष दिलें तसेंच इतःपर वसूल वाढविण्या-
कडेही देणार. हिंदुस्थानांत आपलें राज्य असावें अशी आमची
इच्छा आहे. डच लोकांनीं हिंदुस्थानांतील आपल्या गवर्नरास
व्यापाराकरितां एक कलम लिहिलें तर तेथें खंडणी उत्पन्न कर-
ण्याविषयीं दहा कलमें लिहीत, ह्यावरून त्यांची त्यांनीं उगीच
स्तुति केली होती. इंग्लिशांनीं असें लिहिलें होतें तथापि त्यांचा
उद्देश सिद्धीस नेण्यास त्यांजपाशीं साधनें फारच थोडीं होतीं;
कारण हिंदुस्थानांत त्यांचा अमल कायतो मुंबई व मद्रास येथें व
त्या दोन शहरांच्या भोंवतालच्या थोडथोड्या प्रदेशांत मात्र होता.

विकत घेत- इतकेंच कीं इंग्लिश राजे कोणत्याही हेतूनें आपलें शहर अथवा प्रांत
ल्या मुलुख. विक्रीयास राजी झाले असतां तीं विकत घेण्यास त्यांची तयारी असे.
ह्याच रीतीनें पूर्वेच्या किनाऱ्यावरील टिगनापटन नामें शहर हस्त-
गत करून घेऊन तेथें कांहीं शिबंदी ठेवून त्यास फोर्टसेंट डेविड
असें नांव दिलें. ह्यानंतर नऊ वर्षांनीं ह्यापेक्षां चांगला प्रांत त्यांच्या
हातीं लागला. औरंगजेब ह्यानें आपला मुलगा अजिमउशन ह्यास
बंगाल्याचा मुख्य अधिकार दिला होता; परंतु आपणास बादशाही
मिळविण्याचा यत्न आपण करावा असें त्याच्या मनांत आलें आणि
हा उद्देश सिद्धीस नेण्याकरितां पैशाची गरज लागली म्हणून इ०
स० १६९८ त चटानदी, गोविंदपूर, आणि कलकत्ता हीं तीन
शहरें व त्यांच्या भोंवतालचा प्रदेश इतक्याची जमीनदारी कंपनीला
विकण्यास तो राजी झाला. कलकत्ता हें शहर पुढें लौकरच
इंग्लिशांची हिंदुस्थानांतील राजधानी व्हावी असा ईश्वरी संकेत
होता. त्यांनीं यथायोग्य विचार करून तेथें फोर्ट विल्यम नांवाचा

किल्ला बांधावयास आरंभ केला, आणि इ० स० १७०७ त हा किल्ला बंगाल इलाख्याची गादी केली. प्र० २० इ० स० २७१५

वैद्यकांत यूरोपियन लोकांची वाकबगारी इकडील लोकांपेक्षां अधिक ह्यामुळें बंगाल्यांत प्रथम त्यांचा पाय शिरला. ह्या वेळेसही ह्याच गुणामुळेंच त्यांचें वजन पुष्कळ वाढण्याचा प्रसंग आला. तो असा कीं इ० स० १७१५ त फेराकशियर बादशाहाच्या कारकिर्दीत कांहीं व्यापाराच्या कामाकरितां इंग्लिशांनीं आरमिनिया येथील एका व्यापाऱ्याबरोबर आपले दोन गुमास्ते दिल्लीस पाठविले. रो साहेब व दुसरे लोक ह्यांचा उद्देश जसा पूर्वी सिद्धीस गेला नाहीं तसाच ह्यावेळेसही मुख्य उद्देश, बंगालचा सुभेदार जफारखान व दुसरे कोणी सरदार लोक ह्यांच्या कृत्रिमामुळें, सिद्धीस गेला नाहीं. परंतु बादशाह ह्यावेळेस फार दुखण्यानें पडला होता. इकडील वैद्यांचें ज्ञान कमी ह्यामुळें त्यांनीं त्या दुखण्यांत हात घातला असतां त्यांस यश येईल असें नव्हतें. हामिल्तन ह्मणून एक गृहस्थ वर सांगितलेल्या गुमास्त्यांबरोबर तेथें गेला होता, तो वैद्यकांत चांगला होता, त्यानें बादशाहास खडखडीत बरें केलें. बादशाहावर हा विलक्षण उपकार झाल्यामुळें त्यानें त्यास पुष्कळ बक्षीस दिलें, मद्रासेजवळचीं तीन खेडीं दिलीं, व बंगाल्यांत सदतीस गांवांची जमीनदारी विकत घेण्याची परवानगी दिली. ह्या व्यवस्थेप्रमाणें झालें असतें तर कलकत्त्याच्या उत्तरेस पांच कोसांचा प्रदेश ह्यांच्या हातीं लागला असता; परंतु बंगाल्याच्या नवाबाचें इंग्लिशांशीं वैर असल्यामुळें त्यानें जमिनीच्या मालकांस आंतून धमकी देऊन सांगितलें कीं आपल्या जमिनी इंग्लिशांस विकण्यास कोणी राजी होऊं नये; ह्यामुळें इंग्लिशांच्या हातीं जमिनी यावयाच्या त्या आल्या नाहींत. बादशाहानें इंग्लिशांस मागें सांगितल्यापेक्षां मोठा असा एक अधिकार दिला होता. तो हा कीं बंगाल प्रांतांत त्यांनीं व्यापाराचा माल आणिला असतां आणि त्या प्रांतांतून नेला असतां त्यांचा शाडा घेऊं नये व त्याजबाबद जकात मागूं नये. परदेशांतील माल ह्या देशांत आणिला असतां व ह्या देशांतून परदेशांत नेला अस-

वैद्यकांत यूरोपियन लोकांची कुशलता.

बादशाह बरा झाला.

इ० स० १७४४ फार उपयोगाची परवानगी मिळाली.

ग्रं० १० इ० स० २७३४

तां इंग्लिशांस जकात पडूं नये. इतकीच जरी परवानगी होती तरी तिजपासूनही त्यांचें फारच हित झालें, व कलकत्ता हें ठाणें लौकरच भरभराटास चढलें.

पुढें बरेच दिवसपर्यंत मुलुखाच्या संबंधानें कंपनीच्या कारभारांत कांहीं फेरफार झाला नाहीं. कंपनीचें ह्मणणें असें होतें कीं हिंदुस्थानांतील आमच्या कारभाऱ्यांच्या उधळेपणामुळें आह्मास तिकडील सावकारांचें व व्यापाऱ्यांचें कर्ज झालें. परंतु ह्या गोष्टीचा बंदोबस्त लौकरच झाला असें दिसतें. त्या लोकांनीं आपल्या खाल्यांचा खर्च बेतावातानें चालविल्यामुळें त्यांचा व्यापार सुरक्षितपणानें चालून त्यांत त्यांस नफा झाला. त्यांनीं व्यापार वाढवितां वाढवितां इतका वाढविला कीं त्यांची वर्षाची विक्री दोन कोट रुपयांची झाली, ह्यामुळें त्यांच्या भांडवलावर शेंकडा सात रुपयांपासून आठ रुपयांपावेतों त्यांस नफा पडला. ह्याचप्रमाणें त्यांचा कारभार चालता तर कदाचित त्यांचा पुष्कळ नफा होता; परंतु फ्रेंच आणि ब्रितिश ह्यांची इ० स० १७४४ त जी लढाई सुरू झाली तीमुळें कंपनीच्या स्थितींत मोठाच फेरफार झाला. ह्मणजे कंपनीच्या आंतील व्यवस्थेस धक्का बसला व ह्यामुळें यूरोप खंडांतील व हिंदुस्थानांतील राजांशीं जो त्यांचा संबंध होता त्यांत अंतर पडलें. ही गोष्ट समजण्यासाठीं फ्रेंचांनीं हिंदुमहासागरांतील बेटें व हिंदुस्थान ह्यांत जीं पूर्वीं ठाणीं घातलीं होतीं त्याविषयींचा मागील थोडासा विचार केला पाहिजे.

व्यापाराची पडती.

फ्रान्सावरोबरचे लढाईचा परिणाम.

फ्रेंच लोकांचीं वैर्यांचीं कृत्यें.

फ्रेंच लोक नौकागमन शास्त्रांत इंग्लिश आणि डच ह्यांच्या फार मागें पडले होते खरे, परंतु मोठमोठ्या जिवावरच्या कामास देखील हात घालण्यास ते धैर्य धरून पुढें सरत, हें पूर्वीपासूनच दृष्टीस पडत असे. इ० स० १५०३ मध्यें देखील रुआं येथील व्यापाऱ्यांनीं एक आरमार तयार करून रवाना केलें होतें, परंतु तें मध्येंच फसलें, ह्याचें कारण त्यांचे खलाशी लोक नौकागमन शास्त्रांत तेवेळीं निष्णांत नव्हते हेंच प्रायः असावें. पुढील शतकाच्या आरंभीं त्यांनीं अनेक वेळ यत्न केला, परंतु तो बहुतेक वेळ वायां गेला. शेवटीं इ० स० १६४२ त या लोकांची एक बरीच कंपनी झाली.

मादागास्कर ह्मणून अफ्रिकाखंडाच्या पूर्वेस एक मोठें सुपीक बेट आहे त्यांत मुख्यत्वेंकरून ठाणें करण्याची ह्यो कंपनीनें योजना केली हें वाईट झालें. ह्या बेटांत शेतकी करण्यास व व्यापार करण्यास चांगलें आनुकूल्य होतें हें खरें. परंतु यूरोपखंडांत खपण्यासारखा माल तेथें उत्पन्न होईना. ह्या बेटांत वस्ती फार असून लोकांचा स्वभाव क्रूर होता; आणि फ्रेंच लोक त्यांच्या देशांत जाऊन सत्ता करूं लागल्यामुळें ते त्यांस (फ्रेंचांस) लागलेच त्रास देऊं लागले. ठाणेदारांची व त्या लोकांची लढाई लागली, आणि तीपासून ठाणेदारांस फार त्रास झाला. फ्रेंच लोकांनीं समुद्र किनाऱ्यावर कांहीं ठिकाणीं लांकडी घरें बांधून त्यांस किल्ले असें नांव दिलें होतें, तीं त्यांनीं मोठ्या संकटानें बांधविलीं. ह्या घरांपासून त्यालोकांचा फायदा अगदीं न होतां ते व्यर्थ तीं बांधण्याच्या खर्चाखालीं आले.

प्र० १० इ० स० १७४८ फ्रेंच माद्रागारकर येथें ठाणेंघालतात.

इ० स० १६६४ मध्यें फ्रान्स देशांत प्रथम "फ्रेंच ईस्टइंदिया कंपनी" ह्या नांवाची एक मंडळी झाली. ह्या कंपनींत कोलबर्त हा मुख्य होता. त्यावेळेस तेथें चवदावा लूई राजा राज्य करीत होता. त्याला आपला भरभराट व्हावा अशी फार इच्छा होती. ह्यामुळें कोलबर्त ह्यासही हुरूप येऊन त्यानें शेतकी, शिल्प, व व्यापार, हीं वाढविण्याकरितां फार झटून यत्न केला. त्याकाळीं लोकांत जीं मतें चालू होतीं त्यांतमार्गें ह्या कामांत तो चालला. पण त्यावेळेस अर्थ शास्त्रांतील दृढ सिद्धांत अगदींच कोणास माहीत नव्हते, ह्यामुळें कोणत्या एखाद्या व्यापाराची बढती करावयाची असल्यास तो करणाऱ्यावरोवर प्रतिस्पर्धा होऊं देऊं नये, त्यास मोठाले हक्क द्यावे व त्या व्यापाराचा त्यासच अधिकार द्यावा, हे उपाय लोक करीत असत. ईस्टइंदिया कंपनीचा हिंदुस्थानाशीं व्यापार चालविण्याच्या पद्धतीचा मसूदा तयार करून कोलबर्त ह्यानें राजाकडे पाठविला त्यांत हीच पद्धति घेतली होती. ह्या व्यापारास भांडवल साडेबासष्ट लक्ष रुपये पाहिजे होतें, व ह्या व्यापाराचा भरंवसा येण्याकरितां पुष्कळ गोष्टी फुगवून लिहिल्या होत्या. ह्यानंतर पन्नास वर्षेपर्यंत तुह्मींच व्यापार करावा अशी सत्ता.

फ्रेंच ईस्टइंदिया कंपनी

कोलबर्त ह्याची पद्धत.

प्र० १० इ० स० १६६८

नद ह्या कंपनीस मिळाली व तिला सर्व कर सुटेल, आणि आरंभीं दहा वर्षेपर्यंत तुमचें जें नुकसान होईल तें सर्व आह्मी भरून देऊं असें सरकारानें त्या कंपनीस कबूल केलें. हा करार केल्यामुळें सरकारास पुढें वास्तविकच पुष्कळ पैसा द्यावा लागला. ह्या व्यापाराचा जितकें भांडवल लिहिलें होतें तितकें जरी थोडें होतें तरी वर्गणीदारांकडून तितकेंही जमेल नाहीं; ह्यामुळें खजिन्यांतून साडेचारा लाख रुपये दिले, आणि ह्याप्रमाणेंच बडेलोक व दरबारांतील दुसरे सर्व सधन लोक ह्यांजकडून कांहीं पैसा देवविला.

कंपनीची अव्यवस्था.

ह्या कंपनीच्या व्यवस्थेत विचार थोडा होता व तिजपासून फायदा होईल असेंही नव्हतें. मादागास्कर येथें केलेल्या ठाण्यापासून आपणास कांहीं तरी नफा व्हावा ह्मणून कंपनीनें उद्योग चालविला आणि तेथें आपल्या लोकांचीं वसाहत करण्याकरितां पुष्कळ लोक पाठविले, परंतु त्यांपैकीं बहुतेकांस तेथील हवा मानली नाहीं, त्यांचे फार हाल झाले आणि तेथील लोकांनीं त्यांस फार त्रास दिला, ह्यामुळें त्यांपैकीं बहुतेक लोक मेले. त्यानंतर बाकी राहिलेल्या लोकांस सरनी आणि मास्कारेनस ह्या दोन बेटांत जाऊन रहावयास सांगितलें. हीं बेटें कांहीं कालानंतर मारिशस आणि बोर्बन ह्या नांवांनीं कांहींशीं उदयास आलीं. मादागास्कर बेटांत जो उद्योग केला होता तो व्यर्थ गेल्यावर कंपनीनें हिंदुस्थानांत गलबतें रवाना केलीं. तीं तेथें पोहोंचल्यानंतर त्या लोकांनीं समुद्राच्या किनाऱ्यावर निरनिराळ्या ठिकाणीं आपलीं ठाणीं घातलीं. इ० स० १६६८ मध्यें त्या कंपनीनें केरन ह्मणून एक फ्रेंच गृहस्थ होता त्यास कारभारी नेमून सुरतेस एक मुख्य वखार घातली. ह्या गृहस्थानें आपलें बहुतेक आयुष्य हालंद देशाच्या चाकरींत घालविलें होतें.

हिंदुस्थानांत ठाणीं घातलीं.

येथें प्रथमतः त्यास असा रंग दिसला कीं आपली बरीच बढती होईल; परंतु पुढें इकडच्या राजांचे आणि त्यांचे तंटे लागले आणि ह्या व्यापारापासून आपणास शेवटीं नफा होत नाहीं असें त्यांच्या अनुभवास आलें; ह्यामुळें येथून आपण अकस्मात् चालतें व्हावें हें त्यांस बरें वाटलें आणि त्यांस लोकांचें कर्ज होतें तें न फेडतां ते तसेंच निघून गेले. ह्या गो-

ष्टीमुळें त्यांचें तेथें पुन्हा येणें सहजच बंद झालें. त्यानंतर त्या लोकांनीं सिंहलद्विपांत त्रिंकोमाली येथें व हिंदुस्थानाच्या पूर्व किनाऱ्यावर सेंट थामस येथें ठाणीं घालण्याचा उद्योग केला; परंतु हालंद देशांतील लोक डच ज्यांस वलंदेजी असें ह्मणतात, त्यांच्या मात्सर्यामुळें दोनही ठिकाणचा उद्योग व्यर्थ गेला. एम् मार्टीन ह्मणून फ्रेंचाचा एक बुद्धिमान व देशाभिमानी कामदार होता त्यानें जे फ्रेंच लोक चोहोंकडे पसरले होते त्यांस एकत्र जमवून पोंदेशरी येथें नेऊन ठेविलें. ही गोष्ट त्यानें केली नसती तर त्या लोकांची अवस्था फार कठीण झाली असती. त्यानें शहाणपणाच्या व मनमिळाऊ अशा वर्तणुकीनें पोंदेशरींतील लोकांची प्रीति संपादून अशा प्रकारें व्यापार सुरू केला कीं, त्यापासून नफा होऊन त्या ठाण्याची लौकरच मोठी वढती झाली.

इ० स० १६६८ डच लोकांचा मत्सर.

फ्रेंच आणि इंग्लिश ह्यांची प्रथम परस्परांशीं चकमक झडली त्यावेळेस फ्रेंचांचे हिंदुस्थानांत वर सांगितलें त्याशिवाय दुसरें ठाणें सांगण्यासारिखें एकही नव्हतें. परंतु हें ठिकाण मजबूत होतें व जवळच्या कांहीं प्रांतांत त्यांचा अमल होता ह्यामुळें ह्या ठाण्यांत बंदोबस्त चांगला होता. माही आणि कारिकल आणि बंगाल इलाख्यांत चंद्रनगर ह्या ठिकाणीं ह्यांच्या लहान लहान वखारी होत्या. इ० स० १७४४ त ह्या दोन राष्ट्रांमध्यें लढाई सुरू झाली आणि ती यूरोपांत त्यांनीं मोठ्या निकरानें चालविली होती. ही लढाई हिंदुस्थानापर्यंत वाढत जाऊं नये असा फ्रेंच कंपनीचा हेतु होता असें दिसतें. परंतु त्या कंपनीच्या गलबतावरील कामदार लोकांस जय मिळविण्याविषयीं आवेश उत्पन्न होऊन हिंदुस्थानांत इंग्लिशांनीं आपल्या ठाण्यांचा बंदोबस्त केल्यापूर्वी आपण हल्ला करून जय मिळवावा असें त्यांस वाटलें. लाबर्डोने ह्मणून एक मोठा बुद्धिमान व मोठा मेहेनती मनुष्य होता. त्यानें गलबतावर पायरी पायरीनें सर्व कामें केलीं होतीं. हा ह्या वेळेस मारिशस आणि बोर्बोन ह्या बेटांचा गवर्नर होता. फ्रान्स देशाकडून फारसें साह्य न मिळतां केवळ जातीच्या श्रमानें ह्यानें त्या दोन बेटांचा मोठा भरभराट करून सोडला. फ्रान्स देशांत ह्या लढाईची

इ० स० १७४४ इंग्लिशांवरोबर चकमक झडली त्यावेळेची फ्रेंचांची स्थिति

इंग्लिशांच्या ठाण्यावर हल्ला करण्याचा बेत.

प्र० १०
इ० स०
१७४६

तयारी चालली होती ते वेळेस हाही तेथें होता. तेव्हां त्यानें प्रधानाशीं व कंपनीशीं असें बोलणें लाविलें कीं, हिंदुस्थानांत जीं शत्रूंचीं ठाणीं आहेत त्यांवर हल्ला करावा. ह्या गोष्टीविषयीं कंपनीचा अभिप्राय अगदीं उलटा होता; परंतु तीस न कळतां सरकारानें ही गोष्ट पसंत करून त्यास दोन गलबतेंही देण्याचें कबूल केलें होतें पण तीं मात्र पुढें दिलीं नाहींत. हा बेत सिद्धीस नेण्याकरितां ह्याजपाशीं सामग्री जरी फार कमी होती तरी नशिबावर भरंवसा ठेवून तो सिद्धीस नेण्याविषयीं दृढ निश्चय करून तो आपल्या कामावर परत आला. हल्ला करण्याचा उद्देश ह्याच्या मनांत होता ह्यामुळें तेथें जीं तारवें आलीं तीं ह्यानें ठेवून घेऊन त्यांस स्वारीकरितां चाकरीस ठेविलें. आणि त्यांवरील खलाशी लोकांपैकीं पुष्कळ ज्यांनीं बंदूक मुळींच कधीं सोडली नव्हती अशांस रीतिप्रमाणें कवाईत शिकवून तयार केलें व आणखी पुष्कळ तजविजा काढल्या आणि तयारिविषयीं ज्या अडचणी होत्या त्या सर्व दूर केल्या. इ० स० १७४६ च्या जून महिन्यांत हा पौंदेशरीस येऊन पोहोंचला. तेवेळीं वाटेस पश्चिमेच्या किनाऱ्यावर जें इंग्लिशांचें तारवावरील सैन्य होतें त्याच्यांशीं ह्याची थोडिशी चकमक झडली. येथेंही डुप्ली ह्मणून जो फ्रेंच गवर्नर होता त्यानें जे कांहीं अडथळे आणिले ते लावर्डोने ह्यास दूर करावे लागले. मग हल्ला करण्याकरितां जलमार्गानें आपले फौजेसुद्धां जाण्याविषयीं त्यास परवानगी मिळाली.

सरकार ह्याचा बेत कबूल करतें.

गवर्नर लावर्डोने ह्याचा हल्ल्याविषयीं उत्कंठा.

मद्रासेवर स्वारी

इंग्लिशांचीं हिंदुस्थानांत जीं ठाणीं होतीं त्यांचा कारभार मद्रास शहरांत होत असे इतकेंच नाहीं परंतु हें शहर इंग्लिशांखेरीज इतर युरोपियन लोकांनीं त्या वेळेस इकडे जीं मोठमोठीं ठाणीं घातलीं होतीं त्यांपैकीं एक होतें. मद्रास व भोंवतालचीं खेडींपाडीं मिळून ह्यांमध्यें लोक एकंदर सुमारें अडीच लक्ष होते त्यांत शिपायी लोक २०० व इतर लोक १०० मिळून तिनशें इंग्लिश होते. हे इंग्लिश लोक सेंट जार्ज ह्मणून तेथें किल्ला होता त्यांत राहत असत. ह्या किल्ल्या भोंवताल्ल्या तट अरुंद होता व त्या तटास सरासरी बांधलेले असे चार बुरूज व चार मोरचे होते.

ह्यावरून स्पष्ट दिसतें कीं आपल्या रक्षणाकरितां त्यांजला साधनें फार कमती होतीं; व तशांतही त्यांनीं अगदीं पराक्रम दाखविला नाहीं. ह्या किल्ल्यावर पांचे दिवसपर्यंत कुलपी गोळ्यांचा भडिमार चालला होता, त्यांत दोन तीन घरें जळालीं व पांच चार माणसें मेलीं. आणि इंग्लिश लोक शत्रूंच्या स्वाधीन झाले. लावर्डोने ह्यानें इंग्लिशांबरोबर अशा चमत्कारिक करार केला कीं कायद्याप्रमाणें ह्या ठिकाणीं आमचा अंमल बसून कंपनींच्या वखारी व तोफखाने हीं आमच्या ताब्यांत आल्यावर जर तुम्ही अमुक दिवसांचे आंत अमुक खंडणी द्याल तर मद्रास तुम्हांस परत देऊं. ह्याप्रमाणें आपला एकही मनुष्य न गमावितां हा किल्ला जिंकून घेऊन तो सरदार पोंदेशरीस परत आला. परंतु येथें त्यास जसा मान मिळावा तसा मिळाला नाहीं. आपणच काय तें मोठें असावें अशी डुप्लीची इच्छा होती, ह्यामुळें प्रतिस्पर्धी अधिकारी ह्याला दुःसह होत असे. लाबर्डोने ह्याच्या मसलतीस तो आड येई, आणि त्याची वारंवार अप्रतिष्ठा करी, ह्यामुळें शेवटीं हा कज्जा सोडून देऊन लाबर्डोने फ्रान्स देशास परत गेला. तेथेंही वरील कामदाराचें लिहिणें गेलेंच होतें त्यावरून तेथल्या लोकांनीं त्यास फार वाईट रितीनें वर्तविलें. त्यानें इकडे बहुत दिवस विश्वासानें काम केलें होतें, ह्या गोष्टीचा विचार करून पाहतां त्यांनीं अगदींच अयोग्य केलें. त्यास त्यांनीं तुरुंगांत टाकिलें. तो तीन वर्षेपर्यंत सोडिला नाहीं. आणि सुटल्यानंतरही तो विचारा लौकरच मेला.

प्र० १० इ० स० १७२६

मद्रास स्वाधीन होते.

दोन कामदारांचें परस्परांशीं शत्रुत्व.

ह्यानंतर हिंदुस्थानांतील कामाचा सर्व अधिकार डुप्ली ह्याचे हातीं आला. हा मोठा विलक्षण पुरुष होता. ह्याचा बाप (जनरल फारमर) फ्रान्स देशांत खोतीच्या कामावर मुख्य होता व ईस्ट इंदिया कंपनीचाही दैरेक्तर (मुख्य) होता. ह्याजवळ पुष्कळ संपत्ति होती, ती सर्व डुप्लीच्या हातीं आली, हा पैसा व्यापारांत घालावा असें डुप्लीस बापाचें सांगणें होतें. ह्यास प्रथम पोंदेशरी येथील कौन्सिलांत मुख्य सभासद नेमून पाठविलें आणि दुसरे वेळेस चंद्रनगर येथील सुपरिन्तेन्देन्त नेमून पाठविलें. सरकारच्या कामांत चांगली व्यवस्था होईल अशी तजवीज करून चंद्रनगरच्या

डुप्लीनामें फ्रेंचांचा गवर्नर.

प्र० १० इ० स० १७४६

ठाण्याचा त्यानें एकदम भरभराट करून सोड़ला, आणि मोठा व्यापार करून आपली स्वतांची संपत्तिही पुष्कळ वाढविली. तो बुद्धिमान होता व त्यास यशही मिळत गेलें. ह्यामुळें पॉंदेशरी येथील गवर्नराची जागा त्यास मिळण्याविषयीं त्याची शिफारस झाली. डुप्लीला लाबर्डोनें ह्याच्या उत्कर्षाचें सहन होईना, म्हणून त्यानें त्याशीं कज्जा करून त्याला हिंदुस्थानांतून काढिलें खरें. परंतु अंमल करण्याची लाबर्डोने ह्याची रीत चांगली होती सबब तीच चालविण्याविषयीं त्यानें निश्चय केला. ह्याचा अधिकार म्हटला म्हणजे फ्रेंच* इंदियेमध्यें व्यापाराची देखरेख करावी हा होता; परंतु जय मिळविण्याविषयीं पाहिलें असतां सीजर किंवा सिकंदर ह्याप्रमाणें त्याच्या मोठमोठाल्या मसलती होत्या. इंग्लिशांचा पराजय करून त्यांजपासून आपण मद्रासचा किल्ला घेतला आहे; तर पुढेही असेंच चालवून ह्या लोकांस प्रथम ह्या पश्चिमेच्या किनाऱ्यावरून अगदीं घालवून द्यावें असें त्यास वाटलें. पूर्वीच लिहिलें आहे कीं लाबर्डोनें ह्यानें इंग्लिशांचा संकेत मान्य करून त्यांच्याशीं असा करार केला होता कीं हा संकेत तुम्ही शेवटास न्याल तर कांहीं दिवसांनंतर मद्रास तुम्हांस परत देऊं. हा मनुष्य मोठा मानी आणि प्रतिष्ठित होता म्हणून आपला शब्द शेवटास नेण्याचा त्यानें निश्चय केला होता. पण डुप्ली ह्याची धांव मोठी होती म्हणून ही किल्ला देण्याची गोष्ट त्याच्या मनाला बागत नव्हती. आपला हेतु एरवीं सिद्धीस जाणार नाहीं असें पाहून त्यानें अशी तजवीज केली, कीं लाबर्डोने हिंदुस्थानांतून निघून जाईपर्यंत मद्रास परत देण्याची मसलत लांबविली आणि तो निघून गेल्यावर पॉंदेशरी येथील लोकांकडून असें बोलणें लावविलें कीं फ्रेंचानीं मद्रास परत देऊं नये, कारण तो असल्यापासून आमचा बचाव फार चांगला होईल. ही विनंती मान्य केलीसें दाखवून मद्रास परत न देतां डुप्लीनें तेथें लूट करविली आणि तेथील गवर्नर व दुसरे मोठमोठे लोक ह्यांस कैदी करून आपल्या ठाण्यांत आणिलें.

जयाविषयीं मोठाल्या मसलती.

इंग्लिशांशीं अप्रामाणिकपणा.

सेंट देविद किल्ल्यावर स्वारी.

ह्यानंतर सेंट देविद किल्ला जिंकण्याकरितां लागलीच त्यानें

* फ्रेंचांच्या अमलांतील हिंदुस्थानाचा भाग.



प्रकरण
इ० स०
१७४६

स्वारी केली. ह्या वेळेस एक चमत्कारिक गोष्ट घडून आली आणि तिजवरून डुप्ली ह्यास मोठा भरंवसा आला कीं आपली आतां फते होते. आणि हिंदुस्थानांत ज्या लढाया वगैरे मोठमोठ्या गोष्टी झाल्या त्या सर्वांमध्यें ती गोष्ट मोठी ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती गोष्ट कोणती म्हणाल तर अर्काटच्या नवाबानें इंग्लिशांचा पक्ष धरून मद्रास परत घेण्याकरितां दहा हजार फौज बरोबर देऊन आपल्या मुलास पाठविलें. ह्या शहराचा बचाव करण्याकरितां फ्रेंचाजवळ फक्त १२०० शिपाई होते, फ्रेंचांचा जय. परंतु एवढ्या फौजेनिशीं नवाबाच्या एवढ्या मोठ्या फौजेवर हल्ला करण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं व त्यांत त्यांचा जय झाला ह्याचें कारण सामान्यतः त्यांचें सैन्य फार सुशिक्षित व त्यांच्या तोफखान्याची व्यवस्था चांगली असे. आतां आशिया खंडांत फौज म्हटली म्हणजे तींत अव्यवस्थित पोटार्थी लोकांच्या कांहीं टोळ्या एकत्र जमल्या असतात. यूरोपखंडांतील लोक अगदीं थोडे असले तरी त्यांचें तेज इकडील लोकांवर पडतें हें पोर्तुगीज लोकांनीं बहुत दिवसांपूर्वीच प्रत्ययास आणून दिलें होतें; परंतु ह्या गोष्टीस बहुत दिवस होऊन गेले होते, ह्यामुळें तिचें स्मरण बहुत करून कोणास राहिलें नव्हतें. आणि फ्रेंच व ब्रितिश ह्यांचे उभयतांस आजपर्यंत असें वाटत असे कीं, नवाब (मोंगल) हा मोठा पराक्रमी असेल. ह्याजकरितां थोडक्याशा फौजेनिशीं त्याजवर चाल करण्याचा विचार करणें हें व्यर्थ वेडेपण आहे. परंतु तो भ्रमाचा भोंपळा आतां फुटला; आणि फ्रेंच व ब्रितिश हे ह्यावेळेस जसा कांहीं एकनवीन धडाच शिकले व त्या धड्याप्रमाणें त्यांनीं वर्तणूकही चालविली. परंतु ह्या वर्तणुकीपासून मोठमोठाले भयंकर परिणाम घडून आले.

इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्या फौजेचा कमजास्तपणा.

हल्लीं डुप्ली ह्याच्या मनांत इतकेंच होतें कीं सेंतदेविद हा किल्ला येवढा जिंकून घ्यावा. त्याप्रमाणें १७०० लोक बरोबर घेऊन तो त्या किल्ल्याकडे चालला. ह्या फौजेंत युरोपियन लोकच बहुत होते. व इंग्लिशांजवळ ह्यावेळेस गोरे लोक कायते दोनशें होते, व कांहीं काळे लोक होते, परंतु ते कवाईत वगैरे शि-

ग्र० १० इ० स० १६७८

कून तयार झाले नव्हते. फ्रेंच लोक मोठ्या अवसानानें जात असतां नवाबाच्या फौजेनें त्यांस एकाएकीं गांठून त्यांवर अकस्मात हल्ला केला, त्यामुळें त्यांचें कांहीं नुकसान होऊन त्यांस परत जाणें भाग पडलें. ह्यानंतर सेंतदेविद किल्ल्याजवळच कद्दलूर म्हणून एक गांव आहे तें घेण्याकरितां डुप्ली ह्यानें जळमार्गानें कांहीं फौज पाठविली, परंतु समुद्रावर तुफान झाल्यामुळें तींस परत यावें लागलें. मग नवाबाचें मन आपल्याकडे वळवावें ह्याविषयीं डुप्लीनें आपलें सर्व चांतुर्य खरचलें. फ्रेंच लोकांचें सामर्थ्य मोठें आहें असें या नवाबाच्या मनांत बिंबवून देण्याविषयीं ह्यानें विशेषतः फार तजवीज केली. कारण ह्यास असा भरंवसा होता कीं इकडील राजेरजवाडे वगैरे ज्यागोष्टींपासून त्वरित लाभ होतो तीं करतात. व जो पक्ष प्रबळसा वाटेल त्यास जाऊन मिळतात. फ्रेंचांची आणखी फौज येऊन पोहोंचली असें नवाबास कळल्यावरून त्यांच्या मोठेपणाविषयीं जें डुप्लीनें सांगितलें होतें तें त्यास खरें वाटूं लागलें. आणि नवाब इंग्लिश लोकांस मनापासून चांगली मदत करीत असतां त्यांस सोडून त्यांच्या शत्रूंबरोबर तह करून तो मुकरर करण्याकरितां त्यांजकडे आपल्या मुलास त्यानें पाठविलें. एतद्देशीय राजांच्या मनांतून ज्याप्रमाणें आपणास आदर सत्कार मिळावा असें असतें त्या प्रमाणेंच मोठ्या डामडौलानें त्या मुलाचा फ्रेंचांनीं आदर सत्कार केला.

नवाबावरोबर डुप्लीचा वर्तणूक.

सेंतदेविद किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां पुन्हा फ्रेंच आले ! परनही गेले.

डुप्ली ह्यास पुन्हा हुरूप येऊन त्यानें आपला उद्देश सिद्धीस नेण्याचा उद्योग सुरू केला. त्यानें नदी उतरून जाऊन किल्ल्यासमोर मोठी बळकट छावणी घातली. तेव्हां इंग्लिशांचा अदमिरल्ल म्हणजे आरमाराचा अधिपति ग्रिफन साहेब, ह्याचें आरमार आलें त्यांतून कुमकेकरितां पुष्कळ फौज आली ती त्या रस्त्यानें जातां फ्रेंचांनीं पाहिली तेव्हां फ्रेंच लोक पुन्हा परत गेले. नंतर इंग्लिशांची आणखीही कांहीं फौज आली. शेवटीं १७४८ साच्या जानेवारी महिन्यांत मेजर लारेन्स म्हणून एक लढाईच्या कामांत वाकबगार असा कामगार होता त्यानें आपणाकडे सेनापतीचें काम घेतलें. त्यानंतर कांहीं कालपर्यंत इंग्लिश व फ्रेंच हे दोघेही

अगदीं समबल होते ह्यामुळें त्यांपैकीं कोणाएकाच्यानें दुसऱ्याशीं मोठीशी गडबड करवली नाहीं. पॉंदेशरीचा गवर्नर डुप्ली हा कदलूरावर हल्लाकरण्याकरितां खरोखरी मध्यरात्रीं येत होता, परंतु हें इंग्लिशांस कळल्यामुळें फ्रेंच लोकांचें बरेंच नुकसान करून त्यांस त्यांनीं माघारें परतविलें. प्र० १० इ० स० १७४८

ह्यानंतर लवकरच इंग्लिशांचीं नऊ गलबतें येऊन पोहोंचलीं, त्यांत १४०० लोक होते. इतके लोक आल्यानें ह्या देशांत त्या दोन लोकांमध्यें ज्या लढाया वगैरे होत असत त्यांची स्थिति अगदीं बदलून गेली. ही नवीन आलेली फौज व पूर्वी येथें होती तीं मिळून एकंदर गोऱ्या लोकांची फौज ह्या प्रांतांत एवढी जमली होती, कीं तेथें तेवढी गोरी फौज कधीं कोणाच्याही पाहण्यांत आली नव्हती. एवढी कुमक आल्यामुळें शत्रूवर चढ करण्याविषयीं इंग्लिशांच्या आंगीं पुष्कळ जोर आला. आणि त्यांनीं असा निश्चय केला कीं शत्रूचें मुख्य स्थान जें पॉंदेशरी शहर त्यास वेढा घालून एकदां चांगला हात दाखवावा. इंग्लिशांच्या फौजेचें समरंगणांत निवारण करण्यासारखी फौज फ्रेंचांच्या जवळ नव्हती ह्यामुळें वेढा घातला तेवेळेस जय होईल असा रंग दिसत होता. परंतु वेढ्याचें काम जसें जलदीनें आणि झपाट्यानें चालावें तसें चाललें नाहीं. त्या शहरापासून एक कोसावर एक लहानसा किल्ला होता, तोच जिंकावयास इंग्लिशांचे पुष्कळ दिवस निघून गेले. पुढें या शहरा समोर लढाईच्या वेळेस शिपाई लोकांस उभें राहण्याकरितां जे चर वगैरे खणिले त्यांत उभें राहून तोफांचा भडिमार शहरावर करतां येईल इतकें जवळ तें शहर नाहीं असें नजरेस आलें. पुढें हीं चूक दुरुस्त करण्यापूर्वीच पर्जन्य काळ लागला, व फौजेंत अजार उत्पन्न झाला, ह्यामुळें वेढा घालण्याचें काम तहकूब करणें जरूर असें त्यांस वाटलें. त्यांनीं वेढा उठविल्यामुळें फ्रेंच लोकांस फार आनंद झाला व हा आमचा मोठा जयच झाला अशी बढाई ते करूं लागले. परंतु ह्या गोष्टीपासून त्यांचा कांहीं एक नफा झाला नाहीं इतक्यांत यूरोपखंडांत इंग्लंद व फ्रान्स ह्या दोन राष्ट्रांचा तह झाला व त्या तहाच्या कलमांत मद्रास सोडून द्यावी हें एक

पॉंदेशरीचा वेढा.

मद्रास परत मिळाली.

प्र० १०
इ० स०
१७४८

कलम होतें. अशीही बातमी येऊन पोंचली ह्यामुळें इंग्लिश व फ्रेंच हे उभयतां लढाईच्या पूर्वी ज्या स्थितींत होते त्या स्थितींत पुन्हा आले.

यूरोपांत तह झाल्याचा परिणाम.

ह्या तहापासून हिंदुस्थानांत पुन्हा स्वस्थता व्हावी तो न होतां लढाया वगैरे पुर्वीच्यापेक्षां जास्त होऊं लागल्या. कां तर इंग्लिश आणि फ्रेंच ह्या उभयतांजवळ मोठ मोठ्या फौजा होत्या आणि इतक्या फौजांचे खांस तर काम नव्हतें तेव्हां कोणत्या कामावर त्या फौजांची योजना केली असतां आपणास नफा होईल असा ते दोघेही आपापल्या ठिकाणीं विचार करूं लागले. मागील लढायांत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांवरून इकडील राजे दुर्बळ आहेत हें दिसून आलेंच होतें, ह्यामुळें हा देश धनाढ्य असून चांगला आहे, त्यापक्षीं आपण येथें मोठें विस्तीर्ण राज्य स्थापिलें असतां होईल असें खांस वाटलें.

येथील सरकारावरोबर पहिली लढाई.

प्रथम इंग्लिशांनीं हालचाल केली. शहाजी म्हणून एक तंजावरचा राजा होता याला त्याच्या एका भावानें पदच्युत केलें होतें. म्हणून त्यानें आपणास फिरून राज्य प्राप्त करून देण्याविषयीं तुम्हीं मदत करावी असें इंग्लिशांशीं बोलणें लाविलें, आणि ह्या कामाबद्दल खांस देवीकोटचा किला आणि त्या किल्ल्याखालचा प्रांत त्यानें देऊं केला. हा प्रांत व हा किला कालेरूननदीच्या कांठीं मोठ्या सोईच्या ठिकाणीं होता. इ० स० १७४९ त त्यांनीं त्या किल्ल्यावर स्वारी केली, परंतु तारवांवरील फौज व दुसरी फौज ह्या दोहोंचा एक विचार जमला नाहीं, ह्यामुळें इंग्लिशांचा मोड झाला. व राजाच्या लोकांकडून कुमक व्हावी तीही झाली नाहीं, ह्यामुळें हा किला जिंकण्याविषयीं प्रयत्न न करितां तसेच परत आले. ह्या स्वारींत त्यांची अप्रतिष्ठा झाली ह्यामुळें त्यांनीं दुसऱ्यानें त्या किल्लयावर स्वारी केली. तेव्हां फौजेचीं तारवें कालेरूननदीचे मुखापर्यंत जाऊन पोहोंचलीं आणि तेथून शिपाई लोक होड्यांत बसून नदींतून देवीकोट शहरास गेले. किला हस्तगत होण्याविषयीं पुष्कळ अडचणी आल्या व एक मोठी लढाई झाली तेव्हां मग किला त्यांच्या स्वाधीन झाला. ह्या लढाईत

प्र० १०
इ० स०
१७४९

इंग्लिशांचा लेफ्तेनेन्त क्लैव साहेब ह्यानें मोठा पराक्रम केल्यामुळें त्याची फार प्रसिद्धि झाली. ह्या देशाच्या पुढील इतिहासावरून ह्या सरदारानें मोठाच लौकिक मिळविला असें स्पष्ट दिसून येईल. हा किला इंग्लिशांच्या स्वाधीन होतांच तेथील राजानें इंग्लिशांशीं तह केला. त्यांत हा किला इंग्लिशांकडे रहावा असें ठरलें आणि त्याबद्दल इंग्लिशांनीं ज्याच्या मदतीकरितां शस्त्र उचललें होतें त्याचा पक्ष सोडून दिला. 'इंग्लिशांनीं त्या राजाबरोबर असाही ठराव केला कीं, तुम्हीं शाहाजीस ४०१०० रूपये वर्षास देऊन त्यास आपल्या प्रतिबंधांत ठेवावें म्हणजे तुम्हांस त्यापासून काडीमात्र उपद्रव होणार नाहीं. इंग्लिशांनीं हें काम अगदीं अयोग्य केलें हें स्पष्ट आहे. त्यांस असें वाटत होतें कीं अशी व्यवस्था केली असतां तंजावरकराकडून आपणास प्रसंगीं साह्य मिळेल परंतु तें कांहींच झालें नाहीं. प्र० १० ह० स० १७२९ लेफ्तेनेंत क्लैव. अयोग्यव्यवस्था.

इकडे फ्रेंच लोकांनीं मोठाच उद्योग चालविला होता. ते दक्षिण हिंदुस्थानांत उघडपणें आपलेंच प्राधान्य मानूं लागले. ह्यावेळेस करनाटकांत जी मोठी घडामोड झाली तींत फारच अप्रसिद्ध गोष्टी आहेत व तींत जे लोक पडले होते त्यांच्या इतिहासापासून मनोरंजन व्हावयाचें नाहीं. व त्यांचीं नांवेंही वेडींवांकडीं आहेत ह्यामुळें वाचणारांच्या मनांत हा विषय स्पष्ट पणें आणून देतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु आरंभीं एवढी ही गोष्ट सांगण्यास चिंता नाहीं कीं, हिंदुस्थानांत एक राजा मेला म्हणजे त्याचें राज्य त्याच्या वडील मुलास मिळावें अथवा दुसऱ्या कोणास मिळावें ह्याविषयीं जे कांहीं नियम आहेत त्यांचा कोणी कांहींच विचार करीत नाहींत. त्या राजाचे मुलगे, नातू, पुतणे, भाचे, आणि ह्यांपेक्षांही दूरदूरचे नातलग लोक हक्क सांगूं लागतात व तो सिद्ध करण्याकरितां लागलेंच शस्त्र उचलतात. दक्षिणेंत निजामउलमुलुख व करनाटकचा नवाब सादतुल्ला हे दोघे मेल्यानंतर त्यांच्या अधिकारांविषयीं वर सांगितलेल्या प्रकारचा बखेडा सुरू झाला. निजामउलमुलुखानें मोंगलांच्या राज्यांत मोठमोठीं कृत्यें केलीं होतीं ह्यावरून त्या पु- फ्रेंचांचे बेत अधिकाराविषयीं हिंदूंचे नियम.

ग्र० १० इ० स० १७४९

रुषाचें स्मरण सर्वांस असेलच. निजामउल्मुलुख व सादतुल्ला ह्या दोघांचीं संस्थानें पूर्वी दिल्लीच्या बादशाही खालींच होतीं, परंतु पुढें तेथील बादशाह दुर्बल झाल्यामुळें तीं होतां होतां कालेंकरून स्वतंत्र झालीं. ह्या दोन संस्थानांपैकीं पहिल्यावर नासिरजंगाचा हक्क होता व दुसऱ्यावर अनवरुद्दीन ह्याचा हक्क होता. निदान त्यांच्या हातीं त्या संस्थानाची वहिवाट होती. परंतु हें सर्व एकीकडे राहून मुजफरजंग हा दक्षिणेच्या सुभेदारीविषयीं हक्क करूं लागलां, आणि चंदासाहेब करनाटकाच्या नवाबीविषयीं हक्क करूं लागला. ते दोघे एक होऊन त्यांनीं चाळीस हजार फौज जमविली आणि डुप्लीपाशीं साह्य मागितलें. ह्या फ्रेंच गवर्नरास आपलें मान वाढवावें अशी इच्छा होतीच. त्यानें असें पाहिलें कीं, दक्षिण हिंदुस्थानांत हीं दोन मोठीं संस्थानें आहेत हीं आपल्या मदतीनें ह्या उभयतांस मिळालीं म्हणजे आपली सत्ता येथें निर्विवाद चालू होईल व आपली फौजही हें काम सिद्धास नेण्यास हावी तितकी आहे. असा विचार करून त्यानें त्या कामाकरितां दिआटवील ह्या सरदारावरोबर ४०० युरोपियन गोरे शिपाई व ४९०० काळे शिपाई देऊन त्यांस मुजफरजंग व चंदासाहेब ह्यांचें सैन्य एकत्र जमलें होतें त्यास जाऊन मिळावयास सांगितलें. तो त्यास जाऊन मिळाल्यानंतर ती सगळी फौज अनवरुद्दीन म्हणून जो करनाटकचा नवाब होता त्याजवर हल्ला करण्याकरितां गेली. तोही वीस हजार लोक जमवून अंबूर म्हणून एक मोठा बळकट किल्ला होता, त्यावर छावणी घालून राहिला होता. हें स्थळ करनाटकांत जाण्याच्या मोऱ्या मार्गावर आहे. त्यानें रावीन नदीच्या पलीकडे लहानशी छावणी घातली आणि तेथें कांहीं तोफा ठेवून त्यांजवर थोडीशी गोरे लोकांची फौज ठेविली होती आणि त्या छावणी सभोवतीं मोरचेबंदी केली होती. दिआटवी ह्यास फ्रेंच लोकांचें शौर्य व शिक्षा हीं कशीं काय आहेत हें सर्वांस दाखविण्याची फार इच्छा होती म्हणून तो आपल्या थोड्याशा फ्रेंच लोकांकडून त्या छावणीवर हल्ला करविण्यास तयार झाला. त्या दोघां मुसलमान सरदारांनींही तें त्यांचें म्हणणें मान्य केलें. ही

दक्षिण हिंदुस्थानांत सत्ता मिळविण्याविषयीं डुप्लीचे बेत.

गोष्ट सिद्धीस जाण्यास फार कठीण पडेल असें वाटलें नव्हतें, परंतु पुढें कांहींसें कठीण पडलें. शत्रूकडच्या तोफा चांगल्या होत्या व त्या चांगल्या रितीनें चालविल्या होत्या ह्यामुळें त्या फौजेनें दोन वेळ हल्ला माघारा फिरविला. परंतु हल्ला करणाऱ्या लोकांस आपण तीन फौजांसमक्ष लढत आहों असें वाटून त्यांनीं तिसऱ्यांदा हल्ला केला आणि तें ठाणें घेतले. मग तेथून त्यांनीं मुख्य फौजेवर चाल केली. तेथें नवाबानें हत्तीवर बसून जरीपटका पुढें चालविला होता. आणि त्याचे निवडक स्वार त्याच्या भोंवताले होते. तो आपल्या फौजेस उत्तेजन देत होता. परंतु एका काफरी शिपायानें वार काढला त्याची गोळी त्या नवाबाच्या छातींतून पार गेल्यामुळें तो पडला. मग फौज लागलीच बारा वाटांस पळाली आणि ती छावणी, साठ हत्ती, सगळा तोफखाना, व धान्य वगैरे पुष्कळ लूट फ्रेंच लोकांचा जय होऊन त्यांस सांपडली. मग मुजफर व चंदासाहेब ह्या दोघां सरदारांनीं तत्काल अर्काटावर स्वारी करण्याचा निश्चय केला. आणि तेथें लढाई न करितां तें ठाणें त्यांच्या हातीं आलें.

प्र० १० इ० स० १७८२

अंबूर घेतलें.

अनवरुद्दिन मरण पावला.

अनवरुद्दीन ह्याचा मुलगा महंमदअल्ली हा त्याच्यामागें त्याच्या गादीचा वारस होता तो त्रिचनापल्ली म्हणून मोठें बळकट शहर होतें तेथें पळाला. हें शहर त्याच्या हातीं होतें. ह्यामुळें करनाटकावर अद्यापि त्याचा वारसा होता. डुप्ली ह्यानें त्या मिलाफी सरदारास अशी पराकाष्ठेची निकड लाविली कीं, त्रिचनापल्लीच्या किल्लयावर संरक्षण चांगल्या रितीचें प्रायः नसेल, ह्यासाठीं एक क्षणभर विलंब न करितां तुम्ही त्या किल्लयावर हल्ला करण्याकरितां जावें. तथापि त्या मुसलमान सरदारांस आपण पूर्वी अर्काट व पोंदेशरी ह्या ठिकाणीं जावें असें वाटलें. आणि तेथें एक दक्षिणेचा सुभेदार झाला व दुसरा करनाटकंचा नवाब झाला म्हणून उभयतांनींही लोकांत मोठा डामडौल दाखविला. शेवटीं ते स्वारी करण्याकरितां बाहेर निघाले, ते वेळेसही त्रिचनापल्लीस जावें असें डुप्लीचें म्हणणें होतें तसें न करितां ते तंजावरावर गेले. हें शहर तेथून दूर होतें व स्वारी करण्यासारखेंही नव्हतें.

महंमदअल्ली.

प्र० १० इ० स० १७४९

तथापि स्वारी करण्याचा त्यांचा गुप्त हेतु होता. त्यांच्या खजिन्यांत पैक्याची शिलक अगदीं नव्हती, तेव्हां त्यांस असें वाटलें कीं आपणांस पैसा तर अवश्य पाहिजे ह्याकरितां तंजावरच्या राजाकडे पुष्कळ खंडणी येणें आहे ती तो-न देईल तर त्याजपासून बलात्कारानें मागून घ्यावी. तंजावर हें शहर कावेरीनदीच्या काठीं आहे. हें शहर संपत्तिमान व मोठें डौलदार आहे. ह्यांत एक देवळाची इमारत आहे. ही इमारत इतकी मोठी व उत्कृष्ट आहे कीं तिजपुढें दक्षिण हिंदुस्थानांतील इतर सर्व इमारती अगदीं तुच्छ आहेत. ह्या संस्थानाचे श्रीमान राजाबरोबर त्यांनीं असें बोलणें लाविलें कीं, आम्ही मोंगलाचे मुखत्यार आहों, तर तुम्ही त्याची खंडणी देणें आहे ती आम्हांस द्यावी. त्यांनीं जरा जोर दाखवून राजास खंडणी देण्याविषयीं तसदी लाविली असती तर प्रायः ती गोष्ट लौकरच शेवटास गेली असती. परंतु तसें न करितां तो राजा त्यांस जसा झुलवूं लागला तसे तेही ऐकत गेले. तो राजा कधीं कधीं त्यांजबरोबर तह करी व कधीं कधीं लढाई करी. असें होतां होतां शेवटीं त्या मुसलमान सरदारांनीं त्या शहराची एक वेस पाडली तेव्हां त्या राजास धाक पडून त्यानें त्यांस नव्वद लाख रुपये देण्याचें कबूल केलें. त्यांपैकीं पहिला हप्ता तत्काल देण्याचें मोठ्या जुलुमानें मान्य केलें त्यानें वेळ घालविण्याकरितां अशी युक्ति काढिली कीं प्रथम कांहीं सोन्याचे व रुप्याचे पत्रे पाठविले. मग कांहीं जुनें नाणें पाठविलें आणि शेवटीं कांहीं जवाहीर पाठविलें. इतक्यांत त्या रणभूमीवर नवीन पराक्रमी पुरुष आल्याचें वर्त्तमान त्या राजास लागलें. ह्या नवीन प्रतापी पुरुषाच्या हातून तें राज्यचक्र सर्व फिरावें असा ईश्वरी संकेत होता.

तंजोरावर हल्ला.

तेथील राजाची युक्ति.

नासिरजंग.

निजामाचा वडील मुलगा ग्यासुद्दीन ह्यानें मोंगलांच्या दरबारांत मोठा पराक्रम केला हें आम्ही पूर्वी लिहिलेंच आहे. तो ह्या वेळेसही त्याच दरबारांत होता ह्यामुळेंच निजामाचा दुसरा मुलगा नासिरजंग ह्यास दक्षिणेची सुभेदारी मिळाली. व तो त्या अधिकाराचा किताब आपणास घेऊन त्या हुद्याचें पूर्ण ऐश्वर्य भोगूं लागला. कांहीं विशेष कारण घडल्यावरून त्यास बादशाहाच्या

फौजेस येऊन मिळण्याचा हुकूम आला होता म्हणून तो नर्मदेपर्यंत जाऊन पोहोंचला तों त्यास मुझफरजंग व चंदासाहेब हे दोघे दोन संस्थानें बळकावून स्वस्थ बसले आहेत असें कळलें. तो माघारा फिरला आणि बादशाहाकडून आपणास अधिकार मिळाला आहे असें दाखवून त्या पक्षाचे सर्व लोक व आपले लोक ह्या धट्ट सरदारांनीं केलेल्या बंडाचें पारिपत्य करण्याकरितां त्यानें एकत्र जमविले. त्यानें तीस हजार मराठे लोकांस स्वारांच्या जागा दिल्या. आशिया खंडांत फौज इकडून तिकडे जाऊं लागली म्हणजे तिजबरोबर उंट वगैरे डामडौल फार असतो ह्यामुळें तिच्या मजला लहान लहान होतात त्याप्रमाणेंच तो लहान लहान मजला करीत करीत करनाटकाच्या हद्दीवर येऊन पोहोंचला. आर्मी म्हणून एक इतिहास लिहिणारा आहे त्याचें मत असें आहे कीं तेथें येऊन पोहोंचे तों ह्या पुरुषाजवळ तीन लाख सेना जमली. तेव्हां एकत्र जमलेल्या सरदारांस आपलें संरक्षण करण्याकरितां तयारी करणें हें योग्य होतें. डुप्लीनें त्यांस आपणाकडून झालें तितकें साहाय्य केलें. त्यांस कांहीं द्रव्याची अडचण आहे असें त्यास समजल्यावरून त्यानें पांच लक्ष रुपये कर्जाऊ दिले आणि आपलें पायदळ दोन हजारपर्यंत वाढविलें. आपले प्रतिपक्षी जे फ्रेंच लोक त्यांचा अलीकडे इकडे पाय शिरकत चालला होता तें पाहून इंग्लिश लोकांस वाईट वाटलें व त्यांस भयही वाटलें, तरी ते लढाया उतावळेपणानें करण्याच्या वगैरे कामांत शिरले नाहींत. त्यांनीं महंमदअल्लीस आश्रय दिला होता तो इतकाच, कीं त्रिचनापल्ली व तंजावर ह्या ठिकाणीं त्यांनीं आपली थोडकीशी फौज त्याच्या कुमकेकरितां पाठविली होती परंतु नासिरजंग गोंगलापासून पर्ण अधिकार घेऊन येवढ्या मोठ्या फौजेनिशीं जेव्हां आला तेव्हां मात्र मेजर लारेन्स साहेब तिलप्राय अनमान न करितां आपल्या साहाशें लोकांनिशीं जाऊन त्यास मिळाला. त्या सुभेदाराचा जय होण्यास ह्या फौजेचें अगत्य होतें असें नाहीं. आतां फ्रेंच लोकांचे शिपाई लढाऊ होते परंतु त्यांजवर देखरेख चांगली नसल्यामुळें त्यांच्यांत अव्यवस्था फार होती. त्यांच्या सरदार लोकांत तंटा

प्र० १० इ० स० १७४९ तंजोरची मोकळीक होण्याचा समय येतो.

एकत्र जमलेल्या सरदारांचे संरक्षणाचे उपाय.

महंमदअल्लीस इंग्लिशाची कुमक.

प्र० १०
इ० स०
१७४९

होऊन त्यांपैकीं तेरा असामींनीं एके दिवशीं आपल्या जाग्यांचे रा-
जीनामे दिले. दी आटवे ह्यास ह्या गोष्टीनें त्रास होऊन त्याचें
देहभान अगदीं सुटलें, आणि त्यानें लागलाच आपल्या फौजेसुद्धां
पोंदेशरीस निघून जाण्याचा निश्चय केला. तेव्हां ज्या दोन
सरदारांकरितां फ्रेंचांनीं शस्त्र उचललें होतें त्यांस कोणी साह्य
नसल्यामुळें त्यांची अवस्था फार कठीण झाली. चंदासाहेबानें
फ्रेंचांच्या ठाण्यांत जाऊन त्यांचा आश्रय केला. आणि मुजफर-
जंग शहाणपणानें नासिरजंगास शरण गेला त्यास त्यानें लागल्याच
बिड्या घातल्या.

एकत्र जमले-
ल्या फौजेचा वे-
त मोडतो.

डुप्लीचें धैर्य,

डुप्ली ह्याचें जें महत्व आलीकडे इतकें वाढलें होतें तें ह्यावेळेस
अगदीं कमी झालें. तरी त्यानें आपलें धैर्य सोडलें नाहीं. ना-
सिरजंगावरोबर तह करण्याकरितां त्यानें यत्न केला. ह्या तहाच्या
कामाकरितां त्यानें जे वकील पाठविले होते त्यांचें कार्य झालें नाहीं
तरी त्यांपासून असें समजलें कीं नासिरजंग हा आळशी व विलासी
असल्यामुळें त्याच्या फौजेंतील कांहीं मुख्य आफगाणी सरदार
त्याला पदच्युत करण्याच्या मसलतींत आहेत. डुप्ली ह्यानें ह्या
बंडवाल्या सरदारांबरोबर संधान केलें. आणि त्यांनीं कपटानें
जो बेत केला तो सिद्धीस नेण्यासाठीं त्यांस त्यानें फौजेची कुमक
केली. दी आटवे हा पुन्हा फौज घेऊन निघाला आणि मोंगलांचे सर्व
शिपाई लोक अफूच्या नादांत धुंद असतां त्यांच्या लष्करांत शिरून
त्यानें कांहीं तंबूंत एकाएकीं शिरून तेथें मोठी कत्तल केली. दु-
सरी टोळी जलमार्गानें पाठविली होती तिनें मच्छलीपट्टन जिंकून
घेऊन त्यासभोंवतीं कोट घालावयास प्रारंभ केला. हें ह्या भागांत

नासिरजंगाचा
द्वेष.
बंडवाल्यांशीं फ्रें-
चांचा सल्ला.

इंग्लिशांनीं ना-
सिरजंगास सो-
डलें.

फार प्राचीन काळापासून मुख्य बंदर होतें. इकडे नासिरजंग
ह्याच्या वर्तणुकीला अगदीं धरबंद नव्हता ह्यामुळें व आम्ही तुमच्या
सांगण्याप्रमाणें चालणार नाहीं असें त्यानें मेजर लारेन्स ह्यास
स्पष्ट सांगितल्यामुळें मेजर लारेन्स ह्यानें आपली फौज त्या सुभे-
दाराच्या चाकरींतून काढली. ह्यामुळें दी आटवे ह्यास पाहिजे
तसा हल्ला वगैरे करण्यास संधी सांपडली. त्यानें एक टोळी
पाठवून नवाबाचा पराजय करून त्यास अर्काटास निघून जा-

प्यास भाग पाडले. इकडे करनाटकांतील अतिशय बळकट जो जिंजी किला त्याजवर हल्ला करण्याकरितां त्यानें फौज रवाना केली. त्या फौजेनें मध्यरात्रीं हल्ला करून आपली वीस मनुष्यांपेक्षां जास्ती मनुष्यें पडूं न देतां एकामागून एक असें तीनही किले घेतले. ह्या एवढ्या मोठ्या प्रांतांत बळकट व सुरक्षित अशी जागा एवढीच होती. प्र० १० इ० स० १७४९ जिंजी घेतली.

आपल्या आळसानें व विलासीपणानें आपलें हें नुकसान झालें असें पाहून नासिरजंगास आवेश आला आणि तो पुन्हा युद्धास तयार झाला. त्याच्या फौजेंतील पुष्कळ लोक कमी झाले होते तरी ह्यावेळेस सुमारें १०००० होते. ह्याच्या फौजेंतील फितुरी लोकांचा बेत सिद्धीस जाण्यास ही गोष्ट फारच अनुकूळ होती तरी पुढें कांहीं दिवसपर्यंत सांगण्यासारखी एकादी गोष्ट घडली नाहीं. ही लढाई स्तिमितपणानें चालली होती व तींत गुंतल्यामुळें ऐष आरामाचा उपभोग करावयास अगदींच सांपडेना, ह्यामुळें नासिरजंग ह्यानें डुप्लीचा नफा होईल अशा रीतीचें त्याजबरोबर तहाचें बोलणें लावलें हें तहाचें बोलणें चालू असतां डुप्लीनें इकडील राजांप्रमाणें कपटानें त्या फितुरी सरदारावरोबरही संधान चालविलें होतें. असें म्हणतात कीं नासिरजंगाबरोबर तह होऊन त्या तहनाम्यावर सहीही झाली होती. तरी तें वर्तमान नवीन झालेला फ्रेंच सेनापति लाच ह्यास कळविलें नव्हतें. तेव्हां त्या फितुरी आफगाणी लोकांनीं आपला बेत शेवटास नेण्यासाठीं मदत करण्याकरितां त्यास बोलाविलें. तो सरदार युद्धास आला आणि दुसरे दिवशीं पहाटेस चारवाजतां नासिरजंग आपल्या छावणींत ज्या ठिकाणीं स्वतां फौजेची देखरेख करीत होता त्याठिकाणीं त्यानें हल्ला केला. नासिरजंग ह्याचे घोडेस्वार मोठ्या शौर्यानें लढले ह्यामुळें ही लढाई मोठ्या निकराची झाली. परंतु फ्रेंचांची फौज सुशिक्षित ह्यामुळें व त्यांच्या तोफा फार जलदीनें सुटत असत ह्यामुळें त्यांनीं शत्रूच्या सेनेची दाणादाण करून दिली. नासिरजंग स्वतां शूर होता. आपले शिपाई लोक एवढ्याशा यूरोपियन लोकांबरोबर लढण्यास मागें घेतात असें पाहून त्यास मोठा

नासिरजंग लढाईस आला.

फ्रेंच सरदार लाचह्याचीं कृत्यें

प्र० १० इ० स० १७५०

संताप आला. आपल्या पदरच्या कांहीं सरदारांच्या हातांखालीं पुष्कळ लोक आहेत पण ते सरदार व त्यांच्या पक्षाचे लोक बिलकूल लढत नाहींत असें त्यास कोणीं सांगितल्यावरून तो स्वतां घोड्यावर बसून ते फितुरी सरदार होते तेथें आला आणि जे लढत नव्हते त्यांची त्यानें तुम्ही भित्रे आहां म्हणून अगदीं निर्भर्त्सना केली. तो प्रथम कडापा ह्या नांवाचे एका सरदाराबरोबर बोलूं लागला तेव्हां त्या सरदारानें त्यास बेअदबीचा जाब करून त्याबर आपली कडाबीन झाडली त्याबरोबर नासिरजंगाच्या उरांत जोडगोळी लागून तो मरून भुईवर पडला. मग काय! इकडील फौजेला एका राजाचा दुसऱ्यानें पराजय केला अथवा त्याला मारिला असतां त्या पराजय करणाराकडे जाऊन मिळणें म्हणजे केवळ एका क्षणाचें काम आहे. असो ह्याप्रमाणेंच ह्यासमयीं स्थिति झाली. नंतर लागलाच मुझफरजंग ह्यास कैदेंतून काढून पुढें केला आणि सर्व संमतानें त्यास दक्षिणचा सुभा दिला. हा प्रदेश यूरोपांतील रूस देशाचें राज्य खेरीज करून दुसऱ्या कोणत्या राज्याशीं तोलून पाहिला असतां फार मोठा आहे.

नासिरजंगाचा मृत्यु

मुझफरजंग गादीवर बसतो.

ह्या बंडापासून फ्रेंचांचा अमल दक्षिण हिंदुस्थानांत पुरता बसला. मुझफरजंग ह्याचा डुप्लीवर पक्का विश्वास बसून तो पोंदेशरीस त्यास भेटावयास गेला. तेथें डुप्ली ह्यानें मोठ्या समारंभानें त्यास दक्षिणेच्या सुभ्याच्या गादीवर बसविलें. मुझफरजंगानेंही डुप्लीस मोंगलाचा गवर्नर नेमून त्याजकडे कृष्णानदीच्या दक्षिणेकडील सर्व प्रांताच्या वसुलाचें काम सांगितलें. हा दक्षिणेकडचा प्रदेश मोठेपणानें फ्रान्स देशायेवढा आहे असें ह्मणण्यास चिंता नाहीं. पोंदेशरी, कारिकल, आणि मच्छलीपट्टन ह्या तीन शहरा भोंवतालचा बराच प्रांत मुझफरजंगानें त्यास नेहमी देऊन टाकिला. ईश्वरी नियम अथवा मानवी नियम ह्यांतील कोणताच जे लोक मानीत नाहींत त्यांशीं संबंध केला असतां मनुष्य संकटांत पडून त्यास काळजी लागायाची हें आहेच; त्याप्रमाणेंच ह्यावेळेस फ्रेंचांचा जय झाला खरा परंतु ते अडचणींत पडून त्यांस मोठी काळजी लागली. ती अशी कीं नासिरजंगास ज्या पठाणांनीं ठार मारिलें

फ्रेंच सत्ता मिळविताना.

होतें ते मुझफरजंगाजवळ न्या कामगिरिबद्दल बहुत द्रव्य मागूं लागले. इकडील रिवाजाप्रमाणें पाहिलें असतां त्यांचें मागणें रास्त होतें. इतकें द्रव्य देऊन आणखीही ते कितो मागते तितकें दिलें असतें ह्मणजे मुझफरजंग बहुतकरून मिकेसच लागला असता. डुप्लीनें न्या पठाणांस असें दर्शविलें कीं तुम्हांस थोडकेंसें द्रव्य घेऊंन तोडजोड केली पाहिजे. ती गोष्ट त्यांनींही न्यायेनेंस मान्य केली असें दिसलें. आतां ती गोष्ट मान्य करण्याचें कारण आपण डुप्लीच्या अमलांत आहों असें त्यांस वाटलें असावें हेंच दिसतें. असें न्या पठाणांशीं बोलणें चालणें झालें असतांही मुझफरजंग पोंदेशरीहून दक्षिणेंत चालला तेव्हां त्यास असें समजलें कीं, तेच विश्वास घातकी पठाण लोक आपणास मार्गांत अडविण्याकरितां शस्त्रधारी होऊन पुढील दरे खिंडी वगैरे ठिकाणीं जमून राहिले आहेत. ही बातमी लागली असतांही आपलें शौर्य ह्या लोकांस दाखवावें असें मुजफरजंगाच्या मनांत येऊन तो फ्रेंच लोकांची वाट न पाहतां एकाएकी पुढें चाल करून गेला ह्यामुळें त्याचें कांहीं नुकसान झालें. नंतर फ्रेंच लोक येऊन मिळाल्यावर न्या सुभेदाराचा जय होईल असें चिन्ह दिसत होतें इतक्यांतच कानौलच्या नवाबाबरोबर द्वंद्व युद्ध करण्याची मुजफरजंगानें प्रतिज्ञा केली. त्या युद्धांत त्या नवाबाची बरची मुजफरजंगाच्या मस्तकांत शिरून तो तत्काल मरण पावला. ही गोष्ट घडून येतांच, बुसी नामें फ्रेंचांचा कारभारी होता त्यास हिंदुस्थानांतील कामकारभारांत आपल्या लोकांचें वजन आतां अगदीं राहणार नाहीं असें वाटून प्रथम मोठें भय पडलें. परंतु तितक्यांत त्यास मयत राजाचे तीन भाऊ आपल्या लष्करांत कैदेंत आहेत असें स्मरण झालें. मुजफरजंगाचा मुलगा लहान होता त्यास गादीवर न बसवितां त्यानें नेटीव लोकांपैकीं मुख्यांची संमति घेऊन सर्व भावांमध्यें वडील जो सलाबतजंग त्यास गादीवर बसविलें. आपणास गादी मिळाली हा उपकार फ्रेंच लोकांचा आहे असें ह्या नवीन सुभेदारास (सलाबतजंगास) वाटल्यावरून तो आपल्या पूर्वीच्या अधिकाऱ्याप्रमाणेंच मोठ्या उत्कंठेनें त्याचें हिताहित पाहूं लागला.

प्र० १.० इ० स० १७५०

पठाणसरदारांची मागणी.

तो पहिलेच लढाईंत पडला.

सलाबतजंग गादीवर बसतो.

प्र० १०
इ० स०
१७५१
इंग्रीस वाईट वाटतें.

ह्याप्रमाणें शत्रूंची इतकी वढती होत असतांही इंग्लिशांच्या मनांत कांहीं दिवसपर्यंत अगदीं वांकडें आलें नाहीं. मेजर लारेन्स हा मुन्सदी नव्हता व त्यानें नासिरजंगास सोडून दिल्यामुळें हिंदुस्थानांतील कामकारभारांत त्याचें वजन राहिलें नाहीं. पुढें फ्रेंचांचा विजय होण्याच्या ऐन वक्तावर तो कांहीं घरगुती कामाकरितां हिंदुस्थान सोडून विलायतेस निघून गेला. शेवटीं लुई राजाचे लोक म्हणजे फ्रेंच हे फार उद्दामपणानें वागूं लागले ह्यामुळें ब्रिटिश लोकांची पुरी खातरी झाली कीं ह्यांच्या हातांत हिंदुस्थानाचा कारभार चालू राहिला असतां आपणास मोठें भय आहे. असें त्यांस वाटल्यावरून त्यांनीं त्रिचनापल्लीच्या रक्षणाकरितां कपतान कोप ह्याच्या हाताखालीं फौजेची एक टोळी देऊन त्यास पाठविलें. ज्या महंमदअल्लीचा पक्ष इंग्लिशांनीं धरला होता त्याच्या ताब्यांत करनाटकांत एवढाच कायतो वळकट किला राहिला होता. त्रिचनापल्लीस जातांना मधुरा शहर घेण्याकरितां तो सरदार उद्योग करीत असतां त्यास जय न मिळतां

निष्फल प्रयत्न.

त्याच्या टोळीपैकीं पुष्कळ लोक मेले. नंतर कपतान जिंजन ह्याजवरोबर मोठी फौजेची टोळी देऊन त्यास सेंत देविद किल्ल्याहून रवाना केलें. परंतु इंग्लिश लोकांनीं ह्या देशांत लढाया वगैरे करून जो जय मिळाला त्याचें पूर्व चिन्ह ह्या सरदारानें कांहींच दाखविलें नाहीं. ह्या दोघांही सरदारांची आणि शत्रूची गांठ वोलकोड्याच्या किल्ल्यापाशीं पडली तेव्हां काळे लोक शत्रूसमोर धैर्य धरून उभे राहिले असतां गोरे लोक तत्काल शत्रूच्या भयानें माघारां पळाले ह्या कारणानें त्यांच्या मदतीस जे काळे लोक होते ते लढाईच्या कामांत सुशिक्षीत नसतांही त्यांजपुढें त्यांनीं आपली अप्रतिष्ठा करून घेतली. पुढील दोन प्रसंगीं ते इंग्लिश लोक ह्यांपेक्षां चांगले लढले. परंतु सरतेशेवटीं समरंगणांत शत्रूवर जय मिळविण्याविषयीं प्रयत्न न करितां त्यांनीं त्रिचनापल्लींत जाऊन पडण्याविषयीं जलदी केली.

इंग्लिशांची अयोग्य वर्तणूक.

इंग्लिशांस कुमक येते

त्यानंतर इंग्लिशांनीं दुसरी एक टोळी पाठविली तेव्हां ती आणि पूर्वीचे कांहीं लोक होते ते मिळून एकंदर सुमारें सहाशें गोरे

लोक त्या ठिकाणीं जमले. चंदासाहेब हा हल्लीं अर्काटचा नवाब होता त्याचीं फौज व फ्रेंचांची फौज मिळून इंग्लिशांच्या फौजेपेक्षां फारच अधिक असून ते उभयतां त्रिचनापल्लीस वेढा घालीत होते, ह्यामुळें इंग्लिशांस असें मोठें भय पडलें कीं, फ्रेंच लोकांच्या अमलांत जावयाचें कायतें एवढेंच ठिकाण उरलें आहे तेंही घेण्यास त्यांस फारसे अयास लागतील असें नाहीं अशा ऐन बाणीदार प्रसंगावर एक नवीनच योद्धा रणभूमीवर येऊन मोठालीं पराक्रमाचीं कृत्यें करूं लागला. तो कोण म्हणाल तर क्लैवसाहेब. इंग्लंदांत शापशियर म्हणून एक प्रांत आहे तेथील एका गृहस्थाचा हा मुलगा. ह्याच्या बापापाशीं कांहीं थोडीशी जागा होती. हा कंपनीच्या अमलाखालीं मुलकी खात्यांत चाकरी पतकरून हिंदुस्थानांत आला, परंतु ह्याच्या बेअदबीच्या व उद्धटपणाच्या वर्तणुकीमुळें वरिष्ठ अधिकाऱ्यांस ह्याचा त्रास येऊन त्यांची ह्याजवर गैरमर्जी झाली व त्यांस असें वाटलें कीं ह्या मनुष्यास सुशिक्षा अगदीं लागावयाचीच नाहीं. इतक्यांत लढाई सुरू झाल्यावर एनसाइनची जागा पतकरून फौजेंत जाण्याची त्यास परवानगी मिळाली आणि ह्याच्या अंगीं शौर्यादि गुण दिसल्यामुळें हा ज्या खात्यांत होता त्यापेक्षां ह्या लढाईच्या खात्यांत ह्याची हुशारी विशेष आहे असें हा लष्करी खात्यांत शिरल्यावर लौकरच सर्वांस वाटलें. ह्या खात्यांत इतकी हुशारी ह्यानें दाखविली कीं तिजपासून ह्याची कितीएक भरंवशाच्या जागेवर नेमणूक व्हावी. नवाबाची अर्काट ही राजधानी आहे तिजवर हल्ला न्यावा म्हणजे त्रिचनापल्लीचा वेढा मोकळा होईल अशी युक्ति ह्यानें सरकारास सुचविल्यावरून ह्याच्या ताब्यांत सरकारांतून पांचशें लोक दिले. त्यांपैकीं दोनशें युरोपियन होते. त्यांतही कांहीं मुलकीच्या खात्यांतून आपल्या खुषीनें आले होते. हे लोक घेऊन मोठ्या हिय्यानें तो हा म्वारीवर गेला. तो अर्काटास पोहोंचला तेव्हां पाऊस, वारा, गर्जना, ह्याचें तुफान असतां त्याचे लोक निर्भयपणें पुढें चाल करून येताहेत इतकें पाहूनच किल्लेकऱ्यांस भय सुटून त्यांनीं शहर लागलेंच मोकळें करून दिलें. त्यानें त्या लोकांस त्या भयापासून स्वस्थ होऊं दिलें नाहीं. तर

प्र० १० इ० स० १७५१

क्लैव साहेब आला.

लष्करी कामांत त्याची बुद्धि.

इ० स० १७५२

म० १० इं० स० १७५२

लगेहात त्यांचा पाठलाग करून त्यांस हिकडून तिकडे तिकडून हिकडे पळून जाणें भाग पाडलें.

हा हल्ला नेण्याचा उद्देश तर तत्काल सिद्धीस गेला. तो असा कीं त्रिचनापल्लीस ज्या फौजेनें वेढा घातला होता तिजपैकीं पुष्कळ फौज अर्काट परत घेण्याकरितां नवाबानें तिकडे नेली. तेथें नवाबाची चार हजार फौज जमली व दोन हजार लोक वेलोराहून त्याच्या कुमकेस आले. क्लैवसाहेब मोठा छातीचा पुरुष होता त्यानें नवाबाचे लोक शहरांत जाऊन राहिले होते त्यांस दहशत घालण्याकरितां शहरावर हल्ला करावयास प्रारंभ केला. पण ह्याप्रसंगीं ही गोष्ट त्यानें चांगली केली नाहीं. कारण शिपाई लोक कितीही अशिक्षित असेनात ते जर भिंतीच्या अगर दुसरे एकाद्याच्या आश्रयास उभे राहून लढतील तर ते मोठ्या शूरांचीही तरोबरी करतील ह्यांत संशय नाहीं. त्यः नवाबाच्या लोकांनीं घरांतून इंग्लिशांवर बंदुकांचा भडिमार केला तेव्हां अर्थातच इंग्लिश सेनापतीचें फार नुकसान होऊन त्यास माघारां फिरावें लागलें. अस्तु. ह्यानंतर क्लैवसाहेबाला एक मोठें अडचणीचें काम करावयाचें येऊन पडलें. तें असें, कीं अर्काटच्या किल्ल्याचा घेर सुमारें एक मैलभर होता, त्याच्या तटबंदीचें काम अगदीं कच्चें होतें व किल्ल्या सभोंवतालचा खंदक उतरून आंत येण्यासारख्या पुष्कळ ठिकाणीं वाटा होत्या. असें असतां ह्या किल्ल्याचें संरक्षण तर करावयाचें आणि ह्याजपाशीं लोक सारे कायते तीनशें. परंतु ईश्वरानें त्याच्या आंगीं जें चमत्कारिक युद्ध कौशल्य ठेविलें होतें तें दाखविण्याचा त्याकाळीं उत्कृष्ट प्रसंग आला. लेफ्तेनेन्त इनिस मद्रासेहून कांहीं फौज घेऊन आला, तों नवाबाची फौज ह्याच्या आणि क्लैवसाहेबाच्या मध्यें पडली ह्यामुळें त्याची त्याची भेट न होतां त्यास परत जावें लागलें. परंतु मुरारराव ह्याच्या दिमतीस सहा हजार फौज होती, आणि तो नवाबाच्या पक्षाचा असतांही त्या पक्षाचा जय होणार नाहीं असें त्यास दिसलें. तेव्हां त्यानें त्याचा पक्ष सोडून दिला आणि त्या इंग्लिश सरदाराचें शौर्य पाहून त्यास मोठा आवेश आला. त्यानें मी तुला साह्य करीन असें त्यास वचन दिलें. शे-

धैर्याचें वर्णन.

क्लैवचे कृत्यापासून संकटें.

वर्टी नवंवराच्या चौदाव्या तारखेस मुसलमान लोकांचा मोठा स- प्र० १० इ० स० १७५२
णाचा दिवस पडला होता; आणि तो दिवस हिंदु लोकांत जसी विजयादशमी तसा युद्धादिक कार्यास फारच प्रशस्त मानलेला आहे; म्हणून शत्रूनें ते दिवशीं सकाळीं किल्ल्यावर मोठा हल्ला केला. फौजेंतील लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या केल्या होत्या आणि एक टोळी हल्ला करण्याकरितां मोठ्या आवेशानें पुढें सरे आणि ती टोळी माघारां परतली म्हणजे दुसरी लागलीच चाल करून येई. तोफेजवळ त्रैवसाहेबास स्वतां उभे राहून सरबती करण्याकरितां मदत करावी लागली. शेवटीं शत्रु मागें हटून त्यांनीं वेढा उठविला. ह्याप्रमाणें त्या तरुण शूर सरदाराचा अमल तेथें झाल्यावर तो त्या प्रांतांत चौंहीकडे स्वारी करून किती एक मोठमोठीं ठिकाणें होतीं तीं आपल्या ताब्यांत घेऊन मद्रासेस परत आला. हल्ला करणाराचा पराजय.

त्रिचनापल्लीचा बचाव करण्याकरितां जी फौज ठेवली होती तिच्या कुमकेस एकामागून एक अशा फौजा येऊन मिळाल्या. मेजर लारेन्स हा विलायतेंतून पुष्कळ नवीन फौज घेऊन आला होता तो ११०० काळे व ४०० गोरे इतके लोक घेऊन त्या शहराच्या संरक्षणाकरितां स्वतां तेथें आला. महंमद अल्ली ह्यानें मुरारराव ह्यास आपणाकडे वळवून त्यास आपल्या दिमतीस ठेविलें व म्हैसूरच्या दिवाणास पुष्कळ प्रांत वगैरे देण्याचें कबूल करून त्यासही आपल्या मदतीस बोलाविलें. हे सगळे मिळून तेथें एकंदर २०००० फौज जमली. इतकी 'फौज जमल्यामुळें इंग्लिश व ह्या पक्षाचे दुसरे लोक ह्यांचें सामर्थ्य शत्रूपेक्षां खामोखाम जास्ती होऊन त्यांनीं मागें पुढें न पाहतां शत्रूवर उघड मैदानांत जाऊन हल्ला करण्याचा निश्चय केला. फ्रेंच व तत्पक्षीय दुसरे लोक ह्यांस ही गोष्ट कळतांच कोलरून आणि कावेरी ह्या दोन नद्यांच्या फांद्यांनीं झालेलें एक वेट आहे त्यांत सेरिंघम म्हणून एक बंदोबस्ताची जागा आहे तेथें एक तटबंदीच्या देवळाचा त्यांनीं जाऊन आश्रय केला. पण एकत्र जमलेल्या फौजेनें येथेंही त्यांचा पिच्छा पुरविला. चंदासाहेबाच्या पक्षाच्या लोकांची जय मिळविण्याची इंग्लिशांस कुमक आली.

फ्रेंचांचा व त्याच्या पक्षाचे लोकांचा मोड.

प्र० १० इ० स० १७५३

निराशा होऊन पुष्कळ त्यास सोडून गेले. शेवटीं तो दुर्दैवी राजा (चंदासाहेब) आम्ही तुमचें संरक्षण करूं असें तंजावरकरांपासून वचन घेऊन त्यांच्या स्वाधीन झाला. परंतु त्यांनीं आपलें वचन मोडून त्याचा लागलाच वध केला. हें चांगलें केलें नाहीं. फ्रेंचांचे शिपाईही कांहीं ठराव करून घेऊन त्यांच्या स्वाधीन झाल्यावर त्यांनीं त्यांस पाडाव केलें असें म्हणून त्यांपैकीं कांहीं सेंत देविदच्या किल्ल्यांत पाठविले व कांहीं त्रिचनापल्लीस पाठविले.

ब्रिटिशांस समाधान वाटणें.

आपल्या अमलांत करनाटक पूर्णपणें आलें असें ब्रिटिश लोकांस वाटून त्यांस अत्यंत समाधान झालें. परंतु फ्रेंचांचें हें नुकसान झाल्यामुळें पोंदेशरीस जिकडे तिकडे हाहाकार झाला. डुप्लेच्या शिरजोर स्वभावामुळें ज्या लोकांस त्याचा कंटाळा आला होता, त्यांच्या मात्र मनांत डुप्लेनें आपला पंगडा पडण्याकरितां जी मसलत केली होती ती फसली ह्यामुळें आनंद झाला, आणि ह्या गोष्टीनें मात्र त्या लोकांच्या दुःखाचें कांहींसें शांतवन झालें. तथापि ह्याच वेळेस ह्या प्रकरणापेक्षां एका मोठ्या प्रकरणांत डुप्ले हा पडून त्यांत ह्याचे वजन वाढत चाललें होतें. तें प्रकरण असें कीं, त्याचा यजंट म्हणजे मुकत्यार बुसी नामें सरदार होता त्यानें सलाबतजंग ह्याच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यास ज्या मनुष्यानें ठार मारिलें होतें त्याचें पारिपत्य सलाबतजंगाकडून आपल्या मदतीनें करवून त्यास (सलाबतजंगास) दक्षिणेच्या गादीवर बसविलें, आणि त्याजबरोबर गोवळकोंडें व औरंगाबाद येथें जाऊन पूर्वेकडील देशांत ज्या डामडौलाच्या रिती आहेत त्याप्रमाणें तेथील राज्यकारभार आपणाकडे करून घेतला. तथापि ह्याचा हक्क मोंगलांच्या दरबारांत मान्य झाला नाहीं. कारण त्यानें तें राज्य ग्यासुद्दीन हा निजाम उलमुलखाचा वडील पुत्र होता सबब त्याचा रास्त हक्क पाहून त्यास दिलें. त्याच वेळेस मराठ्यांच्या फौजांनीं हल्ले करून हा देश अगदीं हैराण करून टाकिला होता ह्यामुळें फ्रेंचांच्या मदतीशिवाय आपला अमल येथें होणार नाहीं असें सलाबतजंगास वाटून त्यानें दिवाणगिरीचें काम बुसी ह्यासच सांगितलें.

डुप्लेची शहाणपणाची वहिवाट.

गेलेला मोठेपणा मिळविण्याविषयीं फ्रेंचांचा उद्योग.

एवढा फायदा झाला खरा परंतु डुप्लेचें तेवढ्यानें समाधान न

होतां करनाटकांत फ्रेंचांचें वर्चस्व पुन्हा व्हावें म्हणून त्यानें एक- म० १८
सारखी मेहेनत चालविली होती. इकडील राजे जो वेत करीत इ० स०
किंवा एकादा पक्ष उचलीत तो शेवटास नेण्याविषयीं त्यांचा अ- १७५३
गदीं धरबंद नसे, असें सदोदीत चालले होतें, ह्यामुळें डुप्लीस
लोकरच्च अनुकूल संधी सांपडली. एरवीं इतकी लोकर सांपडली
नसती. असले बेबंद पुरुष संकटांत पडून मदत मागूं लागले
म्हणजे त्यांस मदती बद्दल पाहिजे तें मागितलें असतां त्यावेळेस
त्यांनीं कबूल करावें हा आपला त्यांचा सांप्रदायच. पण एकदां
त्यांचें कार्य होऊन जिकडच्या तिकडे झालें म्हणजे मग आपलें
वचन राखण्याचें त्यांच्या स्वप्नांत देखील नाहीं. ब्रिनिश व म-
हंमद अल्ली ह्यांचा जय झाल्यानंतर मेजर लरेन्स साहेब ह्यास म- महंमद अल्लीचा
हंमद अल्ली ह्यानें म्हैसूरच्या दिवाणानें मदत करावी ह्याबद्दल त्यास मूर्खपणाचा क-
त्रिचनापल्ली व तिच्या खालचा प्रांत देण्याचा ठराव केला होता रार.
हें कळल्यावरून मोठें आश्चर्य वाटलें आणि ह्या ठरावाप्रमाणें
उलगडा करण्याकरितां महंमद अल्लीकडे त्या दिवाणानें लकडा
लाविला. वरें ह्या ठरावाविषयीं महंमद अल्लीस विचारल्यावर
त्यानें एकदम स्पष्ट सांगितलें कीं, मीं त्यास वचन दिलें खरें,
परंतु त्याप्रमाणें करण्याचें आतां माझे गांवीं बिलकूल नाहीं.
व असा भलताच करार केला असतां त्याप्रमाणें पुढें वागणूक तो पुरा करण्या-
होईलच असा विश्वास बाळगणें म्हणजे मला अगदीं असंभाव्य चा रीत.
दिसतें. महंमद अल्ली म्हणाला मी त्या दिवाणास असें सांगतों कीं
तुम्हांस हल्लीं मधुराशहर दिलें आहे हें घेऊन तुम्हीं स्वस्थ रहावें.
व त्रिचनापल्ली मिळण्याची तुम्हांस आशा आहे तिचें पुढल्यापुढें
काय होईल तें पाहूं. ह्याविषयीं पुष्कळ नाहीं होय करतां करतां
शेवटीं आपणास कांहीं जास्त सख्यां मिळत नाहीं असें पाहून
दिवाणानें आपला संतोष आहे असें महंमद अल्लीस दाखविलें. दि-
वाणाच्या पोटांत द्वेष आहे असें मेजर लरेन्स ह्यास स्पष्ट दिसल्या
वरून त्यानें कंपनीस असें सांगितलें कीं ह्यास त्रिचनापल्ली द्यावी,
नाहीं तर ह्यास व मुरारराव यास धरून बेदेंत ठेवावें, म्हणजे त्यां-
पासून पुढें आपणास कोणताही उपद्रव होणार नाहीं. नाहीं तर

प्र० १०
इ० स०
१७५३

ह्यांजपासून फार त्रास होईल. दैरेक्तरांनीं ह्या दोहींपैकीं कोणतीच गोष्ट मान्य केली नाहीं. तो दिवाण तर त्रिचनापल्ली मिळविण्याविषयीं निराश होऊन महंमद अलीचा सूड कोणत्या उपायांनीं उगवावा ह्याविषयीं विचार करीतच होता. हल्लीं ह्या दिवाणाचें मानस असें आहे हें भोंवतालच्या प्रांतांतील फौजबंद सरदारांस समजल्यावर त्यांसही महंमद अलीवरोवर टक्कर मारण्याविषयीं आवेश आला. ह्या सरदारांमध्यें जिंजी किल्ल्याचा गवर्नर म्हणजे मुख्य कारभारी होता. हा जिंजी किल्ला सर्व किल्ल्यांमध्यें मोठा बळकट होता. आणि इंग्लिश लोक हा किल्ला खालीं करून घेण्याकरितां उद्योग करीत असतां फ्रेंचांनीं त्यांचा पराजय केला होता. डुप्लेनें फौजेची एक मोठी टोळी पाठविली तिनें फोर्तसेंत देविदच्या प्रांतांत शिरून मद्रासेहून जलमार्गानें इंग्लिशांकडील स्विस्स साहेब कांहीं फौज घेऊन तेथें येत-

फ्रेंचांचा कांहीसा जय.

होता त्याचा पराजय केला. मग लारेन्स साहेब निघून आला त्याची आणि स्विस्स ह्याची गांठ फोर्तसेन्त देविद शहरापासून सुमारें एक कोसावर बाहूर म्हणून गांव आहे तेथें पडली. तेव्हां लारेन्स ह्याचे लोक मोठ्या आवेशानें बंदुकीच्या संगिनींनीं शत्रूवर जबरदस्त हल्ला करून त्याच्या फौजेच्या मध्यापर्यंत शिरून गेले. तेव्हां ते शत्रूचे लोक आपलीं हत्यारें टाकून पळाले. त्यांचा असा घोटाळा झाला कीं लारेन्साचे काळे लोक जर लूट मिळविण्याच्या नादांत गुंतले नसते तर त्यांस पळतां पुरे झालें असतें. ही संधी पाहून कपतान क्लैव साहेब ह्यानें कवलांग व चिंगलपटन हे दोन किल्ले आपल्या ताब्यांत घेतले. परंतु हे घेण्यास त्यास फार अडचणी आल्या. ह्यानंतर त्याच्या शरीर प्रकृतीमुळें त्यास विलायतेस जावें लागलें. ह्यामुळें त्याच्या हाताखालच्या फौजेंपासून जीं मोठीं मोठीं कामें व्हावयाचीं तीं तशींच राहिलीं.

इंग्लिशांचा फायदा.

म्हैसूरच्या दिवाणाचा फ्रेंचांवरोवर तहा.

म्हैसूरच्या दिवाणाचें फ्रेंचांवरोवर तहाचें वोलणें लागल्यावर इंग्लिशांचा जय झाला असें वर्तमान त्यास कळलें तेव्हां आपण सख्यां दमखावा असें त्यास वाटलें. परंतु ह्या जयापासून कांहीं हांशिलाची गोष्ट झाली नाहीं असें समजतांच तो आणि मुरारराव ह्या उभय-

तांनीं त्यांजवरोवर तह केला. मुरारराव ह्या गोष्टींत पडला ह्याचें कारण इतकेंच कीं, लुटीपैकीं, त्यास जो हिस्सा आला तो यावा तितका आला नाहीं म्हणून त्यास वाईट वाटलें होतें. वेलूरचा गवर्नर मार्टिज अली ह्यास नवाबाची गादी मिळण्याची आशा दाखवून डुप्लीनें त्यालाही आपणाकडे ओढिलें. आणि फ्रेंचांची फौज व नेटीव सरदारांची फौज मिळून जाऊन त्रिचनापल्लीला वेढा घातला. तेथल्या अधिकाऱ्याच्या हयगईमुळें एवढ्या मोठ्या ठिकाणीं धान्याचा पुरावा जितका असावा तितका नाहीं, केवळ पंधरा दिवसां पुरताच आहे असें अकस्मात समजल्यावरून मेजर लारेन्स ह्यास तेथून पुरावा करण्यासारखें कांहींच सुचेनासें झालें. तेव्हां आपल्या सर्व फौजेनिशीं जलदीनें तेथें जाऊन त्या शहराचा वेढा उठविण्याची तजवीज करणें त्यास प्राप्त पडलें. दिवस उन्हाळ्याचे आणि जाण्याची जलदी फार ह्यामुळें त्याच्या फौजेचे फारच हाल झाले. परंतु तेथें आल्यावर शहरांत शिरण्यास त्यास अगदीं हरकत झाली नाहीं. धान्य वगैरे जे पदार्थ आवश्यक आहेत त्यांचा पुरावा करावा म्हणून दक्षिणेकडच्या प्रांतांतील राजाकडे पत्रें वगैरे पाठविण्याची तजवीज त्यानें चालविली. तंजावरकरांकडून त्यास कांहीं मदत मिळाली. हिंदुस्थानांतील राजे म्हटले म्हणजे जसा रंग दिसेल तसें साह्य वगैरे काय करणें तें करितात. तसेंच तंजावरकरांचेंही होतें. अशा प्रसंगीं त्रिचनापल्लीसारख्या मोठ्या शहरांत सर्व लोकांस अन्न पाण्याचा पुरावा करणें म्हणजे अशक्य ह्यामुळें तेथील चार लक्ष लोकांस तुम्हीं येथून निघून जाऊन कांहीं दिवसपर्यंत दुसरीकडे राहण्याची तजवीज करावी म्हणून त्यानें हुकूम केला. आणि त्या शहराच्या इतक्या लांब तटावर, तेथें २००० लोक होते तेवढे कायते संरक्षण करणारे. एवढ्या मोठ्या शहरांतील लोकांकरितां जें धान्य वाहेरून आलें होतें त्याकरितांच भांडणें लागून फ्रेंच व इंग्लिश ह्या उभयतांचे नेत्र अगदीं तिकडे लागले. फ्रेंचांची फौज इंग्लिशांपेक्षां फारच अधिक असून ते अशा जाग्यावर येऊन राहिले होते कीं, दक्षिणेकडून इंग्लिशांकरितां जें धान्य वगैरे येई तें पुढें नेण्याचा प्रतिबंध

इ० स० १७५४

फ्रेंचांनीं त्रिचनापल्लीस वेढा घातला.

त्रिचना पल्लीचें रक्षण ब्रिटिश करतात.

प्र० १० इ० स० १७५८

करावयास त्यांस सहज सांपडे. अशा प्रसंगीं शूर सरदार लारेन्स साहेब ह्याजवळ फौज फारच थोडी असतां फ्रेंचांवर दोन वेळ हल्ला करून त्यांच्या जागेवरून त्यांस पळविलें, आणि धान्य वगैरे शहरांत येण्याकरितां मार्ग मोकळा केला. इंग्लिशांच्या सैनेचें शौर्य व तिचें फ्रेंचांच्या सैनेवर वर्चस्व ह्यांवेळेस जसें दृष्टीस पडलें तसें खरोखर पूर्वी कधींच पडलें नव्हतें. तथापि ह्या सर्व श्रमापासून जें फल व्हावयाचें त्याला शिपाई लोकांनीं आपल्या आळसामुळें हिसका आणिला. एके दिवशीं पहांटेच्या प्रहर रात्रीं इंग्लिशांच्या पाहरेकऱ्यांस गाढ निद्रा लागली असतां फ्रेंच लोक जाऊन तटास शिड्या लावून वर चढले आणि तेथचे धनी होऊन वसले. आणि ते शहरांत चालले होते तों त्यांच्यापैकीं कितीएक शिपाई लोक एका खोल खाचेंत पडून त्यांनीं आरोळ्या मारिल्या, त्या दुसऱ्या लोकांनीं ऐकिल्या आणि त्यांपैकीं कितीएकांनीं वार काढिले, तेव्हां आपण येथें आहों हें इंग्लिशांच्या फौजेस समजलेंसें फ्रेंच शिपायांस वाटून त्यांनीं सरबत्ती करून तंबूर ठोकला आणि विव लर वा (राजा चिरकाल वांचो) असा जय शब्द करीत पुढें गेले. तेथें जवळच ब्रिटिशांची पुष्कळ फौज राहत होती ही एक ह्या प्रसंगीं मोठी चांगली गोष्ट झाली. ही फौज लेफ्तेनेन्त हरिसन ह्यानें फार चांगल्या ठिकाणीं नेऊन तिजकडून अशा चतुराईनें काम चालविलें कीं, त्या हल्ल्यामध्यें पुढें जे लोक होते ते तर अगदीं कापून टाकिले गेले, आणि त्या हल्ला करणाऱ्यांनीं ज्या शिड्या लाविल्या होत्या त्यांपैकीं कांहीं काढून घेतल्या व कांहीं मोडून टाकिल्या आणि शत्रूचे लोक सुमारें ३६० आंत शिरले होते; ते पाडाव केले. त्रिचनापल्लीचा वेढा म्हणजे एक स्मरण ठेवण्यासारखी गोष्ट झाली. आणि ह्यावेळेस फ्रेंच लोकांस वर सांगितलेल्या गोष्टीपासून मोठा जय येईल असें वाटत होतें, परंतु तसें न होतां त्यांचें उलटें नुकसान झालें; आणि ह्या वेढ्याच्या वेळेस आरंभापासून शेवटपर्यंत पाहिलें असतां फ्रेंचांचें इतकें नुकसान कधींच झालें नव्हतें. तरी ह्यानंतर लागलेंच धान्य वगैरे सामान आणणाऱ्या लोकांच्या संरक्षणाकरितां इंग्लिशांची एक टोळी पा-

इंग्लिशांचें शौर्य.

पाहऱ्याची हयगय.

वेढ्यावर बचाव.

ठाविली होती तिजवर १८००० नेटीव व ४०० युरोपियन इतक्यांनीं मिळून हल्ला केला. ह्यावेळेस इंग्लिशांच्या फौजेवर जो मनुष्य होता तो गैर माहिती होता. त्यानें आपल्या फौजेच्या लहान लहान टोळ्या करून त्यांच्या रांगा करून त्या दूर दूर उभ्या केल्या मुरारराव आणि इबिसखान ह्यांनीं म्हैसूरकरांच्या बारा हजार घोडेस्वारांनिशीं भरधांव दौड करून एकाएकीं इंग्लिशांच्या त्या रांगांवर हल्ला केला. शत्रूच्या घोडेस्वारांनीं आपल्या रांगा मोडून टाकिल्या असें इंग्लिश फौजेच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्यांस एक फेर झाडण्यास देखील फुरसत सांपडली नाहीं. तशांत काळ्या लोकांनीं त्यांस सोडून दिलें आणि ते फक्त १८० असामी सांपडले. सटन जाण्याची आशा तर त्यांस कांहींच राहिली नाहीं. तेव्हां त्यांनीं असा निश्चय केला कीं, आतां मरावयाचें खरें पण जितक्यांचा प्राण घेववेल तितक्यांचा घेऊन मग मरावें. ह्या १८० असामीपैकीं कांहीं मेले व कांहीं धरले गेले. ह्यांच्या मध्येंच *ग्रेनेडीयर लोकांची एक टोळी होती तिनें आलीकडे जो इंलिशांचा बहुत वेळ जय झाला त्यांत मोठालीं शौर्याचीं कृत्यें केलीं होतीं.

प्र० १० इ० स० १७५४ इंग्लिशांवर हल्ला.

ह्याप्रमाणें दीडवर्ष हा त्रिचनापल्लीचा वेढा होता, परंतु इतक्या काळांत सांगण्यासारखा एकदा फायदा म्हटला म्हणजे फ्रेंचांस कांहीं झाला नाहीं व त्यांच्या पक्षाचे जे दुसरे बहुत सरदार होते त्यांसही झाला नाहीं. मिल ह्याचें म्हणणें असें आहे कीं कंपनीनें इतका जबरदस्त उद्योग करावा अशीही गोष्ट नव्हती, तथापि कर्नाटकाचें होतें काय हें पाहण्याकरितांच तिनें इतकें केलें हें ध्यानांत धरिलें पाहिजे. किंवा हिंदुस्थानांत आपली राज्यस्थापना होते किंवा नाहीं हेंच पाहण्याकरितां तिनें अशी सक्तमेहेनत केली असेंही म्हणावयास कांहीं चिंता नाहीं. अशा प्रसंगीं ज़र त्यांनीं मागें घेतलें असतें तर "भी मद्रास शहर हें कोळी लोकांचें खेडें करून टाकीन" असें जें डुप्लीचें म्हणणें होतें तेंच खरें झालें असतें.

त्रिचनापल्लीस फार दिवस वेढा राहतो.

इ० स० १७५५

दक्षिणेच्या म्हणजे सलाबतजंग ह्याच्या दरबारांत बुसी व त्याच्या हाताखालचे लोक मिळून सर्व कामकारभार चालवीत होते हें

सलाबतजंगाचें दरबार.

* उंच शिपाई.

प्र० १०
इ० स०
१७५५

आम्ही पूर्वीच सांगितलें आहे. ह्या दरबारांत येथें सांगण्यासारिख्या कांहीं गोष्टी झाल्या. सलाबतजंगास फ्रेंच लोकांच्या योगानें हा मोठा अधिकार प्राप्त झाला. मोंगलांनें ग्यासुद्दीन ह्यास सलाबतजंगाला गादीवरून काढून टाकण्याकरितां पाठविलें होतें, सबब तो आणि मराठे लोक, ह्याला पदच्युत करण्याकरितां टपले असतां केवळ फ्रेंचांनींच त्याचें संरक्षण केलें. सलाबतजंग शहाणा व उदार होता ह्यामुळें बुसी ह्याचें इतकें वजन तेथें पडलें असें दिसतें. आम्ही मराठे व ग्यासुद्दीन ह्या दोघांविषयीं नुकतेंच लिहिलें त्यांपैकीं ग्यासुद्दीन हा पुष्कळ फौज घेऊन येत होता तो वाटेनें अकस्मात मेला. कोणी अशी शंका घेतात कीं; सलाबतजंगाच्या लोकांनीं विषप्रयोग करून ह्यास मारिलें. ही गोष्ट खरीच असेल असें आमच्यानें म्हणवत नाहीं. असो हा मरतांच सलाबतजंगावरचें अरिष्ट टळलें. मग ह्या आपल्या राजास कांहीं थोडेसे परदेशचे लोक येथें आले आहेत त्यांच्या आज्ञेंत वागावें लागतें हें त्याच्या सभोवतालच्या लोकांस फार वाईट वाटून त्यांनीं ह्या नीच स्थितींतून बाहेर पडण्याची तुम्हीं कांहीं तरी तजवीज करावी म्हणून त्या राजास मोठा लकडा लाविली. त्या लोकांच्या सांगण्याप्रमाणें त्यानें कांहीं तजवीज केली आणि त्यावेळेस बुसीही तेथें कांहीं दिवस नव्हता हें त्या तजवीजीस अनुकूलच झालें. ती तजवीज अशी, फ्रेंचांचीं पलटणें तेथें होतीं त्यांचा पगार न देतां कांहीं एक खोड्या कारणावरून त्यांच्या अनेक तुकड्या करून त्यांस निरनिराळ्या ठिकाणीं पाठविलें. तथापि बुसीनें परत येतांच सगळे लोक पुन्हा एकत्र जमविले. सलाबतजंगास ह्याचा धाक होताच, आणखी मराठ्यांच्या स्वारीची धास्तीही त्यास पडली होती, ह्यामुळें बुसी ह्यास त्याजपासून पाहिजे तसा ठराव करून घेण्यास सांपडलें. तो असा कीं ज्या मंत्री लोकांनीं फ्रेंचांच्या नाशाविषयीं मसलत दिली होती त्यांस सुभेदारानें काढून टाकावें पलटणांचा वगैरे पगार अडकावला होता त्याकरतां सलाबतजंगापासून बुसीनें पूर्वेच्या किनाऱ्यावरील उत्तरेकडील सरकारें व ओरिसा हे दोन प्रांत मागून घेतले, आणि ह्यापुढें आम्हांकडून पगाराची अथवा दु-

फ्रेंचाच्या मोठेपणाचा हेवा.

बुसीचें वचन.

सन्या एखाद्या गोष्टीची हरकत झाल्यास आम्ही हे परत मागणार नाहीं असें त्याजपासून कबूल करून घेतलें. फ्रेंचांच्या ताब्यांत पूर्वी दिलेला कांहीं मुलूख होताच तो आणि हा मिळून मदापल्ली-पासून जगन्नाथपुरीपर्यंत एकंदर शंभर कोस लांबीचा प्रदेश त्यां-च्या हातीं आला, त्याचा वसूल त्यांस साडेपंचायशी लक्ष रुपये येत होता. प्र० १० इ० स० १७५५

तहाचें बोलणें.

इंग्लिशांचे मुख्य अधिकारी व फ्रेंचांचे मुख्य अधिकारी ह्यांस त्यांच्या त्यांच्या विलायतेहून असे हुकूम आले होते कीं, इंग्लिश व फ्रेंच ह्या उभयतांमध्यें जे तंटे असतील ते मिटवून टाकून तह करण्याचा उद्योग करावा त्या अधिकाऱ्यांनीं ह्या. हुकुमाप्रमाणें तह करण्याकरितां परस्परांमध्यें पत्र व्यवहार चालू केला. इक-डील राजापासून व विशेषतः मोंगलांपासून जे प्रांत उभयतांस मिळाले त्याजविषयीं प्रत्येका जवळ लेखी पुरावा काय आहे ह्याचा तपास करावा असें ढोंग करून त्यांनीं परस्परांचे कागदपत्र पाह-ण्यास प्रारंभ केला. तेव्हां फ्रेंचांनीं आपलीं सनदा पत्रें दाखविलीं. त्यांविषयीं इंग्लिशांचें म्हणणें असें पडलें कीं, हीं सर्व बनावू आहेत (असें म्हणण्याविषयीं कांहींसें कारण होतें असें दिसतें) ह्याकरितां ह्या गोष्टींवरून निर्णय करूं नये, तर ज्या गोष्टींच्या योगानें उभ-यतांच्या संस्थानांस बळकटी येईल अशा गोष्टींचा विचार करावा. ह्यानंतर उभयतांनीं आपापल्या पक्षास अनुकूल अशीं कलमें का-ढिलीं; परंतु त्यांवरून ऐक्य होईल असा भरंवसा येईना.

हिंदुस्थानांतील लढायांविषयीं इं-ग्लंडांतील वि-चार.

हिंदुस्थनांतील वादविवादांवरून यूरोपखंडांतही इंग्लिश व फ्रेंच ह्या दोन सरकारांमध्यें मोठा वादविवाद लागला. फ्रेंचांचा गव-र्नर डुप्ली ह्यानें अभिलाष बुद्धीनें राज्यें घेण्याचा जो प्रकार चाल-विला होता तो त्यांस वाईट वाटत होता, ह्यामुळें त्या कज्याविषयीं त्या लोकांनीं डुप्ली ह्यास मदत पूर्वी कधींच केली नव्हती. तशांत इंग्लिशांचें त्याच गोष्टीविषयीं बोलणें लागलें ह्यामुळें तें त्यांस फार वाईट वाटलें. हिंदुस्थानांत रवाना करण्याकरितां इंग्लिशांनीं एका भयंकर आरमाराची तयारी चालविली. तेव्हां कांहीं वाद-विवाद होऊन शेवटीं असें ठरलें कीं, दोन्ही राज्यांतून कमिशनर

कमिशनरांची नेमणूक.

म० १०
इ० स०
१७५५

म्हणजे मुखत्यार पाठवावे आणि त्यांस पूर्ण अधिकार द्यावा आणि असें सांगावें कीं, फ्रेंच व इंग्लिश ह्या उभयतांनीं जो देश मिळविला असेल किंवा त्या देशाविषयीं जी वळकटी करून घेतली असेल तिचा तादृश विचार न करितां त्या दोघांस वरें वाटेल अशा रितीनें न्यायानें तंटा मिटवून टाकावा. ह्याप्रमाणें नेमणुकी होऊन फ्रेंच कमिशनर गाधू हा पौंदेशरीस येऊन पोहोंचला तेव्हां सर्वांस मोठी काळजी पडली कीं, डुप्ली हा मोठा जबरदस्त अधिकारी आहे त्यापक्षीं हा नवा अधिकारी त्याच्या जाग्यावर आल्याची बातमी त्याच्या कानीं पडली म्हणजे काय होईल कोण जाणे. असें सर्वांस वाटण्याचें कारण डुप्ली केवळ अगदीं शिखरावर चढून गेला होता; मोंगलांच्या सुभेदाराचा पोषाग आणि चिन्हें तो धारण करीत असे; आणि जे लोक त्याच्या भेटीस येत त्यांजकडून आपणापुढें हमेशा गुडघे टेंकवून कुरनिसा करवीत असे. हिंदुस्थानांत आपल्या देशाचा (फ्रान्साचा) वर्चष्मा करावा ह्या गोष्टीच्या बेतांतच त्याचें मन सर्वकाळ गढून राहिलें होतें हें सर्वांस दिसतच होतें. परंतु तो मुत्सद्दीही पक्का होता ह्यामुळें आतां आपण आडकाठी घातली असतां आपलें कांहीं चालावयाचें नाहीं हें त्याच्या लक्षांत आलें. फ्रान्सांतून जो हुकूम आला तो त्यानें संतोषानें मान्य केला. नंतर त्या कमिशनरानेंही त्याचा चांगल्या रितीचा आदर सत्कार करून त्यास विलायतेस पाठवून दिलें. तो फ्रान्सांत गेला तेव्हां कंपनीनें मात्र त्याचा आदर सत्कार अगदीं केला नाहीं व कंपनीचें राज्य हिंदुस्थानांत वाढावें म्हणून त्यानें कांहीं आपल्या खासगी जिंदगींतून व कांहीं पतीवर कर्ज काढून एकंदर सुमारें चाळीस लक्ष रुपये खर्च केले होते, ते आम्ही परत देत नाहीं म्हणून कंपनीनें त्यास साफ सांगितलें. अशा रितीनें कंपनीनें डुप्लीचा अपमान केला ह्याबद्दल सर्व इतिहास कर्त्यांनीं कंपनीस मोठा दोष लाविला आहे. आमचें ह्याविषयीं असें म्हणणें आहे कीं, ह्या गवर्नरानें आपल्या देशाचा वर्चष्मा पाडण्याकरितां लढाया वगैरे करण्याचा जो क्रम चालविला होता तो सिद्धीस नेण्यासाठीं त्यानें लक्षावधी रुपये आपल्या पदरचे खरचले खरे, परंतु फ्रान्सांतील व्यापारी मंडळीच्या मनांत

लोकांच्या कल्पना व डुप्लीची योग्य रितीनें अनुकूलता.

फ्रेंच कंपनीकडून त्याचा आदर सत्कार.

जो प्रकार चालवावयाचा होता त्या प्रकाराशीं ह्या गवर्नराचा क्रम अगदीं विरुद्ध होता. आमच्या मतीं व्यापारी मंडळीचा प्रकार चांगला होता. मंडळीचें म्हणणें असें होतें कीं मोठमोठाले प्रांत आमच्या ताब्यांत आणण्याची आमची इच्छा नसतां ते आणण्याविषयीं ह्यानें खर्च केला ह्यांत आम्हांवर ह्याचे कांहीं उपकार नाहींत. सबब ह्यानें आमच्या कार्याला आपलें द्रव्य लाविलें तरी ही गोष्ट ह्यानें आमच्या हुकुमाशीं विरुद्ध केली म्हणून आपल्या मंडळीस ह्याचें द्रव्य परत करण्याचें अगत्य नाहीं. सरकारांत अर्ज केला तेव्हां तेथें असें ठरलें कीं कंपनीचें म्हणणें रास्त आहे. परंतु डुप्लीवर ह्याच्या सावकारांनीं कोर्तांत अर्ज केला असतां तो नामंजूर करावा असा दस्तऐवज त्यास देवविला हा सरकारानें मोठा अन्याय केला.

प्र० १० इ० स० १७५५ त्यांच्या वर्तणुकेस आधार.

ह्या नंतर फ्रेंचांचा कमिशनर गोधू साहेब व इंलिशांचा कमिशनर सांडरस साहेब हे उभयतां लागलेच तह करण्याच्या तजविजीस लागले. ह्यांत दोन उद्देश होते, एक नेटिवांचीं संस्थानें न बळकावितां त्यांचें संरक्षण करावें, व दुसरा फ्रेंच व इंग्लिश ह्या दोन लोकांत जीं तंट्याचीं कलमें होतीं त्यांचा यथार्थ विचार करून तंटा मिटवून टाकावा. पहिल्याच कलमांत असा ठराव केला होता कीं मुअर* लोकांपासून फ्रेंच व इंग्लिश ह्या उभयतांस जे प्रांत मिळाले असतील त्यांपैकीं व्यापाराचा बंदोबस्त राहण्याकरितां समुद्रकांठावरचे कांहीं प्रांत ठेवून बाकीचे उभयतांनीं ज्यांचे त्यांस परत करावे. जे प्रांत ठेवावयाचे ते असे काढिले पाहिजेत कीं ते हातीं असल्यानें दोनही पक्षांचे लोकांचा आपआपल्या प्रांतांत सारखाच अमल राहील. ह्या तहांतील कलमें बहुत करून इंग्लिशांस अनुकूल होतीं फ्रेंचांपेक्षां त्यांस थोडा मुलूख सोडावा लागला, व त्यांनीं महंमदअलीचा पक्ष उचलला होता तर तोही उभय संमतानें करनाटकचा नवाब ठरून त्याविषयीं कांहीं तंटा उरला नाहीं. फ्रेंचांस मात्र ओरिसा व उतरेकडील सरकारें ह्या दोन ठिकाणीं मेळविल्यापैकीं पुष्कळ प्रांत सोडून द्यावा लागला.

हिंदुस्थानातील हक्काविषयीं उभयतांचा ठराव.

इंग्लिशांस अनुकूल ठराव.

* त्यावेळेस हिंदुस्थानांतील राजांस मुअर असें म्हणत असत.

प्र० १०
इ० स०
१७५५
तहाचा क्षुब्धक परिणाम.

ह्या तहापासून इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्यांतील तंटे बंद होतील असें पूर्वी वाटले होतें; परंतु तें कांहींच झालें नाहीं असें म्हटलें तरी चालेल. करनाटकच्या नवाबगिरीकरितां महंमदअली इंग्लिशांकडे झटत होता. त्यास तो अधिकार दिल्यानंतर इंग्लिशांस असें वाटलें कीं ह्याचे भोंवतालीं ह्याचे जे कोणी शत्रु आहेत त्यांनीं ह्याजवर हल्ला धरिलें असतां ह्याचा बचाव आपणास केलाच पाहिजे. म्हैसूरच्या दिवाणानें त्रिचनापल्ली घेतल्यावांचून रहायाचें नाहीं असा निश्चय केला ह्यामुळें इंग्लिशांस त्या किल्ल्याचें रक्षण करण्याकरितां तेथें फौज ठेवावी लागली. ह्या शत्रूपासून इंग्लिशांस धास्ती होती असें तर बिलकूल नाहीं. कारण

म्हैसूरच्या दिवाणाचे हक्क.

त्या ठिकाणच्या फौजेवर जो कप्तान किलपात्रिक म्हणून सरदार होता त्यास, दिवाण किल्ल्यावर हल्ला करण्याचा बेत करीत आहे असें कळतांच त्यानें सांगून पाठविलें कीं आपण येत असल्यासमीच आपणास किल्ल्याचा दरवाजा उघडून देऊन भेटीस येतों. मधुरा आणि तिणवल्ली ह्या दोन प्रांतांत नवाबाचा अंमल बसवून पैक्याचा वसूल करण्याकरितां आणखी फौज पाठविण्याचें कंपनीनें कबूल केलें. हें काम आपणास जड जाणार नाहीं व ह्या उत्पन्नापैकीं आपणास कांहीं हिस्साही मिळेल असें खचीत वाटत होतें. परंतु पुढें दोन्ही गोष्टींविषयीं त्यांची अगदीं निराशा झाली. ह्या प्रांतामध्यें बहुतेक कोळी लोकांची वस्ती होती व ते लोक अगदीं अज्ञानावस्थेत होते असें म्हटलें तरी चालेल. चोरी करणें व दंगा करून लूट करणें ह्या चालींमध्यें ह्या लोकांची बरोबरी करणारे लोक सांपडणें फार कठीण. त्यांचीं घरें म्हटलीं म्हणजे दाट झाडींमध्यें जेथें प्रवेश होणें कठीण अशा ठिकाणीं असतात. तेथून भोंवतालच्या प्रांतांतील गुरें वगैरे लुटून आणण्याकरितां ते निघतात. आणि शौर्याच्या कृत्याविषयीं जसा अभिमान बाळगावा तसा हे लोक आपलें लुटी करण्याविषयीं जें चातुर्य त्याचा अभिमान बाळगतात. आपलें कूळ व आपली जात संपन्न करणें ह्यांतच कायतें महत्व आहे असें ते मानितात व असें करण्यांत ते मृत्यूची देखील तिलप्रायं भीति बाळगीत नाहींत. ह्या

कोळी.

गुणाविषयीं ह्या लोकांची वाईट समजूत.

गोष्टीचें एक चमत्कारिक उदाहरण सांगतों. एकदां दोन भा- म० १० इ० स० १७५५
वांनीं पुष्कळ घोडीं चोरलीं, तेव्हां त्या दोघांस धरून मेजर ला-
रेन्स ह्याजकडे आणिलें. त्यानें त्यांस फांशीं देण्यास सांगितलें.
त्या दोघांपैकीं एक जण म्हणाला कीं, मला सोडाल तर मीं जना-
वरें चोरून नेलीं आहेत तीं मी जाऊन दोन दिवसांच्या आंत परत
आणून देतों आणि तोंपर्यंत मी आपल्या भावाला येथें तुमच्या ता-
ब्यांत देतों. त्याचें म्हणणें कबूल करून त्यास सोडून दिलें. पुढें
त्याची मुदत संपली तेव्हां त्याचा भाऊ बंदींत होता त्यास बोला-
वून आणून त्याची चौकशी केली तेव्हां त्याच्या मनाला भीति व-
गैरे कांहींच न वाटतां तो मोठ्या शांतपणानें म्हणाला कीं आम्ही तु-
मचे घोडे चोरले आहेत ते आमचें सर्व कुटुंब सधन होण्यापुरते
आहेत; तर असलीं मोठमोठीं मौल्यवान जनावरें हातीं लागलीं अ-
सतां तीं परत आणून देण्याचें माझ्या भावाच्या मनांत येईल अस-
ला वेडा विचार तुमच्या मनांत आला ह्या गोष्टीचें मला मोठें आ-
श्चर्य वाटतें. माझ्या भावानें ही चांगली युक्ति काढिली. मज-
विषयीं जर म्हणाल तर ह्या लाभापेक्षां कमी लाभ असतांही बहुत
वेळां मी आपला प्राण धोक्यांत घातला होता. हा तर लाभ मो-
ठा आहे. ह्यापक्षीं अशा महत्कृत्याकरितां प्राण देण्यास मी अग-
दीं एका पायावर राजी आहें. हें त्याचें निर्भय पणाचें बोलणें
ऐकून लारेन्स साहेबास फार मौज वाटली आणि क्लैव साहेब मध्यें
पडल्यामुळें त्यानें त्या मनुष्यास जिवानिशीं सोडून दिलें. हे
कोळी लोक पर्वताच्या टेंकडयांवर राहत असत. ह्या टेंकडयां- हिंदूंचे किल्ले,
तून जेथें वाटा वगैरे असत तेथें किल्याप्रमाणें दगडाचे गडगे रचून
ते लोक तटबंदीप्रमाणें करीत ह्या तटांच्या बाहेरच्या आंगास
मोठमोठाले रुंद व खोल असे खंदक असत आणि त्या खंदकांच्या-
ही बाहेरल्या आंगास कळकांचीं बेटें असत. हीं कळकांचीं बेटें
इतकीं दाट असत कीं, तीं जाळावीं किंवा तोडावीं तरच पुढें प्रवेश
होण्याचा संभव, नाहीं तर बोलावयासच नको. ह्या लोकांचा
ह्या टेंकड्यांचें संरक्षण करण्याविषयीं मोठा निग्रह असे. इंग्लि-
शांबरोबर पटांगणांत उभें राहून ते लोक कधीं लढाई करीत न-

प्र० १०
इ० स०
१७५८

सत. परंतु इंग्लिशांच्या टोळ्या जाण्यायेण्याची पाळत ठेवून त्या- जवर हला करण्याच्या वेतांत ते असत. एकदां एक लहानशी टोळी त्यांना निजलेली आढळली. तिची त्यांनीं एका घटकेंत कत्तल उडविली. एका प्रसंगीं इंग्लिशांची सर्व फौज मधुरा शहराजवळच्या एका खिंडींतून जात होती त्यावेळेस तिनें आपला बंदोबस्त चांगला ठेविला नव्हता ह्यामुळें पिछाडीच्या लोकांवर ह्या कोळी लोकांनीं हला करून त्या फौजेचें फार नुकसान केलें. ह्याप्रमाणें ह्या मोहिमीमध्यें इतके हाल भोगूनही त्या फौजेच्या हातून स्वारीचा खर्च भागण्यापुरता देखील वसूल उत्पन्न झाला नाहीं. आणि ह्यानंतरही त्या लोकांस किती एक वर्षेपर्यंत ह्या लोकांवरोवर झटपट्या खाव्या लागल्या; आणि त्यांपासून फल कांहींच न होतां व्यर्थ त्रास मात्र आला.

फ्रेंच लढाईस आरंभकरितात.

आपले शत्रु इंग्लिश ह्याप्रमाणें उद्योगांत गुंतले आहेत हें पाहून फ्रेंचांस असें वाटलें कीं, आपणही आपल्या शत्रूप्रमाणेंच करावें. मधुरा प्रांतांत जी लढाई चालली होती तींत इंग्लिश अगदीं गुंतून पडले आहेत हें पाहून फ्रेंचांनीं जलदीनें त्रिचनापल्लीवर स्वारी केली; आणि त्यावेळेस तेथें संरक्षण करावयासही फारसे कोणी नव्हते, परंतु कप्तान कल्यद ह्यानें खूपच जलदी करून फौज जमवून त्या शहराचा बचाव केला. ह्यानंतर इंग्लिशांनीं फ्रेंचांस लुटावें आणि फ्रेंचांनीं इंग्लिशांस लुटावें असें कांहीं कालपर्यंत परस्परांत चाललें होतें तों कांहीं एक गोष्ट घडून आली तिजमुळें ह्या कज्याचें पूर्व रूप जाऊन तो वाढला व त्याचा सगळाच रंग अगदीं नवीन झाला.

इंग्लंड व फ्रान्स यामधें लढाई.

सन १७५६ त्यांत ब्रिटन आणि फ्रान्स ह्या दोन देशांचें परस्परांशीं युद्ध सुरू झाल्यावर तेथल्या फ्रेंचांनीं, हिंदुस्थानांत वर्चस्व मिळविण्याविषयीं पराकाष्ठेचे श्रम पडले तरी करावयाचे पण वर्चस्व मिळवावयाचें असा निर्धार केला. प्रधान मंडळीनें एकया मोक्या आरमाराचा अधिकार कौंतलार्ला ह्या नांवाच्या गृहस्थास सांगून तो हिंदुस्थानांत पाठविण्याची योजना केली. ह्या गृहस्थाचे पूर्वज ऐर्लंडचे राहणारे होते. ह्या गृहस्थानें जातीच्या शौ

र्यानें पूर्वी अनेक कामें केलीं होतीं व फंटेनाय ह्या ठिकाणीं फ्रेंच व इंग्लिश ह्यांची लढाई झाली तेव्हां इंग्लिशांचे किती एक कामगार ह्यानें स्वहस्तानें पाडाव केले होते. इंग्लंडांतील दुसऱ्या जेम्स राजाची इतरांच्या कुबुद्धीला लागल्यानें फार दुर्दशा झाली. नाहीं तर प्रथमतः त्या राजावर ह्या गृहस्थाची फार निष्ठा होती. आणि ज्या लोकांनीं ह्यास इंग्लंडांतून बाहेर काढिलें त्यांस हा अगदीं पाण्यांत पाहत असे. तशांत त्या लोकांचें हिंदुस्थानांतील संस्थान पालथें घालण्याचा अधिकार मुख्यत्वेंकरून त्याच्या हातीं आला. ह्यामुळें तर त्याच्या अंगीं पराकाष्ठेचाच अभिमान उत्पन्न झाला. फ्रान्स देशांत ब्रेस्त म्हणून एक बंदर आहे, तेथून तो सन १७५७ त मे महिन्याच्या चवथे तारखेस हिंदुस्थानांत येण्याकरितां निघाला, परंतु मार्गांत दिवसगत लागून फार त्रास झाला. कारण ह्याच्या बरोबरच्या लोकांत पराकाष्ठेचा अजार उद्भवल्यामुळें मार्गांत फार अडचण झाली. ह्यामुळें पॉंदेशरीस येऊन पोंहोंचण्यास त्यास सन १७५८ च्या एप्रिल महिन्याची पंचविसावी तारीख आली म्हणजे निघाल्यापासून एक वर्ष लागलें. म० १० इ० स० १७५८

हा ज्या उद्देशानें हिंदुस्थानांत आला होता तो शेवटास नेण्याची ह्याला फार उत्कंठा झाली होती; ती अशी कीं, संध्याकाळचे पांच वाजल्यावर हा बंदरांत पोहोंचला; तरी त्याच रात्रीं सेंत देविदच्या किल्ल्याला वेढा घालण्याकरितां हा फौज घेऊन चालता झाला. तो किल्ला अद्यापिही मोठा बळकटीचा असून तें इंग्लिश लोकांच्या ठाण्यांपैकीं, एक मुख्य ठाणें आहे हें सर्वांस अभिमत होतें. हा वेढा घालण्याची अविचारानें उगीच त्वरा केली ह्यामुळें आपली सोय कोणती व गैरसोय कोणती; आपल्या हाताखालच्या लोकांचें मत वेढा घालावा असें आहे किंवा वेढा घालूं नये असें आहे; इत्यादि गोष्टींचा विचार कांहींच न होतां त्या हाताखालच्या लोकांशीं शत्रुत्व होऊन लाली ह्याचा बेत शेवटास जाऊं द्यावयाचा नाहीं असा त्यांस उलटा अभिमान पडला. ह्यामुळें पुढें ह्या सरदाराला फार हरकत झाली. ह्या किल्ल्यांत बंदोबस्त कोणत्या प्रकारचा आहे, दरवाजे कोणत्या कोणत्या अंगास आहेत, मारा कोठून आहे वगैरे गोष्टीं- कौंतलाला. अविचाराचें कृत्य.

प्र० १० इ० स० १७५९

ची बरोबर माहिती करून न घेतां हा तेथें एकाएकीं जाऊन पोहोंचला. तथापि वेढा घालण्याचें काम त्यानें मोठ्या जोरानें चालविलें. किल्लयांतील लोकांनीं भलतीकडे नेम धरावे भलतीकडे गोळी घालावी असें केल्यामुळें किल्ल्याचा बचाव चांगल्या रितीनें झाला नाहीं. शेवटीं फ्रेंचांनीं अगदीं भडिमार चालू केला तों त्यांच्या जवळचें दारू गोळा वगैरे सामान अगदीं सरत आलें. जून महिन्याच्या पहिल्या तारखेस फ्रेंचांनीं पुढें सरसावून किल्ल्याच्या पायाशीं तोफा लावून असा भडिमार चालविला कीं, आंतील गोलंदाज व बंदुकी धरणारे ह्यांच्यानें पुढें उभें राहवेना. तेव्हां किल्ला स्वाधीन करणें भाग असें ठरलें. शिपाई लोक पाडाव झाले आणि हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या संस्थानाच्या राजधानीचा हा किल्ला जमीनदोस्त झाला.

फौर्त सेंत दे-विदकिल्ला घेतला.

लाली मोठ्या आनंदानें पौंदेशरीस आला आणि सर्व हिंदुस्थानांतून इंग्लिशांस हांकून देण्याचा ह्याचा बेत होता त्याविषयीं विलंब लावावयाचा नाहीं असा त्यानें निश्चय केला, हा बेत सिद्धीस नेण्याकरितां त्यानें कांहीं एक तजवीज केली तिजमुळें त्याची फार अप्रतिष्ठा झाली. दक्षिणेंतील दरबारांत राज्यक्रांति वगैरे गोष्टी चालल्या असतां व तेथील मोठमोठ्या लोकांचें परस्परांशीं हाडवैर पडलेलें असतांही बुसीनें फ्रेंच लोकांच्या तर्फेनें जसा अंमल चालवावा तसा अंमल चालवून आपलें वजन फार चांगल्या रितीनें राखिलें होतें. हिंदुस्थानाच्या पूर्वेच्या किनाऱ्यावर जे सरकार म्हणून प्रांत आहेत ते त्याच्याच ताब्यांत होते. तेथें विजगापट्टन म्हणून इंग्लिशांचें मोठें बंदर होतें व तेथें माल वगैरे ठेवण्याकरितां बहुत वखारी बांधिलेल्या होत्या तें बंदर त्यानें घेतलें. अशा रितीनें बुसी फ्रेंचांचा अंमल वाढवीत असतांही मद्रास घेण्याकरितां व बंगाल्यांतील इंग्लिशांचीं नवीन संस्थानेंही घेण्याकरितां आपली सर्व फौज एकत्र जमली पाहिजे म्हणून लाली ह्यानें बुसी ह्यास असा हुकूम पाठविला कीं, तुम्हीं त्या दरबारांतून निघून यावें. हा हुकूम पोहोंचल्यावर येथें राहण्यापासून मोठमोठाले फायदे खचीत होतील व मद्रास वगैरे घेण्याविषयीं आपण म्हणतां, तर त्या गोष्टी

लाली साईबाचा हर्ष.

बेडेपणानें बुसीला काढिलें.

तशाच घडतील असाही नियम नाहीं. ह्यास्तव हें संस्थान हातचें सोडून निघून यावें हें मला सयुक्तिक दिसत नाहीं असें बुसी ह्यानें स्पष्ट लिहिलें; परंतु लाल्ली ह्याचा स्वभाव असा असे कीं, मनास येईल तें करायाचें आणि त्याच्या तोंडांतून निघेल त्याला कोणी आड येतां कामास नये. ह्यास्तव त्यानें बुसीच्यें कांहीं एक न मानितां लिहून पाठविलें, कीं, हुकुमावर तकरार न करितां हा दुसरा हुकूम हातीं पडतांच निघून यावें. प्र० १० इ० स० १७५९

दक्षिणच्या दरबारांत आपलें एवढें नुकसान करून लाल्ली ह्यानें पुष्कळ फौज एकत्र जमविली खरी; परंतु त्याजपाशीं द्रव्याचा पुरावा नव्हता ह्यामुळें मोठी एकादी लढाई करण्याचें म्हटलें म्हणजे त्याच्या हातून होईल असें नव्हतें. ही अडचण दूर करण्याची त्यानें अशी तजवीज काढिली कीं, तंजावरच्या राजाची आपणास पन्नासलाख रुपये देण्याची मागील कबुलात आहे तो पैसा उगविण्याकरितां त्या राजावर स्वारी करावी. हें गोष्ट करिते वेळेस त्यानें अगदीं विचार केला नाहीं. ह्यामुळें ती करण्यापासून नेटीव लोकांस त्याचा अगदीं त्रास येऊन ते त्याला विरुद्ध झाले. तंजावरास जाऊन वेढा घालावयास प्रारंभ केला पण त्याजपाशीं अन्नपपाणी, दारूगोळा, वगैरे सर्वच सामानाची कमताई असल्यामुळें त्यास वेढा उठविणें प्राप्त झालें. ह्यानंतर लौकरच करनाटकांत अर्काट व दुसरे कांहीं गांव ह्या सरदाराच्या हातीं लागले तेव्हां तेथून त्यानें सर्व पुरावा केला. नंतर बुसीही येऊन त्यास मिळाला तेव्हां त्या लालीस असें वाटलें कीं, आतां मद्रासेस वेढा घालण्याची आपली चांगली सोय आहे. हा वेढा त्यानें दोन महिनेपर्यंत घालून ठेविला होता, परंतु त्यास बहुत अडचणी आल्या. ह्यावेळेस इंग्लिशांच्या फौजेंत १७५८ गोरे लोक होते व २४२० काळे लोक होते. त्या फौजेवर देखरेख गवर्नर पिगट साहेब व प्रख्यात शूर लारेन्स साहेब ह्या दोघांची होती ह्यामुळें तिनें मोठ्या शौर्यानें तेथचा बचाव केला. फेब्रुवारी महिन्याच्या १६ व्या तारखेस इंग्लिशांचें आरमार आलें याजवर ६०० शिपाई लोक नवे आले हें पाहून फ्रेंचांनीं वेढा उठविला. ही न- तंजावरच्या राजावर स्वारी इ०स०१७६० मद्रासचा वेढा.

इ० स० १७६० घाईनें मागें सरणें

वीन फौज दृष्टीस पडतांच फ्रेंचांच्या सेनेनें आपल्या सेनापतीच्या हुकुमाची वाट न पाहतां लागलाच माघारा पळ काढिला. त्यामुळें लाली साहेबाचा हें शहर जाळून टाकण्याचा बेत होता तो शेवटास नेण्यास त्यास अगदींच वेळ राहिला नाहीं.

पोंदेशरीस लाली आला.

लालीचे आणि त्याच्या हाताखालच्या मुख्य मुख्य कामगार लोकांचें अत्यंत वैमनस्य पडलें होतें, त्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें अप्रतिष्ठा होऊन तो पोंदेशरीस परत आला हें त्या कामगार लोकांस व शहरच्या बहुतेक लोकांस मोठ्या आनंदाचें वर्त्तमान झालें. हा गोष्ट लाली साहेब स्वतां कबूल करितो. आतां जिकडे पहावें तिकडे लाली ह्यास संकटें दिसूं लागलीं. इंग्लिश लोक मोहीम करून करनाटक पुन्हा जिंकून घेऊं लागले. तेव्हां त्यांचा अमल वाढूं देऊं नये म्हणून फ्रेंच लोक प्रयत्न करीत असतां त्यांचा सांदिराश येथें पराजय होऊन त्यांस पोंदेशरीस परत यावें लागलें. हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या राज्याचा लय फार जलदीनें होत चालला

इंग्लिशांची सरमी.

हें स्पष्ट आहे. आणि इंग्लिशांस आलीकडे जो जय मिळाला त्यानंतर ते जर लागलेच पोंदेशरीवर येते तर थोडक्याच दिवसांत तें शहर त्यांच्या हातीं लागलें असतें हें फ्रेंचांचा सेनापतीच कबूल

इ० स० १७६१

करितो. परंतु जय मिळाल्यावर करनाटकांत कांहीं चांगल्या बंदोबस्ताचीं ठाणीं व कारिकल बंदर अशीं फ्रेंचांच्या ताब्यांत होतीं तीं जिंकून घेण्यांतच त्यांचे तीन महिने गेले. फ्रेंचांच्या ताब्यांत बंदर असें एवढेंच राहिलें होतें. इंग्लिशांस वरचेवर फौज येऊन मिळत गेली व फ्रेंचांस तशी मिळत गेली नाहीं ह्यामुळें त्यांनीं पोंदेशरीवर येऊन वेढा घालण्याची तयारी चालविली. अशा रितीनें

फ्रेंचांच्या मुख्याचा संकटावस्था.

लालीची अगदीं पांचावर धारण बसल्यावर त्यानें हैदरअलीं हा हल्लीं म्हैसूरचा राजा झाला होता त्याजपाशीं कांहीं करार करून आपल्या कुमकेस फौज मागून घेतली. त्याचे लोक तेथें येऊन एक महिनाभर राहिले तेव्हां आपण ज्यांच्या मदतीस आलों त्यांच्यांत सामर्थ्य नाहीं असें त्यांस स्पष्ट दिसल्यामुळें त्यांची उमेद खचली व

कुमक परत गेली.

इतक्यांत म्हैसुराकडे जाण्याचें कांहीं निकडीचें कार्य उभें राहिलें ह्यामुळें फ्रेंचांस सूचना न देतां ते एकदम स्वदेशास परत निघून गेले.

आपला बचाव करण्यासाठीं लाली ह्यानें मध्यरात्रीं मोठ्या आवेशानें ब्रिटिशांच्या छावणीवर हल्ला करून तेथें कांहीं ठिकाणीं बरीच धामधूम केली; परंतु ब्रिटिशांचे शिपाई लोक शूर पडले व लाली ह्याच्या एकाटोळीनें तेथें येण्यास उशीर लाविला ह्या दोन गोष्टी एकत्र जमल्यामुळें शेवटीं त्यास परत यावें लागलें. सन १७६० त सप्टंबर महिन्याच्या अखेरीस पोंदेशरीच्या भोंवतीं जमिनीच्या आंगानें आणि समुद्राच्या आंगानें असा दोहींकडून वेढा पडला तो असा कीं बाहेरून अन्नाचा वगैरे पुरावा करण्याचीही फ्रेंचांस पंचाईत पडली. बंदरांत फ्रेंचांचीं दोन मोठीं गलबतें होतीं तीं रात्रीं इंग्लिश लोक घेऊन गेले. शहरांतील रहिवासी जितके काळे लोक आहेत तिक्यांस बाहेर घालवून दिलें पाहिजे असें लाली ह्याचें बहुत दिवस म्हणणें होतें त्याप्रमाणें नवंबराच्या २७ व्या तारखेस त्यानें करून टाकिलें. त्यानें १४०० ते काळे लोक बलात्कारानें किल्लयाबाहेर काढिले. परंतु ह्यांस जाऊं दिलें असतां आंतील शिपाई लोकांस अन्न पुष्कळ दिवस पुरेल आणि त्यामुळें आपणास वेढा कांहीं जास्ती दिवसपर्यंत घालावा लागेल, असें दिसल्यावरून बाहेरचे लोक त्या लोकांस जाऊं देईनात. ते दुर्दैवी लोक तटाच्या आसपास झाडपाला खात हिंडत होते. त्यांचें मागणें असें होतें कीं आम्हांला शहरांत जाण्याची परवानगी द्या नाहीं तर त्या छावणीच्या पार निघून जाण्याची तरी परवानगी द्या. परंतु एक आठवडापर्यंत दोनही पक्षाचे लोक अगदीं स्तब्ध राहिले. त्यानंतर कर्नल कूट साहेब ह्यास दया येऊन त्यानें त्या बिचारे लोकांस आपल्या छावणीच्या पार निघून जाण्यास परवानगी दिली. त्या लोकांचीं तोंडें अन्न पाण्यावांचून अगदीं सुकून गेलीं होतीं. आतां आपणास आश्रय कोठें पहावा हें त्यांस सुचेना. तरी त्यांस जावयास परवानगी दिली ह्यामुळें कोठें तरी जावयास जागा झाली एवढ्यावरूनच ते लोक इंग्लिशांचे मोठे उपकारी झाले,

पं० १० इ० स० १७६१ इंग्लिशांच्या छावणीवर हल्ला

पोंदेशरीस वेढा घातला.

युरोपियन लोकांचा क्रूरपणा.

सन १७६१ त ज्यानेवारीच्या १२ वे तारखे पावेतों इंग्लिशांच्या रणभूमींत मोरचे वगैरे लावणें हें बरोबर झालें नव्हतें. परंतु पुढें शत्रूकडून त्या कामास कांहींच प्रतिबंध झाला नाहीं ह्यामुळें

मोरचे सुरू झाले.

प्र० १० इ० स० १७६१

तें काम करण्यास त्यांस आयास पडले नाहींत; व विलंबही लागला नाहीं. फ्रेंच लोकांचें धैर्य अगदीं सुटलें. त्यांच्यापाशीं अन्न दोन दिवसां पुरतेंच राहिलें होतें. १४ व्या तारखेस दोन वकील त्यांजकडून इंग्लिशांकडे गेले. एक लालीकडून आला होता व दुसरा फ्रेंचांचा गवर्नर व त्यांचें कौन्सिल ह्या उभयतांकडून आला होता. लालीकडच्या वकिलानें असें सांगितलें, कीं लालीचें म्हणणें कीं तहामध्यें कांहीं गोष्टींचा ठराव झाला असतां इंग्लिशांनीं तो मोडला हीच, इंग्लिशांवरोवर कोणत्या एखाद्या गोष्टीचा ठराव करण्यास मोठी अडचण आहे. परंतु ह्या प्रसंगीं दुसरा उपाय नसल्यामुळें मी आपल्या फौजेसुद्धां युद्धांत पाडाव झालों म्हणून इंग्लिशांच्या स्वाधीन होऊन शहर खालीं करून देतों. गवर्नर आणि कौन्सिल ह्यांजकडील जो वकील होता त्यानें शहरांतील रहिवासी लोकांविषयीं कांहीं ठराव करण्याचें बोलणें लाविलें. परंतु प्रस्तुतच्या स्थितीवरून पाहतां कोणतीही गोष्ट करणें अगर नकरणें हें जयवंत पक्षाच्या स्वाधीन होतें; तथापि इंग्लिशांनीं सांगितलें कीं आम्हांस जें करावयाचें तें विचार करून सदयांतः करणानें करूं. असें उभयतांचें बोलणें होऊन कर्नल कूट साहेब पॉंदेशरी शहरांत गेला; आणि मग तीन दिवसांनंतर तो पराजित सेनापति (लाली) गलबतांत बसून विलायतेस चालता झाला. तो फ्रान्सांत जाऊन पोहोंचल्यावर मग तर त्याजवर मोठाच दुःखकारक प्रसंग गुदरला. फ्रेंचांची आणि इंग्लिशांची लढाई झाली तींत इंग्लिशांचा सेनापति पिट साहेब होता त्यानें सर्व लढाईमध्यें कोठेंच फ्रेंचांचें कांहीं चालूं न देतां त्यांजवर अनेक प्रकारचीं मोठमोठीं संकटें आणून घातलीं. ह्यामुळें फ्रेंच लोकांस ह्यावेळेस फार वाईट वाटलें होतेंच. त्यांतच हिंदुस्थान हातांतून गेलें ह्या गोष्टीच्या योगानें त्यांस अतिशयित संताप होऊन ते म्हणाले, कीं, ज्या मनुष्याच्या हातून हें नुकसान झालें त्याचें आम्हीं पारिपत्य करणार. बुसी व दुसरे तीन असामी लालीच्या हातांखालीं कारभार चालविण्याकरितां होते त्यांजवर त्यानें नेहमींप्रमाणेंच मोठ्या आवेशानें कायदा बरहुकूम अर्जी केली,

पॉंदेशरी इस्तगत झालें.

फ्रेंचांचा क्रोध.

परस्परांवर दोषारोप.

कीं ह्या असामींचा माझ्याशीं द्वेष होता तेवढ्यावरूनच त्यांनीं फ्रेंच कंपनीचा नाश केला. त्यानें जें हें गाऱ्हाणें सांगितलें त्याविषयीं कांहीं आधार दिसत नाहीं. लालीनें अनेक वाईट गोष्टी केल्या आहेत त्यांचा विचार करितां त्याच्या आंगीं योग्यता नव्हती इतकेंच नाहीं पण दुसऱ्याहीं कांहीं गोष्टी सिद्ध होतात; आणि त्याच वाईट गोष्टींपासून हा शोकप्रद परिणाम झाला आहे असें प्रतिवादी ह्यांनीं त्याजवर उलट गाऱ्हाणें केलें. लालीच्या उतावीळपणामुळें दुसरे जे फ्रेंच लोक हिंदुस्थानांतून फ्रान्सास गेले होते त्यांचेंही मत बहुतकरून त्याला प्रतिकूळच पडलें. त्यांच्या साक्षींवरून न्यायाधीशांस लालीवर मोठ्या राजद्रोहाचा गुन्हा आहे खरा असें वाटलें. परंतु ह्या गुन्ह्याविषयीं सबल आधार अगदींच नव्हता असें आम्हांस दिसतें. त्यानें बहुतेक गोष्टी विचार न करितां दांडगाईनें केल्या हें खरें आहे, आणि त्याचा स्वभाव कडक आणि दाष्ट होता ह्यामुळें त्याचा आपल्या लोकांशीं द्वेष पडला आणि काळ्या लोकांशींही द्वेष पडला आणि त्यामुळें फ्रेंच सरकाराच्या व फ्रेंच कंपनीच्या स्वार्थास धक्का आला हेंही खरें आहे. पण ह्यांत राजद्रोह झाला नाहीं; कारण राजद्रोह म्हटला म्हणजे नाश करण्याचा इरादा मनांत पाहिजे. लालीपासून जे दोष घडले ते केवळ त्याच्या अविचारामुळें व शत्रूचा नाश करण्याविषयीं त्यास पराकाष्ठेची उत्सुकता झाली होती तीमुळें घडले. त्याच्या मनांत आपल्या राजाचा नाश करण्याचा इरादा नव्हता हें खचीत. ह्या महान् अपराधाचा गुन्हा त्याजवर घातल्यावर त्यास बास्तील म्हणून जो तुरुंग आहे त्यांतुन काढून एका लहान तुरुंगांत ठेविलें आणि बंदिवान लोकांस कोणी बुद्धिवाद वगैरे देऊं नये असा फ्रान्सांत मोठा वाईट शिरस्ता आहे त्या शिरस्त्याप्रमाणेंच त्यास बुद्धिवाद सांगूं नये असा त्यांनीं प्रतिबंध केला. इंग्लंदाप्रमाणेंच फ्रान्सांत पार्लमेन्त नांवाची सभा आहे ती पारीस शहरांत भरत असते. त्या सभेंतील कांहीं लोक फार संभावित होते, परंतु सभासदांची संख्याही फारच मोठी होती ह्यामुळें त्या लोकांच्या मनांत दुसऱ्यांनीं लालीविषयीं फार वाईट भरवून दिलें होतें. ह्यामुळें त्या

प्र० १० इ० स० १७६१

लालीवर राजद्रोहाचा आरोप.

लालीस अन्यायाची शिक्षा व त्याचा वध.

ग्र० १०
इ० स०
२७६२

सभासदांनीं त्यास फांशीची शिक्षा ठरविली, तेव्हां सिगर आणि पिलट म्हणून दोन गृहस्थ मोठे नामांकित त्या सभेचे सभासद होते त्यांनीं ही शिक्षा ठरविणें अन्याय आहे असें स्पष्ट सांगितलें. वालतेअर साहेब असें साफ म्हणतो कीं हा नांवाचा मात्र न्याय, पण वास्तविक पाहतां खूनच आहे. लालीचें मोठें दुर्दैव! ही शिक्षा त्यास सांगितली तेव्हां ईश्वराकडे दृष्टी लावून हात जोडून मोठ्यानें म्हणाला "पंचेचाळीस वर्षें चाकरी केली तिचें हेंच वर्षास काय!" आणि त्याच्या हातांत कंपास होता तो तो आपल्या पोटांत मारून घेत होता तों त्याच्या जवळच्या लोकांनीं हात धरिला. नंतर दुसरे दिवशीं त्यास एका सामान्य गाड्यावर बसवून मृत्यु स्थानावर नेऊन तेथें अन्यानें फांशीची शिक्षा दिली.

(दहावें प्रकरण समाप्त.)

प्रकरण ११.

बंगालप्रांत इंग्लिशांनीं जिंकून घेतला.

प्राचीनकाळीं इंग्लिशांनीं वसाहत केली तेव्हांचीं संकटें– अलीवर्दीखानाची कारकीर्द– यामागून सुराजउद्दवला ह्यास त्याचा अधिकार मिळाला.– इंग्लिशांचा मत्सर त्यानें केला– कासिमबाजार घेतलें– कलकत्त्यावर स्वारी– तो रक्षण्याचे बेत– शत्रूंचीं कृत्यें– गडकरी लोकांस गलबतावरील लोकांनीं व किल्लेकऱ्यानें सोडिलें– किला स्वाधीन केला– ब्लयाक होल येथें लोक कोंडून ठेविले होते.– भयंकर यातना– नवाबाची वर्तणूक– क्लैव साहेब व वात्सन साहेब ह्यांचें मद्रासेवर आरमार– ते तेथें उतरून प्रथम शत्रूंशीं लढले ती लढाई– कलकत्ता हस्तगत झाला– सुराजउद्दवला पुन्हा घेऊं पाहतो– तह– चंद्रनगर घेतलें– नवाबास गादीवरून काढून टाकण्याचा बेत– कपटें– मीरजाफर ह्यानें फितूर केला– क्लैव साहेबानें चाल केली– प्लासी येथील लढाई– मीरजाफर ह्यास गादीवर बसविलें– सुराजउद्दवल्यास जिंकून मारिलें– शाजद ह्याची स्वारी– मोंगलांचा व अयोध्येच्या नवाबाचा पराजय– नवीन नवाबाची वाईट वर्तणूक– त्यामागून मीरकासीम गादीवर बसला– त्याचा कंपनीशीं विवाद– उभयतांचें वांकडें– पाटणाशहर घेतलें व तें शत्रूस सांपडलें, तें पुन्हा घेतलें– मेजर अदमस साहेबाचा जय– इंग्लिश लोक बंदीवान होते त्यांची कतल– मीरकासीम हा अयोध्येस पळाला– सुजाउद्दवला ह्याचा पुष्कळ वेळां पराजय– मोंगल लोक इंग्लिशांस मिळाले– मीरजाफर मरण पावला– क्लैव साहेब हिंदुस्थानास परत आला– सुजाउद्दवला पुन्हा गादीवर बसला– बंगाला, बहार, व ओरिसा येथील दिवाणगिरी कंपनीस मिळाली.—

प्र० ११
इ० स०
१७५४
इंग्लिशांच्या बखारीस अडचणी.

हिंदुस्थानाच्या पूर्वतिरावर इंग्लिशांचे कारखाने होते त्यांपेक्षां बंगाल्यांतील कारखाने पुष्कळ वर्षेपर्यंत अगदीं लहान होते, परंतु अशी वेळ आली कीं या प्रांतांत मोठाल्या गोष्टी घडूं लागल्या व शेवटीं तेथें हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्यकारभाराचें मुख्य ठिकाण व राज्याची गादी झाली. कलकत्त्यास इंग्लिशांची बखार प्रथम कोणत्या रितीनें झाली ती पूर्वी सांगितली; ती जाफरखान सुभेदार असतां पुष्कळ संकटें आलीं, तरी वाढतच चालली होती. तेथें सुजा हा नवाब असतां पुष्कळ वढती झाली. तो मेल्यानंतर त्याचा पुत्र सफजेर हा अविचारी व मनाचा हलका असे. तो गादीवर असतां त्यास काढून अलीवर्दीखान म्हणून जातीचा पठाण म्हणजे आफगानी लोकांच्या वंशांतला सरदार व सैनेच्या कामांत मोठा बुद्धिमान पुरुष होता तो गादीवर बसला. असा अन्यायानें गादीवर बसला तरी त्यानें जोरानें व कोणास दुःख न देतां कल्याणकारक रितीनें कारभार केला, कांतर मराठे मोठें सैन्य घेऊन बंगाल्यांत येऊं लागले. असें म्हणतात कीं मोंगलानें अथवा बंगालच्या सुभेदारानें बोलावल्यावरून मराठे प्रथम आले व त्यांस कित्येक वेळ हटवून मागें लाविलें तरी पुनः पुनः ते स्वाऱ्या करीत. अलीवर्दीखान शूर व विचारी असे, ह्यामुळें त्यानें आपला मुलूख जिंकून घेऊं दिला नाहीं; परंतु मराठे मुलूख लुटून नाश करीत तो त्याच्यानें बंद करविला नाहीं. अलीवर्दीखानानें आपल्या ताब्यांतील हिंदुलोकांस सरकारी दिवाणी खात्यांत वगैरे चाकऱ्या देऊन व त्यांच्या मालमत्तेचें चागलें रक्षण करून हिंदुलोकांची प्रीति संपादिली व असा मनुष्य अर्थातच जे परकी खरे परंतु व्यापाराकरितां वगैरे त्याच्या मुलखांत राहिले होते त्यांवर जुलूम करील असा संभवही नव्हता. इंग्लिशांचें गाऱ्हाणें सांगण्यास इतकेंच होतें कीं त्याला कित्येक वेळ संकटें पडलीं तेव्हां व्यापारास साह्य दिल्याबद्दल इंग्लिशांनीं खुषीनें कांहीं पैसा द्यावा म्हणून कित्येक वेळ मागणें केलें, परंतु बारावें त्याची कारकीर्द होती तेवढ्या कालांत त्यानें पैसा घेतला तो सर्व मिळून दहा लक्षांवर झाला नाहीं. मराठे स्वारी करणार अशी बातमी लागली

अलीवर्दीखानानें शहाणपणानें कारभार केला.

इंग्लिशांशीं सं-



तेव्हां कलकत्त्या भोंवतीं सात मैल खंदक खणतों म्हणून खंदकास आरंभ केला, परंतु त्या गोष्टीस त्यानें अडथला केला नाहीं. तें भय जातांच त्यांनीं तें काम बंद केलें; पुढें त्या खंदकास मराठ्यांचा खंदक असें नांव पडलें.

फराशीस व इंग्लिश स्पर्धे-यीं मत्सर.

करनाटकांत इंग्लिशांचा व फराशिसांचा वरचष्मा झाला म्हणून त्यास बरीच काळजी लागली असें म्हणतात. त्या लोकांचें महत्व इतकें वाढलें कीं ते ज्याला पाहिजे त्याला गादीवर बसवितात व ज्याला पाहिजे त्याला गादीवरून काढितात अशी म्हण पडली. पुढें अंग्र्याची समुद्रावर लढाई करण्यांत कीर्त्ति असे त्याचा पराजय करून त्याचें राज्य बुडविलें, तेव्हां इंग्लिशांविषयीं अलीवर्दीखानास बरेंच भय पडलें.

सुराज उद्दवला स्नेह सोडुन वांकडा झाला.

अलीवर्दीखान मेल्यानंतर त्याचा नातू सुराजउद्दवला हा गादीवर बसला. तो दुर्व्यसनी व जुलमी होता, त्याच्या मनांत तो द्वेष फारच वाढला. कोणी एक मुलगा नवाबाचा वारस होता त्यास तो ढोंगी असें मानी. त्या मुलास इंग्लिशांनीं आश्रय सहज दिला असें दिसतें. परंतु ह्या गोष्टीचाही त्यास राग आला. शेवटची गोष्ट येवढीच सांगतों कीं इंग्लिशांच्या वखारींत पुष्कळ द्रव्य आहे असें वर्त्तमान त्यास कोणी कळविलें होतें. तीं वखार लुटण्यास चांगलें कारण सांपडावें म्हणून पाहतच होता. इतक्यांत दिसण्यांत बराबर कारण इंग्लिश लोक फोर्तविलियम ह्याच्या भोंवतीं आणखी बंदोबस्त करावा म्हणून कांहीं कामें करीत होते ती वातमी कळली तेव्हां तें झालें. मग ड्रेकसाहेब तेथें गवर्नर होता त्यास बोलावून आणून विचारलें तों त्यानें सांगितलें कीं फराशीस लोक आम्हांबराबर पूर्व तिरावर लढत आहेत त्यापक्षीं ते येथेंही लढाई करितील किंवा न जागो तीच लढाई येथपर्यंत येईल, ह्या भयानें हा बंदोबस्त करणें अवश्य आहे. असें भलतें उत्तर सांगतांच त्याच्या पोटांत अभिमान उत्पन्न झाला व त्यास भय पडलें. त्याच्या राज्यांत त्याच्यानें रक्षण करवणार नाहीं म्हणून नवीन बंदोबस्त केला ह्यांत त्याची गैरअब्रु झाली असें वाटलें व आपल्या देशांत कदाचित् लढाई येईल हें त्यास भयही पडलें. नंतर विलंब न

इंग्लिशांच्या गवर्नराचा वेडेपणा.

प्र० ११ इ० स० १७५५ कासिम बाजार येथील लूट.

लाविलां राजमहाल येथून कलकत्त्याकडे तो सेना घेऊन चालता झाला. वाटेनें कासिमबाजार येथें कंपनीची वखार होती तेथें थांबला. त्या वखारीचा थोडासा बंदोबस्त होता, तीं भोंवतीं खंदक किंवा लांकडांचा कोट नव्हता व आंत इमारत असून बाहेर पडदे लाविले होते ते कायते भिंतींप्रमाणें होते, ह्याशिवाय बाहेर भित नव्हती. त्यानें तेथील गवर्नर वाटसाहेब व दुसरे दोन सभासद कौन्सिलांत होते त्यांस प्रथम लष्करांत बोलावणें झालें. तेव्हां त्यांच्या मनांत जाण्याचें नव्हतें, परंतु त्यांच्यानें नाहीं म्हणवेना. ते कांहीं दिवस युद्ध न करितां एकदम गेले म्हणून हालवेल साहेब दोष लाविती असें दिसतें, परंतु ते तसें म्हणजे हालवेल साहेबाच्या म्हणण्याप्रमाणें करिते तर शत्रु सर्वांची कत्तल उडविते, हें खरें आहे व त्यांत फायदाही फार थोडा होता ह्याकरितां दोष लावावा ह्याचें कारण बरोबर नाहीं असें आम्हांस वाटतें. ते तेथें गेल्यावर नवाबाचें मागणें आम्ही कबूल करतों अशा मजकुराचा कागद लिहून त्यावर सही करून घेतली. मग कलकत्त्यास परत येऊं न देतां त्यांस कैदी करून ठेविलें व सुराजउद्दवल्याच्या शिपायांनीं काळ्या लुटल्या.

मित्रत्वाची वतणूक.

कलकत्ता येथील कौन्सिलांतील लोक आपलें सामर्थ्य कमी असें समजून ज्या रितीनें नवाबाशीं विघाड होणार त्या रितीनें आजपर्यंत वागत होते; व वांकडें येण्याचें मुख्य कारण इतकेंच होतें कीं फोर्ट विल्यिम येथें खंदक खणण्याची वगैरे कामें नवीन चालविलीं होतीं, ह्याकरितां त्यांनीं तीं कामें बंद केलीं आणि वीस दिवस फुकट घालविले. तितके दिवसांत पुष्कळ बंदोबस्त करून तें ठिकाण युद्ध केल्याशिवाय न देते. परंतु कासिमबाजार येथील वखार घेतली असें वर्तमान कळतांच आतां सोईनें बोलणें होऊन सख्य होईल ही आशा अगदींच राहिली नाहीं, मग युद्ध सामग्री कमी होती ती वाढविण्याचा मात्र प्रयत्न चालविला. किल्ल्याचे बंदोबस्तास पांचशें चवदांवर लोक नव्हते, व त्यांपैकीं युरोपियन म्हटले तर एकशें चौऱ्याहत्तरच होते; ह्यांत कवाइतीशिवाय कामगिरी केलेले असे दहा देखील नव्हते. (हालवेल साहेबाच्या म्ह-

बेडरपणानें विलंब लाविला.

फोर्ट विल्यिम येथील थोडेसे गडकरी.

णण्याप्रमाणें पाहतां) कवाईत देखील शिकविण्याची फार हयगय होती, ह्यामुळें बंदूक कोणीकडून धरावी हें देखील शिपायांस माहीत नव्हतें. किल्ल्याचा विस्तार मोठा होता तथापि त्या भोंवतीं चारच फूट रुंदीची भिंत होती तिच्या आंत कासिमबाजार येथल्याप्रमाणें खोल्या होत्या, त्यांच्या खिडक्या बाहेर असत व तटबंदीच्या खोल्यांवरील माळवदें होतीं तेंच आच्छादन होतें. त्या भिंतीभोंवते चोहोंकडे माल ठेवण्याच्या कोठ्या होत्या व दहापांच एके ठिकाणीं दहापांच दुसरे ठिकाणीं अशीं घरें होतीं, व लहान बोळही होते; कित्येक इमारती इतक्या उंच होत्या कीं, त्यांवरून किल्ल्यावर तोफ लागू व्हावी, व कित्येक अशा तऱ्हेच्या होत्या कीं, त्यांच्या आश्रयानें राहिलें असतां गोळीचें वगैरे कांहीं भय न व्हावें. अशा प्रसंगीं लष्करी अमलदार लोकांनीं इमारती आंत घेऊन सभोंवतीं शिपाई लोक रक्षणाकरितां उभे केले; असा बेत करण्यांत हा उद्देश होता कीं, शत्रूस आंत येऊं देऊं नये. परंतु ओमि ह्यानें ह्याविषयीं दोष लाविला तो बरोबर आहे असें दिसतें, कारण त्या जागेचा परिधि मोठा, व आंत शिरण्यास वाटा पुष्कळ होत्या ह्यामुळें त्या सर्व जागेस वेढा घालून रक्षण करण्याजोगी त्यांजवळ सेना नव्हती. त्यांनीं किल्ल्याच्या लगत घरें होतीं तीं पाडावयाचीं होतीं येवढें काम करण्यास वेळ नव्हता असें असेल तर त्यांनीं निदान छावणीवरचे मजले पाडून टाकावयाचे होते व ज्या इमारतींचें रक्षण व्हावयासारिखें होतें व किल्ल्याच्यापेक्षां ज्या उंच होत्या त्यांवर शिपाई उभे करून त्यांचें रक्षण करावयाचें होतें व सर्वांभोंवतीं खंदक व लांकडी कोट घालावयाचे होते. अशा उपायांनीं वर्षास आरमार येत असे तें येई तोंपर्यंत ते किल्ला धरून राहिले असते व आरमार आल्यावर निदान त्या लोकांस पळून तरी सुरक्षित जातां येतें, असें हालवेल ह्या ग्रंथकर्त्याचें मत आहे. अशा संकट प्रसंगीं त्यांनीं फ्रेंच व डच ह्या उभयतांस गळ घातली कीं, सुराजउद्दवला हा आपला सर्वांचा शत्रु आहे तर सर्व मिळून ह्या जुलमी पुरुषाचें पारिपत्य करूं. तेव्हां फ्रेंचांनीं मात्र अपमानाचें उत्तर पाठविलें कीं, चंद्रनगर येथें येऊन रहा म्हणजे तुमचें रक्षण करूं.

म० ११ इ० स० १७५६

किल्ल्याच्या रक्षणाचा बाइट बेत.

फ्रेंच व डच ह्यांची विनवणी.

इ० स० १७५६ फोर्ट विलियम ह्यावर हल्ला.

प्र० ११ इकडे नवाबानें कलकत्त्यावर स्वारी करण्याची इतकी घाई केली कीं, वाटेनें ऊन पुष्कळ लागून अथवा प्रखर ऊन लागल्यामुळें रोगादिक होऊन त्याचे कित्येक शिपाई लोक मरण पावले. त्यानें १७५६ त जून महिन्याचे नववे तारिखेस कासिम बाजार सोडलें. मग तो सोळावे तारिखेस फोर्ट विलियम ह्याच्या नजीक आला. तेव्हां मराठ्यांचा खंदक सर्व जाग्याभोंवतीं नव्हता थोड्याच भागीं होता हें ठाऊक नसल्यामुळें त्याचा कांहीं दिवस प्रतिबंध झाला, परंतु खंदक उतरून गेल्यावर अठरावे तारिखेस सकाळीं बाहेरील ठाणीं होतीं त्यांवर त्यानें एकदम हल्ल्यास आरंभ केला, तेथें रक्षणार्थ तीन मोर्चे बांधिले होते, त्यांवरील तोफांचा कांहीं वेळपर्यंत फार मारा चालविला होता, तरी हिंदुस्थानांतील लोकांनीं झुडपांच्या आडून गोळ्यांचा वर्षाव चालविला. ज्यावाटांचें चांगलें रक्षण केलें नव्हतें त्यावाटांनीं आंत शिरले व तीं भित तर अगदीं पडण्यासारखी होती. आंत गेल्यावर जे मोठे धैर्यवान होते त्यांसदेखील आम्ही शत्रूस हटवूं अशी अशा राहिली नाहीं, असें असतां सैन्य तेथून नेण्याची कांहींच युक्ति केली नाहीं. हें खरें कीं, बायकामुलें रात्रीस गलबतावर नेऊन ठेविलीं व कौन्सलाचे दोन सभासदांकडे गलबतावर तीं चढविण्याचें काम होतें त्यांस परत यावें हें नीट न वाटून ते तेथेंच राहिले. त्या रात्रीस दोन वाजतां सर्व मुख्य सरदार एकत्र जमून विचार करूं लागले कीं, आतां पळून जावें किंवा उद्यांची रात्र येई तोंपर्यंत वाट पहावी. ह्याविषयीं पुष्कळ वादविवाद झाला, नंतर सभा उठली, परंतु कोणताच निकाल झाला नाहीं, ह्यामुळें अर्थात असें झालें कीं, वाट पहावी हें बरोबर. दुसरा दिवस उगवतांच शत्रूनीं मोठ्या झपाट्यानें हल्ला चालविला व त्यांची सर होऊन ते थोडथोडी जागा बळकावीत चालले. हिकडे असा संकटसमय दर तासास अधिक अधिक वाढत चालला असतां ज्या गलबतावर बायकामुलें ठेविलीं होतीं त्या गलबताचा नांगर टाकून नदीच्या तोंडाशीं उभें केलें आहे व तें पाहून इतर गलबतें नांगर टाकून तशींच थांबविलीं आहेत. ही फार दोष लावण्यासारखी गोष्ट केली. 'मग किल्लेकरी लोक मोठ्या

गडकरी लोकांची निराशा.

संकटांत पडले. ब्रेकसाहेब त्या किल्लयावर सुभेदार होता त्याला सेनेस हुकूम चांगला करतां येत नव्हता. त्यानें लढाई आपल्या अंगावर येते असें पाहतांच त्यांची पांचावर धारण बसून शेवटीं होडी राहिली होती तींत शिपाई लोकांचें काय होईल हें न पाहतां बरळा. तेव्हां शिपाई लोकांस रागही पुष्कळ आला व आश्चर्यही पुष्कळ वाटलें मग हालवेलनामें साहेब होता त्यास त्याच्या जागेवर त्यांनीं आपणच निवडून नेमिलें, परंतु त्यास काळजी येवढीच पडली कीं आपली सुटका होते कशी. एक गलबत जवळ अटोक्यांत होतें, तें हुकूम करून जवळ आणण्यास सांगितलें, परंतु तें येत असतां वाळूवर लागलें व त्यावरील लोक तें सोडून चालते झाले. गोविंदपूर येथें जीं गलबतें जाऊन लागलीं होतीं त्यांनीं यावें म्हणून पुष्कळ मोठ्यानें ओरडून हाका मारिल्या, परंतु त्यांपैकीं एक देखील त्या शूर पुरुषांचे प्राण वांचविण्यास किल्लयाच्या मिंतीजवळ आलें नाहीं; तें येतें तर त्यांस पराकाष्ठेचें भय होतें असें नाहीं. असो हा गोष्ट वाईट केली. दुसरा कोणताही उपाय राहिला नाहीं असें पाहून हालवेल साहेबानें किला हस्तगत करण्याचें बोलणें चालविलें. त्यानें सकाळीं एक पत्र लिहून तटबंदीखालीं टाकिलें तें पोहोंचून तिसरे प्रहरीं लढाई कांहीं वेळ तहकूब असावी म्हणून निशाण उभारिलें हें उत्तर मिळालें. हिकडे अंमळ घोटाळा झाला असें पाहून दारू प्यायले, मग त्यांस असा अमल आला कीं लढाई करण्यास ते निरुपयोगी झाले. हें शत्रूंस समजतांच ते किल्लयांत शिरले व कोणी अडथळा न करितां किला शत्रूंच्या स्वाधीन झाला.

सं० १० इ० स० १७५६

सुभेदार पळून गेला.

हालवेल ह्यास आपणच निवडून सुभेदार केलें.

किला हस्तगत करण्याचें बोलणें.

येथील सेना फोर्ट विलियमांत शिरली, तेव्हां तिनें प्रथम जुलुमाचें कृत्य कोणतेंही केलें नाहीं. परंतु नवाब व त्याबरोबर मीरजाफर हा सेनापति होता, ते उभयतां आंत गेले तेव्हां नवाबानें हालवेल साहेब ह्यास बोलावून आणून बंगालच्या राजाबरोबर युद्धास उभा राहिलास ही शरमेची गोष्ट आहे अशी पुष्कळ निर्भर्त्सना केली. तेथील तिजोरींत पन्नास हजार रुपये मात्र सांपडले म्हणून त्याला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. तें पोटांत न राहून त्यानें बोलू-

मिरजाफर ह्याचें वर्णन.

कैदी लोकांशीं वागणूक.

प्र० ११ इ० स० १७५६

न दाखविलें; तथापि तिसरे भेटीच्या वेळेस शेवटीं उठतांना सांगिलें कीं तुला कोणी उपद्रव करणार नाहीं. मी बोलतों हें मी शिपाई आहें त्यापक्षीं खरें असें पक्कें समज. नंतर तो इंग्लिश सरदार अपल्या लोकांकडे परत गेला आणि पाहतो तों त्यांभोंवतीं शिपायांचा बंदोबस्तानें पाहरा असून त्यांनां एके पडवींत नेलें होतें. ती पडवी किल्लेकरी लोकांस पाऊस व ऊन लागूं नये म्हणून बांधली होती. परंतु तिच्यामुळें खालच्या खोलींतून उजेड व हवा त्या बाजूनें अगदीं येत नसे. किल्ल्यांत किती एक ठिकाणीं आग लागली होती त्यामुळें धुराची अशी पराकाष्टा झाली कीं आम्हीं गुदमरून मरावें म्हणून बुद्धया धूर केला आहे असें भय त्यांस पडलें; परंतु दुसरी चांगली जागा त्यांस ठेवण्याकरितां पाहण्याची योजना चालली होती. त्यांनीं किल्ल्यांत ब्ल्याक होल म्हणून एक अंधारी कोठडी होती ती खोली शिपायांकरितां नेमिली, तींत अठरा चौरस फूट जागा होती; दोन लहान खिडक्या लोखंडाचे गज बसविलेल्या होत्या; त्या खिडक्या पडवीच्या बजूस होत्या व पडवींत वारा फिरण्यासही सोई नव्हती ह्यामुळें त्या खिडक्यांतून श्वासोच्छ्वास सरासरी चालण्यापुरती मात्र हवा येत होती. ह्या लहानशा खोलींत अमलदार व शिपाई मिळून एकशें शेचाळीस असामी बळेंच आंत घातले. तेव्हां कोणी धैर्य करून म्हणाले कीं आंत मावूं तरी कसे. मग मुख्य अधिकाऱ्यानें हुकूम केला कीं जो आंत जाण्यास मागें घेईल त्यास तत्क्षणीं मारून टाकावें अशा रितीनें बळेंच त्या कोठडींत ते मावत नव्हते तरी त्यांस आंत भरून वरिरून दारास बळकट अडसर घातला. ह्याप्रमाणें त्यांस कोंडून टाकिलें तेव्हां त्यांनीं मनांत आणिलें कीं आपण आजच्या रात्रीस वांचत नाहीं हें खचीत आहे त्यापक्षीं जें होईल तें होवो, बाहेर निघण्याची अवश्य तजवीज केली पाहिजे. मग त्या खिडकींतून जमादार हिंडत त्यांत दयाळू कोण आहे असें तोंडावरून पाहून त्यास हाल्वेल साहेबानें शपथ घालून सांगतलें कीं जेथें दम कोंडणार नाहीं अशा जागेंत आम्हांस नेण्याची तजवीज कर म्हणजे उद्यांसकाळीं शंभर रुपये बक्षीस

कलकत्ता येथील ब्ल्याक होल कोठडी.

इंग्रजांची भयंकर अवस्था.

देईन. ह्यांत किंमपि अंतर होणार नाहीं. तो मनुष्य जाऊन प- प्र० ११
रत आला आणि म्हणाला कीं तसें होणें फार कठीण आहे. तेव्हां इ० स० १७५६
आंतील लोकांस वाटलें कीं आपण थोडे रुपये देऊं केले, मग दोनशें रुपये देण्याचें त्यांनीं कबूल केलें. तो मनुष्य पुन्हा गेला आणि परत येऊन म्हणाला कीं नवाबास झोंप लागली आहे, त्यास कोणाच्यानेंही जागें करवत नाहीं. पहा एकशें चाळीस मनुष्यांचे प्राण वांचत असतां त्या जुलमी नवाबाची झोंप एक क्षणभर मोडवली नाहीं हा चमत्कार आहे. त्या अनर्थाच्या रात्रीं ज्या यातना झाल्या यांचें सविस्तर वर्णन हालवेल साहेबानें केलें आहे; त्या दुःखाप्रमाणें अमुकास दुःख भोगावें लागलें असें इतिहासांत सांपडणें फार कठीण आहे. दर पळास दुःख वाढत चाललें होतें. जे लोकांचीं दुःखें दडपून गेले होते ते अमळ हलले म्हणजे लागलेंच जवळ असत त्यांस अडचण होऊन दुःख मात्र होई. ती हवा लवकरच नासून अपकार होऊं लागला, तो असा कीं क्षणोक्षणीं प्राण गुदमरूं लागले; आणि घामाच्या धारा चालल्या व पाण्याचा तर पराकाष्ठेचा शोष पडला. तशांत खिडकी जवळची जागा सर्वांत चांगली असें जाणून तेथें आपण जावें म्हणून कित्येक तडफड करूं लागले हें फारच वाईट झालें. त्या खिडकींत पुष्कळ परदेशचे लोक होते ते त्यावेळेस कोणी लहान मोठा नाहीं असें झाल्यामुळें जोरानें खिडकी जवळ जाण्यास पाहूं लागले तेव्हां जे दुःख भोगीत होते ते हीनबळ होत जाऊन कित्येकजण चेंगरून अथवा पायांखालीं सांपडून मरण पावले. जेव्हां पाणी पाणी म्हणून कित्येक मोठ्यानें ओरडूं लागले, तेव्हां पाण्यानें भरलेले कातडयाचे डोल त्या दयाळू जमादारानें गजांतून आंत सोडिले, परंतु त्या योगानें दुःख मात्र अधिक झालें; कां तर पाणी मिळण्यासाठीं फार दांडगाई झाली. बाहेर शिपाई होते ते मौजेनें त्यांची दांडगाई पाहूं लागले व चांगलें दृष्टीस पडावें म्हणून खिडकीजवळ दिवे देखील कित्येकांनीं आणिले. सुमारें अकरा वाजतां कैदी भराभर मरूं लागले. हालवेल ह्याचे जिवलग असे सहा मित्र होते ते त्याच्या पायांपाशीं पडले त्यांवरून जे राहिले होते ते तुडवून गेले. जे त्यावेळेस जि-

ग्र० ११ इ० स० १७५६

वंत होते त्यांपैकीं पुष्कळ वायूनें बडबडत होते व कित्येक बेशुद्ध होते; कित्येक प्रार्थना करीत होते, परंतु ते जें म्हणत त्यांत संबंध नव्हता. इतर ईश्वराची पराकाष्ठेची निंदा करीत होते. बाहेर जे पाहारेकरी होते त्यांस पुष्कळ अवाच्य बोलून ह्या खोलीस आग लावा म्हणजे आम्ही दुःखांतून मुक्त होऊं असें म्हणत परंतु तेंही व्यर्थ. दिवस उगवला तेव्हां मेले नव्हते असे थोडे होते, त्यांपैकीं बहुतेक वायूनें बडबडत होते अथवा बेशुद्ध होऊन अचेतन पडले होते. मुख्य सुभेदार जातीनें अचेतन पडला होता. मग सहा वाजण्याच्या सुमारास सुराजउद्दवला निजून उठला तेव्हां त्यानें त्या सुभेदाराचा शोध केला. तेव्हां रात्रीं जें वर्त्तमान झालें होतें तें सर्व त्याच्या कानावर गेलें. तेव्हां तो इंग्लिश सरदार जिवंत आहे किंवा कसें हें पहा म्हणून माणसास आज्ञा केली. मग तो जिवंत आहे व बांचेल असें वाटतें असें परत कळल्यावर खोलीचें दार उघडण्याचा हुकूम दिला. खोलींत घातले तेव्हां एकशें शेचाळीस होतें. त्यांपैकीं दार उघडलें तेव्हां तेवीस जणांस मात्र धुगधुगी राहिली होती. ताजी हवा आंत शिरतांच हालचेल सावध झाला, मग त्याला संभाळून नवाबाच्या जवळ त्याच्या माणसांनीं नेलें, तेव्हां तो तें दुष्ट वर्त्तमान सांगू लागला, इतक्यांत नवाबानें त्याला बसावयास कांहीं देण्याचा हुकूम केला व थोडें पाणी द्या म्हणून सांगितलें; परंतु दयेचें चिन्ह आणखी कांहीं एक दाखविलें नाहीं. मग त्यानें तेथें पुष्कळ द्रव्य आहे असें ऐकिलें होतें त्याविषयीं निक्षून चौकशी चालविली; द्रव्य अगदीं नाहीं म्हणून सांगितलें होतें, परंतु तें त्यास खरें वाटलें नाहीं. पुष्कळ चौकशी केली तथापि त्याविषयीं अधिक शोध लागला नाहीं. मग तो सरदार व इतर तिघेजण ह्यांस मक्सुदाबाद येथें पाठविलें. गलबतांतून जात असतां त्यांस सर्व आंगावर गळवें होऊन फार दुःख भोगावें लागलें. तीं गळवें होण्याचें कारण त्या लोकांस पूर्वी कोंडिलें होतें तें झालें; गळवें येणें हें प्रकृति चांगली होण्याचें चिन्ह समजतात. बाकी लोक राहिले त्यांस सोडून दिलें; आणि प्रेतें होतीं तीं प्रेतसंस्कार कांहीं न करितां खंदकांत फेकून दिलीं.

राहिले होते त्यांची अवस्था.

हालचेल व नवाब त्यांची भेट

हालवेल साहेबाचें मत असें दिसतें कीं हा अनर्थ व्हावा असें नवाबाच्या मनांत नव्हतें हें खरें, परंतु कित्येक हानाखालच्या अगलदार लोकांनीं सूड उगविण्यास ही संधी साधिली. तथापि नवाबानें ह्या अनर्थास कारण कोण वगैरे कांहींच शोध केला नाहीं. ह्यावरून या दुष्ट कृत्याचा दोषी तोच आहे असें दिसतें. मिलनामें ग्रंथकर्त्या इंग्लिशांनीं ती खोली बंदिवानांकरितां नेमिली होती म्हणून असें झालें असा त्यांसच दोष लाविला, परंतु हें आम्हांस बरोबर वाटत नाहीं. औरस चौरस अठरा फूट जागा ज्याखोलींत आहे ती दोन किंवा तीन शिपायांस पुरेल व ह्यांपेक्षां अधिक लोक तेथें बहुतकरून कधींही ठेवीत नव्हते असें वाटतें. हा अनर्थ होण्याचें कारण म्हटलें तर पुष्कळ लोक थोडया जाग्यांत भरले हें उघड आहे.

प्र० ११ ह० स० १७५६ गडकरी लोकांचे दुःखाचें कारण कोण असावें ह्याविषयीं विचार.

मद्रास येथील सरकारास कांहीं वर्तमान कळलें तों बंगाल्यांत इंग्लिशांचें कांहीं एक राहिलें नाहीं, हें दुःखाचें वर्त्तमान येऊन पो होंचलें. तेव्हां दक्षिणेत मोठा उदय होण्याची वेळ आली होती. फ्रेंच लोकांनीं सलाबतजंगास दासाग्रमाणें ठेविलें होतें, त्यामुळें पुष्कळ वर्षेंपर्यंत त्याचे मनांत या लोकांपासून निराळें व्हावें असें होतें, शेवटीं त्यानें तसें करण्याचा निश्चय केला. बुसी ह्यास जाण्यास सांगितलें व फराशीस लोकांनीं पूर्वी ज्या संकटांतून राखिलें होतें त्यापासून आतां तेच रागावून आपणास उपद्रव करितील त्यांपासून रक्षण व्हावें म्हणून सलाबतजंगानें इंग्लिशांस विनंती करून कुमकेस फौज मागितली. ती फौज पाठवून देते तर फराशीस लोक दक्षिणहिंदुस्थानांत पंच होऊन कलह तोडीत त्यांच्याप्रमाणें ते झालें असते. हा समय चांगला आला होता परंतु बंगाल्यांत अशी वेळ प्राप्त झाली होती कीं, हिकडला फायदा सोडून आपण कुमक नाहीं म्हटली म्हणजे बुसी ह्यास प्रार्थना करून परत आणून फराशीस लोकांच्या अमलांत सलाबतजंगास पुन्हा रहावें लागेल असें असतांही कुमक नाहीं म्हणणें भाग पडलें.

त्या वर्त्तमानामुळें मद्रासेस जो प्रकार झाला तो.

मद्रासच्या सरकाराची तनजवोज.

आरमाराकडील व इतर मिळून जितकी फौज पाठविण्यास होती तीं सर्व कलकत्त्यास रवाना केली, तींत आरमारावरील फौजेवर आदमिरल वाट्सन व इतर लष्करावर कर्नल क्लैव ह्यांस मुख्य ने-

कलकत्त्यास पाठविलेली फौज.

प्र० ११ इ० स० १७५६

मिलें होतें. ह्या सेनेनें हिंदुस्थानांत इंग्लिशांचें राज्य स्थापिलें खरें, परंतु तींत पाहतां नऊशें युरोपियन लोक व पंधराशें नेटीव लोक इतकेच कायते होते. दोन गलबतें मिळून त्यांवर सातशें लोक व सामानाच्या कोठ्या पुष्कळ होत्या. तीं गलबतें तुफान होऊन भलतीचकडे गेलीं. बाकीचीं गलबतें दिसेंबर महिन्याच्या मध्याच्या सुमारास कलकत्त्याच्या खाल्च्या आंगास कांहीं अंतरावर फुल्ता म्हणून शहर आहे तेथें येऊन लागलीं. त्याच ठिकाणीं पूर्वीच्यापैकीं बाकी राहिलेले इंग्रज लोक येऊन राहिले होते. मग नवाबाच्या नांवाचीं पत्रें माणिकचंद नामें कलकत्त्यास सुभेदार होता त्याजकडे पाठविलीं. त्यांत नवाबास धमकावून फार भय घातलें होतें, अशीं पत्रें पाहून त्यानें साफ सांगितलें कीं, माझ्यानें हीं नवाबाकडे पाठवत नाहींत. नंतर इंग्लिश सरदारांनीं विलंब न करितां लढाईस आरंभ करावा असा निश्चय केला. अदमिरल वात्सन ह्यानें दुसरे दिवशीं शहरापासून पांच कोशांवर खालीं बजबज म्हणून किल्ला होता त्यावर हल्ला करण्याच्या बेतानें मायिदापूर ह्याच्या जवळ गलबतें नेऊन लाविलीं. तथापि क्लैव साहेबानें थेट कलकत्त्यावरच स्वारी करण्याचा निश्चय केला; मग होड्या मिळाल्या नाहींत तरी गलबतावरून उतरून खुष्कीच्या मार्गानें तो चालता झाला. वाटेनें रात्र झाली तेव्हां फौजेतील लोक श्रमानें फार थकले होते म्हणून बंदुका वगैरे भुईवर ठेवून स्वस्थ झोंप घ्यावी अशी परवानगी मिळाली होती. तेथून एक कोसाच्या आंत शत्रूचें मोठें सैन्य तळ देऊन उतरलें होतें हें वर्त्तमान त्यास नव्हतें. परंतु शत्रूनीं ह्याची बातमी ठेविली होती. त्या लोकांनीं रात्रीस येऊन एकाएकीं एकदम हल्ला चालविला. प्रथम त्यांनीं बराच मार मारिला, व इंग्लिशांच्या दोन चाल्या तोफा देखील घेतल्या. तथापि इंग्लिश सरदार जागा होतांच पळून न जातां नेहमींप्रमाणें त्यानें धैर्य धरून सर्व लोक लागलेच जमा केले. इंग्लिशांच्या फौजेची संख्या थोडी व शत्रूची सेना मोठी होती व त्याचा कांहीं जयही झाला, तरी कवाईत शिकलेल्या लोकांशीं शत्रूच्यानें युद्धांत बरोबरी करवेना. शेवटीं त्याचा अगदीं पराजय होऊन चहूंकडे फौजेची फांकाफांक झाली.

लढाईस आरंभ.

क्लैव साहेबाची वर्त्तणूक.

ह्यावरून युरोपियन लोकांचें सेनाबळ अधिक असें पूर्ण दिसून आलें, तेव्हां माणिकचंदास पराकाष्ठेचें भय पडून तो विलंब न करितां कलकत्ता सोडून चालता झाला. तेथें कांहीं लोक असावे म्हणून पांचशें गडकरी मात्र ठेविले होते; मग वात्सन साहेबानें मोरचे बांधून तोफांचा मार चालू करतांच कलकत्ता हस्तगत झाला. तेथें इंग्लिशांच्या बखारींत माल होता तो पाहतात तों तसाच होता. कर्नल क्लैव साहेब व आरमारावरील मुख्य सरदार वात्सन साहेब ह्या उभयतांमध्यें कांहीं मत्सर उत्पन्न झाला; कारण वात्सन साहेबाच्या मनांत तेथें दुसऱ्या कोणास सुभेदार नेमावयाचें होतें व कंपनीचें सैन्यही आंत येऊं द्यावयाचें नव्हतें. कर्नलाच्या मनांत ती जागा आपणास मिळावी असें येऊन त्यानें आपला हक्क बरोबर आहे असें स्थापिलें. ह्या उभयतां सरदारांचे कलह चालू झाले, परंतु दोघेही सरकारचा फायदा व्हावा ह्याविषयीं तत्पर होते व पोटांतून परस्परांस मोठे मानीत, ह्या कारणामुळें कंपनीचे कामास फारसा प्रतिबंध झाला नाहीं. त्या ठिकाणाहून कपतान कुती साहेबास हुगळी येथें पाठविलें. तेथें थोडी लढाई झाल्यावर शहर घेतलें तेव्हां लूट सांपडली ती दीड लाखापर्यंत भरली.

प्र० ११
इ० स०
१७४६
कलकत्ता हस्तगत झाला.

उभयतां अधिकाऱ्यांमध्यें मत्सर.

इंग्लिश येऊन त्यांचा जय झाला ही वार्तमी नवाबास लागतांच त्यानें फौज जमवून कलत्त्यावर स्वारी केली. हिंदुस्थानांतील राजे किती हीनबल असतात हें क्लैवसाहेबास माहीत नव्हतें म्हणून ज्याची प्रजा वीस कोट असा ह्या राज्यार्शी युद्ध करण्यास तो पुढें सरसावेना. मद्रासेस कंपनीवर तेव्हां मोठी वेळ गुदरली होती ह्यामुळें त्याला तेथें लवकर परत जाणें अवश्य होतें, अशा कारणावरून त्यास वाटलें कीं सराजउद्दवला मध्यम म्हणजे जरब पडण्याजोगीं नव्हत अर्शी कलमें कबूल करील तर बरें. वात्सन ह्याच्या मनांत तर त्याचा पराजय होई तोंपर्यंत तह करूं नये असा आग्रह होता. परंतु दुसऱ्यानें त्याचें मन मिळवून वकील पाठविला, तो पोहोंचला तेव्हां त्याचा चांगला सत्कार झाला आणि कबूल करण्यास योग्य अर्शी कलमें सुराजउद्दवल्यास सांगितलीं.

कलकत्त्यास येथील फौज रवाना झाली.

नवाबाची सौम्य रीति.

प्र० ११ इ० स० १७५६

तथापि त्यानें कूच थांबविला नाहीं व पुष्कळ युक्तींनीं टाळाटाळ करून तह शेवटास जाऊं दिला नाहीं. सन १७५७ त जानेवारीच्या शेवटीं सर्व सेनेनिशीं तो तेथें येऊन पोहोंचला. मग कलकत्त्याजवळ आपल्या सैन्याच्या सभोवतीं खंदक खणण्यास आरंभ करविला. तेव्हां सर्वांस वाटलें कीं तहाचें बोलणें चालविण्यांत त्याचा उद्देश इतकाच आहे कीं पुष्कळ काळ तयारीस सांपडावा. त्यानें परत जावें म्हणून सांगण्याकरितां दोन वकील पाठविले, परंतु ते गेले असतां त्यांचा गर्वानें सत्कार ठेविला नाहीं व त्यांचें म्हणणें कबूल केलें नाहीं. कोणी एक्या तेथील मित्रानें सांगितलें कीं तुम्हीं जपून रहा, कदाचित् विश्वासघात होईल; तेव्हां एकाएकीं निघून ते चालते झाले आणि सुरक्षित आपल्या छावणींत गेले.

क्लैव साहेबानें येथील सैनवर हल्ला केला.

क्लैवसाहेबानें तर येथील लोकांच्या सैनेवर हल्ला करण्याचा निश्चय केला. त्यापाशीं सहाशें खलाशी लोक होते व त्यांखेरीज सैनांनीं निकरानें व निश्चयानें लढाई केली, परंतु तीन घोंटाळा फार झाला व ते पांगून युद्ध करीत होते. त्या सैनेवर धुकें इतकें दाट पडलें होतें कीं त्यांतील लोकांस परस्परांस बहुतकरून ओळखवेना. शत्रूच्या तोफांच्या व घोडेस्वारांच्या बंदुकांचा सपाट्याचा मार चालला तेव्हां इंग्लिश लोकांचा पुष्कळ नाश झाला. सरासरी २२० लोक मरण पावले. शेवटीं त्यांनीं जो जो हल्ला केला त्यांत त्यांस परत हांकून लाविलें; तेव्हां सुराजउद्दवल्ला त्यानें पाहिलें कीं आपले लोक पुष्कळ व पराक्रमी असून त्यांच्यानें इंग्लिशांच्या लहानशा टोळीवर चढाव करवत नाहीं. मग त्यास तह करावा असें वाटलें. उभयतांच्या मनांत तह करण्याची इच्छा असल्यामुळें या दोघांच्या संमतीनें कलमें ठरलीं. सुराज ह्यानें कलकत्त्यास इंग्लिशांनीं तटबंदी करावी म्हणून मान्य केलें व लढाईच्या पूर्वीं जे हक्क होते ते राखून त्यांनीं व्यापार चालवावा असें कबूल केलें. इंग्लिशांस जें नुकसान सोसावें लागलें तें भरून

इंग्लिशांची सिद्धि.

तहाचीं कलमें.

घेण्याचा हक्क असतांही त्यांनीं तो सोडून दिला. सुराज व इंग्लिश ह्या उभयतांनीं जातीचें रक्षण करण्यास व कोणाशीं युद्ध-कर्त्तव्य असल्यास परस्परांस मदत करावी असाही तहांत करार ठरला, मग ह्या महत्वाकांक्षी राजानें आपलें सैन्य माघारां आपल्या मुलखांत नेलें. इ० स० १७६७

फ्रान्स व इंग्लंद ह्या दोहों देशांचें युद्ध चालू झालें अशी बातमी येऊन पोहोंचली तेव्हां बारीक व मोठा विचार आतां नवीन उत्पन्न झाला. फ्रेंच लोकांचें बंदोबस्ताचें ठाणें चंद्रनगर येथें होतें. त्यांनीं कबूल केलें कीं ह्या प्रांतांत लढाई नसावी उदासीन रहावें. परंतु त्यांनीं असेंही सांगितलें कीं पोंदेशरी येथील सरकार आमचें म्हणणें मान्य करी तोंपर्यंत हा उदासीनपणा चिरकाळ राहील असें आमच्यानें कबूल करवत नाहीं. हें म्हणणें मान्य करावें असें क्लेव साहेबास वाटलें, त्यानें असें पाहिलें कीं ह्या ठाण्यावर जर हला केला तर नवाबास राग येईल व बंगाल्यांतील कारभारांत ब्रिटिश लोकांस फारच मन घालावें लागेल. बरें, मान्य केलें तर फ्रेंचलोक निश्चयानें सांगत नाहींत ह्यामुळें त्यांचा नेम नाहीं व येथील राजाचा मानस आपल्या हिताकडेच राहील ह्याचा कांहींच नेम नाहीं; म्हणून तो फ्रेंच लोकांस मिळाला तर व ह्यांच्या मुख्य राजधानींतून कुमकही सहज यावयाजोगी आहे ती आली तर फ्रेंचांकडील लोकांचा सहजच इतका जमाव होईल कीं त्यांबरोबर इंग्लिशांच्यानें युद्ध करवणार नाहीं. मग असें म्हणणें पडलें कीं फ्रेंच लोकांवर आपला वर्चस्मा हलीं आहे त्यापक्षीं त्यांना आतांच धुळीस मिळवावें; असा इंग्लिशांचा ठराव वात्सनचें व मद्रास सरकारचें फारच म्हणणें पडून शेवटीं सर्वांनीं कबूल केला. ह्या ठरावास सुराज ह्यानें मान्य करावें म्हणून बोलणें लाविलें परंतु त्यानें कांहींच उत्तर देण्याचें बंद केलें. अदमिरल वात्सन ह्यानें पत्र लिहिलें त्यांत तो ठराव अवश्य मान्य करावा व नकेला असतां कांहींसा धाक वगैरे घातला होता असा मजकूर होता. त्यानंतर त्याला उत्तर देणें भाग पडलें, तेव्हां तुम्हांस जें नीट दिसेल तें करा असें मोहोगम संमताचें उत्तर

फ्रान्स व इंग्लंद ह्या देशांतील युद्धास पुन्हा आरंभ.

हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या चमत्कारिक स्थिति.

प्र० २१ इ० स० १७६७ नवाबाची वर सोड.

त्यानें पाठविलें आणि वातनामें साहेब त्याचे दरबारीं वकील होता त्यास सांगिलें कीं मी ह्या कामांत पडत नाहीं. पुढें सैन्याचा कूच झाला असें वर्तमान कळतांच त्यानें आपलें पूर्वीचें बोलणें फिरवून लढाई तहकूब ठेवावी अशी स्पष्ट आज्ञा पाठविली. तेव्हां हा केवळ अपमान केला असें समजून त्या लिहिण्याकडे अगदीं लक्ष दिलें नाहीं. क्लैव ह्यानें तसेंच पुढें जाऊन सन १७५७ त मे महिन्याच्या १४ तारखेस वेढा घालण्यास आरंभ केला आणि

चंद्रनगरास वेढा घातला व नें घेतलें.

चंद्रनगर येथील बाहेरील ठाणीं होतीं तीं आंत पळवून लाविलीं. तेथील लोकांनीं शौर्यानें युद्ध केलें; परंतु वात्सन हा आरमारावरील सरदार लौकरच आरमारांनिशीं येऊन पोहोंचला तेव्हां त्यानें तोफांचा भडिमार चालविला, व अशा युक्तीनें व जोरानें लढाई चालविली कीं थोड्याच वेळांत कांहीं आट कबूल करून घेतां तेथील लोकांनीं शहर हस्तगत केलें. तेथें रक्षणार्थ पांचशें युरोपियन व सातशें येथील लोक होते ते युद्धदास झाले आणि पुष्कळ कोठारें शत्रूंस सांपडलीं

क्लैव ह्यावर आगिबाणीचा प्रसंग.

ह्या लढाईंत इंग्लिशांचा पूर्ण जय झाला; तरी क्लैव ह्यास ह्यामुळें आपणावर आतां कोणता आगिबाणीचा प्रसंग आला आहे हें लौकरच समजलें. नवाब तर मोठ्या रागानें परंतु पोराप्रमाणें बडबडत होता, व वात्सन साहेबास मारून टाकीन असा धाकही घालीत होता. पूर्वी अहंमद अबदल्ला म्हणून पठाणी सरदार बंगाल्यावर स्वारी करण्याकरितां येणार होता तो भिऊन परत गेला, त्यामुळें नवाबास धैर्य आलें होतें. त्यास फ्रेंच लोक आपणास कुमक करितील अशीही त्या वेळेस खातरी वाटत होती. कांहीं फ्रेंच लोक तेथें होते व नवीन कुमक येण्याचा संभव होता व ती झटकाच्या वाटेनें येत होती. इंग्लिशांचा आग्रह होता कीं फ्रेंच लोकांचा एक मनुष्य देखील नवाबानें आपल्या मुलखांत ठेवूं नये. म्हणून तो तोंडानें म्हणे कीं मीं तसेंच केलें आहे, परंतु तुमचें मागण्यासबरीक अंत नाहीं, अशी कुरकुर केली. ह्याप्रमाणें पोरकटपणाचें भाषण करीत असतां एके दिवशीं मीरजाफर नामें त्याचा मुख्य प्रधान होता त्यास ब्रिटिश लोकांवर स्वारी करून

नवाबाची अशक्तपणाची व संतूक.

परांजित केलें असतां दहा लाख रूपये देतों म्हणून सांगितलें, परंतु दुसरे दिवशीं सकाळीं नवाबाला त्या गोष्टीचा पश्चात्ताप झाला. ही अशक्तपणाची गोष्ट पाहून फार दुःख वाटतें. ह्या गोष्टीमुळें व कंपनीचें ठाणें जवळ होतें ह्यामुळें तेथें अगदीं नवीनच प्रकार उत्पन्न झाला. प्र० ११ इ० स० १७६७

आशियेंतील कोणत्याही दरबारांत फितुरांचीं कारणें नेहमीं असतातच. त्यांत ही गोष्ट विशेषेंकरून हिंदुस्थानांतील दरबारास लागू होती, कारण कीं अमक्याच्या मागून अमक्यानें गादीवर बसावें असा नियम नसून तेथें अव्यवस्था पराकाष्टेची असे. नवाबाच्या मुख्य अधिकाऱ्यांपैकीं कित्येक जण त्याच्या यथेच्छ व जुलमी वर्तणुकीमुळें फार त्रासले व गादीवर आपण बसावें असेंही त्यांच्या मनांत वागत होतें. आणि वात्सन साहेब रसिदेंत राहिल्यामुळें त्याच्या द्वारें अर्ज वगैरे पाठविण्यास सोई चांगली होती. खुदा-यार खानलाती नामें सरदार होता त्यापासून प्रथम तशाप्रकारचें बोलणें आलें. तो म्हणाला इंग्लिशांच्या साहाय्यानें मी आपल्या यजमानास पदच्युत करीन व आपणास येथील मोठे संपत्तिमान साव्कार अनुकूल होतील हें खचित आहे. पुढें असेंही वात् साहेबास विदित केलें कीं मीरजाफर म्हणजे मुख्य प्रधान हाही त्यास गादीवर बरावूं असें कबूल केलें असतां ह्या कटांत येण्यास तयार आहे तेव्हां ह्या गोष्टीकडे फारच लक्ष लागलें. नंतर ही बातमी क्लैव साहेबास कळविली, तेव्हां त्यास वाटलें कीं राज्याच्या स्थितींत पक्की उलटापालट झाली आहे. सुराज ह्याचे दुर्गुण क्लैव साहेबाच्या दृष्टीस पक्के आले होते असें दिसतें. तो त्यास लुच्चा म्हणून वर्णितो व ज्यावर विश्वास अगदीं ठेववत नाहीं त्यास काढून टाकलेंच पाहिजे; त्याचा तरी नाश करावा, नाहीं तर आपला खचित होईल असें समजला. इकडे त्याच्या पोटांत वहीम येऊं नये म्हणून सुराजास शांतवनाचें पत्र लिहिलें. तिकडे सर्व तयारी झाली होती व कलमें मात्र ठरावयाचीं राहिलीं होतीं. म्हणून क्लैव साहेब लागलाच मुख्य ठाण्यास गेला आणि सिलेक्त कमिती म्हणजे निवडक मंडळी नेमून त्यांच्यापुढें आपला सर्व बेत निवेदित केला.

नवाबाचे दरबारीं फितूर.

क्लैव साहेबाचा मुत्सद्दीपणा.

प्र० ११ इ० स० १७६७

तीं तीन लोकांनीं विचार करून सांगितलें कीं ह्या वेतास आमचें मनापासून अनुमत आहे व आरमाराबरील मुख्य सरदार वात्सन ह्यानें मी लढाईस येतों असेंही मान्य केलें.'

इंग्लिशांचें अनिश्चयित मागणें.

कलमें कबूल करून घेण्याचीं ठरलीं तीं येणेंप्रमाणें. फ्रेंचांच्या वखारी व सर्व माल इंग्लिशांस द्यावा व फ्रेंचांस बंगाल्यांतून अगदीं घालवून द्यावें; कलकत्त्या भोंवतालचा बराच मुलूख द्यावा, व जें नुकसान सोसावें लागेल त्याबद्दल एक कोटी रूपये कंपनीला द्यावे, ब्रिटिश लोक तेथें राहत होते त्यांस पन्नास लक्ष, एतद्देशीय लोकांस व आर्मिनियन लोक येथें होते त्यांस सत्तावीस लक्ष, व सेनेतील लोकांकरितां पंचवीस लक्ष मागितले, व तेवढाच रकम आरमाराकरितां मागितली. त्या कमेतींतील एकानें सहज विचारिलें कीं आपण आपणाकरितां कां कांहीं मागूं नये ? तें बोलणें सर्वांनीं मान्य केलें आणि आपआपल्या पदवीप्रमाणें वांटून घेण्याकरितां बारा लक्ष रूपये मागण्याचें ठरविलें. हिंदुस्थानांतील राजांच्या संपत्तीविषयीं साधारण पराकाष्टेच्या भ्रांति युरोपियन लोकांस होत्या. नवाबाची संपत्ति रोख साडेचार कोटींची आहे अशी वंदता होती. म्हणून पंचेचाळीस लाखांपेक्षां तर कमी भरणार नाहीं हें खचीत असें त्यांस वाटत होतें; परंतु मिस्तर अर्मी लिहितो कीं अलीवर्दी खानाच्या कारकिर्दीभर तो परचक्राचें निवारण करीत होता, त्यावरून पाहतां हा शेवटचा अजमासही अगदीं अयुक्तिक आहे असें सिद्ध झालें असतें. एकंदर तीनकोट रूपयांची याद मीरजाफर ह्यापुढें ठेविली. तेव्हां त्याचा प्रधान राजदुलभ नामें होता त्यानें सांगितलें बंगालच्या खजिन्यांतही इतका पैसा देण्यास नाहीं हें खचित आहे. परंतु इंग्लिश लोक त्यांत कांहींच कमी करीनात व त्यास मोठ्या आशा दाखवून स्नेहाचें भाषण करीत म्हणून इकडील लोकांच्या प्रमाणें त्यानें जें जें मागितलें तें तें कबूल केलें व मनांत धरिलें कीं, वेळेस काय होईल तें पाहतां येईल. ह्या ठरावांतील मुख्य गोष्ट सांगितली पाहिजे कीं, उमीचंद नामें सावकारासही गुप्त मसलत चालली होती तीं माहीत झाली होती. त्यानें भय घातलें कीं, मला अमुक पैसा द्याल तर मी ही मसलत फोडणार नाहीं, जर न द्याल तर फोडीन.

येथील लोकांच्या संपत्तीविषयी भ्रम.

ह्या लबाडींतून पार पडण्याकरितां त्यानें युक्ति केली कीं, दोन यादी लिहिविल्या, त्यांपैकीं एक खरी होती तींत उमीचंदाचें कलम कांहींच नव्हतें; दुसरी होती ती उमीचंदास दाखविण्याकरितांच केली होती; तींत उमीचंदाच्या नांवानें वीस लक्षांपेक्षां कमी घेणार नाहीं असें कलम होतें. कर्नल क्लैव ह्यानें दुसऱ्या यादीं सह्या करून वात्सन साहेबास सही करण्याकरितां दिल्या तेव्हां त्या स्तुत्य पुरुषानें सही करीत नाहीं म्हणून सांगितलें. तथापि क्लैव ह्यानें त्यास विचारिलें कीं, आपली सही दुसऱ्यानें केली तर कसें? मग तो म्हणाला आतां तुम्हांला पाहिजे तसें करा. असें कांहींसें मत दिल्यावर त्याच्या अक्षराप्रमाणें अक्षर काढून खोटी सही केली आणि ती यादि उमीचंदास दाखवून त्याचें तोंड बंद केलें. आपणास फसविलें असें त्यास पुढें कळलें तेव्हां त्यास बुद्धिभ्रंश झाला व शेवटीं तो अगदीं वेडा झाला. मील साहेब हें फार नीचपणाचें कृत्य क्लैव साहेबानें केलें असें लिहितो. सरजान मालकम म्हणतो कीं, उमीचंदाप्रमाणें जो पुरुष उघड फितूर करितो असें म्हणेल त्याचें मन वळविण्याकरितांच जर त्यांच्यासारखें कपटाचें कृत्य केलें तर हें योग्यच आहे म्हणून असें करणाराकडे दोष नाहीं. हा साहेब म्हणतो ह्यांत खरेपणा आहे खरा परंतु एकंदर पाहतां इंग्लिश लोकांच्या थोरपणास हें नीट आहे असें आमच्या बुद्धीस येत नाहीं.

म० ११ इ० स० १७६७ उमीचंदास उलटें फसविलें.

निरनिराळीं मतें.

क्लैव साहेबानें चंद्रनगर येथें आपली फौज जमा करून सतराशें सत्तावनांत जून महिन्याच्या तेरावे तारिखेस साडेसातशेंच ब्रिटिस लोक व बाकीचे इतर मिळून एकतीसशें लोकांनिशीं कूच केला आणि येवढ्या फौजेवर तें मोठें राज्य बुडविण्याचा मानस धरिला. नवाबाचें लष्कर कासिमबाजारा जवळ प्लासी येथें होतें तेथें तो पोहोंचला, तेव्हां मीरजाफर ह्याच्या वागणुकीविषयीं वाईट वर्तमान त्यास समजलें. तें असें कीं, मीरजाफराचें पुष्कळ वेळां त्याच्या यजमानाशीं बोलणें झालें व उभयतांचें मनांत वांकडें होतें तें सर्व गेलें असें दिसण्यांत येतें व त्यानें आपणास युद्धास साहाय्य करीन अशा ज्या मोडूं नयेंत त्या शपथा यजमानापाशीं वाहिल्या आहेत.

क्लैवह्यानें आपली फौज जमविली.

प० ११
इ० स०
१७६७

मीरजाफरचीं संशयाची वर्णनूक.

मीरजाफर ह्यानें चोरून पुष्कळदां सांगून पाठविलें कीं, नवाबाच्या मनांत वहीम येऊं नये म्हणून हें सर्व केवळ मिष केलें आहे; तरी तो उभय पक्षांकडे सारखा वागत होता ह्यामुळें कोणाला तरी एकाला खचित फसविणार आहे असें होतें, परंतु कोणाला फसविणार हा संशय राहिला होता. ह्या कारणास्तव क्लैव साहेब कासिमबाजार बेटासमोर पोहोंचला तेव्हां या ठिकाणापासून वर कांहीं अंतरावर १५००० घोडेस्वार व ३५००० पायपळ व मोठाल्या चांगल्या तोफा येवढें येथील लोकांचें लष्कर उतरलें होतें त्याच ठिकाणीं थांबला. एकविसावे तारखेस त्यानें लढाईच्या मसलतीची सभा म्हणजे कामदारांची मंडळी जमा केली. हे कामदार लढाई करण्याची नसली म्हणजे बहुतकरून मसलत करण्याकरितां सभा भरितात. क्लैव साहेबानें हल्लींच्या स्थितींत शत्रूवर हला करण्यास नीट नाहीं ही माझी खातरी आहे असें म्हणून विचारास आरंभ केला. तेथील सर्व अमलदारांचें मत एक जमलें, त्यांत मेजर कुती म्हणाला कीं, सेनेंतील लोकांस हुरूप आला आहे व त्यांस वाटत आहे कीं, आपण जय मिळवूंच. तर विलंब झाल्यानें अगदीं हुरूप नाहींसा होईल; व शत्रूस नवीन कुमक लवकर येऊन मिळेल. व विशेषेंकरून फ्रेंच लोकांची मोठी टोळी मुलखांत आहे ती लवकरच येईल. आपण आतां लढाई करावी, नाहीं तर आपण आपले सर्व बेत सोडून परत जाऊन कलकत्त्यांत स्वस्थ बसावें. हें कुती साहेबाचें मत क्लैव साहेबासुद्धां कोणासही मान्य न होऊन दुसरी गोष्ट सर्वांस कबूल झाली, परंतु सभा विसर्जन झाल्यावर क्लैव साहेब शेजारच्या शार्डींत एकटा हिंडावयास गेला आणि एक तास विचार केल्यावर त्याची खातरी झाली कीं, कुती जें म्हणतो तें दूरवर विचाराचें सांगणें आहे, त्यापक्षीं त्याप्रमाणें करावें असा निश्चय केला. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं तो नदी पार उतरून जाऊन शत्रूच्याकडेस पंधरा मैलपर्यंत कूच केला. दुसरे दिवशीं उजेडतां शत्रूचें लष्कर अर्ध कोशावर उतरलें होतें तें दृष्टीस पडलें.

लढाईची सभा,

क्लैव साहेबानें मन फिरलें.

प्लासी येथील लढाई.

ही प्लासी येथील लढाई झाली तींनच हिंदुस्थानांतील सत्ता इंग्लिशांच्या हातीं गेली खरी, परंतु तींत जसा फायदा होणार होता

तशा योग्यतेनें पराक्रमाची लढाई झाली नाहीं. सुराजउद्दवल्या- इ० स० १७६७
च्या सैनेनें जून महिन्याच्या तेविसावे तारखेस सकाळीं सहा वाज-
तां हल्ला करण्यास आरंभ केला; तेव्हां इंग्लिशांच्या आड नदीचें
नार होतें व झाडी होती त्यांचे आश्रयानें राहून बहुतकरून सर्व दि-
वस आपले रक्षणार्थ मध्यें मध्यें तोफा सोडीत राहिले. एकदां
समोरच्या घोडेस्वारांनीं पुष्कळ वेळ मार केला तेव्हां स्वारीच्या तो-
फा बरोबर होत्या त्यांच्या सपाट्यानें त्यांस मागें हटवून लाविलें; परंतु
तें युद्ध इतकें मंद चाललें कीं, त्याच्यामध्यें कर्नल क्लैव साहेबास
निद्रा लागून तो स्वस्थ पडला होता, असें सांगतात. मिस्तर उर्मि
ह्यानें त्यास निद्रा लागण्याचें कारण त्याला पुष्कळ श्रम झाले होते
असें लिहिलें आहे. नवाब तर दुष्ट परंतु भित्रा आपल्या तंबूत
राहिला होता त्यास शत्रु पळाले नाहींत असें वर्तमान कळलें व मु-
ख्यत्वेंकरून त्याचा पराकाष्ठेचा इमानी व पराक्रमी सरदार मीरम-
दीन पडला असें कळल्यावर त्याचें धैर्य अगदीं खचलें. मग
मीरजाफर कोणीकडे होतो हाच कायतो मुख्य विचार पडला होता,
कारण कीं पुष्कळ वेळपर्यंत हा संशय राहिला होता. त्याचें मारजाफर इंग्लिशांस मि-
सैन्य डावेकडे वळलें तेव्हां देखील इंग्लिशांनीं त्याचे लोकांस न ळाला.
ओळखून शत्रूचे लोक समजून मार चालविला. तथापि लौकरच
दिसून आलें कीं, ते लोक सैनेपासून निराळे होत आहेत; नंतर
क्लैव साहेबानें निश्चय केला कीं, आतां विलंब न करितां लष्करावर
एकदम हल्ला करावा. तो हल्ला होऊन त्यांत कांहीं वेळ न ला- नवाबाचा अग-
गतां त्याचा जय झाला; कां तर हल्लयास आरंभ झाला तों शत्रु दीं पराजय.
सामान, तोफा, व तंबू टाकून पळत सुटले. इंग्लिशांनीं तीन को-
सपर्यंत पाठलाग केला. मोठे नामांकित कित्येक सरदार मारिले
आणि चाळीस तोफा घेतल्या. इंग्लिशांचा नाश म्हटला तर
तेवीस असामी मात्र पडले, व पन्नास जणांस जखमा लागल्या. नवा-
बाची पांचांवर धारण बसून अगदीं निराश होऊन त्यास कांहीं
सुचेना; मग उंटावर बसून पळून गेला. तेव्हां बरोबर दोनहजार
निवडक स्वार होते.

दुसरे दिवशीं दादपूर येथें इंग्लिशांचा मुख्य सरदार व मीर-

प्र० ११ इ० स० १७६७ मीरजाफर ह्यांची भेट.

जाफर ह्या उभतांची भेट व्हावी म्हणून ठरलें. त्या प्रसंगीं मीरजाफर आपण सरासरी व संशय येण्यासारखी वर्तणूक केली ह्यामुळें इंग्लिशांस राग आला असेल ह्या भयानें भेटण्यास भीत भीत गेला. तो आंत शिरल्यानंतर शिपाई लोकांनीं आपल्या हत्यारांनिशीं सलामी दिली, तेव्हां आपणावर त्यांचा रोख आहे असें समजून दचकून मागें सरला. तेव्हां क्लैव साहेब सामोरा गेला आणि बंगाला, बहार, व ओरिसा येथील नवाब म्हणून त्याला बसविलें. नंतर भाषण झालें त्यांत उभयतांचीं मनें मोकळीं होतीं; सुराजउद्दवला ह्यास धरण्याची तजवीज काय करावयाची ती ठरविली. लढाई झाल्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास तो नवाब दादपूर येथें येऊन पोहोंचला; त्याचे कित्येक सरदार पूर्वीच आले होते ते एकत्र जमा करून विचार केला. तेव्हां कित्येकांनीं बुद्धिवाद सांगितला कीं, इंग्लिशांच्या हस्तगत व्हावें, परंतु तें ऐकिलें नाहीं. ज्यांनीं सांगितलें कीं, शिपाई लोकांस पगार द्यावा आणि मग उद्यां पुढें होऊन युद्ध करावें, त्यांचें बोलणें ऐकिलें. परंतु तो जनानखान्यांत परत गेल्यावर मीरजाफर जवळ येऊन पोहोंचला असें कळतांच तो मित्रा होताच ह्यामुळें त्याचा पूर्वीचा निश्चय एकीकडे गेला. मग त्यानें गरिबाप्रमाणें पोशाग घातला आणि आपला आवडता खोजा व रांड घेऊन रत्नें वगैरे सर्व पार्टींत घालून ती डोकीवर घेतली आणि होडींत बसला आणि पाटणा शहरापर्यंत वरच्या बाजूस नेण्याकरितां हांकारूं लागला. तेथील सुभेदार इमानी होता असें जाणून आपणास तेथें गेलें असतां भय नाहींसें होईल असें त्यास वाटत होतें. तो राजमहाल येथें येऊन पोहोंचला तेव्हां होडीवाले लोक दमले होते ते रात्री विसांवा घेण्याकरितां तेथें उतरावें असें म्हणूं लागले. मग ते उतरले तेव्हां एके पडीक बागेंत लपून राहिला तरी सकाळीं एका हलक्या मनुष्यानें त्यास पाहिलें. पूर्वी त्याच मनुष्याचे कान ह्यानें रागाच्या भरांत कापून टाकविले होते. त्यानें तो नवाब असें ओळखून तें वर्तमान मीरजाफराच्या भावास कळविलें त्यानें जे शिपाई नवाबास धरण्याकरितां पाठविले होते त्यांस बरदी दिली. मग लागलेच ते धांवून आ

क्लैव ह्यानें त्याचा सत्कार टोकिला नो.



आणि त्यास धरून मक्सुदाबाद येथें घेऊन गेले, व तेव्हां वाटेनें नानाप्रकारें त्याचा अपमान केला. ज्या वाड्यांत मोठ्या डामडौलानें पूर्वीं नुकतांच नवाब असून राहत होता त्याच वाड्यांत तोच नवाब शिपायांनीं महापराध्याप्रमाणें फरफरां ओढीत नेला. ही दुःखाची गोष्ट पाहून मीरजाफरास कांहींसें वाईट वाटलें, असें दिसतें. व वाईट वाटण्याचें कारण हें होतें कीं सर्व गोष्टी अलीवर्दीखान म्हणून सुराजउद्दवल्याचा आजा होता त्याजपासूनच प्राप्त झाल्या होत्या व त्यानेंच त्यास वाढविलें होतें व सुराजउद्दवला ह्यानें त्याचा अपराध केला होता असेंही नव्हतें. त्यानें सुराजउद्दवल्यास एकीकडे जाण्यास सांगितलें. नंतर त्यानें आपले मंत्री नवाबाचें काय करावें हा विचार ठरविण्याकरितां जमा केले. कित्येकांनीं त्यावर दया करावी असें सांगितलें व कित्येकांनीं आतां मारून टाकावें असें सांगितलें, त्यांत मिरान नामें मीरजाफराचा पुत्र सतरा वर्षांचे वयाचा होता. दुसरी युक्ति दुष्ट खरी परंतु निर्भय तरी होती. मीरजाफरानें करूं नकरूं अशावर टाकिलें, मग त्याच्या मुलानें आपण निजावयास जावें, सुराजउद्दवल्याची तजवीज मजकडे लागली असें सांगितलें. तेव्हां त्याप्रमाणें त्यानें केलें व पुढें काय होणार हें त्याच्या मनांत आलें नसेल असें नाहीं; मग ज्या खोलींत नवाब कैद करून ठेविला होता तेथें लागलींच मिरान ह्यानें मारेकऱ्यांची टोळी पाठविली. तेव्हां तो विलाप करून पुष्कळ ओरडला आणि त्यानें प्राण सोडिला. मग त्याचें शरीर हत्तीवर घालून रस्त्यांतून फिरविलें, तें पाहतांच सर्व लोक दासाप्रमाणें मीरजाफरास लागलेच वश झाले, आतां सुराजउद्दवल्याची जी गति झाली ती त्यास योग्यच होती; तथापि ज्या रितीनें त्यास मारिलें व पुढें वागणूक केली व ज्या पुरुषांनीं ही गोष्ट केली ह्या सर्वांचा विचार करून पाहतां हें कर्म फार घातुक व नीच केलें हें खरें आहे.

मीरजाफर ह्यानें मान ठेविला तो.

त्यास मिरान ह्यानें मारविला

हिकडे इंग्लिशांनीं बंगालच्या तिजोरींत किती द्रव्य आहे ह्याचा शोध चालविला, आणि पाहतात तों मीरजाफर ह्याच्या प्रधानानें सांगितल्याप्रमाणें त्याची पराकाष्ठेची निराशा झाली. एकं-

बंगालची तिजोरी.

प्र० ११ इ० स० १७६७

दर ठरविलेली रकम देण्यास दोन कोटी दोन लक्ष रुपये पाहिजे होते आणि जामदारखान्यांत एक कोटी पांचलक्ष मात्र होते व तेवढा पैसा नेऊन शिलक कांहींच नाहीं असें करितां येईना. ह्या कारणास्तव अर्धी रकम आतां घ्यावी व बाकीची रकम वर्षास एक हप्ता अशा तीन हप्त्यांनीं फेड करितों असें म्हणणें मान्य करणें प्राप्त झालें, ह्या अर्ध्या रकमेंत एक तृतियांशाचें जवाहीर वगैरे माल घेणें प्राप्त पडलें, बाकी ऐंशीलक्ष रोख मिळाले. अशी रोख बक्षिशी इंग्लिशांस अथवा कोणत्याही युरोपियन लोकांस आजपर्यंत मिळाली नाहीं असें म्हणतात. साह्य केल्याबद्दल इतर सरदारांस बक्षिसें मिळालीं तीं त्यांनीं संतोषानें घेतलीं. ही गोष्ट हिंदुस्थानच्या लोकांच्या मतानें पाहिली असतां नीट आहे, परंतु इंग्लिशांच्या दृष्टीनें पाहिलें असतां गैर अब्रूची आहे. क्लैव साहेबानें सांगितलें कीं सोळा लक्ष रुपये मला पोहोंचले व बाकीच्या कौन्सिलदारांपैकीं प्रत्येकास दोनलक्ष चाळीस हजार रुपये आले. वास्तविक साहेबास नेमाप्रमाणें वांटा नव्हता म्हणून दर एकाच्या वांट्याचा एक दशांश काढून त्यासाठीं एक बक्षीस काढिलें. ही तजवीज कित्येक सरदारांस फारच वाईट वाटली.

मोठ्या बक्षिशीचा पैसा.

बक्षिसाची वाटणी.

नंतर लौकरच बंगाल सरकारास विलक्षण संकटें प्राप्त झालीं. त्या प्रांतांत चोहींकडे बंदोबस्त नाहींसा झाला होता ह्यामुळें येथील राजांच्या मनांत आलें कीं हा मुलूख सहज आपल्या हस्तगत होईल. मोंगलाचा वडीलमुलगा शाहजादा ह्यानें आपल्या बापापासून बंगाला बहार आणि ओरिसा ह्या प्रांतांच्या सुभेदारीचीं वस्त्रें घेऊन आपला हक्क स्थापण्याकरितां लढाईच्या तयारीनें तेथें गेला. त्याजबळ जें सैन्य होतें तें फार लहान होतें खरें, परंतु त्याला दोन पराक्रमी सरदार अनुकूळ होते. त्या सरदारांचें स्वतंत्र राज्य झालें होतें असें म्हणण्यास चिंता नाहीं. एक तर अयोध्येचा नवाब होय. ह्याचा मुलूख गंगेच्या उत्तरेस फार सुपीक आहे व मागें तेथें निराळ्या बादशाहीची गादी होती. अलाहाबाद म्हणजे प्रयाग हा मुलूख गंगेच्या लगत आहे व हा सुपीक देशाचें मुख्य शहर गंगा व यमुना ह्यांच्या संगमाजवळ

बंगाल सरकारचीं नवीन संकटें.

पेंथील सरदारांचा कट.

आहे हें शहर त्याप्रांतांत फार मोठें व महाक्षेत्र आहे. येथील सुभेदार त्यास मदतीस होता तो दुसरा सरदार होय. अकबरानें तें आपलें राहण्याचें स्थान करून दोन नद्या मिळतात तेथें कोन होतो त्या ठिकाणीं चाळीस* साटून नामें मोठा किल्ला बांधिला आहे त्याच्या दरवाज्यांवर घुमट व गोपुरें बांधून शोभिवंत केलीं आहेत. ती इमारत सर्वोत्कृष्ट दिसते, व येथील लोकांची कारागिरी पाहण्यासारखी तेथें दृष्टीस पडेल. ब्रिटिश लोकांनीं आलीकडे बंदोबस्ताकरितां नवीन कामें केलीं आहेत व उत्तर हिंदुस्थानांत लष्कराचें सामान वगैरे ठेवण्याची ती मुख्य जागा केली आहे. मोंगलाचा मुलगा स्वारी करण्यास आला तेव्हां आपल्या देशाच्या हितामुळें व मीरजाफर ह्यानीं तह केला होता त्यामुळें त्यास मदत करणें क्लैव साहेबास प्राप्त पडलें. मील साहेब म्हणतो कीं मोंगलावर क्लैव साहेबानें धडधडीत हें बंड केलें त्यापक्षीं ही गोष्ट फार निंद्य होय; परंतु दूरच्या सर्व प्रांतांवर मोंगलाचा अमल पुष्कळ वर्षेंपर्यंत केवळ नांवाचा राहिला होता व मोंगल इतर राजांच्या हातांत केवळ मुलाप्रमाणें असे व मीरजाफर त्याचा अधिकार मानीत नव्हता त्याप्रमाणेंच ते राजे मानीत नसत. हा सर्व विचार करून पाहतां क्लैव साहेबाची वर्तणूक कांहींशी भिन्न दिसते. इंग्लिशांनीं मुर्शिदाबाद येथें नवाबाचें सैन्य व आपलें सैन्य एकत्र करून पाटना शहरावर कूच केला. तें शहर राम नारायण ह्यानें मोठ्या संकटानें रक्षण करून ठेविलें होतें; हा पुरुष त्याच्या पदरीं राहिला होता. जर येथील सरदार आपल्या यजमानाचें काम व्हावें म्हणून एक विचारानें वागते आणि परस्परांत कलह न करिते तर मोठें दारुण युद्ध झालें असतें. अयोध्येच्या नवाबानें अलाहाबाद म्हणजे प्रयाग घेण्यास आरंभ केला तेव्हां त्याचें रक्षण करावें म्हणून सुभेदारानें उद्योग चालविला. त्यास फसवून शत्रूनीं आपल्या ताब्यांत करून घेतलें. मग शाहजादा ह्यास कोठेंही साहाय्य राहिलें नाहीं. मील नामें इतिहासकर्त्ता असें लिहितो कीं अशा प्रख्यात राजाचा वंशज व पृथ्वीवरील सार्वभौम राज्याचा मा-

प्र० ११ इ० स० १७५७

येथील सरदारांत कलह.

* चाळीससाटून म्हणजे चाळीस बुरुजांची इमारत.

प्र० ११ इ० स० १७५७ शाहाजादा याची स्थिति.

लक असा असून त्याला मित्र किंवा कांहीं एक मदत नाहींशी होऊन क्लैव साहेबास मला निर्वाहाकरितां अमुक पैसा पाठवून द्यावा व पैसा पाठविला तरी मी ह्या मुलूखांतून निघून जातों असें विनंतिपत्र पाठविणें त्यास भाग पडलें. ह्याप्रमाणें मुलखांतून लागलीच जाण्याचें कबूल करून घेऊन पैसा दिला; तेव्हां अर्थातच क्लैव साहेबानें ह्या कलहाचा शेवट उत्तम प्रकारें केला व असें करण्यास त्यास अगदीं कठीण पडलें नाहीं. मीरजाफर ह्यास उपकार वाटून त्यानें जरी फार कर्ज वगैरे होतें तरी क्लैव साहेबास जाहगीर म्हणून कलकत्त्यामोंवतीं जो मुलूख कंपनीकडे होता त्याबद्दल भाडें येणें तें त्यास वक्षीस द्यावें असें केलें. ह्याच वेळेच्या सुमारास त्या साहेबानें सरकार म्हणून दक्षिणेस मुलूख आहे त्यावर हल्ला करण्याकरितां सैन्य पाठविलें. तो त्यानें सरासरी आपल्या ताब्यांत आणला व डच लोकांनीं हल्ला केला तो परतवून तो इ० स० १७६० त फेब्रुवारी महिन्यांत अधिकार सोडून यूरोपास चालता झाला.

आतील प्रांताची स्थिति.

हिकडे दिल्ली वगैरे मुलखांत बंडें नव्हतीं असें नाहीं. मोंगलास मराठ्यांनीं मारिल्यानंतर त्याचा पुत्र गादीवर बसला त्या राजधानीचें नांव मात्र मोठें राहिलें होतें आंत हशील नव्हतें. त्यानें पुन्हा बंगाल्यावर स्वारी करण्याचा बेत केला व अयोध्येचा नवाब तेव्हांही मदत होता. त्यास वजीर असा मोठा किताब मात्र मिळाला. त्यांची सेना मिळून पाटना शहरावर चालली व त्यांनीं गडकरी लोक बरेच आपल्या ताब्यांत आणिले. नंतर कर्नल केलाद हा इंग्लिशांची फौज व मीरजाफराचा पुत्र मिरान ह्याचें सैन्य ह्या उभयतांवर मुख्य होता तो किल्ल्यावरील लोकांच्या कुमकेस आला. त्यानें फेब्रुवारीच्या बाविसावे तारखेस १७६० त हल्ला केला; आणि येथील लोक ज्या ठिकाणीं होते तें ठिकाण फार वाईट असल्यामुळें ते अगदीं उपयोगी पडले नाहींत तरी ब्रिटिश लोक व त्यांचे येथील शिपाई लोक ह्यांनीं गोळ्यांचा मार करून रणांतून शत्रूस घालवून दिलें व बहार प्रांतीं जाण्यास त्यांना भाग पाडिलें. मिरान ह्यास थोडीशी जखम लागली होती. तो पुन्हा पाटना शहरांत शिरून ऐषआराम भोगूं लागला. नंतर

ब्रिटिश लोकांचा थोडासा जय.

पराजित झालेले सैन्यानें मुर्शिदाबादेस जवळचा जो रस्ता होता त्या रस्त्यानें नवाबाच्या मुलखांतून जाऊन त्यास राजधानींत एकदम गांठावें असा उद्देश धरिला. हा बेत जसा हुशारीनें केला होता त्याप्रमाणें सिद्धीस नेला असता तर त्यांचा बेत सिद्ध झाला असता असें म्हणतात; परंतु त्या सरदारांनीं हिकडील लोकांच्या नेहेमींच्या रितीप्रमाणें विलंब लाविला आणि केलाद ह्यानें नदीच्या वाटेनें लवकर सेना उतरवून आपल्या स्नेह्यास कुमक केली व जो हल्ला होण्याचा ठरला होता तो होऊं दिला नाहीं. त्याच मार्गानें घाईनें परत येऊन ते इंग्लिशांच्या अगोदर पाटना शहरास पोहोंचले व त्या सेनेस फराशिसांचा सरदार लासाहेब ह्यानें सेनेसुद्धां मदत करून त्या शहरास वेढा घालून आंतील लोकांची त्रेधा करून सोडिली. कप्तान नाक्स ह्यानें उन्हानें शरिरें भाजताहेत अशा उन्हांत दोनशें मैलांवर जमीन तेरा दिवसांत चालून तेथें जाऊन वेढा उठवून लाविला व शत्रूस मागें हटविलें. ई० स० १७६० नवाबावर एकदम हल्ला करण्याचा बेत.

हिकडे बंगाल्यांत व्यवस्था जशी असावी तशी अगदीं नव्हती. मीरजाफर हा आळशी, विलासी, आणि जुलमी निघाला. इंग्लिशांनीं मदत केल्याबद्दल त्यानें हप्तेबंदीनें पैसा देण्याचें कबूल केलें होतें त्याप्रमाणें दिला नाहीं व त्याच्या अव्यवस्थित खर्चास तो पुरेनासा झाला; त्यानें बडे लोकांस लुटून आपला खजिना भरण्याचा सपाटा चालविला, त्यांपैकीं तिघां बडे लोकांनीं एकदां बंड केलें. इंग्लिशांचें कर्ज फेडण्याकरितां तीन प्रांतांचा वसूल लावून दिला होता व सारा विक्रण्याचा व व्यापारसंबंधी इतर कित्येक हक्क त्यांस दिले होते; परंतु हें अगदीं उघड दिसूं लागलें कीं तो इंग्लिशांचे सर्व उपकार विसरला आणि भयानें म्हणजे आपली सत्ता राखण्यास दुसरा उपाय नाहीं असें समजून मात्र तो इंग्लिशांस मानीत असे. ह्या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून कौन्सिलांतील मुख्य लोकांनीं मीरजाफर काढून त्याचे जागीं दुसरा बसवावा, किंवा निदान दुसऱ्याच्या हातीं वास्तविक सत्ता द्यावी असा निश्चय केला. पुष्कळ विचार होऊन ठरलें कीं मीरजाफरास काढून त्याचाच जावई मीरकासिम राज्याची अव्यवस्था काढून टाकण्यासारखा हुशार आहे

बंगाल्यांतील व्यवस्थ

मिरजाफर ह्याची अव्यवस्था.

प्र० ११ इ० स० १७६० तोच नेमावा. मिस्तर वानसितार्त मुर्शिदाबादेस गेला आणि पुष्कळ तऱ्हेनें सांगूं लागला कीं तुझा नवाबपणाचा डौल व शोभा राहील असा बंदोबस्त करून देतों: कासिम हा राज्याचा कारभार चालवील हें तूं कबूल कर. तेव्हां त्याच्यानें तें बोलणें अगदीं नाकबूल करवेना. तरी तो अभिमानानें म्हणाला कीं नांवाचा अधिकार मला ठेविला असतां त्याची मला गरज नाहीं. त्यापेक्षां चार लोकांप्रमाणें कलकत्त्यांत राहून बाकीचें अयुष्य घालवीन तें बरें.

मीरकासीम. मीरकासिम हा मोठ्या हुशारीनें व शहाणपणानें राज्यकारभार करूं लागला. मोठ्या अकलेनें व्यवस्था करून व येथील बडे लोकांपासून पैसा काढून त्यानें इंग्लिश लोकांची बाकी तुंबली होती ती फेडून टाकिली. परंतु कांहीं निकडीचा प्रसंग येऊन इंग्लिशांस व नवाबास लवकरच हिंदुस्थानाचे सरहद्दीवर जावें लागलें; कां तर दिल्लीचे बादशाहास अयोध्येचा नवाब कांहींसा मदत होता त्यानें नवाबाचे मुलखांत स्वाऱ्या करून पुष्कळ त्रास दिला. त्या मुलखाचा बंदोबस्त करण्याकरितां मेजर कर्नाक साहेब गेला आणि लवकरच मोंगलाच्या सेनेस युद्ध करण्यास लावून तिचा अगदीं पराजय करून टाकिला. मोठी लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली तर फराशीस लोकांचा सरदार लासाहेब होता त्याचा पराजय केला व त्यास धरिलें. हा सरदार इंग्लिशांचें येथील राजांचें सेनेशीं युद्ध चाललें असतां थोडे लोक जवळ असतां सर्वांस मुख्यलें मदत करीत असे. त्याचा पराजय झाल्यावर त्याचे लोक पळून गेले, मग तो दोहों पायांत तोफ धरून त्या अयटीनें मृत्यूची वाट पहात उभा राहिला. इंग्लिशांचे सरदारांनीं जवळ जाऊन मोठ्या आर्जवानें त्यास आपलें लष्करांत नेलें आणि जसा एखादा मोठा मनुष्य पाहुणा येतो त्याप्रमाणें त्याचा मान व बंदोबस्त राखिला. हें पाहून विद्याचारसंपन्न लोकांचे लढाईचे नियम ठाऊक नसल्यामुळें हिंदु लोकांस मोठा चमत्कार वाटला. लढाई झाल्यानंतर कर्नाक साहेबानें तऱ्हाचें बोलणें पाठविलें व बादशाहाची भेट घेण्यास मी लष्करांत येतों असेंही सांगून पाठविलें. त्यानें दोन्ही

लासाहेबाचा जय.

गोष्टी प्रथम नाकारल्या, परंतु पक्का विचार केल्यावर बादशाहानें त्याविजविषयीं सरदारास भेटीस बोलाविलें आणि त्याबरोबर मग पाटना शहरासही गेला. तेथें मीरकासिम ह्याची भेट होऊन बादशाहाशीं तह ठरला. खांत बंगाल, बहार, आणि ओरिसा ह्या तीन प्रांतांची सुभेदारी मीर ह्याजकडे झाली. ह्याबदल बादशाहास दर वर्षास चोवीस लाख रूपये खंडणी देण्याचें त्यानें कबूल केलें. बादशाहीची सत्ता पुन्हा प्राप्त व्हावी म्हणून त्यास इंग्लिशांनीं मदत करावी अशा प्रकारचा मजकूर कबूल केला. परंतु पैशाच्या अडचणीमुळें व इतर गोष्टी घडल्या त्यापुढें सांगतों त्यामुळें तें कलम अगदीं जसेंचें तसेंच राहिलें. इ० स० १७६७ नफ ठरला.

मीरकासिम ह्याचे कारकिर्दीचे आरंभीं त्यानें शहाणपणानें व हुशारीनें बंदोबस्त केला; आणि स्वतंत्र कारभार चालविण्यास त्यास मिळता तर तो फार चांगलें राज्य करिता. परंतु इंग्लिश लोकांनीं त्यास अधिकार दिल्यामुळें ते वरचष्मा दाखवूं लागले तें त्या पराक्रमी पुरूषास साहेनासें झालें. दोन वेळ नवाब काढून दुसरे नवाब गादीवर बसविले ह्यामुळें इंग्लिशांस वाटूं लागलें कीं बंगाल्चे खरोखरी स्वामी आपण आहों. व इतर लोकही त्यांस तसेंच लेखूं लागले; इंग्लिशांचे अगदीं हलके अमलदार ते मानूं लागले कीं, इकडील राजांनीं आम्ही जें सागूं तें मान्य केलें पाहिजे. कौन्सिलांत दोन तट पडले होते, गवर्नराचें म्हणणें एक असे व इतर सभासदांचें म्हणणें एक पडे. ते लोक मीरकासिम ह्यास गादीवर बसविण्याच्या वेळेस प्रतिकूळ होते. त्या सभासदांचें बहुमत होऊन गवर्नराचें म्हणणें सिद्धीस न जावें म्हणून हरतऱ्हेनें झटत. पूर्वी सांगितलेल्या हलक्या कामदारांस व त्या सभासदांस येथील लोकांविषयीं जें हें वाटत असे तें फार वाईट असे. मीरजाफर ह्यास अधिकार प्राप्त करून दिला तो प्रकार कसा झाला तो मनांत आणून सभासद लोक आम्हांस जातीनें वीस लक्ष रूपये नजर द्यावी व हें मागणें फार थोडें असें जाणून मागूं लागले. तेव्हां कासिम ह्यानें सांगितलें कीं तुम्हांस मी देईन असें म्हटलें नाहीं व मी देत नाहीं. हा प्रकार कंपनीस कळला

मीरकासीम ह्याचे कारकिर्दीचा आरंभ.

आपसांत मत्सर वाढून झालेला प्रकार.

ग्र० ११ इ० स० १७६०

तेव्हां तिनें कासीम ह्याचें म्हणणें मान्य केलें. आणि कौन्सिलदारांचा अन्याय म्हणून त्यांचें म्हणणें नापसंत केलें. आतां ह्या करणावरून सभासदांचे मनांत नवाबाविषयीं फारच वैर वाढलें असावें हें उघडच आहे. ह्या मंडळींत एलिस नामें साहेब मुख्य होता, तो एके दोलीनिशीं पाटना येथें जाऊन राहिला आणि मनास येईल तसें वागावें अशी परवानगी घेऊन मोठ्या मगरूरीनें नवाबाशीं वर्तूं लागला. इंग्लिशांस जकातीची माफी पूर्वी मोंगलांनीं केली होती त्या करारप्रमाणें माल जाऊं द्यावा व येऊं द्यावा असें ते म्हणूं लागले तेव्हां नवाब पराकाष्ठेचे गाऱ्हाणें करूं लागला. जकातीची माफी असल्यामुळें थळभरीत म्हणजे ज्या शहरांत माल भरावा तेथें व नदींतून पलीकडे जातांना व आलीकडे आणतांना जकात पडत नसे. अशी जकात घेण्याची चाल फार वाईट होती. इंग्लिशांस जकातीची माफी व येथील लोकांस फार जकात द्यावी लागत असे ह्यामुळें त्यांचें फार नुकसान होई व इंग्लिशांचे गुमास्त्यांसही हक्क मिळाला तेव्हां इतर व्यापारी अगदीं बुडाले; गुमास्त्यांस त्यांनीं आपल्या नांवाचा हक्क दिला हें अगदीं अयोग्य केलें. हा अन्याय पाहून नवाबानें ह्या गोष्टीविषयीं गाऱ्हाणें केलें, तेव्हां मिस्तर वान्सितार्त ह्यानें मगर येथें करार नामा ठरविला कीं कंपनीच्या लोकांनीं व येथील लोकांनीं सारखीच जकात द्यावी. हा बंदोबस्त फार चांगला झाला असतां व त्या बरहुकूम नवाबानें कांहीं खरा करून खरें परंतु वागण्यास आरंभ केला. तथापि कौन्सिलांत बहुमत होऊन तो ठराव रद्द झाला. नंतर पूर्वीप्रमाणें पुन्हा दंगल चालू झाली. मग हें भांडण नसावें म्हणून माल आणण्यास व नेण्यास खुष्कीवर कोणीच जकात देऊं नये असें नवाबानें ठरविलें. ही गोष्ट फार चांगली असतां इंग्लिश लोकांनीं विनाकारण वेड्याप्रमाणें गाऱ्हाणें करण्यास प्रारंभ केला. ही ओरड करण्याचें कारण इतकेंच कीं नवाबानें इंग्लिश व आपली प्रजा ह्यांच्यामध्यें भेद नाहींसा केला. पुढें उभयतांच्या मनांत वैर वाढलें तेव्हां उभयतां लढाईची योजना करूं लागले. नवाबानें पैसा जमविण्याचा व सेना

नवाबाचे वास्तविक गाऱ्हाणें.

नवीन ठेवून युरोपियन लोकांप्रमाणें तयार करण्याचा सपाटा जा- म० ११
तीनें चालविला. कांहीं नावा लष्करीसामान भरून गंगेंतून पाटना इ० स०
शहरास जात आहेत असें वर्त्तमान कळतांच त्या अडवून ठेवाव्या १७६०
असा हुकूम नवाबानें पाठविला; परंतु पुढें लवकरच ह्या गोष्टींत दमयतांची ल-
आपण बरोबर केलें नाहीं असें त्यास वाटून त्या त्यानें जाऊं दिल्या. ढाईची तयारी.
तथापि एलिस साहेबास नावा प्रथम अडविल्याची बातमी कळतांच
त्यानें निश्चय केला कीं कौन्सिलांतील कलमवार हुकुमाप्रमाणें पाटणा
शहरावर हल्ला करावा. तेव्हां तेथें रक्षणार्थ बंदोबस्त चांगला
नसल्यामुळें तें लवकर हातीं लागलें. ही दांडगाईची गोष्ट कासिम कासिमाशीं ल-
ह्यास कळतांच त्यास अतिशयित क्रोध आला आणि त्यास लढाई- ढाईस आरंभ.
शिवाय दुसरें कांहीं सुचेनासें झालें. नंतर लवकरच वर्त्तमान आलें
कीं इंग्लिशांनीं शहर घेऊन लूटीस आरंभ केला व तें शहर आपल्या
ताब्यांत आलें असें जाणून ते स्वस्थ राहिले इतक्यांत तेथील पूर्वीच्या
सुभेदारानें येऊन हल्ला करून इंग्लिशांस हांकून लाविलें. तेव्हां
गंगेंतून पळून जात असतां त्या सर्वांस धरून कैदी केलें. हें क-
ळतांच नवाबास संतोष झाला. कासिमबाजार येथें इंग्लिशांची
वखार होती तीही घेतली व तेथें रक्षणार्थ लोक होते त्यांस कैदी
केलें.

मग इंग्लिशांनीं पुन्हा मीरजाफरास अधिकार दिला; तो रा- मीरजाफराशीं
ज्याच्या मोहास गुंतून इंग्लिशांनीं जें त्याचें वाईट केलें तें सर्व विस- पुन्हा तहठरला.
रला. मेजर अदमस साहेब मुख्य होता त्यास हुकूम झाला कीं
फार त्वरा करून मोहिमीस आरंभ करावा. मीरकासिमानें युद्धाची
तयारी केली होती तशी तयारी कोणत्याही राजानें केली नव्हती
असें स्पष्ट कळून आलें. मुर्शिदाबादेसमोर बिनीचे लोक दूर उभे
केले होते त्यांचा पराजय करून नंतर शहरच्या रक्षणाकरितां
खंदक व मोरचे लावले होते त्यांवर हल्ला करणें भाग होतें. इ- सुभेदाराच्या
तकें करून इंग्लिशांपुढें गेले तेव्हां गिरियाच्या मैदानांत नवाब सैनेचें वर्णन.
आपलें सर्व सैन्य उभें करून राहिला आहे असें दृष्टीस पडलें. तें
सैन्य युरोपियन लोकांच्या सैन्याप्रमाणें दिसत होतें. त्या सैन्याचे
निरनिराळे भाग केले होते व इंग्लिशांच्या प्रमाणें पोशाग व हत्यारें

प्र० ११ इ० स० १७६०

वगैरे दिल्ली होतीं आणि जवळ चांगल्या तोफा पुष्कळ होत्या. त्या लोकांची संख्या वीस हजार घोडे व आठ हजार पायदळ ह्यापेक्षां अधिक नव्हती परंतु ह्या सैन्यशीं लढाई करण्यास मेजर अदम्स ह्याजवळ तीन हजार लोक होते. तथापि त्यानें आपले लोक हल्ला करण्यास नेले. तेव्हां नवाबानें मोठ्या शौर्यानें चार तास पर्यंत इंग्लिशांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. एकदां त्यानें त्यांची रांग मोडून वेढा देखील घातला व दोन तोफा जिंकून नेल्या परंतु इंग्लिशांचे कवाइतीपुढें व निश्चयाचे वर्तणुकेपुढें शेवटीं कांहीं एक टिकलें नाहीं. नवाबाकडले लढाऊ लोक होते ते आपल्या तोफा व सामान टाकून पळून गेले. नवाब तर उद्यानदीच्या कांठीं लष्कराभोंवतीं खंदक खणून जागा केली होती तेथें जाऊन राहिला तो तळ एकीकडे नदी, एकी कडे पर्वत, आणि एकीकडे दलदल असून मध्यें होता. ह्यामुळें ती जागा घेण्यास सैन्याला महिन्याला कांहीं दिवस कमी इतकें दिवस लागले. शेवटीं त्यावर एकाएकीं हल्ला करून ती घेतली. तेव्हांपासून त्यानें ब्रितिशांशीं तोंड देऊन कधींच युद्ध केलें नाहीं. अदम्स साहेबानें लागलींच मांगड येथें जाऊन त्यास वेढा घातला. तें नवाबानें आपलें नगर केलें होतें आणि तेथें कोट वगैरे बांधून बंदोबस्त केला होता. नऊ दिवसपर्यंत एकसारखें युद्ध होऊन तें नगर हस्तगत झालें. तेव्हां नवाबास पराकाष्ठेचा राग आला. त्यानें इंग्लिशांस सांगून पाठविलें कीं पाटना शहरावर इंग्लिशांचा कूच झाला असे कळतांच शहरांत रक्षणास जेवढे लोक आहेत तेवढ्यांस धरिलें होतें ते सर्व ठार मारितों असें त्यानें रागानें सांगून पाठविलें तेव्हां ह्या निरोपावरून त्यांच्या अधिकारी सरदारास फार वाईट वाटून त्यानें कैदेंत होते त्या लोकांस पत्र लिहिलें, त्यांत तुमची सुटका होईल अशी तजवीज कोणती करावी तें सुचवा, अशा प्रकारच्या मजकुराची विनंती लिहिली होती. एलिस आणि हे म्हणून दोन शूर पुरुष होते त्यांनीं उत्तर दिलें कीं सुटका होण्याची आशा देखील नाहीं, आमच्या प्रारब्धास आलें तें आम्ही भोगणार, त्यापक्षीं आम्हांसाठीं एक क्षणदेखील सेनेची कूच करण्याची खोटी करूं नये. वान्सि-

ब्रिटिश लोकांचा सिद्धि.

कासम ह्याचा दुष्ट वर्तणुक.

तात ह्यानें मीरकासिम ह्यास पत्र लिहिलें त्यांत त्याचा मानस फार वाईट व तुम्ही तसें कराल तर तुमचें पारिपत्य करूं असा मजकूर होता. परंतु इंग्लिशांची सेना येण्यास निघाली असें कळतांच मीरकासिम ह्यानें आपल्या इच्छेप्रमाणें तें घातुक कृत्य केलें. पाटना येथील पन्नास अमलदार व शंभर सोजीर रक्षणास होते त्यांस ठार मारून टाकिलें. त्यांत मिस्तर फुलर्टन नावें वैद्य फार चांगला होता त्यास मात्र राखिलें; बंगाल्यांत राहणारे दोघे श्रीमंत व विख्यात सावकार होते ते इंग्लिशांचे स्नेही आहेत येवढें जाणूनच नवाबानें त्या सावकारांस मारून टाकिलें. अशा घोर कर्मानें, लोकांच्या मनांत त्याची शौर्याची व कसाले काढण्याची वर्तणूक पाहून कळवळा येता तो आला नाहीं. ग्र० ११ इ० स० १७६०

पुढें नवाबाची आशा पाटना शहरावर मात्र राहिली होती. त्यास लौवकरच इंग्लिशांनीं वेढा घातला. त्यानें त्या शहराचे रक्षणास नवीन दहा हजार लोक ठेविले आणि रक्षणाच्या ठिकाणांवर स्वारांच्या टोळ्या ठेविल्या. नवाबाच्या लोकांनीं लढाई मोठ्या हुशारीनें केली; त्यांनीं इंग्लिशांचा एक गोचीं घेतला आणि दारूखाना उडवून टाकिला. तथापि इंग्लिशांनीं आठ दिवसांत किल्ल्यास भोंक पाडिलें आणि एकदम हल्ला करून तो घेतला. पाठना शहरास वेढा.

नंतर कासिम ह्यानें निरुपाय होऊन सर्व आशा सोडिली, आणि अयोध्या प्रांतामध्यें सुजाउद्दला सरदार होता त्यास शरण जावें म्हणून त्या प्रांतांत पळून गेला. तेव्हां त्या सुभेदाराच्या दरबारीं मोंगलाच्या वंशांतील कोणी नामांकित पुरुष शरण येऊन पूर्वी राहिला होता, तो कासिमापेक्षां मोठा होता. कासिम ह्याचा तेथें चांगला आदर सत्कार ठेवून सुजानें त्याचा पक्ष धरण्याचें कबूल केलें. ह्यांत आपला मोठेपणा वाढेल असें जाणून त्यानें हें केलें असें बहुतकरून दिसतें. नंतर हे तिघे पराक्रमी पुरुष आपलीं सैन्यें एकत्र करून इंग्लिशांवर हल्ला करण्यास चालते झाले. त्या वेळेस असें घडलें कीं शत्रूंचें सैन्य मोठें पराक्रमी आणि इंग्लिशांची तयारी तर असावी तशी अगदीं नव्हती. त्यांच्या सैनेंत बहुतेक लोक इंग्लंद खेरीज करून इतर देशांतील राहणारे व येथील कासिम पळाला

प्र० ११ इ० स० १७६० इंग्लिशांना सेनेंत त्रास.

शिपाई मिळून होते; ती सर्व सेना म्हणूं लागली कीं आम्ही इतके उत्तम प्रकारचे जय मिळविले त्याबद्दल बक्षीस कांहींच मिळालें नाहीं. व हवा वाईट व अन्नाचा पुरवठा कमी ह्यामुळें आमचे हाल केले. हें सर्व लोकांस वाटून ते त्रासले, आणि अधिकारी अमलदारांचा हुकूम मानीनातसे झाले, व कित्येक लोक मुख्य सेना सोडून एकीकडे देखील गेले. मेजर कर्नाक हा त्याप्रसंगीं मुख्य नेमिला होता त्यानें शत्रूंवर चालून जावें अशी तयारी नाहीं, हें पाहून पाटना शहराजवळ तळ होता तेथेंच शत्रूंस येऊं द्यावें अशा बेतानें राहिला. शत्रु हला करण्यास आले आणि युद्धास आरंभ झाला तेव्हां शिपाई लोकांचे मनांत वाईट आलें होतें तें ते विसरले आणि पराकाष्ठेचे निकरानें युद्ध केलें. पुष्कळ वेळ युद्ध झाल्यानंतर त्यांनीं शत्रूंचा पराजय करून त्यांस हटवून लाविलें, परंतु लोक अगदीं दमून गेले होते म्हणून त्यांच्यानें फार लांबपर्यंत पाठलाग करवेना. सुजाउद्दवला अयोध्येकडे पळून गेला त्या मागें इंग्लिशांचा सरदार गेला नाहीं.

मेजर मनरो.

सन १७६४ चे मे महिन्यांत सेनेचा मुख्य अधिकार मेजर हेक्तरमनरो ह्यास प्राप्त झाला. तो पुरुष अचाट उद्योग करणारा होता; त्यानें पूर्वीच्या अमलदारानें ज्या रितीनें जय मिळविले होते, तोच क्रम पुढें चालविला. तथापि हें आवश्यक दिसून आलें कीं जे अमलदारांचा हुकूम पाळणार नाहींत त्यांचा पक्का बंदोबस्त केला पाहिजे, व ह्या गोष्टीकरितां फार कडक उपाय योजिले पाहिजेत. येथील शिपाई लोकांची एक पलटण मनरो साहेब जाऊन पोहोंचल्यावर लागलीच लष्कर सोडून चालती झाली. तिला शिपाई पाठवून मागें बोलावून आणिलें, आणि त्यांतील चोवीस असामी पुढारी होते ते निवडून काढून त्यांस तोफेच्या तोंडीं देऊन उडवावें असा हुकूम केला. तेव्हां त्या लोकांनीं देवास आलें तें मोठ्या शौर्यानें भोगिलें. नंतर अमलदारांचा हुकूम कोणी तोडणार नाहीं असें पाहून मनरो साहेब सुजावर चालून गेला तेव्हां तो शोणनदीवर बुक्सार येथें तळ देऊन खंदक खणून राहिला होता. आक्तोबर महिन्याच्या तेविसावे

दंगा करणाऱ्या लोकांचें पारिपत्य.

तारखेस सकाळीं आठ वाजतां ते इंग्लिशांवर चालून आले. ह्यामुळें त्या जागीं त्यांवर हल्ला करण्याचें इंग्लिशांस कठीण पडलें होतें. तें संकट अनायासें दूर झालें. मग तीन तासपर्यंत उभयतांचें युद्ध होऊन इंग्लिशांनीं त्यांचा पराजय केला. तथापि ते लोक हटले तेव्हां फार दूरपर्यंत त्यांचा पाठलाग झाला नाहीं, परंतु त्यांचें दारू वगैरे पुष्कळ सामान आणि एकशें तीस तोफा इंग्लिशांस सांपडल्या. त्या पक्षांत बादशाह होता त्यानें मेजर कर्नाक ह्यापाशीं पूर्वीच तहाचें बोलणें लाविलें होतें तें त्या अमलदारानें आपणास अधिकार नाहीं असें जाणून मान्य केलें नव्हतें. तेंच बोलणें पुन्हा लाविलें आणि म्हणूं लागला कीं सुजानें माझी अप्रतिष्ठा केली व मला केवळ बंदीवानाप्रमाणें ठेविलें आहे. मेजर मनरो ह्यानें बरें म्हणून उत्तर दिलें, आणि कलकत्त्यास लिहिल्याविंचून निश्चय सांगतां येत नाहीं असें जाणून ठराव करण्यास विलंब लाविला. मग लौकरच तिकडून ठराव होऊन आला. तो येण्याच्या पूर्वीच त्या मोंगलानें आपलें जातीचें सैन्य होतें तें घेऊन इंग्लिशांस मिळून त्यांच्या निशाणाखालीं चालूं लागण्यास आरंभ केला होता.

प्र० ११ इ० स० १७६४

तहाचें बोलणें.

नवाब आपल्या प्रांतांत पळून गेला होता त्यानें मल्हारराव होळकर ह्याचे लोक व गाजिउद्दीन ह्यांस कुमकेस आणिलें. हे लोक मोंगलाच्या पदरीं मोठे बलाढ्य असत असें आपण वाचिलेंच आहे. ह्या उभयतांची मदत घेऊन विजयी झालेल्या इंग्लिश लोकांशीं युद्धाचा बेत मांडिला. तरी सर राबर्ट फ्लेचर हा कांहीं दिवसपर्यंत मुख्य अधिकारी झाला होता त्यानें अलाहाबादेस (प्रयागास) वेढा घातला. तोफेच्या गोळ्यांनीं तटास एक भगदाड पाडितांच तो किल्ला हस्तगत झाला. कर्नाक साहेब त्या वेळेस जनरलाचे पदवीस चढला होता. तो फ्लेचर जाऊन मुख्य अमलदार आला त्यानें लागलाच वजिराच्या सैनेवर चालून जाऊन हल्ला केला, तेव्हां अगदीं श्रम न पडतां ती सेना चहूंकडे फांकली. त्यानंतर त्या वजिरास आपला सर्व मुलूख सोडून देणें भाग पडलें.

इंग्लिशांशीं युद्ध करण्याकरितां येथील लोकांचा नवीन जमाव.

प्रयागास वेढा.

प्र० ११ इ० स० १७६२ इंग्लिशांचे मोहीम.

ह्यावेळेस इंग्लिशांनीं मोहीम केली ती अनेक देशांतील इतिहासांत ज्या मोठाल्या लढायांचें वर्णन केलें आहे त्यांप्रमाणें झाली. इंग्लिशांनीं शत्रूंचें मोठें सैन्य असतां पांचवेळ जय मिळविला; जो जो किल्ला लढला तो तो किल्ला इंग्लिशांनीं घेतला; त्यांनीं मोंगल बादशाह व त्याचे सर्व मुख्य जाहगीरदार ह्यांस जिंकिलें. सारांश मध्य हिंदुस्थानांतील विस्तीर्ण प्रदेशाचे खरोखरी सत्ताधारी ते झाले, परंतु ह्या कृत्यापासून कोणत्या तऱ्हेनें आपलें हित करून घ्यावें ह्याविषयीं पुष्कळ भिन्न मनें पडलीं.

मिरजाफराचा मृत्यु.

मीरजाफर हा मरण पावला, ह्याचें कारण कांहींसें असें झालें कीं, इंग्लिश लोकांचा पुष्कळ पैसा देणें होता तो ते मागत व त्यापाशीं तर पैसा नव्हता, तेव्हां त्या त्रासानें मेला. तेव्हां कांहीं वेळ करावें नकरावें असा विचार होऊन कौन्सिलांत (कारभार करणाऱ्ये मंडळींत) ठरलें कीं नजीबउल्ह्वला नांवें मीरजाफराचा पुत्र आहे त्यास गादीवर बसवावें. तो मुलगा वीस वर्षांचा होता त्यास त्याच्या बापाच्यापेक्षां कमी अधिकार दिला, म्हणजे त्यास पुष्कळ परतंत्र केलें. त्यांनीं मुलखाचें रक्षण करण्याचें काम आपणाकडे घेतलें त्यामुळें अर्थांतच लष्कर त्यांच्या हातांत राहिलें. व त्याच्या कारभारावर आपली देखरेख ठेवून प्रतिबंध करण्याची सत्ता आपणाकडे घेतली.

दैरेक्तर्स कोर्ट कासं काळजी.

तिकडे कोर्ट आफ् दैरेक्तर्स् लोकांस हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांनीं मुलूख मिळविले असतांही पुष्कळ काळज्या उत्पन्न झाल्या. मुलूख घेण्याचें काम त्यांच्या हुकुमा खेरीज चाललें होतें. त्यांच्या मनांत व्यापाराच्या सुरक्षितपणाकरितां जितका मुलूख अवश्य होता त्यापेक्षां अधिक घेण्याचें नव्हतें असें दिसतें. मीरजाफर आणि कासिम ह्यांविषयीं हकीकत कळली तेव्हां तीवदल त्यांनीं कौन्सिलदारांस केवळ दोषच लाविला नाहीं, परंतु त्यांनीं अशा कामानें तुमच्या इमानीपणास व व्यवस्थितपणास बट्टा लागेल ही आम्हांस शंका आहे असा मजकूर लिहिला. तीन वर्षांत तीन वेळ असे प्रसंग आले कीं ते हिंदुस्थानांत राहतात कीं न राहतात. ह्याविषयींच काळजी पडली होती. त्यांनीं मुख्यत्वें करून कुरकुर

लाविली कीं ह्या लढायांच्या योगानें नेहेमीं पुष्कळ पैसा खर्च होई व तिकडे पैसा पाठविण्याकरितां शेंकडा पंचवीस रुपये दर एकाच्या वाटणींत कमी झाले. पुष्कळ लोक चाकरीस हवे होते म्हणून त्यांना लोक पाठवावे लागले ते मोठ्या संकटानें मिळाले आणि विलायत सरकारानें त्यांच्या तैनातीस कांहीं लोकांची नेमणूक करून दिली. ती नसती दिली तर दैरेक्तरांस लोकच मिळतेना. त्या लोकांस इकडे पाठविण्यास गलबतांचा मक्ता देण्यास देखील कठीण पडलें. लवकरच त्यांस आढळलें कीं हिंदुस्थानांतील अधिकारी यथेच्छ खर्च करितात व लांच घेतात. मग ज्याची आकलन शक्ति मोठी व समजूत चांगली असा मुत्सद्दी पुरुष मिळाला तर तो हिंदुस्थानांतील कारभार फार वाढला आहे त्यांतील अनेक प्रकरणांत बंदोबस्त करील व आपल्या कारभारांत कलह न शिरेल असा दृढ पाया घालील, असें त्यांस वाटूं लागलें. आतां कोण मिळेल म्हणून विचार निघतां ज्या पुरुषानें राज्य घेण्याचा वास्तविक पाया घातला त्या पुरुषास नेमावें असें त्यांच्या मनांत आलें. मग लार्ड क्लैव हा परत जाऊन तीन वर्षें झालीं होतीं त्यास पुन्हा हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलखांत मुख्य अधिकार देऊं लागले. परंतु तो पतकरीना, तो म्हणूं लागला कीं माझ्या हातीं पुष्कळ सत्ता ठेवाल व माझ्यावर कौन्सिलाचा अगदीं जोरा चालणार नाहीं असें कराल तर मी अधिकार पतकरितों. हें म्हणणें कबूल करूं नये म्हणून पुष्कळांनीं अडथळे केले थपापि शेवटीं कबूल करावें असें तेरा असामींचें मत पडलें, व न करावें असें अकरा असामींचें मत पडलें, मग कबूल करावें असें बहुतांचें मत पडून त्यास अधिकार दिला.

म्र० १०
इ० स०
१७६०
हिंदुस्थानांतील मुलूख आल्यावदल व तो राहील ह्याविषयीं संशय.

हुशार व पराक्रमी गवर्नर हवा होता.

क्लैव साहेबाची नेमणूक.

त्या साहेबाची स्वारी सन १७६५ च्या आरंभीं कलकत्त्यास येऊन पोहोंचली; परंतु त्यानें कारभार कसा चालविला वगैरे वर्णन आणखी एखाद्या वेळेस लिहूं, सध्यां त्यानें कंपनीचा मुलूख कोणत्या उपायांनीं वाढविला त्या उपायांविषयीं लिहितों. सुजाउद्दवल्याचा पराजय दर एक लढाईंत झाला, व त्याच्या हद्दीवरून त्यास हटवून देखील लाविलें तरी त्यापाशीं युद्धाची सामग्री पुष्कळ होती व तो जा-

तो कलकत्त्यास पोंचला.

प्र० ११ इ० स० १७६५

तीनें हुशार होता. त्याचें सैन्य चोहोंकडे पसरलें होतें तें जमा करून व मराठ्यांपासून कुमक मिळवून त्यानें त्या सेनेनिशीं जनरल कर्नाक साहेबाशीं तोंडासमोर पुन्हा लढण्याचा बेत घातला. ही लढाई कालपी येथें झाली, तींत सुजाचा अगदीं पराजय झाला व पुष्कळ नाश होऊन त्याला यमुनेंतून मोठ्या घाईनें पळत जावें लागलें. मग आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून तो इंग्लिशांच्या लष्करांत गेला, आणि त्यांनीं तारावं म्हणून शरण आला. तेव्हां इंग्लिशांनीं त्यानें आपणाबरोबर मीर-कासिम ह्यास आणावें म्हणून पराकाष्ठेचा आग्रह केला व मोठाल्या देणग्या देऊं असेंही कबूल केलें, परंतु त्या इमानी पुरुषानें निश्चय केला कीं, जो पुरुष आपणास शरण आला, त्याचा विश्वास-घात कधीं करणार नाहीं. असा इमानीपणा इकडील राजांच्या आंगीं क्वचित आढळतो. त्यानें कासिम ह्यास व लढाईंत मदतीस जर्म-नींतील समरू नामें सोबती होता त्यास सिंधुनदाच्या हद्दीवरील दे-शांत आश्रा मिळविण्याकरितां जाऊं दिलें. सुजा कर्नाक साहेबा-च्या लष्करांत गेला, तेव्हां तेथें हिंदुस्थानांतील पहिल्या प्रतीचे व थोडे दिवसांपूर्वी पृथ्वीवर मोठे बलाढ्य आणि लक्ष्मीवान अशा रा-ज्याचे मालक असे दोन राजे त्यापाशीं झाले.

सुजादवल्याचा पराजय.

हें वर्त्तमान लार्ड क्लैव ह्यास कळतांच तो प्रयाग येथें इंग्लिशां-चें लष्कर होतें तेथें गेला; त्याठिकाणीं ते दोघे विख्यात पुरुष क्लैव साहेब येऊन काय ठराव करील ह्याची वाट पहात राहिले होते. सुजा ह्यानें हट्टानें युद्ध वगैरे केलें म्हणून त्याचा सर्व मुलूख घेऊन बादशाहास द्यावा असा सर्वांनीं निश्चय केला होता, परंतु सुजाची व साहेबाची जातीनें ओळख झाल्यानंतर साहेबास त्याविषयीं फार चांगलें वाटून त्यानें जाणिलें कीं, मोंगलांपेक्षां हा शत्रु झाला तर मोठा नाश करील व मित्र झाला तर पराक्रम करील, आणि नंतर ठरान केला कीं, त्याचा सर्व मुलूख त्याकडे द्यावा. त्याच्या राज्यां-तील प्रजा त्यावर फार प्रीति करीत असते. कोरा व प्रयाग हे प्रांत बादशाहाकडे नेमिले. आणि त्यानें मान्य केलें अथवा मान्य करावे लागलें कीं, बंगाला, बहार, व ओरिसा ह्या सुपीक प्रांतांतील

क्लैव साहेबानें सुजाचा मान ठेविला तो.

पुन्हा मुलूख दे-ण्याचा निश्चय.

जमाबंदीचें काम, म्हणजे अर्थात सर्व अधिकार, कंपनीनें चालवावा व त्याबद्दल बादशाहानें सवीस लाख रुपये दर वर्षास कंपनीपासून घ्यावे. इतकें असतांही जो-हा पैसा त्यास मिळे तितका पूर्वी मिळत नव्हता. पुढें लवकरच नजीब उलदवला म्हणून त्या प्रांताचा नांवाचा सुभेदार होता तो बेताळीस लाख रुपये वेतन घेऊन स्वस्थ घरीं बसावा असें केलें. नंतर क्लैव साहेबास मोठा आनंद झाला कीं, जो मुलूख इंग्लिशांस मिळाला त्याची जमाबंदी दोन कोटी पंन्नास लाख रुपयांहून अधिक होईल, त्यांतून वर लिहिलेल्या रकमा वजा जातां व कारभाराचा खर्च वजा जातां कंपनीस एक कोटी बेवीस लाख रुपयें रोख मिळतील. वसुलाविषयीं हें त्याचें मत फारसें बरोबर नव्हतें, तथापि एकामागून एक जय होत गेले त्यामुळें व दहा वर्षांपूर्वी गंगेच्या मुखाजवळ जेथें बंदोबस्त नाहीं असा एकच किल्ला होता, परंतु हल्लीं पाहूं गेलें असतां हिंदुस्थानभर सर्व उत्तम प्रदेशांत कंपनीची सत्ता झाली, हें पाहून इंग्लंदांतील लोकांस अचंबा वाटला.

म० ११ इ० स० १७६५

क्लैव साहेबाचें वसूलाचें मत.

(अकराविं प्रकरण समाप्त.)

प्रकरण १२ वें.

म्हैसूरच्यां राजाबरोबर लढाया.

म्हैसूरच्या राजाची स्थापना.— देवराज आणि नंदराज ह्या प्रधानांचा अमल— हैदरअल्ली— त्याची उत्पत्ति वगैरे— त्याचा लहानपणची दारिद्र्यदशा— तो प्रसिद्धीस येऊं लागतो— फौज जमविण्याची त्याची रिति— त्यास डिंडिगल येथील फौजदारी मिळाली— त्याचा अमल वाढला— नंदराजाची क्रूरता— तो संकटांत पडतो— हैदरअल्ली त्याचें संकट दूर करितो आणि नंतर त्याच्या अधिकारावर येतो— तो संकटांत पडतो— संकटांतून पार पडून म्हैसूरचा धनी आपणच होतो— तो बेदनूर शहर जिंकून घेतो— म्हैसुरावर मराठ्यांची स्वारी— हैदरअल्ली कालिकत शहर जिंकितो— हैदरअल्लीवर जे लोक उठले होते त्यांस इंग्लिश मिळतात— मराठे तह करितात— इंग्लिशांस जिंकण्याकरितां निजाम हैदरअल्लीस मिळतो— ते दोघे जण करनाटकावर स्वारी करितात— मद्रासेवर हला करण्याकरितां येतात— त्रिनोमाल्ली येथील लढाई— निजाम हैदरअल्लीचा पक्ष सोडून देतो— म्हैसुरावर स्वारी— हैदरअल्लीचा जय— तो करनाटक घेतो— तो पुन्हा मद्रास घेण्याकरितां येतो— त्याचा इंग्लिशांशीं तह होतो— मराठे पुन्हा हैदरावर मोठी स्वारी करितात— तो त्यांजबरोबर सला करितो आणखी प्रांत जिंकितो— त्याचा इंग्लिशांशीं चुरस— मद्रास सरकारची अनीति— हैदर करनाटकावर स्वारी करून तें ओस करितो— कर्नल बाली ह्याच्या फौजेचा पराजय— कलकत्त्याहून सर अयरकूट साहेबाची रवानगी झाली— त्याम किर्तीएक गोष्टी अनुकूल झाल्या— कर्नल ब्रायवेत ह्याच्या फौजेचा नाश— तह— हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर लढाया— हैदरअल्ली मरण पावतो—त्याचा पुत्र टिपू गादीवर येतो—

मद्रास सरकारांत तंटे होतात– कूट साहेब मरण पावतो– इंग्लंद आणि फ्रान्स ह्या दोन देशांचा परस्परांशीं तह होतो– जनरल माथ्यू साहेबाच्या हातीं बेदनूर येतें– सुलतान तें परत घेतो– मंगळूरचा वेढा– टिपूशीं तह. इ० स० १७८० ग्र० १२

मोंगलांचीं बादशाही व तिजखालचीं मोठमोठीं मांडलिक संस्थानें हीं मोडिलीं तेव्हां हिंदुस्थानांत प्रायः राजा म्हणून कोणी राहिला नाहीं. एखाद्या प्रांतांत कोणी एखादा पराक्रमी पुरुष असला म्हणजे त्यानें पुढारी होऊन कांहीं लुटारू वगैरे लोक जमवावे आणि पाहिजे तेवढा प्रांत दाबून स्वस्थपणें अमल करूं लागावें अशें चाललें होतें.– कितीं एकांनीं तर ह्याप्रसंगीं राज्येंच स्थापिलीं. ह्या राज्यांपैकीं म्हैसूरचें राज्य मोठें प्रबल होतें. दक्षिण हिंदुस्थानांत सह्याद्रि नामक पर्वत व दुसरे कांहीं मोठमोठे पर्वत असल्यामुळें तेथें उच्च प्रदेश बहुत आहेत. म्हैसूरप्रांत हा तसाच उंच प्रदेश आहे. त्याची पश्चिम सीमा मलबार किनारा, आणि पूर्व सीमा करनाटक प्रांत. पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंत जी ह्याठिकाणीं हिंदुस्थानाची रुंदी आहे तिचा अर्धापेक्षां अधिक भाग म्हैसूर प्रांतांत सांपडला आहे. ह्या प्रांतासभोंवतीं पर्वत असल्यामुळें त्याची उंची समुद्राचे पृष्ठावर तीन हजार फूट आहे. हा प्रांत असा उंच असल्यामुळें त्यांतील हवा समशितोष्ण आहे आणि शरीर प्रकृतीस फार चांगली आहे ह्या प्रांतांतली जमीन उत्तम प्रकारचें जिराईत व बागाईत होण्यास बहुतकरून चांगली आहे, आणि तेथच्या शेतकरी लोकांत फारसें कलाकौशल नव्हतें तरी ते आस्थेनें मेहेनत करीत, त्यामुळें त्यांस उत्पन्न पुष्कळ होई. हें राज्य एका शूर सरदाराच्या हातांत आलें तेव्हां त्यानें तें असें वाढविलें, कीं इंग्लिशांस हिंदुस्थानामध्यें आपली स्थिति होते कीं नाहीं अशी धास्ती पडली. म्हैसूरचें राज्य.

म्हैसूरचें संस्थान शेवटपर्यंत मुसलमान लोकांच्या हातीं पुरतेपणीं लागलें नाहीं; आम्हीं ज्यावेळचा त्याचा इतिहास लिहित आहों म्हैसूचें सरकार.

प्र० १२ इ० स० १७४९

त्यावेळेस तेथें अमल हिंदुराजांचाच होता. हे राजे पूर्वी दक्षिणेंतील राजांस कधीं नजराणा व कधीं खंडणी देत असत, आणि दक्षिणेंतील राज्यें मोडल्यावर मोंगलांस सदरहूप्रमाणेंच देत असत. पुढें मोंगलांचें तेज कमी होऊं लागलें तसें त्यांनीं सर्व देणें बंद केलें. मग मोंगलांकडून एक सरदार पुष्कळ फौजेनिशीं येऊन त्यानें म्हैसूरकरांकडून खंडणी वगैरे सर्व पूर्ववत् चालू केलें. अस्तु, अशा स्वातंत्र्यापासून म्हैसूरकर राजांचें कांहीं हित झालें असेल असें म्हणावें; तर तें कांहीं नाहीं. ते राजे इकडील इतर राजेलोकांच्या चालीप्रमाणें मिजाशींमध्यें गरक होऊन गेले होते, आणि राज्यकारभार चालविण्याचा कुलअखत्यार प्रधानांच्या हातीं दिला होता.

करनाटकांत लढाई सुरू झाली तेवेळेचीं त्याची स्थिति.

करनाटकांत लढाई होऊन इंग्लिशांचें म्हैसूरकरांशीं वैषम्य पडलें तेव्हां त्या राज्यांत देवराज आणि नंदराज हे दोघे बंधु मुख्य होते त्यांपैकीं नंदराज अमल करण्याला मोठा हुशार होता. ह्याच संधीस एका प्रतापी पुरुषाचा उदय होत चालला होता आणि पुढें सर्व दक्षिण हिंदुस्थान व विशेषतः म्हैसूर प्रांत ह्यांतील राज्यकारभारांत त्यानें विलक्षण फेरफार केला, तो पुरुष कोणता म्हणाल तर हैदरअल्ली.

हैदरअल्ली.

कर्नल विकम साहेबानें नेटीव लोकांच्याच कागदपत्रांवरून हैदरअल्ली ह्याचा मुळापासून कच्चा इतिहास लिहिला आहे; परंतु तितका सर्व येथें लिहिण्याची आवश्यकता आम्हांस दिसत नाहीं.

त्याचें मूळ.

हैदरअल्लीचें मूळ घराणें पंजाब प्रांताच्या उत्तरभागांत होतें. त्याचे पूर्वज हलक्या प्रतीचे होते आणि त्यांची गरिबी तर इतकी होती कीं कधीं कधीं त्यांचा निर्वाह केवळ भिक्षेवर होत असे. त्याचा बाप फतेमहंमद ह्यास कोणी धर्मार्थ बाळगिलें होतें. नंतर तो एका म्हैसूरकर सरदाराच्या फौजेंत चाकरीस राहिला. तेथें त्यानें मर्जीमाफक काम केल्यावरून त्यास कांहीं पायदळाची नाईकी दिली. कोणाएका कुलीन स्त्रीच्या नवऱ्याला चोरांनीं लुटून ठार मारिलें त्यामुळें तिला पराकाष्ठेची दारिद्र्य दशा आली. तेव्हां तिच्या दोन कन्या होत्या त्यांचीं फतेमहंमद ह्याजबरोबर

हैदरअल्ली.

तिजकडून लग्नें करून देवविलीं. नंतर धाकट्या बायकोपासून

ख्यास शाबास आणि हैदर असे दोन पुत्र झाले. शाबास नऊ वर्षांचा आणि हैदर सात वर्षांचा असे झाले तोंच त्यांचा बाप फतेमहंमद आणि त्याचा धनी हे दोघे लढाईंत मारिले गेले. नंतर फतेमहंमदाची बायको आणि हीं दोन मुलें एका दुष्ट सरदाराच्या हातांत सांपडलीं. त्यानें तिचा सर्व वित्तविषय हिरावून घेतला आणि आणखी तुझें कोठें काय आहे तें दाखीव म्हणून तिला फार त्रास देऊन तिचे विलक्षण हाल केले. ह्याप्रमाणें त्या बाईचें सर्वस्व जाऊन दोन मुलें व आब्रू येवढें कायतें शिलक राहिलें. नंतर तिचा भाऊ इब्राहिम म्हणून होता त्याजकडे ती गेली आणि त्यानें त्या सर्वांचें पालन पोषण केलें. ह्यावेळेस हैदर ह्याजवळ कांहीं ऐवज नव्हता व तो पुढें एवढ्या मोठ्या योग्यतेस चढेल असें लक्षणही दिसत नव्हतें. तो लिहिणें वाचणें देखील शिकला नव्हता. तो मोठा झाल्यावरही त्यानें आपला सर्वकाळ चैनींत किंवा पारधींत घालवावा असें चालविलें होतें. ह्याप्रमाणें सत्तावीस वर्षें वयाला होत तोंपर्यंत त्यानें कोणताही धंदा केला नाहीं; फौजेंत देखील कोठें चाकरीस राहिला नाहीं. त्याचा वडील भाऊ शाबास हा नंदराजाच्या फौजेंत चाकरीस राहून बराच वाढला होता. तेथें त्यानें चांगला लौकिक मिळविल्यावरून त्यास सेनापतीच्या हाताखालची एक जागा मिळाली होती. शेवटीं देवनळ म्हणून एक किल्ला होता त्याच्या वेढ्यावर शाबास ह्याची नेमणूक झाली. तेव्हां हा वेढा आहे तोंपर्यंत ह्या कामांत त्वां मला मदत करावी असें त्यानें हैदर ह्यास सांगितलें. तें मान्य करून हैदर शाबास ह्याजबरोबर गेला. हा वेढा नऊ महिने पडला होता. पूर्वीच्या रितीवरून हैदर फार उनाड आहे असें वाटत होतें पण तो ह्या फौजेच्या हद्दीवर येतांच त्याच्या आंगीं धैर्य, शौर्य, अवसान, वगैरे जे गुण मोठ्या योध्याच्या आंगीं असावे ते सर्व दिसूं लागले. पुढें त्याच्या स्वाधीन एक लहानसें पतक करून त्यास सांगितलें कीं हें तूं पाहिजे त्या रितीनें वाढीव म्हणजे त्यापासून तुझें कांहीं हित होईल.

प्र० १२ इ० स० १७४२

त्याच्या गुणांचा थोडथोडा उद्भव.

त्याचें युद्ध सामर्थ्य प्रथमच दिसून आलें.

नंदराजानें फ्रेंचाबरोबर स्नेह करून ते आपलेसे करून घेतले आणि त्रिचनापल्लीवर स्वारी करण्याचा बेत केला. ह्या स्वारीचें

त्रिचनापल्लीवर स्वारी.

प्र० १२ इ० स० १७५९

कांहीं वृत पूर्वींच लिहिलें आहे. ह्या वेळेस हैदर नंदराजाबरोबर होता. ह्या मोहिमेमध्यें आपला नांवलौकिक वाढण्याचा व वृद्धी होण्याचा जेवढा प्रसंग आला तेवढा हैदरानें अगदीं जाऊं दिला नाहीं. हिंदुस्थानांत लुटारू लोक मनस्वी होते, त्यांपैकीं हैदरानें आपणाजवळ पुष्कळ लोक जमविले. ह्या लोकांस पगाराची गरज नसे; पण ते एखाद्या हुशार सरदाराच्या आश्रयाखालीं राहून जें लुटून आणीत तेवढ्यावर संतुष्ट रहात. हैदर ह्या लोकांस कांहीं देत नव्हता; पण उलटें तेच ह्यास कांहीं देत असत; तें असें कीं ते लूट करून जें आणितील त्यांतील अर्धें हैदरास द्यावें असा ठराव होता. हा हिस्सा देण्यास ते लोक अगदीं नाखुष होते ह्यांत संशय नाहीं. परंतु हैदर, जरी त्यास लिहितां येत नव्हतें, तरी तोंडच्या हिशोबांत फार हुशार होता, आणि त्याच्या पदरीं खंडेराव म्हणून ब्राह्मण कारकून होता तो हिशोबाच्या कामांत फार चांगला वाकबगार होता, तो त्यास मदत करीत असे त्या दोघांनीं अशी तजवीज करून ठेविली होती, कीं जी पुढें त्या लुटारू लोकांची टाळाटाळ अगदीं चालूंच नये. ज्या आचरणाच्या योगानें हैदरानें राज्यपद मिळविलें त्याची शहरांतील एखाद्या मोठ्या चोराच्या आचरणाशीं तुलना करून पाहिली असतां चोराचें आचरण फार बरें असें म्हणण्यास चिंता नाहीं. घोडीं, गुरें, धान्य वगैरे जे मोठे लुटण्यासारखे पदार्थ तेवढेच चोरून हे लुटारू रहात नसत. तर कापडचोपड बाळी बुगडी किंवा दुसरें कांहीं किडुक मिडुक बायका पोरांच्या आंगावरून देखील हिसकावून घेत असत. इष्टमित्रांचा देखील माल जर गुप्तपणें चोरायास सांपडला तर ते अनमान करीत नसत. अशा रितीनें चाललें असतां त्रिचनापल्लीहून निघण्यापूर्वी हैदराजवळ १५०० स्वार, ५,००० पायदळ, हत्ती, उंट व इतर लष्करी सामान जेवढें एखाद्या मोठ्या सरदाराच्या बरोबर असावें तेवढें जमलें. युद्धाच्या कामांत त्यानें चांगला लौकीक मिळविला त्यामुळें त्याजवर ज्याची मर्जी बहाल होऊन डिंडिगल म्हणून मोठें शहर होतें तेथें त्यास फौजदार नेमिलें. हें शहर पाळगार लोकांपासून नुकतेंच जिंकून

हैदरानें लुटारू लोक जमविले.

सत्ता मिळविण्याविषयीं हैदराचा अयोग्य उपाय.

त्यास डिंडिगलचा फौजदार नेमिलें.

घेतलें होतें. ह्या अधिकारावर आल्यानंतर त्यानें आसपासचा मुलूख लुटावा व नीच मार्गानें कपट करून साक्षात राजाला व राजाकडून देखरेख करण्याकरितां आलेल्या अधिकाऱ्यांला फसवावें असें करून त्यानें आपली फौज वाढविली व द्रव्यही बहुत मिळविलें. अधिकाऱ्याच्या लक्ष फौजेची हजिरी द्यावयाची तींत तो एकदां भलेरीच फौज पुन्हा आणी; आणि अशा रितीनें दहा हजार फौजेची अठरा हजार फौज त्यानें करून दाखवावी. ह्याप्रमाणें फौज नसतां तिच्या पगारावदल तो पैका घेई; आणि जी फौज होती तिच्या पगारावदलचा पैका त्याला जो खर्च पडत असे त्याहून फारच अधिक घेई. फौजेतील लोक अजारी पडल्यास त्यांच्या औषधपाण्याच्या खर्चावदल सरकारांतून शिवाय पैसा मिळत असे. म्हणून हैदरानें असें करावें, कीं धडधाकट्या शिपाई लोकांच्या हातां पायांस हळदीच्या पट्ट्या बांधवून त्यांस अधिकाऱ्यापुढें आणावें आणि त्यांजवदल त्याच्यापासून पैसा काढावा. अशा रितीनें तो नंदराजास अगदीं फसवी; आणि त्यास तर हैदर येवढ्या मोठ्या फौजेचा खर्च मुलखाच्या उत्पन्नावर चालवून बेताच्या खर्चानें लढाया करून जय मिळवितो ह्या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटत असे. हलकट वर्तणूक.

हैदरअलीं जवळ फौजफांटा पुष्कळ जमून तो द्रव्यानें गबर झाला व त्याचा लौकीकही मोठा वाढला. तेव्हां आतां आपणास म्हैसूरची गादी मिळविण्यास फारसें कठीण पडणार नाहीं असें त्यास वाटून त्यानें ती मिळविण्याचा इरादा धरिला. त्या दरबारांत राजे प्रधान वगैरे मोठाल्या लोकांत मोठे जबरदस्त बखेडे चालले होते ते हैदरास साधकच झाले. नंदराजानें तेथल्या राजास आपल्या तावदाराप्रमाणें करून अगदीं आपल्या मुठींत आणून ठेविलें होतें; आणि तो राजा तर ह्या कावांतून बाहेर पडण्याच्या युक्त मसलतींत होता. त्यानें ह्या कामाकरितां आपल्या पक्षाचे पुष्कळ लोक करून ठेविलेच होते; परंतु मसलतीप्रमाणें सर्व तयारी होण्यापूर्वीच राजाकडून त्या मसलतीची फूट पडली ह्यामुळें त्यानें ज्या बाजूस कोडबंदी केली होती त्यावर हल्ला करून तो नंदराजानें घेतला. ह्याप्रमाणें नंदराजाचा जय झाल्यानंतरही त्यानें आपल्या राजाचा थोडासा डा- लोभीपणाचे विचार.

प्र० १२ इ० स० १७६५ दुष्ट वर्तणूक.

मडौल ठेवलाच होता, पण त्याच्या पक्षाचे जे लोक होते त्यां पैकीं कांहीं एकांस विध्या घातल्या व कांहीं एकांचे नाक कान कापून त्यांस रस्त्यांवर हांकून दिलें. नंदराजाचा भाऊ देवराज होता त्यास हें क्रूर कर्म पाहून संताप आला ह्यामुळें तो आपला तेथील सर्व स्वार्थ सोडून दुसऱ्या परगण्यांत रहावयास गेला.

नंदराजाच्या फौजेची चमत्कारिक युक्ति.

हिंदु राजांस कर्ज फेडण्याची अडचण नेहमीं पडायाची असेच आहेच, त्याप्रमाणेंच नंदराजासही ती अडचण येऊन पडली. फौजेची बाकी पुष्कळ थकली होती, तिजबद्दल तिनें मोठा गयगवा केला; पण त्यानंतरहून कांहीं तोडजोड झाली नाहीं. सबब ती त्याच्या दारीं धरणें घेऊन बसली. हिंदु लोकांत अशी चाल आहे, कीं ज्याच्या दारीं धरणें बसेल त्यानें तें धरणें उठे तोंपर्यंत अन्नपाणी घेऊं नये. ह्यामुळें ते लोक बसले असतां नंदराजानें अन्नपाणी घेतलें नाहीं. फौज त्याच्या दरवाज्यांत बसून राहिली होती तिनेंही नंदराजानें ह्या नियमाप्रमाणेंच चालावें म्हणून खूप बंदोबस्त ठेविला होता.

हैदराची मध्यस्थी.

ह्या संकटसमयीं हैदर हा नंदराज आणि फौज ह्या दोघांची मध्यस्थी करण्याच्या बेतानें श्रीरंगपट्टणास आला आणि तेथें जितका हातीं येण्याजोगा सरकारी पैसा होता तितका त्यानें जमविला व लोकांकडे कांहीं सरकारी तसल्मातीचीं येणीं होतीं तीं मोठ्या चातुर्यानें उगविलीं आणि फौजेचें तूर्त मागणें होतें तेवढें द्रव्य जमतांच तें तीस देऊन धरणें उठविलें. त्यानें ह्याच प्रसंगीं नंदराज आणि देवराज ह्या दोघां बंधूंचें सख्य करून दिलें, परंतु त्यानंतर देवराज फार दिवस वांचला नाहीं. हैदरअल्लीस कांहीं एक लाभ नसतां त्यानें केवळ निःस्वार्थपणानें अशा गोष्टी केल्या ह्यामुळें तो सर्वांस चांगला वाटून लोकांची त्याजवर फार प्रीति बसली. नंदराजाच्या फौजेच्या बाकीची तोडजोड हैदरानें केली होती सबब ती फौज लाला वश होतीच व त्याची जातीची फौजही त्याच्या जवळ पुष्कळ होती, ह्यावरून त्याला तेव्हां असें वाटूं लागलें कीं म्हैसूरचा राजा मीच आहें. नंतर मराठ्यांनीं पुष्कळ फौजनिशीं म्हैसूरावर एकदां स्वारी केली त्यावेळेस हैदरअल्लीस सेनापती नेमून त्यांजबरोबर लढण्याकरितां नंदराजानें पा-

ठविलें. ह्याप्रसंगीं त्यास जय तर मिळाला नाहीं; परंतु लोकांस जो शेवट होईल असें वाटलें होतें त्यापेक्षां त्यानें फार चांगला केला, ह्यामुळें त्याचें वजन त्याच्याच वाढलें. ह्यानंतर आतां हैदराची बुद्धि फिरली; ती अशी कीं, ज्या नंदराजाच्या कृपेनें तो एवढ्या अधिकारास चढला होता त्याचाच नाश करून त्यानें आपणच मुख्य होण्याचा बेत केला. खंडेराव हा हैदराचा दिवाण होता आणि बाहींदारही होता. त्यानें राजाची आई चांगली शहाणी होती तिच्या द्वारानें राजाशीं नंदराजास काढून देण्याविषयींची घाटाघाट करण्यास आरंभ केला आणि आपल्या राज्याचा अधिकार आपल्या हातीं यावा ह्या हेतूनें नंदराजास घालवून देण्याच्या मसलतीस राजा कबूल झाला. व दुसऱ्याही कांहीं गोष्टी त्याबेळेस त्यांच्या मसलतीस अनुकूल झाल्या. त्या अशा, कीं फौजेची नवीन बाकी नंदराजाकडे तुंबल्यामुळें ती त्याच्या दारापुढें पुन्हा धरणें घेऊन बसली. हैदरानें मागच्या वेळेप्रमाणें फौजेचें समाधान करून आपल्या यजमानाचें संकट दूर केलें नाहीं; तर तो एकीकडे फौजेला चिथावी आणि एकीकडे नंदराजास त्रास देई. प्रथमतः दुसऱ्या फौजेवरोवर धरणें घेऊन बसायास आपणास वाईट वाटतें असें त्यानें दाखविलें. पण मग तिजवरोवर धरणें घेऊन बसला. अशा प्रकारचें संकट नंदराजावर गुदरलें; तेव्हां त्यानें हैदराशीं असें कबूल केलें, कीं मला खजिन्यांतून पुष्कळ द्रव्य व फौज दिल्यास मी तुमच्या स्वाधीन सर्व राज्यकारभार करून निघून जातों. हें नंदराजाचें बोलणें कबूल करून हैदरानें द्रव्य वगैरे देऊन त्यास घालवून दिलें. ह्यानंतर राजानें आपल्या हातीं राज्य घेऊन दिवाणी, फौजदारी, व लष्करी सर्व कारभार हैदरअल्ली व खंडेराव ह्या उभयतांस सांगितला. आतां असल्या वजनदारीच्या अधिकारावरून हांकून दिलेला एवढा प्रधान आपली स्थिति बरी मानून स्वस्थ बसेल असें होणारच नाहीं हें स्पष्टच आहे. नंदराज तेथून निघाला तो श्रीरंगपट्टणापासून पांच कोसांवर म्हैसूर शहर आहे तेथें गेला आणि मेहेनत करून त्यानें आपली फौज पुन्हा भरली. हा मजकूर हैद-

म० १२ इ० स० १७६२

नंदराजास युवराज्याधिपत्याचे गुप्त बेत.

हैदराचा बेत सिद्धीस गेला.

प्र० १२ ह० स० १७६१

रास कळल्यानंतर नंदराजाला त्यानें असा हुकूम पाठविला, कीं तुम्ही आपल्या पदरच्या फौजेस फांटा द्यावा आणि सरकारांतून तुमच्या घरगुती खर्चाकरितां कांहीं नेमणूक मिळेल तेवढी घेऊन स्वस्थ राहावें. त्यानें रागावून हैदरास असें उत्तर पाठविलें कीं ह्या पदवास तुला मीं आणिलें, आणि आतां सर्व कारभार सोडून एकीकडे येऊन राहिलों, असें असतां तुं इयानें हैदर पाहवत नाहीं; तर तुइया इच्छेप्रमाणें व हातून होईल तें कर; मी म्हैसुरांतून हालणार नाहीं. मग हैदरानें लागलीच म्हैसुरावर स्वारी केली; तेथें प्रथम मोठी लढाई झाली; परंतु शेवटीं शहर स्वाधीन करून हैदराचें सांगणें नंदराजास मान्य करणें प्राप्त पडलें.

हैदरावरील नवें संकट.

ही लढाई झाल्यावर पुढें हैदरअल्लीच्या अमलाचा केवळ कळसच झाला अशी म्हटल्यास चालेल. परंतु थोडे दिवस गेल्यावर त्याजवर असें संकट येऊन गुदरलें, कीं तसें पूर्वी त्यास कधींच आलें नव्हतें. राजा व त्याची मातोश्री ह्यांनीं येवढी घालमेल केली तिजपासून त्यास निष्पन्न काय झालें ? पहिला प्रधान नंदराजा राजाला एकीकडे ठेवून आपण राज्य करीत होता म्हणून त्याला काढून त्याच्या जागीं दुसरा आणिला तो त्याजप्रमाणेंच निघाला आणि पुन्हा राज्य आपल्या हातीं नाहीं तें नाहींच. हें भविष्य घालमेल होण्याच्या पूर्वीच राजाच्या व मातोश्रीच्या मनांत आलें होतें व नंतर तर प्रत्यक्ष दिसूंच लागलें. खंडेराव हैदराचा बहुत दिवसांचा मोठा विश्वासूक मित्र होता. पण हैदर प्रबळ झाला सें दिसतांच त्या मायलेकरांनीं खंडेरावाला आपल्या पक्षाचा करून न ठेविलें, तेव्हां तो आणि तीं दोघें हैदराला पकडण्याची संधी पाहूं लागलीं; हैदरअल्ली असल्या कंत्राणांत अत्यंत प्रवीण होता सबब पण तो त्यांच्या हातीं तेव्हांच सांपडला. तो प्रकार असा, कीं हैदरास आपणावर कोणी शत्रु उठेल अशी अगदीं शंका उरलीं नव्हती. सबब आपली बहुतेक फौज चोहींकडे पाठवून देऊन थोड्याशा फौजेनिशीं तो श्रीरंगपट्टणाच्या बाहेर छावणी देऊन राहिला होता. तेथें एके दिवशीं एकाएकीं आपणावर तोफांचा

रोंख धरिलेला पाहून हैदरअली फार चकित झाला आणि त्यास पराकाष्ठेचें भय पडलें. त्यास कांहीं अडचण पडली म्हणजे तो खंडेरावास बोलावीत असे त्याप्रमाणें त्यानें त्यावेळेसही त्यास बोलाविलें, परंतु तो गृहस्थ तटबंदीवर फौजेला हुकूम करीत आहे असें पाहतांच आपण कोणत्या पांशांत सांपडलो आहों हें हैदराचें लक्षांत पुरतेपणीं आलें; तथापि अशाही जिवावरच्या प्रसंगीं धैर्य न सोडितां आपलीं माणसें चांगल्या ठिकाणीं ठेवून (त्याचा पूर्वीचा कारकून) खंडेरावाशीं तहाविषयीं त्यानें मोठ्या नम्रतेनें बोलणें लाविलें. खंडेरावानें साफ जवाब पाठविला कीं तुम्ही आपला जामदारखाना व कुटुंब आमच्या स्वाधीन करून थोडे शिपाई बरोबर घेऊन रात्रीं कोणास नकळतां सडे निघून जावें. हैदरानें रयतेस दुःख देऊन मोठ्या अन्यायानें संपत्ति जमविली होती; तरी ती संपत्ति व त्याच्या कुटुंबांत त्याचा पुत्र टिपू केवळ नऊ वर्षांचा होता तो ह्यांस टाकून खंडेरावाच्या सांगण्याप्रमाणें निघून जावें लागलें. हैदर गेल्यानंतर त्याचें कुटुंब श्रीरंगपट्टणास नेऊन तेथें त्याचें पालण पोषण चांगलें केलें. म्र० १२ इ० स० १७६२

हैदराची नम्रता. व तो पळाला.

हैदर तेथून निघाला तो प्रथम अनिकल मुकामीं गेला आणि मग बंगळुरास गेला. ह्या दोन्ही ठिकाणीं त्याचाच अमल होता. हैदरावर पूर्वी सांगितल्या प्रकारचा प्रसंग आला असतांही ह्या दोन्ही ठिकाणचे सुभेदारांनीं त्याचा पक्ष सोडिला नाहीं. हैदराची पहिली फौज चोहोंकडे पसरली होती ती त्यानें एकत्र जमविली, आणि त्याचें नांव पूर्वीच फार गाजलेलें होतें त्यामुळें त्यानें नवीन लोक मिळविण्याविषयीं यत्न केला तो त्याचा सफळ झाला. ह्याप्रमाणें थोडक्याच दिवसांत फौज जमवून त्यानें खंडेरावावर स्वारी केली. परंतु खंडेराव राज्य कारणांत फार चांगला होता व त्याच्या हाताखालची फौज हैदराच्या फौजेपेक्षां चांगली होती, सबब त्यानें सगळी फौज लढाईला एकदम उभी करून हैदराचा पराजय केला. ह्याप्रमाणें पुन्हा हैदराच्या प्राणांवर संकट येऊन गुदरलें तथापि त्यांतूनही पार पडून विलक्षण युक्ति करून त्यानें आपलें कार्य साधिलें. ती युक्ति अशी कीं दोनशें स्वारांनिशीं निघून रातो-

हैदराचे नवे उपाय.

त्याचा मोड.

प्र० १२ इ० स० १७६३

रात तो नंदराजास शरण गेला आणि त्याजबळ आपल्या सर्व अपराधाबद्दल क्षमा मागून त्यानें त्यास विनंती केली, कीं आपण आपल्या पूर्वीच्या अधिकारावर येऊन आपल्या ह्या सेवकाचें (हैदराचें) पूर्ववत् पालन करावें. आतां ज्या हैदरानें नंदराजास पूर्वी नुकतेंच पदच्युत केलें होतें त्याच हैदराच्या असल्या कपटी बोलण्यास नंदराज फसला ही मोठी एक आश्चर्याची गोष्ट आहे, असें सर्व इतिहासकार मानितात; परंतु नंदराजाचा अधिकार प्रतिष्ठा हीं अगदींच गेलीं होतीं, तीं पुन्हा मिळण्याची आशा त्याला काय ती ही गोष्ट कबूल केली असतांच होती, हें त्या इतिहासकारांनीं मनांत आणिलें म्हणजे इतकें आश्चर्य होणार नाहीं.

हैदराच्या युक्ति सिद्धीस गेल्या.

ही मसलत साधिल्यानंतर हैदरानें ह्याहीपेक्षां खोल अशी दुसरी एक मसलत काढिली. ती अशी, कीं खंडेरावाच्या फौजेंतील मोठमोठाल्या अधिकाऱ्यांस नंदराजाच्या नांवचीं फितुरीपत्रें लिहून त्यांजवर नंदराजाचें मोर्तब केलें. तीं पत्रें जासुदाच्या हातीं दिलीं; आणि त्यास असें सांगितलें कीं तूं वाहेरून असें दाखीव, कीं खंडेरावाच्या हातीं हीं पत्रें पडूं नयेत म्हणून मी फार जपत आहें. आणि आंतून तर त्याच्या हातीं पडण्याचा यत्न कर. ह्याप्रमाणें केल्यानें तीं पत्रें मध्यें धरिलीं जाऊन खंडेरावाच्या हातीं पडलीं. हा सरदार मोठा राज्यकारणी व वाकबगार होता खरा; परंतु ह्या वेळेस अगदीं फसला, आणि आपल्या पदरच्या लोकांनींच आपला विश्वासघात केला असें वाटून तो एकाएकीं आपली छावणी सोडून श्रीरंगपट्टणास निघून गेला. पाठीमागें त्याच्या फौजेची अगदीं अव्यवस्था झाली, तितक्यांत हैदरानें तिजवर अकस्मात हल्ला करून तिची दाणादाण करून टाकिली, तोफा वगैरे सामान, दाण्याची कोठी, व सर्व पायदळ इतकें धरिलें गेलें. हें पायदळ हैदरानें आपल्या पायदळाशीं मिळविलें. घोडेस्वार मात्र लौवकरच पळाले त्यामुळें ते सुटले. खंडेरावास हें कपट समजतांच तो आपली फौज जमवूं लागला, तों हैदरानें दुसरेंच कारस्थान केलें. तें असें कीं तो कांहीं दिवस तयारी न चालवितां अगदीं स्वस्थ बसला आणि त्यावरून असें दाखविलें, कीं पुढें खंडेरावावर हल्ला क-

रण्याचा साझा बेतच नाहीं. मग एके दिवशीं रात्रीं एकाएकीं खंडेरावाच्या फौजेवर चाल करून जाऊन ती गैरसावध असतां त्यानें तिचा पराजय केला. नंतर त्यानें आसपासचीं गांवें जिंकून घेतलीं आणि श्रीरंगपट्टणाच्या बाहेर पांच सहा हजार फौज तोफा लावून पडून राहिली होती तिजवर गेला. तेथें त्यानें शत्रूशीं लबाडीनें तह करून त्यांच्या मनांतील संशय घालविला तसें ते स्वस्थ बसले आणि त्यांचे बहुतेक घोडेस्वार व लष्करी-सामान येवढ्याचा नाश होऊन ते हैदराच्या हातीं सांपडले. असे हैदराचे सर्व शत्रु हैदराच्या मुठींत सांपडले, तथापि त्याच्या मनांत असें होतें, कीं आपणाला जीं तहाचीं कलमें ठरवायाचीं आहेत तीं म्हैसूरच्या राजानें आपण होऊन काढून मला तीं मान्य करण्याचा आग्रह केला, असें लोकांत दिसावें. हैदरानें राजास अशी विनंती सांगून पाठविली कीं सरकारचा सेनापति खंडेराव माझ्या स्वाधीन करून माझी सरकारांत बाकी पुष्कळ उरलेली येणें आहे तिचा फडशा करावा; मग सरकारची मर्जी असल्यास हें काम मजकडे ठेवावें, नसल्यास मला रुखसत द्यावी, म्हणजे मी दुसरीकडे उद्योग पाहीन. त्याच्या मनांत जें होतें तें त्यानें आंतून लिहून पाठविलें, तें पाहून राजा अडचणींत पडला. तेव्हां त्यानें हैदरअल्लीस लिहिलें, कीं राज्य करण्याच्या खटपटींतून मला सोडवावें, आणि मला तीन लाख रुपये व नंदराजास एक लाख रुपये इतका वसूल देऊन बाकीचा सर्व तुम्ही आपल्याकडे घ्यावा. त्या गोष्टीविषयीं आपली खुषी नाहीं असें हैदरानें प्रथम दाखविलें पण मग तीच गोष्ट मान्य केली. खंडेरावावर क्षमा करावी म्हणून राजानें व राण्यांनीं हैदरास बुध्कळ सांगितलें. हैदरानें उत्तर केलें, कीं मी त्याला पोपटाप्रमाणें पाळीन. राजाला वगैरे ह्या उत्तरावरून असें वाटलें, कीं राघू जसा ममतेनें पाळितात तसा हैदर खंडेरावाला पाळील. परंतु हैदर ज्या कपटानें बोलिला होता तें त्यानें खरें केलें. तें असें कीं, पोपटाप्रमाणें लोखंडी पिंजरा करून त्यांत खंडेरावाला जन्मभर ठेवून दररोज त्याला तेथें दूधभात मिळावा

प्र० १२ इ० स० १७६३

खंडेरावाचा अगदी पराजय.

राज्यावरोवर मोठ्या मसलतीची वत्तणूक.

खंडेरावाचा क्रूरपणानें उगविला.

प्र० १२ इ० स० १७६५

अशी तजवीज त्यानें केली. हतभाग्य खंडेराव ! आतां हैदरानें नंदराजांबरोबर तह केला तेवेळेस त्यानें त्याजवळही मोठमोठ्या बाता मारिल्या होत्या त्यांपैकीं नंदराजाला मिळालें कायतें लाख रूपयांचें वर्षासन.

हैदराच्या विजयाची वृद्धि झाली.

वर सांगितल्याप्रमाणें म्हैसूरचें राज्य हैदर अल्लीच्या हातीं लागल्या नंतर तो चोहींकडे आपला अमल वाढवूं लागला. सीरा, चितलदुर्ग व दुसरे कांहीं परगणे, म्हैसूरच्या खालचे असतां, तेथील राजे व पाळेगार लोक म्हैसूच्या संस्थानांत घोटाळा झाला तेव्हां पासून थरेच स्वतंत्रपणें वागूं लागले होते, सबब हैदरानें ते सर्व परगणे जिंकून आपल्या ताब्यांत घेतले. ह्या सर्व ठिकाणीं हैदरास थोडेंबहुत द्रव्य सांपडलें. तथापि त्याच्या हातीं पुष्कळ संपत्ति लागली अशी वेदनूर परगण्यांतच. हा परगणा म्हणजे घाटमाथ्याचा अत्युच्च प्रदेश होय. ह्याची उंची समुद्राच्या सपाटीपेक्षां सुमारें पांचहजार फूट आहे. ह्या प्रदेशांत पर्जन्य पुष्कळ पडतो ह्यामुळें जिराईत बागाईत अत्युत्कृष्ट होतें. हा प्रदेश एकीकडे असल्यामुळें ह्यावर फारशा स्वाऱ्या वगैरे होत नसत. ह्या ठिकाणीं जे राजे होत गेले त्यांनीं द्रव्य संचय करण्याकडे फार लक्ष्य दिलें. कारण, इकडील लोक द्रव्याला विलक्षण मान देतात, अस्तु, वेदनूर शहरावर म्हैसूरची फौज येऊन पडली. ह्या शहराचा परिघ सुमारें चार कोस असून शहर फार शानदार होतें. शहरचे लोक ती फौज पाहतांच राजवाड्याला आग लावून जवळच्या रानांत पळून गेले. मागें हैदरानें पाहिजे तशी लूट केली. विक साहेब असें म्हणतो, कीं ह्या लुटींत बारा कोटींचा ऐवज हैदराला सांपडला. पुढें जो माझा एवढा भरभराट झाला त्याला कारणीभूत वेदनूरची लूटच होय असें हैदरही स्वतां म्हणत असे असें सांगतात. परंतु विक साहेबाच्या मताप्रमाणें १२ कोटच असतील असें आम्हांस वाटत नाहीं.

प्रदेशाचें वर्णन.

अतिशयित लूट.

त्याचा शत्रु माधवराव त्यास विजय प्राप्त झाला.

अशा रितीनें हैदराचा जय होत चालला असतां एक विघ्न येऊन पुढें उभें राहिलें. मराठ्यांचा प्रख्यात सरदार माधवराव, पुष्कळ घोडेस्वारांच्या फौजेनिशीं म्हैसूर प्रांतांत शिरला. ती फौज प्रांतांत

जिकडे तिकडे पसरून त्या प्रांताबाहेर जाणें अथवा आंत येणें अगदीं बंद होऊन गेलें. हैदर येवढा शहाणा व सावध होता खरा, पण फौज दूर आहे असें त्यास वाटलें होतें ह्यामुळें एवढी फौज एकदम चोहोंकडे पसरलेली पाहतांच तोही अगदीं चकित होऊन गेला. नंतर ही मोहीम बरेच दिवस चालली होती. तींत प्रथमच हैदराचा पराभव झाला. नंतर आपलें वस्तान पुन्हा बसविण्याकरितां त्यानें पुष्कळ श्रम केले; पण व्यर्थ गेले. शेवटीं मराठ्यांशीं तह करावा ह्याकरितां हैदराला पुष्कळ खंडणी कबूल करून त्यांस बत्तीस लाख रुपये रोख द्यावे लागले. नंतर मराठ्यांची दंगेखोर फौज म्हैसुरांतून निघून गेली. तसा हैदर पुन्हा दुसऱ्या राजांवर स्वाऱ्या करण्यास मोकळा झाला. पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यावर कालिकत म्हणून मोठें प्रसिद्ध शहर आहे. तेथील राजांस पूर्वी झामोरीन असें म्हणत असत. ह्या शहरावर हैदरानें ह्यावेळेस स्वारी केली. मागें पोर्तुगीज लोकांचा सरदार आलबुकर्क ह्यानें ह्या शहरावर हल्ला आणिला होता. त्यावेळेस त्या शहरच्या फौजेनें त्याजबरोबर बेतानें युद्धप्रसंग केला नाहीं. तरी त्यास त्रासवून मागें फिरविलें. हैदराच्या फौजेवरही सदरहू प्रमाणेंच कालिकतवाल्यांनीं हल्ला केला; परंतु हैदर शूर असून छातीचा सरदार होता. तो शत्रूनें आणिलेल्या सर्व अडचणींतून पार होऊन शहराच्या सन्निध आला. तेव्हां आतां आपलें कांहीं चालणार नाहीं असें पाहून झामोरीन आपल्या मंत्री मंडळीसह शहराबाहेर येऊन राहिला आणि हैदराशीं तहाचें बोलणें बोलूं लागला. तो हैदराच्या छावणींत गेला तेवेळेस हैदरानें त्याचा मान चांगला ठेविला. झामोरीन ह्यानें १९००००० रुपये खंडणी देण्याचें हैदराशीं कबूल केलें तेव्हां हैदरानें पुढें उपद्रव न करितां प्रांतांतून निघून जातों म्हणून सांगितलें. असा करार केला होता तरी हैदरानें कालिकत शहरावर हल्ला करून तें एकाएकीं घेतलें. खंडणीच्या ऐवजाचा भरणा झामोरीन ह्याजकडून सावकास होत होता तो जलदीनें करण्याकरितां हैदरानें झामोरीन व त्याचे सरदार ह्यांस प्रतिबंधांत ठेविलें आणि त्या सरदारांचे तर हाल हाल केले. ते हाल

म० १२ इ० स० १७६६

कालिकत स्वाधीन झालें.

प्र० १२ इ० स० १७६६ हैदराचें क्रूरत्व.

पाहून आपलीही अप्रतिष्ठा अशाच रितीची होईल असें झामोरीन ह्यास वाटल्यामुळें हैदरानें त्यास ज्या वाड्यांत कैदेंत ठेविलें होतें त्या वाड्याचे दरवाजे त्यानें चिणून टाकिले, आणि आंत आग लाविली. पुढें आग विझविण्यापूर्वीच राजा मरून गेला. त्याच्या पदरच्या कांहीं लोकांनीं त्याच आगींत उड्या घालून आपल्या राजाबरोबर प्राण दिले. लोकांवर अशा प्रकारचा जुलूम करून हैदरानें जय मिळविला. ह्यामुळें त्याजवर तेथेंच मोठें भयंकर बंड उत्पन्न झालें; आणि तें मोडण्याकरितां हैदरास कितीएकांचे जीव घ्यावे लागले व कितीएकांस म्हैसुरास नेऊन ठेवावें लागलें.

हैदरावर बंड झालें.

अशाप्रकारें हैदराचा जिकडे तिकडे जय होत चालला व त्यामुळें त्याचें सामर्थ्यही वाढत चाललें हें पाहून दक्षिण हिंदुस्थानांतील मोठमोठाल्या राजांसही भय पडलें. दक्षिणचा सुभेदार निजामअल्ली आणि मराठ्यांचा सेनापति माधवराव हे दोघे मिळून हैदरावर उठले. इंग्लिशांनीं निजामअल्लीच्या मदतीस फौज देण्याचें कबूल केलें. ही मदत इंग्लिशांनीं अमुक कार्याकरितां करावी असें स्पष्ट बोलणें झालें नव्हतें; तर निजामअल्लीच्या राज्याचा रास्त रितीनें बंदोबस्त करण्याकरितां मदत करारी असें मोघम ठरलें होतें; म्हैसूरच्या स्वारींत इंग्लिशांनीं निजामअल्लीस कुमक करावी इतकेंमात्र सर्वांस स्पष्ट समजलें होतें. त्यावरून त्या स्वारीच्या मसलतीकरितां निजामास भेटावें म्हणून कर्नल स्मिथ साहेब हैदराबादेस गेला. विचारानें पाहिलें असतां ह्या प्रसंगीं इंग्लिशांनीं निजामास मदत करण्याचें पतकरलें हें चांगलें केलें नाहीं. कारण मराठे एकटेच हैदराबरोबर लढण्यास समर्थ होते. सबब ते दोघेच लढते म्हणजे दोघेही जेर झाले असते आणि दोघांचेंही सामर्थ्य सारखेंच क्षीण झालें असतें. इंग्लिशांच्या कुमकेपासून एकाचा मोड होऊन दुसरा जबरदस्त व्हावा आणि त्यांच्यांतील समता मात्र नष्ट व्हावी असा प्रकार होता.

संकेत साक्षकारी फौजेची फुटाफुट.

सन १७६७ त मराठे, निजाम, आणि इंग्लिश ह्या तिघांच्या फौजांत हालचाल होऊं लागली. ह्या तिन्ही फौजा परस्परांशीं फुटून होत्या. निजाम आणि इंग्लिश ह्यांच्या फौजा तयार हो-

प्र० १२
इ० स०
१७६३

ण्यास एक महिना अवकाश होता. तोंच माधवरावानें आपल्या फौजेकडून म्हैसूर प्रांत व्यापून टाकिला. त्याच्या एकट्याच्याच फौजेबरोबर समोर उभें राहून लढण्याचें हैदराचें सामर्थ्य नव्हतें सबब धान्य जमिनींत पुरून टाकावें, विहिरींच्या पाण्यांत विष कालवावें, वैरण नाहींशी करून टाकावी, गुरें ढोरें डोंगरांत हांकून द्यावीं, अशा रितीनें शत्रूस उपद्रव देऊन कसें तरी त्यास माघारें हटवावें म्हणून हैदरानें बहुत युक्ति केल्या; पण सर्व व्यर्थ गेल्या. कारण हे लुटारू लोकही शहाणे आणि युक्तिवान पडले. त्यांनीं आपल्या घोड्यांचा काशांवर* गुजारा केला. त्यांनीं जमिनींत भाल्याचीं टोंकें खुपसून पहावें आणि जर खालीं दगड लागला किंवा वास आला तर येथें धान्य पुरलें आहे असें समजावें, मग तें धान्य उकरून काढावें आणि निर्वाह करावा, अशा प्रकारें धान्याची अडचण दूर केली. आतां गुरांविषयीं, तीं कोठेंही जरी हैदराच्या लोकांनीं नेलीं असलीं तरी मराठ्यांनीं माग लावावा आणि पकडून आणावीं. ह्या रितीनें गुरांचीही अडचण त्यांनीं दूर केली. अशा रितींनें मराठे मुलखांत तर शिरले आणि त्यांस माघारां हटविण्याची तर आपणाजवळ सामग्री अगदीं नाहीं असें पाहून हैदरानें असा निश्चय केला कीं, जो खर्च पडेल तो करून मराठ्यांना ह्या त्रिकुटांतून फोडावें. तेव्हां अपाजी राम म्हणून हैदराच्या पदरीं एक ब्राम्हण मुत्सद्दी होता त्याला तहाचें बोलणें करावयाकरितां हैदरानें माधवरावाकडे पाठविलें. तहाचें बोलणें लावण्याची हिकडची रीति निराळी आणि यूरोपखंडांतली रीति निराळी. माधवरावानें आपलें दरबार भरून तेथें त्या वकिलाला बोलाविलें, आणि त्याचें बोलणें ऐकून घेऊन त्याला जबाब दिला कीं, ज्या पुरुषानें आपल्या राजाला इतके नीच अवस्थेंत ठेविलें आहे त्याजबरोबर मी तह कधींही करणार नाहीं. माधवरावाचें बोलणें असें पडतांच लागलेंच सर्व सभेचेंही ह्या गोष्टीविषयीं अनुमोदन पडलें. त्या वकिलानें आपल्या राजाचा तो दोष पदरीं घेतला, आणि हळूच म्हणाला, हैदरअलीचा असा स्वभाव आहे

हैदराच्या युक्ति

त्याचें तहाचें बोलणें शेवटास गेलें.

* कुंदाच्या गवताच्या मुळ्या.

म० १२ इ० स० १७६७

कीं, त्याच्यापेक्षां जे श्रेष्ठ राजेरजवाडे आहेत त्यांनीं एखादी विरुद्ध गोष्ट केली कीं, तो लागलीच ती करितो. हें ऐकतांच हैदरानें जशी म्हैसूरच्या राजाची दशा करून टाकिली होती तशीच माधवरावानें शिवाजीच्या वंशांतील राजाची दशा करून टाकिली होती. ह्या गोष्टीचें सर्वांस स्मरण झालें. तेव्हां पूर्वी माधवरावाच्या म्हणण्यास जें सर्वांनीं अनुमोदन दिलें होतें तें एकीकडे राहून ते सर्व मनांत हसूं लागले, तेव्हां माधवरावानेंही मान खालीं घातली. नंतर लागलीच तहाच्या बोलण्याला सुरुवात झाली. तेव्हां पस्तीस लक्ष रुपये दिल्यास हा प्रांतही सोडून देतों व निजामाचा पक्षही अगदीं सोडून देतों असें माधवरावानें कबूल केलें. माधवरावाच्या म्हणण्याप्रमाणें त्याचा उद्देश शेवटास गेला. नंतर माधवरावाकडे तुम्ही आपल्या कराराप्रमाणें लढाईला तयार व्हावें अशी सुचना करण्याकरितां कर्नल ताद साहेब आला तेव्हां त्या सरदाराच्या तोंडावर दरबारचे सर्व लोक हंसले.

इंग्लिशांकडील वर्तमान.

हिकडे स्मिथ साहेब निजामाच्या सेनेसह वर्तमान म्हैसूर प्रांतांत शिरला. ही सेना तरी कोणत्याप्रकारची होती! तिच्याजवळ धड सरंजाम नव्हता, तिला धड पगार मिळत नव्हता, व लढाई कशी करावी हेंही तिला माहीत नव्हतें, ह्या सर्व गोष्टींवरून स्मिथ साहेबाच्या मनांत अशी शंका आली कीं ह्या स्वारीपासून कांहीं हशील होणार नाहीं. आणि खरोखरच ह्या मोहिमेचें जें स्वरूप पूर्वीं त्याच्या मनांत आलें होतें त्यापेक्षां ह्या वेळेस फारच भयंकर स्वरूप होण्याचा रंग दिसूं लागला होता. इंग्लिशांचा वरचष्मा पाहून त्यांच्या विषयीं निजामाच्या मनांत अनेक कारणांवरून फार वाईट आलें होतें. दिल्लीचा मोंगल जो सांप्रत केवळ नामधारी बादशाह होऊन बसला होता त्याजपासून इंग्लिशांनीं उत्तर सरकारें ह्या नावाचे जे चांगले प्रांत होते ते आपणास बक्षीस घेतले होते. महंमदअलीचा पक्ष धरून इंग्लिशांनीं त्यास करनटकची नवाबगिरी दिली होती. निजामाचें राज्य व पदवी हीं माशीं आहेत असा बूट महंमदअलीनें काढिला होता. आणि निजामास असें वाटत होतें कीं, इंग्लिश ही गोष्ट सिद्धीस नेण्यास गुप्तपणानें त्यास साधक आ-

त्यांच्या स्वेच्छाचा अविश्वासूपणा.

होत. इकडे हैदरअल्लीच्या दरबारांत मोफजखान नामें महंमदअ- ग्र० १२
ल्लीचा भाऊ होता. महंमदअल्लीला नवाबाचा अधिकार मिळा- इ० स०
ला होता तो मोफजखानाच्यानें पाहवत नव्हता; कारण एका भा- १७६७
वाचें बरें दुसऱ्या भावाच्यानें पाहवत नाहीं हें ह्या देशांत अगदीं साधारण आहे. तेव्हां महंमदअल्लीचा नाश करण्याकरितां मोफजखान म्हैसूरच्या संस्थानाला येऊन मिळाला होता. हैदरानें मोफजखानास, निजामाबरोबर गुप्तरूपें पत्रव्यवहार सुरू करावयास सांगितलें त्याप्रमाणें पत्रव्यवहार सुरू होतांच निजामाचें मन वळलें. मोफजखानाला त्यानें लिहून पाठविलें कीं, जे इंग्रज लोक आम्हांला हाताशीं धरून आपलें कार्य करून घेणार होते त्यांचें व महंमदअल्लीचें पारिपत्य करण्यासाठीं हैदर आणि आम्ही एक होऊन तुमचा राज्य मिळविण्याचा उद्देश खचीत शेवटास नेऊं. असा पत्रव्यवहार होऊन जे दोन राजे नुकतेच परस्परांस केवळ पाण्यांत पाहत होते तेच इंग्लिशांचा नाश करण्याकरितां एक झाले. अशा प्रकारानें निजामाची मसलत फिरली हें स्मिथ साहे- इंग्लिशांची
बाच्या नजरेस आलें आणि निजामही प्रामाणिक होता सबब त्याज- संकटावस्था.
कडूनही समजलें, आणि त्यावरून त्यांचा काय मनसोबा होता हें पुरतेपणीं स्मिथ साहेबाच्या लक्षांत आलें. स्मिथ साहेबानें हैदराच्या मुलखांत लांबपर्यंत प्रवेश केला होता हें त्याला माघारे येण्याविषयीं ह्या समयीं फारच प्रतिबंधक झालें. त्यानें निजामाला असें कळविलें कीं ह्या वेळेस माघारें जावें हें मला बरें दिसतें. माघारें जाण्याविषयीं त्यानें निजामाला कांहीं कारणेंही दाखविलीं होतीं. त्यावरून निजामानें ती गोष्ट कबूल केली आणि इतकें मात्र सांगितलें कीं तुम्ही आपलीं तीन पलटणें आम्हांजवळ ठेवावीं. स्मिथ साहेबानें हें म्हणणें मान्य करावें ह्याविषयीं वस्तुतः कांहीं कारण नव्हतें; परंतु केलें. ह्याप्रसंगीं निजामानें जसा आपला थोरपणा दाखविला तसा थोड्याच राजांच्या अंगीं दृष्टीस पडतो. तो असा कीं, इंग्लिशांच्या पांच टोळ्या खेरीज करून त्यांची बाकीची सर्व फौज त्यानें स्वस्थपणें जाऊं दिली, मागाहून त्या पांच टोळ्यांसही काडी इतका उपद्रव न देतां जाऊं दिलें आणि मग लढाई सुरू केली.

ग्र० १२ इ० स० १७६७ इंग्लिशांविरुद्ध जबरदस्त कट.

इंग्लिशांचा पराजय करण्यासाठीं हैदर आणि निजाम एक झाले. हे दोघेही बलिष्ठ होते. त्यांची फौज एकंदर ४३,००० स्वार, आणि २८,००० पायदळ इतकी होती. स्मिथ साहेबाची फौज सारी ६००० पायदळ आणि १००० स्वार इतकी होती. हे दोघे मिळून आपणावर हल्ला करणार असें पाहून घाटांतून ज्या मार्गांनीं करनाटकांत ते आपणावर येणार असें स्मिथ साहेबास वाटलें त्या मार्गांत मात्र त्यानें चांगला बंदोबस्त ठेविला होता. परंतु त्या प्रांताची त्याला चांगली माहिती नव्हती, ह्यामुळें हैदराच्या फौजेला येण्याला जे चांगले मार्ग होते तेच वेळेनुसार बंदोबस्ताखेरीज राहिले. हैदर आणि निजाम हे त्या वाटांनीं लागलेच येऊन स्मिथ साहेबाच्या सेनाव्यूहाच्या पिछाडीवर हल्ला करण्याची दहशत घालून त्यांनीं त्यास तत्काल माघारें पळविलें. हैदर आणि निजाम ह्यांनीं चंगमाजवळ त्याच्या फौजेवर हल्ला केला, परंतु त्यानें तो माघारा हटविला. ह्यावरून स्मिथ साहेबाचा अर्थात जय झाला. परंतु त्यांनीं त्याच्या फौजेच्या कोठींतून कांहीं थोडेसे तांदूळ लुटून नेले ह्यामुळें त्याला पराजय झाल्याप्रमाणेंच होऊन चिनोमालीस पोहोंचे तों रात्रंदिवस पळ काढावा लागला. ह्यानंतर या युद्धाचें स्वरूप फार भयंकर दिसूं लागलें. त्या ब्रिटिश सरदारानें दहा हजार फौज जमविली. तिजपैकीं बहुतेक युद्धाच्या कामांत तयार होती ह्यामुळें त्याचें वर्चस्व दिसलें. परंतु त्याचे घोडेस्वार थोडे होते व तेही चांगले नव्हते. आणि शत्रूचे तर उत्कृष्ट सडेस्वार होते. त्यांनीं चोहींकडे पसरून स्मिथ साहेबाच्या फौजेला अन्नाचा तोटा पाडिला आणि जेवढ्या जागेवर त्याची छावणी होती तिच्या पलीकडे बिलकूल त्याचा फिरक न होई असें करून टाकिलें. ह्याप्रमाणें हिकडे चाललें असतां हैदरअल्लीचा मुलगा टिपू, ज्यानें पुढें इंग्लिशांशीं अत्यंत हाडवैर बांधिलें तो ह्यावेळेस केवळ १७ वर्षांचा होता. तो पांच हजार स्वारांनिशीं मोठमोठ्या मजला करून मद्रासेजवळ जाऊन उतरला. आणि कितीएक इंग्लिश लोक वेड्यापाड्यांनीं आपआपल्या बंगल्यांत स्वस्थ असतां त्यांस त्यानें एकाएकीं जाऊन धरिलें. हिकडे हैदर व निजाम ह्या दोघांचा

कर्नल स्मिथ साहेबाचा निरर्थक जय.

टिपू.

वेत असा होता कीं त्या स्मिथ साहेबाच्या फौजेला अन्नाचा तोटा पाडून त्याची दुर्दशा करावी; परंतु इकडील चालीप्रमाणें लोकांनीं कांहीं पेंवांत धान्य ठेविलें होतें तें इंग्लिशांस सांपडलें ह्यामुळें त्यांचा तोड्याचा प्रसंग टळला. निजाम मूर्ख होता व उतावळाही होता, त्यानें असा आग्रह धरिला कीं धान्याचा तोटा पडून ह्या गोष्टीला काळ फार लागेल, सबब तसें करूं नये, तर एकदम लढाई सुरू करावी. आपलें पायदळ व स्वार हीं दोन्ही पुष्कळ आहेत. तेव्हां आपणास जय होईलच असें त्या उभयतांस वाटून त्यांनीं त्रिनोमाली येथें स्मिथ साहेबावर हल्ला आणिला. परंतु स्मिथ साहेबास डोंगराचा आश्रय सांपडला होता त्यामुळें तो पटकन आड झाला व त्याच्या तोफखान्याचें काम गोलंदाजांनीं फार चांगल्या रितीनें चालविलें ह्या दोन कारणांमुळें हैदर व निजाम ह्यांच्या एवढ्या फौजेचे सर्व श्रम अगदीं वायां गेले. ह्या राजांनीं फळ काढिला त्या वेळेस मोठा चमत्कार झाला. निजामाची अशी गैरशिस्त चाल होती कीं फौजेच्या पाठीमागें हत्तींची रांग उभी करावी. त्या चालीप्रमाणें ह्या वेळेसही त्यानें हत्तींची रांग उभी केली होती. ह्या हत्तींवर अंबाऱ्या व हौदे घालून त्यांत निजामाच्या राण्या मोठ्या डौलानें ह्या लढाईचा चमत्कार पाहण्याकरितां बसल्या होत्या. युद्धांत आपला मोड झालासें दिसलें तेव्हां हत्तींची रांग भरधांव काढावी म्हणून निजामाचा हुकूम झाला; परंतु अंबारींतून एक राणी असें म्हणाली कीं ह्या हत्तीला असें मागें फिरविण्याचें शिकविलें नाहीं, तर तो जरीपटक्याच्या मागें जातो. ह्या गोष्टीचा परिणाम असा भयंकर झाला कीं जरीपटका माघारा जाईपर्यंत कैक हत्ती पडले. राण्यांच्या मेळ्यामध्यें तर गोळ्या पूर्वीपासूनच जाऊन पडत होत्या.

प्र० १२ इ० स० १७६८

मग कर्नल स्मिथ साहेबाचा जय झाला.

अशा रितीचा अनर्थ झालेला पाहून इंग्लिशांचा नाश करून आपली भरभर करण्याचा जो निजामाचा उद्देश होता त्याजविषयीं तर त्याची निराशा झालीच ही एक गोष्ट आणि दुसरी गोष्ट अशी कीं हैदराचा व त्याचा जो साह्यसंकेत होता त्याप्रमाणें पुढें चालवावें न चालवावें अशी त्याच्या अंतःकरणांत दुग्धा उत्पन्न

निजामाचा अनिश्चय.

म० १२ इ० स० १७६८ त्यानें हैदराची मैत्री सोडिली.

झाली. पुढें अंबुराजवळ जी त्याची इंग्लिशांशीं लढाई झाली तींतही त्याला पुन्हा धक्का पोहोंचला व बंगाल्यांतून इंग्लिशांची कांहीं फौज येऊन तिनें त्याच्या मुलखांत स्वारी केली. ह्या दोन गोष्टींमुळें तर त्याचा निश्चय झाला कीं हैदराचा संबंध अगदीं सोडून देऊन इंग्लिशांशीं आपण एकट्यानें निराळा तह करावा. तो तह सन १७६८ त फेब्रुआरीच्या २३ व्या तारखेस झाला. ह्यावेळेस निजाम अडचणींत होता सबब तहाच्या कलमांत तरी त्याच्या मताप्रमाणें थोड्या गोष्टी होत्या. मोंगलांकडून इंग्लिशांस सरकार नांवाचे प्रांत मिळाले होते ते ह्या तहांत निजामापासून त्यांनीं आपणाकडे कायम करून घेतले. इंग्लिशांनीं त्यास दरसाल पांच लाख रूपये द्यावे असें ठरलें. हा पैसा ह्या प्रांतांबदल द्यावा असें नव्हतें, तर केवळ दोस्तीखातर त्यास मदती ऐवजीं द्यावा असें होतें. ह्या पैशांतूनही ह्या नुकत्या झालेल्या लढाईच्या खर्चाबदल दरसाल तीन लाख रूपयांप्रमाणें एकंदर पंचवीस लाख रूपये इंग्लिशांनीं कापून घ्यावे असा ठराव झाला होता. दुसरा असाही करार झाला होता कीं, इंग्लिशांनीं हैदराचा मुलूख घेतला असतां निजामानें त्यांस अगदीं हरकत करूं नये.

इंग्लिशसरकारच्या अविचाराचा हुकूम.

हा स्मिथ साहेबाला जय मिळाल्यामुळें मद्रास सरकारास मोठा उत्साह होऊन त्यांनीं त्या साहेबाला असा हुकूम पाठविला कीं हैदराचें मुख्यस्थान जें म्हैसूर त्यावरच स्वारी करून त्याचा अगदीं धुव्वा उडवावा, त्या सरदारानें सरकारास असें दाखविलें कीं, म्हैसुरावर स्वारी करणें असल्यास अगोदर बंगळुरावर हल्ला करून तें घेतलें पाहिजे; आणि बंगळुरा भोंतालचा मुलूख तर अगदीं डोंगरी व ओसाड आहे ह्यामुळें तेथें फौजेचा निर्वाहच होणें अशक्य आहे. सबब सरकारच्या हुकुमाप्रमाणें करण्यास अडचण आहे. ह्या स्वारीविषयीं स्मिथ साहेबानें आपला अभिप्राय असा दर्शविला कीं घाटाच्या खालचा मुलूख सुपीक आहे तो आपल्या ताब्यांत घेऊन त्यांत आपला अमल बसलासा झाला म्हणजे मग तेथून पुढें सर्व तजवीज बांधावी. ह्यावर कौन्सिलदारांनीं असें ठरविलें कीं दोन्ही गोष्टी एकदमच कराव्या. पण हें चांगलें

इंग्लिशसरकारचे अविचाराचे उपाय.

केलें नाहीं. नंतर त्यांनीं स्मिथ साहेबास बंगळुरावर जाण्याचा हुकूम केला, आणि कर्नलवूड साहेबास निराळी फौज देऊन त्याला स्मिथ साहेबाच्या सुचनेप्रमाणें, तळघाटचा मुलूख जिंकण्यास जाण्याचा हुकूम केला. ह्याच दोन अधिकाऱ्यांत त्यांनीं अशी योजना केली कीं एक मुख्य आणि एक मदतगार. परंतु हा विचार सुयुक्तिक नव्हता, कारण मदतगारापासून मुख्यास मदत न होतां उलटी त्याच्या कामाला वस्तुतः अडचण व्हावी असा ह्यापासून संभव होता. कौन्सिलदारांनीं अगदीं अयोग्य मनुष्य जो महंदअली त्याला इंग्लिश सरकारानें जिंकलेल्या मुलखाचे वसुलाचें काम सांगितलें. इतक्यांत मुंबईहून कांहीं फौज येऊन तिनें होनावर, मंगळूर आणि पश्चिमेच्या किनाऱ्यावरचीं आणखी कांहीं ठिकाणें घेतलीं त्यामुळें इंग्लिशांच्या लढाईच्या कामाला बळकटी आली. जो मुलूख जिंकण्याकरितां सरकारांतून वूड साहेबास पाठविलें होतें त्यांतील सर्व मुख्य मुख्य ठिकाणें घेऊन तो सर्व मुलूख त्यानें पादाक्रांत करून टाकिला. म्हैसूरचें राज्य हातीं लागण्याचीं किल्ली बंगळूर शहर होतें त्याच्या शेजारी जाऊन पोहोंचल्यावर स्मिथ साहेबानें त्याला वेढा घालण्याची तयारी केली ह्याप्रमाणें थोड्या दिवसांत हैदराचें अर्धें राज्य गेलेंच आणि त्याचें मुख्य स्थान जें म्हैसूर तेंही जातें अशी त्याला दहशत पडली. तथापि त्यानें आपली सर्व फौज प्रथम पश्चिमेकडच्या मुलखांत घातली तेथें त्याचा अमल पूर्ववत बसून त्यानें इंग्लिशांस सर्व ठिकाणांतून हांकून दिलें. नंतर मद्रासच्या फौजेबरोबर लढण्याकरितां त्यानें पूर्वेकडे मोहरा फिरविला. इकडे इंग्लिशांनीं पुष्कळ मुलूख जिंकून घेतला होता, परंतु तो त्यांच्याचकडे सतत राहील असा त्यांनीं बंदोबस्त केला नव्हता ह्यामुळें तो केव्हां जाईल हा अगदीं नियम नव्हता. निजाम इंग्लिशांकडे मिळाल्यामुळें अर्थात हैदराजवळची पुष्कळ फौज कमी झाली होती, परंतु त्याजवळ बाकी जी फौज होती तिचें सैनापत्य त्यानें स्वतां केल्यामुळें तेवढ्याच फौजेनें बहुतकरून दोन फौजांचें काम केलें. स्मिथ साहेबास असें निक्षून लिहून आलें होतें कीं, तुम्हीं बंगळुराला लौकर वेढा घालावा. कारण लढाईचा

प्र० १२ इ० स० १७६८

कांहीं वेळपर्यंत हैदराचा कंवची झाली.

करनल स्मिथ साहेबाचे शाहणपणाचे विचार.

प्र० १२ इ० स० १७६८

शेवट लष्कर होण्याचा उपाय तेवढाच आहे. त्यानें उत्तर पाठविलें कीं, हैदराची फौज पूर्वी जिंकल्याशिवाय बंगळुराला वेढा घालण्याचें अशक्य आहे व हैदरअल्ली असा शहाणा आहे कीं तो इंग्लिशांच्या लष्करा भोंवतीं मात्र स्वारी करितो, परंतु समोरासमोर उभें राहून लढण्याचा प्रसंग बुध्या टाळितो. इंग्लिश आपणापेक्षां फार बलिष्ठ आहेत असें त्याच्या ध्यानांत आल्यामुळें आपलें पुष्कळ नुकसान करून घेऊनहीं इंग्लिशांबरोबर तह करण्याची त्याची खुषी होती. आपल्या सरहद्दीवरचा बारामहाल नांवाचा मुलूख सोडून इंग्लिशांस देण्यास व लढाईच्या खर्चाबद्दल दहा लाख रुपये ही त्यांस देण्यास तो राजी होता. परंतु कौन्सिलांतील मुख्यांस आपला जय होईल अशी आशा अजूनही होती म्हणून त्यांनीं हैदरापाशीं द्रव्य मुलूख दोन्ही तो देत होता त्यापेक्षां पुष्कळ अधिक मागितलें, ह्यामुळें आपण लढाई चालवावी असा हैदराचा दृढ निश्चय झाला. कौन्सिलांतून कर्नल स्मिथ साहेबास लिहून गेलें कीं तुम्हांस कांहीं मसलत विचारावयाची आहे ह्याकरितां कर्नल वूड साहेबास तुम्ही आपलें काम सांगून मद्रासेस परत यावें. वूड साहेबानें तळघाटाचा पुष्कळ प्रदेश जलद अमलांत आणिला ह्यामुळें त्याची प्रतिष्ठा झाली होती खरी; परंतु तो हैदराबरोबर जेव्हां लढूं लागला तेव्हां ह्याचें अगदीं चालेनासें झालें. बंगळूर येथें हैदराच्या फौजेनें एकाएकीं गांठल्यामुळें वूड साहेबाचा मोठा घोंटाळा झाला आणि त्याला आपलें नुकसान करून पळून जावें लागलें. ह्यावेळेस मेजर फिट् जरलद साहेब कुमक घेऊन आला नसता तर वूड साहेबाचे फारच हाल झाले असते. फिट् जरलद साहेबानें सेनापतीचें काम आपण पाहूं लागून वूड साहेबास लागलेंच कैद करून मद्रासेस पाठविलें.

मद्रास सरकारचा अनिश्चयिन आशा.

स्मिथ साहेबास परत बोलाविलें.

कर्नल वूड साहेबाची नालायकी.

हैदराचा पूर्ण जय झाला.

इंग्लिशांची फौज बहुत दिवस मैदानांत पडून राहिली होती, तेथें अन्नाचा बंदोबस्त चांगला नव्हता व हवाही चांगली नव्हती, ह्यामुळें ती अगदीं जर्जर झाली होती. हैदराला एकामागून एक कुमका मिळतच होता यावरून त्यानें इंग्लिशांवर मोठा भयंकर हल्ला करण्याचा बेत केला. तो हल्ला इंग्लिशांच्या समोर उभें

राहून करावयाचा नव्हता, तर डोंगरांतून फिरतां फिरतां करावयाचा होता. त्याचा सेनापति व तो ह्यांस घाटांतील वाटांची माहिती चांगली होती. घाटाखालीं कोईमतूर व बारामहाल हे प्रांत होते, त्यांत हे दोघे एकामागून एक उतरले. हेच दोन प्रांत इंग्लिशांनीं जिंकून घेतल्यामुळें ते अगदीं फुगून गेले होते. कंपनीची फौज फुटून लहान लहान टोळ्यांनीं चोहोंकडे पसरली होती. त्यांच्या जागा बचाव होण्यासारख्या नव्हत्या. ह्यामुळें फारसा युद्ध प्रसंग न होतां त्या एकीमागून एक अशा सर्व हैदराच्या हातीं लागल्या. कितीएक ठाणीं नेटीव जमादारांनीं इंग्लिशांचा विश्वासघात करून हैदराच्या स्वाधीन केलीं. ह्याप्रमाणें इंग्लिशांस जेवढा मुलूख जिंकल्याचा डौल वाटत होता तेवढा सर्व दीड महिन्याच्या आंत त्यांजपासून हैदरानें परत घेतला. ह्यावेळेस कप्तान निक्सन साहेबाच्या हाताखालीं एक टोळी होती ती मोठ्या शौर्यानें लढली. तरी शेवटीं तिला हैदराच्या सर्व फौजेनें वेढून बहुतकरून ती अगदीं धुळीस मेळविली. नंतर हैदरानें एरोडावर स्वारी केली. तें कप्तान आर्तन ह्याच्या स्वाधीन होतें. हैदरानें त्यास लिहिलें कीं तुम्ही आमच्या छावणींत आला असतां तुम्हास कांहीं दगा व्हावयाचा नाहीं. हा सरदार त्या गोष्टीचा विचार न करितां एकदम हैदराच्या स्वाधीन झाला. विक साहेब म्हणतो, आर्तन ह्यानें ह्या वेळेस विचार केला नाहीं ह्याचें कारण, तो पूर्वी एक वेळ हैदराकडे भोजनास जाऊन त्याचा हैदराशीं परिचय पडला होता असें वाटतें. असें म्हणतात कीं, हैदराचा हा मोठा बाणा होता कीं कांहीं तरी आधाराखेरीज आपलें वचन मोडावयाचें नाहीं. मग तो आधार सरासरी असला तरी चिंता नाहीं. ह्या वेळेस हैदराला वचन मोडण्याला अशी एक संधी सांपडली होती कीं, रामिन्सन नांवाचा कोणीएक कप्तान इंग्लिशांच्या फौजेंत होता तो हैदराजवळ पूर्वीं कैदी होता आणि हैदरानें त्याला केवळ वचनावर मोकळें केलें होतें. परंतु तो आपलें वचन मोडून इंग्लिशांच्या फौजेंत पळून गेला होता. ह्या सबबेवरून हैदरानें आर्तन साहेबास अटकावून ठेविलें व त्याजवर कांहीं जुलूम करून व कांहीं द-

प्र० १२ ह० स० १७६८

कप्तान आर्तन साहेबाचा मूर्खपणा.

प्र० १२ इ० स० १७६२

हशत घालून यापासून राबिन्सन ह्यास हुकूम लिहून घेतला, कीं त्यानें एरोडचा किल्ला हैदराचे स्वाधान करावा. हा हुकूम पाहतांच राबिन्सन ह्यास वाटलें कीं, हा हुकूम तोडतां कामास नये. कावेरीपुरम येथील शिपाई लोकांवरोवर जो करार केला होता तो ह्याच कारणावरून हैदरानें मोडिला व त्यांस श्रीरंगपट्टणास पाठवून देऊन तेथें तुरुंगांत टाकिलें आणि त्यांचे पराक्राटेचे हालही केले.

हैदराचा जय होत चालला.

ह्याप्रमाणें हैदराचा जय होत चालला होता ह्या वेळेस त्यानें इंग्लिशांच्या सेनाव्यूहाच्या पृष्ठभागास दहशत देण्याचा आरंभ केला. इंग्लिशांस आज पावेतों आपला जय होईल असा पक्का ग्रह होता; पण ह्या वेळेस पाहतात तों आपल्या कोट्या व ठाणीं हीं सर्व हैदराच्या हातीं पडतात असें दिसलें. त्यांचा गर्व परिहार होऊन त्यांनीं कप्तान ब्रूक साहेबास हैदराबरोबर तह करण्याकरितां पाठविलें. हैदरानें त्याचा फार चांगला आदर केला आणि आपल्या मनांतल्या गोष्टी मोकळेपणानें त्याजपाशीं सांगितल्या. हिंदुस्थानांतील राजे लोकांची परस्परांशीं युद्धें चालू असलीं म्हणजे असें मोकळें मन राहणें फार कठीण आहे. तो म्हणाला, माझी अशी फार इच्छा होती, कीं ब्रिटिशांवरोबर आपलें सख्य असावें, परंतु ही गोष्ट त्यांनीं व त्यांचा एक अप्रयोजक संकेत साह्यकारी महंमद अली ह्यानें मोडिली; आम्हांकडून कांहीं मोडिली नाहीं. माझी स्वार्थदृष्टीच ही इच्छा उत्पन्न होण्याचें कारण होतें व हें करण्याचा मुख्य उद्देश हा होता कीं, मराठे नेहमीं आमच्या देशांत स्वाऱ्या घालतात आणि त्यांची नेहमींची येण्याची वेळ आतां अगदीं येऊन ठेपली आहे ह्या सर्व गोष्टी त्या वकिलापाशीं त्यानें कबूल केल्या. तो ब्रूक साहेबाजवळ स्पष्ट बोलिला कीं मराठे आणि इंग्लिश ह्या दोघांवरोवर एकदम लढण्याचें माझें सामर्थ्य नाहीं. ह्याकरितां अशा अढचणीच्या प्रसंगीं युरोपियन शत्रूंशीं लढाई करण्याकरितां मराठ्यांशीं सख्य करावें हें चांगलें आणि ही व्यवस्था करण्याविषयीं मला कठीण पडावयाचें नाहीं. तो ब्रूक साहेबाला आणखी असें म्हणाला, तुम्ही कौन्सिलदारांस साफ सांगा कीं, त्यांस मजवरोवर सख्य किंवा शत्रुत्व काय करणें असेल तें ज-

कप्तान ब्रूक साहेबास काम सांगितलें.

हैदरानें मोकळ्या मनानें सर्व गोष्टी कबूल केल्या.

लद करावें, विलंब लावूं नये. कौन्सिलदारांस हें समजतांच त्यांनीं अंद्र साहेब म्हणून त्यांचा मोठा भरंवशाचा माणूस होता त्याला हैदराकडे पाठविलें, परंतु अजूनही त्याची उडी मोठी होती ह्यामुळें लढाई पुन्हा सुरू झाली. स्मिथ साहेब पुन्हा सेनापतीच्या कामावर येऊन त्यानें लुटारू हैदरास मागें हटविलें. तथापि हैदरानें छाती करून एक मोठें अचाट काम करण्याचें योजिलें. सहा हजार स्वार आणि दोनशें पायदळ इतक्या निवडक फौजेसहवर्त्तमान सुमारें सत्तर कोस जमीन चार दिवसांत चालून जाऊन मद्रासेच्या अलीकडे तीन कोसांवर तो दाखल झाला. ही स्वारी एकाएकीं पाहतांच इंग्लिशांस मोठा अचंबा वाटला. आपल्या मोठेपणाविषयीं जो त्यांस अभिमान होता तो अगदीं गलित झाला आणि आपला बचाव कसा होतो अशी त्यांच्या पोटांत मोठी भीति उत्पन्न होऊन ते अगदीं निराश झाले. मद्रासच्या किल्ल्याचा बचाव करण्याकरितां इंग्लिशांनीं आपली फौज परत बोलाविली असती तर ती वेळेस येऊन सहज पोंचली असती. त्यांस भीति दोन गोष्टींची होती; एक हैदर त्यांची खेड्यांपाड्यांतील ठाणीं लुटील व दुसरी शहरांत लूट करील. त्यांतही ही दुसरी गोष्ट घडेल नघडेल ह्याविषयीं संशयच होता. परंतु लढाईची कांहींच तजवीज न करितां हैदरानें त्यांजपाशीं ज्या गोष्टी मागितल्या त्या करण्यास ते एकदम कबूल झाले. त्या गोष्टी अशा कीं स्मिथ साहेब फौजेसुद्धां म्हैसुरावर जात आहे त्यास पुढें न जाण्याचा हुकूम व्हावा. गवर्नराचें काम दुप्री साहेबास देण्याचा ठराव झाला आहे, तो भाल्याबरोवर त्यानें संधी करण्यास आरंभ करावा. हैदर तहाला तयार होता ह्यामुळें विलंब लागला नाहीं व अडचणही पडली नाहीं. हा तह सन १७६९च्या एप्रील महिन्यांत झाला. त्यांतील ठराव असा कीं, लढाई सुरू होण्यापूर्वी जो ज्याचा मुलूख होता तो त्याजकडे रहावा. हैदरानें असें मागितलें कीं, दुसऱ्यावर स्वारी करणें अथवा त्यापासून बचाव करणें ह्या दोन्ही गोष्टींविषयीं तुमचा आमचा साह्यसंकेत असावा. इंग्लिशांनीं त्यांपैकीं दुसऱ्यापासून बचाव करण्याविषयीं साह्य करण्याचें मात्र पतकरिलें. परंतु ज्या अडचणींत आपण सांपडूं नये

प्र० १२ इ० स० १७६९

कर्नल स्मिथ साहेबास पुन्हा कामावर पाठविलें.

हैदराचें साहस कृत्य.

कौन्सिलानें हैदराचें बोलणें जतावळीनें कबूल केलें.

प्र० १२ इ० स० १७६९

म्हणून दुसऱ्यावर स्वारी करण्याविषयीं आम्ही मदत करणार नाहीं असें ह्यांनीं आपणास सोडविलें होतें त्या अडचणींत ते येवढ्याच कबुलातीवरून सांपडले असें त्यांस मागून दिसलें.

हैदराचें मराठ्यांशीं युद्ध.

ह्याप्रमाणें इंग्लिशांचा आणि हैदराचा तंटा होता तो त्यानें मिटविला. ह्या कामांत त्याची प्रतिष्ठा झाली व नफाही झाला. हैदराला आतां मराठे हे इंग्लिशांपेक्षां भयंकर शत्रु राहिले होते, त्यांजबरोबर लढण्याविषयीं त्याला हुशारी आली. माधवराव मोठ्या फौजेनिशीं हैदराच्या मुलखांत शिरला. असें म्हणतात कीं ह्यावेळेस माधवरावाची फौज हैदराच्या फौजेच्या दुप्पट तरी निदान होती, आणि तिजवरील सरदारही निष्णात होते. ह्यावेळेस दुसऱ्यांदा मुलूख ओसाड पाडून मराठ्यांस हटविण्याचा हैदरानें यत्न केला. परंतु ते पूर्वीप्रमाणेंच सर्व अडचणींतून पार पडले, आणि तो प्रांत जिंकावयाचाच बेत करून एकामागून एक मोठमोठीं

मराठ्यांचा क्रूरपणा.

ठाणीं घेऊन अत्यंत क्रूर कर्म करीत चालिले. एके किल्ल्यांतील फौज मोठ्या निकरानें लढली म्हणून त्या निर्दय सेनापतीनें म्हणजे माधवरावानें तेथल्या त्या शिपाई लोकांचे नाक कान कापून टाकण्याचा हुकूम केला, आणि तेथील किल्लेदारास बोलावून विचारिलें, कीं अशा रितीचें शासन तुला व्हावें हें तुला यथार्थ दिसतें कीं नाहीं? त्यानें उत्तर केलें, कीं महाराज, व्यंग होईन मी, पण अप्रतिष्ठा होईल तुमची. ह्या उत्तराचा खरेपणा माधवरावाच्या मनांत असा बिंबला कीं त्या किल्लेदारास शासन न करितां त्यानें माघारां लाविलें.

व्यंबकराव मामास कांहीं दिवस अधिकार मिळाला.

पुढें माधवरावाची प्रकृति अतिशयित बिघडल्यामुळें लढाईचें काम व्यंबकराव मामावर सोंपणें त्याला भाग पडलें. हैदरानें त्या मामावरोबर लढण्याचा निश्चय करून आपल्या लष्कराभोंवतीं मोरचेबंदी केली. हैदरानें जी जागा नेमिली होती तिच्या भोंवतालीं डोंगरांचा परिघ होता. व्यंबकराव मामानें त्या छावणीवर जाऊन हल्लाच मात्र केला नाहीं, पण दररोज तोफांचा असा भडिमार चालविला होता कीं शेवटीं हैदरानें आपल्या राजधानीच्या शहरास पळून जाण्याचा निश्चय केला. रात्र होतांच हैदर तेथून

निघाला; मनांत कीं उजाडण्यापूर्वी शत्रूच्या टप्यांतून बाहेर जावें परंतु त्याच्याच पदरच्या एका सरदारानें अविचारानें वार काढिला त्यामुळें त्याची ती मसलत फुटली आणि मराठ्यांचें घोडेस्वार त्याच्या पाठीस लागले. ह्यानंतर मोठा विलक्षण चमत्कार झाला. हैदराच्या फौजेवर तर मोठा बाणीचाच प्रसंग गुदरला होता तरी तो नेहमींप्रमाणें कैफाच्या तारेंत अगदीं गुंग होऊन पडला होता. त्याला हें कैफाचें अगदीं व्यसनच लागून गेलें होतें. आणि ह्याच व्यसनामुळें फौजेवर देखरेख करण्याला तो अगदीं योग्य नव्हता. अशा प्रसंगीं त्याचा मुलगा टिपू त्याच्या दृष्टीस पडला, त्याला त्यानें पराकाष्ठेची शिवीगाळ केली, आणि मग एक दांडकें हातांत घेऊन त्याला अशा जोरानें ठोकलें कीं आळ दिवस होऊन गेले तरी टिपूच्या आंगावरचे त्या माराचे वळ बुजाले नाहींत. टिपू रागानें जळजळत आपल्या तंबूंत गेला आणि आंगरखा, पागोटें, आणि तरवार, हीं जमिनीवर फेंकून देऊन म्हणाला, "बाबानें आपणाकरितां पाहिजे तर लढावें, मी तर ईश्वराची आणि ईश्वराच्या पैगंबराची शपथ वाहतों कीं आज मी तरवार खचीत उपसणार नाहीं." असें होतांच फौजेचा विचार फौजेवर च पडला. तेव्हां ते लोक लागलेच चोहींकडे चार पळून गेले. आणि मराठे लूट करण्यांत गुंतले होते, इतक्यांत हैदर एका चलाख घोड्यावर स्वार होऊन एकटाच श्रीरंगपट्टणास जाऊन पोहोंचला, मागून टिपूनें अगदीं गरीब रितीचा पोषाक करून शत्रूच्या फौजेपाशीं वाट मागितली, आणि तींतून बाहेर पडून जाऊन तोही तेच दिवशीं रात्रीं आपल्या शहरांत पोहोंचला.

प्र० १२ इ० स० १७६९ हैदर पळून गेला.

त्याचें कैफाचें व्यसन.

त्याच्या फौजेचा अगदीं मोड झाला.

व्यंकटराव मामानें लागलीच त्या शहरावर स्वारी केली. आणि असा रंग दिसला कीं जें राज्य हैदर आजपावेतों बळकावून बसला होता त्या राज्याचा आतां व्यंकटराव मामा अगदीं फडशा पाडितो. परंतु इतक्या बळकट किल्ल्याला वेढा घालण्याजोगें चातुर्य मराठ्यांच्या आंगीं नव्हतें. एक महिनाभर पर्यंत दररोज तोफा सोडाव्या असें चाललें होतें, पण त्यापासून कांहीं फळ झालें नाहीं. हैदराचें जें कांहीं कमी पडे त्याचा बंदोबस्त तो नेहमीं

इ० स० १७६९ जातीनेंच करीत होता. नंतर मराठ्यांच्या पिछाडीवर हल्ला करण्याकरितां हैदर निघाला आणि त्यास त्या गोष्टींत यशही आलें. पुढें दीड वर्षपर्यंत इकडे लढाई करावी तिकडे लढाई करावी अशा रितीनें मराठ्यांस त्रास आणिल्यावर शेवटीं हैदरानें जें कबूल केलें तेवढ्यावरच तह करण्यास ते राजी झाले. तीं कबुलात अशी कीं हैदरानें आपल्या राज्यांतील उत्तरेकडचा पुष्कळ मुलूख त्यांस द्यावा, पंधरा लाख रुपये रोख द्यावे आणि पंधरा लाख मागून द्यावे. ह्या शेवटल्या कलमाची मातबरी हैदर पुरती जाणून होता. ह्या लढाईच्या संबंधानें थोडासा अप्रस्तुत विषय सांगणें आहे तो सांगतों.

म्हैसूरचे राज्याचें रक्षण करण्याविषयीं हैदराला मदत करण्याचा इंग्लिशांचा मागें ठराव झाला असतां त्यांनीं ह्या लढाईंत त्याला मदत अगदीं केली नाहीं. ही लढाई संपल्यानंतर कंपनीकडून तिच्या मुख्य अधिकाऱ्यास लिहिणें आलें, त्यांत कर्नाटकच्या लढाईमध्यें त्यांनीं हात घातल्याबद्दल त्यांस मोठा दोष लाविला होता. आणखी असें लिहिलें होतें, कीं जो साह्य संकेत केला असतां आपणास लढाईचा प्रसंग पडेल तो कधींही करूं नये व विशेषेंकरून हैदर किंवा दुसरा कोणी नेटीव राजा ह्यास तारवांची किंवा फौजेची मदत तुम्हीं बिलकूल करूं नये. कौन्सिलानें ह्या गोष्टी अमलांत आणिल्यास वरेंच, पण न आणिल्यास त्याच्यावर दाब ठेवावा. ह्याकरितां सरजान लिंदसे ह्या साहेबास कुलअखत्यार देऊन त्यास प्रधानादाखल इकडे कंपनीनें पाठविलें. तथापि हा साहेब थोडक्याच दिवसांत आपल्या अखत्यारीच्या बाहेर गेला आणि करनाटकचा नवाब महंमदअल्ली ह्याजबरोबर त्याचा अत्यंत स्नेह होऊन हैदराला बुडविण्याविषयीं मद्रास सरकारानें मराठ्यांस मदत करावी असें महंमदअल्ली म्हणतच होता त्याप्रमाणें हा साहेबही म्हणूं लागला. तथापि आपण केलेला तह धडधडीत मोडणें हें फार वाईट असें वाटल्यावरून कौन्सिलदारांनीं तें म्हणणें ऐकिलें नाहीं; परंतु कौन्सिलदारांनीं ठराव केला एक आणि लिंदसे साहेबाचें म्हणणें पडलें एक, त्या-

कौन्सिलदारांत मतभेद.

मुळें इंग्लिशांच्या वर्तणुकींत अगदीं धरसोड झाली. कोर्तआफ् डैरेक्तरांकडे लिंदसे साहेबाच्या कामाची हकीकत लिहून गेल्यानंतर त्यांनीं त्याला काढून त्याच्या कामावर आरमाराचा अधिपति अदमिरल हारलांद ह्यास नेमिलें आणि लिंदसे ह्याची कौन्सिलाशीं चकमक झडली तशी तुमची झडूं नये अशा प्रकारचें हारलंद साहेबास लिहून पाठविलें. परंतु तें सर्व एकीकडे ठेवून अगदीं पूर्वीच्या अधिकाऱ्यांप्रमाणेंच मनास आलें म्हणजे सल्ला करावा मनास आलें म्हणजे इंग्लिशांस लढाई करण्याविषयीं तसदी लावावी असें तो साहेब करूं लागला. शेवटीं कौन्सिलावर दाब ठेवण्याकरितां निराळा एक वरोबरीचा अधिकारी नेमण्याचा हा उपाय चांगला नाहीं असें पाहून कोर्तानें तो सोडून दिला. आणि कंपनीच्या ताब्यांत हल्लीं जितका मुलूख आहे त्यापेक्षां अधिक मिळविण्याची तिची इच्छा बिलकूल नाहीं. आणि उलटें असें आहे कीं कोणाच्या खटल्यांत न पडतां अगदीं उदासीनपणानें हिंदुस्थानांत असावें ह्या दोन गोष्टी कौन्सिलाच्या मनांत कोर्तानें* पक्केपणीं ठसवून दिल्या. अस्तु. प्र० १२ इ० स० १७६९

इंस्ट इंदिया कंपनीचे विचार.

मागें हैदराचा आणि मराठ्यांचा तह झाला म्हणून लिहिलेंच आहे. त्यानंतर मराठ्यांची स्वारी परत जाऊन हैदर मोकळा होतांच आपला गेलेला मुलूख माघारा घेण्याविषयीं त्यानें जबरदस्त उद्योग चालविला. प्रथम त्यानें मलबार किनाऱ्यावरचा मुलूख घेण्याचें योजिलें. त्या किनाऱ्याशीं दळणवळण ठेवणें तर कुर्ग प्रांतांतूनच ठेवावें लागत असे. कारण तो प्रांत म्हैसूरच्या आणि मलबार किनाऱ्याच्यामध्यें आहे. हैदरानें त्या मुलखावर एकाएकीं स्वारी केली ह्यामुळें तेथें शत्रूची कांहीं एक तयारी नाहीं असें त्यास आढळलें. त्यानें ह्या ठिकाणीं पराकाष्ठेचेंच क्रूर कर्म केलें. तें असें कीं, जो कोणी एक शीर कापून मजपुढें आणील त्याला पांचरुपये बक्षीस मिळेल, असा प्रसिद्धपणें जाहीरनामा लावून आपली ही जयाची निशाणी येईल तिजबदल आणणारांस बक्षीस वांटण्याकरितां तो आपण जातीनें बसला. तें हैदराची मलबाराबर स्वारी

पराकाष्ठेचा क्रूरपणा.

* कोर्त आफ् डैरेक्तरांनीं.

प्र० १२ इ० स० १७७२

शिरें आणण्याचें काम सुरू झाल्यानंतर सातशें मस्तकें येऊन पडलीं तावत्कालपर्यंत त्यास दया आली नाहीं. नंतर दोन मस्तकें सुरूप चेहऱ्याचीं आलीं तीं पाहून मात्र हैदराला अत्यंत दया आली आणि त्यानें ती कत्तल अगदीं बंद करण्याचा हुकूम केला. कुर्ग प्रांत हैदराच्या हातीं आला. मागें हें राज्य प्रबळ होतें, परंतु घरांतल्या तंट्यामुळें अगदीं अव्यवस्थित होऊन गेलें होतें. मग बाहेरच्या शत्रूला कांहींच तेथच्या लोकांच्यानें अडफांटा आणवला नाहीं. ह्यानंतर मराठ्यांनीं हैदराचा पुष्कळ प्रांत घेतला होता तो परत घेण्याची तजवीज तो योजूं लागला. इतक्या अवसरांत मराठ्यांचें राज्य प्रबल असतां त्यांतही कांहीं अव्यवस्था झाली. ही गोष्ट हैदराला फारच हितावह झाली. सन १७७२ त थोरले माधवराव मेल्यानंतर थोडक्याच काळानें रघुनाथराव, ज्यास राघोबादादा असें म्हणत असत, तो पेशव्यांच्या गादीवर बसला. परंतु त्याचा त्या राज्यावर अधिकार सर्व रयतेनें कबूल केला नाहीं. तेव्हां हीच संधी पाहून हैदरानें मराठ्यांस मागील तहांत जो मुलूख तोडून दिला होता तो आतां परत घ्यावा ह्या बेतानें त्या मुलखांत बेलाशक स्वारी केली. हैदरापासून त्या मुलखाचें रक्षण करण्याकरितां राघोबा दादा जलदी करून आला, परंतु इकडे येतांच त्याच्यावर दुसरें मोठेंच बंड झालें त्यामुळें त्यास माघारां जाण्याचा प्रसंग आला, तेव्हां राघोबा दादानें कृष्णा नदीच्या दक्षिणेचा सर्व मुलूख हैदराला देऊन त्याच्याशीं तह केला आणि मग तो त्या बंडाकडे निघून गेला, तों त्याच बंडात त्याच्या अमलाची अखेरी झाली. पुढें हरीपंत फडके हे राघोबा दादास पदच्युत करणाऱ्या मंडळीचे प्रमुख होते, सबब त्यांजबरोबर फौज देऊन सर्वांनीं त्यासच म्हैसूर प्रांतावर पाठविलें. तो सरदार त्या प्रांतांत शिरला; परंतु त्याच्या फौजेंतील एका टोळींत हैदरानें फितूर केला ह्यामुळें त्याचा सर्व यत्न निष्फल होऊन त्यास गेल्याप्रमाणें परत यावें लागलें.

माधवरावाचा मृत्यु.

हैदरअल्ली हा मोठा मेहनती होता. राघोबाबरोबर तह झाल्यानंतर दुसऱ्या कितीएक स्वतंत्र संस्थान्यांबरोबर लढाया करूं लागला. त्या संस्थान्यांपैकीं कितीएकांचे किल्ले हैदराच्या आणि

मराठ्यांच्या सरहद्दीवर होते, व किर्ती एकांचे त्याच्या मुलखांत होते. मोठमोठ्या किल्ल्यांपैकीं गुटी नांवाचा एक किल्ला होता तो मुरारराव म्हणून एक मोठा लुटारू मराठा सरदार होता त्याच्या स्वाधीन होता. ह्या सरदारानें इकडे मागें मोठमोठ्या लढाया करून लौकिक मिळविला होता. त्या किल्ल्याच्या तटबंदीच्या पोटांत पुष्कळ डोंगर सांपडले होते. किल्ल्याच्या खालचीं ठाणीं हैदराच्या हातीं लागलीं, परंतु तो किल्लाच घेण्याकरितां आला तेव्हां किल्लेदार मोठ्या निश्चयानें लढले, ह्यामुळें किल्ला हातीं लागला नाहीं; तेव्हां पुष्कळ पैसा दिल्यास हैदर तह करितो असें झालें. नंतर मुरारराव्यानें हैदराकडे एक गृहस्थ ओलीस पाठविला त्या गृहस्थाची मानमान्यता हैदरानें फार चांगली राखल्यावरून मुरारराव शरण आला, ह्याचें कांहीं गुप्त कारण होतें तें तो गृहस्थ हैदरापाशीं बोलून गेला; तें असें कीं किल्ल्यांत आतां तीनच दिवसांपुरतें पाणी शिलक आहे. हैदरानें त्यावेळेस तिकडे लक्ष दिलें नाहीं. परंतु मग तहनाम्यांतील कलमांत कांहीं दोष आहे असें कुभांड करून त्या किल्ल्याला पुन्हा वेढा दिला, तेव्हां अर्थातच मग तो सांगेल तें ऐकून किल्ला स्वाधीन करणें मुरारराव्यास भाग पडलें. हा किल्ला मिळाल्यावर चितलदुर्ग येथेंपाळेगार होता त्यावर स्वारी केली. त्या राजानें हैदराचें पूर्वी कांहीं चालूं दिलें नाहीं. त्याचे रयत लोक मोठे रणशूर व धर्मभोळे होते. त्यांस बेरड असें म्हणत असत. त्यांनीं किल्ल्यांत एका अत्युच्च स्थानावर कालीचें देऊळ बांधिलें होतें. हिंदु लोक ह्या देवीस संहारकारिणी असें मानितात. यावत्कालपर्यंत कालीची सेवा आमच्या हातून यथार्थ होत आहे तावत्कालपर्यंत हा किल्ला जाण्याचें भय नाहीं असा त्या लोकांस पूर्ण भरंवसा होता. दर सोमवारीं प्रातःकाळीं मोठ्या समारंभानें त्या देवीची पूजाअर्चा नेहमीं होत असे त्याप्रमाणें ह्या लढाईच्या वेळेस पूजा झाल्यानंतर मोठ्यानें शिंग फुंकून सर्व शिपाई लोक आपआपल्या जिवाकडे न पाहतां मोठ्या आवेशानें शत्रूवर चाल करून निघाले. त्यांच्या मनांत असें होतें कीं शत्रूच्या लोकांचीं मस्तकें कापून आणून त्या संहारकारिणी देवीच्या भयं-

म० १२ इ० स० १७७२

गुटीचा वेढा.

हैदरानें आपलें वचन मोडिलें.

पाळेगार.

प्र० १२ इ० स० १७७२

कर स्थानापुढें मनोऱ्याप्रमाणें त्यांच्या राशी घालाव्या. हल्ला करण्यापूर्वी शत्रूस आम्ही अमुक वेळेस हल्ला करितों अशी सूचना देण्याची कोणाचीच चाल नाहीं. तथापि त्या लोकांनीं हैदरास सूचना दिली, आणि मोठ्या आवेशानें अनेक स्थळीं एकदम हल्ला करून देवीला ज्याप्रमाणें बली द्यावयाचे त्यांच्या मनांत होतें त्याप्रमाणें दिलें. ह्यावेळेस हा किल्ला हैदराच्या हातीं आला नाहीं. कारण, मराठे हैदरावर आल्यामुळें तो वेढा काढणें त्यास भाग झालें. तथापि पुढें दुसऱ्यानें वेढा घातल्यावर तो किल्ला त्याच्या हातीं आला. त्यावेळेस देवीपुढें दोन सहस्र शिरांच्या राशी पडल्या होत्या त्या सर्वांच्या दृष्टीस पडल्या. ह्यावेळेस तरी काय! फितूर झाला तेव्हां कालीच्या मंत्राचें सामर्थ्य नष्ट झालें. असें मानावें लागलें. शेवटीं चितलदुर्ग किल्ला असा अजेय असतां त्यांत शत्रूंस प्रवेश करूं देणें त्या किल्लेदाराला भाग पडलें.

हैदराचा इंग्लिशांवरोबर बेवनाव.

इंग्लिशांविषयीं हैदराच्या मनांत फार जळत होतें. त्यांचा आणि आपला साह्यसंकेत असावा ह्याविषयीं त्यानें इंग्लिशांचें फार आर्जव केलें, हें मागें सांगितलेंच आहे. हें त्याचें म्हणणें आपल्या कार्याकरितां होतें ह्यांत संशय नाहीं. तथापि त्याचें म्हणणें वाजवी होतें, कीं मराठे जबरदस्त आहेत तर त्यांच्यापासून बचाव करण्यासाठीं परस्परांनीं परस्परांस मदत करावी. त्यावर आलीकडे मराठ्यांनीं म्हैसुरावर स्वारी केली त्यावेळेस हैदराचें राज्य राहतें किंवा नाहीं ही देखील बहुत दिवसपर्यंत भ्रांति होती. हें सर्व कृत्य इंग्लिश लोक पाहत असतां व त्यांचा साह्य करण्याचा ठराव असतां त्यांनीं त्याचें संकट दूर करण्याविषयीं कांहींच साह्य केलें नाहीं. ह्यामुळें त्याला फारच वाईट वाटलें. इंग्लिशांच्या मदतीपासून आपला नफा होईल ही आशा त्यानें मग अगदीं ठेविली नाहीं. आणि दुसऱ्याही-सर्व आशा सोडून देऊन इंग्लिशांच्या नाशाचा उपाय पाहूं लागला. इकडे मराठ्यांच्या दरबारांतही मोठा फेरफार होऊन

इंग्लिशांविरुद्ध कट.

त्यांनीं नेहमींप्रमाणें हैदरावर स्वारी करण्याचें मना करून त्याजकडे असें बोलणें लाविलें कीं इंग्लिशांबरोबर लढण्याविषयीं तुमचा आमचा साह्यसंकेत असावा. हा गोष्ट हैदराला मान्य होऊन मराठ्यांच्या म्हण-

प्याप्रमाणें उभयतांचा ठराव झाला. दैवगत्या मद्रास सरकारचेंही मत अगदीं फिरलें आणि म्हैसूरच्या राजाचें आणि आपलें ऐक्य असण्यापासून आपल्या नफा आहे हें त्यांच्या लक्षांत यागूं लागलें. त्यांनीही हैदराकडे बोलणें पाठविलें कीं, कोणत्याही परचक्रापासून उपद्रव झाल्यास आम्ही मदत करूं; आणि तुमचें आमचेंही निकट सख्य असावें. हैदराला ज्यावेळेस इंग्लिशांच्या मदतीची फार गरज होती त्यावेळेस त्यांनीं केली नाहीं, आणि ज्या वेळेस आपलें रक्षण करण्याचें सामर्थ्य त्याच्या आंगीं आलें त्यावेळेस आम्ही मदत करितों आम्ही मदत करितों, म्हणून त्याच्या पाठीस लागले, ह्यामुळें हैदराला जास्त संताप मात्र आला. अशा ऐन अडचणीच्या प्रसंगीं, अमेरिकेंत इंग्लिशांची आणि फ्रेंचांची लढाई होत होती त्या कारणावरून इंग्लंद आणि फ्रान्स ह्या दोन देशांमध्यें लढाई सुरू झाली, आणि हिंदुस्थानांतही त्या दोन राष्ट्रांच्या लोकांत लढाई सुरू झाली. परराष्ट्राशीं उलाढाली करण्याचा फ्रेंचांचा स्वभावच होता; आणि तशांत त्यांस असें आढळलें कीं, हैदर आपणास पाहिजे तसा अनुकूळ आहे, तेव्हां त्यांनीं हैदराशीं लागलाच पत्रव्यवहार चालू केला. हैदर फ्रेंचांस मिळाला. आजपर्यंत हैदराचें घराणें म्हणजे म्हैसूरचे राजे फ्रेंचांच्या अनुसंधानानेंच वागत आले होते आणि त्यामुळेंच त्याचा नाशही पुष्कळ झाला होता, सबब हैदरानें ह्यावेळेस ही मसलत चांगली केली नाहीं.

म० १२ इ० स० १७६९

फ्रेंचांशीं हैदराचा तह.

इंग्लिशांची आणि फ्रेंचांची लढाई सुरू होतांच इंग्लिश सरकारानें असा बेत केला कीं, फ्रेंचांचीं हिंदुस्थानांतील दरोबस्त ठाणीं घ्यावयाचीं, त्याप्रमाणें पॉंदेशरी लागलीच इंग्लिशांच्या हातीं लागलीं, ती घेण्याविषयीं हैदरानें त्यांस अगदीं अडफांटा घातला नाहीं, उलटें त्यानें असें दाखविलें, कीं मला ह्या गोष्टीपासून आनंद झाला. परंतु मलबार किनाऱ्यावर फ्रेंचांचें माही म्हणून ठाणें होतें तें घेण्याचें इंग्लिश बोलूं लागले तेव्हां मात्र त्यानें त्यांस अडचण घातली. तो म्हणाला, कीं माहीच्या भोंवतालचा देश मीं जिंकला आहे त्यापक्षीं तें ठाणेंही माझ्या अमलांत आहे. आतां फ्रेंचांच्या ठाण्यावर हल्ला करण्यास हैदर आड येतो हें रास्त नव्हे,

इंग्लिशांचे विचाराचे बेत.

माहीचें ठाणें घेतलें.

प्र० १२ इ० स० १७६९

त्यापक्षीं भीति बाळगण्याचें आपणास कारण नाहीं, असें मनांत आणून इंग्लिशांनीं तिकडे फौज रवाना केली. हैदरानें ह्याप्रसंगीं फ्रेंचांस खूप मदत केली, परंतु कांहींच उपयोग झाला नाहीं. इंग्लिशांच्या फौजेनें माहीचें ठाणें जिंकून घेतलें. ह्यानंतर हैदराचें इंग्लिशांशीं अगदीं हाडवैर पडलें होतें, ह्याचें कारण, ह्या वेळेस त्याचें ह्यांनीं ऐकिलें नाहीं ह्यामुळें त्याला कोप आला, हच असावें असें म्हणतात. परंतु द्वेषाचें वास्तविक कारण ह्यापेक्षां प्रायः खोल होतें आणि त्यांत त्याचा कांहीं मोठा विलक्षण मतलब होता असें वाटतें.

मद्रास सरकारची दूरवर दृष्टी होती.

हैदराविषयीं (त्याच्या मुलखावर हल्ला करून त्याला दुखवायाचें नाहीं असा) मद्रास सरकारानें जो बेत केला होता तो शहाणपणाचा होता. परंतु ह्या बेताप्रमाणें चाललें असतां आपली मसलत फसेल किंवा काय ! ह्या गोष्टीकडे त्या सरकारानें अगदीं डोळेझांक केली, आणि हैदरानें आपलें शत्रुत्व केलें असतां आपणास कांहीं संकट पडेल असें कोणी म्हटलें असतांही त्यांस तें खरें वाटलें नाहीं. हैदरानें आपला विचार कांहीं गुप्त ठेविला नाहीं. आणि आपण कोणपर्यंत कृत्य केलें असतां इंग्लिशांस भय पडेल हें तरी पहावें असा त्याचा बेत होता, असें दिसतें. इंग्लिशांनीं डेन्मार्क देशांतला स्वार्तज म्हणून एक पाद्री होता त्याला हैदराकडे पाठविलें. हा गृहस्थ मोठा संभावित आणि स्नेहाला फार योग्य होता. हैदरानें त्याचें आदरातिथ्य फार चांगलें रितीनें केलें आणि तो परत गेला तेव्हां त्याजबरोबर एक पत्र पाठविलें त्यांत इंग्लिशांच्या हातून जे आपले अन्याय घडले होते त्यांची त्यानें एक यादच लिहिली होती. शेवटीं कांहीं अपशब्दही लिहिले होते ते असे, कीं "मी अजून तुमचा सूड उगविला नाहीं; यरें कांहीं चिंता नाहीं" ह्यानंतर ग्रेसाहेबास त्याकडे पाठविलें; परंतु हिकडील चालीप्रमाणें त्याजबरोबर चांगले नदर भदराणे कांहीं दिले नव्हते; तर एक खोगीर आणि एक बंदूक एवढे दोन पदार्थ मात्र दिले होते, तेही वाईट होते. ह्यामुळें हैदरानें दोहोंचा तिरस्कारानें अंगीकार केला नाहीं. शहराच्या बाहेर जवळच उतारकरूंचा

रागयेण्यासारखा हैदराचा निरोप.

एक सोपा होता सांत एखाद्या कैदीप्रमाणें त्या साहेबाला जागा दिली, तेथें सरकारचे चाकर लोकांपैकीं एक असामी त्याजबरोबर मोज्या उद्धटपणानें वागला. ह्यामुळें त्यास फारच त्रास आला. त्याचें काय म्हणणें होतें तें एकवार ऐकल्याप्रमाणें केलें. नंतर महंमद ओसमन म्हणून हैदराचा एक प्रामाणिक कामगार होता त्याजबरोबर हैदराकडून ग्रेसाहेबास निरोप आला. त्या निरोपांत हुशारी धरण्यासारिखें कांहींच नव्हतें. हैदरानें प्रश्न केला, "तहाचा उपयोग काय? सन १७६९ रांतील तहाचीं सर्व कलमें इंग्लिशांनीं मोडून टाकिलीं. मराठ्यांबरोबर लढण्याविषयीं इंग्लिशांनीं मदत न केल्यामुळें माझा अगदीं नाश होण्याचा समय आला होता; ही एक मोठी गोष्ट सांगतों. ह्यापेक्षां गौण गोष्टी तर पुष्कळ आहेत, पण त्या सर्व सांगण्याची जरूरी नाहीं." म्हैसुरांत स्वारीची पोक्त तयारी चालली होती हें महंमदअल्लीस स्पष्ट समजलें होतें सबब त्यानें इंग्लिश सरकारास ती गोष्ट जाहीर करून असें लिहिलें कीं हें संकट इंग्लिशांवर मोठें आलें आहे आणि ह्याचें निवारण करण्याची तजवीजही फारच चांगली केली पाहिजे. परंतु महंमदअल्लीनें ह्याच प्रकरणीं इंग्लिशांस पुष्कळ गोष्टी भलत्या रितीच्या सुचविल्या होत्या ह्यामुळें हैदराला प्रतिकूळ जी गोष्ट तो बोले तिजकडे ते दुर्लक्ष्य करीत असें चाललें होतें सबब ह्याप्रसंगीं ही गोष्ट त्याची कौन्सिलानें ऐकिली नाहीं. ह्यामुळें पुढें त्यांजवर आकाश कोसळण्याचा जो प्रसंग आला होता त्याविषयीं त्यांची तयारी अगदीं नव्हती.

प्र० १२ इ० स० १७७८

ग्रे साहेबास यश आलें नाहीं

इंग्लिशांनीं हयगय केली.

इंग्लिशांवर स्वारी करण्याची योजना म्हैसुरास चालली होती त्या स्वारींत हैदराला जय यावा ह्याकरितां हिंदु लोकांनीं जेनम म्हणून एक मोठा उत्साह केला व मुसलमान लोकांनीं मशिदींतून देवाची प्रार्थना केली, आणि मग सन १७८० च्या आरंभीं हैदर श्रीरंगपट्टण सोडून बाहेर निघाला आणि फौजेचा तळ पडलेला पाहून तर त्यास असें वाटलें कीं दक्षिण हिंदुस्थानांत लढाईला सज्ज झालेली अशी पसंत फौज कधींच पाहिली नाहीं. ह्या फौजेंत २८,००० घोडेस्वार, १५,००० कवाईत शिकलेले लोक आणि

हैदरानें एकदम हल्ला केला.

प्र० १२ इ० स० १७८०

४०,००० साधारण शिपाई, पण त्यांतही कित्येक चांगले वहिवाट-लेले, ह्याप्रमाणें एकंदर ८३,००० लोक होते, आणि ह्यांखेरीज २००० बाणदार ५००० बेलदार, व ४०० गोरे इतके लोक होते. नंतर अर्ध्या जुलईमध्यें चंगमाच्या मार्गानें कर्नाटकांत उतरून तेथें हैदरानें फार नाश केला आणि लोकांस अतिशयित दुःख दिलें. पुढें थोड्या दिवसांनीं ही स्वारी मद्रासेजवळ कांहीं कोशांवर जाऊन पोहोंचली. तथापि इंग्लिश कौन्सिलांत जे प्रबल साहेब लोक होते त्यांस हैदराच्या येण्याविषयीं कोणी कांहीं बोललें तर त्या बोलणारास ते म्हणत कीं हैदरापासून भीति आपणास कांहीं नाहीं. ह्याप्रमाणें चाललें असतां एके दिवशीं ज्वालामिश्रित कृष्ण धूम्रस्तंभ मद्रासेकडे येत आहेत असें दिसले. सर्वांचें म्हणणें असें आहे, कीं हैदरानें त्यावेळेस सगळा प्रांत जाळून टाकिला, परंतु कर्नल विक साहेब म्हणतो कीं असें झालें नसेल. कारण हैदराचा बेत सर्व प्रांत जिंकण्याचा होता आणि त्या बेताला तर ही गोष्ट अगदीं विरुद्ध आहे. परंतु वेढा घालून एवढें मजबूद शहर हातीं येण्यास फार त्रास पडेल असें वाटून त्यानें मद्रास शहराच्या भोंवतालचा मात्र बराच मुलूख जाळून ओसाड करून टाकिला.

मद्रासेस भीति पडली.

हैदरास प्रतिबंध करण्याविषयीं इंग्लिशांची न्यूनता.

प्रथमतः जो भयंकर प्रसंग गुदरला होता तो दबलासा होतांच हैदराबरोबर लढण्याची तजवीज इंग्लिश लोक पाहूं लागले तों त्यांच्या खजिन्यांत पैशाची शिलक नव्हती, कौन्सिलांत एक विचार नव्हता, आणि महंमदअल्लीवर कार्डीमात्र विश्वास ठेवण्याची सोय नव्हती, ह्यामुळें त्यांस लढाई करण्याविषयीं मोठी अडचण होती. इंग्लिशांचा प्रथम इरादा असा होता कीं नवाबाच्या म्हणजे महंमदअल्लीच्या फौजेच्या ताब्यांत जे जे मजबूद किल्ले वगैरे आहेत ते आपल्या ताब्यांत द्यावे. कारण त्यांजवर हैदरानें एकदां हल्ला केल्याबरोबर ते लोक किल्ले खचित त्याच्या स्वाधीन करतील. असें केलें तरी बहुतेक किल्ले हैदराच्या हातीं लागलेच; परंतु ब्रिटिश कामदारांनीं मेहेनत करून दोन किल्ल्यांचा मात्र बचाव केला. क्लिंत साहेब शंभर लोकांनिशीं वांदिवाश येथें गेला; पण

तेथल्या किल्लेदारानें हैदराबरोबर कांहीं ठराव करून किला स्वाधीन करण्याचें कबूल केलें होतें त्यामुळें त्या साहेबास तेथले लोक आंत घेईनात. तथापि युक्तीनें परवानगी मिळवून तो साहेब आपल्या हाताखालच्या दुसऱ्या चार असामीं सहवर्त्तमान किल्ल्यांत गेला आणि मुख्य अधिकाऱ्यास कैद केलें. नंतर किल्ल्यांतील फौजेपैकीं जेवढी चांगली दमदार फौज होती तेवढी त्या साहेबाकडे मिळून तोच त्या किल्ल्याचा मुख्तयार झाला.

प्र० १२ इ० स० १७८० इंग्लिश अधिकाऱ्यांचीं धैर्यांचीं वर्त्तणूक.

इंग्लिशांचा दुसरा इरादा असा होता कीं, आपल्या फौजेच्या टोळ्या प्रांतांत चोहोंकडे पसरल्या आहेत त्या एकत्र जमवाव्या. कर्नल बेली साहेब हैदराच्या ठाण्यांवर हला करण्यासाठीं प्रांतांत फार लांबवर गेला होता आणि त्याच्या हाता खालची फौज पुष्कळ होती, व सामान चागलें होतें. त्या फौजेंत सुमारें २८०० लोक होते आणि इंग्लिशांची एकंदर सर्व फौज म्हटली म्हणजे ५२०० होती. लार्ड माक्रियद साहेब नुकताच हिंदुस्थानांत येऊन फौजेचा कारभार करूं लागला होता. त्यानें कांहीं कारणावरून असा आग्रह धरिला कीं शत्रूशीं युद्धप्रसंग करणें तो मद्रासेपुढें जवळच करावा, कां कीं प्रांतांत जिकडे तिकडे त्याची फौज पसरली आहे त्यापक्षीं आपण तिकडे जाऊं नये. मद्रासेपासून २५ कोशांवर कांजीवरम म्हणून गांव आहे तेथें सर्व फौज जमवावी असा सर हेक्तर मनरो साहेब सेनापति ह्याचा अभिप्राय होता. त्याप्रमाणें तेथें फौज जमत होती. ह्या ठिकाणास येऊन पोहोंचण्याकरितां बेली साहेबास खुषकीच्याच मार्गानें येणें जरूर होतें आणि त्या मार्गानें हैदराची सर्व फौज त्याजवर तुटून पडण्याचा संभव होता. प्रथमतः कार्तिलार नदीला पूर आल्यामुळें त्या साहेबाचा दहा दिवस प्रथम एक सारखा खोळंबा झाला पुढें ती नदी उतरून आल्या नंतर टिपूच्या हाता खालीं मोठी फौज होती तिनें त्याजवर हला केला. हा हला बेली साहेबानें मागें हटविला खरा; परंतु कांहींसें त्याचें नुकसान झालें. हैदरानें मनरो साहेबाच्या फौजेवर हला करण्याची हूल दाखवून त्या साहेबाची फौज आणि बेली साहेबाची फौज ह्या दोहोंच्यामध्यें

लार्ड माक्रीयद साहेबाचे येन.

इंग्लिश फौज चोहोंकडे पसरली होती.

प्र० १२ इ० स० १७८०

आपली सर्व फौज घेतली. ह्या दोन फौजांमध्यें अंतर सारें सात कोसांचें होतें. एकमेकांच्या तोफा सुटत होत्या त्या एकमेकांस ऐकूं ही येत होत्या, आणि त्या उभयतां साहेबांची गांठ पडून एकमतानें ते लढते तर हैदराची सेना अशिक्षित होती सबब तिचा पराजय ते सहज करिते. तशांत तुम्हीं मला येऊन मिळोंव असें बेली साहेबानें मनरो साहेबास पत्रही लिहिलें; परंतु कांजीवरम येथें धान्य व दारूगोळा ह्या दोहोंचा संग्रह कमी होता; सबब अशा अवस्थेंत हें गांव टाकून गेल्यास तें आपल्या हातचें जाईल असें मनरो साहेबास वाटल्यावरून आपण तेथेंच राहून त्यानें कर्नल फ्लेचर ह्याजबरोबर एक हजार लोक देऊन त्याला बेली साहेबाच्या मदतीस पाठविलें. आतां चोहोंकडे हैदराची फौज पसरली होती आणि तींतून पार निघून जाणें हें त्या साहेबाला केवढें जिवावरचें काम होतें बरें ! तशांत त्याच्या बरोबरचे वाटाडे होते तेही मोठे कृत्रिमी होते, परंतु फ्लेचर साहेबही शहाणा व हुशार होता. सबब वाटाड्यांस फसवून सर्व अडचणींतून पार पडून हुकुमाप्रमाणें तो बेली साहेबाच्या फौजेस जाऊन मिळाला. नंतर बेली साहेबाजवळ एकंदर ३७०० लोक झाले. ह्या दोन फौजांची गांठ पडूं दिल्याबद्दल हैदर आपल्या कामगारांवर फारच रागावला. नंतर इंग्लिशांचीं दोन सैन्यें एकत्र झालीं आहेत ही हल्ला करण्याची तयारी आहे असें पाहून फ्रेंचांनीं हैदरास विनंती केली, कीं आपण येथून जलदीनें निघून जावें आणि बेली साहेबाबरोबरचा लढाईचा प्रसंग मुळींच टाळावा. हैदरानें इंग्लिशांची ही फौज किती आहे व हिचा पराक्रम कसा आहे वगैरे सर्व गोष्टींची बरोबर अटकळ करून ठेविलीच होती म्हणून त्यास कांहीं वाटलें नाहीं. नंतर बेली साहेबानेंच प्रथम रात्रीं निघण्याचा उद्योग केला; ह्यांत त्याचा मतलब असा होता, कीं आपण आहों त्यापेक्षां पुष्कळ पुढें सरल्याप्रमाणें होईल; आणि तशांत लढाईचा प्रसंग पडल्यास ही आपली फौज चांगली कवाईत शिकलेलीच आहे, त्यापक्षीं आपली कांहीं हानि होणार नाहीं. परंतु मग कांहीं अडचणी आल्यामुळें त्यानें आपला बेत फिरविला आणि उजाडेपर्यंत निघूं नये असें ठरविलें. फ्लेचर

करनल फ्लेचर साहेबाची युक्तीची तजवीज.

बेली साहेबानें वेडेपणानें घेण्याम उशीर लाविला.

साहेबाचें मत तेच वेळेस निघावेंसें होतें; पण बेलीनें ऐकिलें नाहीं. बेली साहेब आपल्या ठरावाप्रमाणें प्रातःकाळीं निघून चालता झाला; पण थोड्याच वेळानें पाहतो तों म्हैसूरची सर्व फौज त्याला आड आली. प्रथमतः इंग्लिशांच्या फौजेवर त्या फौजेच्या टोळ्या फुटून फुटून येत होत्या; पण पुढें तीं अमळशा संकुचित मार्गावर आलीं आणि तेथें तिजवर हैदराच्या तोफा वगैरे लागू होण्यास अडचण नाहींशी झाली. तेव्हां सुमारें पन्नास तोफांचा भडिमार तिजवर एकदम चालू होऊन इंग्लिशांची फार खराबी होऊं लागली. पुढें ह्या भयंकर प्रसंगाचा परिणाम काय झाला ह्याविषयीं कांहींसे भिन्न भिन्न लेख आहेत. सरकारी व दुसरे कांहीं लेख ह्यावरून असें दिसतें कीं इंग्लिशांनीं मोठ्या शौर्यानें बहुतवेळ हल्ला माघारा हटविला. आतां त्यांचें शौर्य सर्वांस माहीत आहेच त्यापक्षीं असें होण्याचा संभवही आहे. परंतु घरगुती वर्त्तमान असें आहे कीं बेलीं साहेबाचा ह्या प्रसंगीं अगदीं बदनकशा झाला. कारण त्याला एकट्याला सेनाधिपत्य करण्याचा सराव नव्हता ह्यामुळें त्याला कांहीं सुचेनासें होऊन तो हिकडून तिकडे आणि तिकडून हिकडे धांवत सुटला. एक ठिकाण धरून राहिला नाहीं. तेव्हां अर्थातच ज्या गोष्टी त्यास अनुकूळ होत्या त्यापासून देखील आपलें हित करून घेणें त्याच्या हातून झालें नाहीं. सर्व शिपाई लोक म्हणूं लागलें कीं आम्हांला पुढें न्या आणि शत्रूनें तोफांचा मार चालविला आहे त्यापक्षीं उगींच तयारी वांचून शत्रूच्या आंगावर आम्हास ढकलूं नका. एकाएकीं इंग्लिशांचे दारूचे दोन छकडे पेटून भोंवतालीं आग पसरली, आणि दारूगोळ्यांचा तोटा येईल अशी त्यांस दहशत पडली. महादजी शिंदा हा मोठा साहसी पुरुष होता; त्याच्या हाताखालीं म्हैसूरकरांचे स्वार होते त्यांनीं इंग्लिशांवर जबरदस्त हल्ला केला तेवेळेस इंग्लिशांच्या फौजेंतील काळे लोकांची फाटाफूट होऊन ते हैदराच्या फौजेंत असे मिळून गेले कीं तिजपासून त्यांस निराळे काढण्याची अगदीं सोय राहिली नाहीं. इतकें झालें तरी इंग्लिशांचे थोडेसे गोरे लोक होते ते दम धरून उभे राहिले होते. परंतु हैदराच्या एवढ्या फौजेबरोबर

प्र० १२ स० स० १७८०

सेनापतीच्या कामाला बेली साहेबाची नालायकी

त्याचा अगदीं मोड झाला.

म० १२ इ० स० १७८०

ह्यांचा टिकाव लागेल असा संभव दिसेना. सबब बेली ह्यानें पुढें जाऊन आपला रुमाल फिरविला. तेव्हां त्यांस असें वाटलें कीं चालीप्रमाणें हैदर लढाई महकूब करील. परंतु तसें न होतां हैदराच्या फौजेनें इंग्लिशांच्या फौजेंत घुसून तिची फारच दुर्दशा केली; ती अशी, कीं जे शिपाई जखमी झाले होते त्यांजवर त्यांच्या बायकां पोरांवर त्यांनीं वार केले. असें करण्याविषयीं कारण हैदरानें आपलें वचन मोडिलें असावें किंवा रुमाल फिरविल्यावर हीं इंग्लिशांच्या लष्करांत कांहीं तोफा वगैरे सुटतच होत्या ह्यामुळें त्याला राग आला असावा, ह्या दोहोंपैकीं एक असावेंसें दिसतें. लाली आणि पिमोरिन ह्या दोन फ्रेंच सरदारांनीं मेहनत केल्यावरून इंग्लिश फौजेवर ह्यासमयीं जी काय कृपा झाली तेवढीच झाली, बाकी कांहीं नाहीं. असो, त्याप्रमाणें इंग्लिशांची बहुतेक फौज रणांत पडली आणि दोनशें युरोपियन लोक व दुसरी कांहीं बाकी राहिली होती ती सर्व पाडाव झाली.

ह्या नाशाचें कारण.

ह्या लढाईचा परिणाम अशा रितीनें फार वाईट झाला ह्याविषयीं कर्नल विक साहेब स्पष्ट असें म्हणतो कीं इंग्लिशांच्या दोघा सेनापतींतून एक जरी चांगल्या विचारानें चालता तरी दोन्ही फौजा बचावल्या; आणि दोघे जर चांगल्या तजविजीनें चालते तर हैदराचाच पराजय होता. मनरो साहेब कत्तल उडालेल्या जाग्यापासून सुमारें एका कोसाच्या अंतरावर येऊन दाखल झाला होता; परंतु तिकडे तोफा सुटावयाच्या अगदीं बंद झाल्या, आणि त्यानें फिकडून खुणा केल्या त्याचें प्रत्युत्तरही त्यास मिळालें नाहीं, सबब त्यानें पुढें पाय टाकिला नाहीं. पुढें त्या फौजेची दुर्दशा झाली असें कळतांच तो चिंगलपट्टनास माघारा निघून गेला. कर्नल कास्बी साहेब थोडक्याशा लोकांनिशीं मोठ्या शहाणपणानें आणि तजविजीनें पळून येऊन त्यास तेथें मिळाला. इंग्लिशांच्या पाडाव केलेल्या लोकांस श्रीरंगपट्टणास नेऊन हैदरानें त्याचे अतिशय हाल केले. जे जखमी झाले नव्हते त्यांच्या पायांत बिड्या घालून ठेवणी बैरीज एक सोपा होता तेथें त्यांस ठेविलें. आणि कोंपऱ्याकोंपऱ्यांस नुसत्या चटया टाकाव्या आणि त्यांवर त्यांनीं निजावें

'कैदी लोकांस क्रूरपणानें वागविलें.

असें केलें होतें. त्यांच्या पोटाला दररोज चार आणे मिळत. त्यांची व्यवस्था वरोवर नसल्यामुळें व त्यांस रोगराई झाल्यास औषध पाण्याची तजवीज अगदीं नव्हती ह्यामुळें कैक लोक तसेच मेले. इ० स० १७८०

वर सांगितलेला जय मिळाल्यापासून म्हैसूरकरांस मोठा नफा झाला तो हा कीं, अर्काटचा किला त्यांच्या हातीं लागला. एथील किलेदार प्रथम चांगल्या रितीनें लढले पण शेवटीं नोवेंबराच्या तिसऱ्या तारखेस (इ० स० १७८०) तो किला हैदराच्या स्वाधीन झाला. वांदिवाश, वेळूर, चिंगलपट्टण वगैरे दुसऱ्या किल्ल्यांसहीं त्यानें जवरदस्त वेढे घालून ठेविले. अर्काट घे. तलें.

हा विलक्षण नाश झाल्याचें वर्त्तमान इंग्लिश सरकारची मुख्य गादी कलकत्ता येथें कळतांच पुढच्या वंदोवस्ताकरितां हेस्टिंग्स साहेवानें फार चांगली तजवीज केली. सर अयरकूट साहेव हा निभावलेला मनुष्य असून हिंदुस्थानांत जे इंग्लिश लोक आले त्या सर्वांमध्यें युद्ध क्रियेंत निष्णात अशी त्याची मोठी कीर्त्ति होती, सवव त्यास मुख्य सेनापति नेमून ५६० गोरे शिपाई वरोवर देऊन वंगाल्याहून रवाना केलें; आणि काळ्या लोकांच्या पलटणींनीं पावसाळा संपतांच समुद्र किनाऱ्याच्या लगत्यानें मद्रासेस जावें असा हुकूम केला. त्याच वेळेस मद्रासच्या गवर्नरास सस्पेंड करूं आणि त्याची जागा कौन्सिलांतील वरिष्ट अधिकाऱ्यास दिली, हा अधिकारी, गवर्नराची कामांत सुस्ती असल्यामुळें त्यास नेहमीं विरुद्ध येत असे. प्रस्तुतच्या लढाईस जो पैसा पाहिजे होता तो नवीन मुख्य सेनापतीच्या हातीं ठेविला होता. सरअायरकूट साहेवास सेनापति नेमिलें.

कूट साहेव मद्रासेस येऊन लढाईची तयारी करूं लागला. तेव्हां त्याच्या हाताखालीं लढाईला नेण्यासारखी अशी सारी सात हजार फौज होती; पैकीं सतराशें गोरे लोक आणि वाकीचे काळे लोक होते. तथापि एवढ्याच फौजेनिशीं अगदीं न भितां उलटा गोल्या हैदरेनें समरांगणांत शत्रूच्या विस्तीर्ण व पराक्रमी अशा दळाशीं युद्धप्रसंग करण्यास तयार झाला. शत्रूच्या दळावर सरदारही चांगले होते. कूट साहेवास भय कायतें हें होतें कीं हैदरानें जो मुलूख प्रायः ओसाड करून टाकिला होता त्यांतच समोर लहानशी उपयोगी फौज.

प्र० १२ इ० स० १७८०

उभें राहून युद्ध न चालवितां इकडून हल्ला करावा तिकडून हल्ला करावा असा उपद्रव तो करीत असे. दूरच्या देशास जाण्याकरितां जसें एखादें तारूं निघतें, किंवा व्यापाऱ्यांचा समाज एखाद्या जंगलांतून जाण्याकरितां निघतो तसें इंग्लिशांची फौज मद्रासेहून निघतांना झालें. ज्या ज्या वस्तूची गरज लागणार ती ती बरोबरच नेली पाहिजे असें होतें. मद्रासेशिवाय दुसरेकडून कांहीं एक मिळणार नाहीं असें होतें त्यामुळें कदाचित फौजेला अन्नाचा दुकाळ पडेल असा संभव होता. ही फौज एका गट्टीनें चालत असे, आणि जेवढी जागा तीस उतरायास लागे तीपेक्षां अधिक जागा ती अगदीं धरीत नसे. ह्याप्रमाणें इंग्लिशांची फौज चालली असतां हैदराच्या स्वारांच्या टोळ्या चौहोकडून तिजवर येत; ह्या स्वारांस जेव्हां असें दिसलें कीं अशा एखाद दुसऱ्या टोळीबरोबर लढून इंग्लिश आपला दारूगोळा खराब करीत नाहींत. तेव्हां तर ते त्या इंग्लिशांच्या फौजेजवळ येऊन गोष्टी देखील सांगूं लागले आणि आम्हाबरोबर बाहुयुद्धास उभे रहा असा मोठा तोरा दाखवूं लागले. इंग्लिशांचा दालस म्हणून एक सरदार होता तो शरीरानें मोठा बळकट असून चांगला पराक्रमी होता; त्यानें त्या लोकांपैकीं पुष्कळांबरोबर बाहुयुद्ध करून जय मिळविला ह्यामुळें मोठमोठे वस्ताद होते ते देखील त्यास मानूं लागले. तथापि अशा प्रकारच्या युद्धांत सामान्यतः नेटीव लोकांस बरें पडे.

बाहुयुद्ध.

शत्रूच्या कामाला हरकत केली.

हैदराच्या अशा प्रकारच्या उपद्रवापासून इंग्लिशांस त्रास होऊं लागला. हैदर त्यांच्यासमोर उभा राहून लढेना. परंतु इतकें झालें कीं ज्या ज्या ठिकाणावर इंग्लिशांनीं फौजेचा रोंख धरिला त्या त्या ठिकाणचा वेढा उठविणें त्यास प्राप्त झालें. ह्याप्रमाणें वांदिवाश व परमकाईल हे दोन मोठे किल्ले त्यांच्या हातीं आले आणि हैदराचें पाऊल अर्थात मागें पडलें. तथापि हैदर असा होता, कीं मेहनतीला कधीं जुमानायाचा नाहीं. आज येथें तर उद्यां मोठी मजल करून त्यानें दूर निघून जावें, असें चाललें होतें, ह्यामुळें त्याच्या पाठीमागें लागल्यानें इंग्लिशांची फौज अगदीं थकून गेली आणि तिच्याजवळचें बहुतेक सामानही संपून गेलें. ह्यामुळें

कूट साहेबास असें झालें कीं सगळ्या फौजेनिशीं हैदरावर एकदम घाला घालून जर आला जय तर आला; ह्याखेरीज इतर उपाय नाहीं. ही मसलत तरी शेवटास जाईल असा त्यास भरंवसा नव्हता. असें म्हटल्यास चिंता नाहीं. पुढें फ्रेंचाचें आरमार बंदरांत येऊन दाखल झालें व इंग्लिशांचे लोक चिलमब्रम येथील देवळावर हल्ला करीत असतां त्यांचा पराजय झाला. ह्या दोन गोष्टींवरून हैदरास इशारी येऊन त्यानें कडलुरा नजीक एक बंदोबस्ताचें ठिकाण पाहून तेथें आपल्या फौजेचा तळ दिला, आणि त्याच्या सभोवतीं चर खणवून मोरचेबंदी केली. ह्या ठिकाणाहून त्यानें समुद्रावरचेंही धोरण राखून इंग्लिशांचें जें सामान सुमान वाटेनें जाईल येईल तें मध्येंच हाणून पाडावें असें चालविलें. हें ठिकाण इंग्लिशांना मोठें भयंकर होतें पण कूट साहेब चतुर, त्यानें, हैदरानें दुसऱ्या कांहीं कामाकरितां जो मार्ग तयार केला होता त्यांतूनच आपली फौज नेऊन, हैदरानें मोरचेबंदी करून आपल्या स्वारांची जी मोठी थोरली टोळी उभी केली होती तिच्या तोंडावर नेऊन उभी केली, आणि शेवटाखालीं हैदराच्या सर्व फौजेस त्यानें पळविलें. हैदराच्या सेनेच्या मागल्या आंगास एक टेंकडी होती, तिजवर खुरचा टाकून हैदर बसला होता. आपल्या फौजेवर हल्ला करून इंग्लिशांनीं जय मिळविला हें पाहून हैदर अत्यंत चकित होऊन गेला, आणि त्यास असा संताप झाला कीं त्याचें देहभान सुटून कांहीं वेळ पावेतों तो बसला होता त्या जाग्यावरून देखील हलेना. शेवटीं त्याचा एक फारां दिवसांचा आणि विश्वासूक असा चाकर होता त्यानें आग्रहानें त्याच्या पायांत गुडघेजोडा चढवून त्याला एका चलाख घोड्यावर बसवून तो इंग्लिशांच्या हातीं न लागे असा पार करून दिला.

कूट साहेबाच्या चतुराईचा पुढारीपणा.

वांदिवाश येथील हैदराचा वेढा मागें एक वेळ इंग्लिशांनीं उठविला असतां टिपूनें मातब्बर घातला होता पण इंग्लिशांच्या सेनापतीनें तो पुन्हा उठविला. हैदरावरोबर लढाई करून जो जय त्या सेनापतीनें मिळविला होता त्याचा उपयोग हा वेढा उठविण्याविषयीं त्यास पडला. त्याला ह्या संधीस द्रव्य, दाणा, व दुसरें कांहीं

इंग्लिश सरदारास सामानाची फार आवश्यकता.

म० १२. इ० स० १७८०

ग्र० १२ इ० स० १७८०

लष्करीसामान ह्यांची फार नड होती; पण त्यांपैकीं कोणतेंच ह्या ठाण्यांतून त्याला मिळालें नाहीं. इकडे हैदरानें कूच करून पुढें जावें मागें उलटावें असें करतां करतां पुन्हा एक वेळ तंबू ठोकून तो लढाईची वाट पाहत राहिला. पालिलूर म्हणून एक खेडें आहे त्याच्या नजीक कर्नल वेली साहेबावरोबर लढून त्यानें मागें जय मिळविला होता म्हणून ती जागा यशस्वी आहे असें त्यास वाटून त्याच ठिकाणीं ह्यावेळेस लढाई करावी असें त्यानें आपणच ठरविलें ह्याठिकाणीं लढण्यासाठीं कूट साहेबानें आपली फौज नेली; पण त्या लढाईपासून तादृश निकाल न होतां इंग्लिशांचे लोक मात्र बहुत मेले. कारण कूट साहेबानें आपलीं पलटणें निरनिराळ्या ठिकाणीं उभीं करून पाहिलें, पण जिकडे जावें तिकडे हैदराच्या फौजेंतून तिर्कस आडवे गोळे येऊन लागत त्यामुळें फार त्रास होई. मिल साहेब तर असें म्हणतो, कीं कूट साहेबाचा आणि मनरो साहेबाचा तंटा पडला होता म्हणून कूट साहेब जी तजवीज काढी तीं मनरो साहेब लटकी पाडी, ह्यामुळें म्हैसूरचा राजा जर ह्या समयास सोडून लढता तर त्याचा पूर्ण जय झाला असता. पण तसें न करितां तो लढत होता तेथून मागें हटला, तेव्हां इंग्लिश त्या जागेवर गेले. मागें नुकतेंच वेली साहेबाच्या लढाईंत इंग्लिश लोक मरून त्यांचीं प्रेतें तेथें पडलीं होतीं तीं अद्यापि तशींच होतीं; आणि ह्या लढाईंत कूट साहेबाचें लष्कर त्या प्रेतांवर चालत गेलें. नेटीव लोकांनीं ह्यावेळेस हा आपला मोठा जयच झाला अशी फुशारकी भोगिली. असें कितीं एकांचे लेखांवरून दिसतें पण वॉक साहेबाच्या म्हणण्याप्रमाणें त्यांचा दोष दिसत नाहीं. तो म्हणतो कीं आपण मागें हटल्यासारखें दाखवून इंग्लिशांस आंगावर द्यावें अशा हेतूनें आम्ही मागें सरलों आणि त्याप्रमाणें इंग्लिश पुढें आले ह्यांत आपलेंच काम झालें इतकेंच नेटिवांचें म्हणणें होतें आणि ह्या म्हणण्याप्रमाणें घडलें खरेंच.

वादग्रस्तविषय.

जनरल कूट साहेबाची अस्वस्थता.

ह्या लढाईपासून इंग्लिशांची कुवत फारशी वाढली नाहीं व त्यांची कीर्तिही तादृश झाली नाहीं. नंतर वेळूरच्या किल्लेदाराला वेढा पडून किल्लेदारांची अगदीं पांचांवर धारण बसली आहे,

असें कूट साहेबाला कळून त्यानें त्या किल्ल्याकरितां सपाटून लढण्याचा बेत केला. पण मग हैदराची छावणी सोलीन गडावर आहे असें त्यास समजल्यावर त्यानें अगोदर तिकडे स्वारी करून हैदराला लढाईला उभा करायाचा असा निश्चय केला. सप्तंबराच्या २७ व्या तारखेस सकाळीं निघून त्यांनें अशी मजल मारिली, कीं थोडें चुकलें नाहीं तर हैदराची फौज रांगेनें पुरती उभी राहिली नाहीं तोंच तिला एका एकीं गांठण्याचा समय आला होता. तितक्यांत त्या फौजेनें सांवरासांवर करून इंग्लिशांवर तोफांचा खूप भडिमार केला, पण शेवटीं त्यांचे पांच हजार लोक पडून त्यांस पळ काढणें भाग पडलें. इंग्लिशांचें सारे १०० लोक पडले. अस्तु हें अटोपतांच कूट साहेब वेळुरावर कूच करण्याला बहुतेक मोकळा झाला. तथापि कूच करून जाण्यास कांहींशी अडचण होतीच. पुढें हा तेथें दाखल होतांच शत्रु तेथला वेढा उठवून चालता झाला. एखाद्या लढाईंत इंग्लिशांना जय यावा एखाद्या लढाईंत नेटिवांना जय यावा. असें ह्या मोहिमींत चाललें होतें. १७८० इ० स० प्र० १२

दच लोकांचें ठाणें इंग्लिशांच्या हातीं आलें.

इंग्लिश आणि दच ह्यांच्यामध्यें कलह उत्पन्न होऊन लढाई उपस्थित झाली असें वर्त्तमान मद्रासेस आलें, तेव्हां माकार्तणी साहेब तेथचा प्रसिदेंत होता त्यानें दच लोकांचें मुख्य ठाणें निगापट्टण हें हल्ला करून घ्यावें अशी मसलत केली. ह्या मसलतीस कूट साहेब अनुकूल नाहीं असें दिसल्यावर माकार्तणी साहेबानें मनरो साहेबाच्या दिमतीस जी चार हजार लोकांचीं टोळी होती त्याच्च टोळींत लोक कमी होते ते भरून ती पुरी केली. आणि कूट साहेबाच्या फौजेंतील लोक अगदीं न घेतां ती दच लोकांवर रवाना केली. हें कृत्य मोठ्या ईर्षेनें चाललें होतें निगापटणच्या किल्ल्याला एकांत एक असे पांच कोट होते ते पांचही इंग्लिशांच्या फौजेनें अगदीं न मितां अशा आवेशानें काबीज केले कीं दच लोकांची आठ हजार फौज होती तरी चौदा दिवसांत ते कौलावर आले आणि ह्या किनाऱ्यावरील लोकांचीं दुसरीं ठाणीं होतीं तीं सर्व ह्या मुख्य ठाण्याबरोबरच घडघडलीं. सिंहलद्वीपांत

ग्र० १२ इ० स० १७८२

त्यांचें त्रिंकोमाली म्हणून एक मोठें ठाणें होतें तें देखील इंग्लिशांनीं हला करून घेतलें.

इंग्लिशांस तंजावरास कांहीं काळ पावेतों जय मिळाला.

तंजावरच्या राज्यांत इंग्लिशांचें वजन कमी झालें होतें तें वाढविण्याविषयीं कर्नल ब्राथवेत दोन हजार फौजेनिशीं झटत होता. म्हैसूरकरांच्या स्वारांनीं तो सर्व मुलूख अगदीं व्यापून टाकिला होता आणि इंग्लिश फौजेवर आपल्या सगळ्या सैन्यापासून फुटून एकीकडे पडल्याप्रमाणें होती; सबब म्हैसूरच्या एवढ्या थोडक्या फौजेपासून बचाव करून घेण्यास ही फौज फारच थोडी होती. इंग्लिशांस ज्या द्वारांनीं अगदीं बित्तीम बातमी लागावयाची ती सर्व बंद करून टाकून इंग्लिशांस हैदरअल्ली उलटी बातमी देऊन फसवीत असे. आम्ही तुमचे बातमीदार म्हणून जे इंग्लिशांस सांगत त्यासर्वांस हैदराकडून पगार पोंचत असे. ब्राथवेत साहेब कोलरून नदीच्या तिरावर छावणी घालून राहिला होता. हैदराची खाशी फौज त्या छावणीला चोहोंकडून घेरा घालूं लागली तरी त्याच्या मनांत घेऱ्याची अगदीं शंका आलीच नाहीं. एका नेतिवानें त्याला सांगितलें कीं, तुमच्या लष्कराला हैदराचे लोक घेरा घालिताहेत, पण ह्या सांगण्यावर अगदीं भरंवसा ठेवण्यासारखें नाहीं असा उलट मजकूर सांगून हैदराच्या हेरानें या साहेबास फसविलें. शेवटीं आपल्या फौजेच्या दसपट फौजेनें आपणाला घेरलें, असें त्या साहेबानें पाहिलें. अशा प्रसंगीं इंग्लिशांचे हे थोडकेच लोक होते, पण ते प्रामाणिक होते सबब ते लढले ते खरोखर मोठ्या शौर्यानें लढले आणि पुष्कळ दिवस हें युद्ध चाललें होतें, त्यांत मधून मधून हैदराच्या फौजेनें वारंवार मोठ्या जोरानें हल्ले केले; तरी त्यांनीं ते मागें हटविले, ह्या गोष्टीविषयीं सर्व लेख मिळतात. शेवटीं फ्रेंचांच्या फौजेनें इंग्लिशांवर हल्ला केला तेव्हां त्यांच्या काळ्या लोकांच्या रांगा अगदीं फुटल्या आणि सर्वच घोटाळा झाला. अखेरीस इंग्लिशांचे कांहीं लोक मारले गेले व कांहीं लोक शरण गेले. फ्रेंच सरदारांनीं तर आपल्या नेहमींच्या चालीप्रमाणें शरण आलेल्यांवर दया केली, आणि टिपू हा मुख्य सेनापति होता त्यापक्षीं त्यानें कांहीं क्रौर्य

बातमीदार ठेवण्याची हैदराची रीत.

कर्नल ब्राथवेत साहेबाना अगदीं पराभव झाला.

करावें पण दैववशात् त्यानेंही नेहमींप्रमाणें क्रूरपणा न करितां त्या कैदींस चांगलें ठेविलें. प्र० १२ इ० स० १७८२

ह्या प्रसंगीं हा जय झाल्याचें हैदरास फारसें न वाटतां त्यास पुढील गोष्टीची फार काळजी लागली होती. त्याला असें वर्त्तमान येऊन पोहोंचलें कीं, हेस्टिंगस साहेबानें बंगल्यांत बसून पराकाष्ठेचे श्रम करून मराठ्यांकडून आपला (हैदराचा, पक्ष सोडविला. आणि मराठे त्या साहेबास इतके अनुकूळ झाले आहेत कीं, त्यांचा आणि इंग्लिशांचा जो आलीकडे तहनमा झाला त्याच्या वेळेस ब्रितिशांच्या अमलांत जितका मुलूख होता तितका पूर्ववत त्यांजकडे राखण्याविषयींची जबाबदारी त्यांनीं आपल्या माथ्यावर घेतली आहे. मलबार किनाऱ्यावर तेलिशरी म्हणून शहर आहे त्याला वेढा घालण्याकरितां हैदरानें आपली फौज पाठविली होती तिला पूर्वी कांहीं एक भागा नसतां तेथें फारच जबरदस्त प्रसंग आला. त्या फौजेचा तेथल्या लोकांवर कांहीं दबदबा पडणें एकीकडेच राहिलें आणि तेलीशरीवाल्यांस मुंबईहून पुष्कळ कुमक येऊन तिनें त्या हैदराच्या फौजेला शोडपून ती शरण आणिली. हें सर्व वर्त्तमान हैदराच्या कानावर त्याच वेळेस आलें. ह्या अशा विपरीत गोष्टी झाल्यावरून तो इतका उदासीन झाला होता, कीं करनाटक सोडून देऊन जाण्याचा बेत त्यानें केला होता; इतक्यांत फ्रेंचांची पुष्कळ फौज पूर्वेच्या किनाऱ्यावर येऊन दाखल झाल्याचें वर्त्तमान आलें आणि त्याप्रमाणें मार्चाच्या दहाव्या तारिखेस ती तीन हजार फौज बंदरावर उतरली. नंतर फ्रेंच व हैदर ह्यांनीं आपण इंग्लिशांस युद्ध भुमींत खचीत भारी आहों असें मानून लागलाच कडलूरास वेढा घातला आणि त्या ठिकाणीं दारूगोळा वगैरे सामान भरपूर नव्हतें ह्यामुळें तो अगदीं लढाई वांचूनच त्यांच्या स्वाधीन झाला. नंतर हैदर तेथून वांदिवाश किल्ला मोठा राहिला होता त्यावर हल्ला करण्याकरितां गेला. तितक्यांत कूट साहेब तेथें येऊन त्या किल्ल्याकरितां लढण्यास तयार झाला. आणि हैदरही ज्या एकत्र झालेल्या सैन्याच्या बळाढ्यतेविषयीं मोठा गर्व बाहत होता. तें खाजवळ होतें. पण उपयोग काय ? आम्ही

हैदराचा मोनि.

साष्टकारी फ्रेंच लोक आले

जनरल कूट साहेबाचा वरि. शपणा.

प्र० १२ इ० म० १७८१

लढाई करीत नाहीं असें म्हणून तो आपोआप पौंदेशरीकडे वळला कूट साहेबानें पाठलाग करून आरनी जवळ त्याची बहुत खराबी करून अगदीं त्याचा पराजय केला. त्या साहेबानें लागलाच वेळुरास सामानाचा सांठा करून ठेवून कडलूर परत घेण्याकरितां त्यावर स्वारी केली, परंतु तेथें त्याला तारवांवरील फौजेची मदत नव्हती ह्यामुळें तें काम फसलें. असो ह्या मागील गोष्टींवरून पाहतां, फ्रान्सांतून एवढ्या बलाढ्य सैन्याची कुमक येऊनही मैदानांत इंग्लिशांसमोर उभे राहण्याची हैदराची छाती झाली नाहीं तो नाहींच.

इतक्यांत इकडे मलबार किनाऱ्यावर आपला अमल बसविण्याकरितां इंग्लिश लोकांनीं सक्त प्रयत्न चालविला होता. तेलीचरी मुकामीं, मागें सांगितल्याप्रमाणें हैदराच्या फौजेचा पराजय केल्यावर मेजर अब्रिगंदन साहेबानें कालिकोट आपल्या ताब्यांत आणिलें. कर्नल हंबरस्तन साहेब हा शूर आणि बुद्धिमान सरदार होता, तो कांहीं फौजेनिशी मुंबईहून येऊन तेथें उतरला. ह्या कारणानें तर युद्ध भूमीवर इंग्लिशांपुढें शत्रूचें कांहीं चालेनासें झालें. हंबरस्तन साहेब आपला त्राताच आहे असें नेयर लोकांस वाटून त्यांनीं लागलीच आपली फौज आणि त्याची फौज एकत्र केली. नंतर ते एकत्र झालेलें सैन्य प्रांतांत गेलें. हैदराची फौज वेडेपणानें ह्या सैन्याची वाट पाहत राहिली होती. हैदराच्या फौजेच्या मागल्या आंगास नदी होती ह्यामुळें ती जागा तिला सोईची नव्हती. पुढें इंग्लिशांच्या सैन्यानें तिचा अगदीं पराभव केला आणि तिनें मागें पळ काढिला. तेव्हां त्या नदींत तिजपैकीं बहुतेक लोक बुडाले. इंग्लिश प्रांतांत शिरले तेव्हां त्यांस पुढें जाण्याला कांहीं अडचणी आल्या आणि पाठीमागेंही शत्रूचे लोक लागले होते, ह्यामुळें त्यांस फार त्रास येऊन माघारें परतावें लागलें. त्यांस मागें जातांना फारच जलदी करावी लागली. कां कीं म्हैसूरकरांचें ज्या किनाऱ्यावर नुकसान झालें होतें त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं टिपू आणि लाली हे उभयतां बहुत फौजेनिशीं येत होते. इंग्लिश लोक पनानंवर जाऊन उतरले आणि तेथें कर्नल माक्लिअद सा-

इंग्लिशांचा जय झाला.

टिपूचा कूच.

हेब त्या फौजेच्या कामावर आला, त्यानें मोरचेबंदी करून असा बंदोबस्त केला होता कीं, टिपूचा त्या ठिकाणीं पुष्कळ नाश होऊन त्यास मागें फिरावें लागलें. तथापि आपल्या खाशा फौजेनिशीं पुन्हा हल्ला करण्याच्या तयारींत टिपू होता; इतक्यांत निकडीचें कांहीं काम उपस्थित झालें तेव्हां अर्थांतच दुसऱ्या सर्व गोष्टी एकीकडे ठेवून त्यास माघारें म्हैसूरास जाणें पडलें. प्र० १२ इ० स० १७८२

हैदर मरणपावला.

तें निकडीचें काम हें कीं, हैदराची प्रकृति अलीकडे कांहीं दिवस फारच बिघडत चालली होती. या प्रांतांतील मोठमोठ्या श्रीमंत लोकांस राजहोरा म्हणजे राजयक्ष्मा म्हणून मोठा पलिस्त व्याधि होत असतो तो हैदरास होतो असें चिन्ह दिसूं लागलें. तोच रोग झाला असा निर्णय झाला म्हणजे नेतीव वैद्यांचे हात पाय अर्दी थकतात आणि त्यांत रोग्याचा अंतच होतो. सन १७८२त दिसेंबर महिन्याच्या ७व्या तारखेस हैदरअली ह्या रोगानें मेला. त्यावेळेस त्याचें वय अमुकच होतें असें ठाऊक नाहीं, परंतु ऐंशीं वर्षें होऊन गेलीं असावीं असें म्हणतात. हिंदुस्थानांत मोठमोठे अचाट काम करणारे बहुत लोक झाले त्या सर्वांमध्यें हैदर हा कांहीं विलक्षणच पुरुष होता. तो मुळाक्षरें देखील शिकला नव्हता, तेव्हां अर्थांतच त्याला लिहितां वाचतां येत नव्हतें. असें असतांही त्यानें एवढें प्रबल राज्य मिळविलें होतें. त्याच्या आंगीं थोरपणा, न्याय, माणुसकी, ह्या गुणांचा लेश देखील नव्हता. तथापि त्याची बुद्धि निवळ होती आणि तो राजकीय कामांत अत्यंत दक्ष होता, ह्यामुळें त्यानें तें राज्य चांगलें चालविलें. हैदरानें आपला अमल इतका वाढविला होता कीं त्या अमलाला त्याच्या मरणामुळें मोठा धोका येण्याचा समय होता. कारण इकडील फौज जुटीनें एकत्र बाळगणें फारच कठीण आहे. तिच्या मनांत देशाभिमानाचें वारेंही नसतें. बरें, हें सर्वांचें कार्य आहे किंवा आपला शिपाईगिरीचा बाणा आहे ह्यासाठीं आपणास एकत्र राहून लढलें पाहिजे असेंही त्यांच्या मनांत बागत नसतें, तर ज्या फौजेची आपल्या मुख्यावर जी निष्ठा असते तिजमुळेंच ती एकत्र बाळगली जाते. ती निष्ठा तरी हा राजा आणि आपण ह्या-

म० १२ इ० स० १७८२

ची फौज ह्या संबंधानें असते असा हिशोब नाहीं; तर हा एक मोठा चांगला माणूस आहे अशा हिशोबानें असते. तो मुख्य गेला अगर नाहींसा झाला म्हणजे त्या फौजेची फाटाफूट होऊन हिकडे चारलोक तिकडे चारलोक असें होऊन अव्यवस्था होते आणि चोहोंकडे चार निघून जातात अथवा निरनिराळ्या टोळ्या होऊन राहतात. नंतर ज्या टोळींत जो सरदार असेल तो आपल्या पराक्रमाच्या अगर लांचाच्या योगानें तिचें मन आपणाकडे वळवून घेतो, असें प्रायःघडतें. असो प्रस्तुत हैदराच्याच कुटुंबाचा विचार केला असतां त्यास हें संकट फारच मोठें होतें. कारण तो जातीनें मोठा हुशार आणि वडवड्या होता ह्यामुळें दिवाणी अथवा लष्करी खात्यांत कांहीं न्यूनाधिक्य होणें तें केवळ त्याच्याच इच्छेप्रमाणें होत असे, दुसऱ्याचा हात त्यामध्यें बिलकुल नसे. ह्यामुळें तो मरतांच चोहींकडे मोठीच अव्यवस्था होऊन जावी, परंतु तसें झालें नाहीं. त्यानें अकलेनें कांहीं मनुष्य निवडून ठेविले होते, त्यांनीं ह्या प्रसंगीं हैदराशीं व त्याच्या कुटुंबाशीं आपला इतबार साडला नाहीं.

हैदराच्या कारभाऱ्याचे बेत.

हैदराच्या खजिन्याचें काम पूर्णया व कृष्णराव हे त्याच्या पदरचे दोन गृहस्थ मिळून चालवीत असत. हे दोघेही ब्राम्हण, पण विरुद्ध पंथाचे आणि भिन्न भाषेचे असे होते. ह्यामुळें ह्याचा दाब त्याजवर आणि त्याचा दाब ह्याजवर असा प्रकार होऊन लबाडी होत नसे. हैदराचा अंतकाळ समीप आलासें दिसतांच ह्या दोघांनीं मिळून अशी अलौकिक मसलत केली कीं हैदराचा अंत झाल्याची बातमी पदरच्या फौजेला व इतर लोकांला अगदीं कळूं देऊं नये. पुढें कांहीं दिवस हैदराची तबियत फार बिघडली होती ह्या कारणानें तो आपले खोलींत आपले जे परम विश्वासु सेवक होते त्यांस मात्र येऊं देत असे; इतरास अगदीं प्रतिबंध असे. त्या दोघा खजीनदारांनीं आपला बेत त्या विश्वासु मनुष्यांस सांगितला आणि अशी सक्त ताकीद केली कीं, हा विचार फुटला तर खबरदार. इतर सर्व लोकांस ते दोघे चालीप्रमाणें हैदराची प्रकृति सांगून असें दाखवीत कीं अजून पावेतों बरें आहे. महंमद अमीन म्हणून

त्यांचा बेत उघड झाला.

हैदराचा भाचा होता त्यानें मात्र दुसऱ्या एका सरदाराला खाकेंत घेऊन हैदराचा टिपूहून लहान दुसरा मुलगा तो स्वभावानें भोळसर होता त्याला गादीवर बसविण्याचा बेत केला. पोटांतला अभिप्राय कीं त्याच्या नांवानें आपणच मुखत्यारीनें राज्य करावें. परंतु त्याची ही मसलत फुटली, तेव्हां जसा कांहीं हैदराचाच हुकूम झाला आहे असा डौल दोघां खजीन दारांनीं दाखवन त्या उभयतांस धरून कैदेंत ठेवून पका बंदोबस्त करून टकिला. राजाचा अंतकाल होतांच त्याच्या विश्वासूक प्रधानांनीं त्याच्या ज्येष्ठ पुत्रास खबर पाठविली, ती त्याला चार दिवसांत पोहोंचली. त्याबरोबरेस मागें सांगितल्याप्रमाणें पनानी जवळ टिपूची इंग्लिशांशीं लढाई चालली होती ती तहकूब करून तो अत्यंत त्वरेनें म्हैसुराजवळ आला. इतक्यांत सर्व गोष्टी जिकडल्या तिकडे नीट आहेत असें त्यास समजतांच त्यानें जाण्याची त्वरा कांहीं कमी केली. मग इ० स० १७८३ त जानेवारीच्या दुसऱ्या तारखेस कोणास फारसें न समजतां गुप्तपणें तो छावणींत आला. तेथें चालीप्रमाणें पदरच्या लोकांस पगार व देणग्या वगैरे वांटल्यावर लागलेंच जाहीर झालें कीं म्हैसूरचा राजा व सर्व सेनेचा स्वामी टिपू होय. म्यावेळेस त्याच्या अमलांत ८८००० फौज होती व खजिन्यांत ३,००,००,००० रुपये होते. त्याखेरीज जवाहीर व दुसरे मौल्यवान पदार्थ पुष्कळच होते.

प्र० १२ इ० स० १७८२

टिपू गादीवर बसला.

हैदराच्या मरणाची बातमी फुटूं द्यावयाची नाहीं अशी योजना पूर्वी केली होती, तरी मद्रास सरकारास ती बातमी तेव्हांच लागली. सरकारांतून तीं बातमी कमांडर इन् चीफ् म्हणजे मुख्य सेनापति ह्यास कळविली आणि सांगितलें कीं, इकडील संस्थानांत अशी गोष्ट घडली म्हणजे फाटाफट होऊन मोठी अव्यवस्था होत असते आणि अशा अव्यवस्थेंत आपलें कार्य फार आयास न पडतां होईल. त्याकरितां त्वरेनें फौजेसहित तिकडे निघून जावें. परंतु त्यावेळेस कौन्सिलांतील सर्व सभासदांत वरिष्ठ अधिकाऱ्याचा हुकूम खालच्या कामगारांनीं मानूं नये, परस्परांत मोडाले तंटे करावे, अशा रितीची फार अव्यवस्था चालली होती. पूर्वी सर अयर

मद्रास सरकारच्या तजविजी.

कौन्सिलदारांत वेबनाव.

म० १२ इ० स० १७८३

कूट साहेबाला लष्करी काम करण्याची अगदीं मुखत्यारी देऊन खाजबर मुलकी काम पाहणाऱ्या कौन्सिलदारांचा दरोगा काढी मात्र ठेविला नव्हता, ही गोष्ट त्यावेळच्या स्थितीला आवश्यकच होती, आणि ह्या मसलतीपासून लढाईच्या कामांत सरकारास न-फायदा मोठा झाला. परंतु पुढील सेनापतीस ह्या स्वतंत्र अधिकाराचा दाखला होऊन तसाच अधिकार आपणास आहे असें ते मानूं लागले. कूट साहेबाच्या जाग्यावर जनरल स्युअर्त साहेब झाला, तो कूट साहेबाप्रमाणें आपणांसही स्वतंत्र अधिकार आहे असें म्हणूं लागला. लार्ड मकार्टनी साहेबाचें म्हणणें असें होतें कीं लष्करी खात्यावर मुलकी कामकाज पाहणाऱ्या कौन्सिलाचा हुकूम असावा. आपला मानलेला अधिकार खरा करण्यासाठीं स्युअर्त साहेब मद्रास सरकारांतून जे हुकूम आले त्यांस विरुद्ध वागत गेला; प्रथम तो म्हणाला कीं हैदर मेला आहे किंवा नाहीं ह्याविषयीं संशय आहे; दुसऱ्यांदा बोलला कीं योग्यवेळेस जाईन; आणि तिसऱ्यांदा म्हणाला कीं माझ्या फौजेचा कूच करण्याविषयीं अगदीं तयारी नाहीं. सारांश टिपूला गादीवर बसून जिकडे तिकडे स्वस्थता होऊन तेरा दिवस होत तोंपर्यंत ह्या साहेबानें कांहीं एक केलें नाहीं.

धक्का पोहोंचण्या सारखा; उग्गीर इंग्लिशांनीं लाविला.

मुलकी खात्याकडील मुख्य आणि लष्करी खात्याकडील सरदार हे सरकारचा इरादा रिद्धीस नेण्यास न झटतां एक मेकांवर दोष देत, असें चाललें होतें. ह्यामुळें आंतल्या आंत तंटे लागून त्यापासून सरकार कामास मोठी हरकत झाली. बंगाल सरकारानें ह्यागोष्टी बद्दल मुख्य दोष मद्रास सरकारावर ठेविला असें दिसतें. मद्रास सरकारास त्यांचें व्याजोक्तीचें लिहिणें आलें तें असें कीं "तुम्ही आम्हांकडे पुष्कळांविषयीं गाऱ्हाणीं सांगून पाठवितां ही आम्हांवर मेहेरबानी आहे– "ह्या सरकाराविषयीं गाऱ्हाणीं, अर्काटचा नवाब आणि त्याचे मित्र ह्यांजविषयीं गाऱ्हाणीं, हिंदुस्थानांतील सर्व सैन्याच्या अध्यक्षाविषयीं गाऱ्हाणीं, बादशाही आरमाराच्या मुख्याविषयीं गाऱ्हाणीं, तुमच्या खात्यांतील सेनापतीविषयीं गाऱ्हाणीं, आणि पुन्हा ह्या सरकाराविषयीं गाऱ्हाणीं." करनाटक सोडवून घेण्याविषयीं

जी लढाई झाली तिची सर्व देखरेख मद्रास सरकारच्या हातांत होती व त्यावेळेस सामान पुष्कळ असून तें ह्यांच्याच ताब्यांत होतें असें असतां त्या सरकारच्या मेहनतीचें फळ कांहींच झालें नाहीं असें बंगाल सरकारचें म्हणणें होतें आणि त्यावरून त्या सरकारानें कूत साहेबास बहुतेक पूर्वीप्रमाणेंच स्वतंत्र अधिकार देऊन पुन्हा सेनापतीचें काम करण्यासाठीं मद्रासेस पाठवून दिलें. असा स्वतंत्र अधिकार असूं नये म्हणून मकार्तनी साहेबानें फार आग्रह धरिला. तो शूर सरदारही जलप्रवासाच्या श्रमांनीं अगदीं शक्तून जाऊन त्याच्या शरीरांत पूर्वीचा कांहीं रोग होता तो त्याला पुन्हा उद्भवला. आणि इ० स० १७८३ त एप्रिलच्या २६ व्या तारखेस म्हणजे मद्रासेस पोहोंचल्यावर दोन दिवसांनीं तो मरण पावला. इकडील ज्या प्रतापी राजाला (हैदराला) कूत साहेबानें युद्धांत हात दाखविला होता त्याला मरून त्यावेळेस सुमारें चार महिने झाले होते इतक्यांत हात दाखविणाराही त्याच्याच सोबतीस गेला.

सर अयरकूट साहेब मरण पावला.

करनाटकांत लढाई करण्याला इतकें सुलभ पडेल असें वाटत नव्हतें; पण असेंच घडून आलें. त्याचें कारण लढाईचें मुख्यस्थान पश्चिम हिंदुस्थान झालें आहे त्यापक्षीं तिकडे आपला हात चांगला चालण्याकरितां करनाटकांतील फौज तिकडे न्यावी असें टिपूला वाटून त्यानें त्याप्रमाणें केलें. असें त्यास वाटण्याचीं कारणें लष्करच लिहूं. टिपू करनाटकांतून निघून गेल्यामुळें इंग्लिशांनीं कडलुरावर स्वारी करण्याचा निश्चय केला. फ्रेंचांनीं आपली मुख्य फौज ह्या ठिकाणीं जमविली होती, आणखीही तेथें बाहेरून फौज नेहमीं येतच होती सबब लौकर तेथें जाऊन त्या ठाण्याला वेढा घालावयास पाहिजे होतें, परंतु जनरल स्युअर्त साहेब दररोज सारी तीन मैलांची मजल करी, आणि अशा सावकाशीमुळें नेहमींप्रमाणें जेथें बारा दिवस लागावयाचे त्या मुकामास पोहोंचण्याला त्याला चार्लीस दिवस लागले. ह्याबद्दल मद्रास सरकारानें त्या साहेबावर पुढें मोठा ठपकाही ठेविला. तंजावर मुकामीं कर्नल फ्रेझर्तन साहेब होता त्यास ह्याप्रसंगीं स्युअर्त साहेबानें लागलेंच बाजाविलें. ह्याबद्दलही स्युअर्त साहेबावर त्या सरकारानें मोठा

नव्या राजाचा कारभाराची रीति.

जनरल स्युअर्त साहेबाविरुद्ध गाऱ्हाणीं.

प्र० १२ इ० स० १७८३

टपका ठेविला. फुलर्तन साहेबास आणणें ही एक तजवीज होती, पण तसाच जरूरीचा प्रसंग पडल्यास ती करावी असा समज होता. हें कसेंही असो पण वास्तविक अंश इतका दिसतो कीं, जी जी मदत त्यास मिळाली ती घेऊनही कडलूर घेणें ही गोष्ट त्या साहेबाच्या शक्तीबाहेर होती. कारण फ्रेंचांचा सेनापती बुसी ह्याजवळ फ्रेंच फौज पुष्कळ होती व ती शूर होती. आणि काळ्या लोकांची फौजही बरीच होती. जून महिन्याच्या तेराव्या तारखेस हल्ला करून ज्याकरितां लढाई चालली होती तें स्थल इंग्लिशांनीं घेतलें, परंतु तेवढ्याकरितां त्यांचे एक हजारावर लोक पडले. मध्यरात्रीं फ्रेंच लोक इंग्लिशांवर येत असतां इंग्लिशांनीं तोफांचा भडिमार करून त्यांस माघारें परतविलें. तथापि फ्रेंच आरमाराचा मुख्य सफ्रेन म्हणून होता त्यानें समुद्रावर आपलें आधिपत्य स्थापून बंदरावर सुमारें चोवीसशें लोक आणून उतरविले, पुढें फ्रेंचांचा वरचष्मा होण्याची शंका अगदीं राहिली नाहीं. नंतर त्यांनीं कांहीं एक अचाट उद्योग करण्याची तयारी केली आणि त्या उद्योगापासून आपणावर मोठा अनर्थापात होतो अशी इंग्लिशांस बळकट दहशत पडली. स्युअर्ट साहेब अगदीं त्रासला होता, आणि तशांत मद्रास सरकारानें आपणास हातचें सोडलेलें त्यास वाटलें. त्यावरून विचार न करितां त्यानें निश्चय केला कीं, कोणताही प्रसंग आला तरी आपल्या हाताखालचे लोक पुढें ढकलायाचेच. अशा ऐन वाणीच्या वक्तावर विलायतेहून बातमी येऊन पोहोंचली कीं, तिकडे दोन्ही राष्ट्रांच्या मध्यें तह झाला. त्यामुळें बुसीनें आपणाकडून लढाई बंद केली आणि टिपूच्या चाकरीस त्याचे लोक होते त्यांस लिहून पाठविलें कीं त्यांनी चाकरी सोडून द्यावी. टिपू आणि इंग्लिश ह्यांचा तंटा मिटण्यासाठीं उभयतांची मध्यस्थी करण्यासही तो खुषी होता आणि त्याप्रमाणें कांहीं उद्योगही झाला होता; परंतु तो तात्काळ फलद्रूप होण्यासारखा नव्हता.

फ्रेंच फौजेचा मोठा जमाव.

तहाची बातमी.

पश्चिम किनाऱ्यावरील बलस्थान.

पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यावर ह्यावेळेस मोठाल्या घडामोडी होऊं लागल्या त्यांविषयीं आतां लिहितों. राज्यावर आपला वारसा शाबीद करण्याकरितां टिपू तांतडीनें श्रीरंगपट्टणास निघून गेल्या-

वर इंग्लिशांचें पुन्हा वर्चस्व झालें; कारण त्याच वेळेस जनरल माथ्यूस साहेब पुष्कळ फौजेनिशीं मुख्य अधिकारावर आला. ह्या अधिकाऱ्यास मुंबई सरकारांतून नेहमीं मोठें निक्षून लिहून येत होतें कीं, लढाई सुरू करून फार जवळच्या रस्त्यानें बिदनूर शहरावर फौज न्यावी आणि ह्या गोष्टीविषयीं अगदीं विलंब लावूं नये. पण ज्या सरकारांतून असें खडसून हुकूम येत होते ते फारच दूर पडलें होतें. तेव्हां या हुकुमांचा किती उपयोग पडणार आहे हें स्पष्टच आहे. माथ्यूस साहेबानें उलट सरकारास लिहिलें यांत हुकुमाप्रमाणें चालण्यास संकटें कोणतीं व मला वरें दिसेल त्याप्रमाणें वागण्याचें माझ्या स्वाधीन ठेविलें नाहीं तर नुकसान काय हें सर्व फार चांगल्या रीतीनें दाखविलें होतें. आणि यद्यपि अशाप्रकरणीं जे हुकूम वगैरे येत असतात त्यांत स्पष्ट लिहिलें नसलें तरी सेनापतीच्या अकलेवर कांहीं थोडें तरी असतेंच. तथापि जारसें न पाहतां सरकार हुकुमाप्रमाणें काम सुरू करण्याकरितां माथ्यूस साहेब एकाएकीं निघाला. त्या किनाऱ्यावर बिदनूर शहराला फार लगत जें बंदर होतें तेथें आपली फौज नेऊन त्यानें उतरविली; आणि फौजेच्या अघाडीवर व पिछाडीवर टिपूच्या फौजेच्या टोळ्या घिरट्या घालीत असतां त्यांची भीति तिळप्राय न बाळगितां ज्या ठिकाणीं घाट निखालस सुळक्या सारखा होता त्या ठिकाणीं फौज चढवायास आरंभ केला. पुढें त्यास जय मिळेल अशी अटकळ बांधण्यास कांहीं आधार नव्हता, पण त्यास जय मिळाला. त्यास सर्व गोष्टी अनुकूलच होत गेल्या, आणि एकही वार काढावा न लागतां बिदनूर आपोआप त्याच्या हातीं आलें. अशी बोलवा आहे कीं ह्या शहरांत ८००००० रूपयांचा माल त्या साहेबास सांपडला आणि त्यापैकीं बऱ्याच मालाचें त्यानें गिळंकृत केलें, असा आरोपही त्याजवर आला होता. परंतु पुढें कांहीं नवीन प्रकरणें उत्पन्न झाल्यामुळें त्या गोष्टीची पुरी चौकशी झाली नाहीं. कर्नल विक्स साहेबाच्या म्हणण्यावरून असें दिसतें कीं, माथ्यूस साहेबास जय मिळाला तो केवळ फितूर झाल्याच्या योगानें मिळाला. तरी हें खरें आहे कीं हा फितूर झाल्याचा मजकूर माथ्यूस साहेबास

म० १२ इ० स० १७८३

जनरल माथ्यूस साहेबास थोडाबहुत पावेतों जय मिळाला.

संभव नसतां जय मिळाला त्याचें कारण.

म० १२ इ० स० १७८३

अगदीं माहीत नव्हता, त्या फितुराच्या प्रकार असा कीं सिकभयाज म्हणून एक हैदराजवळ गुलाम होता, त्याजवर त्याची मर्जी होती. सबब त्यानें त्यास चिदनूरचा सुभा दिला होता. हैदर टिपूचा नेहमीं पाणउतारा करीत असे. तो त्यास असें म्हणे कीं तुजपेक्षां ह्या गुलामाच्या आंगांत गुण चांगले आहेत. ह्या कारणावरून टिपू त्या गुलामाला अगदीं पाण्यांत पाहत असे. पुढें हैदर मेल्यावर टिपू राज्यावर आला तेव्हां त्यानें लागलाच असा हुकूम लिहिला कीं, सिकभयाज ह्यास पकडून त्याचें डोकें उडवावें. तो हुकूम सिकभयाज ह्यानें मध्यें धरिला, आणि तोच त्याच्या मनांत चेव येऊन त्यानें किल्ल्यांत परत जाऊन किला इंग्लिशांच्या स्वाधीन केला. ह्याचा धनी टिपू हें अघोर कर्म करण्यास प्रवृत्त झाला तरी, इंग्लिश टिपूबरोबर लढणार होते त्यांस सिकभयाज लढाईंत मिळाला नाहीं. तर टिपू तेथें आला तेव्हां तेथून निघून जाऊन त्याच किनाऱ्यावर एके ठिकाणीं जाऊन सुखवस्तु राहिला.

टिपूनें परत स्वारी केली.

आपलें एवढें मोठें ठाणें इंग्लिशांच्या हातीं गेलें आणि ते लोक आतां आपल्या शहरावर चालून येताहेत, हें वर्तमान टिपूस समजतांच त्याला फार संताप आला. माथ्यूस साहेबास त्याच्याच लोकांनीं कळविलें कीं आपल्या फौजेच्या मागें टिपूच्या फौजेच्या टोळ्यांच्या दोळ्या येऊन सगळ्या फौजेला वेढा देत आहेत; आणि एवढ्या फौजे बरोबर पुढें लढणें फार कठीण पडेल. त्या वेळेस इतकें झालें होतें कीं तुमच्या बुद्धीस चांगलें दिसेल त्याप्रमाणें तुम्हीं चालावें अशी मुंबई सरकारची परवानगी माथ्यूस ह्यास मिळाली होती. त्याला जो मार्ग सहज जय मिळाला म्हणून लिहिलें त्यावरून तो अगदीं फुगून जाऊन त्यानें डोळे मिटून सर्व भरंवसा नशिबावर ठेविला. किती एकांच्या म्हणण्यांत असें देखील आहे कीं, आपणास कांहीं अमानुष शक्तीची मदत आहे असा त्याचा विश्वास बसला होता. त्याप्रमाणें निघोर राहून आरमाराकडे जीं त्याचीं कागद पत्रें जात तीं शत्रूच्या हातीं सांपडलीं तरी तो अगदीं फिकीर करीत नसे. इकडे टिपूच्या पदरीं कासिम्मी म्हणून एक फ्रेंच इंजनेर होता त्याच्या विद्येची मदत त्याच्या सर्व

इंग्लिश सरदाराचा मुर्खपणाचा विश्वास.

फौजेस होऊन तिनें इंग्लिशांच्या फौजेस वेढा दिला. तेव्हां इंग्लिशांस किल्ल्यांत शिरणें भाग पडलें. नंतर ते किल्ल्यांतून चांगले लढले, परंतु शेवटीं आपल्या सोईची एक गोष्ट ठरवून घेऊन किला स्वाधीन करणें त्यांस प्राप्त झालें. ती गोष्ट ही कीं आम्हांस पश्चिम किनाऱ्यावर निर्भयपणें जाऊं द्यावें. असें इंग्लिशांनीं मागितल्यावरून टिपूनें तें मान्य केलें. टिपूनें बिदनूरच्या किल्ल्यांत गेल्यावर खजिन्याकडे स्वारी केली आणि पाहतो तों खजिना अगदीं रिकामा; मग त्याच्या आंगाचा लाही झाली. नंतर इंग्लिश कामदारांचा झाडा घ्यावा असा त्यानें हुकूम फर्माविला. त्याप्रमाणें झाडा घेतांच त्यांजवळ कांहीं रोख पैसा व कांहीं जवाहीर मिळून पुष्कळ ऐवज सांपडला. इकडच्या लोकांचा असा समज आहे कीं ह्या प्रकारच्या ऐवजावर सर्व लोकांची सत्ता असते. ही लबाडी उघाडीस आल्यावरून टिपूस असें वाटलें कीं इंग्लिशांबरोबर केलेल्या करारापासून आतां आपण सुटलों. या खोड्या कामांतील कैदी लोकांस बिड्या घालून म्हैसूर प्रांतांतील निरनिराळ्या किल्ल्यांत पाठवून देऊन तेथें त्यांस फार हाल भोगावयास लाविलें. प्र० १२ इ० स० १७८३ कैदी होणें भाग पडलें,

मंगळूरचें संरक्षण.

ह्यानंतर सपाटीच्या मुलखांत उतरून टिपूनें मंगळुरास वेढा घातला. हा किला मोठासा मजबूद नसतां कर्नल कांबेल साहेबानें मोठ्या शौर्यानें त्याचा बचाव केला. छपन्न दिवस एकसारखा वेढा होता. त्यामुळें इंग्लिशांचा बहुतेक सर्व खराबा झाला, तों इतक्यांत इंग्लंद व फ्रान्स ह्या दोन देशांचा तह झाला म्हणून मागें बातमी आली होती ती इकडे पोहोंचली. त्यावरून कौसिमी, लाली, आणि वैदनात हे फ्रेंच सरदार आपल्या फौजेसुद्धां टिपूच्या लष्करांतून चाकरी सोडून निघाले. ह्या गोष्टीचा टिपूला मोठा राग आला. कारण त्याला असें वाटत होतें कीं ह्या लढाईंत हे सरदार आपणांस फ्रेंच कंपनीचे नौकर म्हणून मिळाले आहेत असें नाहीं, तर हे स्वतांच्या दोस्तीकरितां मिळाले आहेत. अस्तु, टिपूच्या हातून कांहीं तोशीस लावून न घेतां आपली सुटका करून घेण्यास या सरदारांस मोठे प्रयास पडले. हे सरदार निघून गेल्यावरही वेढा कायम ठेवण्याविषयीं

इंग्लिश व फ्रेंच ह्यांमध्यें तह झाल्याचें वर्तमान आलें.

प्र० १२ इ० स० १७८२ टिपू सल्ल्यास राजी झाला.

टिपूनें कांहीं प्रयत्न केला, पण तो व्यर्थ गेला. शेवटीं तो सल्ला करण्यास राजी झाला. आणि त्या सल्ल्याची एक आट अशी होती कीं, तो झाल्यानंतर मलबार किनाऱ्यावर कोठेंच इंग्लिशांचें व टिपूचें युद्ध होऊं नये. दुसरी आट अशी होती कीं, मंगळूरच्या किल्ल्यांत त्यावेळेस जितकी फौज होती तितकीला पुरण्यासारखें अमुक खंडी धान्य वगैरे सामान किल्ल्यांत टिपूनें जाऊं द्यावें. हें दुसरें कलम नांवाला मात्र राहिलें होतें बाकी त्यांतलें हांशील तर मुळींच नाहींसें होऊन गेलें होतें. मुळीं अन्न सुग्रास नाहीं व तेंही पोटभर नाहीं असें किल्ल्यांतल्या फौजेचें झालें त्यामुळें किल्ल्यांतल्या फौजेच्या प्रकृति एकाएकीं अगदीं बिघडून गेल्या. हिकडे जनरल एम लियद ह्यानें वास्तविक पाहिजे तितकें धान्य आणण्याची चांगली तजवीज करावी तीं त्यानें केली नाहीं. भलतेच वेळेस कांकूं करूं लागला. ह्याप्रमाणें सुमारें नऊ महिने वेढ्याचें दुःख सोसून शेवटीं कांबेल साहेबास किल्ला स्वाधीन करणें भाग पडलें. असा परिणाम झाला आणि चाकरीच्या मेहनतीनें तो फारच थकून गेला होता ह्यामुळें पुढें लौकरच मृत्यु पावला.

दक्षिणेंत फायदा झाला तो.

मुलकी खात्याचा वकील सेलिवान साहेब नामें होता तो मोठा चतुर व योजक होता, आणि लांग साहेब आणि फुलर्तन साहेब हे उभयतां युद्ध कर्मांत निष्णात होते. तेव्हां सेलिवान साहेबाचा इकूम आणि या दोघांचें युद्धचातुर्य ह्या दोन गोष्टी एकत्र मिळाल्यामुळें इंग्लिशांस दक्षिणेकडे पुष्कळ मोठाले फायदे झाले. करूल व डिंडिगल हीं दोन ठाणीं प्रथम यांच्या हातीं आलीं आणि पालघाट व कोईमत्तूर हीं दोन मागून हातीं आलीं. फुलर्तन साहेबाची तर घाट चढावा आणि श्रीरंगपट्टणावर स्वारी करावी ह्याविषयीं तयारी चालली होती. तों इतक्यांत त्याला हुकूम आला कीं तुम्हीं पुढें चाल न करितां अलीकडे जो मुलूख तुम्हीं घेतला असेल तो टिपूचा टिपूस परत द्यावा. टिपूनें इंग्लिशांपाशीं मागितलें कीं, सल्ल्याचा मजकूर बोलण्याकरितां तुम्हांकडील दोन वकील आमच्या छावणींत पाठवावे. मद्रास सरकारानें ती विनंती मोठेपणानें मान्य केली; पण कर्नल विकस साहेब म्हणतो

कीं, त्यांनीं हें चांगलें केलें नाहीं. हे वकील तेथें गेल्यानंतर त्यांस टिपूचा मंगळुराविषयीं काय उद्योग चालला आहे हें जेव्हां समजलें तेव्हां त्यांनीं फुलर्तन साहेबास लिहिलें कीं, मुलूख परत देण्याचें काम तहकूब करावें. परंतु शेवटीं तह झाला त्यांतील कलमें येणेंप्रमाणें– उभय पक्षांनीं आपापला प्राचीन मुलूख ठेवून नवीन घेतलेला मुलूख ज्याचा त्यास परत द्यावा; आणि टिपूनें इंग्लिशांपैकीं ज्यांस कैदेंत ठेवून हालहाल मांडले होते त्यांतील जे जिवंत असतील त्यांस सोडून द्यावें. प्र० १२ इ० स० १७८३

(बारावें प्रकरण समाप्त.)

प्रकरण १३ वें.

इंग्लिशांनीं म्हैसूर घेतलें त्याविषयीं.

टिपूचा अंमल– ख्रिस्ती लोक व कुर्ग येथील लोक त्यांस टिपूनें त्रास दिला– त्याजवर बंड– त्याचा जय– तहाचा ठराव– कालिकोट येथील लोकांचे टिपूनें हाल केले– त्रावणकोरावर हल्ला– तो मागें हटविला– शेवटीं जय झाला– मार्किस कार्नवालिस हा हिंदुस्थानांत आला– त्याचें मत– तो टिपूवरोवर लढण्याचा निश्चय करितो– निजामावरोवर तह– जनरल मेडोज साहेव मोहिम सुरू करितो– डिंडिगल व पालघाट हे हस्तगत होतात– टिपूनें जे डावपेंच केले त्यांपासून त्याचें हित झालें– तो करनाटक ओसाड पाडितो– कार्नवालिस हा सेनापति होतो– तो बंगळुरावर चालून जातो– तो किल्ला त्याचे हातीं लागतो– इंग्लिशांच्या मदतीस निजामाकडून आलेली फौज– श्रीरंगपट्टणावर स्वारी– लढाई– इंग्लिशांवर संकट पडून ते मागें पळाले– जनरल आवर क्रांवी साहेव हा पुढें चाल करून येतो आणि मागें हटतो– मराठ्यांवरोवर प्रसंग– इंग्लिश कित्तीएक डोंगरी किल्ले जिंकितात– श्रीरंगपट्टणावर दुसऱ्यानें स्वारी– टिपूचा पराभव– त्याकडून तहाचें बोलणें– इंग्लिशांनीं मान्य केलेल्या गोष्टी– म्हैसूरचे राजे इंग्लिशांकडे ओलीस येऊन राहिले– अडचणी– शेवटचा निकाल– मोहिमेचे सामान्य परिणाम– सर जान शोर ह्याची समेट करण्याविषयीं तजवीज– मार्किस वेल्सली साहेव हिंदुस्थानांत येऊन दाखल होतो– त्याची राज्यपद्धति– टिपूचा फ्रेंचांवरोवर तह– निजामाच्या दरबारांत ब्रिटिशांचें वजन पडतें– सुलतानावरोवर तह– त्याजवर फौज जाती– मुंवईहून आलेल्या फौजेवर तो हल्ला करि-

तो– ब्रिटिश लोक श्रीरंगपट्टणावर जातात– मलाविली येथील लढाई– टिपू निराश होतो– वेढ्याची सुरूवात– त्यांतील कृत्यें– तह करण्याविषयीं टिपू प्रयत्न करितो– त्याला भीति पडती– श्रीरंगपट्टणावर हल्ला करून तें घेतलें– राजाचा मृत्यु– त्याचा स्वभाव– कुळकथा– म्हैसूरच्या राज्याची वासलात.

टिपूचा इंग्लिशांशीं मागें सांगितल्याप्रमाणें तह झाल्यावर हिंदुस्थानांतील राजे रजवाडे ह्यांच्या मध्यें तो मोठा अग्रगण्य झाला. युद्धाविषयीं व मोठेपणाचे इच्छेविषयीं पाहिलें असतां टिपू आपल्या बापाप्रमाणेंच होता असें म्हटल्यास चिंता नाहीं. आणि कधीं कधीं तर युद्धकौशल्य बापापेक्षांही त्याच्या अंगीं अधिक दृष्टीस पडे. असें होतें तरी बापाच्या वृत्तीला आणि त्याच्या वृत्तीला फारच तफावत होती, हें मागें सांगितलेंच आहे. ती तफावत अशी, हैदराचें असें असे कीं, आपल्या स्वार्थाची जी मसलत असेल ती शेवटास नेण्याचा जो एखादा सरळ रस्ता असेल तो धरून तिच्याच मागें लागावयाचें, मग मध्यें इतर व्यवधानाकडे अगदीं मन घालावयाचें नाहीं. टिपूचें म्हटलें म्हणजे अनेक विचार मनांत घोटाळत असावयाचे आणि अनेक प्रकारचे तरंग उठावयाचे असें असे त्यामुळें एकच रस्ता धरून आपली मसलत शेवटास नेणें हें त्याच्या हातून होत नसे. मुसलमानी धर्माविषयीं हैदर अगदीं औदासिन्य दाखवीत असे. पण, टिपूच्या मनांत त्या धर्माच्या बद्दलविषयीं विलक्षण वेड शिरलें होतें. आणि त्या वेडामुळेंच दुसऱ्यांवर अत्यंत जुलूम करून त्यांच्या व आपल्यामध्यें त्यानें विलक्षण द्वेष उत्पन्न केला. ह्या गोष्टींचा परिणाम असा झाला कीं हैदराला कांहीं एक आधार नसतां त्यानें कांहीं युक्ति व कांहीं लबाड्या करून जें एवढें राज्य संपादिलें होतें तें टिपूच्या हातीं आल्यावर तो तें गमावून आपण मरून गेला.

प्र० १३ इ० स० १७८३

टिपूचें बल.

टिपूचा स्वभाव.

कानडाप्रांताच्या हद्दीवर कांहीं लोक पोर्तुगीज लोकांनीं ख्रिस्ती केलेले होते, त्या लोकांस धर्माच्या बाबतीविरून त्रास देण्यास

ख्रिस्ती लोकांचा छळ.

प्र० १३ इ० स० १७८३

टिपूनें आरंभ केला. ह्याच उदाहरणांत पाहिलें असतां अशा प्रकारें या लोकांस त्रास देण्याविषयीं टिपूचें दाखविण्या सारिखें कांहीं कारण होतेंसें दिसतें. युरोपियन लोकांनीं मागें इकडील लोकांस नवान (ख्रिस्ती) धर्म स्वीकारण्याविषयीं फार जुलूम केला असा टिपूचा लेख स्पष्ट आहे. आणि हें प्रायः खरें आहे ह्यांत शंशय नाहीं. टिपूनें ६०,००० ख्रिस्ती लोक जमवून त्यांजवर जुलूम करून त्यांची सुंता करविली. नंतर त्यांस श्रीरंगपट्टणास नेऊन निरनिराळ्या पलटणांत घालून टाकिलें. आणि अशाप्रकारें त्यांचे फार हाल झाले ह्यामुळें बहुत लोक मेले असेंही म्हणतात. टिपूच्याच म्हणण्याप्रमाणें पाहिलें असतां ६०,००० लोक जमविले होते. पण बिकसाहेबाच्या म्हणण्याप्रमाणें पाहिलें असतां सारे ३०,००० होते. भलताच एक अयुक्तिक मार्ग काढून टिपू म्हणत असे कीं, मुसलमानी धर्म घेण्याविषयीं कोणी आग्रह केला असतां ज्यास आग्रह होतो त्याची कांहीं अप्रतिष्ठा नाहीं, तर उलटें तें त्यास मोठें भूषण आहे. तो तोंडानें मात्र असें म्हणत असे; परंतु जे लोक बंड करीत अथवा दुराग्रह धरीत त्यांस त्यानें ती शिक्षा करून ठेविली होती. कुर्ग प्रांत म्हटला म्हणजे अगदीं डोंगरी मुलूख आहे, हा प्रांत म्हैसूरच्या अमलांत आला होता पण त्यांतले लोक त्या अमलास फार नाखुष होते. टिपू व इंग्लिश ह्यांची लढाई लागली तेव्हां त्या लोकांनीं आपलें स्वातंत्र्य पुन्हा स्थापण्याचा उद्योग चालविला होता. कारण मुसलमानी धर्म त्यांस आवडत नव्हता व त्या अमलांत त्यांच्या मालमत्तेचें संरक्षणाकडे टिपूचें अगदीं दुर्लक्ष्य होतें, सबब ह्या दोन कारणांमुळें ते लोक मुसलमानांचा द्वेष करीत होते. त्यांचा अगदीं निकरानें लढण्याचा जेव्हां बेत दिसला तेव्हां टिपूला आपल्या सर्व फौजेनिशीं त्यांच्यावर स्वारी करणें भाग पडलें. टिपू तेथें गेला तेव्हां ते लोक किर्रशाड्यांत व दऱ्यांत दूर जाऊन वसले, आणि त्या ठिकाणीं तर टिपूचा प्रवेश होण्याचा अगदीं संभव नव्हता. सबब टिपूनें असें केलें कीं, आपल्या फौजेच्या तुकड्या करून ज्या ठिकाणीं लोक पळून गेले होते त्या ठिकाणाला, पारधी लोक मृगयेला गेले असतां श्वापदांस कों-

कुर्गवाची बेअमर्याद वर्तणूक.

डिनात त्याप्रमाणें गराडा घालून त्या लोकांस कोंडिलें. शेवटीं ते ज्या ज्या ठिकाणीं लपले होते त्या त्या ठिकाणीं जाऊन सत्तर हजार लोक धरून नेऊन ते ज्या दोन गोष्टींचा अत्यंत त्रास करीत असत त्याच दोन गोष्टी म्हणजे सुंता आणि दास्य, ह्या त्यांजकडून करविल्या. अशा क्रूरकर्मापासून जो टिपूचा जय झाला त्यावरून तो अगदीं उतून जाऊन त्यानें आपणास बादशाह ही पदवी लावून घेतली. इंग्लिशइतिहासकारांनीं बादशाह ह्या शब्दाचा अर्थ किंग् (राजा) असा केला आहे पण तो अर्थ बरोबर नाहीं. आज पावेतों ही पदवी दिल्लीचा अधिकारी जो मोंगल त्यास मात्र असून त्याचा वरिष्ठ अधिकार म्हैसूरचे राजे कबूल करीत आले होते. परंतु टिपूनें ही पदवी आपणाला घेतली तेव्हां लागलेच सर्व रयत लोक देवळांतून बादशहाच्या कल्याणाकरितां ईश्वराची प्रार्थना करावयाची ती दिल्लीचा मोंगल शाहअलम ह्याजकरितां न करितां टिप करितां करूं लागले.

म० १३ इ० स० १७८३

टिपूसुलतान आपणास बादशाह म्हणवूं लागला.

टिपूचें वजन पुष्कळ वाढत चाललें, व त्यानें आपणास मोठी पदवी वगैरे घेतली ह्यामुळें इ० स० १७८५ त त्याजवर मोठें बंड झालें. तें असें कीं, दक्षिण हिंदुस्थानांत एवढें जबरदस्त बंड आल्लीकडे बहुत दिवसांत झालें नव्हतें. मराठ्यांनीं हैदराचें संस्थान बहुत वेळां अगदीं जमीनदोस्त करून टाकिलें होतें, आणि आल्लीकडे त्यांच्यांत अगदीं फाटाफूट झाली होती तरी एतद्देशीय राजांमध्यें बलाढ्य असे तेच होते. त्यांनीं दिल्ली शहर घेऊन मोंगलाला आपल्या हातांत आणून ठेविलें होतें. आणि एवढ्या विस्तीर्ण राज्याकरितां त्यांजबरोबर भांडणारा अफगाणच्या राजाखेरीज दुसरा कोणी नव्हता. सामर्थ्यानें व अधिकारानें मराठ्यांच्या खालोखाल निजाम होता, त्याबरोबर त्यांनीं साह्यसंकेत केला होता. त्यांचा उद्देश असा होता कीं म्हैसूरचें संस्थान जिंकून घेऊन तें सर्व उभयतांमध्यें वाटून द्यावें. ह्याकांमात आपला जय होईल अशी मराठ्यांला पुरी खातरी होती म्हणून त्यांनीं आपल्या देखील सर्व सरदारांस बोलाविलें नाहीं. आणि इंग्लिशांचीही कुमक मागितली नाहीं. कारण त्यांस म्हैसूरच्या राज्याचा कांहीं हिस्सा

टिपूविरुद्ध कट.

मराठ्यांचा भरंवसा.

म० १३ इ० स० १७८३

द्यावा लागेल. मराठे व टिपू ह्यांच्या राज्यांच्या मधील मुख्य सीमा तुंगभद्रा नदी होय. तिकडे मराठे व निजाम ह्यांनीं जाऊन वदामीच्या किल्ल्याला वेढा घालून तो घेतला आणि त्यांचे घोडेस्वार सर्व प्रांतांत पसरले. ह्या वेढा घालणाऱ्या फोजेला टिपूनें मागें हटविण्याचा उद्योग केला नाहीं. तर तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेस अंदोणी म्हणून निजामाचा मुख्य किल्ला होता त्याजवर एका वांकड्या रस्त्यानें टिपू आपली फौज घेऊन आला. हा किल्ला मोठा जबरदस्त आहे असें निजामास वाटत होतें ह्यामुळें त्यानें तेथें आपलें लहानसें ठाणें केलें होतें. त्यांत त्याच्या भावाचा व पुतण्याचा असे दोघांचे जनानखाने होते. टिपूनें आपल्या चालीप्रमाणें मोठ्या आवेशानें वेढ्याचें काम चालविलें होतें; पण हल्ला करण्याची एकाएकीं फार जलदी केली; तेथच्या किल्लेकऱ्यानें मोठ्या शौर्यानें किल्ल्याचा बचाव केला ह्यामुळें टिपूला सर्वथा माघारें फिरावें लागलें. टिपूचा असा मोड झाल्यामुळें निजाम व मराठे ह्यांच्या एकत्र जमलेल्या फौजांस पुढें अंदोणीकडे येण्यास संधी सांपडून त्यांनीं टिपूस माघारें जाणें भाग पाडिलें. परंतु पावसाळा आल्यामुळें तुंगभद्रेला पूर येण्याचे दिवस जवळ येऊन ठेपले सबब सामान सुमान सुद्धां सर्व लष्कर नदीचें दक्षिण तीर अगर उत्तर तीर ह्यांतून कोणत्या तरी एकावर नेऊन ठेवणें मराठ्यांस भाग होतें. पण दक्षिण तीरावर टिपूसारखा प्रबल शत्रु असतां त्या किनाऱ्यावर एवढें मोठें सैन्य आणि इतकें थोरलें सामान नेऊन त्याच्या दाढेस देणें हें ठीक नाहीं असें वाटून ते नदी उतरून उत्तर तीरास आले; ह्यामुळें पावसाळा अहि तोपर्यंत टिपूच्या राज्यास भय नाहीं असें झालें. अंदोणी किल्ल्यांत राहणारीं निजामाच्या कुटुंबांतलीं सर्व माणसें लवकर बाहेर काढून घेऊन तो किल्ला देखील सोडून देणें त्यांस भाग पडलें. नंतर टिपू किल्ल्याच्या आंत शिरून जों पाहतो तों राजवाड्यांतल्या खोल्या वगैरे जशा मोठ्या उंच सामानानें भरून वसण्याकरितां वगैरे तयार करून ठेविलेल्या असाव्या तशा पुष्कळ खोल्या आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें.

हल्ला करण्याचा उनावळा केल्यामुळें टिपूस मागें फिरावें लागलें.

अदोणि किल्ल्यावर हल्ला.

अंदोणीचा किल्ला सोडिला.

आपणाला जय मिळाला असा डौल घालण्याविषयीं टिपूस हें खरोखर कारण झालें. परंतु त्याचा येवढ्यावरच संतोष नव्हता आणखी पुढें जय मिळविण्याचा त्याचा मोठा इरादा होता. त्यानें बेदनूरच्या रानांत पुष्कळ वृक्ष तोडविले आणि नदीच्या प्रवाहांतून खालच्या आंगास नेऊन त्यांचे कांहीं ताफे व कांहीं नावा करविल्या अशा कीं त्यांच्या योगानें आपली फौज नदी पलीकडे नेतां येईल. तुंगभद्रा उतरून जाऊन एवढ्या मोठया प्रबल सेनेच्या आंगावर पडणें हें मोठें साहसकृत्य आहे, सबब आपण ह्यास हात घालूं नये असें टिपूच्या सर्व सरदारांनीं त्यास पुष्कळ सांगितलें पण तें कांहीं एक न ऐकतां आठ दिवसांच्या आंतच त्यानें आपलें सर्व दळ तुंगभद्रानदीच्या उत्तर तीरावर नेलें. मराठे व निजाम ह्यांस ही गोष्ट समजली तरी खरीच वाटेना. ह्यामुळें बंदोबस्ताची एखादी तजवीज करणें ती त्यांनीं केली नाहीं. ह्यामुळें मग त्यांस समजलें कीं आपणास एकदम टिपूनें अगदीं घेरून टाकिलें आहे. पुढें टिपूनें कैक वेळां त्यांजवर चाल केली व त्यांनीं कैक वेळां टिपूवर केली असें होऊन शेवटीं टिपूनें आपल्या सर्व फौजेच्या चार टोळ्या करून मध्यरात्रीस त्या एकत्र जमलेल्या फौजेच्या छावणीवर हल्ला केला. त्या चारी टोळ्या एक विचारानें लढल्या नाहींत ह्यामुळें त्या कामांत यावा तसा जय आला नाहीं. तथापि त्यापासून इतकें झालें कीं शत्रूस आपली जागा सोडावी लागली. आणि ती जागा घेण्याविषयीं त्यांनीं पुन्हा उद्योग केला तेव्हां तर त्यांस आपलें बहुत नुकसान करून घेऊन माघारें फिरावें लागलें. एकंदरीनें त्या दिवशींच्या लढाईचा परिणाम पाहतां एकत्र जमलेल्या लोकांस आपण सावनूर प्रांत सोडून माघारें जावें असें वाटलें. इतक्यांत परस्परांत तहाचें बोलणें लागलें त्यांत असें ठरलें कीं, हैदरानें जी सालबार खंडणी देण्याची कबुलात केली होती ती खंडणी टिपूनें कबूल करावी. ही खंडणी पुष्कळ कमी केली होती तरी पंचेचाळीस लाख रुपये खंडणीचा आकार होता. त्यापैकीं तीसलाख रुपये टिपूनें लागलेच रोख दिले. ह्या युद्धामध्यें अंदोणी व दुसरीं कांहीं शहरें टिपूनें घेतलीं होतीं तीं त्यांचीं

प्र० १३ इ० स० १७८७ टिपूचा अपघटित बेत.

थोडासा जय मिळतो.

परस्परांचा तह झाला.

इ० स० १७८७

प्र० १२

न्यांस परत दिलीं आणि त्यांबदल तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेकडील बहुतेक सर्व हिंदुस्थानाचा अधिपति टिपू आहे असें मराठे व निजाम ह्यांनीं कबूल केलें.

एवढ्या प्रबल शत्रूबरोबर लढाई करून टिपूनें जय मिळविला ह्यामुळें सर्व हिंदुस्थानांत, टिपू युद्धाच्या कामांत अत्यंत निष्णात अशी त्याची मोठी कीर्ति झाली. शत्रूशीं तह केला त्यांतही त्यानें मोठा शहाणपणा व नेमस्तपणा दाखविला हेंही त्याच्या कीर्तीविषयीं कारण झालें. आतां त्यास असें वाटूं लागलें कीं, तुंगभद्रेच्या दक्षिण प्रदेशाचा मालक मीच आहें आणि लोकांवर पाहिजे तसा जुलूम करून मुसलमानी धर्म वाढविण्यासही आपण मुखत्यार आहों. त्याचा प्रथम बेत हा होता कीं सह्याद्री खालीं उतरून कालिकोट प्रांतांत स्वारी करावी. ह्याप्रांतांत मोठ्या श्रमानें जय मिळवून हैदरानें तो म्हैसूरच्या राज्या खालीं आणिला होता. ह्या प्रदेशांत एका जातीचे लोक टिपूच्या पाहण्यांत आले. त्यांचा मुसलमानी धर्माविषीं इतका द्वेष होता कीं त्यांच्या घराला बाहेरच्या आंगानें देखील जर एखादा मुसलमान शिवला तर ते आपलें सगळें घर जाळून फस्त करीत, त्या लोकांचा धर्म पाहिला असतां असा होता पण नीति पाहिली असतां फारच खराब होती. ती अशी, कीं तेथल्या बडेलोकांस नेअर असें म्हणतात त्यांमध्यें व्यभिचार म्हणजे सर्वमान्य असा होता. सारांश टिपूनें जें त्यांस म्हटलें कीं "तुम्ही संपूर्ण लोक व्यभिचारापासून उत्पन्न झालां आहां, आणि तुम्हांमध्यें स्त्रीपुरुषांचे जे परस्परांशीं संबंध आहेत ते मनांत आणिले असतां रानांतल्या पशूंस तरी लज्जा म्हणून कांहीं पदार्थ असतो, पण तुम्हांला तो अगदीं नाहीं असें दिसतें." ह्यांत तिलप्राय अत्युक्ति नाहीं. अशा जरी त्यांच्या चाली होत्या तरी ते जातीचे मोठे शूर होते. टिपूचा बेत होता कीं जुल्मानें त्या लोकांची सुंता करून त्यांजकडून गोमांस खावयाचें. त्यांचा तर असा निश्चय होता कीं टिपूशीं मोठ्या निकरानें लढून ही गोष्ट होऊं द्यावयाची नाहीं. आणि त्याप्रमाणें त्यांची तयारीही होती. नंतर ते अगदीं पराजित झाल्यावर देखील ह्या

धर्म युद्ध.

दोन गोष्टी त्यांनीं मोठ्या पराकाष्ठेनें कबूल केल्या. कांहीं लोक जंगलांत जाऊन लपले व कांहीं आसपासच्या पर्वतांत जाऊन राहिले. सरते शेवटीं कितीएकांची सुंता केली व कितीएकांस घर, दार, वतनवाडी, ह्यांवरून हांकून दिलें; ह्याप्रमाणें सर्वांची वासलात लाविली. ह्यानंतर देवळें वगैरे ज्या धर्मसंबंधी इमारती त्यांवर टिपूनें हत्यार धरिलें. तो लोकांत प्रतिष्ठा सांगत असे कीं सोनें अथवा रुपें अथवा तांबें ह्या धातूंच्या ज्यांवर छाबण्या असतील आठ हजार देवळें मी पाडून जमीनदोस्त करून टाकिलीं, आणि मूर्तींच्या पायांखालीं जी ठेवी पुरलेली होती ती खणून काढून घेतली. पण ह्या गोष्टींत त्यानें आपल्याच कौर्याचें फार अतिशयोक्तीनें कथन केलें आहे, असें कांहीं कारणांवरून खचित वाटतें. असली कृत्यांवरून तो फारच चढून गेला. त्याला असें वाटलें कीं, आपल्या अंगीं खरोखरी कांहीं दैविकशक्ति आहे, आणि ती आपला पैगंबर जो महंमद त्यापेक्षां कांहीं थोडी कमी असल्यास कोण जाणे. पावसाळ्याच्या ऐन भरामध्यें त्याच्या पदरच्या कामगार लोकांनीं त्यास पुष्कळ आग्रह केला कीं आपण ह्या अशा वेळेस घाट चढून जाण्याचा उद्योग करूं नये. त्यानें उत्तर केलें कीं "मी जाईपर्यंत वृष्टि बंद करावी अशी मेघांस आज्ञा करीन." असो पण ह्यानंतर लवकरच त्याला एका जबरदस्त शत्रूबरोबर युद्ध करण्याचा प्रसंग आला, आणि त्या शत्रूपुढें त्याच्या मानुषशक्तीचा उपाय चालला नाहीं व दैविकशक्तीचाही चालला नाहीं.

प्र० १३ इ० स० १७८८

टिपूची अपणाविषयींची बढाई.

हिंदुस्थानाच्या दक्षिण टोंकास (म्हणजे कुमारी केपाजवळ) पश्चिम भागांत त्रावणकोरचें राज्य आहे. त्या राज्याच्या आसपासचीं मोठालीं राज्यें उलथींपालथीं होऊन राज्यक्रांति होऊन गेल्या, परंतु तेथचे राजे दुसऱ्या राज्यांच्या तंत्रांत न पडतां आपलें स्वातंत्र्य राखून खुशाल होते. त्या राज्याच्या पूर्वेकडच्या आंगास कुमारी केपापर्यंत एकसारखा सह्याद्रिपर्वताचा फांटा गेला आहे, आणि उत्तरेच्या आंगास एक सरासरी कोट आहे व त्याच्या बाहेर खंदक आहे त्यामुळें त्या सर्व बाजूचा बंदोबस्त आहे. हा मुलूख टिपूनें आलीकडे जो मुलूख जिंकिला होता त्यांतलाच जसा कांहीं एक

त्रावणकोरचें राज्य.

ग्र० १३ ह० स० १७८८ हल्ल्याचीं कारणें.

भाग जिंकिल्याखेरीज राहिला होता. तो जिंकून तो सर्व मुलूखचा मुलूख आपल्यासा करावा अशी त्यास फार उत्कट इच्छा होती. त्यानें करण्याचीं अनेक कारणें रचिलीं. कोचीनचा मुलूख अगदीं म्हैसूरच्या राज्याखालीं आला होता पण त्याचें एक अंग त्रावणकोरच्या मुलखांत असें शिरलें होतें कीं त्रावणकोरच्या राज्याचा बचाव करण्याकरितां जो कोट बांधिला होता त्याच्या पोटांत तें सांपडलें होतें. तेव्हां टिपूस म्हणावयास झालें कीं माझ्या राज्यांतल्या एका प्रांतांत जावयास मला ह्या कोटापासून हरकत होते. इकडे पोर्तुगीज लोकांपासून क्रांगनूर आणि अयाकोट म्हणून दोन किल्ले डच लोकांनीं फार दिवसांपूर्वी जिंकून घेतले होते आणि त्यांजपासून ते त्रावणकोरच्या राजानें आपला उत्तर बाजूचा बचाव चांगला व्हावा ह्या हेतूनें खरेदी घेतले होते. ह्या गोष्टीपासून टिपूस फार वाईट वाटलें. तो म्हणाला हे किले आमच्या मुलखांत आहेत आणि डच लोकही आमचा वरिष्ठ अधिकार मान्य करून आम्हांस जमिनीचें भाडें देत असतात. पण ह्या दुसऱ्या गोष्टीविषयीं कारण दिसत नाहीं. टिपूचें आणखी एक वादाचें कारण होतें तें असें कीं त्यानें त्रास दिल्यामुळें त्याच्या अमलांतून जे लोक पळाले त्यांस त्रावणकोरच्या राज्यांत चांगला आश्रय मिळाला होता. तें त्यास सहन होत नव्हतें. हीं व अशीं दुसरीं कारणें सांपडल्यावर टिपू आपलें कार्य साधण्यास एक तिलप्रायही विलंब करिताना; परंतु करील काय ! मागल्या लढाईंत त्रावणकोरच्या राजाचा आणि इंग्लिशांचा ठराव झाला होता कीं दोघांपैकीं एकावर परचक्र आलें असतां त्याचें निवारण करण्याकरितां परस्परांनीं परस्परांस मदत करावी. तेव्हां त्रावणकोरच्या राजावर उठलें म्हणजे टिपूस अर्थात इंग्लिशांशीं वांकडे व्हावें लागेल, अशा भीतीनें तो दचकला. आतां ह्याविषयींची सर्व हकीकत मद्रास सरकारास कळविणें टिपूस प्राप्त होतें, आणि त्या सरकारचीही म्हैसूरच्या राजाशीं आपण गोडीनें असावें अशी फार इच्छा होती. टिपूच्या म्हणण्यावर या सरकारचें म्हणणें असें पडलें कीं तुमचें जेवढें कांहीं सुयुक्तिक बोलणें असेल तेवढें

संरक्षणाविषयीं इंग्लिशांवरोवर तह.

ऐकून घेण्याविषयीं आम्ही तयार आहों, आणखी तुमच्या ह्या खटल्यांतील सर्व गोष्टींचा विचार करावा आणि खटला मिटवून टाकावा ह्याकरितां दोन असामी कमीशनर नेमितों पण हें बोलणें टिपूच्या मसलतींशीं जुळेना; तेव्हां त्रावणकोरचे खंदक व मोरचे ज्या ठिकाणीं भक्कम नव्हते त्या ठिकाणीं हल्ला करण्यासाठीं तो आपल्या सर्व फौजे सुद्धां मोठ्या त्वरेनें निघाला. एवढ्या विस्तीर्ण तटाचा बचाव करणें म्हणजे खरोखर फार अडचणीचें काम आहे. पण त्यामुळें टिपूचें साधलें, तें असें कीं, सन १७८९ त दिसेंबराच्या २९ व्या तारखेस टिपूच्या सर्व फौजेनें थोरल्या दरवाज्यावर हल्ला करण्याची हूल दाखविली त्यामुळें कोटाच्या आंतील सर्व लोकांचें लक्ष त्या दरवाज्यावर लागून राहिलें होतें. इतक्यांत टिपूनें आपल्या चौदा पंधरा हजार खाशा फौजेनिशीं, कोटाच्या एका दक्षिणेकडच्या आंगास रक्षण नव्हतें तेथून आंत प्रवेश केला. नंतर जवळच्या दरवाज्याशीं जाऊन आपली फौज आंत घ्यावी ह्याकरितां तो तटाच्या आंतल्या आंगानें चालला. कांहीं वेळपर्यंत त्यास कोणी आड आलें नाहीं, उलटी आंतल्या लोकांची अशी धांदल झाली कीं त्यांस ह्या बुरजाकडून त्या बुरजाकडे आणि त्या बुरजाकडून ह्या बुरजाकडे पळतां पळतां पुरेसें झालें. तथापि त्या लोकांस नवीन कुमक येऊन पोहोंचतांच ते नेट धरून शत्रूपुढें उभे राहिले. कोटाच्या आंतल्या आंगास एक चौरस इमारत होती तींत दारूगोळा वगैरे सामान होतें आणि शिपाई लोकही होते ह्यामुळें त्या ठिकाणापासून त्यांनीं आपला बचाव करण्याचा विशेष प्रयत्न केला. निघाल्यापासून लढत जातां जातां आपली फौज पुष्कळ कमी झाली असें पाहून टिपूनें नवी फौज आंत घेण्याविषयीं हुकूम केला. ह्या म्हणण्याचा अर्थ बरोबर समजला नाहीं ह्यामुळें हुकमाप्रमाणें तजवीजही बरोबर झाली नाहीं. टिपूचे शिपाई लोक कांहींसे अस्ताव्यस्तपणानें पुढें येत होते तों वीस असामी त्रावणकोरी शिपायांनीं आपण अगदीं अलग राहून त्या लोकांवर गोळ्यांचा वर्षाव केला. तेव्हां टिपूच्या लोकांचा सुभेदार पडून त्या सर्वांचा असा गोंधळ झाला कीं, पुढें बंदोबस्ताचा कांहीं

अ० १३ इ० स० १७८९

त्रावणकोरच्या हद्दीवर हल्ला.

नवीन फौज आंत घेतली.

त्यांची अव्यवस्था व मोड.

प्र० १३ इ० स० १७९९ उपायच राहिला नाहीं. अशी अवस्था होऊन ते लोक जेव्हां माघारे पळूं लागले तेव्हां त्यांच्या संरक्षणासाठीं जी त्यांच्या मागें दुसरी टोळी येत होती तिच्यावर ते पडले, ती टोळी आपल्या मागलीवर पडली. पुष्कळ लोक खालीं पडले ते दुसऱ्यांच्या पायांखालीं सांपडून ठार मेले आणि तो खंदक प्रेतांनीं अगदीं भरून निघाला.

टिपू पळाला. स्वतां टिपूही त्याच गर्दीत सांपडून चालला होता तो दोनदां खालीं पडला आणि पाय दुखावून लंगडा झाला. नंतर त्याच्या चाकरांनीं मोठ्या पराकाष्ठेनें त्याला खंदकाच्या पार केलें. टिपूच्या पायाला ह्याप्रसंगीं जी दुखापत झाली ती शेवटपर्यंत निघालस बरी झाली नाहीं. तो ज्या मेण्यांत बसला होता त्याचे भोई गर्दीत गांगरले जाऊन तो मेणा मार्गेच पडला. टिपूचीं मोरतबें व आंगठ्या वगैरे अलंकार शत्रूच्या हातीं सांपडले. पुढें कांहीं पायीं चालावें न कांहीं एका धाकट्या गाडींत बसून जावें, अशी त्वरा करितां करितां आपलीं दोन हजार माणसें गमावून मोठ्या दुर्दशेनें तो आपल्या छावणींत पोहोंचला. मुळीं युद्धामध्यें जय अपजय ह्यांचा अगदीं नेम नाहीं, मग अनाडी रितीचे युद्धांत कसें होईल हें सांगायासच नको.

ह्या अपजयामुळें टिपूस संताप आला. ज्या शत्रूचा टिपू तिरस्कार करीत होता त्याच्या फौजेनें आपल्या खाशा फौजेची अगदीं दुर्दशा करून तीस मागें फिरविलें ती गोष्ट पाहून टिपूला किती संताप आला आणि काय अप्रतिष्ठा वाटली ह्या गोष्टी येथें लिहिलां येणें कठीण आहे, पण ला मनांत सलज आणितां येतील. टिपूनें असा पण केला कीं माझी सर्व जमाजम पूर्वीप्रमाणें होऊन माझा नाश झाल्याबद्दल मी शत्रूचा मूड उगविल्याशिवाय ही छावणी सोडून माघारा जाणार नाहीं. त्यानें आपली बाकीची सर्व फौज त्या ठिकाणीं जमविली, आणि श्रीरंगपट्टण व बंगलूर ह्या ठिकाणीं मोठाल्या तोफा होत्या त्याही आणविल्या. ह्या तयारींत समग्र तीन महिने निघून गेले, तरी इंग्लिशांच्या मनांतली भ्रांति तिलप्रायही गेली नाहीं; आणि तुम्हांबरोबर माझें सख्य असावें अशी माझी फार इच्छा अद्यापि आहे असें बोलून टिपू त्यांस झुलवीतच होता.

इंग्लिशांस ठकविलें.

शेवटीं इ० स० १७९० त एप्रिल महिन्याच्या आरंभीं लढाईची सर्व सिद्धता होऊन त्रावणकोरच्या भिंतीवर एकसारखा तोफांचा हल्ला सुरू झाला आणि लागलेंच सुमारें अर्ध कोस लांबीचें एक भगदाड पडलें. नंतर त्रावणकोरची फौज मोकळ्या मैदानांत सांपडली तेव्हां शत्रूशीं तोंड न देतां ती पळूं लागली आणि टिपू पाहतो तों आपल्या पुढें सर्व देश अगदीं निराश्रय दिसूं लागला. नंतर लागलाच त्यानें कांगनूरच्या किल्ल्यास वेढा दिला; पण तेथें जवळच एक विपीन म्हणून बेट आहे त्यांत त्रावणकोरच्या राजाच्या मदतीकरितां इंग्लिशांनीं आपली फौज ठेविली होती तिला तीन पलटनांनिशीं कर्नल हरटली साहेब येऊन मिळाला. शत्रूच्या आंगावर जाऊन पडणें हें आपल्या हातून होत नाहीं असें पाहून तो साहेब तेथली काळ्या लोकांची टोळी होती तिला घेऊन आपला बचाव करण्याकरितां एके ठिकाणीं तळ देऊन राहिला. पण या ठिकाणीं टिपूनें त्यास त्रास देण्याचा उद्योग केला नाहीं. कांबीज केलेल्या मुलखांपैकीं पुष्कळ मुलूख व्यापून तेथल्या लोकांस टिपूनें फार दुःख देऊन नेहमींप्रमाणें ते प्रांत ओस पाडिले आणि लोकांस गुलाम करून टाकिलें. प्रांताच्या दक्षिणेस कांहीं झाड्या होत्या त्यांत पुष्कळ रयत लोक पळून गेले तेथें त्यांचा पाठलाग करण्यास फार कठीण पडलें. ज्या भिंतीपासून टिपूस त्रावणकोर घेण्यास इतका विलक्षण त्रास झाला होता ती भिंत अगदीं जमीनदोस्त करून टाकिल्यानंतर पुढें पाऊसकाळ आला व इंग्लिश लोकाच्या फौजेमध्यें हालचाल होत होती त्यामुळें टिपूला अमळसें भयही पडलें होतें ह्यामुळें तो श्रीरंगपट्टणास निघून गेला. प्र० १३ इ० स० १७९०

कांगनूरचा वेढा.

इ० स० १७८६ त मार्किस कार्न वालिस साहेब गवर्नर जनरल होऊन, हिंदुस्थानांतल्या राजनीतींत मोठा फेरफार करावा ह्या हेतूनें ह्या देशांत येऊन पोहोंचला. विलायत सरकारानें त्या साहेबास मुख्य सांगणें असें होतें कीं, हिंदुस्थानांतील राजे रजवाड्यांबरोबर युद्धाचा प्रसंग आला असतां तो हरतऱ्हा करून टाळावा. त्यावरून केवळ आपला बचाव करण्याकरितां जर युद्ध असेल तर त्यांत मात्र इंग्रज सरकार मन घालूं इच्छीत, एरव्हीं बिलकूल लक्ष

हिंदुस्थानाच्या कारभारांत नवीन फेरफार.

प्र० १३
इ० स०
१७९०
मार्क्विस कार्न वालिस ह्याचें मत बदललें.

घालणार नाहीं असा सरकारचा अभिप्राय त्यानें प्रसिद्ध केला; पण ह्यांत त्यानें किमपि पडदा न ठेवितां सर्वच अगदीं स्पष्ट बोलून सोडिलें, त्यामुळें कितीएकांस ही रीति आवडली नाहीं. परंतु थोड्याच दिवसांत त्याचें मत अगदीं फिरलें आणि त्याला असें वाटूं लागलें कीं, म्हैसूरचें संस्थान अगदीं पालथें घालून टाकण्याकरितां मोठें युद्ध करणें आपणास जरूर आहे; आणि यदा कदाचित् जरूर नसलें तर निदान त्या युद्धापासून आपणास उपयोग तरी मोठा होईल. ह्या साहेबानें आपला पूर्वीचा निश्चय अगदींच बदलिला ह्याविषयींचें चांगलें एखादें कारण सांपडणें कठीण दिसतें. आतां टिपूनें मोठें भयंकर स्वरूप दाखविण्यास आरंभ केला होता खरा, परंतु मराठे आणि निजाम ह्यांचा परस्पर साह्यसंकेत होऊन सर्व मध्य हिंदुस्थानाचा एक पक्ष झालेला होता, म्हणून टिपूच प्रबल होईल आणि दुसऱ्यांचा पक्ष कमी पडेल अशी भीति बाळगण्यास त्या साहेबाला कारण नव्हतें. इंग्लिशांनीं टिपू हीनबल करून टाकिला असतां मात्र मराठे व निजाम ह्यांचा विलक्षण भरभराट होऊन टिपूचें व दुसऱ्या पक्षाचें जें शक्तिसाम्य तें नष्ट होऊन जाईल, असा उलटा संभव होता. नवीन गवर्नर जनरल कार्न वालिस साहेब ह्यानें लढाई करण्याची मसलत केली त्याविषयीं आम्हांस असें कारण दिसतें कीं टिपूचा स्वभाव उग्र असून तो मोठा घालमेल्या होता हें त्या साहेबास आवडत नव्हतें. आणि टिपू मलबार किनाऱ्यावरच्या रहिवासी लोकांस फार त्रास देत असे हीं गोष्ट त्या साहेबास फार वाईट वाटत असे हेंही एक कारण असावेंसें आम्हांस वाटतें.

गंठूर मागितलें तें मिळालें

पुढें कार्न वालिस साहेबानें निजामाबरोबर जो करार केला त्यावरून त्याचा अभिप्राय स्पष्ट समजून आला. उत्तर सरकारच्या पोटांत जे प्रांत आहेत त्यांपैकीं गंठूर खेरीज करून बाकी सर्व प्रांत इंग्लिशांच्या ताब्यांत आलेले होते, आणि तो मात्र आला नव्हता. तेवढा निजामापासून लवकर मागून घ्यावा असें त्या साहेबास वरिष्ठ सरकारचें सांगणें होतें. इ० स० १७६८ मध्यें निजामाचा व इंग्लिशांचा हैदराच्या संस्थानावर स्वारी करून तें जिंकून परस्परांनीं

आपसांत वांटून घ्यावें असा ठराव झाला होता, आणि त्याबद्दल निजामानें इंग्लिशांस गंठूर द्यावें असें त्या ठरावांत कलम होतें; त्यावरून इंग्लिशांचा वारसा त्या प्रांतावर होता ह्या उभयपक्षांचा अशा प्रकारचा ठराव झाल्यानंतर तों कैकवेळां मोडिला व कैकवेळां त्या उभयपक्षांच्यामध्यें लढाया चालू झाल्या. आणि म्हैसूरच्या राज्याविषयीं ज्या त्यांच्या मसलती होत्या त्यांजकडे तिलप्राय लक्ष न देतां त्या राजांशीं दोन वेळां तह केला होता. ह्या सर्व गोष्टी मनांत आणिल्या म्हणजे त्या ठरावा अन्वयें इंग्लिशांचा गंठुरावर किंवत वारसा होता हें स्पष्ट दिसतें. तथापि निजामाचा गंठूर प्रांतावर वारसा लागू करण्याकरितां इंग्रज सरकारांतून लष्कर रवाना केलें आणि निजाम हा वारसा इनका लौकर कबूल करील असें वाटत नव्हतें पण त्यानें तो लागलाच कबूल केला ही मोठी विलक्षण गोष्ट झाली. निजामाचें आणि टिपूचें हाडवैर होतेंच, तेव्हां ह्यापासून काय होईल कोण जाणे असें निजामाच्या पोटांत मोठें भय उत्पन्न झालें होतें. त्यामुळें दुसऱ्या सर्व गोष्टी एकीकडे ठेवून गंटूर प्रांत घेण्याबद्दल जें इंग्लिशांचें बोलणें होतें तें मान्य करण्यास तो तयार झाला. त्याचें म्हणणें इंग्लिशांस इतकेंच होतें कीं म्हैसूरचें राज्य घेतल्यानंतर त्यापैकीं पुष्कळ मुलूख आम्हांस देण्याचें तुम्ही कबूल केलें आहे तें कलम व दुसरीं सर्व कलमें तुम्ही ह्या ठरावांत घातलीत असल्यास गंठूर देण्याची गोष्ट आम्हांस कबूल आहे. निजाम सरकारचें सर्व म्हणणें तर गवर्नर जनरल साहेबास कबूल करतां येईना. परंतु पुढें ह्या गोष्टी आगच्या हातून घडण्या सारिखा समय आल्यास आम्ही तुमच्या म्हणण्याप्रमाणें करूं असें साहेबानें निजामास सांगितलें. त्यांत हा अन्वयें इंग्लिशांनीं लागलीच निजामाच्या कुमकेस फौज रवाना करावीसें ठरलें व ती फौज अमुक अमुक राजांवर पाठवूं नये म्हणून ठरलें होतें त्यांचीं नांवें लिहिलीं होतीं त्यांत टिपूचें नांव लिहिलें नव्हतें तेव्हां अर्थात टिपूवर फौज पाठविण्यास चिंता नाहीं असें झालें.

अनुकूलत्व व तावडतोब अनुकूलता.

ही व्यवस्था करूं लागल्यानें कार्न वालिस साहेबाच्या मनांत अगदीं उत्पन्न झालाच होता. तितक्यांत वर्त्तमान येऊन पोहों-

प्र० १३ इ० स० १७९०

टिपूच्या वर्त्तणूकीची वातमी.

चलें कीं टिपूनें त्रावणकोरच्या तटावर हल्ला केला ; तेव्हां टिपूचें आपण होऊन चांगला कुरापत काढिली ; आतां त्यास लढाईंत सिद्ध व्हावें असें सांगून पाठविण्यास कांहीं चिंता नाहीं. अलीकडून लार्ड कार्न वालिस त्यास प्रायः आनंद झाला असेल. मद्रास सरकारानें बंगाल्यास आपलें मत असें लिहून पाठविलें कीं टिपूची अजूनही तहकरण्याची खुषी आहे, आणि टिपूवरोबर युद्ध करण्याची तयारी न करितां तें सरकार आपणच त्याबरोबर तहाविषयीं प्रवृत्त होत होतें, कार्न वालिस साहेबानें फार रागावून मद्रास सरकारास त्या पत्राचा जबाब लिहिला. वास्तविक पाहिलें असतां त्रावणकोरच्या कज्यांत त्या प्रसंगीं इंग्रिशांना लक्ष घालणें प्राप्त होतें खरें ; परंतु त्या कज्यापासून इंग्रिशांचें मोठें नुकसान होणार होतें असें दिसत नाहीं, त्यापक्षीं एखाद्या गोडीगुलाबीच्या रितीनें जर तो तंटा मिटविला असता तर बरें होतें ; केवल युद्धाचेंच कारण नव्हतें. तथापि कार्न वालिस साहेबानें स्पष्ट लिहिलें कीं ह्या गोष्टीचा विचार पूर्वीच करणें योग्य होतें व अद्यापि ह्या गोष्टीचा विचार न करणें म्हणजे दोन संस्थानांमध्यें शत्रुत्व वाढूं देण्याचाच उपाय आहे असें म्हटलें पाहिजे. त्या साहेबानें असा बेत केला होता कीं आपण मद्रासेस जाऊन स्वतः सेनाधिपत्य करावें, पण तितक्यांत

जनरल मेदोज आला.

जनरल मेदोज साहेब तेथें आल्याचें वर्त्तमान लागल्यावरून त्यानें तो बेत सोडून दिला कारण मेदोज साहेब हा बुद्धिमान व हुशार असा त्याचा पूर्ण भरंवसा होता.

मराठ्यांवरोबर तह.

कार्न वालिस साहेबानें जलदी करून निजाम व मराठे त्यांजबरोबर सख्यसंकेत केला तेव्हां त्या प्रत्येकानें आपली सेना टिपूवर रवाना करितों असें कबूल केलें. ही कुमक करण्याबद्दल म्हैसूरच्या लढाईत जय आला म्हणजे तुमच्या म्हणण्याप्रमाणें त्या राज्यांतील मुलूख तुम्हांस देऊं असें गवर्नर जनरल साहेबानें निजाम व मराठे ह्यांच्याशीं कबूल केलें. निजामानें असा फार आग्रह धरिला कीं आमची फौज म्हैसूरच्या लढाईवर गेली म्हणजे मागें आमच्या मुलखावर स्वाऱ्या घालून तो लुटूं नये ह्याविषयीं आम्हांस लेखी दस्तऐवज पाहिजे. निजामाचे म्हणणें अगदीं असंभवी होतें असें तर नाहीं ; परंतु एवढें

मोठें मराठे सरकार आणि त्याच्या हातून असें अयोग्य व निंद्यकर्म होण्याचा संभव आहे असा मजकूर सरकारी कागदपत्रांत दाखविणें म्हणजे अत्यंत लांछनाची गोष्ट होय, ह्याकरितां गवर्नर जनरल साहेबानें आम्ही तुमचें संरक्षण करूं असें घरगुती नात्यानें सांगून निजामाचें समाधान केलें. प्र० १३ इ० स० १७९०

इंग्लिशांनीं अशा रितीनें एकाएकीं युद्धाची तयारी केली त्यामुळें त्यांजबरोबर उभें राहण्याविषयीं टिपूची तयारी नव्हतीमें दिसतें. इ० स० १७९०च्या जून महिन्यांत टिपूचें संस्थान देखाशक व्यापाचें ‘धोतानें इंग्लिशांनीं मोहिमेची सुरुवात केली. त्यांचा बेत अगदीं असाच होता कीं सरळ रस्त्यानें जाऊन दक्षिणेच्या आंगानें घाट चढावा आणि श्रीरंगपट्टणावर जावें. मागील लढाईच्या अनुभवासच कर्नेल फुलर्टन साहेबानें ह्या मार्गानें स्वारी केली असतां होण्यासारिखी आहे अशी योजना केली होती. बारा मइलांतून जो म्हैसूरचा रस्ता आहे तो दक्षिणेकडल्या रस्त्यापेक्षां जवळ असून त्यांत जागोजाग लष्करी ठाणीं होतीं तशीं दक्षिणेकडच्या मार्गांत नव्हतीं हें खरें; पण, त्या रस्त्यानें तृण काष्ठ व दाणादुणा पुष्कळ होता आणि उत्तरेकडच्या रस्त्यावर बंगळूरचा किला मोठा मजबूत होता हें एक लचांड होतें आणि तें लचांड ह्या दक्षिणेच्या रस्त्याला नव्हतें, ह्या रितीं त्यानच जावें असें ठरलें. ह्या रस्त्यानें तरी टिपूचीं जेवढीं मजबूत ठाणीं घाटाच्या पायथ्याशीं होतीं तेवढीं जिंकून पुढें जावयाचें होतें. मेदोज साहेबानें कोइमत्तूर मुकामीं मुख्य लोकांस करून घाटाच्या पायथ्याखालचीं टिपूचीं ठाणीं जिंकण्याचें काम करणेस सांगितलें; कारण त्यास दक्षिण हिंदुस्थानाची माहिती चांगली झाली होती. ह्या ठाण्यांपैकीं फार मजबूत ठाणें म्हटलें म्हणजे पालघाटचें होतें. हा घाट म्हणजे ह्या भागांत म्हैसूरच्या रक्षणाचें मुख्य स्थानच होतें. हें कोइमत्तूरापासून पश्चिमेकडे सुमारें पंधरा कोसांवर होतें. स्युअर्ट साहेबानें लागलीच पालघाटावर स्वारी केली पण मार्गामध्यें त्याला एक संकट अकस्मात उत्पन्न झालें. ह्या दिवसांमध्यें पर्जन्यकाळामुळें हिंदुस्थानाच्या पश्चिमेकडच्या किना- इंग्लिशांनीं तापडनीच तयारी केली. खालच्या प्रदेशांतील किल्ले घेतले.

म० १३ इ० स० १७९०

त्यावर जिकडे तिकडे जलमय होऊन जात असतें आणि तिनाऱ्याच्या आलीकडे पूर्वेच्या मुलखांत थोडथोडी वृष्टि होते त्यामुळें गर्मी मोडून गार वारा मात्र येतो. पण तो साहेब पश्चिमेकडे जाऊं लागला तसा खूप जोरानें पर्जन्य लागूं लागला आणि त्यामुळें लढाई वगैरे करण्याची अगदींच सोय राहिली नाहीं. पालघाट मुक्कामीं जाऊन युद्धास तयार व्हा असें चार्लिप्रमाणें शत्रूस सांगून तो साहेब परत आला. नंतर डिंडिगल म्हणून ठाणें कोईमतूराच्या आग्नेयी दिशेस तुमारें पन्नास साठ कोसांवर होतें त्यावर नेदोज साहेबानें स्युअर्त सहिवास पाठविलें. ह्या ठाण्याची मजबुती सरासरीच असेल असें वाटून त्यानें आपल्यावरोवर दा गोळा वगैरे सामान फार थोडें घेतलें. त्यामुळें किल्ल्याचा तट एकेजागीं पुरता फोडिला नाहीं तोंच तें सामान अगदीं खलास झालें. आतां एकदम हल्ला करावा ह्याखेरीज दुसरा उपायच राहिला नव्हता. आणि तो केला तों त्यांत शत्रूनीं त्यांस मागें हटविलें, परंतु त्या हल्ला करणारांचा हियया पाहून शत्रु अगदीं चकित होऊन गेले आणि ह्यांजवळ सामानाची फार कमताई होती हेंही त्या शत्रूस माहीत नव्हतें, ह्यामुळें अशुक्र कल्पेंत मान्य करीत असतांस ठाणें स्वाधीन करितों अशी एक याद पाठविली. स्युअर्त साहेब शहाणाच होता; त्यानें आपल्याजवळच्या सामानाची सर्व व्यवस्था मनांत आणून तो याद कबूल केली.

डिंडिगलास वेढा घातला आणि तें घेतलें.

पालघाट स्वाधीन झाला.

तो डिंडिगल्या ठाण्याहून परत येईपर्यंत पर्जन्यकाळ जाऊन पालघाटावर पुन्हा जाण्यासारखे दिवस आले. ह्या ठाण्याच्या मजबुतीविषयींही पूर्वी बरोबर माहिती झाली नाहीं. म्हणजे तोंडें युद्ध असें अगदीं उलटें समजविलें होतें. ह्यामुळें त्यानें पुष्कळ तसदी घेऊन तोफा वगैरे सामान खूप रवाना केलें. परंतु सकाळीं (२१ सप्टेंबर) दोन मोरचे चालू केल्याबरोबर किल्ल्यांतील तोफा अगदी बंद पडल्या, आणि सूर्यास्तापूर्वी इंग्लिशांनीं तटाला शिडी पाडिली. आंतील फौजेकडून लागलेंच बोलणें आलें यांत इंग्लिशांच्या नौकरीस जे नेयर लोक आहेत त्यांजपासून आम्हांस उपद्रव होऊं देऊं नये. ह्याखेरीज दुसरी कांहीं एक अट नव्हती, असें मग-

लें तरी चालेल. टिपूनें नेयर लोकांस अतिशय छळिलें होतें, त्यामुळें त्यांचीं अंतःकरणें अगदीं खवळून जाऊन, जेवढें टिपूचें म्हणून पुढें येईल त्याचा नाश करावा असा त्यांचा निश्चय झाला होता. प्र० १३ इ० स० १७९०

त्याप्रमाणें हिकडे कर्नल स्युअर्त साहेबाचा उद्योग चालला असतां जनरल मेदोज साहेबाच्या फौजेनें म्हैसुराकडे बराच प्रवेश केला. कावेरी नदीच्या कांठीं ठरूर व एरूड हीं दोन आणि भवानी नदीच्या कांठीं सतीमंगल हें एक अशीं एकंदर तीन ठाणीं होतीं तीं इंग्लिशांनीं एकामागून एक जिंकून घेतलीं. सतीमंगलच्या ठाण्याच्या टप्यांत गजल हट्टीचा मार्ग होता आणि गजल हट्टींतून पार गेलें म्हणजे म्हैसूर प्रांतांतच प्रवेश झाला. ह्या सतीमंगलच्या ठाण्यांत कर्नल फ्लाइद साहेब २००० फौजेनिशीं पडून राहिला होता. अशा व्यवस्थेमुळें इंग्लिशांच्या निरनिराळ्या फौजांचे परस्परांशीं दळण वळण चांगलें राहत नव्हतें. तें असें कीं, मेदोज साहेब कोइमत्तूर मुकामीं होता त्याच्या आणि फ्लाइद व स्युअर्त ह्यांच्यामध्यें पंधरा कोसांचें अंतर होतें. फ्लाइद साहेबानें कर्नल स्युअर्त साहेबास लिहून पाठविलें, कीं आमच्या ठाण्याचा जागा मोठी भीतीची आहे व तशात आम्हांवर हल्ला करण्यासाठीं शत्रु खूप फौज जमवांत आहे. स्युअर्त साहेबानें ह्या गोष्टीकडे लक्ष न देतां सध्यां आहां त्याच ठिकाणीं बंदोबस्तानें रहावें असा त्यास हुकुम पाठविला. म्हैसूरकरांचा सरदार सैयद साहेब ह्यानें इंग्लिशांवर हल्ला नेला होता, तो इंग्लिशांनीं सहज मार्गें हटविला, आणि त्या लोकांस घाटाखालीं जाणें भाग पाडिलें. एक नामर्द सरदार फौज घेऊन इंग्लिशांवर आला त्याचा मोड झाला एवढ्यावरून, टिपू स्वतः आपल्या सर्व सैन्यानिशीं येऊन युद्धास उभा राहिला म्हणजे काय होईल ह्या गोष्टीची अटकळ करणें कठीण होतें. सप्तंबर महिना लागतांच टिपूच्या घोडेस्वारांच्या टोळ्या घाटावरून उतरतांना इंग्लिशांच्या नजरेस पडल्या; आणि निरनिराळ्या ठिकाणीं भवानी नदी उतरून इंग्लिशांच्या काळ्या लोकांच्या व गोऱ्या लोकांच्या फौजांना

म्हैसूरकडील ठाणीं हातीं आलीं.

कर्नल स्युअर्त साहेबाचा अविचार.

प्र० १३ इ० स० १७९०

ते लोक वेढा देऊं लागले तेव्हां काळ्या लोकांस तर लागलेंच वाटलें कीं आपणावर ही मोठी वाणीची वेळ गुदरली आहे. असें असतांही या लोकांनीं आपला बचाव चांगला केला. इंग्लिशांच्या छावणीच्या सभोवतीं जी दाट झाडी होती तींत टिपूनें आप-

त्याच्या टोळीची संकटावस्था.

ली फौज घातली त्यामुळें इंग्लिशांच्या लोकांनी तिजवर संगिनींचा खूप मारा केला व कांहीं टोळ्या र निर्दालस कापून काढिल्या तथापि म्हैसूरकरांस नवीन कुमक मिळत जाऊन ते पुढें सरल्याने आणि मोरचे चालू करून इंग्लिशांच्या काळ्या लोकांचे प्राण व्याकूळ केले. असा प्रकार चालला होता तरी ते लोक मोठ्या दमानें पुढें राहिले होते; ते असें म्हणत कीं आम्ही कंपनीचें मीठ खाल्लें आहे त्यापक्षीं आमच्या प्राणाचे धनी इंग्लिश लोक आहेत. अशा विचारानें ते लोक मागें न हटतां तेथेंच उभे राहिले. तेव्हां टिपूला असें वाटलें कीं रात्रीच्या रात्रीं आपण घरें दूर निघून जावें. परंतु दैवदशा विलक्षण पडली त्यामुळें तो हाले कीं कर्नल फ्लाइद त्याच्या हातून आपल्या तळाचा बचाव होत नाहीं

कर्नल फ्लाइद यानें पळ काढिला.

सा होऊन आपणास प्रातःकाळीं माघारा पळ काढणें प्राप्त आहे असें त्यास वाटलें, आणि त्याप्रमाणें तीन तोफा जमिनीवर फेंकून देऊन तो निघून गेला. तेव्हां टिपूनें आपली १५००० फौज जमवून तेवढ्यानिशीं लागलाच इंग्लिशांचा पाठलाग करावयास आरंभ केला. तों तिसरेप्रहरीं इंग्लिश एका रांगेनें पळत असतां त्यांस गांठिलें. नंतर इंग्लिशांस कोकणेठां थांबावें लागलें व कोकणेठां लढाईच्या जोकानें सर्व रहावें लागलें. असें होऊन त्यांनीं टिपूचे तळे पुष्कळ वेळां माघारे फिरविले. तथापि इंग्लिश लो-

त्यांच्या नशीबानें चांगला प्रसंग आला.

पुढें चालूं लागले म्हणजे टिपूच्या लोकांनीं चोंकिडून चालून यावें असे चालले होतें. इंग्लिशांस आणखी तीन तोफा टाकून द्याव्या लागल्या. त्यांची अधिक अधिकच पांचावर धारण बसत चालली. इतक्यांत कोईमतुराकडून कांहीं घोडेस्वार घेतलेले दृष्टीस पडले. तेव्हां एकदम अशी बातमी उठली कीं जनरल मेडोज साहेब तिकडून त्या फौजेच्या मदतीस येत आहे. कर्नल फ्लाइद साहेबानें ही बातमी खरी आहे असें दाखविलें, त्यावरून सगळ्या

क्या फौजेचा तैंच खबर वाटून जिकडे तिकडे तीच बोलवा झाली. आणि टिपूला वास्तविक गोष्टीची माहिती असतांही तो चकला आणि आपली फौज त्यानें माघारी घेतली. अर्धे झाल्याच्या पोटीं फ्राइद साहेबाला मोठ्या फौजेच्या ठाण्याकडे जाण्यास सबड सांपडली. ती फौज त्याच्याच मदतीस येण्याकरितां निघाली होती पण ती भलत्याच रस्त्यानें गेली. त्यामुळें त्या दोन्ही फौजांची गांठ पडण्यास मोठे प्रयास पडले, आणि गांठ पडण्यापूर्वीं त्या दोन्ही फौजांचे फार हाल झाले. प्र० १२ इ० स० १७९०

अशा त्या विलक्षण गोष्टी घडून आल्यामुळें इंग्रजांचे मेले व जखमी झाले मिळून सुमारें चार पांचशें लोक गेले. त्यांनीं मोहिमेचा बेत केला होता तो सगळा बिघडून गेला. ज्या मार्गानें इंग्रजांचा म्हैसुरावर स्वारी करण्याचा बेत होता त्या मार्गानें ठाणीं बांधून त्यांनीं दारूगोळ्याचा वगैरे बंदोबस्त केला होता, तीं ठाणीं शत्रूच्या हातीं पडण्यासारखीं होतीं सबब होईल तितकी खबरा करून तीं ठाणीं उठविणें त्यांस भाग होतें. ह्या सर्व गोष्टींस न जुमानितां जनरल मेडोज साहेबानें टिपूवर जाऊन पडण्याचा इरादा धरला, आणि टिपूच्या फौजेजवळ येऊन भिडला, पण टिपूनें अनेक कारस्थानें करून मेडोज साहेबाला आणि बारामहाल प्रांतांत कर्नल मॉकसवेल साहेब ठाणें घालून राहिला होता त्याला असा दोघांसही ठाला देऊन मोठ्या जलदीनें कोरोमंडल सिकन्यावरच्या प्रांतांत स्वारी केली. तिकडे त्रिचनापल्लीला दहशत देऊन तो उत्तरेकडे वळला आणि कर्नाटकप्रांत जमीनदोस्त करून टाकिला. हैदरअल्लीचा कर्नाटकांत प्रथमतः जय झाला त्या बेळेस त्याला शत्रूकडून फारसा अटकाव झाला नव्हता, त्याप्रमाणेंच ह्याबेळेस टिपूलाही विशेष अटकाव झाला नाहीं. मागें बांदिश मुकामीं क्यापतन स्मिथ साहेबानें टिपूस हात दाखविला होता; आणि त्याच साहेबाची पुन्हा त्या स्वारींत धियानगर मुकामीं गांठ पडून त्यानें टिपूस मागें हटविलें. परंतु त्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं त्याला मुळींच कसा तो अटकाव झाला नाहीं, असें म्हटल्यासहि चालेल. टिपूनें प्रथम असें चालविलें होतें कीं जें पुढें येईल त्याचा जाळून इंग्रजांचा बेत बिघडला.

प्र० १३ इ० स० १७९०

पोळून फडशा करावा. पण मग त्याला असें वाटलें कीं असें करूं नये, कारण त्यांत आपला फायदा नाहीं. तर लोकांपासून खंडणी घ्यावी; म्हणजे तेणेंकरून आपला खजिना रिकामा होत आहे त्याला तरी भर पडेल. पौंदेशेरीस आल्यावर फ्रेंचांबरोबर तह करावा म्हणून तो पुष्कळ झटला, परंतु त्यावेळेस फ्रान्सांत लोळावा लुई राजा होता त्याच्या स्वभावाला कज्जा अगदीं नको होता त्यामुळें त्यानें तें टिपूचें बोलणें मान्य केलें नाहीं. कारण टिपूशीं तह केला म्हणजे इंग्लिशांशीं वांकडें व्हावें लागलें असतें.

लार्ड कार्नवालिस साहेबस्वतां सेनाधिपत्य स्वीकारिनो.

ह्या संग्रामामध्यें मेदोज साहेबाचें लढाईच्या कामांत चातुर्य आणि धैर्य हें तर दिसून आलें, परंतु हिकडल्या राजांशीं मोहीम करणें म्हटलें म्हणजे, त्यांचीं अनेक प्रकारचीं कुलंगडीं असतात तितक्यांशीं पुरून उरण्यासारिखें त्याचें सामर्थ्य नव्हतें. म्हणून लार्ड कार्नवालिस साहेबानें आपल्या पूर्वीच्या बेताप्रमाणें स्वतः आपण लढाई चालविण्याचा बेत केला; आणि इ० स० १७९१ त ज्या-

त्याच्या व्यवस्थेचे उद्देश.

नेवारीच्या २९ व्या तारखेस मद्रासेस पोहंचून सेनापतीचें काम आपणाकडे घेतलें. त्यानें पुष्कळ फौज जमवून मेदोज साहेबास लिहिलें कीं तुम्हीं आम्हांस येऊन मिळावें. त्यानें असा निश्चय केला कीं टिपूच्या राज्याच्या मध्यभागीं जाऊन तेथेंच संग्राम करावा. ह्या राज्यांत प्रवेश करणें तो उत्तरेच्या रस्त्यानें जाऊन करितां येईल अथवा दक्षिणेच्या रस्त्यानें जाऊन करितां येईल. असा विचार करितां करितां त्यानें असें रटविलें कीं उत्तरेच्या रस्त्यानें जावें हें चांगलें. दक्षिणेकडून नुकतींच स्वारी केली होती ती फसली होती, हेंच ह्या वेळेस उत्तरेकडचा रस्ता प्रशस्त करण्याचें कारण प्रायः असावें असें वाटतें. दक्षिणेकडच्या रस्त्यानें गेलें असतां मद्रासेपासून किती किती अंतरावर आपलीं ठाणीं पडतील, ह्या गोष्टीचाही त्यानें विचार केला आणि उत्तरेच्या रस्त्यानें बंगळूरचा किल्ला होता ही एक मोठी अडचण होती तशांत त्या जागचीं हवाही सर्द होती. तथापि दोन्ही अडचणी कबूल करून त्यानें त्याच रस्त्यानें जाण्याचें ठरविलें.

गवनर जनरलचा कूच.

फेब्रुवारीच्या पांचव्या तारिखेस गवर्नर जनरल साहेब तेथून

निघून अकराव्या तारिखेस वेळुरांतून नीट अंबुराकडे गेला. ए- ख्याद्यास तर ह्यावरून असें वाटलें असतें कीं मद्रासेच्या समोरचा एखादा रस्ता धरून त्यानेंच घाट चढण्याचा ह्या साहेबाचा बेत आहे. हिकडे टिपूचा पेंदेशरी जवळच तळ पडून राहिला होता. त्याला असा भरंवसा होता, कीं फ्रेंचांचा आणि आपला साह्यसंकेत होऊन त्यांजकडून आपणास सहा हजार पायदळाची कुमक होईल. दुसरा भरंवसा त्याला असा होता, कीं इंग्लिशांनीं ज्या रस्त्याकडे रोख धरिला आहे त्याच रस्त्यावर आपण आपल्या स्वारांनींशीं त्यांच्या पुढें जाऊन उतरूं. कारण आपले घोडे चांगले आहेत. परंतु कार्न वालिस साहेब एकाएकीं उत्तरेस वळून चार दिवसांत वांकड्या रस्त्यानें येऊन मुंग्लीवर उतरला, आणि तेथें पाहतो तों शत्रूची लढाईविषयीं कांहींएक तयारी नाहीं. मग तेथून सुमारें आगखी चार दिवसांत म्हैसूरच्या मैदानांत जाऊन दाखल झाला, आणि हीं जागा म्हणजे सर्व म्हैसूर प्रांताचा ऐन मध्य होय. ह्या अशा तजविजीनें गवर्नर जनरल साहेबानें मोहिमेची सुरुवात केलेली पाहून टिपूची तर उमेद अगदीं खचली, आणि ह्या मोहिमेंत इंग्लिशांचा जय होऊन त्यांचा आपणावर पगडा पडेल असेंही त्याच्या मनांत येऊन चुकलें.

ख्रि० स० १७९२

सेनाधिपतीनें खूप जलदीनें चाल केली.

अशाप्रकारें टिपू तर अगदीं चकित झाला आणि लागलाच आपल्या राज्याचा बंदोबस्त करण्यास निघून गेला. परंतु पुढें एखादी चांगली तजवीज योजावी ती त्यानें योजिली नाहीं. बंगळूरच्या किल्ल्यांत त्याचा जनानखाना होता तो तेथून काढावयाचा होता, तें काम टिपू स्वतः पाहूं लागला; त्याच कामांत त्याचा पुष्कळ वेळ गेला. इंग्लिशांच्या फौजेवर जाऊन पडण्याविषयीं टिपूनें एरवीं पुष्कळ उद्योग केला; परंतु त्यांनीं बंगळूरच्या किल्ल्यापुढें मार्च महिन्याच्या पांचव्या तारखेस येऊन जेव्हां छावणी दिली त्यावेळेस त्यानें त्यांस बिलकूल आडफांटा घातला नाहीं. त्यांनीं लागलाच किल्ल्याला वेढा देऊन मोठ्या नेटानें काम चालविलें; परंतु त्यांस गैरसोई मनस्वी विलक्षण होत्या. सारखा वेढा घालावा तर किला फारच मोठा पडला; ह्यामुळें तटाला मोरचे लावून काय

बंगळूरास वेढा घातला.

ग्र० ३१ इ० स० १७९१

होईल तें होवो असें चालविलें होतें. किल्ल्यांतल्या लोकांस जी जी मदत पाहिजे होती ती ती मिळत गेली. टिपूची फौज चांगली लढाऊ असून चलाख होती, आणि आड राहून एकदम तुटून पडणें अगर संधान साधून छापा घालणें ह्या कामांत फार हुशार होती; ते लोक समोर उभे राहून लढाई करूं लागले असतां इंग्लिशांवर त्यांचें तेज पडत नसे. किल्ल्यांतील फौजेचा बचाव करावा आणि इंग्लिशांवर पडावें ह्याविषयीं टिपूचा सतत उद्योग चालला होता, आणि ह्याकरितां तो इंग्लिशांच्या फौजेवर चोहोंकडून येत होता, पण त्याच्या हातून इंग्लिशांचें कांहीं झालें नाहीं.

कर्नल फ्लाइचा नाश.

इतकेंच कीं कर्नल फ्रइद साहेबाबरोबर एक स्वारांची टोळी देऊन त्यास टिपूची छावणी वगैरे पाहून येण्यास रवाना केलें होतें. तेथें त्यानें कांहीं उतावळी केल्यामुळें मात्र इंग्लिश बरेच नुकसानाखालीं आले. ते असे कीं तो साहेब ज्या कामाकरितां गेला होता तें काम करून आपल्या छावणीस परत येण्यास निघणार इतक्यांत त्याच्या नजरेस असें आलें कीं टिपूच्या फौजेच्या पिछाडीच्या आगावर हल्ला करण्याची आपणास ह्यावेळेस फार चांगली सोय आहे; आणि ही गोष्ट केल्यावांचून त्याच्यानें तेथून निघवेना. तो पुढें तर सरसावला पण एका खडतर मैदानांत सांपडल्यामुळें त्याचा थोडासा घोंटाळा झाला. तथापि त्यानें टिपूच्या फौजेचा पाठलाग चालविला होता इतक्यांत त्याच्या गालावर बंदुकीची गोळी येऊन लागली ती दुसऱ्या गालांतून पार निघून गेली आणि तो मूर्छावत् होऊन जमिनीवर पडला. कर्नल फ्राइद साहेबाचा मदतनीस त्या फौजेच्या डाव्या आंगास फार दूर होता ह्यामुळें अशा वाणीच्या प्रसंगीं त्या फौजेला हुकूम करण्यास अगर तीस उत्तेजन देण्यास त्या ठिकाणीं कोणीच राहिला नाहीं. ह्यामुळें ती फौज मागें परतली. इतक्यांत टिपूच्या फौजेंत चोहोंकडे थांगराथांगर झाली आणि किल्ल्यावरून इंग्लिशांच्या सैनेवर गोळे येऊन पडूं लागले. त्यामुळें तर तिच्यामध्यें घोंटाळा होऊन जिकडे तिकडे पळापळ सुटली. अशा प्रसंगीं कर्नल कौदी साहेबानें कांहीं पायदळानिशीं तेथें येऊन टिपूचे लोक इंग्लिश फौजेच्या पाठीस ला-

गले होते त्यांस अटकाव केला म्हणून कांहीं बचाव झाला. नाहीं तर अगदीं पराजयच झाला असता. ह्या धामधुमींत इंग्लिशांचे शिपाई लोक सारे ७१ मेले पण घोडे सुमारें ३०० पडले हें मोठें नुकसान झालें. प्र० १३ स० स० १७९१

ह्यानंतर इंग्लिशांनीं बंगळूरच्या किल्ल्यासभोंवतालचें शहर हल्ला करून घेतलें. हें शहर बरेंच मोठें होतें. त्याच्या भोंताल- बंगळूर शहर घेतलें.
चा कोट आपला सरासरीच होता पण बंदक होता तो मजबूद होता. तटाचा दरवाजा निवडुंगांनीं अगदीं भरून टाकिला होता. त्या कामांत इंग्लिशांस फार मेहनत पडली. त्यांनीं हल्ला केला तो त्या स्थळाची बरोबर माहिती नसतां केला. त्यांचे लोक पुढें चालून गेले तेव्हां व शहरांत शिरण्याचा तजवीज करीत होते तेव्हां अशा दोन्ही वेळेस टिपूच्या लोकांनीं बुरजांवरून त्यांजवर बंदुकींचा मारा एकसारखा चालविला होता. कर्नल मूरहौस म्हणून इंग्लिशांचा एक फार चांगला कामगार होता त्यास चार जखमा लागून अग्वेरास ता मेला. शेवटीं तो दरवाजा अगदीं पाडिल्यावर लेफ्तेनेन्त अयर साहेब ह्यानें आंत प्रवेश केला. जनरल मेदोज साहेब हा लढाई चालली असतांही मोठ्या आनंदांत होता. आपल्या शिपायांस उत्तेजन देण्याकरितां तो म्हणाला "वाहवा, तुमची मोठी बहादुरी! आतां आंत शिरून अयर साहेबाचा कसा काय बचाव करतां पाहूं चलें." हें ऐकतांच त्या शिपाई लोकांस उत्तेजन येऊन ते आंत घुसले, पण किल्ल्याचा विस्तार फार मोठा पडला ह्यामुळें तो सगळा व्यापून टाकणें त्यांच्यानें झालें नाहीं. टिपूनेंही आणखी नवी फौज आंत घातली तेव्हां तिनें बंदुका, कडाबिनी, पिस्तूलें, वगैरेच्या योगानें इंग्लिशांवर भडिमार चालू केला. ह्यामुळें पुन्हा आंत लढाई सुरू झाली. इंग्लिशांच्या लोकांनीं संगिनींचा मारा करून त्या लोकांस रस्तोरस्त्यांनीं पळावयास लाविलें. आणि लागलेंच त्यांजकडून तें शहर रिकामें करून घेतलें. ह्या प्रसंगीं इंग्लिशांचे लोक एकंदर १३१ पडले. इंग्लिश सरदारांचें शौर्य.

ह्याप्रमाणें बाहेरचें शहर तर घेतलें; नंतर आंतील गढी घेण्याची राहिली होती. इंग्लिशांनीं मार्च महिन्याच्या एकविसाव्या ता- किल्ल्याच्या तटाला भोंक पाडिलें.

प्र० १३ इ० स० १७९१

रखेपर्यंत किल्ल्याच्या तटाला भोंक पाडिलें परंतु हल्ला नेण्याजोगें तें मोठें नव्हतें. इतक्यांत टिपूनें किल्ल्याच्या संरक्षणाविषयीं मोठी आटोकाट तयारी चालविली त्यामुळें इंग्लिशांनीं त्याच रात्रीं हल्ला करण्याचा निश्चय केला. त्या रात्रीं चांदणें चांगलें पडलें होतें.

बंगलोरचा किल्ला घेतला.

शिपाई लोकांच्या कानांत हलकेंच सूचना केली कीं अकरा वाजतां त्यांनीं गलबला अगदीं न करितां हल्ला करण्याकरितां निघावें असा संकेत ठरला होता. त्या संकेताप्रमाणें निघून जाऊन तटाला शिड्या लाविल्या व कांहीं थोडेसे लोकही तेथें येऊन पोहोंचले. तों इतक्यांत किल्ल्यांत बातमी लागून जिकडे तिकडे गवगवा झाला. किल्लेदार त्या ठिकाणीं येऊन खूप शर्थेनिशीं लढला, पण शेवटीं पडला. इंग्लिशांनीं मागल्याप्रमाणें संगिनी चालू केल्याबरोबर त्यांचा तटावर अमल बसला. त्यांच्या टोळ्याच्या टोळ्या किल्ल्यांत शिरून चोहोंकडे पसरल्या आणि ते लोक एका दोन घटकेंत किल्ल्याचे धनी होऊन बसले. ही बातमी टिपूस समजून तो आपल्या सर्व फौजेनिशीं बचाव करण्यासाठीं येत होता इतक्यांत चोकडों लोक तिकडून प्राण घेऊन पळत आले आणि किल्ल्यांत प्रलय उडाला होता त्याबाबद सर्व हकीकत त्यांनीं टिपूस सांगितली ती ऐकून त्याचे हातपायच मोडले आणि बेशुद्ध होऊन सारीरात्र तो उगीच पडला होता. कोणी असें म्हणतात कीं, हा हल्ला होणार अशी बातमी पूर्वीच टिपूला लागून त्यावर येण्याची तयारीही त्यानें केली होती. परंतु पुढें ज्या गोष्टी घडून आल्या त्या ह्या म्हणण्याशीं जमत नाहींत.

इंग्लिश फौजेवरील संकट.

ह्याप्रमाणें लार्ड कार्नवालिस साहेबाला त्या ठिकाणीं जय मिळाला परंतु त्याला अन्नपाणी वगैरे सामानाची फारच कमताई पडली; आणि तशांत जनावरांला वैरणीचा तर अगदीं कडाका झाला ह्यामुळें तो मोठ्या संकटांत पडला. नंतर कांहीं सामानसुमानाचा संग्रह करावा व निजामानें दहा हजार स्वार मदतीस देतों म्हणून कबूल केलें होतें ते येऊन मिळाल्यास पहावें ह्या दोन हेतूंनीं तो साहेब त्या ठिकाणाहून उत्तरेकडे म्हणजे निजामाच्या राज्याकडे सरला. हिकडे बरेंच दूर गेल्यानंतर निजामाकडून जी फौज यावयाची होती ती येऊन दाखल झाली पण उपयोग काय ! तें

त्यांचे चमत्कारिक साह्यकारी.

वेडेंविद्रें सैन्य नदरेस पडल्याबरोबर सर्वांची अगदीं निराशा झाली. विक साहेबानें ह्या सैन्याची कांहीं चमत्कारिक स्थिति लिहिली आहे. तो म्हणतो– सर्व देशांत हत्यारांचे म्हणून जितके नमुने आहेत तितके सगळे ह्या सैन्यांत पाहून घ्यावे. ह्या सैन्यांत धनुर्बाण, गदा, सर्व प्रकारच्या तलवारी, सर्व जातींचे भाले, आणि सर्व जातींच्या तोड्याच्या बंदुका इतकींही हत्यारें होतीं. सर्व प्रकारच्या जंजिरी टोप्या ह्या फौजेंत दृष्टीस पडत होत्या. इतक्या डौलाप्रमाणें पाहिलें असतां सैन्यामध्यें व्यवस्था अगर हुकूम मानणें ह्या गोष्टीचा अगदीं अत्यंताभाव होता असें म्हटल्यास भिता नाहीं. इतकेंच कीं निरनिराळ्या टोळ्या आपआपल्या निशाणाभोंवतीं जमून राहिल्या होत्या. प्रत्येक मनुष्य आपले ठिकाणीं स्वतंत्र आपल्या इच्छेप्रमाणें वागणारा होता. दर एकाच्या डौलावरून असें दिसावें कीं हा एकटा देखील जय मिळविण्याविषयीं समर्थ आहे !! जें युद्ध मोठ्या व्यवस्थेनें चालणार त्यांत असल्या अव्यवस्थित फौजेचा कितपत उपयोग पडणार आहे हें स्पष्टच आहे. परंतु कहीला जाणें अगर शत्रूला उगीच भय प्रदर्शन करणें असल्या कामाला हे लोक उपयोगीं पडतील आणि तेणेंकरून ज्या फौजेला हल्लीं तें काम करावें लागतें तिला फुरसत सांपडेल; असें प्रथमतः कार्न वालिस साहेबास वाटत होतें तथापि पुढें पाहतां त तीं त्यांनीं नेटिवांस लुटावें आणि इंग्लिशांच्या छावणींतलें जें धान्य वगैरे सामान मुळींच संपत आलें होतें तें खाऊनसवरून फस्त करावें; ह्या दोन गोष्टींशिवाय तिसरें त्यांच्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं असें नजरेस आलें. प्र० १३ इ० स० १७९१

सेनापतीचे निश्चयात्मक बेत.

निजामाकडून आलेल्या मदतीचा कांहीं उपयोग होत नाहीं अशी कार्न वालिस साहेबाची निराशा झाली. ह्यासमयीं त्याला तीन गोष्टी म्हटला असतां सगळ्याच गोष्टींचा होता. परंतु विशेषेंकरून सामानसुमान इकडून तिकडे नेणें व तिकडून इकडे आणणें ह्याची सोय चांगली नव्हती. अशी स्थिति झाली होती तथापि त्याचा अभिप्राय असा होता कीं लढाईचा शेवट केल्याशिवाय सोडूं नये, आणि तो शेवट होण्याकरितां श्रीरंगपट्टणावर स्वारी करणें

प्र० १३ इ० स० १७९२

अगर्दी जरूर होतें. ह्या स्वारीची जिकडून जिकडून तयारी होण्यासारखी होती तिकडून तिकडून चालविली. सर्व कामदार लोकांस बोलावून आणून विचारितांच ते आपापलें खासगत सामान सरकारच्या ताब्यांत देण्यास राजी झाले, आणि तेंच सामान त्यांस जातीला पाहिजे सबब तें त्यांनीं नेतीव लोकांपासून भाड्यानें घेतलें. असें करण्याचें कारण सरकारला तर त्या सामानाची गरज फार पण सरकारानें नेतीव लोकांपाशीं मागितलें असतां ते त्यास खुषीनें देणार नाहींत सबब अशी तजवीज योजिली. सामान नेण्याची अडचण इतकी होती कीं. तोफांचे गोळे वाहून नेण्यास बायका, पोरें, देखील लागलीं होतीं. ह्याप्रमाणें कोणत्याही सरंजामाची तादृश तयारी नसतांही सरामरी थांगराथांगर करून श्रीरंगपट्टणावर लार्ड साहेबानें फौज रवाना केली. हा प्रकार पाहून टिपूला तर असें भय पडलें कीं, आपला जनानखाना व जामदारखाना हे दोन्ही श्रीरंगपट्टणांतून काढून चितलदुर्गास न्यावे अशी योजना त्यानें केली होती, पण तितक्यांत त्याच्या आईनें त्यास असें सांगितलें कीं ही गोष्ट केल्याबरोबर अर्थात सर्व रयत व फौज अगर्दी घाबरून जाईल, तस्मात जनानखाना वगैरे हलविण्याचा उद्योग करतां कामास नये. हें सांगणें टिपूनें मान्य केलें आणि असा निश्चय केला कीं ह्या शहराचा बचाव करण्याच्या कामांत जें कांहीं नुकसान होईल तें करून घ्यावयाचें. टिपूनें शहरांत चोहोंकडे भिंतीवर इंग्लिश लोकांची वेडीं, विद्रीं, बीभत्स, अशीं चित्रें काढिलीं होतीं, आणि कांहीं चित्रांत असेंही दाखविलें होतें कीं टिपूचीं कांहीं माणसें इंग्लिशांकडे कैदेंत होतीं त्या माणसांचा ते चोरून प्राण घेताहेत.

टिपूस भीती वाटली.

मुलतानानें आपल्या युक्ति बदलल्या.

आजपर्यंत टिपू धामधुमीच्या लढाई खेरीज तोंडास तोंड देऊन बिलकुल लढत नसे. तो आपल्या सैन्याच्या टोळ्या इंग्लिशांच्या टोळ्यांमध्यें घालून त्यांच्या परस्परांशीं गाठीं पडूं देत नसे, आणि ह्या तजविजीपासून मागील लढाईमध्यें त्याचें बरेंच हित झालें होतें. परंतु लार्ड कार्न वालिस साहेबाच्या मोहिमेमध्यें तसा प्रकार करणें टिपूच्या हातून झालें नाहीं. आणि आतां तर श्रीरंगपट्टण जा-

ण्याचा समय आला व टिपूच्या बायका टिपूची फार निर्भत्सना करूं लागल्या ह्या दोन गोष्टींमुळें चालीप्रमाणें शहरास इंग्लिशांचा वेढा पडण्याची वाट न पाहतां त्यांच्या आंगावर जाऊन छावणी देणें न्यास जरूर पडलें. श्रीरंगपट्टण बेटांत आहे आणि त्या बेटाजवळच एक डोंगरांची रांग आहे. त्या दोहोंच्या मधून कावेरी नदी वाहती. टिपूनें मोठा विचार करून आपलें सैन्य त्या डोंगरांच्या रांगेवर उभें केलें. लार्ड साहेबानें रातोरात टिपूच्या फौजेच्या डाव्या आंगास आपल्या फौजेचा तळ दिला. पण टिपूनेंही आपल्या फौजेच्या पुढल्या उंच टेंकड्यांवर इंग्लिश कशाकरितां येऊन उतरले हें मोठ्या शिताफीनें तेव्हांच ताडिलें. टिपूनें जी जागा धरिली होती तिजपासून त्यालाही मोठा नफा झाला. ती लढाई मोठ्या निकरानें चालून पुष्कळ दिवस होत होती. टिपूच्या फौजेवर आपला तोफखाना सुरू करण्याची इंग्लिशांची सोय नव्हती त्यामुळें टिपूच्या फौजेकडून जो भडिमार झाला तो अगदीं निमूटपणें सोसावा लागला. टिपूच्या तोफखान्यांतून इंग्लिशांच्या फौजेंत वाणावर बाण एकसारिखे येऊन पडत होते ह्यामुळेंही तिला फार त्रास झाला. इतकेंही झालें तथापि इंग्लिश जसे जवळ येऊन भिडले तसे सरबर्तीवर सरबर्ती असें करितां करितां त्यांनीं टिपूच्या फौजेचीं ठाणीं एका मागून एक ह्याप्रमाणें सर्व ठाणीं घेऊन टाकिलीं. शेवटीं टिपूच्या फौजेला शहराच्या कोटाचा आश्रय जाऊन करावा लागला. म्र० १३ इ० स० १७९१

मोठें युद्ध.

कार्न वालिस साहेबाचे जखमी झाले व मेले मिळून पांचशें लोक कमी होऊन त्या दिवशीं त्याची सरासरी फत्ते झाली. पण ह्यानंतर त्याला असें झालें कीं, ह्या ठिकाणीं आपणास पूर्ण जय मिळाला तरी आपला उद्देश सिद्धीस जाणें कठीण. टिपूनें मोठ्या तजविजीनें आपल्या जुन्या चालीप्रमाणें इंग्लिशांच्या छावणीच्या आसमंतात् भागचा सर्व मुलूख ओसाड करून टाकिला. इंग्लिशांनीं आपणास कोणी मनुष्य भेटून कांहीं मदत मिळावी किंवा कांहीं बातमी लागावी एतदर्थ त्या ओसाड प्रदेशांत कैक ठिकाणीं बातमीदार वगैरे पाठविले, पण कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

इंग्लिशांस जय मिळाला पण त्यापासून फायदा झाला नाहीं.

ग्र० १३ इ० स० १७२१. इंग्लिशांच्या फौजेंत अन्नाचा दुष्काळ पडला, रोग उत्पन्न झाले, आणि एवढा तळ एके ठिकाणीं पडला असतां जेवढीं संकटें म्हणून येण्यासारिखीं होतीं तेवढीं सर्व आलीं. आणि हीं सर्व अरिष्टें अशीं आहेत कीं एकदां येऊन गुदरलीं म्हणजे युद्धापासून जितके लोक मरतात त्यांपेक्षां ह्यांपासून जाजतीच मरतात, पण कमी नाहींत. बैल वगैरे ओझ्याच्या जनावरांची त्यांजपाशीं इतकी कमताई होती कीं, सामानाच्या अगर मोठमोठ्या तोफांच्या गाड्या शत्रूच्या नदरेसमोर त्यांच्या शिपाई लोकांस, जनावराप्रमाणें ओढाव्या लागत असत. सारांश पुढें जावें मागें यावें असें करितां करितां शेवटीं लार्ड साहेबास असें वाटलें कीं श्रीरंगपट्टणच्या वेढ्याकरितां सर्व तोफा व दुसरा दरोबस्त सरंजाम आणिला आहे तो टाकून देऊन आपणास ह्याच क्षणीं माघारें निघून गेलें पाहिजे. लार्ड साहेबाच्या मदतीकरितां दुसरी फौज रवाना झाली होती तिलाही पुढें न येण्याविषयीं हुकूम पाठविणें त्यास जरूर पडलें. त्याची हकीकत पुढें लिहितों.

मलबारकिनाऱ्यावरील युद्ध.

इंग्लिशांची फौज व सामानसुमान वगैरे सर्व राहण्याचें ठिकाण म्हटलें म्हणजे मद्रास, पण त्यांची लढाई मलबार किनाऱ्यापर्यंत पसरली होती. ह्या मलबार किनाऱ्यावरच्या लढाईंत कर्नल हार्तली साहेब सेनापति होता. त्याजपाशीं फौज थोडीच होती, पण त्या प्रांतांतले लोक टिपूच्या जुलमाला अत्यंत त्रासले होते ह्यामुळें ते इंग्लिश फौजेला पाहिजे तशी मदत करीत असत. टिपूची फौज धामधूमीच्या लढाईंत इंग्लिशांपेक्षां निपुण होती. पण रयत लोक तीस प्रतिकूळ होते, तेव्हां त्या लढाईचा घाट जमतो कसा ? अर्थात नाहीं. ह्या सर्व कारणामुळें टिपूच्या फौजेस इंग्लिशांच्या समोर उभें राहून बेताबातानें लढावें लागलें आणि त्या लढाईंत तिचा अगदीं पराजय झाला. नंतर लागलाच इ० स० १७९० मध्यें दिसेंबर महिन्यांत जनरल आबरक्रांबी साहेब बहुत फौजेनिशीं येऊन दाखल झाला आणि मलबार किनाऱ्यावर कानन्नूर वगैरे जेवढीं टिपूचीं ठिकाणें होतीं तेवढीं सर्व त्यानें घेऊन टाकिलीं. इतक्यांत कुर्गचा राजा त्याला मिळाला त्यानें त्याला आपल्या

राज्यांतून टिपूच्या राज्यांत जाण्याला रस्ता दिला. कुर्ग प्रांतांतील लोकांचे हाल टिपूनें फसकसे केले ह्याविषयीं आम्हीं मागें लिहिलेंच आहे. त्यांचा राजा बहुत वर्षें बंदींत होता तो तेथून कांहीं कारस्थानानें नुकताच सुटून आला होता. इकडे त्याचे पुष्कळ रयत लोक तो मुलूख सोडून देऊन दुसरे ठिकाणीं जाऊन दुःखार्णवांत पडले होते. तो राजाही बंदींतून सुटला तो अरण्यांत जाऊन राहिला. तेथें झाड्यांतून वगैरे कांहीं स्वतंत्र लोक होते त्यांच्या मनांत तो आवेश होताच. तेव्हां त्या आवेशानें ते त्या राजाला येऊन मिळाले. त्या राजानें मोठ मोठालीं पुष्कळ कृत्यें अशीं केलीं कीं त्यांचा एखादा ग्रंथ रचला असता तर फार शानदर झाला असता. ह्या कृत्यांच्या योगानें त्याची चोहींकडे कीर्ति पसरून जे लोक पूर्वी देशोधडीस गेले होते तेही येऊन त्याला मिळाले. नंतर राजानें त्या लोकांस फौजेच्या कामांत तयार करून त्यांजकडून टिपूच्या लोकांची फजिती करविली आणि त्यांचीं ठाणीं हिरावून घेतलीं. कुर्गच्या लोकांवर जुलूम करून टिपूनें त्यांच्या मुलखांत आपले मुसलमान लोक आणून घातले होते त्यांस हांकून देऊन शेवटीं तो राजा कुर्गचा धनी होऊन बसला. इतक्यांत जनरल आबर्क्रांबी साहेब तेथें आला आणि त्याचा व राजाचा शत्रु एकच पडला ह्या करणानें त्या दोघांचा लागलाच साह्यसंकेत होऊन राजानें साहेबास वाट दिली. त्या रस्त्यानें साहेबानें आपली फौज म्हैसूरच्या मुलखांत शिरण्यासाठीं रवाना केली. ह्या वाटेनें तिला कोणी आड येणारा नव्हता. ह्या रस्त्यानेंही घाट मोठा व उंच आहे; तेव्हां अशा उंच प्रदेशावर मोठ मोठाल्या तोफा वगैरे चढिवणें म्हणजे अत्यंत श्रमाचें काम होय. कारण जागोजाग कंप्या वगैरे लावून मोठ मोठ्या सोलांनीं तोफा ओढून घ्याव्या लागत असत. अशा अनेक अडचणी असतां त्या सर्वांतून पार पडून आबर्क्रांबी साहेब मोठ्या त्वरेनें कार्नवालिस साहेबास मिळण्यासाठीं येत होता; तों त्याला हुकूम येऊन लागला कीं ताबडतोब परत जावें, तेव्हां त्याप्रमाणें त्याला परत जावें लागलें. लार्ड कार्नवालिस साहेबाप्रमाणें आबर्क्रां-

प्र० १३ ह० स० १७९२ कुर्गचा राजा.

आबरक्रांबी साहेबाबरोबर तह.

प्र० १३ इ० स० १७९१ मराठ्यांची कुमक येऊन पोंहोचली.

बी ह्यासही मोठमोठाल्या तोफा वगैरे बहुत सामान टाकून देऊन जावें लागलें.

लार्ड कार्नवालिस साहेबाचा परत जाण्याचा बेत झाला हें मागेंच लिहिलें आहे. त्याप्रमाणें तो बंगळूरावर परत जात होता. फौजेंतल्या लोकांस अन्नाचा तोटा पडल्यामुळें त्यांची शक्ति क्षीण झाली; जे लोक अजारी होते त्यांसही तसेंच बळें बळें जावें लागलें ह्यामुळें सर्व फौजेची दुर्दशा होऊन कांहीं मागें व कांहीं पुढें अशी तिची फाटाफूट झाली होती. इतक्यांत डाव्या आंगास मोठी धोरली एक स्वारांची टोळी त्या लोकांच्या नजरेस पडल्यामुळें ते अगदीं भिऊन गेले. ही टोळी मोठ्या एखाद्या सैन्याची बिनी असावी असें त्यांस वाटून ते कांहीं लढाईच्या तयारींत होते. इतक्यांत त्या टोळींतील एक स्वार पुढें येऊन त्यानें त्यांस हांक मारून सांगितलें कीं मी मराठ्यांकडील आहें. मग असें समजलें कीं परशुराम भाऊ पटवर्धन व हरिपंत फडके हे दोन शूर सरदार मोठ्या बलाढ्य सेनेसहवर्त्तमान येत आहेत त्या सैन्याची ही बिनी आहे, हे सरदार वक्तावरच आपल्या राज्यांतून निघाले होते पण उशीर लागण्याचें कारण हें कीं येतांना त्यांनीं धारवाडाला वेढा दिला होता. त्या ठिकाणीं टिपूनें किल्ला बांधून त्यांत चांगला फौजफांटा ठेवून बंदोबस्त राखिला होता. हें शहर म्हैसूरच्या उत्तरेस आहे. परशूराम भाऊनें इंग्लिशांची एक लहानशी टोळी मदतीस घेऊन इ० स० १७९१ च्या सप्तंबर महिन्यांत त्या किल्ल्यापुढें मोरचे वगैरे लावून युद्धाला आरंभ केला. हें लढाईचें काम मोठ्या चमत्कारानें चाललें होतें. मोरचा लावावयाचा तो तटाचे एके ठिकाणीं रोंखून ठेवून त्या ठिकाणीं तोफा कधीं लागू करीत नसत, तर सरासरी तटाच्या आसपास गोळे टाकावे असें करीत असत. दुसरें असें कीं तोफेंत दारू भरली म्हणजे गोलंदाजांनीं एकदां गुरगुडी ओढावी घटका अर्धी घटका कांहीं गप्पाटप्पा माराव्या मग बत्ती लावावी; पुन्हा तोफ भरावी, आणि पुन्हा गप्पा मारूं लागावें, असें सारखें चाललें होतें. दोनप्रहरीं जेवणखाण व थोडिशी विश्रांति एवढें आटोपण्या-

धारवाड घेतलें.

करितां उभय पक्षाच्या संमतानें दोन तास अगदीं निराळे काढिले होते; म्हणजे त्यावेळेस कोणी कोणावर गोळा वगैरे टाकूं नये. इंलिशांच्या इंजिनियर लोकांनीं अनुमान केलें कीं, अशा रितीनें हें काम चाललें म्हणजे तटाला भोंक पडण्याला सुमारें पांच सात वर्षें लागतील. कर्नेल फ्रेदरिक साहेब हा मोठा हिंमतदार मनुष्य होता, आणि ह्या मोठ्या कमांत आपणास जय मिळावा अशी त्यास फारच उत्कंठा होती, पण अशा दिरंगाईनें त्यास विलक्षण त्रास येऊन तो दुखण्यांत पडला आणि त्यांत त्याचा शेवटही झाला. अशाच रितीनें सुमारें सहा महिने ह्या ठिकाणीं झाल्यावर किल्ल्यांतल्या फौजेचें अन्न वगैरे संपत आलें व बंगळूर किल्ला इंग्लिशांच्या हातीं लागला अशी बातमी तीस लागली त्यामुळें तिचें धैर्य सुटून किल्लेदारानें तहाचीं कलमें लिहून मान्यतेकरितां मराठ्यांकडे पाठविलीं. त्यांनीं त्यावेळेस तीं मान्य केलीं, पण तीं पुढें चालविलीं नाहींत. नंतर तेथून मराठ्यांची फौज हळूहळू म्हैसुराकडे आली तेव्हां पूर्वी लिहिल्याप्रमाणें कार्नवालिस साहेबाच्या फौजेची आणि तिची गांठ पडली. ही एवढी फौज आपल्या कुमकेस येत आहे असें लार्ड कार्नवालिस साहेबास श्रीरंगपट्टण मुकामीं कळतें तर हरतऱ्हा करून त्यानें तेथें राहणें केलें असतें असें वाटतें. पण टिपूचे घोडेस्वार मोठे चपल त्यांनीं इंग्लिशांस बातमी लागूं दिली नाहीं. प्र० १३ इ० स० १७९१

वेळेवर धान्याचा वगैरे पुरावा आला.

मराठे येऊन मिळण्यापूर्वी इंग्लिशांच्या छावणींत अगदीं दुष्काळच येऊन पडण्याचा समय गुदरला होता. पण ते आल्याबरोबर इतकें झालें कीं त्यांजबरोबर सर्व जिनसांचा संग्रह पुष्कळ असून ते विकण्यास राजी होते; त्यामुळें मागतील ती किंमत आपल्या गरजेखातर दिली असतां पाहिजे तो जिन्नस मिळतो असें झालें. मराठ्यांचें सैन्य लुटारू पडलें त्यामुळें त्यांच्यांत कोणत्याच गोष्टीची कमताई नव्हती. विलायती पदार्थ होते व इकडचेही पदार्थ होते. त्यांत विलायती पदार्थ म्हटले म्हणजे सकलादीच्या ताग्यापासून तों बरमिंगहम येथील चाकूपर्यंत होते. हिकडचे पदार्थही पुष्कळ होते त्यांत वस्त्रें पाहिलीं असतां का-

किरकोळ लूट

प्र० १३ इ० स० १७९१

हिमरी शालजोडयांपासून तों जुनीं धोत्रेंपात्रें येथपर्यंत होतीं, आणि जवाहीर वगैरे पाहिलें असतां अगदीं उत्तम प्रतीच्या हिऱ्यापासून तों खेडया पाडयांतील गरीब बायकांच्या नाका कानांतील रूप्याच्या सुंकल्यापर्यंत होतें. इकडे सराफाच्या दुकानांत पाहिलें असतां सर्व देशांतील नाण्यांची अगदी गरदी होऊन गेली होती आणि त्यावरून असें दिसलें कीं ह्या छावणींत व्यापाराची मोठी भरभर आहे. आणि खरोखर हे जे वस्ताद लुटारू लोक आहेत, म्हणजे घाऊक सांपडो अगर किरकोळ सांपडो पण लुटावयाचें हाड्यांचा धंदा त्यांच्या छावणीखेरीज इतरत्र अशी व्यापाराची भरभर दिसत नाही. मराठ्यांनीं कार्नवालिस साहेबाची आणि वणजारी लोकांची ओळख करून दिली. हे लोक फार उपयोगी आहेत, ते असे कीं त्यांचे मोठाले थव्यांचे थवे धान्य भरून आपण जातीनें हत्यारबंद होऊन बायकांपोरांसुद्धां नेहमीं फिरतात आणि सर्व फौजांना धान्याचा नेहमीं पुरवा करितात. जे पैसा देतात त्यांस ते इमानें इतबारें धान्य देतात. कार्नवालिस साहेबाजवळ आतां पैसा पुष्कळ होता त्यामुळें त्याला कोणतीही ददात पडेल असें नव्हतें. टिपूचा खजिना संपत चालला होता म्हणून त्यापेक्षां हा गबर झाला.

वंजारी अगर धान्याचा व्यापार करणारे.

बेत फिरला.

इंग्लिशांच्या फौजेवरचें प्रस्तूतचें तर अरिष्ट टळलें; तेव्हां आतां माघारें उलटावें तों लार्ड कार्नवालिस साहेबाच्या नजरेस असें आलें कीं मद्रासेहून नवीन तोफा व दुसरें भरपूर सामान येऊन लढाईला चांगले दिवस येत तोंपर्यंत पुन्हा श्रीरंगपट्टणावर स्वारी करणें होणार नाहीं. असा विचार ठरला तेव्हां फौज सध्यां रिकामीच राहिली होती तीं डोंगरी किल्ल्याप्रमाणें उंचउंच दुर्ग होते ते जिंकून घेण्याच्या कामाकडे लाविली. हिंदुस्थानांत असे दुर्ग अनेक ठिकाणीं आहेत. ह्या सर्व दुर्गांमध्यें नंदिदुर्ग म्हणून जो होता तो मूळचाच कठीण होता आणि तशांत तो अगदीं अगम्य करून टाकावा म्हणून टिपूनें किल्ल्याप्रमाणें तेथें उत्तम रितीनें बंदोबस्त ठेवून अपल्या पटचा एक मोठा शहाणा कामगार त्यावर नेमिला होता. मेजर गॉदा साहेबाला कांहीं लहानसहान दुर्ग घेण्याच्या कामांत यश आल्यावरून त्यानें नंदिदुर्ग घेण्याचा इरादा धरिला. ह्या दुर्गावर

दुर्ग घेतले.

नंदिदुर्ग घेतला.

प्रवेश झालाच तर एका तोंडानें होण्यासारिखा होता पण माथ्यावर ह्या ठिकाणीं दुहेरी तट घालून चांगली बळकटी केली होती. ह्या दुर्गाच्या बाजू अगदीं सुळक्या सारिख्या उंच होत्या ह्यामुळें त्यावर तटबंदी करण्याचे आणि बुरजावर तोफा चढविण्याचे श्रम पराकाष्ठेचेच होते. एकवीस दिवसांत इंग्लिशांनीं दोन ठीकाणीं तट पाडिला, आणि एके दिवशीं पहांटेस लखलखीत चांदणें पडलें असतां जनरल मेदोज साहेबानें त्या दुर्गावर स्वतः हल्ला केला. किल्लेदार मोठ्या आवेशानें लढले, तटावरून मोठमोठाल्या धोंडी खालीं घडघडत येत होत्या; आसपासच्या कड्यांवरून निर्झांच्या कडकडाटाप्रमाणें कडकडाट चालला होता. पण हल्ला करणारांनीं सर्व अडचणींतून पार पडून आंतल्या दरवाजावर मारहाण करून आंत प्रवेश केला. ह्या वेढ्यांत मेले व जखमी मिळून एकंदर १२०; पैकीं ३० असामी हल्ल्याच्या वेळेस ज्यावरून धोंडी येत होत्या त्याखालीं सांपडून मेले. म० १३ इ० स० १७९१

सावनदुर्ग हल्ला करून घेतला.

हे दुर्ग म्हणजे बिकट ह्यांच्या मध्यें प्रवेश होणें कठीण अशी जी समजूत होती ती आलीकडे कमी कमी होत चालली आहे. सावनदुर्ग घेण्याचा उद्योग करणें व्यर्थ आहे असें कर्नल स्युअर्त साहेबास पुर्वी वाटलें होतें आणि हा दुर्ग नंदिदुर्गापेक्षांही कठीण होता पण त्याच साहेबानें तो दुर्ग घेण्याचा उद्योग चालविला. आणि पुढें सरावें मागें यावें ह्यांत त्याचें सुमारें सात दिवस गेले वर्षांच दिवसपर्यंत मोरचेबंदी करून ते लढले आणि हल्ला करून आपला एकही शिपाई न गमावितां दुर्गाचे धनी झाले. नंतर उत्तरदुर्ग येथील फौजेस ह्या पुर्वीच्या बातम्या समजल्यावरून ती अगदीं भिऊन गेली आणि दुर्ग लागलाच स्वाधीन केला. बारामहाल प्रांतांत किसनगड म्हणून शहर आहे तें एक टिपूचें मोठें ठाणें होतें त्यावर इंग्लिशांनीं एकाएकीं हल्ला केला पण त्या हल्ल्यांत त्यांस तादृश यश आलें नाहीं; तें असें कीं टिपूचे लोक इंग्लिशांवर दौड करीत आणि पुन्हा त्या ठाण्यांत जाऊन राहत. तेव्हां हें ठाणें त्यांस अशा रितीनें राहण्यास उपयोगीं पडूं नये म्हणून कर्नल मार्कसवेल ह्यानें तें घेऊन जाळून टाकिलें, एवढेंच त्यानें केलें; पण उत्तरदुर्ग स्वाधीन झाला.

प्र० १२ इ० स० १७९२

तेथें आपला फैजफांटा ठेवून बंदोबस्त करणें हें त्याच्या हातून झालें नाहीं. टिपूनें मध्येंच पुष्कळ फौज दक्षिणेकडे रवाना केली होती तिनें अनेक कारस्थानें करून इंग्लिशांपासून कोइमत्तूर घेतलें. त्या ठिकाणच्या इंग्लिशांशीं टिपूच्या लोकांनीं प्रथम असा करार केला होता कीं तुमचे लोक पालघाट मुकामीं आहेत त्यांस तुम्ही जाऊन मिळत असतां आम्ही तुम्हांस उपद्रव देणार नाहीं. पण हा करार मोडून टाकून टिपूनें त्या इंग्लिशांस कैदी करून श्रीरंगपट्टणास रवाना केलें.

लार्ड कार्नवालिसच्यानें तयारी पुरी केली.

मध्यें तह होण्याकरितां कांहीं वेळ उद्योग केला पण तो सफळ झाला नाहीं. कार्नवालिस साहेबानें सर्व गोष्टींची भरपूर तयारी करून सर्व सेना अगदीं सिद्ध केली आणि असें ठरविलें कीं श्रीरंगपट्टणावर जाण्यास आतां उगीच विलंब करूं नये. निजामाचा मुलगा सिकंदर जाहां हा आपल्या फौजेनिशीं येऊन लार्ड साहेबास मिळाला. ही फौज आजपावेतों गुरमकोंडाचा वेढा घालण्यांत गुंतली होती. ह्या फौजेंत व्यवस्था पाहूं गेलें असतां कोणत्याच प्रकारची नव्हती त्यांच्या हत्यारांचे वगैरे वर्णन मागेंच केलें आहे. ह्या सर्व गोष्टींवरून ह्या फौजेच्या मदतीपासून आपलें कांहीं बर होईल अशी अशा लार्ड साहेबास नव्हती. मराठ्यांची फौज परशुरामभाऊच्या दिमतीस होती; म्हणून त्यानें जर इंग्लिशांच्या घोडेस्वारांचें काम केलें असतें तर फार चांगलें झालें असतें. पण त्याच्या मनांत असें आलें कीं आपण इंग्लिशांच्या समाजांतून निघून बिदनूर प्रांतावर जावें आणि तो प्रांत संपन्न आहे त्यापक्षीं लुटावा ह्यांत आपला नफा विशेष आहे; आणि ह्या स्वहिताकरितां इंग्लिशांच्या व त्याच्या जुटापासून ज्या अनेक मोठमोठ्या गोष्टी व्हावयाच्या त्या सर्वांवर त्यानें बेधडक लाथ मारिली. कप्तान लिटल साहेब एक हजार लोकांनिशीं परशुरामभाऊच्या दिमतीस होता त्याला भाऊ जो कांहीं बरा वाईट बेत करी त्याप्रमाणें वागावें लागत असे. आणि जेवढी गोष्ट श्रमसाध्य असे तेवढी त्याजवर करावयाची पडे. एक वेळ असें झालें कीं एका दऱ्यांत टिपूची फौज ठाणें देऊन राहिली होती, आणि तें जंगल म्हणजे असें होतें कीं

तेथें प्रवेश होणेंही कठीण. अशा ठिकाणीं त्या फौजेवर हल्ला करण्याविषयीं लिटल साहेबास परशुराम भाऊनें फार तसदी लाविली. तेव्हां साडेसातशें शिपाई लोक़ांनिशीं तो साहेब त्या कामावर जाऊन मोठ्या निक़रानें लढला. ह्या लढाईंत जय येतो अगर नाहीं ह्या गोष्टीचा कांहीं वेळपर्यंत तर अगदीं संशय होता; आणि ह्या लढाईंत त्यांचें नुक़सान फार झालें, पण शेवटीं त्यानें टिपूच्या लोकांस हांक़ून दिलें. ह्या सर्व मोहिमेंत ही एक मोठी लढाई झाली असें सर्व म्हणतात.

प्र० १३ इ० स० १७९२ क्यापतन लिटल साहेबाचें शौर्य.

वर सांगितल्या प्रकारामुळें लार्ड कार्नवालिस साहेबाला आपल्या खासगत दिमतीस जी बावीस हजार फौज होती तिजवर सर्व भरंवसा ठेवणें प्राप्त झालें. ह्या फौजेंत बेचाळीस गरनाळा आणि चाळीस तोफा होत्या. ह्या फौजेखेरीज जनरल आबर्क्रांबी साहेबाच्या हताखालीं ८४०० फौज होती तीहि कार्नवालिस साहेबाच्या आटोक्यांत होती. तिला त्यानें ताबडतोब श्रीरंगपट्टणावर निघून जाण्याविषयीं हुक़ूम केला. इ० स० १७९२ त फेब्रुवारीच्या पहिल्या तारिखेस ती फौज निघाली आणि मार्गांत चालावयाचें तें तीन रांगा करून चालत असे. त्यांत मधल्या रांगेंत तोफा व दारूगोळा वगैरे सामान चालत असे, आणि दोहोंकडच्या दोन रांगांनीं पायदळ चालत असे. अशा तीन रांगा केल्यामुळें आजपावेतों इंग्लिशांची फौज मार्गानें जाऊं येऊं लागली असतां टिपूच्या फौजेपासून तीस जो उपद्रव होत असे तो उपद्रव एक रांग न करितां तीन रांगा केल्यामुळें बहुतेक टळला.

उपयोगी पडणारी फौज.

फेब्रुवारीच्य पांचव्या तारिखेस ती फौज लहानसा घाट चढून गेली तेव्हां तेथून श्रीरंगपट्टण दिसूं लागलें. ह्या शहराच्या बाहेरल्या आंगास टिपू सुमारें चाळीस हजार पायदळ व पांच सहा हजार घोडेस्वार इतक्या फौजेनिशीं मोरचेबंदी करून तयार होऊन राहिला होता. आतां कर्नल विक साहेब असें म्हणतो कीं, टिपूनें आपल्या एखाद्या विश्वासु सरदाराच्या दिमतीस चांगली हुशार फौज देऊन त्यास शहरांत ठेविलें असतें आणि आपल्या घोडेस्वारांनिशीं इंग्लिशांच्या मागें लागून त्यांस कांहीं बातमी लागूं देऊं नये

लार्ड कार्नवालिस वर्त्यांची गांठ पडली.

रांगांच्या मागून (जवळच) कार्नवालिस कांहीं थोडीशी फौज घेऊन चालला होता. ही सर्व फौज अवशीस चांगलें स्वच्छ चांदणें पडल्यावर आठ वाजतां निघाली. ह्या रात्रीं जेवढ्या गोष्टी झाल्या तेवढ्यांची अगदीं कच्ची हकीकत लिहिलेली आहे, पण ज्यांनीं या गोष्टी लिहिल्या त्यांनीं तरी रात्रीच्या पाहण्यावरून लिहिल्या कारणानें त्यांजमध्यें अस्पष्टपणा आहे. ह्या सर्व गोष्टी लोकांस स्पष्ट समजतील अशा प्रकारें सांगणें म्हटलें म्हणजे त्या त्या स्थळाचें विशेष वर्णन येथें केल्याखेरीज होणार नाहीं, त्यापक्षीं ही गोष्ट येथें होत नाहीं. इतकें खरें आहे कीं हा हल्ला रात्रीं केल्यामुळें इंग्लिशांच्या कामदार लोकांस अनेक प्रकारचीं संकटें व अडचणी आल्या. एकदां तर असें झालें कीं कर्नल स्युअर्त व कर्नल माक्सवेल ह्या दोघांच्या टोळ्या चांगलें दिसत नसल्यामुळें एकमेकांस संगिनींनीं भोंसकण्याच्या लागांत आल्या होत्या. कार्नवालिस साहेब टिपूच्या छावणीची हद्द वलांडून आंत शिरला, आणि तेथें कर्नल मेदोज ह्यास पहात होता; इतक्यांत एक्या मोठ्या टोळीनें त्याजवर हल्ला केला. तेव्हां तो मोठ्या संकटानें तिच्या तोंडाशीं तोंड देऊन उभा राहिला. ह्या हल्ल्याचा परिणाम एकंदरीनें पाहतां असा झाला कीं इंग्लिशांची फौज जेव्हां येऊन भिडली तेव्हां तिच्यापुढें टिपूच्या फौजेचा अगदीं टिकाव लागेनासा होऊन ती पळत सुटली. टिपूच्या छावणीच्या एक्या बाजूस नदी होती म्हणून मागेंच सांगितलें आहे; ह्या नदीचा उतार, इंग्लिशांच्या वर सांगितलेल्या दोन टोळ्यांस सांपडून ते लोक जेव्हां मोठ्या निकरानें उतरूं लागले तेव्हां मात्र टिपूच्या पक्षाला मोठी बाणीची वेळ आली. फौजेला नदी उतरून नेण्याच्या कामांत कर्नल नाक्स ह्यानें फार चांगली शिताफी केली. ह्यामुळें पूर्वी ह्या कामांत जितके श्रम पडतील असें सर्वांस वाटलें होतें तितके देखील पडले नाहींत. पण उताराच्या ठिकाणीं पाणी पुष्कळ होतें ह्यामुळें इंग्लिशांचे दारूचे तोटे भिजून खराब झाले. तेव्हां त्यांजपाशीं भरंवसा ठेवण्यासारिखें संगिनींशिवाय दुसरें कांहींच उरलें नाहीं. आरंभीं म्हणजे

म० १३ इ० स० १७९२ रात्रीचा हल्ला.

नदींतील उतार.

म० १३ इ० स० १७९२

व त्यांस अन्नपाणीही मिळूं देऊं नये, असें केलें असतें तर पहिल्याप्रमाणें धामधूम करण्यास त्याला वरें पडतें. परंतु आपली हल्लींची जागा मजबुतीची आहे अशी टिपूची पक्की खातरजमा होती आणि हीच जागा धरून आपण राहिलों असतां हैदराच्या वेळेस म्हणजे सन १७६७ त मराठे जसे निराश होऊन माघारे निघून गेले तसे इंग्लिशही कंटाळून त्रासून शेवटीं निघून जातील असें टिपूस वाटत होतें. खरोखरच टिपूच्या छावणीच्या सभोंवतीं बंदोबस्त फार चांगला होता. म्हणजे एका बाजूस कळकींचीं दाट वेटें होतीं, व एक लहानशी नदी होती व एक कालवा होता. त्याची जी मोठी टोळी होती तिच्या पुढच्या आंगास एक लहानसा तटबंदी किल्ला होता न त्यांतील एक कोट होता. ह्या टोळीच्या पिछाडीस बेट व त्यांतील शहराची तटबंदी होती. कांहीं कमजास्ती रंग दृष्टीस पडल्यास माघारे जाऊन राहण्यासही हें स्थळ फार चांगलें होतें. सारांश टिपूच्या ह्या छावणीविषयीं बहुत लोकांस व विशेषतः नेतीव कामदारांस असें वाटत होतें कीं ह्या ठिकाणीं हल्ला येण्याची भीति अगदीं नाहीं. हिकडे कार्नवालिस साहेबानें विचार केला कीं आपण कांहीं हालचाल न करितां स्वस्थ बसलों तर तितक्या काळांत टिपू आपल्या छावणीच्या आसपास कांहीं जास्ती मोरचेबंदी वगैरे करून तीस विशेष बळकटी आणील. आणि आपण शत्रूच्या देशांत तळ देऊन राहिलों आहों व तशांत आपले साह्यकर्तेही आपण त्यांजवर विश्वास ठेवावा असे नाहींत ह्यामुळें आपणास हें फार जड जाईल. ह्या सर्व कारणांवरून आपण लराकरून एकदम मोठा हल्ला करावा असा मनसोबा त्यानें केला. एखाद्या किल्ल्यावर हल्ला कर्त्तव्य असतां रात्रीं तो करण्यांत जशी सोय असते तशी एथेंही हें काम रात्री चालविण्याची जरूरी होती, कारण हेंच कीं टिपूच्या ज्या तोफा होत्या त्या कांहीं एक निशाण धरून सोडतां येऊं नयेत.

टिपूच्या छावणीची बळकटी.

तिजवर तावडतोब हल्ला करण्याचें ठरलें.

हल्ल्याचा बेत.

ह्या हल्ल्यावर जे लोक पाठवावयाचे होते त्यांच्या तीन रांगा केल्या. जनरल मेदोज ह्याच्या दिमतीस एक आणि कर्नल स्त्युअर्त व कर्नल माक्स वेल ह्या दोघांच्या दिमतीस दोन. ह्या

प्र० १२ इ० स० १७९२

इंग्लिशांच्या फौजेंत हालचाल नव्हती तेव्हां टिपू नदीच्या कांठीं एक चांगला बुरूज होता त्यांत राहिला होता आणि त्याचें जेवण तेथेंच झालें. परंतु इंग्लिश उताराकडे येत आहेत असें त्याच्या नदरेस पडतांच त्याला भय पडलें कीं इंग्लिश मध्यें आले म्हणजे श्रीरंगपट्टणाशीं आपलें दळणवळण बंद होईल म्हणून त्यांच्या अगोदर नदी उतरून जाण्याकरितां त्यानें फार जलदी केली. तो गेला तों अगदीं इंग्लिशांच्या अघाडीच्या रांगेजवळून गेला आणि किल्ल्याच्या कोपऱ्यास एकीकडे एक वाडा होता त्यांत तो जाऊन पोहोंचे तोंपर्यंत त्याच्या बरोबरचे कैक लोक मारिले गेले. त्या वाड्यांत तो राहिला. पुढे कांहीं थोड्या वेळानें उजाडलें तेव्हां इंग्लिशांची फौज वेटांत जाऊन आपली सर्व व्यवस्था लावून बसली आहे असें टिपूच्या दृष्टीस पडलें. ह्या फौजेच्या आणि किल्ल्याच्यामध्यें गोळीला वगैरे हरकत करण्यासारिखें कांहीं एक नव्हतें. असें म्हणतात कीं, ह्या घोटाळ्यांत टिपूच्या फौजेंत पळापळ होऊन हजारों लोक आपआपल्या घरीं जाऊन बसले, त्याचमुळें त्याचे सुमारें २३००० लोक कमी झाले, सुमारें दहा हजार लोक आपल्या बायकां पोरांसुद्धां म्हैसुरांतून पश्चिमेकडल्या मुलखांत निघून गेले. ह्या प्रसंगीं इंग्लिशांचे जखमी व मेले मिळून सुमारें पांचशें लोक पडले.

सुलतानाचा अतिशय नाश झाला.

आपलें स्थळपरत घेण्याविषयीं टिपूनें अतिशय प्रयत्न केला.

आपला एकंदर नाश झाला कितीं हें टिपूस समजल्यावर त्यानें पूर्वस्थितीवर आपली व्यवस्था आणावयाकरितां पुष्कळ मेहनत केली. आपल्या फौजेंतून पुष्कळ लोक पळून गेले आहेत त्यांचीं मनें वळून त्यांनीं माघारें यावें ह्याकरितां त्यांस कांहीं तरी बक्षीस मांडावें असें टिपूचा खजिनदार पूर्णय्या ह्याचें म्हणणें होतें. त्याप्रमाणें त्या लोकांमध्यें दोन लाख रुपये वांटून द्यावयाचे असें त्यानें जिकडे तिकडे जाहीर केलें. टिपूनें आपल्या फौजेस असें निकडीचें बोलणें लाविलें कीं इंग्लिशांचा पगडा ज्या ज्या ठाण्यांत पक्का पडला नाहीं तीं तुमच्या हातून झाल्यास परत घ्यावीं. नंतर त्या फौजेनें इंग्लिशांवर मोठे जबरदस्त हल्ले केले व त्या हल्ल्यांस किल्ल्यावरील तोफांची मदतही होती. तथापि शेवटाखालीं त्या सर्वांचा पराजय झाला.

आतां आपलीं छत्रचामरें व हें राज्य राहणें फारच कठीण आहे असें टिपूच्या दिलांत पकें आलें; हें सर्व राखणें झाल्यास इंग्लिशच तह वगैरे करून राखतील तर राखतील दुसरें कांहीं नाहीं, अशीही त्याची खात्री झाली. कार्नवालिस साहेबाच्या हाताखालीं जेवढी फौज होती तेवढीनें टिपूच्या फौजेचे अगदीं धुडके उडवून श्रीरंगपट्टणाला वेढा दिला होता; आणखी आतां त्या फौजेला आबक्रांबी साहेबाची फौज, दक्षिणेकडून गजलहट्टीच्या घाटानें येत होती ती फौज, आणि परशुरामभाऊच्या हाताखालची मराठ्यांची फौज अशा तीन फौजा येऊन मिळणार होत्या. परशुरामभाऊ लूट वगैरे करावी अशा हेतूनें इंग्लिशांच्या फौजेंतून निघून बिदनुराकडे गेला असें मागेंच लिहिलें आहे; त्यास ह्या कृत्याबद्दल कांहीं थोडीशी लाज वाटावी व कांहीं थोडेसें भय वाटावें अशा तऱ्हेचें लिहिणें इंग्लिशांकडून गेलें त्यामुळें तो परत आला. मुळींच टिपूची दशा येथवर येऊन पोंहचली होती, आणि तशांत वर सांगितलेल्या तीन फौजा येऊन मिळाल्या, मगतर काय? टिपूचें राज्य जातें कीं राहतें ह्याजविषयीं संदेहच उरला नाहीं. मनुष्याच्या कोणत्याच गोष्टीचा नियम नाहीं हें जें म्हणणें आहे तेवढ्याबद्दलच संशय धरण्यास दुसरी जागाच उरली नव्हती. असो, टिपूनें तो प्रसंग जाणून असा निश्चय केला कीं, इंग्लिशांचें काय म्हणणें पडेल तें पतकरून तह करावयाचा. लेफ्टेनेन्त चालमर व लेफ्टेनेन्त नाश हे दोन इंग्लिश कामगार कोइमत्तूर मुकामीं मागेंच टिपूनें धरिले होते. आणि त्यावेळेसच इंग्लिशांचा व त्याचा तह झाला होता तो न जुमानून ते दोन असामी कैदी करून आजपावेतों श्रीरंगपट्टणांत ठेविले होते. त्यांस ह्यावेळेस बोलावून आणिलें आणि चाल्मर ह्यास विचारिलें कीं, तुमच्याकडे मोठा हुद्दा असून तुम्ही कार्नवालिस साहेबाचे संबंधी आहांना ? तो म्हणाला हें कांहीं नाहीं. असें झालें तरी टिपूनें त्याला खुला करून सांगितलें कीं, तूं कार्नवालिस साहेबाकडे जाऊन त्यास विदित कर कीं टिपूचा तह करण्याचा मोठा इरादा आहे व त्या बाबतीच्या बोलीचालीं करितां आपणाकडे वकील धाडण्याचें त्याच्या मनांत आहे. कार्नवा-

प्र० १३ इ० स० १७९२ त्याची भोक्याचो स्थिति.

टिपूनें तहाचें बोलणें लाविलें.

प्र० १३ इ० स० १७९२ तहाचीं कलमें.

लिस साहेबानें टिपूला जबाब पाठविला कीं तुमचें म्हणणें आम्हांस मान्य आहे; पण तुम्ही दोन आसामींस कैदी करून त्याचे हाल केले ह्या गोष्टीचा मात्र आम्हांस फार खेद वाटतो. नंतर टिपूकडून गुलामअली म्हणून मोठा हुदेदार इंग्लिशांच्या छावणींत गेला. मग त्या तहाच्या मसलतींत कैक दिवसपर्यंत सगळे अगदीं गढून गेले होते. इंग्लिशांच्या मदतीस मराठे निजाम हे आले होते, पण त्यांनीं मदत कांहींएक केली नव्हती; तथापि ह्या मसलतींत त्यांचा बरोबरीचा मान ठेविला होता. शेवटीं अगदीं निष्कर्ष होऊन टिपूकडे लिहून पाठविण्यार्ची कलमें ठरविलीं तीं येणेंप्रमाणें– इंग्लिशांच्या मदतीस निजाम व मराठे होते सबब त्यांच्या त्यांच्या मुलखास लागून जो टिपूचा मुलूख असेल तो त्यांस द्यावा; आणि ह्याशिवाय इंग्लिशांस मुलूख द्यावा– म्हणजे तिघांस मिळून टिपूनें अर्धें राज्य द्यावें हें एक कलम; टिपूनें तीन कोट तीस लाख रुपये रोख द्यावे हें दुसरें कलम; आणि टिपूनें आपले दोन पुत्र इंग्लिशांकडे ओलीस द्यावे हें तिसरें कलम. अशीं एकंदर तीन कलमें होतीं. हीं तिन्ही कलमें मोठीं अडचणीचीं होतीं खरीं. परंतु तह होत असतां ज्या कांहीं गोष्टी घडल्या त्यांवरून टिपूला तीं मान्यकरणें अगदीं भाग झालें. फेब्रुवारीच्या अठराव्या तारिखेस रात्रीं किल्ल्याबाहेर इंग्लिश काय करितात हें दिसावें म्हणून किल्ल्यावर लखलखीत प्रकाश करून ठेविला होता. तेव्हां किल्ल्याच्या दक्षिणबाजूस मेजर डालरीयल व कप्तान रार्बर्सन ह्या दोघांच्या फौजेंत कांहीं हालचाल वगैरे होत होती तिकडे किल्ल्यांतील सर्व लोकांचें लक्ष्य गुंतलें होतें. इतक्यांत, इंग्लिशांनीं तिलप्राय बोभाट न करितां मोठ्या तजविजीनें किल्ल्याच्या उत्तर बाजूस खंदकाचें काम चालविलें. शेवटीं उजाडल्यावर मग टिपूस समजलें कीं, जेणेंकरून आपला सर्वस्वी नाश होणार असें हें काम इंग्लिशांनीं सुरू केलें आहे. ह्या किल्ल्या जवळून एक नाला गेला होता तो पुष्कळ लांब रुंद करून त्या किल्ल्याशीं समांतर इंग्लिशांनीं केला. त्या नाल्यांत इंग्लिशांनीं आपली फौज अशा बंदोबस्तानें छपावून ठेविली होती कीं, शत्रूनीं कांहीं केलें असतां त्यांच्या कामाला हरकत म्हणून होऊंच नये. हें

श्रीरंगपट्टणासमोर खंदक खंदलें.

काम पुढें चालवून त्यांत सुधारणा चालविली होती. तें सर्व एकावि- साव्या तारिखेस संपलें. ते दिवशीं रात्रीं दुसरा खंदक खणांवयाचा त्याच्या खुणेकरितां रेषा मारिली. तेविसाव्या तारखेस तोही खंदक समाप्त करून किल्ल्यापासून सुमारें एक हजार हातांवर तोफा, गरनळा वगैरे मांडण्याची जागा ठरविली. ही जागा इंग्लिशांस अशी हितावह होती कीं, त्याठिकाणीं उभें राहून लढलें असतां किल्ल्याच्या तटाला तेव्हांच भोंक पडून आपलें कार्य होईलच असा त्यांचा निश्चय झाला. प्र० १३ इ० स० १७९२

सुलतानावर मोठी वाणीची वेळ गुदरली.

ह्याप्रमाणें टिपूचा नाशसमय अगदीं जवळ येऊन ठेपला ह्यामुळें कार्नवालिस साहेबानें त्याला जीं कलमें लिहून पाठविलीं होतीं तीं झटकन मान्य केलींच पाहिजेत असें त्याच्या नदरेस आलें. आपल्या पदरच्या मोठमोठ्या कामदारांस एका मुख्य मशिदींत जमवून सांजपुढें त्यानें कुराणाचें पुस्तक ठेविलें आणि त्याची त्यांस शपथ घालून तो म्हणाला कीं अशा भयप्रदप्रसंगीं तुम्हांस जो बुद्धिवाद सयुक्तिक दिसेल तो मला सांगा. कार्नवालिस साहेबानें जीं कलमें लिहिलीं होतीं तीं टिपूनें त्या लोकांस सांगितलीं आणि म्हणाला, हीं तहाचीं कलमें तुम्हीं ऐकिलींच, आतां मी तुम्हांस काय म्हणतों तेवढें ऐकून जबाब द्या. पुढें लढाई करावी किंवा तह करावा ? अशा शब्दांनीं विचारल्यानंतर दोहोंपैकीं कोणती गोष्ट करण्याविषयीं संमत्ति द्यावी असा संशय राहिलाच नव्हता. आणि ह्यावेळेस आपणास कोणती गोष्ट करणें भाग आहे हें टिपूच्याही लक्षांत पुरतेपणीं आलें होतें; परंतु त्याचें उगीच आपल्या कामदार लोकांचें मत घेतलें. प्रकृत स्थितीचा सर्व विचार केला असतां ह्या कलमांवर मान्यता करण्याखेरीज दुसरा उपायच उरला नाहीं असें सर्वांनीं एकमतानें सांगितलें. लोकांचा हा जो समाज एकत्र जमला होता तो असा होता कीं तो पाहणारास कळवळाच यावा. आणि कर्नल वीक साहेबास त्या सभेंतील जे जे लोक भेटले त्यांस तर त्या समाजाचें स्मरण झाल्याबरोबर त्यांच्या नेत्रांतून अश्रुच येत. त्याची कामदार लोकांवरोबर मसलत.

लार्द कार्नवालिसचें म्हणणें मान्य केलें.

लार्द कार्नवालिस साहेबानें जी तहाच्या कलमांची याद पाठ-

प्र० १३ इ० स० १७९२

विली होती तिजवर सही मोरतब करून टिपूनें त्याच राजां ती याद परत पाठवून दिली. दुसरे दिवशीं सकाळीं इंग्लिश फौजेला हुकूम लिहून गेला कीं खंदकाचें काम बंद करावें व लढाईही महकूब करावी हा हुकूम येऊन पोहोंचल्यावर त्या फौजेंतील सर्व लोकांची हुशारी जाऊन ते अगदीं निराश झाले. पूर्वी त्यांस पराकाष्ठेचाच आवेश आला होता. आपण जय मिळवून श्रीरंगपट्टणाच्या भिंतीला शिड्या लावून आणि आंत जाऊन आमच्या ज्या देशबांधवांस तेथें कैदेंत ठेविलें आहे त्यांस आम्ही स्वहस्तें मुक्त करूं अशी त्यांस अत्यंत ईर्षा होती. नंतर त्या फौजेचें समाधान करण्याकरितां कार्नवालिस साहेबानें मोठ्या चातुर्यानें तीस बोधपर असें लिहून पाठविलें कीं, प्रस्तुत जो आपणास जय मिळाला आहे त्यामुळें तुम्ही आपली वृत्ति बदलूं नका, आणि शरणागत जो शत्रु त्यास वाईट वाटण्यासारिखें कांहीं एक करूं नका.

टिपूचे पुत्र.

तहाच्या तीन कलमांपैकीं टिपूनें आपले दोन पुत्र इंग्लिशांकडे ओलीस द्यावे असें एक कलम होतें. मुलें ओलीस घेणें वगैरे ज्या गोष्टी आहेत त्या इकडील लोकांच्या मताप्रमाणें ठीक असोत, पण यूरोपखंडांतील अर्वाचीन लोक पाहिले असतां त्यांचीं मनें फार कोमल आहेत व ते दयाशील आहेत त्यापक्षीं त्यांच्या कल्पनेला ह्या गोष्टी अत्यंत विरुद्ध होत. पहा बरें, अशा प्रकारची भर घालण्यांत हंशील काय हें कांहीं आपणांस पुरतें समजत नाहीं. बरें असें घेऊन चला कीं शत्रूनें बेधडक तह मोडिला, तर पुढें त्या मुलांचा काय उपयोग पडणार आहे? किंवा त्यांच्या जिवास इजा तरी कोणती द्यावयाची होती. अस्तु इकडील चालीप्रमाणें मुलगे ओलीस देण्याचे तर कार्नवालिस साहेबानें ठरविलेच; पण त्या कामामध्यें त्याच्या हातून जेवढी कृपा दाखविली तेवढी त्यानें दाखविली. हीं मुलें पाठवून द्यावयाचीं त्यावेळेस राजवाड्यांत निकडे तिकडे जसें कांहीं दुःखाचे डोंगरच कोसळल्याप्रमाणें झालें ही गोष्ट कार्नवालिस साहेबाच्या कानीं गेल्यावर त्यानें टिपूला आणखी एक दिवसाचा अवकाश जास्त दिला. त्या राजपुत्रांस राहण्याकरितां कोटांतून डेरे राहुट्या वगैरे सामान येऊन तयारी

झाली. त्यांची बरदास्त राखण्यासाठीं एक लष्करी साहेब लोक आपण होऊन सिद्ध झाला होता. पण टिपूनें कार्नवालिस साहेबास लिहिलें कीं माझीं मुलें आपल्या डेऱ्यांत नेऊन आपल्या स्वाधीन करावी असा माझा फार मनोरथ आहे. फेब्रुवारीच्या २६ व्या तारखेस दुपारीं एक वाजतां तीं मुलें निघालीं. हा तमाशा पाहण्याकरितां गर्दी म्हणजे अशी जमली होती कीं शहराच्या भिंती लोकांनीं अगदीं फुलून गेल्या. स्वतां टिपूही हा तमाशा पाहण्याकरितां त्या लोकांत बसला होता. राजपुत्र ज्या हत्तीवर बसून जाणार होते ते फार चांगलें सजविले होते. त्यांच्यावर पांढऱ्या मलमलीचे गाशे घातले होते. त्यांच्या गळ्यांत मोतीं, माणकें, हिरे इतत्यादि रत्नांचे मोठे मोठे हार घातले होते. लार्ड कार्नवालिस साहेब तंबूच्या दारापर्यंत सामोरा आला आणि तेथें त्या दोघांचे हात धरून त्यांस आंत घेऊन गेला. टिपूकडला मुख्य वकील त्या मुलांबरोबर होताच तो त्या साहेबास म्हणाला, हा वेळ पावेतों हीं मुलें आमचा स्वामी टिपू हैदर ह्याचे पुत्र असें होतें पण आतां तें गेलें त्यांनीं आपणांस आतां पित्याच्या स्थानीं मानिलें पाहिजे. लार्ड कार्नवालिस साहेबानें खरोखरीच त्यांचें पुत्राप्रमाणें कौतुक केलें. त्यांच्या मनांतील भीति लागलीच अगदीं दूर केली थोरला मुलगा सारा १० वर्षांचा आणि धाकटा ८ वर्षांचा होता. पण चार संभावित लोकांत वागावें सवरावें कसें ह्या गोष्टी त्यांस फार चांगल्या रितीनें शिकविल्या होत्या. यामुळें ह्या प्रसंगीं जे लोक तेथें आले होते त्यांस एवढ्याशा ह्या मुलांचा मोठेपणा आणि शांतवृति पाहून मोठें आश्चर्य वाटलें. त्यांच्या वर्तणुकेंत सभ्यपणा तसाच आणि मर्यादाही तशीच, म्हणजे उगीच वचवच अगदीं करावयाची नाहीं.

ते राजपुत्र लार्ड कार्नवालिसच्या स्वाधीन केले.

राजपुत्र ओलीस द्यावयाचे होते ते दिले व एक कोट रुपयेही दिले. नंतर एक मोठी नवीच अडचण पडली. तेव्हांच असें ठरविलें होतें कीं, टिपूनें इंग्लिश, मराठे, आणि निजाम ह्या तिघांस मिळून आपल्या मुलखापैकीं अर्धा मुलूख द्यावा. मराठे व निजाम ह्यांच्या सरहद्दीवरचा मुलूख त्यांस द्यावा व बाकीचा इंग्लिशांस

अगा नव्हती अशा अडचणी आल्या.

प्र० १३ इ० स० १७९२

द्यावा असें अगदीं मोहोगम ठरलें होतें. पण कोणता किती द्यावयाचा ह्याविषयीं साफ लेख झाला नव्हता. वस्तुतः पाहिलें असतां हा लेख इतर सर्व लेखांच्या अगोदर असावा; कारण ही गोष्टच अशी आहे. आतां अमुक प्रांताचा अमुक वसूल हें टिपूच्या दप्तरांत जो वसूल लागला असेल त्यावरून ठरवावें असें केलें होतें. टिपूनें आपल्या मुलखाच्या जमाबंदीचे कागदपत्र इंग्लिशांकडे पाठवून दिले होते त्यांत मराठे व निजाम ह्यांच्या सरहद्दीवरच्या आपल्या प्रांताच्या वसुलाचा आंकडा मनस्वीच फुगविला होता आणि बाकीचा मनस्वीच कमी केला होता. इकडे परशुराम भाऊ आणि निजाम ह्यांनीं लागलेंच तेंच उलटें केलें. तें असें, ते म्हणाले, कीं सरहद्दीवरच्या मुलखाचा वसूल कमी आहे आणि इतर ठिकाणच्या प्रांताचा पुष्कळ अशीं दोन पक्षांचीं म्हणणीं दोन प्रकारचीं पडलीं. ह्यामुळें एकंदरीनें पाहतां तफावत फार मोठी पडली इतक्यांत टिपूच्या वर्त्तणुकीविषयीं संशय उत्पन्न करण्यासारिख्या कांहीं बातम्या उडाल्या. विशेषतः एक वदंता अशी उठली होती कीं टिपू श्रीरंगपट्टणाच्या कोटावर फौजफांटा वगैरे ठेवण्याच्या उद्योगांत आहे. ह्या गोष्टीबाबद जेव्हां इंग्लिशांचे व त्याचें बोलणें झालें तेव्हां त्यानें साफ सांगितलें कीं तुम्हांस योग्य दिसत असल्यास एक बुरूज पाडवितों आणि तुम्ही आंत जाऊन खुशाल पाहिजे तिकडे पहा. हें त्याचें उत्तर अगदीं गैरशिस्त पडलें ह्यामुळें त्याजपासून इंग्लिशांचा संशय दूर झाला नाहीं.

सुलतानाच्या वसुलाचे कागदपत्र.

शेवटीं टिपूच्या वकिलांनीं वसुला प्रकरणीं दुसरे कांहीं कागदपत्र आणिले तेव्हां ते खरेसे वाटले. ह्या कागदांवरून पाहतां टिपूच्या राज्याचा एकंदर वसूल दोन कोटी शाण्णव लाख रुपयांच्यावर नव्हता. नंतर प्रत्येकानें आपापल्या सोईचा मुलूख निवडून काढिला. मराठ्यांनीं आपली सरहद तुंगभद्रा नदीपर्यंत वाढविली, आणि निजामानें आपली पन्नार नदीपर्यंत वाढविली. इंग्लिशांनीं आपल्या भागाचा मुलूख निरनिराळ्या ठिकाणीं घेतला. तो असा कीं, पूर्वेकडे बारामहाल प्रांत; दक्षिणेकडे डिंडिगल; आणि पश्चिमेकडे मलबार किनाऱ्याचा विवाद होता त्यावरचा

बहुत मुलूख त्यांनीं घेतला. ह्या मुलखांत तेलचरी व कालीकत हे दोन प्रांत सांपडले होते. कुर्गप्रांत इंग्लिशांच्या पश्चिमेकडच्या विभागांत गेला असें कानावर येईपर्यंत टिपूनें कांहींएक अडथळा केला नाहीं. ह्या कुर्गप्रांताच्या राजाबरोबर कैक दिवसांपासून टिपूनें लढाया वगैरे चालविल्या होत्या आणि तो प्रांत आज हातचा गेला असें कानीं पडल्याबरोबर तो इतका संतापला कीं त्याला कांहींच सुचेना. तो म्हणाला त्यांच्या कोणत्या मुलखाशीं कुर्ग लागून आहे ? ते एकदम श्रीरंगपट्टणच मागेनात ? इंग्लिशांस ठाऊक आहे कीं अशा प्रकारचा मुलूख देण्याचें कबूल करण्यापेक्षां मी तह मोडून मरून गेलों असतों; सबब माझे पुत्र व माझें धन विश्वास-घातानें पूर्वी हताखालीं घातलें आणि मग हें बोलतात. ह्यापूर्वी ह्यांची खुदरत झाली नाहीं. कांहीं इंग्लिश ग्रंथकार असें म्हणतात कीं कुर्गप्रांत इंग्लिश मजपाशीं मागतील असें टिपूस पूर्वीच वाटलें असावें. हें कसें असेल तें असो. पण मूळचा म्हैसूरप्रांत म्हटला म्हणजे त्याच्या सभोंवतीं पर्वतांची सीमा आहे, आणि टिपूनें ह्याप्रसंगीं दुसरीकडचा जो मुलूख दिला होता तो सर्व ह्यासीमेच्या बाहेरचा होता. आणि ही सीमा तर अगदीं अलगच राहिली होती. पण हा पश्चिमेकडच्या विभागाची हद्द अगदीं पर्वताच्या माथ्यावर येऊन पोहोंचली ; आणि त्याहद्दीच्या आंत माथ्यावरचा कांहीं भाग सांपडून तेथून श्रीरंगपट्टणावर जाण्यास इंग्लिशांस आयता चांगला मार्ग झाला, हें सर्व अगदीं खरें आहे. तर आतां हा विचार मनांत आला म्हणजे टिपूस कसें वाईट वाटणार नाहीं. इकडे लार्ड कार्नवालिस ह्याचेंही करणें वावगें होतें असें म्हणतां येत नाहीं. तें असें कीं टिपूच्या मनांत फार होतें कीं कुर्ग-प्रांतच्या लोकांचे खूब हाल करावे. आणि पाहिलें असतां असें करण्याजोगा त्यालोकांनीं टिपूचा कांहीं अपराध केला होता असें ही नाहीं. तो नाहक त्यांस छळीत होता. तेव्हां एकतर हे लोक अगदीं निरपराधी होते आणि दुसरें असें कीं त्यांनीं इंग्लिशांस मनापासून मदत केली होती म्हणून टिपूच्या हातीं त्यालोकांस कार्नवालिस साहेबाच्यानें देववेना. असो हा प्रांत आम्ही देत नाहीं असें

ग्र० १३ इ० स० १७९२

कुर्गप्रांत मागितल्यामुळें टिपूस राग आला.

प्र० १३ इ० स० १७९२

टिपूनें सांगितल्यांवर पुन्हा पूर्ववत् जिकडे तिकडे गडबड चालली. त्या दोन राजपुत्रांजवळ जे टिपूकडील लोक होते त्यांस त्यांजपासून दूर केलें आणि त्यांजबरोबर आपले कांहीं लोक देऊन त्यांस करनाटकांत रवाना करावें अशी इंग्लिशांच्या लष्करांत घाटाघाट चालली. श्रीरंगपट्टणाला वेढा घालण्याची पुन्हा तयारी झाली. इंग्लिशांच्या फौजेला पुन्हा उत्तेजन येऊन तिनें कंबरा बांधिल्या. परशुरामभाऊंनीं पूर्ववत् लूट सुरू केली. असा हा प्रकार होऊन दोन दिवस झाले नाहींत तों पुन्हा टिपूस वाटलें कीं आपणाच्यानें कांहीं ह्या संकटाचें निवारण होत नाहीं. तेव्हां त्यानें सांगून पाठविलें कीं तुमचें मागणें आम्ही मान्य करितों आणि तुम्हीं तह करावा. असें सांगून पाठविल्यावरही कांहीं दिवस तह झाल्यावांचून तसे उगीच गेले. शेवटीं सन १७९२त मार्चाच्या १८ व्या तारिखेस, तहाचीं खास ठरावपत्रें होतीं तीं टिपूच्या मुलांकडे पाठवून दिलीं; कारण कीं तीं त्यांच्या हातून घ्यावीं असा हेतु होता. दुसरे दिवशीं सकाळीं दहा वाजतां ते मुलगे लार्ड कार्नवालिस साहेबाच्या भेटीस आले आणि तेथें थोरल्या मुलानें साहेबाच्या हातीं तहाचे तिन्ही कागद दिले. ह्याप्रसंगीं मराठे व निजाम हे स्वतः तेथें आले नाहींत. तर त्यांनीं आपापले वकील पाठविले ते लार्ड कार्नवालिस साहेबाच्या हातीं पत्रें पडल्यावर लागलेच आले. तेव्हां त्यानें तीं पत्रें पुन्हा त्यामुलाच्या हातीं दिलीं. नंतर त्यामुलानें मोठ्या प्रौढपणानें तिघांचीं पत्रें तिघांस देऊन टाकिलीं. आतां हीं पत्रें त्यानें मनापासून तर दिलीं नसतील हें तर स्पष्टच आहे. हें होत आहे इतक्यांत तो मराठ्यांचा वकील कांहींसें गुळमळला तें ऐकून त्या राजपुत्रानें विचारिलें कीं तुमचें म्हणणें काय आहे! तुम्हीं बोलायास नको, कां कीं ह्यांत तुमचे यजमानास वाईट वाटण्यास कांहीं कारण नाहीं.

पुन्हा लढाईची तयारी चालविली.

मागणें कबूल केलें.

लढाई निमित्त खर्च.

जनरल दैरम साहेबाचें अनुमान असें आहे कीं इंग्लिशांच्या वांटणीस जो पैसा टिपूकडून आलेल्या खंडणीपैकीं आला त्याशिवाय ह्या लढाई निमित्त खर्चाचा आकार दोन कोट रूपयांहून जाजती बहुधा होणार नाहीं. ह्यावेळेस सर्व खात्यांमध्यें खर्च फारच बाताबे-

तानें चालविला होता. मागें इंग्लिशांस जेव्हां बंगाल्यांत लढाई होऊन जय मिळाला तेव्हां लष्करी लोकांस पुष्कळ पुष्कळ पैसा बक्षीस मिळाला होता; पण ह्यावेळेस तीन मोहिमी मिळून बक्षिसाचा पैसा एकंदर सारा नऊ लाख पसतीस हजार आठशें चाळीस रुपये इतका आला. कार्नवालिस साहेब व मेदोज साहेब ह्या दोघांनीं आपणास ह्यांपैकीं हिस्सा नको म्हणून सांगितलें. व कंपनीनें ह्या पैशांत आपल्या पदरचा पुष्कळ पैसा घातला. ह्यामुळें प्रत्येक कर्नलाला अकरा हजार सहाशें सोळा रुपये आणि प्रत्येक शिपायाला एकशें पंचेचाळीस रुपये आणि चवदा आणे ह्याप्रमाणें बक्षीस मिळाले. जनरल दैराम टिपूच्या पक्षाविषयीं असें लिहितो कीं, त्याचे ४९३४० शिपाई पडले, ६७ किल्ले गेले, आणि ८०१ तोफा गेल्या. प्र० १३ इ० स० १७९२

तहाविषयींचीं मतें.

इंग्लिश मराठे व निजाम ह्यांचा जो पूर्वी सांगितल्याप्रमाणें टिपूशीं तह झाला तो सर्वांस माहीतच आहे. ह्या तहाच्या बाबतींत पुष्कळच वादविवाद आहे. अशा प्रकारचा तह करण्यांत लार्ड कार्नवालिस साहेबाचा अभिप्राय काय होता हें कांहीं अद्यापि पुरतें कळत नाहीं. एकपक्षीं पाहिलें असतां ह्या तहापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं; व एकपक्षीं पाहिलें असतां अतिशयच झालें. ह्या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं. तें असें कीं इंग्लिशांनीं टिपूपासून तहामध्यें प्रांत वगैरे मागून घेतले होते, त्यावरून त्या दोघांचा पुढें स्नेह होईल अशी तर चांगली आशा नव्हती. कारण, टिपू तर महा अभिमानी आणि आपली सत्ता वाढविण्याविषयीं सतत झटणारा असा होता; सबब हे प्रांत वगैरे त्याच्या हातचे गेल्यामुळें इंग्लिशांविषयीं त्याच्या मनांत अगदीं हाडवैर उत्पन्न झालें; आणि आपली अगदीं नाचकी झाली आहे तर आपली सर्व व्यवस्था पूर्वस्थितीवर कशी येईल अशी सदोदित त्यास मोठी काळजी लागली. हा सर्व विचार केला म्हणजे इंग्लिशांनीं अतिशय केलासें वाटतें. बरें, आतां इंग्लिशांनीं टिपूच्या हातांत जेवढा अमल ठेविला होता तेवढाच अमल त्या सारखाच प्रतापी पुरुष वाढवूं लागल्यास सहज पाहिजे तितका वाढण्यासारिखा

प्र० १२ इ० स० १७९४

होता. म्हणजे ह्या तहापसून कांहींच झालें नाहींसें वाटण्याम चिंता नाहीं. असो, अशा अडचणीच्या जरी ह्या तहामध्यें गोष्टी होत्या तरी तो तह झाल्या दिवसापासून सहा वर्षें होत तोंपर्यंत अगदीं सुरळीतपणें चालला.

तहाच्या कलमांचा उलगडा होऊन मुलगे परत पाठविले.

तह झाल्यानंतर त्यांतील सर्व कलमांचा उलगडा झाला आणि मग सन १७९४ त त्या दोन राजपुत्रांस त्यांच्या पित्याकडे परत पाठवून दिलें. पुढें इंग्लिशांबरोबर लढाई करण्याजोगें चांगलें संधानच टिपूस सांपडलें नाहीं. लार्ड कार्नवालिसाच्या मागून सर जानशोअर साहेब हिंदुस्थानचा गवर्नर जनरल झाला. त्यानें असा प्रकार काढिला कीं कोणाच्याही लढाईमध्यें आपण पडावयाचें नाहीं; तें अगदीं येथपर्यंत कीं लोक धडधडीत त्याबद्दल त्यास दोष देतात. नुकतीच टिपूबरोबर जी लढाई झाली होती

मराठ्यांचा जुलूम,

तींत निजाम व मराठे हे एकपक्षीय होते. परंतु मराठ्यांच्या मनांत निजामाच्या मुलखावर स्वारी करून तो लुटावा असें जें फार दिवसांपासून होतें तें तसेंच होतें. शेवटीं त्यांनीं निजामावर स्वारी केली, तेव्हां सर जानशोअर ह्यानें निजामास मदत करावी तीं केली नाहीं हा तर त्या साहेबावर मोठाच दोष आहे. टिपूबरोबर युद्ध सुरू होण्यापूर्वी इंग्लिश व निजाम ह्यांचा जो ठराव झाला होता त्यांतील कलमें कांहींशीं सोहोगम लिहिलेलीं होतीं म्हणजे चांगलीं स्पष्ट नव्हतीं हें खरें आहे; तथापि हल्लींसारखा एखादा प्रसंग गुदरला असतां आपणांस इंग्लिशांची मदत मिळेल असें मानण्याविषयीं निजामाला, रास्तपणानें पाहतां, त्याच कलमांत जागा होती. पण सर जानशोअर ह्याचें मन कीं इंग्लिश सरकारच्या अमलाचें संरक्षण करण्याकरितां मात्र लढण्यास चिंता नाहीं. बाकी इतर

निजामास नवीन साहाय्य पहावें लागलें.

लढाईमध्यें बिलकुल पडूं नये असें आपणास सरकारचें सांगणें आहे त्यापक्षीं निजामास मदत करितां कामास नये. असो निजामावर अशा प्रकारचें संकट येऊन पडलें आणि इंग्लिशांकडून तर मदत होण्यासारखी नाहीं तेव्हां तेथें रेमंड म्हणून एक फ्रेंच गृहस्थ होता, तो मोठा धारिष्टाचा मनुष्य होता व त्याच्या अंगीं युद्धकौशल्य फार चांगलें होतें, सबब त्यास निजामानें आपल्या मदतीस बोलाविलें.

रेमंद त्यानें दुसरे पुष्कळ फ्रेंच कामगार निजामाच्या मदतीस आणिले आणि त्यांच्या साहाय्यानें त्यानें मोठी एक नवी फौज तयार केली. त्या फौजेबरोबर उभें राहण्यास इंग्लिशांनीं तयार केलेले जे इकडचे शिपाई होते तेवढे खेरीज करून बाकी दुसऱ्या कोणत्याही नेटीव फौजेची ताकद नव्हती. असा प्रकार निजामाकडे चालला होता, तों इकडे टिपूनेंही आपल्या फौजेंत कांहीं चांगला फेरफार करावा ह्या हेतूनें खूप मेहेनत चालविली होती; पण हें काम कोणत्या रितीनें करावें ह्याविषयीं त्यास माहिती नव्हती व दुसऱ्याही गोष्टी प्रतिकूल होत्या ह्यामुळें त्या कामांत त्यास यावें तसें यश आलें नाहीं. ग्र० १३ इ० स० १७९८

असा प्रकार हिकडे चालला होता. नंतर सन १७९८ च्या मे महिन्यांत अर्ल आफ् मार्निंग्तन, ज्या गृहस्थास पुढें मार्किस वेल्स्ली (वस्ली साहेब) अशी पदवी मिळाली, त्याची गवर्नर जनरलाच्या कामावर नेमणूक होऊन तो हिंदुस्थानांत आला. विलायत सरकारानें ह्या गृहस्थाची नेमणूक केली ते वेळीं त्यास साफ असें सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील राजेरजवाडे ह्यांजबरोबर लढाया वगैरे अगदीं करूं नयेत व कंपनीचा मुलूखही बिलकूल वाढवूं नये. पण तो आपल्या कारकिर्दीच्या अव्वलीपासून अखेरी पावेतों ह्या सांगण्याला अगदीं विरुद्ध चालला; म्हणजे त्यानें सर्व राजांबरोबर लढाया केल्या व हिमालय पर्वतापासून तों कुमारी केप पावेतों सर्व देश कंपनीच्या ताब्यांत आणिला. वेलस्ली साहेबाच्या पक्षाचे जे लोक आहेत ते लोक म्हणतात कीं, वेलस्ली साहेब सदोदित हुकुमाला अनुसरूनच वागत गेला आणि कोठें कोठें अगदीं हुकुमाला सोडून वागला तर तेथें तसतशीं कारणेंच झालीं, ह्यामुळें त्याचा उपाय नाहीं. आणि तीं कारणेंही वेलस्ली साहेब अधिकार पाहूं लागण्यापूर्वीच उत्पन्न झालेलीं होतीं, तेव्हां ह्याविषयीं त्याचा उपाय काय ?

वेलस्ली साहेब गवर्नरजनरल नेमिले.

त्यास सांगणें व त्याची वतंणूक.

वेलस्ली साहेब अधिकारावर आला याच्या अगोदर पासूनच म्हैसूरच्या संस्थानांत टिपूनें पुष्कळ गडबड चालविली होती. तेव्हां येतांच त्याला तिकडे लक्ष द्यावें लागलें. हैदरअल्लीनें फ्रेंचांशीं अत्यंत निकट संबंध ठेविला होता हें सर्वांस माहीतच आहे. तसाच

टिपूचे नवीन विचार.

प्र० १३ इ० स० १७९७

टिपूनेंही त्यांच्याशीं संबंध ठेविला होता. त्या दोघांच्या मनांतला भाव हाच होता कीं, त्यांच्या मदतीनें हिंदुस्थानांतून इंग्लिशांस हांकून द्यावें. फ्रान्स देशामध्यें इ० स० १७९२ त राज्यक्रांतीच्या संबंधानें मोठी लढाई लागली तेव्हां हिंदुस्थानांतून ते लोक तिकडे निघून गेले ह्या कारणानें त्यांच्या आणि टिपूच्या मागील संबंधांमध्यें पुष्कळ अंतर पडलें होतें. तथापि फ्रेंच लोकांनीं इंग्लिशांचा अथवा यूरोपखंडांतील दुसऱ्या एखाद्या लोकांचा पराभव वगैरे केला अशा प्रकारचा कांहीं मजकूर टिपूस समजला असतां तो फार खूष होत असे आणि आपल्या अमलाची पूर्ववत् स्थापना होण्यास फ्रेंचांची आपणास कुमक मिळेल असा त्यास भरंवसा होता. अशा प्रकारचा विचार टिपूच्या मनांत होताच इतक्यांत रिपाड म्हणून एक फ्रेंच गृहस्थ एका घरगुती गलबतावरील कप्तान होता तो इ० स० १७९३ त मंगळूर मुकामीं आपल्या गलबतांची दागदुजी करण्यासाठीं आला होता, तेथें त्याची आणि गुलाम अल्लीची भेट झाली. ह्या गुलामअल्लीला टिपूनें मागें वकील नेमून फ्रान्स देशांत पाठविलें होतें. ह्या दरबारांत आपला थोडाबहूत डौल पडण्यास ही संधी चांगली आहे, असें पाहून रिपाड ह्यानें गुलामअल्ली पाशीं गप्प झोंकिली कीं फ्रेंचांच्या ताब्यांत जें मोरिशस बेट आहे तेथील दुसऱ्या प्रतीचा कमांदर इन चिफ् मी आहें, व माझा येथें येण्याचा उद्देश म्हणाल तर तुम्हांस कळावें कीं इंग्लिश लोक हे टिपू व फ्रेंच ह्या उभयतांचे वैरी आहेत सबब त्यांस हिंदुस्थानांतून काढून देणें अवश्य आहे आणि ह्या कामाकरितां पुष्कळ फौज पाहिजे ती सदरहु बेटांत तयार आहे ती इकडे आली म्हणजे टिपूस मदत होईल हां. आहे. हें सर्व ऐकून गुलाम अल्लीनें तो गृहस्थ लागलाच श्रीरंगपट्टणास लावून दिला. तेथें ही गोष्ट सर्वांस समजल्यावर टिपूच्या पदरीं जे मुन्सदी होते त्यांनीं राजास सांगितलें कीं, रिपाड हा भुलथाप देणारा लबाड मनुष्य आहे ह्याकरितां सरकारानें ह्याजवर खचीत विश्वास ठेवूं नये. पण टिपूनें तें कांहींच न ऐकतां त्याजवर पूर्ण विश्वास ठेवून त्याच्याशीं मसलती चालविल्या. नंतर "ऐल आफ् फ्रान्स"

फ्रेंचलोकांच्या स्नेहाविषयीं नवीन आशा.

रिपाड ह्याचा टिपूनें सत्कार केला.

मोरिशस येथें वकील पाठविले

(मोरिशस) वेटांत जाऊन तहाविषयीं मुख्य अधिकाऱ्याबरोबर ठराव करण्याकरितां रिपाड ह्याजबरोबर आपले दोन वकील दिले. हा तह अशा प्रकारचा करावयाचा होता कीं दुसऱ्या राष्ट्रावर स्वारी करणें झाल्यास व दुसऱ्या राष्ट्रापासून बचाव करणें झाल्यास टिपू व फ्रेंच ह्या परस्परांनीं परस्परांस मदत करावी. रिपाड व दोन वकील हे मोरिशस वेटांत जाऊन दाखल झाले. तेथील गवर्नर मालार्ती ह्यास टिपूकडून कोणी येणार आहे वगैरे कांहीं मुळींच ठाऊक नव्हतें. पुढें त्यांच्या येण्याचा उद्देश त्यास समजला तेव्हां लागलेच हिंदुस्थानांत फ्रेंचांचा अमल वाढविण्याविषयीं त्याला मोठें स्फुरण येऊन ह्या वकिलांस मनापासून मोठा मान दिला. वर सांगितल्या प्रकारचा एखादा प्रसंग दृष्टीस पडला म्हणजे फ्रेंच लोकांस असें स्फुरण यावयाचेंच. असो, पुढें त्यांच्या सन्मानार्थ कांहीं तोफा सुटून ते त्या वेटांत उतरले. नंतर मालार्ती ह्यानें त्यांस मोठ्या डामडौलानें सरकार वाड्यांत नेऊन त्यांचा उत्तम प्रतीचा आदर सत्कार केला. वकिलांनीं मालार्ती ह्यास टिपूचें काय म्हणणें होतें तें सांगितलें. तें असें कीं, इंग्लिश, मराठे व निजाम ह्या तीन शत्रूंस जिंकण्याकरितां फ्रेंच गवर्नरानें पंचवीस अगर तीस हजार फौज आमच्या मदतीस पाठवावी, आणि हा उद्देश सिद्धीत गेल्यानंतर सर्व हिंदुस्थान आम्ही व फ्रेंच ह्या उभयतां मध्यें वांटून घेऊं. मालार्ती ह्यानें हें बोलणें तत्काल मान्य करून सर्व व्यवस्था केली, पण हिंदुस्थानांतून इंग्लिशांस काढून देणें वगैरे जे मोठ मोठे उद्देश होते ते सिद्धीस नेण्यास फौज तर मनस्वी पाहिजे होती आणि तेथें गवर्नर साहेबा जवळ तर एक देखील शिपाई नव्हता. ह्या गवर्नराच्या हातीं काय तें इतकेंच होतें कीं टिपूचें जें म्हणणें होतें त्याची चांगली शिफारस करून तें फ्रान्स देशांतील "एक्सिक्युतीव दैरेक्तरी" म्हणजे मुख्य अधिकारी मंडळी ह्यांजकडे पाठवून द्यावें, आणि तिकडून जबाब येईपर्यंत त्या बेटांतील रहिवासी नेतीव अगर फ्रेंच जितके जमण्यासारिखे असतील तितके जमवून त्यांचीं पलटणींत नावें नोंदावीं. सर्व लोकांस समजण्याकरितां

प्र० १३ इ० स० १७९७

हिंदुस्थानावर हल्ला करण्याविषयीं बेत.

मोरिशसच्या गवर्नराची अविचाराची वर्तणूक.

प्र० १६ इ० स० १७९८

मालतीं ह्यानें आपल्या सहीचे जाहिरनामे जिकडे तिकडे लाविले. जाहिरनाम्यांत हे वकील कशासाठीं आले आहेत हें लिहून पुढें असें दाखविलें होतें कीं, ज्या लोकांस युद्धांत जाण्याविषयीं हिंमत असेल त्यांनीं म्हैसूरच्या राजाच्या चाकरीस राहण्याकरितां येऊन हजर व्हावें. जे लोक चाकरीस राहतील त्यांस तो राजा मोठमोठाले पगार व मोठमोठीं बक्षिसें देणार आहे. असा उपाय केल्यानें त्या-

त्यांचा यःकश्चित परिणाम.

जपाशीं एकंदर नव्याण्णव असामी आले, त्यांतहीं पुष्कळ प्रकार होते. कांहीं युरोपियन होते, व कांहीं क्रिस्तांव होते; त्यांमध्येंही कांहीं शिपाई लोक, कांहीं खलाशी लोक, व कांहीं गांवचे सुखवस्तु लोक असे होते. मुळीं मिळाले त असे सरासरी होते व तेही अधिक मिळेनात. तेव्हां तेवढ्यावरच संतुष्ट होऊन ते वकील हिंदुस्थानांत येण्यास निघाले ते एप्रिलच्या सविसाव्या तारिखेस मंगळूर मुकामीं येऊन दाखल झाले. ही हकीकत समजल्यावर टिपूला दोन कारणांनीं फार त्रास झाला. एक तर ज्या गोष्टीची आशा करीत बसला होता ती अंजीबात नाहींशी झाली व दुसरें मोरिशस बेटांत टिपूचा इरादा असा आहे, तसा आहे म्हणून निरर्थक डांगोरा मात्र झाला. हें इंग्लिशांस समजून त्याचा बोजवार होणार हें एक होतेंच. तथापि तें नाकबूल करण्याचें त्याच्या स्वाधीन होतें म्हणजे ते वकील आपण पाठविले नाहींत असें म्हणून ती थट्टेदाखल जी नव्याण्णव लोकांचीं टोळी मदतीस आणिली होती ती नको म्हणून सांगितलें असतें म्हणजे झालें असतें. आणि हिकडे आंतून फ्रान्स देशास आपला वास्तविक अभिप्राय साफ लिहून पाठवून त्यांच्याशीं दळण वळण ठेवण्यासही त्यास तादृश हरकत पडली नसती. तो अगदीं उतावीळ होऊन त्याला कांहींच सुचेनासें झालें. ते वकील व त्यांजबरोबर आलेले लोक ह्यांस टिपूनें समारंभानें श्रीरंगपट्टणास नेलें. त्याशहरांत त्या लोकांनीं "जाकोबिनक्लब" ह्यानांवाची एक सभा उपस्थित केली, प्रजासत्ताक राज्याचा पाया घातला, व त्यामध्यें मुख्य उद्देश असा ठेविला होता कीं सर्व लोकांस राजकीय वगैरे गोष्टींचा विचार करण्यास एक सारखा अधिकार असावा.

त्या फ्रेंच लोकांनीं टिपूस "सितिजन टिपू" अशी पदवी देऊन स- प्र० १३
लामी केली. हीं सर्व लोकसत्ताक राज्याचीं चिन्हें त्यास मनापा- इ० स०
सून आवडत होतीं पण त्या चिन्हांचा व त्या शब्दांचा अर्थ काय १७९८
हें त्यास तिलप्राय माहीत नव्हतें. त्याला इतकें मात्र वाटत असे सितिजन टिपू.
कीं हे सर्व संकेत त्या जुटीचे आहेत व त्या जुटीचे लोक आपल्या
हिताविषयीं झटणारे आहेत.

हें सर्व वर्त्तमान गवर्नर जनरल वेल्स्ली साहेब ह्याजकडे लिहून गवर्नर जनर-
गेलें. त्यानें विलायतेस कोर्त आफ्‌दैरेक्टर्स ह्यांस टिपूच्या वर्तणुकी- लचा उपाय.
विषयीं कच्चा मजकूर लिहून आपलें मत साफ असें लिहून पाठ-
विलें कीं टिपूची अशा प्रकारची वर्तणूक सर्वथा अयोग्य आहे व
हिजवरून असें स्पष्ट दिसतें कीं तो युद्धास उभा राहणार ह्यांत
कांडीमात्र संशय नाहीं. ह्या गुन्ह्याबद्दल त्या संस्थानावर एकदम
हल्ला करून तें तत्काल घ्यावें, हें अगदीं न्याय्य आहे. गवर्नर जनरल
ह्याचें हें म्हणणें ब्रितिश मुत्सदी व ब्रितिश कामदार ह्यांस मान्य झालें,
परंतु मिल साहेब, जो आपल्या हातून इंग्लिशांचा इतिहास लिहिण्यांत त्याच्या म्हण-
पक्षपात होऊं नये ह्याविषयीं सतत जपणारा, तो अगदीं साफ् लि- ण्यावर मतें.
हितो कीं गवर्नर जनरल ह्यानें टिपूच्या वर्तणुकीविषयीं ज्या गोष्टी
लिहिल्या त्यांवरून इंग्लिशांनीं त्याजवर एकदम हल्ला न्यावा अगर
त्याजवर पूर्वापेक्षां ज्यास्ती दाब बसवावा असें सिद्ध होईलसें आम्हांस
बिलकूल वाटत नाहीं. इ० स० १७९२ त टिपूचा आणि इंग्लि-
शांचा तह झाला त्यावेळेपासून टिपूचें इंग्लिशांशीं हाडवैर पडलें
व त्याच्या अमलांतील जो मुलूख गेला होता तो परत घेण्याची
संधी त्या दिवसापासून तो सदोदित पाहत होता. ह्या गोष्टींविषयीं
कोणाएकास संशय नाहीं. आणखी अशा प्रकारच्या गोष्टी क-
रण्याविषयींचा अभिमान टिपूच्या मनांत असावा हें वास्तविक पाह-
तां युक्तच आहे असें आम्हांस वाटतें. गवर्नर जनरल ह्यानें
टिपूबाबद ज्या गोष्टी लिहिल्या होत्या त्यांविषयीं सबल आधार
होता खरा; तथापि टिपूच्या हातून प्रसिद्धपणीं कांहीं गुन्हा झाल्या-
शिवाय गवर्नरास त्याजवर चालून जाण्याचा अधिकार नव्हता.
आतां हा जो टिपूनें उद्योग चालविला होता ह्याचा उद्देश म्हणजे

प्र० १३ इ० स० १७९८

हिंदुस्थानांतून इंग्लिशांचा अमल एकदम उडवून द्यावा असाच होता असें नाहीं. आणखीहि इंग्लिशांचा व टिपूचा जो तह झाला होता तो चालू राखण्याकरितां, परस्परांनीं परस्परांस फौजेची अगर द्रव्याची मदत करावी वगैरे प्रकारच्या कांहीं अटी न व्हत्या, त्यापक्षीं इंग्लिशांनीं तो तह अगदीं निष्फळ मानून सोडून दिला असता तर त्यांस काय अडचण होती ! अशा प्रकारचें मिल साहेबाचें म्हणणें आहे. पण, टिपू इंग्लिशांच्या नाशाचे उपाय योजण्यास अत्यंत उत्सुक होता हें सर्वांस संमतच आहे; तर आतां टिपूस सर्व साधनें मिळून त्याच्या हातून इंग्लिशांचा नाश होणार नाहीं असें मानण्यास जर एखादा पक्का आधार असता तर मग मिल साहेबाचें म्हणणें सयुक्तिक आहे असें म्हणण्यास चिंता नाहीं, पण वास्तविक पाहतां असें नव्हतें. फ्रेंच लोक म्हणजे सर्व पृथ्वीवर बलिष्ट, आणि त्यांचें इंग्लिशांशीं अत्यंत हाडवैर, आणि तशांत हिंदुस्थानांतच इंग्लिशांची फजिती उडवावी असा त्यांचा फार मनोदय होता तेव्हां टिपूस त्यांची मदत मिळेल हें सर्वांस ठाऊकच होतें, आणि टिपूसही त्यांचा भरंवसा होता. समुद्रावर मात्र इंग्लिशांचा पुरा अमल बसला होता, सबब तेथें त्यांस तादृश भीति नव्हती असें कदाचित् म्हटलें तरी चालेल. विचाराच्या अंतीं हें देखील रास्त नाहीं; कारण आरमार कसेंका बलिष्ट असेना, पण, देश मोठा असला म्हणजे त्याच्या बंदरांत कोणासही फिरकूं द्यावयाचें नाहीं असा बंदोबस्त त्या आरमाराच्या हातून कधीं व्हवयाचा नाहीं. हें तर काय, पण शत्रूची फौज त्याबंदरांत येऊन तेथून त्यादेशांत दूर दूरच्या ठिकाणीं गेल्यास तिला देखील प्रतिबंध करितां येईल अशी म्हणतां येत नाहीं. ह्याचा आपणास प्रत्यय आहे. ह्याच वेळेस ह्या-

फ्रेंचांचें हडवैर.

गोष्टीचें उदाहरण घडलेलें सांगतों. मिसरदेशांत इंग्लिशांचें आरमार धडधडीत पाहत असतां असतां फ्रेंच सरदार बोनापार्त ह्यानें तो देश जिंकून घेण्यास पुरेल इतकी फौज आणून तेथें उतरली, त्यावेळेस बहुतेकांस असें वाटलें होतें कीं ह्या स्वारीची तयारी मुख्यत्वें हिंदुस्थानाकरितां आहे. हेंच खरें असतें तर इंग्लिशांस हिंदुस्थाना-

मध्यें केवढें भय होतें तें पहा बरें. मिसर देशाच्या स्वारींत फ्रेंचांस संकटें मोठमोठीं होतीं असें बहुतकरून उगीच सर्वांच्या म्हणण्यांत होतें, आतां तीं गोष्ट होऊन जाऊन सर्व जिकडच्या तिकडे झाल्यावर, अंः त्या स्वारींत कश्यीं संकटें असें त्यांस फारच तुच्छ मानितात, असें आम्हांस प्रायः वाटतें. कारण, बोनापार्ताच्या वेळेस फ्रान्सांत लोकसत्ताक राज्य झालें; त्यानंतर यूरोपखंडामध्यें फ्रेंच लोक एका लढाईंतून सुटले म्हणजे दुसऱ्या लढाईंत, दुसरींतून सुटले म्हणजे तिसऱ्या लढाईंत, अशा रितीनें गुंतत गेले म्हणून; नाहीं तर त्यांनीं हिंदुस्थानाकडे फौज हजार वाऱ्यांनीं पाठविलीच असती; आणि जरका फौज पाठविली असती तर त्यांस जय येताना असें म्हणवत नाहीं. प्र० १२ इ० स० १७९८

वर सांगितल्याप्रमाणें इंग्लिशांस, टिपू आणि फ्रेंच ह्यांचा मिलाफ झाला असता म्हणजे भय होतेंच. आणि तशांत हिंदुस्थानांतील आसपासच्या संस्थानाची वस्तुतः स्थिति पाहिली असतां इंग्लिशांस विशेष भीति वाटण्यासारखी होती. टिपूच्या बरोबरीचीं राज्यें म्हटलीं असतां मराठे व निजाम ह्या दोघांचींच होतीं. त्यांपैकीं मराठ्यांचें राज्य मोठें खरें, पण त्यांत अशी अव्यवस्था होऊन गेली होती, कीं शिंदे व होळकर ह्यांचा तंटा लागला होता त्यामुळें बाजीरावाच्यानेंच आपल्या अधिकाराचें संरक्षण होत नाहींसें होऊन तो केवळ टिक्याचा धनी होऊन गेला होता. निजामाच्या राज्यांत चांगला बंदोबस्त नव्हता. व त्यांच्या फौजेला युद्धप्रक्रियेंत कांहींच माहिती नव्हती. रेमंद ह्यानें त्याच्या पदरीं राहून युरोपियन लोकांच्या चालीप्रमाणें जी फौज तयार केली होती तीच कायती त्याच्या सर्व लश्करांत प्रबल होती. थोड्याच वर्षांत रेमंद ह्यानेंही फौज दींड हजाराची दहा हजार केली आणि दहा हजारांची चवदा हजार करण्याविषयीं व्यवस्था चालविली होती. ह्यानिजामाच्या फौजेपासून आपणास कुमक होईल अशी इंग्लिशांस तिलप्राय आशा नव्हती, उलटें त्यांस असें वाटत होतें कीं निजाम हा आपला खचित शत्रु आहे. फ्रेंच सरकारचा बहुत दिवसांपासून असा डाव चालला होता कीं हिंदुस्थानच्या राजे रजवाड्यांच्या पदरीं आपले कामगार ठे- टिपूपासून भीति. त्याच्या नेतिव शत्रूंची अव्यवस्था. फ्रेंचांचे बेत.

प्र० १३ इ० स० १७९८

वून द्यावे आणि त्या योगानें आपल्या शत्रूचें म्हणजे इंग्लिशांचें वजन कमी करून आपलें वजन वाढवावें. टिपू जर इंग्लिशांवर एकदां उठेल तर ही वर सांगितलेली व अशा दुसऱ्या कांहीं फौजा येऊन त्यास मिळून मग एक मोठा सेनासमुद्रच होईल, असें त्यावेळेस सर्वांस वाटत होतें असें म्हटलें तरी चिंता नाहीं. ह्याखेरीज टिपूनें पुणें व हैदराबाद ह्या दोन्ही ठिकाणीं वकील पाठवून कांहीं कारस्थानें चालविलींच होतीं आणि ह्या दोन्ही राज्यांपैकीं एक तरी इंग्लिशांस खचीत मिळेल असें मुळींच नव्हतें. आफ्गानिस्तानचा राजा जमानशाह ह्याजकडे टिपूनें वकील पाठविले होते त्यावेळेस हिंदुस्थानांचें वरें वाईट करण्याचें ज्या पुरुषांच्या स्वाधीन होतें त्यांपैकीं हा एक प्रतापी पुरुष होय. ह्याखेरीज हा राजा हिंदुस्थानावर स्वारी करीलच असा संभवही होता. ह्यावरील सर्व गोष्टींवरून हें अगदीं स्पष्ट आहे कीं त्या राजे रजवाड्यांवरोवर टिपूचीं संधानें जमलीं असतीं म्हणजे इंग्लिशांस अनिवार अशीं बंडें होऊन त्यांच्या अमलांतील देश बळकावतीं.

टिपूचीं कारस्थानें.

वेलस्ली साहेवाचे वेत.

असा प्रसंग येऊन गुदरला तेव्हां वेल्स्ली साहेवानें असा विचार केला कीं टिपूपासून कांहीं कलमांचा ठराव करून घेण्याकरितां एकदम स्वारी करणें अवश्य आहे, कारण स्वारीशिवाय टिपू खुशीनें आमचीं कलमें कबूल करणार नाहीं हें वेल्स्ली साहेवास पक्कें माहित होतें. तीं कलमें येणेंप्रमाणें– टिपूनें मलवार किनाऱ्यावरचा सर्व मुलूख इंग्लिशांस देऊन आपण अरवी समुद्राशीं विलकूल संबंध ठेवूं नये, त्यानें आपल्या राज्यांतून एकंदर फ्रेंच लोक घालवून द्यावे, आपल्या दरवारांत इंग्लिशांचा रेसिदेन्त म्हणजे वकील नेहमीं ठेवावा, आणि इंग्लिशांस स्वारीचा खर्च द्यावा. ह्या शेवटल्या कलमाचा अभिप्राय असा होता कीं, सरासरी त्याच्या जवळचा पैसा कमी करावा म्हणजे लढाई वगैरे करण्याचें त्याच्या हातून होणार नाहीं. वेल्स्ली साहेवाच्या मनांतून असें होतें कीं टिपूनें दुसरे कोणी संस्थानी आपल्या मदतीस मिळविले नाहींत व दुसरीही कांहीं तयारी केली नाहीं तोंच त्याजवर छापा घालून जेर करावा म्हणजे एकाएकी त्याजकडून हीं कलमें मान्य करून घेतां येतील. पण

त्यास जेव्हां कळलें कीं मद्रास इलाख्यांत करनाटकाचें संरक्षण करण्यापुरती देखील फौज नाहीं, मग जो हा एवढा बेत आपण केला आहे तो शेवटास जाण्याचें तर बोलायासच नको, तेव्हां तर त्यास फारच वाईट वाटलें. फौजेची इतकी कमताई होण्याचें मुख्य कारण हेंच कीं लष्करी सामान ह्या जागचें त्या जागीं नेण्याला बैल, उंटें, वगैरे जनावरांचा फारच तोटा होता आणि टिपूशीं लढाई म्हटली म्हणजे आतां एथें, क्षणांत दुसरीकडे अशी चलाखी चालत असे, ह्यामुळें इंग्लिशांस देखील टिपूबरोबर टक्कर मारण्यास त्याप्रमाणेंच तयारी पाहिजे होती. पण त्यांचें तसें कांहीं नव्हतें. फार काय, पण जर त्या वेळेस टिपूनें इंग्लिशांच्या मुलखांत स्वारी करून एथून तो मुलूख फस्त केला असता तर त्याला कोणी एक आड आला नसता. आतां, टिपूच्या बरोबर लढाई करण्याची तयारी अगदीं लवकर झाली तरी निदान तीन महिने लागतील अशी सर्वांची अटकळ होती. लेफ्टेनेन्त कर्नल क्लोस म्हणून जो मोठा अधिकारी होता त्याचें तर मत असें होतें कीं एवढ्या तयारीस सहा महिने लागतील. त्यावेळेस मद्रासचा गवर्नर लार्ड क्लैव साहेब होता त्यानें विचार केला कीं लढाई चालविण्याचे दिवस कायते जानेवारीपासून ते मेपर्यंत आहेत आणि सन १७९९ ची जानेवारी तर अगदीं पावणेचार महिन्यावर येऊन ठेपली. त्यापक्षीं इतक्याशा वेळांत तयारी होत नाहीं. ह्यावरून त्यानें बंगाल्यास सप्तंबर महिन्याच्या आठव्या तारिखेस पत्र लिहिलें कीं इ० स० १८०० चें साल सुरू होण्यापूर्वी मोहिम सुरू करितां येत नाहीं, परंतु वेल्स्ली साहेब तयारी करण्याच्या कामांत असा झटला कीं पुढच्याच अक्तोबर महिन्यांत म्हणजे एका महिन्याच्या आंतच त्या स्वारीला पुरेशी फौज त्यानें जमविली. नव्याण्णवाच्या जानेवारींत इतकी तयारी झाली कीं, पाहिजे तेव्हां निघून चालू होण्यासही फौज सिद्ध आहे असें सर्वांस दिसूं लागलें. वर सांगितलेला तयारीचा प्रकार चालला होता तितक्यांतच वेल्स्ली साहेबानें दुसरें एक मोठेंच काम करून घेतलें तें कोणतें म्हणाल तर, हैदराबादेस निजामानें फ्रेंच लोक ठेवून त्यांजकडून पुष्कळ फौज चां-

प्र० १३ इ० स० १७९८ त्याच्या फौजेची न्यूनता.

गवर्नराची चलाखी.

हैदराबाद करा-बरोबर तह.

प्र० १३ इ० स० १७९८ गल्ली तयार करविली होती ह्या गोष्टीचा विचार करणें वेलस्ली साहेबास फार जरूर होतें. त्या फौजेपासून इंग्लिश सरकारास तोशीस लागूं नये ह्याकरितां गवर्नर जनरल साहेबानें बंदोबस्त केला तो येणेंप्रमाणें;—

तो नह कबूल करविण्याचेंउपाय.

हैदराबादच्या दरबारांत कप्तान कर्क नामें इंग्लिश सरकारचा वकील होता त्यास वेलस्ली साहेबाचा हुकूम गेला कीं तुम्ही निजामाकडून कंपनी सरकाराशीं तह करून घ्यावा तो असा कीं निजाम व कंपनी ह्यांनीं, दुसऱ्या राजावर स्वारी करणें झाल्यास परस्परांस मदत करावी. आणि त्या तहा अन्वयें कंपनी सरकार निजामास खात्रीनें सांगतें कीं त्याच्या राज्यावर कोणताही शत्रु आला असतां कंपनी सरकार निजामाच्या राज्याच्या खर्चीत बचवा करिल. वर सांगितल्याप्रकारें निजामाच्या राज्याचा बचाव करण्याकरितां कंपनी सरकारचीं दोन पलटणें हैदराबादेस आहेत त्यांशिवाय आणखी चार पलटणें व तोफखाना तेथें ठेविला जाईल. पण निजामानें फ्रेंच कामदारांकडून तयार केलेली पलटणें तत्काल मोडून टाकावीं व त्या फ्रेंच कामदारांसही लागलाच फांटा द्यावा. त्याप्रमाणें हुकूम लिहून निजाम सरकारच्या मुलखाच्या सरहद्दीवर पुष्कळ फौजही रवाना केली; त्यावरून निजामानें वरील हुकमांतील कलमें पाहिजे तर कबूल करावीं, नाहीं तर करूं नयेत असें नव्हतें, तर कबूल करणें प्राप्तच होतें. निजाम हा हुकूम पाहतांच मोठा घोटाळ्यांत पडला. निजामानें फ्रेंच कामगार ठेविले होते ते त्याशीं फार शिरजोरपणानें वागत ह्यामुळें त्यास त्यांचा फार कंटाळा आला होता. पण सध्यांच त्यांस फांटा दिला तर ते आपणावरच उठतील आणि मग त्यांजबरोबर इंग्लिश आपल्या वतीनें लढतील; आणि असें झालें असतां फ्रेंच व इंग्लिश ह्या दोन प्रतिस्पर्धी राष्ट्रांची लढाई हैदराबादेस चालू होऊन आपल्या मुलखाची व्यर्थ नासाडी होईल, हें त्यास भय होतें. त्याहीपेक्षां दुसरें भय त्याच्या पोटांत असें होतें कीं इंग्लिशांची सर्व कलमें आज कबूल केलीं असतां आपणांस सर्वकाळ त्यांच्या ओंजळीनें पाणी प्यावयास पाहिजे. शेवटीं सन १७९८ सप्तंबरच्या पहिल्या तारिखेस कंप-

नांचें व आपलें एक करारपत्र करून त्यावर निजामानें सही केली. नंतर त्याच महिन्याच्या १८ व्या तारिखेस तें पत्र कलकत्त्यास मान्य होऊन लागलेंच अमलांत आलें आणि त्या अन्वयें तोफखान्यासुद्धां चार पलटणें, अक्तोबर महिन्याच्या १० व्या तारिखेस हैदराबाद मुक्कामीं येऊन दाखल झालीं. अशा प्रकारें सर्व व्यवस्था झाली असतां निजामाच्या बोलण्यांत पुन्हा कांहीं धरबंद दिसेनासा झाला. तो कांहीं टाळाटाळ करूं लागला; कांहीं एक उपाय तावडतोब करावयाचे ते आजचे उद्यांवर टाकूं लागला. तेव्हां शेवटीं कर्नल रार्वत साहेब ह्यानें निजामाबरोबरचें बोलणें आटोपतें घेऊन २२ व्या तारखेस फ्रेंचांच्या लष्करास एकदम वेढा दिला. फ्रेंचांनीं तयार केलेली फौज होती ती इंग्लिशांबरोबर लढावयाचें म्हणून फार भिऊन गेली होती, व सरकारांत तिच्या पगाराची बाकी फार तुंबली होती ह्यामुळें ती फार नाखुष होती म्हणून ती त्या फ्रेंच सरदारांवरच हत्यारें घेऊन उठली. तुमच्या रोजमुऱ्याची बाकी तुम्हांस खचीत मिळेल व पुढें तुम्हांवर दुसरे सरदार नेमून तुम्हांपासून सरकार नौकरी घेईल असें खातरीनें सांगितलें तेव्हां त्यांनीं हत्यारें खालीं ठेविलीं. ह्याप्रमाणें एवढ्याशा वेळांत एक बार न काढितां चवदा हजार लोकांची फाटाफूट करून दिली आणि तोफखान्यांत दारूगोळा पुष्कळ होता व तोफाही चांगल्या चांगल्या होत्या त्या सर्व जागच्या जागींच राहिल्या.

नं० १२ इ० स० १७८३ तहनाम्यावर सही झाली.

ब्रिटिशांचे ठकवाजीचे उपाय.

मागील ठराव्याप्रमाणें निजामाच्या फौजेची कुमक इंग्लिशांस मिळेल हें सिद्धच होतें. आणि वेल्स्ली साहेबानें पुष्कळ मेहेनत केल्यामुळें इंग्लिशांच्या खासगत लष्कराचीही पोकता झाली होती म्हणून वेल्स्ली साहेबानें एकदम टिपूशीं निकरानें बोलणें लावण्याचा निश्चय केला. इ० स० १७९८ तील नवंबराच्या ८ व्या तारिखेपर्यंत गवर्नर जनरल व टिपू ह्यांचा पत्रव्यवहार दोस्ती माफक चालला होता. वरील तारिखेस वेल्स्ली साहेबानें टिपूस जें पत्र लिहिलें होतें त्यांत आरंभीं कांहीं थोडेसें इकडच्या तिकडच्या सामान्य गोष्टीविषयीं लिहून मग असें लिहिलें कीं इंग्लंदाशीं ज्यांचें

प्रत्यक्ष टिपूशीं पत्रव्यवहार.

प्र० १३ इ० स० १७९८

अगदीं हाडवैर अशा फ्रेंच लोकांबरोबर तुम्ही संधान बांधीत आहां हें इंग्लिश सरकारच्या लक्षांत नाहीं, अगर लक्षांत असूनहीं तें त्याकडे कानाडोळा करितें असें तुम्ही बिलकूल समजूं नये. तुम्हीं फ्रेंचांशीं संबंध ठेविल्यामुळेंच इंग्लिश सरकार व त्यास मदत करणारे दुसरे संस्थानी ह्यांस आपल्या बचावाच्या तजविजी पूर्वीच्या योजिणें प्राप्त झालें. असो त्या सर्व गोष्टी इंग्लिश सरकार एकीकडे ठेवितें आणि कंपनी व म्हैसूर सरकार ह्या उभयतांचा विश्वास परस्परांवर राहून सर्वांचें हित होईल अशा रितीची एखादी शकल योजण्याकरितां पूर्वीचे तुमच्या* ओळखीचे साहेब मेजर दौतन ह्यांस वकील नेमून तुम्हांकडे पाठवावयास इच्छितें. प्रस्तुत कंपनी सरकार व त्याचे बाहीदार ह्यांच्या मनांत तुम्हांविषयीं जो संशय आहे तो सर्व दूर होण्यासाठीं त्या उभयतांस जे उपाय योग्य दिसतात त्यांविषयीं सदरहू साहेब हे तुम्हांस सर्व कचा विचार सांगतील. दिसेंबराच्या दहाव्या तारिखेस वेलस्ली साहेबानें दुसरें पत्र पाठविलें कीं आमची मद्रासेस जाण्याची तयारी झाली आहे तर त्या पत्राचें उत्तर आम्हांस तिकडेच पाठवावें.

मेजर दौतन ह्यास वकील नेमण्याचा विचार.

नवंबराच्या विसाव्या तारिखेस टिपूनें वेलस्ली साहेबास एक पत्र लिहिलें. वेलस्ली साहेबाचें पत्र पोहोंचण्या पूर्वीच टिपूनें हें पत्र लिहिलेंसें दिसतें. ह्या पत्रांत इंग्लिशांनीं फौजेची वगैरे तयारी कोणत्या हेतूनें चालविली आहे असें दोस्तीच्या रितीनें टिपूनें वेलस्ली साहेबास विचारिलें होतें. त्या पत्रांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, आमच्याकडे कांहीं एक गडबड नाहीं, जिकडें तिकडे स्वस्थता आहे. वेलस्ली साहेबाचें नवंबराच्या आठव्या तारिखेस पत्र गेल्यावर टिपूच्या मनांत शंका येऊन त्यानें पुष्कळ दिवसपर्यंत कांहींच जबाब दिला नाहीं. जर ताबडतोब सर्व उलगडा झाला असता तर इंग्लिशांकडून टिपूवर मागणीही वेताचींच झाली असती; म्हणजे त्यानें आपल्या पदरचे फ्रेंच घालवून द्यावे व म्हैसूरप्रांताच्या पोटांतला जो मुलूख इंग्लिश सरकारच्या ताब्यांत होता तो परत

टिपूचा अनिश्चय.

* टिपूचे मुलगे इंग्लिशांकडे ओलीस होते त्यांस पोहोंचविण्यासाठीं १७९४ त मेजर दौतन हा गेला होता तेवेळेस टिपूची त्याची ओळख झाली होती.

घेऊन त्याच्या मोबादला तितक्याच वसुलाचा मलबार किनाऱ्याव- म्र० १३
रचा प्रांत इंग्लिशांस द्यावा; एवढ्या दोन गोष्टी मागितल्या असत्या. इ० स०
टिपूला वाटलें होतें कीं इंग्लिश सरकार कांहीं मागणी करणार १७९९
आहे; पण आपणास इंग्लिश सरकाराला शरणच गेलें पाहिजे असें
त्यास वाटलें नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील संस्थानांबरोबर टिपूनें
संधान चालविलें होतें, तेव्हां कांहीं त्यांच्या कडून, व कांहीं फ्रेंचां-
कडून आपणांस मदत होईल, व ह्याशिवाय आपलें नशीब आहे
असा टिपूला अद्यापि भरंवसा होताच. शेवटीं दिसेंबराच्या अ-
ठराव्या तारिखेस टिपूनें सर्व कच्या हकीकतीसुद्धां वेल्स्ली साहे- त्याची हकी-
बास एक लांब पत्र लिहिलें. दिसेंबरच्या दहाव्या तारखेचें पत्र कत.
पोहोंचल्याबद्दल ह्या पत्रीं कांहीं लिहिलें नव्हतें. परंतु प्रयःतें
पोहोंचल्यावर टिपूनें हें पत्र लिहिलें असावें. फ्रेंच लोकांबाबद
टिपूनें असें लिहिलें होतें कीं, हे लोक रोजगार मिळविण्याच्या
आशेनें येथें येऊन उतरले तेव्हां कांहीं थोड्याशा लोकांस आम्हीं
रोजगार दिला आहे. इंग्लिश सरकारच्या व आमच्या दोस्तींत
अंतर येईल अशी कल्पना सरकारच्या मनांत आली ही मोठी
आश्चर्याची गोष्ट आहे. मेजर दौतन ह्यास वकील नेमून पाठवि-
तों म्हणून वेल्स्ली साहेबानें लिहिलें होतें, त्याविषयीं त्यानें असें
लिहिलें कीं मागील तहाच्या वेळेस जे करार झाले ते पुरे अमलांत
येऊन अगदीं मुकरर झाले आहेत सबब ते सर्वकाळ तसेच राह-
तील. हे ठराव म्हणजे प्रस्तुतच्या इतर राजे रजवाड्यांसहीं केव-
ळ कित्ताच आहे. सर्व पक्षांस अधिक हितावह, व सर्व पक्षांत
परस्परांचा परस्परांवर अधिक विश्वास उत्पन्न करणारे, आणि ह-
ल्लीं आपले आहेत ह्यापेक्षां चांगले, असे दुसरे उपाय असतील असें
मला वाटत नाहीं. वेल्स्ली साहेबानें ह्या पत्रावरून असा अभिप्राय
काढिला कीं, टिपू वकील यावा हें मान्य करीत नाहीं व मागील
तहांत जो मुलूख दिला त्याशिवाय दुसरा मुलूखही देत नाहीं. हा
अभिप्राय त्यानें ओंढून ताणून काढिला असें म्हणतां येत नाहीं.

इ० स० १७९९ त जानेवारीच्या नवव्या तारखेस वेल्स्ली वेल्स्ली सा-
साहेबानें त्या पत्राचें उत्तर मद्रासेहून लिहिलें. इंग्लिश सरकारच्या हेबाचें उत्तर.

प्र० १३ ह० स० १७९९

मनांत वकील पाठविण्याचें वगैरे कोणत्या कारणावरून आलें हें ह्या पत्रांत अगदीं स्पष्ट लिहिलें होतें. मोरिशस बेटांतील खटपटीची कच्ची हकीकत लिहून तेथील गवर्नर मालार्ती ह्याच्या कबूलात पत्राची नकलही ह्या पत्राबरोबर पाठविली होती. ह्या सर्व गोष्टींवरून अनुमान काढून वेलस्ली साहेबानें टिपूस लिहिलें कीं कंपनी व तिच्या पक्षाचे इतर संस्थानी ह्यांजवर स्वारी करण्याच्या कामांत तुम्हीं मदत करावी असा फ्रेंच लोकांबरोबर तुमच्या वकिलांनीं ठराव केला आहे; स्वारी करण्याकरितां त्यांनीं फ्रेंचांपाशीं फौजेची मदत मागितली आणि शिपाई लोक जमविले; त्यांनीं केलेल्या सर्व गोष्टी मान्य करून त्यांनीं मोरिशस बेटांतून आणिलेले लोक तुम्हीं आपल्या फौजेंत सामील केले आहेत; तुम्ही आपल्या खासगत फौजफांड्याची तयारी केली आहे, व फ्रेंचांकडून मदत मिळाली तीच पुरती मिळाली असती तर कंपनीकडून कांहीं अगळीक न होतांही हल्लींची तुमची व तिची दोस्ती व तह हीं सर्व मोडून टाकून तिच्या मुलखावर तुम्हीं एकदम हल्ला सुरू केला असता. मेजर दौतन ह्यास आम्हीं पाठवीत असतां तुम्हीं मान्य केलें नाहीं हें अगदीं गैर केलें; असो, तुमची कंपनी सरकाराशीं दोस्ती राहण्याचा उपाय हा आहे, तर हें पत्र पावल्यावर एका दिवसाच्या आंतच तुम्हांकडून ह्या गोष्टीची मान्यता झाली पाहिजे. जानेवारीच्या सोळाव्या तारिखेस वेलस्ली साहेबानें आणखी एक पत्र लिहिलें आणि त्यांत रूमचा राजा ग्रांद सिग्नोर ह्याचें पत्र टिपूस स्पेनसर साहेबाच्या पत्रांतून आलें होतें, तें भिडविलें होतें, व त्या राजानें फ्रेंचांबरोबर लढाई करण्याचा खास बेत

मेजर दौतन ह्यासच पाठवावयाचें हें पुन्हा सूचविलें.

केल्याबद्दलचा मजकूरही दाखल केला होता. टिपूस फ्रेंचांचा राग येऊन त्यानें त्यांस सोडून द्यावें म्हणून यवनी धर्मावर जो त्यांचा कटाक्ष होता त्या संबंधानेंही ह्या प्रसंगीं कांहीं गोष्टी लिहिल्या होत्या; व टिपूनें फ्रेंचांवरच उठावें ह्यासाठीं त्यांनीं त्या यवनी धर्मातील मुख्यावर जो मागें हल्ला केला होता तोही मजकूर ह्यापत्रीं सामील केला होता; आणि मेजर दौतन हा वकील पतकरला पाहिजे हेंही लिहिलें होतें. पुढें बहुत दिवसानंतर म्हणजे फेब्रुआरीच्या

टिपूचें धर्मांकडे विशेषलक्ष लागण्याविषयीं प्रयत्न.

म० १३
इ० स०
१७९९
टिपूचें उत्तर.

१३ व्या तारिखेस मद्रास मुकामीं बिन तारिखेचें पत्र आलें त्यांत मजकूर थोडाच पण चमत्कारिक होता, तो येणेंप्रमाणें– "सांडणी स्वारावरोबर एक व हलकाऱ्यावरोबर एक अशीं दोन पत्रें आपण मेहेरबानी करून पाठविलीं तीं पावलीं परम संतोष झाला +++ रूमचा राजा (ग्रांद सिनोर) ह्यानें आमच्या नांवचें पत्र तेथील इंग्लिश वकिलाच्या द्वारें आपणाकडे पाठविलें होतें तें आपण ह्या पत्रावरोबर पाठविलें तेंही आम्हांस पोहोंचलें. बाहेर कोठें स्वारी शिकारीला जावें असें बहुत वेळां मनांत आल्यामुळें हल्लीं शिकारीस जाण्याच्या तयारींत आहें. मेजर दौतन ह्यास पाठवितों म्हणून आपण बहुत वेळां लिहिलें; तर त्यास पाठवावें पण बरोबर खटला फार असूं नये. ह्याचप्रमाणें आपणाकडून कुशल वृत्त सदोदित लिहून यावें. बहुत काय लिहिणें लोभाभि वृद्धि असावी"

त्याचा अर्थ.

हें अशा प्रकारचें चमत्कारिक उत्तर वाचून मनांत खरोखर संशय यावयाचा कीं, टालाटाळी करावी अगर इंग्लिश सरकारची बेअदबी करावी असा ह्या उत्तरांतील मतलब आहे. पुढें कर्नल विल्क्स साहेबास म्हैसूरकर सरदारांपासून कळलें कीं त्या पत्रांत जो मजकूर लिहिला होता त्याविषयीं टिपूचें अनुमत होतें, पण इतकें खरें कीं त्याची त्या गोष्टीविषयीं तादृश खुशी नव्हती, व लेख मर्यादेचा असावा तसा नव्हता. जानेवारीच्या नवव्या तारिखेचें पत्र पोहोंचल्यावर टिपूचे डोळे पुरते उघडून पुढें आपलें कठीण आहे असें त्यास दिसलें. तो अगदीं घोंटाळ्यांत पडून त्याला कांहीं सुचेनासें झालें. मोरिशस बेटांत जाण्याची मसलत वगैरे करणारे जेवढे लोक होते त्यांजवर रागावून त्यांस पुष्कळ शिवीगाळ केली. आणि म्हणाला "रिपाड ह्याच्या भिकार गलबतांची मोडकी डोलकाठी सर्व राज्य धुळीस मिळविण्यास कारण होईल." नंतर मेजर दौतन साहेब ह्यास भागांतच भेटावें अशा हेतूनें टिपू मद्रासेकडे जाण्यास निघाला. तिकडे जाण्याची त्याची खुषी होती असा अर्थ नाहीं, पण दुसरा उपायच राहिला नव्हता. परंतु इकडे वेल्स्ली साहेबाचा मनसोबा फिरला. तो म्हणाला, मेजर दौतन ह्यास पाठवून व्यवस्था करण्याची सोय पूर्वी होती पण आतां ती वेळ

वेलस्ली साहेबाचा बेत.

प्र० १३ इ० स० १७९९

गेली. जून महिन्यांत पर्जन्यकाळ सुरू झाला म्हणजे लढाई बंद पडणार, तेव्हां आतां जर तहाचें बोलणें लाविलें तर एवढे तीन महिने ह्यांतच निघून जातील; म्हणजे टिपूला समग्र एक वर्ष फुरसत सांपडेल आणि तेवढ्या काळांत अनेक संस्थानिकांवरोबर संधानें करून फौजांच्या कुमका मिळविण्याविषयीं झटण्याला त्याला जागा होईल; असा विचार मनांत आणून फेब्रुवारीच्या तिसऱ्या तारिखे पावेतों टिपूकडून उत्तर आलें नाहींसें पाहून फौजेला म्हैसुरावर कूच करण्यास हुकुम केला. टिपूचें पत्र आल्यानंतर फेब्रुवारीच्या २२ व्या तारिखेस वेल्स्ली साहेबानें त्यास जाब लिहिला कीं दौतन साहेबास पाठवून तह करण्यानें आमच्या मनांतील गोष्टी सिद्धीस जातील असें नाहीं, त्या पक्षीं त्यास पाठविण्याची आमची सोय नाहीं. तुम्हांकडून पत्राचा जबाब फार दिवस आला नाहीं. ह्यास्तव तुम्हांकडे फौज रवाना करणें जरूर पडलें. परंतु आतां जनरल हारिस साहेब ह्यांस, तुम्ही जे कोणी वकील वगैर पाठवाल त्यांजबरोबर सर्वांचा समेट होईल अशा रितीचें पाहिजे तें बोलणें चालणें करण्याविषयीं अखत्यार दिला आहे. तहाचीं कलमें मात्र तुमच्या व आमच्या दोस्तींत कांहींएक हरकत न येतां सदोदित सारखीं चालण्याला मराठे व निजाम ह्यांस जीं आवश्यक वाटतील तीं ठरविलीं पाहिजेत. हें पत्र जाऊन टिपूला पोहोंचण्या पूर्वीच त्यानें इंग्लिशांवरोवर लढाईला तर उभें रहावें, मगकाय होईल तें होवो, असा निश्चय केला. असा निश्चय करण्याला टिपूनें ज्या गोष्टीविषयीं अनुमोदन दिलें होतें तीं गोष्ट ते करीत नाहींत अशी शंका त्याला आली, हें एक कारण असो अगर त्याच्या बुद्धीला धरबंद नव्हता हें एक कारण असो.

वकील पाठविण्याविषयीं टिपूस सांगितलें.

इंग्लिशांचें लष्कर.

म्हैसूरच्या राज्यावर स्वारी करण्यास जी फौज नेमिली ती येणेंप्रमाणें.— गोरें पायदळ ४३८१, काळें पायदळ १०९९५, गोरे घोडेस्वार ८८४ काळे घोडेस्वार १७५१, गोलंदाज ६०८, एकंदर शिपाई १८३१९, तोफा १०४, आणि वेलदार २४८३. ह्याशिवाय निजामाकडील पायदळ १०१५७ आणि घोडेस्वार ६०००. हे निजामाचे लोक, इंग्रजांची देखरेख असल्यामुळें

बेषखासे लढत. इकडील युद्धकर्मांत पुरा वाकबगार जो जनरल स्युअर्त साहेब हाही इतक्यांत मलबार किनाऱ्याहून निघून ६४२० शिपाई लोकांसहवर्त्तमान मुख्य फौजेला मदत करण्यासाठीं येत होता. इ० स० १७९९

तह केल्यास त्याच ठराचीं कलमें.

जनरल हारिस ह्यास, टिपूवरोवर तह करावयाचा त्याचे दोन प्रकार लिहून दिले होते. त्यांतील त्यानें प्रसंगानुसार योग्य दिसेल तो घ्यावा. म्हणजे फौज तर फक्त श्रीरंगपट्टणापुढें जाऊन उतरली आहे आणि लढाईची सुरूवात झाली नाहीं तर पहिला नमुना काढावा त्यांतील कलमें येणेंप्रमाणें– टिपूनें ब्रितिशांस सर्व मलबार किनारा द्यावा व तितकाच प्रदेश निजाम व मराठे ह्या प्रत्येकास द्यावा; ब्रितिश सरकारचा वकील टिपूनें आपल्या दरबारांत नेहमीं ठेवून घ्यावा; यूरोपखंडांतील ज्या ज्या देशांशीं ब्रितिशाचें वांकडें आहे त्या त्या देशांतील लोकांस टिपूनें आपल्या मुलखांतून घालवून द्यावें; आणि दीड कोट रुपये खंडणी द्यावी. तथापि एकदां सुरूवात झाल्यानंतर, ह्याच मोहिमेंत चांगला शेवट होणार नाहीं असें चिन्ह दिसलें तर प्रसंगानुरूप ह्या कलमांत फेरफार करावा. पण हरतऱ्हेनें टिपूच्या मनांत भीति उत्पन्न केली पाहिजे. कारण, एरवीं त्याच्या हातून एक कपर्दिकही मिळणार नाहीं. जर श्रीरंगपट्टणापुढें मोरचेबंदी वगैरे होऊन तें लवकर हातीं येतें असें दिसलें तर मग तहाचा दुसरा नमुना काढावा. ह्यांत इतकेंच होतें कीं टिपूनें अर्ध राज्य दिलें असतां मात्र तह करावा.

टिपूची त्वरा.

मोहीम सुरू झाल्याबरोबर इंग्लिशांस हात दाखवावा असें टिपूच्या मनांत फार होतें. आणि म्हैसुरावर स्वारी करण्याकरितां कांहीं फौज मलबार किनाऱ्याकडून व कांहीं कोरोमंडल किनाऱ्याकडून येत होती. तेव्हां ही सगळी फौज एकत्र होते ही संधी पाहून टिपूनें विचार केला कीं मलबार किनाऱ्याकडून जी फौज येत आहे ती घाट चढून आली आणि कुर्ग प्रांताच्या समोवतीं-च्या टेंकड्या व मैदानें ह्यांत येऊन उतरली म्हणजे आपणास तिजवर हल्ला करण्यास सांपडेल असा विचार करून तो पश्चिमे-

प्र० १३ इ० स० १७९९

कडे निघाला आणि टांकोटांक गेला तों मार्चाच्या ५ व्या तारिखेस अकस्मात इंग्लिशांच्या फौजेच्या शेजारीं जाऊन उतरला. इंग्लिशांनीं जेव्हां पाहिलें कीं, ह्या फौजेशिवाय टिपूची मुख्य फौज आहे ती अजून मागेंच आहे तेव्हां ते अमळसे उद्विग्न झाले. जनरल स्युअर्त ह्यानें कर्नल मोंतरेसर ह्याजबरोबर कांहीं फौज देऊन तो सिदासीर म्हणून चार कोसांवर एक टेंकडी होती तिजवर ठेविला होता आणि त्यास सांगितलें होतें कीं, कोरोमंडल किनाऱ्याकडून आपली जी फौज येत आहे ती कदाचित कांहीं खुणावगैरे करील तर नजर ठेवावी. इंग्लिशांच्या छावणीच्या समोरच पुष्कळ तंबू ठोकिले होते, आणि थोडक्याच वेळांत तेच तंबू शेंकडों होऊन मोठी भयंकर छावणी दिसूं लागली तेव्हां तर इंग्लिश अगदीं चकित होऊन गेले. मोठमोठ्या सरदारांच्या डेऱ्यांच्या मध्यें एक पुष्कळ मोठा हिरव्या रंगाचा डेरा होता तो खासगत टिपूचा असेल अशी त्यांनीं अटकळ केली होती. पण पूर्वीच्या वातमीला ही अटकळ अगदीं जमत नव्हती म्हणून स्युअर्त साहेबानें सिदासीर टेंकडीवर एक पलटण जास्ती पाठवून तेथील बंदोबस्त चांगला ठेविला होता आणि हिकडे जसा प्रसंग दृष्टीस पडेल तसें करूं असा त्याचा बेत होता.

जनरल स्युअर्त ह्यास आश्चर्य वाटलें.

उजाडल्यावरोबर एका उंचवट्यावरून जनरल हारद्ली साहेबानें पाहिलें तों टिपूच्या फौजेंत मोठी गडबड चालली होती. ह्यावेळस स्युअर्त साहेबानें आपण जाऊन पुढच्या फौजेला मिळावयाचें होतें. किंवा पुढच्या फौजेला तरी माघारें यावयास सांगावयाचें होतें आणि आपली फौज एकत्र करावयाची होती; पण असें कां केलें नाहीं हें स्पष्ट समजत नाहीं. वस्तुतः टिपूची फौज त्या जंगलांतून, कोणास अगदीं न समजतां अशा जलदीनें येऊन भरली कीं सकाळीं नऊ वाजल्यापासून दहा वाजत तोंपर्यंत म्हणजे एका तासांत, मोंतरेसर साहेबाच्या फौजेच्या अघाडीवर व पिछाडीवर एकदम हल्ला करून त्या सर्व फौजेला चोहोंकडून वेढा घातला. दोन अडीच वाजत तोंपर्यंत इंग्लिशांच्या फौजेनें त्या अडचणीच्या प्रसंगीं मोठ्या शौर्यानें टिकाव काढिला; नंतर जनरल स्युअर्त येऊन मिळाला तेव्हां टिपूच्या फौजेवर असा

टिपूच्या हल्ल्याची स्तुति व गुप्तता.

सपाटून हल्ला केला कीं तीस त्या झाडींतून चोहींकडे पळून जाणें भाग झालें. मग पुढची फौज स्युअर्त साहेबानें लागलीच मागें घेतली. ह्यामुळें टिपूला आपली फत्ते झाली असें म्हणायास संधी सांपडली. परंतु इंग्लिशांच्या पक्षाचे लोक मेले २९, जखमी झाले ९८, आणि कमी आले १६ ह्या गोष्टीवरून साफ दिसतें कीं इंग्लिशांस चांगला हात दाखविण्याचा जो टिपूचा हेतु होता तो फसला. आतां त्याकडचा विचार केला तर त्याच्याच म्हणण्यावरून दिसतें कीं ह्यावेळेस त्याचे मोठेमोठे सरदार पुष्कळ पडले आणि ही लढाई झाल्यानंतर पुढें टिपूचें युद्धकौशल्य कोणत्याही लढाईंत दृष्टीस पडलें नाहीं. ह्यावेळेस मात्र त्यानें इंग्लिशांच्या फौजेस एकाएकीं गांठिलें होतें, पण तिचें विलक्षण शौर्य व टिपूच्या फौजेला समोर उभे राहून लढण्याची गैरमाहिती ह्या दोन गोष्टींमुळेंच तिचा नाश टळला. इ० स० १७९१ त्याचा बेत फसला.

नंतर कोरोमंडल किनाऱ्याकडून मोठी फौज येत होती तिजवर जाण्याकरितां टिपू जलदीनें माघारा परतला. टिपूला अतां संरक्षणाचा उपाय म्हटला म्हणजे हैदराच्या चालीप्रमाणें चालावें हा होता; म्हणजे श्रीरंगपट्टणास पुष्कळ फौज ठेवावी; रणांत घोडेस्वारांच्या मोठ मोठ्या टोळ्या ठेवून युद्ध चालवावें; आणि आपण सतत फिरत राहून इंग्लिशांचें दळण वळण बंद करावें; त्यांचें कांहीं सामान कोठून आलें असतां तें त्यांस मिळूं देऊं नये, व त्यांच्या निरनिराळ्या टोळ्या आढळतील त्या गांठून तेथल्या तेथें खप्पा कराव्या. आणि असें तो करता तर एक आपल्या राज्याचा तरी बचाव करिता, किंवा राज्य गेलें असतें, तरी त्याचें बळ कमी झालें नसतें, परंतु त्यानें तसें केलें नाहीं. त्याचा बेत असा होतासें दिसतें कीं इंग्लिशांबरोबर इंग्लिशांच्याच रितीप्रमाणें एकत्र छावणी देऊन समोर उभें राहून चालीप्रमाणें लढावें. पूर्वी श्रीरंगपट्टणाजवळ लढाई होऊन प्रथमच लार्ड कार्नवालिस साहेब मागें हटला त्या दिवसापासून टिपूलाही इंग्लिशांची लढण्याची रीत आवडूं लागली होती. पण त्याप्रमाणें केलें असतांही टिपूचा पराभव झाला. पुढें इंग्लिशांस मागें हटावें लागलें ह्याचें

टिपूचे खोटे बेत.

म० १३ इ० स० १७९९

कारण हेंच कीं, पूर्वी जी धामधूम केली होती तिजमुळें त्यांस सरंजामाचा फार तोटा पडला. इ० स० १७९२ त इंग्लिशांचा आणि टिपूचा तह झाला होता त्या वेळेपासून आपली फौज इंग्लिश फौजेप्रमाणें तयार करण्याविषयीं फार श्रम केले आणि त्या कामांत त्यास यशही मिळालें, तें असें कीं त्याची फौज कोणत्याही इतर नेतीव राजाच्या फौजेला भारी झाली. परंतु आजपर्यंत हैदरानें व टिपूनें स्वतः घोडेस्वारांच्या बळावर कैक वेळां इंग्लिशांचा पराभव केला होता त्याजवरचें लक्ष कांहींसें कमी झालें होतें.

इंग्लिश पुढें गेले.

ह्यावेळेस इंग्लिशांचा टिपूच्या राज्याच्या मध्यभागीं जाण्याचा प्रयत्न होता. वेलस्ली साहेबाची बुद्धि मोठी व्यापक; त्याच्या लक्षांत लागलेंच आलें कीं, आपणास ह्या समयीं इतर गोष्टी मनांत आणून राहतां कामास नये. तर एकदम श्रीरंगपट्टणावर जाऊन हल्ला केला पाहिजे. आणि तें हातीं आलें म्हणजे टिपूचा अगदीं पराभव झाला. सर्व इतिहास कर्त्यांचें म्हणणें एक सारखें आहे कीं, ह्यावेळेस जनरल हारिस साहेबाच्या फौजेवरोबर जसा पोक सरंजाम होता तसा मागें कधीं नव्हता. आणि त्या साहेबाला मार्गामध्यें शत्रूकडूनही मोठासा अडथळा झाला असें नाहीं तथापि वाटेनें तो फार सावकाशीनें चालला होता. मार्चाच्या पांचव्या तारिखेस त्यानें म्हैसूरची हद्द वलांडिली आणि मार्चाच्या दहाव्या तारिखेस सगळी फौज प्रथम जमून चालला. ठरवितांना तर असें ठरविलें होतें कीं निदान १० व्या तारखेस तरी त्यानें म्हैसुरास जाऊन दाखल व्हावें. कांहीं एकांच्या लेखावरून असें भासतें कीं ही सावकाशी करण्याचें कांहीं गुप्त कारण होतें आणि तें उजेडास कधींही आलें नाहीं. परंतु त्यानें आपणावरोबर सामान मनस्वी चालविलें होतें ह्यामुळें त्यास उशीर लागला असावा हें स्पष्ट दिसतें. सगळ्या फौजेला महिन्यांचे महिने अन्न पुरावें म्हणून त्यानें धान्याचे साठ हजार बैल भरून चालविले होते. हे बैल सरासरीच होते आणि हांकणारेही तितपतच. ह्याशिवाय एक किल्ला घेण्याकरितां गरनळा व मोठमोठ्या तोफा पुष्कळ घेतल्या होत्या. तेव्हां इतकें सामान बरोबर चालावयाचें मग उशीर कां नाहीं लागणार ? ह्या

सावकाशी.

उशीर लागण्याचीं कारणें.

किल्ल्यावर विशेष नदर ठेवण्याचें कारण कीं तो हातीं आला म्हणजे सर्व राज्य हातीं येईल अशी अटंकळ होती. प्र० १३ इ० स० १७९९

श्रीरंगपट्टणापासून सुमारें तीस मैलांवर मालावली म्हणून एक खेडें आहे तेथें जनरल हारिस साहेब पोहोंचला आणि टेंकड्यांवरून पाहतो तों टिपूची छावणी दृष्टीस पडली. आणि पुढल्या टोळीवरोवर कर्नल फ्लाइद साहेब होता तो त्याखेड्या जवळ सुमारें अर्धकोसावर गेला तों त्याच्या मागल्या अंगास उंचवटा होता त्यावर टिपूची सेना तमाम पसरलेली त्याच्या दृष्टीस पडली. टिपूवर हल्ला करावयाचा असें ठरून कर्नल वेल्स्ली साहेब ह्या कामगिरीवर निघाला आणि फ्लाइद साहेवाचे घोडेस्वार हल्लयाच्या दुमाल्यावर घेतले होते. टिपूच्या फौजेच्या उजव्या बाजूवर हल्लयाचा रोंख होता. टिपूची एक टोळी मोठ्या व्यवस्थेनें व शौर्यानें पुढें सरसावून आली. इंग्लिशांच्या पायदळानें आपल्या बंदुका न सोडितां ती फौज सुमारें सवाशें हातांवर आली तेव्हां तिच्या गोळ्या आपल्या आंगावर घेतल्याशा करून त्या तुकडींत ते एकदम जाऊन घुसले आणि तिची अगदीं फोडाफोड केली. मागून इंग्लिशांच्या स्वारांनीं चाल करून फैर झाडल्यावरोवर टिपूचे लोक त्या रणभूमीवर चोहोंकडे पसरले आणि मग जिकडे तिकडे पळापळ झाली. हारिस साहेबापाशीं स्वारांची व हलक्या हत्याराच्या शिपायांची फार कमती होती ह्यामुळें यानें त्या पळणाऱ्यांचा पाठलाग केला नाहीं. उभय पक्षांत नुकसान कोणाचेंच विशेष झालें नाहीं. परंतु नेतिवांची जी सर्वोत्कृष्ट फौज ती देखील इंग्लिशांवरोवर अशा बेताब्राताच्या लढाईंत टिकत नाहीं हें एक नवीन उदाहरण झालें. मालावलीची लढाई.

एकदां धामधुमीचा प्रकार करावा ह्याविषयीं टिपू झटत होता इंग्लिशांच्या छावणीपासून तों श्रीरंगपट्टणापर्यंत जो मोठा रस्ता होता त्यानें जळण व वैरणकाडी वगैरे जिन्नस इंग्रजांस अगदीं मिळूं नयेत म्हणून टिपूनें ते नाहींसे करून टाकिले. आणि इंग्लिश ह्या अशा रस्त्यानें कूच करीत असतां त्यांच्या फौजेच्या पिछाडीवर हल्ला करावा म्हणून तो तिजसभोंवतीं फिरत असे. जनरल हारिस हा मालावलीहून निघाला तों डाव्या आंगास वळला आणि सोशिला मुकामीं कावेरी

इ० स० १७९९

नदी उतरून तिच्या दक्षिण तिरावरून श्रीरंगपट्टणाकडे चालला हें पाहून टिपूचे हातपाय अगदीं गळाले. अशा प्रकारें जाण्याचा त्या साहेबाचा मनसोबा होईल असा मुळींच टिपूस आगा नव्हता. ह्यामुळें तिकडे लढाई करण्याची तजवीज पूर्वी ठेविली नव्हती. आपला हा शेवटला उपाय फसलासें पाहून टिपू व त्याचे मुख्य सरदार ह्यांची त्रेधा झाली, आणि पुढें आशा धरण्यास कांहीं जागा राहिली नाहीं. सर्वांस मसलतीकरितां बोलावून आणून टिपू म्हणाला, "आपण शेवटल्या पायरीवर येऊन बसलों आहों?" तुमचा आतां काय निश्चय आहे?" "आपणा बरोबर मरून जावयाचें" असा सर्वांनीं जबाब दिला. जिंकूं अथवा मरून जाऊं; तिसरी गोष्ट नाहीं. अशा संकल्पानें पुनः इंग्लिशांबरोबर उभें रहावें असा सर्व संमतानें ठराव झाला. तेथें जमले होते तेवढ्यांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें. एका सरदारानें टिपूचा निरोप घेते वेळीं त्याला दंडवत घालून त्याचे पाय घट्ट धरिले. (ह्या देशांत विशेष गौरव वगैरे दाखविण्याचा हा प्रकार आहे) टिपूच्या डोळ्याचें पाणी खळेना तेव्हां मग सर्वांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या. कचेरी उठली तेव्हां तर असें झालें कीं, ह्या मृत्युलोकांत जशी कांहीं त्या सर्वांची ही शेवटचीच भेट झाली, परंतु वस्तुतः जी बाणीची वेळ ती अद्यापि आली नव्हती. टिपूला वाटत होतें कीं हारिस साहेब श्रीरंगपट्टणाच्या पूर्वेच्या आंगास कावेरी नदी उतरून ज्या जागीं मागें लार्ड कार्नवालिस उतरला होता त्या जागीं उतरेल. पण हारिस साहेबाचा बेत कीं, वांकडें घेऊन जावें आणि बेट व किल्ला ह्यांच्या पश्चिमेस आपली फौज नेऊन उतरावी. ह्या बेतानें चालल्यामुळें टिपूनें त्याकरितां जो मार्ग ओसाड करून ठेविला होता तो टळला आणि मुंबईहून स्त्युअर्त साहेब जी फौज घेऊन आला होता ती पश्चिमेच्या आंगास होती सबब तिची गांठ पडण्यास ठीक झालें. आणि तेथून दक्षिणेच्या आंगास धान्यदेश होता तिकडेही जाण्यायेण्याची सोय झाली. ह्या खेरीज त्या आंगानें हल्ला करण्यास संधी चांगली होती. टिपूनें ज्या स्थळीं लढाई देण्याचा इरादा धरिला होता तें स्थळही पश्चिमेकडे गेल्यानें साहजिक एकीकडे राहिलें. इकडे टिपूच्या मनांतल्या सगळ्या गोष्टी विपरीत झाल्या तेव्हां मग

प्र० १२

टिपूला भीति पडली.

त्याच्या सरदारांची निराशा.

टिपूचे उपाय फसले.

तो श्रीरंगपट्टणास गेला आणि आंतूनच होईल त्या रितीनें संरक्षण करावयाचें असा निश्चय करून वसला. प्र० १३ इ० स० १७९९

एप्रिलच्या ५व्या तारिखेस, किल्ल्याच्या पश्चिमेस सुमारें दोन मैलांच्या अंतरावर इंग्लिशांनीं येऊन छावणी दिली. ही जागा चांगली बंदोबस्ताची होती म्हणजे छावणीची उजवी बाजू एका उंचवट्यावर जाऊन पोहोंचली होती व डावी बाजू कावेरीच्या तीरावर जाऊन पोहोंचली होती. छावणी जवळ झाडी पुष्कळ होती त्यामुळें मोरचे वगैरे बांधण्यास सामानाची रगाडी होती. तेथें नळ होता त्याच्या मागल्या आंगास आपला बचाव करण्याच्या इराद्यानें टिपूची फौज पडली होती तिजवर कर्नल वेल्स्ली व कर्नल शा हे रात्रीं छापा घालण्याकरितां गेले होते; पण टिपूनें त्यांस मागें हटविलें; नंतर त्यांस जास्ती कुमक मिळून त्यांनीं भर दिवसा टिपूवर हल्ला केला. इतक्यांत फ्रेझर साहेबाला मुंबईहून जनरल स्त्युअर्त साहेब फौजेनिशीं आला होता त्याच्या शोधार्थ पाठविलें. तेराव्या तारिखेस संध्याकाळीं मुंबईच्या फौजेनें सुचनेकरितां तोफा सोडिल्या त्या इकडच्या लष्करांत ऐकूं आल्या, नंतर चवदाव्या तारखेस ती येऊन पोहोंचली. वाटेंत म्हैसूरकरांच्या स्वारांच्या टोळींनें गांठल्यामुळें येऊन पोहोंचण्यास उशीर लागला. तरी त्या स्वारांची गांठ पडली तेवेळेस तिचें तादृश नुकसान झालें नाहीं. इंग्लिशांच्या छावणीमध्यें एकाएकीं असें समजण्यांत आलें कीं कोठींत अठरा दिवसां पुरतें धान्य आहे, तेव्हां धान्याची जास्ती तजवीज करण्याकरितां जनरल फ्रेझर साहेब दक्षिणेकडच्या मुलखांत शिरला. पुढें चार ठिकाणीं धान्य मिळालें, म्हणून त्या कमताईमुळें वेढ्याचें काम चालण्याला कांहीं हरकत आली नाहीं.

इंग्रजांची छावणी.

मुंबईचें लष्कर येऊन मिळालें.

श्रीरंगपट्टणावर हल्ला करण्याला कोणतें ठिकाण सोईचें आहे ह्या गोष्टीचा मोठा विचार चालला होता. त्याच्या नैर्ऋत्य कोनावर हल्ला केला तर इंग्लिशांस वेटांत राहण्यास जागा मिळून कावेरीला पूर येऊन कसें होईल ही पुढली काळजी चुकेल असें होतें. अगदीं पश्चिमेच्या आंगास, शहराचा कोट होता तो नदीच्या तटाकाला लागूनच गेलेला होता सबब तेथें जाणें तर नदीचें पात्र वलांडून जावयास

श्रीरंगपट्टणावरील हल्ल्याचा बेत.

म० १२ इ० स० १७९९

पाहिजे होतें. ह्या दोन ठिकाणांपैकीं पहिलें ठिकाणची तटबंदीं मजबूत होतीं आणि तीं घोंटाळ्याचीं असल्यामुळें कोणीकडून आली आहे व कशी गेली आहे वगैरे नीट समजावयाजोगी नव्हतीं. आतां पश्चिमेच्या अंगास एकच कोन सगळ्या कोटापेक्षां पुढें आलेला होता आणि त्या ठिकाणीं फौजफांटा ठेवून अगर दुसरी कांहीं तजवीज योजून बंदोबस्त केलेला नव्हता. दक्षिणेच्या अंगानें लढाई कायम ठेवून कावेरीच्या उत्तरेकडच्या तीरावरून हिकडे भोंक पाडितां येईल असें होतें, आणखी ह्या ठिकाणीं माणसें गुरें ढोरें सहज नदी उतरून चाललीं होतीं ह्यावरून उतार चांगला होता आणि पुढेंही पर्जन्यकाळ सुरू होऊन कावेरीला पूर येण्याच्या अगोदरच लढाई संपेल अशी इंग्लिशांची खातरी होती. अशा सर्व गोष्टींवरून जनरल स्युअर्त साहेब नदी उतरून श्रीरंगपट्टणाच्या आंगास गेला. तो गेला तेव्हां त्यावर टिपूच्या फौजेनें खूप आवेशानें मारा केला, तथापि तो न जुमानितां त्यानें तेथें तळ दिला. तेथून दक्षिण तीरावर बाकीची सगळी फौज होती तिजबरोबर लढाई व हल्ला वगैरे सर्व पाहिजे तसें करीत असे.

टिपूकडील पत्र.

एप्रिलच्या नवव्या तारिखेस टिपूनें जनरल हारिस ह्यास पत्र लिहिलें कीं मागें केलेला तह आम्हीं मोडला नसतां तुम्ही आमच्या मुलखांत शिरून लढाई करूं लागला ह्याचें कारण काय? त्या साहेबानें थोडक्यांत जबाब दिला कीं वेल्स्ली साहेबाचा तुम्हाशीं भरवरीस पत्रव्यवहार झाला आहे तो पहावा म्हणजे सर्व समजेल. तिकम साहेब टिपूच्या दरबारांतील मसलतीविषयीं नेहमीं लिहीत असतो; पण ह्यावेळेस टिपूच्या मनांत कोणता विचार येऊन त्यानें

खंदक खंटले.

हें केलें ह्याविषयीं तो अगदींच लिहीत नाहीं. इतक्यांत इंग्लिशांनीं खंदक खंटले आणि मोरचेबंदी वगैरे कामहीं खूप झपाट्यानें चालविलें होतें. इंग्लिश मोरचे बांधीत बांधीत पुढें सरत. त्याविषयीं त्यांस टिपूच्या खंदक व तटबंदी ह्यांसुद्धां मजबूत अशा दोन छावण्या होत्या त्यांजकडून हरकत झाली ह्यामुळें त्यांपैकीं एक एप्रिलच्या विसाव्या तारिखेस कर्नल शरब्रूक ह्यानें हल्ला करून घेतली; आणि दुसरी सविसाव्या तारिखेस कर्नल वेल्स्ली ह्यां

नें हल्ला करून घेतली. दुसरी छावणी जाण्याच्या पूर्वीच टिपूनें पाहिलें कीं आज हीं छावणी गेली उद्या तीं छावणी गेली अशा रितीनें आपला आश्रय तुटत चालला आणि इंग्लिशांचें वेढ्याचें काम तर अगदीं जलदीनें संपत आलें तेव्हां असा निश्चय केला, कीं पुन्हा तह करण्याचें बोलणें लावावें. आतां तह करण्याला आपणाला देणें मनस्वी पडेल हें त्याच्या लक्षांत होतेंच. त्यानें गवर्नर जनरल वेल्स्ली साहेब ह्याच्या पत्राचा उल्लेख करून तहाविषयीं बोलण्यासाठीं वकील पाठवून द्यावे असें आमच्या मनांत आहे तर ह्याविषयीं लिहून यावें असें हारिस साहेबास पत्र लिहिलें. त्यानें मोहीम सुरू झाल्यापासून ज्या गोष्टी घडल्या त्या मनांत आणून टिपूस पत्र लिहिलें कीं तुम्हीं आपलें अर्धं राज्य, एक कोट रूपये आतां, व एक कोट रूपये सहा महिन्याच्या आंत इतकें आम्हांस देण्याचें कबूल करा आणि तुमचे चार पुत्र व चार मोठे कामगार आम्हांकडे ओलीस पाठवावयाचें पतकरा. ह्या सर्व गोष्टींचा विचार होऊन चोवीस तासांच्या आंतच तुम्ही त्या मान्य करीत असल्यास कराव्या आणि एक कोट रूपये देऊन वर सांगितलेलीं माणसें आम्हांकडे उद्यां ओलीस पाठवून द्यावीं, नाहीं तर तसें कळवावें. आणखी पुष्कळ गोष्टी तुम्हांपाशीं मागण्याचा मला अखत्यार आहे पण त्या मीं अजून तशाच ठेविल्या आहेत. मला, प्रसंगास श्रीरंगपट्टणांतून तुम्हांस काढून देऊन राहण्याचा अखत्यार आहे.

प्र० १३
इ० स०
१७९९

टिपू तहाचें बोलणें लावितो.

तहाचीं कलमें.

टिपूस राग आला.

हें मागणें अशा प्रकारचें आणि टिपू तर महा अभिमानी त्यामुळें तीं कलमें वाचून पाहतांच त्याच्या आंगाचा अगदीं तीळपापड झाला. तो म्हणाला, इंग्लिश लोक फार मधूर आहेत, ते मजवर नाहक जबरदस्ती करिताहेत, बरें कांहीं फिकीर नाहीं, नशीबीं असेल तसें होईल, मी हातांत तलवार धरून मरून जाईन पण इतर पुष्कळ राजे रजवाडे पेनशनदार होऊन राहिले आहेत त्याप्रमाणें पेनशन घेऊन आयुष्याचे दिवस भोजीत इंग्लिशांच्या आज्ञेत राहणार नाहीं. सारांश त्यानें हारिस साहेबाला जाब धाडावयाचा नाहीं असा निश्चय करून त्यावेळेस तर वसला. परंतु सहा दिवसांनीं इंग्लिशांची खंदकाची वगैरे तयारी झाली आणि फक्त मोरचेबंदी राहिली तेव्हां टिपूनें

तहाचें बोलणें पुन्हा लाविलें.

प्र० १३ इ० स० १७९९

पुन्हा असें मनांत आणिलें कीं तहाच्या कलमांचा विचार करण्याक रितां हारिस साहेबापासून कांहीं अवकाश मागून घ्यावा. अथवा त्यानें ज्या गोष्टी मागितल्या आहेत त्यांत तरी कांहीं कमी करण्याविषयीं विचारावें. अठ्ठाविसाव्या तारिखेस टिपूकडून पत्र आलें त्यांत जनरल हारिस ह्यास लिहिलें होतें कीं तुम्ही दोस्तीच्या इराद्यानें आम्हांस पत्र पाठविलें तें पोहोंचलें. त्या पत्रांत जीं कलमें लिहिलीं आहेत तीं मोठीं विचार करण्यासारखीं आहेत व वकील पाठविल्याशिवाय निकाल करून टाकण्याजोगीं नाहींत त्यांपक्षीं दोन विश्वासू वकील पाठवून कायतो ठराव करावा असें माझ्या मनांत आहे; त्यास कायतें कळविण्यांत यावें. पण अशाप्रकारें ठराव करावयाचा नाहीं असा हारिस साहेबाचा निश्चय होता. त्यानें टिपूस जबाब लिहिला कीं आम्हीं तुम्हांस जीं कलमें लिहिलीं होतीं तीं तुम्हीं कबूल केलीं नाहींत, हें तुम्ही स्वस्थ बसल्यानें आम्हांस कळलें; नंतर एवढ्यावरून आम्ही तुमच्यावर चाल करावी; पण आम्हीं केली नाहीं हे आमचे तुम्हांवर उपकार आहेत. असो, त्याच कलमांस आम्ही अजून राजी आहों, पण तुम्हीं नुसते वकील माफ पाठवूं नयेत. ओलीस जे लोक सांगितले ते व द्रव्य देऊन पाठविले असतां आम्हीं बोलूं. आणि अशाप्रकारें वकील येणें ते तरी उद्यां तीन वाजावयाच्या आंतच आले पाहिजेत. हें उत्तर वाचतांच टिपूचें धैर्य अगदीं सुटलें, तेव्हां अर्थातच त्यास अगदीं राग न येतां तो निराश होऊन अगदीं खिन्न झाला. आणि वेड्याप्रमाणें होऊन मधून मधून कारणां खेरीज उगीच त्यास मनस्वी आनंद होत असे. असें झाल्यानंतर त्यानें आपणावरच्या संकटाचा विचार चांगलें लक्ष लावून मुळींच केला नाहीं, व ज्या उपायांनीं तें संकट अद्यापि टळण्यासारिखें होतें ते त्यानें केले नाहींत.

लबाडीचें उत्तर.

तटास भोंक पाडण्याची व्यवस्था.

अठ्ठाविसाव्या तारिखेस सायंकाळीं मोरचे बांधण्याच्या जागा आंखून घेतल्या. कोटापासून ह्यां जाग्यांचें अंतर सुमारें ४०० यार्ड होतें, ह्यामुळें त्या ठिकाणावरून तोफा सुरू केल्या म्हणजे तेव्हांच आपला इरादा शेवटास जाईल अशी सर्वांची खातरजमा होती. एक पांच तोफा राहण्याजोगा व एक सहा तोफा राहण्याजोगा असे दोन

मोरचे उभारण्याची तयारी चालली. त्यांच्यामध्यें अंतर सुमारें एकशें चाळीस हातांचें टाकिलें होतें. पण एप्रिलच्या तेविसाव्या तारिखेपावेतों एकाचेंच काम संपलें दुसऱ्याचें संपलें नाहीं. सबब तयार झालेल्या मोरच्यावरून तोफा लागू करावयाच्या त्या, पूर्वी ज्या ठिकाणीं भिंत पाडावयाची म्हणून संकेतानें ठरलें होतें त्या ठिकाणीं केल्या नाहींत, कारण त्यांच्या मनांत असें होतें कीं, टिपूस एव्हांच ही बातमी कळूं नये. तर, जवळ एक बुरूज होता त्यावरून इंग्लिशांच्या बाजूवर तोफा लागू होण्यासारिख्या होत्या सबब त्या बुरुजावर त्या मोरच्यावरून तोफा लावाव्या. कोटावर तोफा सुरू झाल्या म्हणजे टिपूच्या लोकांस कोटावर बिलकूल उभें राहतां येऊं नये म्हणून निराळ्या भिंती बांधून त्यांवर तोफांच्या रांगा उभ्या केल्या होत्या. मे महिन्याच्या दुसऱ्या तारिखेस दोनही मोरचे तयार लेश झाले आणि त्यांवरून तटावर मारा सुरू केला. तेच दिवशीं टिपूच्या तटाची फारच नुकसानी होऊन चोवीस तासांच्या आंत, शहरांत प्रवेश करितां येईल एवढें भोंक तटाला पडलें. नंतर हल्ला करून आंत शिरण्याकरितां बाशांचीं ओझीं व तटाला लावण्याच्या शिड्या वगैरे दुसरें सर्व सामान त्या मोरच्या जवळ येऊन पडलें. आदल्या दिवशीं रात्रीं लेफ्तेनेन्त लाबट साहेब कावेरी नदी उतरून किल्ल्याच्या आगांस गेला होता. ह्या ठिकाणीं नदींत खडक असल्यामुळें धर चांगला होता म्हणून उतरून जातांना फौजेचे हाल अगदीं झाले नाहींत. तटाच्या पुढल्या अंगास जी भिंत होती तिची उंची साडेसात फुटी होती आणि फौजेला वर चढून जाण्यास तिजपासून प्रतिबंध होण्यासारिखा अगदीं नव्हता हें त्या साहेबास चांगलें झालें. तिसऱ्या तारिखेस रात्रीं सुमारें शंभर हात लांबीचें खिंडार पडलें आणि दुसरे दिवशीं म्हणजे चवथ्या तारिखेस एक वाजतां हल्ला करण्यास निघावें असें ठरलें. प्र० १३ इ० स० १७९९

भोंक पाडलें.

इकडे टिपूची राज्य करण्याची मर्यादा संपत आली आणि आयुष्याचीही मर्यादा भरत आली ह्यामुळें त्याला बुद्धिही तसीच झाली. अशा ह्या प्राणसंकटांतून पार पडण्याजोगे जे कांहीं

टिपूचे मूर्खपणाचे उपाय.

ग्र० १३ इ० स० १७९२ उपाय लोकांत आहेत ते सोडून देऊन पुढें काय होईल कसें होईल ह्या गोष्टीचें आपणास ज्ञान व्हावें म्हणून भलते भलते मूर्खपणाचे उपाय योजूं लागला. ज्या ब्राम्हणांचा त्यानें अलीकडे छळ केला त्यांस ह्याप्रसंगीं बोलावून आणून सांगितलें कीं, जो कांहीं खर्च लागेल तो घ्या आणि तुमच्या हातून मंत्र तंत्र जें कांहीं होण्यासारिखें असेल तें करा. सर्व ज्योतिष्यांनीं त्यास असें भविष्य सांगितलें कीं, ह्या संकटांतून पार पडणें फारच कठीण आहे. मग टिपूशीं त्यांचें वैर असल्यामुळें ते असें सांगोत किंवा ह्यांतून पार पडण्याचा संभवच नाहीं त्या अर्थीं पार पडाल असें सांगितलें असतां तें खोटें होऊन आपणावरचा विश्वास उडेल ह्या भावानें सांगोत. तथापि बलिदानें व दुसरीं कांहीं अनुष्ठानें करवावयास त्यास सांगून म्हणाले कीं ह्या संकटाचें निवारण झालेंच तर ह्या गोष्टींपासून होईल. त्या ब्राम्हणांच्या सांगण्याप्रमाणें टिपूनें विधिपूर्वक स्नान करून ब्राम्हणांस दानें वाटिलीं आणि एका भांड्यांत तेल भरून त्यांत आपलें प्रतिबिंब पाहत बसला. हे उपाय योजिल्याच्या योगानें टिपूस कांहीं थोडासा भरंवसा आला आणि इंग्लिश आज तर कांहीं पुढें उद्योग चालवीत नाहींत असें त्यास वाटून तो सकाळीं भोजनाला बसला. तों बातमी येऊन पोहोंचली कीं इंग्लिश तटाला शिड्या लाविताहेत. हें ऐकतांच तो त्यांजबरोबर लढण्याकरितां गेला.

ज्योतिष्यांचें दुष्टपणी उत्तर.

खिडारावर हल्ला करण्याची व्यवस्था.

मे महिन्याच्या चवथ्या तारिखेस सकाळीं इंग्लिश लोक खिडार तयार करण्याच्या व हल्ल्याची तयारी करण्याच्या कामांत गुंतले होते. हल्ल्यावर पाठविण्याकरितां चार हजार लोक नेमिले होते आणि त्यांच्या दोन रांगा करून त्यांस सांगून ठेविलें होतें कीं खिंडाराच्या आंत गेल्यावरोबर एका रांगेनें तटावर डाव्या आंगाला पसरावें, आणि दुसऱ्या रांगेनें उजव्या आंगाला पसरावें. ह्या फौजेवर सर देविद बेअर्ड साहेब मुख्य होता. हा सरदार मागें सुमारें चार वर्षेपर्यंत ह्या शहरांतील तुरुंगांत कैदेंत होता आणि तोच सरदार ह्यावेळेस तें शहर जिंकून त्याच्या तटावर झेंडा लावविण्याकरितां निघण्याच्या विचारांत होता. हल्ल्यावर निघ-

णाऱ्या लोकांत जिकडे तिकडे सामसूम होऊन ते शेवटल्या हुकुमाची मार्गप्रतीक्षा करीत होते तों एक वाजण्यापूर्वी बेअर्द साहेबाकडून हुकूम आला कीं आमची सूचना आल्याबरोबर तयारी असावी. तसा प्रसंग आल्याबरोबर सर देविद बेअर्द साहेब मोरच्यावर चढून आला आणि त्याठिकाणीं मोठ्या शौर्याच्या डौलानें उभा राहिला. तो पुरुष तेजस्वी असून भव्य होता ह्यामुळें त्यावेळेस कांहीं विलक्षणच शोभा पडली. त्याठिकाणीं दोन्ही सैन्यांची नजर अगदीं पूर्ण लागून राहिली होती. तेथून तो आपल्या फौजेला हाक मारून म्हणतो "वीरहो, या आतां माझ्या मागून आणि तुम्ही आपणांस 'ऐंगलंदीय वीर' म्हणवितां त्या नांवाप्रमाणें कृति करा" हें ऐकतांच त्या दोन्ही रांगा विजेप्रमाणें लखकन पुढें सरसावल्या. आणि श्रीरंगपट्टणाच्या तटावरून गोळ्यांचा भडिमार चालला असतां पावघटका गेली नाहीं तों त्या दोन्ही रांगांच्या पुढल्या लोकांनीं नदी उतरून खंदक वलांडून तटावर चढून आपला बाहवटा तेथें लाविला. इतक्यांत टिपूच्या टोळीची आणि त्यांची गांठ पडून त्या टोळीनें त्यांजवर हल्ला करून त्यांचे फार हाल केले. परंतु इंग्लिशांचे पुष्कळ लोक तट पाडला होता तेथें जमले आणि पुढें आंत घुसून तटावरून शत्रूच्या लोकांस घालवून देऊन तट धरून बसले. नंतर त्या ठिकाणापासून कांहीं लोक तटाच्या उजव्या आंगास व कांहीं लोक डाव्या आंगास हुकुमाप्रमाणें पसरले. मागें ज्या दोन रांगा सांगितल्या त्यांपैकीं उजव्या आंगानें जी रांग चालली होती तिच्या मागल्या आंगानें, म्हणजे मोरच्यावरून कोटावर तोफांचा भडिमार चालला होता त्यामुळें टिपूच्या लोकांनीं तिकडे तोंड न करितां पळ काढिला. कितीएकांनीं आपलीं पागोटीं वरच्या आंगास घट बांधून तीं तटाच्या बाहेरच्या आंगास सोडून दिलीं आणि त्यांच्या आश्रयानें बाहेर पडण्याच्या तजविजींत होते ते खालीं फत्ती जमीन होती तिजवर आदळून मेले. ह्याप्रमाणें दक्षिणेकडच्या बाजूच्या तटावर टिपूचें कोणी राहिलें नाहीं. तेव्हां मग इंग्लिश लोक पूर्वेकडच्या आंगाच्या तटावर गेले. त्याच्या खिनीचे जे लोक होते त्यांच्या दृष्टीस सरकारचा वाडा पडत होता इतके जवळ जाऊन ते पोहोंचले होते.

प्र० १३ इ० स० १७९९

सर देविद बेअर्द.

प्र० १३ इ० स० १७९९ डाव्या आंगच्या तटाचें चांगलें रक्षण केलें

हिकडे डाव्या आंगास जी टोळी गेली होती तिला फार अडचणी आल्या. ते लोक तटावर चढून गेल्यानंतर पाहतात तों आंतल्या आंगास दुसरा मोठा खोल खंदक होता आणि त्या खंदकाच्या पलीकडे दुसरा तट होता त्या तटावर टिपू आपली पुष्कळ फौज घेऊन तयार होता. ह्या फौजेनें तोफांचा भडिमार चालविला होता. हा प्रसंग म्हैसुरावर गुदरला तेव्हां त्या फौजेचें धैर्य अगदीं सुटलें होतें, तथापि ह्या प्रसंगीं टिपू येऊन पोंहोचल्यामुळें त्याच्या लोकांस उत्तेजन येऊन यांनीं इंग्लिशांच्या मार्गांत ज्या कांहीं अडचणी घातल्या होत्या यांचा मोठ्या शौर्यानें बचाव केला; म्हणजे इंग्लिशांस त्या पाडूं वगैरे दिल्या नाहींत. फारकाय, इंग्लिशांवर मोठा बाणीचा प्रसंग गुदरला. ज्या सरदारांची त्या हल्ल्यावर नेमणूक झाली होती त्यांपैकीं कांहीं मेले व कांहीं जखमी झाले. लेफ्टेनेन्त फार्कर साहेब हा अधिकारावर आला आणि लागलाच पडला. नंतर त्याच्या जागेवर ब्रिगेद मेजर लामतन साहेब आला. इतक्यांत कप्तान गुदाल साहेब उजव्या बाजूच्या फौजेंतून कांहीं लोक आपणाबरोबर घेऊन खंदक वलांडून आला आणि आंतल्या तटावर चढून म्हैसूरकरांनीं जसा इंग्लिशांवर तोफांचा भडिमार चालविला होता तसाच ह्या वेळेस त्यानें त्यांजवर चालविला मग म्हैसूरकरांचा अशी भंबेरी उडाली कीं, ते मागें हटले आणि तेथें पोहोंतांत तों उजव्या आंगास गेलेली जी इंग्लिशांची फौज होती ती त्याच्या पिछाडीवर येऊन पोहोंचली. आपणांस अगदीं चोहोंकडून घेरलेलें पाहून टिपूच्या लोकांनीं पळ काढिला आणि सांपडला तो रस्ता धरून कोटाबाहेर निघून गेले. नंतर तो किल्ला अर्थांतच इंग्लिशांच्या हातीं आला.

हल्ला करणाऱ्यांची संकटावस्था.

म्हैसूरकरांनीं पळ काढिला.

राजवाड्यांसंबंधीं स्थिति.

ह्याप्रमाणें उजव्या आंगच्या टोळीस मोठा जय मिळाल्यानंतर जनरल बेअर्ड साहेब ह्यानें आपल्या फौजेस विश्रांतीकरितां कांहीं अवकाश दिला. इतक्यांत कांहीं कामगार लोकांनीं खबर आणिली कीं टिपूचा वाडा आम्हीं पाहिला आणि त्यांत कांहीं लोक मसलतीकरितां जमले होते व त्या लोकांत कितीएक मोठे योग्यतेचे पुरुष होते. ही बातमी येतांच त्या एकत्र जमलेल्या लोकांकडे

पाठविण्याकरितां बेअर्द ह्यानें मेजर अलन ह्यास बोलाविलें. कारण असलें नाजूक काम करण्याविषयीं तो मोठा दक्ष होता. अलन साहेबाबरोबर टिपूच्या दरबारांत जमलेल्या लोकांस सांगून पाठविलें कीं, इंग्लिशांनीं सरकारच्या वाड्यावर हल्ला करून तो घेतल्यास तुमच्या प्राणावर खास गुदरेल, तर तें संकट टाळण्याकरितां तुम्हीं ह्यावेळेस आमच्या स्वाधीन व्हावें. अलन साहेब तेथें जाऊन पा- हतो तों एकां सज्जाबर कांहीं लोक त्याच्या दृष्टीस पडले. त्यांस त्यानें बेअर्द साहेबाचा निरोप सांगितला. निरोप ऐकतांच ते लोक फार घाबरले आणि त्यांनीं लागलींच किल्लेदारास बोलावून आणिलें तों तोही अगदीं भांबावून गेला आणि दरवाजा खुला करण्याविषयीं विलंब लावूं लगला. परंतु अलन साहेब आपल्या बरोबरच्या दुसऱ्या दोन कामगारांसुद्धां, एके ठिकाणीं भिंत ढांसळली होती तेथून चढून आंत गेला तेथें एका गच्चीवर पुष्कळ हत्यारबंद लोक जमले होते त्यांपुढें बेअर्द साहेबाचें पत्र ठेविलें आणि त्यांस खात्रीनें सांगितलें कीं तुम्ही मनांतली भीति अगदीं सोडून स्वस्थ व्हा. त्यांचा आपणावर विश्वास बसण्यासाठीं त्यानें त्यांस पांढरें निशाण दाखविलें व आपली तलवार त्यांच्या पैकीं एकाच्या हातीं दिली तथापि ते लोक अगदीं भयाभीत आणि अधीर असे दिसत होते. टिपूसाहेब कोठें आहेत असें विचारिलें तेव्हां त्या लोकांनीं सांगितलें कीं सरकारची स्वारी तर वाडयांत खास नाहीं. दोन राजपुत्र आणि राण्या मात्र वाड्यांत आहेत. कायतो निकाल करून तुम्ही आह्मांस जलदीनें उत्तर द्या अशी अलन साहेबानें निकड च लाविली तेव्हां कांहीं एकांत करण्याकरितां त्यांच्या पैकीं कांहीं असामी एकीकडे गेले. कांहीं लोक दिवाणखान्यांत हिकडून तिकडे आणि तिकडून हिकडे धांवताहेत व त्यांस मोठी काळजी पडली आहे असें अलन साहेबाच्या नजरेस आलें व अलन साहेबाबरोबर दोन असामी आले होते त्यांनीं त्यास सांगितलें कीं तुम्ही आपली तरवार परत द्या पण असें केलें असतां त्या दरबारां तील लोकांच्या मनांत संशय येईल असें जाणून त्यानें तें ऐकिलें नाहीं. शेवटीं अलन साहेबानें फार आग्रह धरिला तेव्हां त्याला

प्र० १३ इ० स० १७९९ मेजर अलन ह्यास तो स्वाधीन करून घेण्यास पाठविलें.

त्याचें चतुराईचें काम.

प्र० १३ इ० स० १७९२ त्यास राजपुत्रांच्या भेटीस नेलें.

राजपुत्रांच्या भेटीस नेलें. तेथें ते उभयतां गालीच्यावर बसले होते., सभोंवतीं भालदार, खिसमतगार वगैरे पुष्कळ लोक उभे होते. मेजर अलन साहेब असें म्हणतो कीं, "मैसुदीन व त्याचा भाऊ ह्या दोघांस कार्नवालिस साहेबाच्या ताब्यांत पूर्वी एकदां ओलीस दिलें होतें. ही मला आठवण झाली. ह्याप्रसंगीं त्यांची स्थिति अगदीं उलटी झाली, त्यांच्या मनांत मोठी भीति उत्पन्न झाली होती आणि ती बाहेर दाखवूं नये म्हणून त्यांनीं आपणाकडून पुष्कळ केलें; पण तें लक्षण काय झांकतें ? असो, अशा ह्या सर्व गोष्टींपासून माझ्या मनामध्यें पराकाष्ठेची करुणा उत्पन्न झाली नंतर मी मैसुद्दीनाच्या हातांत हात घातला आणि त्याच्या मनांतली भीति घालविण्याविषयीं माझ्या हातून होण्या सारिखें होतें तेवढें केलें." मैसुदीन ह्यास विचारिलें. तेव्हां त्यानें ही सांगितलें कीं बादशाह वाड्यांत नाहीं. इंलिश कामगारांचें फार म्हणणें होतें कीं वाड्याचा दरवाजा उघडून टाकावा, पण ही गोष्ट राजपुत्रांच्या मनांत नव्हती. तथापि

दरवाजा उघडला.

शेवटीं त्यांनीं फार आग्रह धरिला तेव्हां त्यानें मोठ्या जुलमानें ती गोष्ट कबूल केली, आणि दरवाजा उघडला. इकडे जनरल बेअर्द साहेब पुष्कळ फौजेनिशीं दरवाज्या जवळ येऊन पोहोंचलाच होता. त्यानें मेजर अलन साहेबास पाहतांच खाजबरोबर कर्नल क्रोस साहेबास देऊन त्या राजपुत्रांस बाहेर घेऊन येण्याविषयीं सांगितलें. ते जाऊन राजपुत्रांस चला म्हणाले तेव्हां त्यांनीं "आम्हांस फार भीति वाटते व दुसऱ्याही अनेक अडचणी आहेत" असें पुष्कळ सांगितलें. पण शेवटीं त्या कामगारांबरोबर इंग्लिश सेनापतीच्या जवळ गेले. कोटाला वेढा घातल्यापासून टिपूनें इंग्लिशांचे तेरा असामी कैदी ठार मारिले हें वर्त्तमान नुकतेंच सेनापतीच्या कानीं आलें होतें त्यामुळें तो अगदीं लाल होऊन गेला होता. आणि तो स्वतः ह्या ठिकाणीं कैदेंत असून त्याचे फार हाल झाले होते, त्याचें स्मरण प्रायः विशेष खवळण्याला कारण झालें असेल. पण इतकें असून काय ! हे साक्षात् राजकुमार आणि ह्यांजवर असा प्रसंग गुदरून दीन झाले असें पाहिल्याबरोबर

जनरल बेअर्द ह्याची शांतता.

बाकीचे सर्व विचार एकीकडे राहून त्याच्या अंतःकरणांत दया उत्पन्न झाली आणि त्यानें त्यांच्या हतावर हात देऊन सांगितलें कीं तुम्ही काडी मात्र भीति धरूं नका, कारण तुम्हांला भय नाहीं. नंतर त्यांचीं हत्यारें त्यांस देऊन बरोबर लोक देऊन इंग्लिशांच्या छावणींत रवाना केलें आणि तेथें त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांची बरदास्त ठेविली. इ० स० १७९९

आतां टिपू हातीं सांपडला पाहिजे असें सेनापतीच्या मनांत फार होतें, सबब राजवाड्याचा कोंपरानकोंपरा धुंडल्याशिवांय सोडावयाचा नाहीं अशा बेतानें बरोबर शिपाई लोकांची एक टोळी घेऊन वाड्यांत गेला. तो जनानखान्यांत शिरला नाहीं पण त्यांतून बाहेर पडण्याच्या जेवढ्या वाटा होत्या तेवढ्यांवर पाहरे बसविले आणि चांगला बंदोबस्त राखावा असा हुकूम दिला. पण ज्यासाठीं हे प्रयास चालले होते त्याचा ठाव ठिकाण कोठेंही लागेना. शेवटीं किल्लेदाराला बोलावून खूपच धमकी दिली तेव्हां तो सरासरी कबूल झाला कीं, सरकार स्वारीला जखम लागून स्वारी देवढीवर पडली असेल असें मला वाटतें. तिकडे आपणास पाहिजे तर नेतों. बेअर्द साहेब किल्लेदाराबरोबर त्या ठिकाणीं गेला. तों तेथें मोठा दुःखोत्पादक प्रकार त्याच्या दृष्टीस पडला म्हणजे ऐन कत्तल जी त्या दिवशीं उडाली होती ती ह्याच ठिकाणीं. मेलेले व जखमी झालेले असे एकाच राशींत अशा राशी पुष्कळ पडल्या होत्या. तितक्यांत अंधार पडला होता त्यामुळें तर अधिकच तेथें भयाण दिसत होतें. आतां किल्लेदाराच्या म्हणण्याप्रमाणें टिपू ह्या ठिकाणीं आहे कीं नाहीं हें लवकर समजणें जरूर होतें ह्याकरितां मशाली आणविल्या, आणि त्या ढिगांतून जखमी झालेले व मेलेले लोक एकीकडे काढून टाकूं लागले टाकतां टाकतां शेवटीं टिपूचा घोडा नजरेस पडला मग त्याचा मेणा दृष्टीस पडला त्या मेण्याखालीं एक जखमी सांपडला आणि किल्लेदारानें हा सरकारचा मोठा विश्वासुक चाकर आहे असें लागलेंच त्यास ओळखिलें. नंतर त्या चाकरानें टिपू कोठें सांपडला होता तें ठिकाण दाखविलें. त्या ठिकाणीं टिपूचें प्रेत सां- टिपूकरितां शोध चालविला.

प्र० १३ इ० स० १७९९ टिपूचें प्रेत सांपडलें,

पडलें. आणि किल्लेदार व दुसरे चाकरमाने होते त्यांनीं सांगितलें कीं हें टिपूचेंच प्रेत होय. त्याच्या चेहऱ्यावर विरूपता अगदीं आली नव्हती. तर अत्यंत क्रोध येऊन स्तब्ध रहावें अशी त्याची मुद्रा दिसत होती. नेत्र टकटकीत उघडे होते. तोंडावर तेज व टवटवी तर अशी होती कीं, कर्नल वेल्स्ली साहेब व मेजर अलन साहेब ह्या दोघांस तर टिपू मेला आहे हें कांहीं वेळपर्यंत खरें वाटेना. आतां टिपूची हकीगत अशी झाली असावीशी वाटते, कीं तो हत्यारबंद होऊन आपल्या कांहीं अगदीं जिवाच्या लोकांनिशीं वाड्याबाहेर पडल्यानंतर इंग्लिश तटावरून येत आहेत आणि आपले लोक पळत सुटले आहेत असें त्याच्या नजरेस पडलें तेव्हां त्या पळणाऱ्यांस आरोळ्या मारून त्यांच्या समोर तो आपण स्वतः पुढें सरसावला; आणि स्वहस्तानें गोळ्या घालून त्यानें शत्रूचे कैक लोक पाडिले. असा मासला दाखवून ते लोक त्यानें एकत्र जमविले आणि त्यांस शत्रूंवर वेधडक तुटून पडा म्हणून सांगितलें आणि त्याच क्षणापासून हा भयंकर प्रसंग त्याजवर गुदरला. असो शेवटीं इंग्लिश शूर पडले त्यामुळें त्यांजपुढें टिपूच्या लोकांचें कांहींच चालेनासें झालें आणि टिपू बहुतकरून अगदीं एकटा राहिला तेव्हां त्या पळणाऱ्यांबरोबर ह्याला पळणें भाग पडलें; परंतु त्याच्या प्राणास प्राण देणारे कांहीं थोडेसे लोक होते ते व आपण मिळून तो इंग्लिशांशीं लढतच होता. अखेरीस चोहोंकडून बंदुकींच्या गोळ्या येऊं लागल्या आणि दोन गोळ्या त्याच्या कुशींत शिरल्या. त्याच्या मांडीखालचा घोडा मेला व त्याच्या आंगांतून पुष्कळ रक्त वाहून जाऊन तो अगदीं गळाला. ह्यामुळें या गरदींतून वाट करून निघून जाण्यापुरती कुवत त्याच्या शरीरांत राहिली नाहीं. इतक्यांत इंग्लिशांच्या टोळीनें येऊन त्यास अगदीं गांठिलें तेव्हां त्याच्या एका सेवकानें त्याला विनंती केली कीं मी अमुक आहें असें सरकारानें म्हणावें म्हणजे सरकाराचा जीव बचावेल, नाहीं तर नाहीं. पण तो म्हणाला, ही गोष्ट साफ कर्त्तव्य नाहीं. एक सोजीर त्याच्या कमरेचा पट्टा तरवारीसुद्धां सोडून घेत होता;

त्याचीं शौर्याचीं कृत्यें.

इतक्यांत टिपूनें त्याजवर वार केला तो त्या सोजिराच्या गुडघ्यावर लागून जखम झाली. या सोजिरानें लागलींच गोळी घातली ती टिपूच्या आखांत शिरली आणि तिनें त्याचा प्राण गेला. असो, अशा रितीनें हें झालें असावें. तें प्रेत सांपडल्यानंतर राजवाड्यांत नेऊन तेथून चांलीप्रमाणें लालबागेंत नेलें आणि तेथें हैदर अल्लीनें पुष्कळ द्रव्य खरचून थडगें बांधिलें होतें त्यांत तें पुरून टाकिलें. प्र० १३ इ० स० १७९९ त्यास वर्मी जखम लागली.

हैदराच्या वंशांत राज्य एकंदर थोडींच वर्षें होतें व त्याच्या अमलांत देशही थोडकाच होता हें खरें परंतु मोंगलाई बुडून जीं नवीन राज्यें स्थापित झालीं त्या सर्वांत बलिष्ठ व व्यवस्थित असें हैंच होतें. हिंदुस्थानांत चोहोंकडे अगदीं फाटाफूट झाली होती आणि त्याप्रसंगींच ह्या संस्थानानें डोकें काढिलें होतें. तेव्हां ह्याचा भरभराट किंवा नाश होणें हें काय तें हैदर व टिपू ह्या दोघांच्याच शहाणपणावर होतें. ह्या दोघांपैकीं एकाचा स्वभाव दुसऱ्याच्या स्वभावाशीं जमावा असा नव्हता. पण दोघांचे स्वभावही मोठे चमत्कारिक होते. ह्याविषयीं आम्हीं मागेंही पुष्कळ वेळां लिहिलें आहे. हैदरअल्ली उदयास येऊं लागला तेव्हां त्यास लिहितां वाचतां अगदीं येत नव्हतें. आणि अखेरपर्यंतही तशाचा तसाच होता. आतां टिपूविषयीं पाहिलें असतां त्याजवर कसेही राज्यसंबंधानें अडचणीचे प्रसंग पडोत व कसाही राज्याचा भार असो; पण एखाद्या विद्वानाप्रमाणें लिहिणें, वाचणें, वगैरे ज्या गोष्टी आहेत त्या बहुतकरून सतत करायाच्याच असें त्याचें होतें. त्याचा पत्रें लिहिण्याचा व पाठविण्याचा कारखाना मोठा होता. त्यानें स्वाऱ्या व लढाया वगैरे केल्या त्यांच्या गोष्टी त्यानें स्वतः लिहून ठेविल्या आहेत. हैदरानें विचार करून अनुभव घेऊन कितीएक चाली घातल्या होत्या त्या चांगल्या चालल्या. पण पुढें टिपू आपला, त्याच्या मनांत एखादा प्रकार आला म्हणजे त्याचा धिमेपणानें एखादा विचार न करितां त्या प्रकाराप्रमाणें पूर्वीच्या चालींत भलभलतेच फेरफार करावे; आणि मग त्या फेरफारांपासून अनर्थही भलभलतेच व्हावे.

ह्या राजवंशाची समाप्ती

टिपूचे गुण.

प्र० १३ इ० स० १७९

मुसलमानी धर्मावर त्याची श्रद्धा.

हैदराचें धर्माविषयीं अत्यंत औदासिन्य होसें, आणि त्यामुळें त्याच्या आंगीं नितिही तितपतच होती. तरी राज्यकारभार करूं लागला म्हणजे मुसलमान अधिक आणि हिंदु कमी असें तो मानीत नसे. धर्म कोणताही असला तरी सारखाच. आणि राजाला हा विचार फारच चांगला. आतां टिपूच्या अंतःकरणांत सदां सर्वकाळ मुसलमानी धर्माचा अभिमान. आणि त्या अभिमानापासूनच त्याचे बहुत दोष घडले. ह्या पृथ्वीवर मुसलमानी धर्माचा फैलाव करण्याकरितां ईश्वरानें मला योद्धा तयार करून पाठविलें आहे, असें त्यास वाटत असे. आतां हा एक विचार, व ज्यास्ती राज्य मिळवावें व अमल वाढवावा हा एक विचार, हे दोन्ही मनांत धरून त्यानें चोहोंकडच्या लोकांशीं युद्ध मांडिलें. म्हणजे इंग्लिश हे ख्रिस्ती होत, पेशवे हे ब्राम्हण होत, आणि नेयर हे एक दुसरे मुर्त्तिपूजक होत. टिपूची ह्या सर्वांबरोबर लढाई होती. शेवटीं शेवटीं तर धर्मवेड आणि पोरकट समजूत इतकी वाढली कीं जेव्हां अगदीं येऊन गुदरली तेव्हां मुसलमान लोकांस जादू वगैरे करण्यास त्यानें सांगितलें व ज्या हिंदूंस त्यानें त्रासवून सोडिलें होतें त्यांसही मंत्र तंत्र जप जाप्य वगैरे करावयास सांगितलें. श्रीरंगपट्टण इंग्लिशांच्या हातीं आल्यावर त्यांनीं टिपूचे कारखाने, तहनामे, दफ्तर व राजकीय कागदपत्र हे सर्व पाहिले. त्यांत टिपूला पडलेलीं स्वप्नें व त्यांचे अभिप्राय जींत लिहून ठेविलेले अशी एक चोपडी सांपडली. कर्नल वातसन साहेबानें त्या चोपडींतील चमत्कारिक मासले रा-

त्याचा लोभी स्वभाव व मूर्खत्व.

त्याचीं स्वप्नें.

खून ठेविले आहेत, ते आम्ही येथें लिहितों. एकेसमयीं असें झालें कीं टिपूवर मराठ्यांची स्वारी होणार होती. तेव्हां त्याला स्वप्न पडलें कीं, एक गृहस्थ येऊन त्यानें आपणास सलाम केला. पुढें त्याशीं संभाषण चाललें होतें, तें होतां होतां तोच गृहस्थ स्त्री आहे असें ठरलें. ह्या स्वप्नाचा अभिप्राय बुद्धिकौशल्यानें टिपूनें असा काढिला कीं, आपले शत्रु मराठे प्रथमतः मोठे शूर व भयंकर दिसतील, पण त्यांजबरोबर लढूं लागलों म्हणजे ते बायकांप्रमाणें होतील. एकदां नेतीवरिस्ती लोकांबरोबर युद्ध करावयाचें होतें तेव्हां त्याला दृष्टांत झाला तो असा कीं एक गाय व एक वांसरूं

याच्या दृष्टीस पडलें. गाय दिसण्यांत वाघाप्रमाणें उग्र व भयकर होती. तिच्या पुढल्या पायांस कांहीं चलनवलन होतें, पण मागल्या पायांस अगदीं नव्हतें. ही गाय मारण्याचा त्याचा इरादा होता; पण तो पूर्वीच जागा झाला. ह्या स्वप्नाचा अभिप्राय त्यानें असा काढिला कीं गाय मारण्याचा बेत केला होता त्याप्रमाणें खिस्ती लोकांस आपण मारून टाकूं. आतां पुढल्या पायांस थोडेंसें चलनवलन होतें, त्याचा अर्थ असा कीं, ते लोक आम्हावरोबर लढण्याकरितां कांहींसे झटतील, आणि मागल्या पायांस चलनवलन नव्हतें ह्याचा अर्थ असा कीं त्यांस कोणी मदत करणार नाहीं. दुसऱ्या कितीएक प्रसंगीं टिपूची चांगली बुद्धिमत्ता दृष्टीस पडते, आणि वर सांगितलेल्या प्रसंगीं त्याचा असा पोरकटपणाही दृष्टीस पडतो, असे दोन्ही प्रकार आहेत. अशा स्वप्नादिकांचे मनःकल्पित अभिप्राय काढून त्यांच्या आधारानें राज्यकारभारांत कमजास्त गोष्टी केल्या असतां त्यांपासून चांगलेंच होईल असा नियम नाहीं. मग टिपूचे मनोरथ शेवटास गेले नाहींत ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. प्र० १३ इ० स० १७९९

त्याजविषयीं मतें.

टिपूचे इंग्लिशांशीं अत्यंत हाडवैर होतें. त्यानें त्यांजबरोबर मोठ्या मोठ्या लढाया केल्या व त्यांचे जे लोक कैद केले होते त्यांस त्यानें फारच इजा दिली. ह्यावरून इंग्लिश असें मानीत कीं टिपूची कृति राक्षसाचीच आहे. त्याची आकृति मात्र माणसाची आहे. तो आपल्या प्रजेशींहि असाच क्रूरतेनें वागत असेल असें त्यांस वाटत होतें. पण त्यांची फौज त्याच्या राज्यांत शिरली तेव्हां तींस दिसलें कीं हें राज्य बऱ्या रितीनें चालविलें आहे, जमिनीचें उत्पन्न चांगलें आहे, व ह्या संस्थानाचा मोठा भरभराट आहे. टिपूची प्रजा टिपूला अगदीं वश होती. त्यानें इंग्लिश वगैरे लोकांस जे प्रांत दिले होते त्यांतील लोक त्याचा पक्ष घेण्यास सर्वकाळ सिद्ध असत. ज्या लोकांवर त्यानें जय मिळवावा त्यांचे मात्र त्यानें हाल हाल पाडावे व तेणेंकरून त्यांच्या अति द्वेषास पात्र व्हावें. आणि ह्याच गोष्टीमुळें मुख्यत्वें करून त्याचा हा नाश होऊन तो जिवास मुकला असें म्हटलें तरी चिंता नाहीं. हैदर

त्याच्या लोकांची त्यावर प्रीति

प्र० १३ इ० स० १७९९

हा राज्य संपादन करण्याकरितां झाला होता आणि टिपू तें घालविण्याकरितां झाला, असें लोकांचें म्हणणें आहे; आणि बहुतेक मोठ मोठ्या साहेब लोकांस हें मान्य आहे. तरी एवढी गोष्ट खरी आहे कीं, आसपासच्या संस्थानांवर त्यानें आपलें वर्चस्व पुरें राखिलें होतें. त्यांपैकीं कितीएक संस्थानी हैदराच्या तोलाचे होते व किती एकतर त्याला भारी होते. इंग्लिशांनीं टिपूला खालीं करण्याकरितां मोठ मोठ्या फौजा पाठविल्या व त्या कामांत दक्षताही फार खरचली, तेव्हां टिपूचा पराभव झाला. अशी फौज पाठविली आहे व असें चातुर्य खरचलें आहे असें उदाहरण हिंदुस्थानाच्या इतिहासांत सांपडत नाहीं.

म्हैसूर सर्वथैव इंग्लिशांच्या स्वाधीन झालें.

ह्याप्रमाणें म्हैसुरास इंग्लिशांस पूर्ण जय मिळाल्यानंतर त्याजबाबदची पुढली व्यवस्था करणें सांजकडेसच होतें. ह्या शेवटच्या स्वारींत मराठ्यांचें अंग अगदीं नव्हतें. निजाम पुरतें समजून होता कीं इंग्लिश जयी आहेत, तर ते आपणास जें देतील तें घेऊन संतोष मानिला पाहिजे. गवर्नर जनरल साहेबांनीं

त्याचे विभाग.

कानडादेश, कोइमत्तूर, घाटांतील खिंडी वगैरे आणि श्रीरंगपट्टण इतकीं ठिकाणें कंपनीच्या कुलअखत्यारा खालीं ठेविलीं. श्रीरंगपट्टण हें राजधानीचें शहर होतें, व चोहोंकडच्या प्रदेशांशीं संबंध होता तेणेंकरून सर्व दक्षिण हिंदुस्थानांत पूर्वेकडच्या प्रदेशांचें पश्चिमेकडच्या प्रदेशाशीं दळण वळण सहज राहून पश्चिम किनारा कंपनीच्या अगदीं ताब्यांत राहिला. निजामाच्या प्रांतास लागून जो म्हैसूरच्या राज्याचा प्रांत होता तो इंग्लिशांनीं निजामाला दिला. मराठ्यांस देण्याकरितां कांहीं प्रांत राखून ठेविला होता, आणि त्यांनीं अमुक कलमें मानिलीं असतां त्यांस तो प्रांत द्यावा असें होतें पण तीं कलमें त्यांनीं मान्य केलीं नाहींत त्यामुळें त्यांस तो मिळाला नाहीं, ह्याबाबद आम्ही पुढें लिहिणार आहों. इतकी व्यवस्था करून बाकी पुष्कळ मुलूख खालीं राहिला होता त्याविषयीं गवर्नर जनरल ह्यांचा अभिप्राय असा होता कीं, राहिलेल्या भागाचे तुकडे न पाडितां नेतिवाचें संस्थान करून ठेवावें, आणि त्याला आश्रय देऊन त्यावर वर्चस्व कंपनीचें रा-

कांहीं भागाचें लहानसें संस्थान पुन्हा स्थापिलें.

खावें हें चांगलें. मग, हें मुख्य पद नेतिवामध्यें कोणास द्यावें ह्याविषयीं विचार निघाला. टिपूच्या पुत्रां पैकींच एकाला तें पद गवर्नर जनरल साहेबानें दिलें असतें परंतु आपले पूर्वज महा पराक्रमी व जयी होते ह्याचें त्या मुलांस वारंवार स्मरण होऊन, ज्या इंग्लिशांनीं यांचा विध्वंस केला त्यांशीं हे सर्वदां वांकून राहतील, असें त्या साहेबास वाटलें व हें खरेंही आहे. तेव्हां टिपूच्या मुलांचा उत्तम प्रकारचा बंदोबस्त करून देऊन म्हैसूरच्या प्राचीन राजाच्या घराण्याची अगदीं अप्रतिष्ठा होऊन तें काळोखांत पडलें होतें त्यांतील एकास हें राज्य द्यावें हा बेत बरा होता. ह्या प्राचीन घराण्याला लोक त्यावेळेसही पुष्कळ वश होते. ह्या घराण्यांतील एक बाई आपल्या पांच वर्षांच्या मुलासहवर्त्तमान दारिद्र्यांत दिवस काढीत होती. तिला कोणी विचारितही नव्हतें. अशा स्थितींतून त्या मातापुत्रांस काढून त्या मुलास राज्यपदारूढ केलें. नंतर त्या लोकांस फार आल्हाद होऊन त्यांनीं त्या उभयतांचा जयजयकार केला. म० १३ इ० स० १७९९

मूळराजाचा वारस.

(तेरावें प्रकरण समाप्त.)

प्रकरण १४ वें.

मराठ्यांशीं युद्ध आणि मध्यहिंदुस्थानांत इंग्लिशांचा जय ह्यांविषयीं.

मराठ्यांचा अमंल– शाहू गादीवर बसतो– बाळाजी विश्वनाथ ह्याची प्रख्यात कारकीर्द– त्याच्या मागून थोरले बाजीराव अधिकारावर येतात– होळकर व शिंदे उदयास येतात– पेशव्यांचा अमल– समुद्रावर दंगा करणारा आंग्र्या मोडून टाकिला– थोरले माधवराव पेशवाईवर आले– त्यांची कारकीर्द– राघोबादादा– पेशव्यांच्या प्रधानांनीं राघोबादादास दूर केलें– मुंबई सरकाराशीं राघोबा मिळतो– किटिंग साहेबाची स्वारी– मुंबई सरकाराकडील काम काढलें– तह– पुन्हा युद्धाची सुरुवात– पुण्यावर फौजेची चाल– बदनक्षाचा ठराव– जनरल गोदर्द साहेबाची मोहीम– पोफम व कामक ह्या दोन साहेबांनीं केलेल्या लढाया– मराठे व इंग्लिश एक झाले– महादजी शिंदा ह्याचा अमल वाढला– त्याचें मरण– माधवरावाचें मरण– नाना प्रकारचीं कपटें– इंग्लिशांचा हेवा– शिंदे व होळकर ह्यांचें परस्परांशीं वैर– पेशवे व शिंदे ह्यांचा पराजय– तुम्हीं आम्हांस मदत करावी असें ब्रिटिशांशीं बोलणें लावून त्यांजकडून संकेत करून घेतला– मोहीम सुरू झाली– जनरल वेलस्ली साहेब पुण्यांत शिरला– शिंदा व वऱ्हाडचा राजा ह्यांजबरोबर तह– लढाई वगैरे सुरू झाली– प्लासी येथील लढाई– आरे गांवची लढाई– गावलगडचा वेढा– वऱ्हाडच्या राजाबरोबर तह– मध्यहिंदुस्थानांत शत्रूची फौज– कौल येथील लढाई– आलीगड घेतला– दिल्ली खालसांत केली– मोंगल बादशाह– शत्रूचा शेवटला पराजय– शिंद्याशीं तह– होळकरा

शीं विघाड– कर्नल मानसन पळाला– दिल्लीचा वेढा– होळकरांचा पराजय– भरत पुरास वेढा– इंग्लिशांस मागें हटविलें– तह– शिंद्याची शत्रुत्वाची वर्तणूक– ब्रितन बेटांत राज्य नीतीची नवीन पद्धति– मार्किस कार्नवालिस हा गवर्नर जनरल होऊन हिंदुस्थानांत आला– तो मरून त्याच्या जागेवर सर जार्ज बार्लोदा आला– शिंदा व होळकर ह्यांजबरोबर तह– लार्ड मिन्तो साहेबाची कारकीर्द. प्र० १४ इ० स० १७६०

मराठ्यांचें राज्य.

दक्षिण हिंदुस्थानांत ब्रितिश लोकांनीं युद्धें करून जय मिळविला ह्याविषयींचा इतिहास एक सारखा आम्ही लिहीत गेलों, त्या इतिहासांत मराठ्यांचा उल्लेख फारसा कोठें आला नाहीं. केवळ म्हैसूरच्या युद्धांत त्यांचा थोडासा संबंध होता तेवढ्या पुरतें मात्र त्यांजविषयीं काय लिहिलें तें लिहिलें. मोंगलांची बादशाही खालवल्यानंतर मराठे कसकसे उदयास चढले व पुढें बादशाही बुडविण्याविषयीं कसकसे साधनीभूत झाले हें मागें लिहिलें आहे, तें आमच्या वाचणाऱ्यांच्या लक्षांत असेलच. पुढें आफगाण लोकांचा व मराठ्यांचा युद्धप्रसंग झाला नसता तर मराठ्यांनीं दिल्लीचें तक्त घेतलेंच असतें. आफगाण लोकांच्या फौजेची तयारी विशेष व शौर्यही विशेष. त्या फौजेनें दोन वेळां मराठ्यांचा असा खरपूस केला कीं, ते फार जिवट पडले म्हणून त्यांनींच सोसला, दुसरे तिसरे असते तर जमीन दोस्तच होऊन गेले असते. परंतु मराठ्यांनीं आपल्या डोंगरी मुलखांतून पुष्कळ लोक आणून आपली फौज भरली. ते लोक चांगले लढाऊ होते. हिंदुस्थानांत आपलें राज्य निरंतर रहावें ह्याकरितां आफगाण लोकांनीं उद्योगच केला नाहीं. तर ते लागलेच निघून गेले. तेव्हां एतद्देशीय संस्थानिकांमध्यें मराठ्यांचें वर्चस्व वाढून पुन्हा कायते तेच प्रमुख झाले. म्हैसूरची ते वेळेस खूप चलती होती त्यामुळें त्या संस्थानानें मात्र कांहीं वेळपर्यंत त्यांच्याशीं टक्कर मारिली. पण जेव्हां इंग्लिशांनीं म्हैसूरचें संस्थान जमिनीस मिळवून टाकिलें तेव्हां

आफगाण लोकांनीं मराठ्यांचा पराजय केला.

प्र० १४ इ० स० १७१०

मराठ्यांस इंग्लिश लोकांखेरीज दुसरें कोणी डोयजड राहिलें नाहीं. तेव्हां अर्थांतच दोघांपैकीं एक मोडून जाऊन दुसरा उरेल त्यानें हिंदुस्थानचें राज्य करावें असें झालें. मराठे सरकारच्या आपसांतील कांहीं गोष्टी व इंग्लिशांशीं त्यांचीं बोलणीं चालणीं वगैरे झालीं होतीं तीं ह्याविषयीं कांहीं लिहून मग युद्धाबद्दल लिहूं.

शिवाजीचा अमल.

शिवाजीनें आपल्या लोकांवर पाहिजे तसा अमल केला. तथापि लोकांची त्याजवर प्रीति विशेष ह्या कारणानें आपल्या मागें आपल्या वंशजांस राज्य मिळवावें असें करण्यास त्यास कठीण पडलें नाहीं. पण त्याचे वंशज त्याजप्रमाणें धैर्यशाली व पराक्रमी निपजले नाहींत, त्यामुळें त्या प्रतापी पुरुषानें जो मार्ग घालून ठेविला होता त्यानें जाणें हें त्यांच्यानें झालें नाहीं. ते दिवसानु दिवस ख्यालीखुशालींत व चैनींत निमग्न झाले, आणि राज्यकारभाराचें काम त्यांनीं प्रधानांवर सोंपविलें. मग अशा गोष्टीचा परिणाम काय व्हावा हें हिंदुस्थानांतील अशाच प्रकारच्या दुसऱ्या अनेक उदाहरणांवरून स्पष्टच आहे. ज्याच्या हातीं सर्व राज्यकारभार दिला तोच मुख्य होऊन बसला. मग राजानें त्याला काढून टाकण्याचा उद्योग करणें व्यर्थ आहे. कारण, राजा स्वतः त्या प्रधानाच्या चाकराप्रमाणें झाला व राज्यही त्याच्याच हातांत पडलें. तथापि लोकांस शिवाजीच्या वंशाचा कांहीं अभिमान व शिवाजीनें कसकशा उपायांनीं राज्याची स्थापना केली होती हें यांस चांगलें स्मरत होतें त्यामुळें त्याच्या वंशास मुळींच काढून-टाकून आपणच राज्यपद घेणें हें त्या प्रधानांस फार कठीण होतें. पण त्यांच्या ऐष आरामाचीं यथास्थित तजवीज करून त्यांना टिकल्याचे धनी करावें आणि त्यांच्या नांवानें आपण राज्यसंबंधी हरएक बाबतीचा कारभार पाहावा हें करण्याचें प्रधानांस कठीण नव्हतें. असो ह्याप्रमाणें दोन तीन पिढ्या राजा केवळ नामधारी आणि वास्तविक राजा म्हटला असतां प्राधनच असें चाललें.

त्याच्या मागें गादीवर बसले ते चैनींत निमग्न झाले.

शिवाजीचा नातू शाहू.

पुढें शाहू राजाच्या कारकिर्दींत कांहीं कारणानें ह्या व्यवस्थेंत व्यत्यय आला इ.स.१६९० त औरंगजेब बादशाहाची फौज येऊन तिनें (रायगड ऊर्फ) रायरी घेतली ते वेळेस शिवाजीची

सून आपल्या पुत्रासुद्धां त्या फौजेंतल्या लोकांच्या हातांत सांपडली तेव्हां त्यांनीं त्या उभतांस दिल्लीस नेलें. तेथें बादशाची कन्या बेगम साहेब हिची त्या शिवाजीच्या नातवावर मोठी प्रीति जडली आणि बादशाहाच्या परवानगीनें त्या मुलाकडून विद्याभ्यास करविण्याचें काम तिनें आपणाकडे घेतलें बादशाह मुलीकडे नेहमीं जात येत असे त्या योगानें त्याचीही त्या बाळावर मोठी ममता जडली; आणि त्या मुलाचें मूळचें नांव शिवाजी होतें तें नघेतां तो त्यास विनोदानें शाहू (साव)असें म्हणत असे. त्यांतील अभिप्राय इतकाच होताकीं शिवाजीनें चौर्य विद्येनें राज्य स्थापिलें हें व्याजोक्तीच्या नांवानें दाखवावयाचें होतें. औरंगजेबानें आपल्या राज्यांतील दोन मोठाल्या नामांकित सरदांच्या दोन मुलींवरोबर शाहूचीं येका मागून एक अशीं दोन लग्नें करून दिलीं. त्या लग्नांत अहेर वगैरे मोठमोठाल्या देणग्या बादशाहानें शाहूस दिल्या त्यांत संभाजीची भवानी नामक तरवार लढाईंत त्याजपासून घेतली होती ती दिली. ही भवानी तरवार हिंदुस्थानांत सर्वांच्या ऐकण्यांत आहे. प्र० १४ इ० स० १७०८

शाहू मराठ्यांकडे परत पाठविला.

औरंग जेब मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र आजीमहा पादशाह झाला तेव्हां त्याच्या जवळ शाहू राहिला. ते वेळेस मराठे लोक मोंगलांच्या राज्यांत लुटालूट वगैरे अनेक प्रकारें करून त्यांस त्रास देत असत. तेव्हां त्यालोकांत फूट पाडावी आशा उद्देशानें आजीम ह्यानें शाहूस दक्षिणेंत पाठवून दिलें. हिकडे शाहू दिल्लीस गेल्यापासून त्याच्यामागें त्याचा सावत्र चुलता राजाराम हा राज्य करीत होता तो मेल्यानंतर त्याची बायको ताराबाई राज्य करीन होती. शाहू महाराष्ट्र देशांत येऊन पोंहचल्यावरही ताराबाईच्या मनांत आपण राज्य करावें असें फार होतें, पण सर्व लोकांची प्रीति शिवाजीच्या वडील घराण्यावर विशेष होती आणि ही ताराबाई शिवाजीची धाकटीसून होती तेव्हां सर्व लोकांनीं ताराबाईस दूर करून सन १७०८च्या मार्च महिन्यांत शाहू स शिवाजीच्या गादीवर बसविलें. बहूत वर्षेंपर्यंत त्यानें बरे शहाणपणानेंच राज्य चालविलें आणि आपल्या अधिकाराप्रमाणें तो कांहीं काम कारभार पाहत असे, अगदींच केवळ चैनींत बुडाला होता असें नाहीं. परंतु हिंदुस्थानांतील राजे लोकांचे रिवाज, चाली, तो आपली गादी घेतो.

म० १४ इ० स० १७२०

ऐष आरामाची प्रीति.

वगैरे निराळ्याच प्रकारच्या पडल्या. त्याप्रमाणें त्या राजांनीं राज्यकारभार दुसऱ्यावर सोंपवून आपण ऐष आरामांत स्वस्थ निमग्न असावें असें होतें. आणि तशांत शाहूराजानें बाळपणापासून मोंगलाच्या जनानखान्यांत दिवस काढिले होते त्यामुळें त्याचे वेळेस हा प्रकार इतर राजांच्या वेळेपेक्षां जाजती झाला. पण इतकें फार चांगलें झालें कीं, शाहूनें आपला पूर्ण भरंवसा बाळाजी विश्वनाथ ह्याजवर ठेविला. त्यामुळें शाहूला कोणे गोष्टीची काळजी नव्हती, व सर्व राष्ट्राचा मोठेपणाही राहिला. हा बाळाजी विश्वनाथ आरंभीं दफ्तरांत लहानसा कारकून होता, आणि तोच पुढें मराठ्यांचा मुख्य राजा झाला. आरंभीं जर पाहिलें तर त्याची हुशारी व चांचल्य असें कांहींच नव्हतें. फार तर काय तो घोड्यावर बसला असतां पडेल म्हणून संभाळण्याकरितां दोहींकडे दोन मनुष्यें लागत, यांवाचून होत नसे तथापि तो बुद्धिमान व चतुर होता त्यामुळें शाहूची मर्जी लागलीच त्यावर बसली. राज्याविषयी शाहूचा इरादा असा होता कीं आहे राज्य हें सौम्योपायांनीं आपलेंसें करून घ्यावें आणि त्याचा चांगला बंदोबस्त करून व्यवस्था देवावी. आणि उगीच फौज जमवून लूट करणें वगैरे सोडून द्यावें बाळाजी विश्वनाथ ह्यास आंग्र्याकडे पाठविलें होतें, तेथें मोठ्या चातुर्यानें त्याशीं बोलणें चालणें करून शाहूराजाचा व त्याचा कज्जा त्यानें मिटविला आणि त्याजकडून शाहूराजाचा अमल आम्हांवर आहे असें कबूल करून घेतलें. हें काम बजाविल्यानंतर बाळाजी विश्वनाथावर शाहूची मोठी मेहरबानी होऊन त्यानें त्यास पेशवाईचीं म्हणजे दिवाण गिरीचीं वस्त्रें दिलीं. नंतर बाळाजी विश्वनाथ ह्यानें सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेऊन राज्य मोठ्या व्यवस्थेनें चालविलें. त्यानें आपल्या अमलांत कोठें स्वाऱ्या वगैरे केल्या असें झालें नाहीं. पण कायदे कानू करून बंदोबस्त जेथल्या तेथें चांगला ठेविला होता. मराठ्यांच्या राज्यांत निरनिराळ्या कारणांनीं अनेक पक्ष झाले होते या सर्वांस हितावह अशा कांहीं गोष्टी काढून त्यांच्या योगानें त्या सर्व पक्षांचे त्यानें ऐक्य केलें. पुढें त्याच्या हातून मोठमोठालीं कामें होऊन त्यांचा सर्व हिंदुस्थानांत एवढा

बाळाजी विश्वनाथ.

त्याचें चातुर्य.

दबदबा पडला ह्यास मूळ कारण बाळाजी विश्वनाथच होय. त्यानें वसुलाच्या कामांत पुष्कळ व्यवस्था केली, शेतकीस बहुत उत्तेजन दिलें, व राज्यांतील सर्व कारखान्यांत अमुक रितीनें कामकाज चालवावें, असा बेत करून टाकिला. इ० स० १७२०

सुमारें सहा वर्षांनीं सन १७२०च्या अक्तोबर महिन्यांत बाळाजी विश्वनाथ हा मरण पावला. पण एवढ्या अल्प काळांत त्यानें वर सांगितलेलीं मोठालीं कामें केलीं. त्याच्या मागें त्यास दोन पुत्र होते त्यांतून थोरल्याचें नांव बाजीराव. बाळाजी विश्वनाथ ह्यानें त्यामुलास काम काजामध्यें व शस्त्रविद्येमध्यें जातीनें तरबेज केलें होतें. काम काजामध्यें बाजीराव आपल्या तीर्थरूपाहून चढाईत होता व धैर्यवानही अधिक होता. ह्यास पेशवाईचा अधिकार मिळाल्यानंतर त्यानें शाहूराजाच्या मनांत मराठ्यांचें राज्य वाढविण्याविषयींचे मोठमोठाले बेत भरवून दिले. मोंगलांची बादशाही घेण्याचें त्यानें शाहूस सांगितलें. सर्वांत मोठें कायतें बादशाहाचें पद अशी हिंदुस्थानांतल्या सर्व लोकांची समजूत होती परंतु त्या बादशाहींत अनेक फुटाफुटी होऊन ती इतकी दुर्बल झाली होती कीं जो कोणी छातीकरून तिजवर उठेल त्याच्या हातीं ती लागेल. शाहूराजा स्वतः शूर नव्हता तथापि आपलें राज्य वाढविण्याच्या वगैरे मसलती ऐकून त्याला मोठें स्फुरण आलें. आणि त्यानें बाजीरावास सदर सांगितलें कीं ह्या कामांत तुम्ही जें कराल तें मला संमत आहे. अशी सरकारची परवानगी मिळाली तथापि कांहीं घरगुती वखेडयामुळें बाजीरावाचें चित्तच्यावृत्त झालें होतें, व बादशाहाचा दक्षिणेंतील सुभेदार निजाम ह्याजबरोबर राज्यसंबंधानें त्याचा कांहीं तंटा चालू झाला होता त्यामुळें मोंगलांवर स्वारी करण्याचें जमलें नाहीं पुढें इ०स० १७४०सांत पुष्कळ फौज जमवून दिल्लीवर स्वारी काढिली, तों एकाएकीं दुखणें येऊन तो नर्मदेच्या काठीं मरण पावला. ह्या पुरुषानें पेशवाईचा अधिकार १९ वर्षें चालविला. ह्याच्या कारकिर्दीत होळकर व शिंदा हे दोन नवे पुरुष उदयास आले व ह्याच्या मागें ह्यांचे वंशजही हिंदुस्थानांत स्वतंत्र संस्थानी झाले. ह्या दोघांचें मूळ पाहिलें असतां फारच हलकें होतें. होळकर

बाजीराव आपल्या बापाच्या कामावर होतो.

राज्याविषयीं मोठाल्या मसलती.

बाजीरावाचा मृत्यु.

प्र० १४ इ० स० १७४० होळकर.

हा जातीचा शुद्र धनगर होय. त्याच्या अंगीं युद्ध कौशल्य होतें व तो मोठा शूर होता ह्यामुळें आपणाजवळ कांहीं थोडेसे स्वार जमवून तो पेशव्याच्या फौजेस येऊन मिळाला. सिंदा हा रजपूत लोकांच्या घराण्यांत झाला असें म्हणतात. परंतु तें घराणें फार हलकें होतें, त्याचें मूळही शुद्ध नव्हतें. त्याला दारिद्र्य म्हणजे इतपत होतें कीं शिंदा प्रथमतः पेशव्याजवळ जोडा उचलण्याच्या कामावर राहिला होता. त्यानें त्याच कामांत आपली हुशारी दाखविल्यामुळें पेशव्याची मर्जी त्याजवर बसली आणि बेव्हांपासून तो मोठेपणास चढत चालला. पुढें ते मोठ मोठीं कामें बजावीत चालले तसतसा त्यांचा लौकिक वाढत चालला. शेवटीं त्या दोघांस स्वतंत्र निरनिराळा फौजफाटा ठेवण्याचा अधिकार पेशव्यानें दिला. नंतर आपणांवर साक्षात ज्याचा अधिकार असेल त्याचा मात्र हुकूम मानावयाचा हें हिंदुस्थानांत सर्व साधारणच आहे त्याप्रमाणें ह्यांचेंही होतें. त्यामुळें बाजीरावाच्या मागें ते स्वतंत्र संस्थानिक होऊन बसले.

शिंदा.

पिढीजाद पेशवा.

पेशव्याची गादी वंश परंपरेनें मिळावी अशी तर वहिवाट पडलीच होती तेव्हां बाजीरावाच्या मागून त्याचा वडील पुत्र बाळाजी बाजीराव त्या अधिकारावर आला. रघोजी भोसला ह्या नांवाचा एक मराठा सरदार होता त्यानें बाळाजीस तें काम मिळण्याविषयीं अडचण घातली पण ती चालली नाहीं. तथापि पेशव्यांचा रघोजी भोंसला ह्याजबरोबर कांहीं तंटा चालू होता व दुसऱ्या कांहीं अडचणी होत्या त्यामुळें दिल्लीची बादशाही पालथी घालण्याचा बेत रहित झाला. मोंगल सरकारानें मराठ्यांस वसुलाची जबथाई देण्याचें कबूल केलें असतांही रघोजी भोंसला बंगाल प्रांतांत शिरून अतिशय धामधूम करीत असे. असा प्रकार चालला असतां सन १७४९ त शाहूराजा मरण पावला. शाहूराजा गादीवर असतांच मराठ्यांचें सर्व मालवल्या सारखें होतें. तथापि त्याचा मोठेपणा राहिला तो दोन कारणांनीं राहिला. एक शाहू स्वतः कांहीं शहाणा व कांहींसा हुशार होता, दुसरें तो शिवाजीचा साक्षात नातू होता. पण हा मरतांच सातारची गादी आहे नाहीं हें सा-

राजाचा मृत्यु.

रखेंच झालें होतें. बाळाजी विश्वनाथ ह्याच्या मनांत ती गादी मुळींच मोडून टाकावयाची होती. ही गोष्ट करण्याविषयीं एक विशेष कारण होतें तें असें कीं शाहूराजास पुत्र नव्हता, व शिवाजीच्या घराण्यांतील जो मुलगा बसविण्याचा विचार होता तो अस्सलच आहे अशी खातरी नव्हती, अशा कारणांवरून मोडण्याचें मनांत होतें, पण पुन्हा विचार करून बाळाजी बाजीराव ह्यानें असें ठरविलें कीं सातारचा खर्च कमी करून नांवाला एक धनी राजा स्थापून ठेवावा हें चांगलें. शाहू राजाची राखवारवाई म्हणून एक बायको होती ती त्याच्या फार लोभांतली होती ती बाळाजीच्या मतास अनुकूल होईना. तिनें बाळाजीस अनेक अडचणी घातल्या होत्या यांत ही एक सांगितली होती कीं तुम्ही हें पुर्ववत् चालवीत नसाल तर मी सती जातें. बाळाजी बाजीराव सखवार बाईस बाह्यात्कारें असें सांगत होता कीं आपण सती जाऊं नये. पण सर्व घरांतल्या माणसांच्या व लोकांच्या नदरेंत चातुर्यानें त्यानें असें भरवून दिलें कीं, हें भयंकर कर्म खरें, तरी धर्माप्रमाणें विचार केला असतां तिचें सती न जाऊन चालयाचेंच नाहीं. असो, बाळाजी बाजीराव ह्यांनीं आपल्या इच्छेप्रमाणें सर्व तजवीज केली आणि रघोजी भोंसल्याशीं सख्य करून सातारची राजधानी मोडून पुण्यास केली; आणि पेशवा हाच सर्व मराठ्यांचा मुख्य झाला. त्यानंतर कांहीं वर्षें पर राष्ट्रांतील गोष्टींच्या विचारांत गेलीं आणि दक्षिणेंत व कर्नाटकांत लढाया व दुसरीं राज्यकारणें चाललीं होतीं त्यांतही गेलीं. ह्याशिवाय तिकडे आंग्र्या हा समुद्रावर लुटालूट करीत असे याला मोडावें असें बाळाजीच्या मनांत होतें; त्या कामांत येथें लिहिण्यासारिख्या अनेक गोष्टी घडून आल्या, आणि त्या गोष्टींत इंग्लिशांनीं फार पुढारीपणा केला.

प्र० १४ इ० स० १७४०

सकवार बाई.

मुंबई आणि गोवें ह्या दोन शहरांच्या मधला जेवढा कोंकणचा प्रदेश आहे तेवढा मराठ्यांच्या अमलांतील होय. देशावरील लोक खुषकीच्या रस्त्यानें निरनिराळ्या देशांत स्वाऱ्या करीत असत त्या प्रमाणेंच ह्या ठिकाणचे लोक नेहमीं चांचेपणा करीत असत. मन

कोंकण किनारा.

प्र० १४
इ० स०
१७५५
कान्होजी आंग्र्याचे स्वहिताचे बेत.

१६५० च्या सुमारास जेव्हां मराठे प्रथमतः उदयास येऊं लागले तेव्हां ते मोंगलांबरोबर पाण्यांतून लढत असतां त्यांचा कान्होजी आंग्र्या म्हणून एक कामदार होता त्याच्या मनांत आपण एक स्वतंत्र संस्थान स्थापावें असें येऊन त्यानें ती गोष्ट केली. त्याच्या ह्या बेतास एक गोष्ट साहाजिक अनुकूल झाली. ती अशी कीं, ह्या पश्चिमेच्या किनाऱ्याच्या आंगास समुद्रांतून निघालेले मोठाले उंच असे बहुत डोंगर आहेत ती त्याच्या संस्थानाला आयती मर्यादा झाली. सुवर्ण दुर्ग व गिरिया हे दोन बेटा दाखल किल्ले आहेत त्यांवर कान्होजी व त्याचे वंशज ह्यांनीं बहुत वर्षें अमल केला. त्यांचा तो अमल खूपच वाढत चालला होता. शेवटीं त्यांचें त्यांस वाटूं लागलें कीं आतां आपण पाहिजे त्या गोऱ्या लोकांबरोबर दोन हात करूं. आपल्या जवळच्या समुद्रावरही ते अमल दाखवूं लागले. त्या समुद्रांतून जाणारीं येणारीं गलबतें व माल वगैरे लुटून ते गबर झाले. त्या समुद्रांतून जाणें म्हटलें म्हणजे बरोबर संरक्षणासाठीं लढाईचा सरंजाम घेतल्याशिवाय होतच नसे; एरवीं तेथें लुटलें जायाचें. इ० स० १७५४ च्या फेब्रुवारींत दच लोकांचीं तीन गलबतें आलीं त्यांपैकीं एकावर पन्नास एकावर ३६ आणि एकावर १८ अशा तोफा होत्या. त्या तिहींवर हल्लाकरून त्यांतील कांहीं घेतलें व कांहीं जाळून टाकिलें असा प्रकार झाल्यावर इंग्लिशास वाटलें कीं आंग्र्याचें प्रकरण फारच माजत चाललें आहे व तें आपणासही भयंकर होईल तस्मात ह्याला मोडून टाकण्याविषयीं चांगला उद्योग केलाच पाहिजे. आणि मराठ्यांनींही ह्याकामांत स्वसंतोषानें मदत करण्याचें पतकरिलें. इ०स० १७५५ च्या मार्चांत इंग्लिशांचा कमोदोर जेम्स साहेब एका आरमारानिशीं सुवर्ण दुर्गास आंग्र्यांचे आरमार होतें तेथें आला. इंग्लिशांचें आरमार आलेंसें पाहून आंग्र्याच्या लोकांनीं आपलीं गलबतें मोकळीं करून समुद्रांत हाकारिलीं. तीं गलबतें मूळचीं हलकीं आणि तशांत त्या लोकांच्या जवळ जेवढें चिरगूट पांघरूण होतें तेवढें त्या डोलकाठ्यांस बांधून जेवढा वारा सांपडेल तेवढा साधून ते इंग्लिशांस टाकून दूर निघून गेले. इंग्लिश

त्यास इंग्लिशांनीं प्रतिबंध केला.

आंग्र्यावर स्वारी.

आपलीं तारवें माघारीं हांकून सुवर्ण दुर्गावरच आले. बेटावरील कांहीं किल्ले व समोरच्या किनाऱ्यावरील कांहीं किल्ले मिळवून एक सुवर्ण दुर्गाचें ठाणें झालें होतें. त्या किल्ल्याचे तट व बुरूज आंगचे कोरून काढिले होते व कांहीं एकांचे चौरस आठ आठ दहा दहा हात धोंडे घेऊन त्यांचे बांधिले होते. अशा प्रकारचा बंदोबस्त असतां इंग्लिशांनीं कुलपी गोळ्यांचा मारा केला तेव्हां शेजारल्या किल्ल्यांतील दारूखाना पेटून चोहोंकडे आगीचा प्रळय झाला आणि सर्व फौज व सुखवस्तु सर्व लोक घाबरून गेले आणि आपआपलीं ठाणीं व ठिकाणें सोडून देऊन पळत सुटले आणि सर्व किल्ले रिकामे झाले. मागाहून वातसन साहेब पहिल्यापेक्षां मोठें आरमार घेऊन आला तो गिरियावर गेला. कर्नल क्लैव साहेबानें जमिनीच्या आंगानें त्या शहराला वेढा घालण्याचें पतकरलें. इ० स० १७५६ च्या फेब्रुवारींत ११ व्या तारिखेस तारवें तेथें आणून नांगरलीं आणि तोफांचा भडिमार सुरू केला. आंग्र्याकडील तोफा कांहीं वेळ सुटत होत्या, पण पुढें चालेनासें होऊन लागल्याच बंद पडल्या. १३ व्या तारिखेस आंग्र्यानें शहर स्वाधीन केलें. ह्या भडिमारापासून काय होईल कोण जाणें असें मोठें भय पडलें ह्यामुळें शहर हवालीं केलें असें दिसतें. किल्लाच पाहिला असतां असा बळकट होता कीं कैक दिवस गोळे टाकिले असते तरी त्याची एक कपरी हालली नसती किल्ला ताब्यांत येतांच खजिना, तारवें, तोफा, व दुसरीं कांहीं लढाईचीं हत्यारें पाल्यारें सर्व इंग्लिशांच्या हातीं लागलीं.

प्र० १४ इ० स० १७५५

गिरियावर हल्ला.

शहर घेतलें.

इकडे मराठ्यांचें वजन चोहोंकडे वाढत चाललें होतें. अयोध्येच्या नवाबाकडून शिंदे व होळकर ह्यांस बोलावणें होऊन ते यमुना नदी उतरून गेले आणि रोहिल खंडांत शिरून तें त्यांनीं व्यापून टाकिलेंच होतें पण तितक्यांत आफ्गानिस्तानचा राजा आला त्यामुळें त्यांस माघारें फिरावें लागलें. सन १७६० व १७६१ ह्या दोन सालांत मराठ्यांनीं मोंगलांवर मोठ मोठ्या स्वाऱ्या केल्या होत्या आणि त्यांपासून मोंगलांचें तक्त आपणास मिळेल व सर्व हिंदुस्थानभर आपला अमल होईल असें मराठ्यांस दिसत हो-

मराठ्यांची सत्ता.

इ० स० १७६०

तें. तथापि अहंमद अबदुल्ला ह्यासं मराठ्यांनीं त्रास दिल्यामुळें त्यानें मोठ्या त्वेषानें यांजवरोबर लढून यांचा दोन वेळ फार पराजय केला. यांत विशेषतः सोनपत पानपतच्या लढाईंत पराजय मोठाच झाला याविषयीं, दिल्लीचीं बादशाही कसकशी मोडली हें लिहितेवेळेस, आम्ही सांगितलेंच आहे. त्या ठिकाणच्या पराजयाची बातमी येऊन पोहोंचली ते दिवशीं सारा महाराष्ट्रदेश रडत होता. बाळाजी बाजीराव ह्यांची प्रकृति पूर्वीपासूनच कांहीं दिवस क्षीण होत आली होती. आणि तशांत ह्या पराजयाबद्दल यांस अत्यंत खेद होऊन ते सन १७६१ च्या जून महिन्यांत मरण पावले.

बाळाजी बाजीरावाचा मृत्यु.

माधवराव.

पेशवाईचें काम वंशपरंपरेनें मिळावें असें झालेंच होतें तेव्हां मयताचा पुत्र माधवरावबल्लाळ ह्यास पेशव्याच्या गादीवर बसवून त्याचा चुलता रघुनाथराव ऊर्फ राघोबा दादा ह्यांनीं राज्यकारभार पहावा असें ठरलें. राघोबा दादा मोठा शूर व युद्धकुशल अशी त्याची मोठी कीर्ति पूर्वीच झाली होती. ह्या व्यवस्थेस चार वर्षें झालीं नाहींत तोंच माधवराव ह्यानें मोठ्या हुशारीनें व शहाणपणानें आपल्या एवढ्या अधिकाराचें कामकाज सर्व स्वतः संभाळिलें. सन १७६४ व ६५ ह्या दोन सालांत त्यानें हैदरअल्लीवर मोठी स्वारी केली; तींत त्यास जय मिळाल्यामुळें त्याच्या शहाणपणाची मोठी कीर्ति झाली, आणि फौजफांटा जमविणें व त्यांचा उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेवणें ह्या कामांत त्याची मोठी दक्षता सर्वांस दिसून आली. माधवराव बल्लाळ ह्यानें त्र्यंबकराव मामाला सरदारी देऊन हैदरअल्लीवर दुसऱ्यांदा पाठविलें होतें, हें आम्हीं म्हैसूरच्या इतिहासांत लिहिलेंच आहे. शेवटीं आपल्या कारकिर्दीच्या अखेरीस बादशाहाच्या अमलांतील प्रदेशांतच आपलें वर्चस्व स्थापण्याविषयीं माधवराव बल्लाळ ह्यानें पुन्हा उद्योग केला. शिंद्याच्या फौजेनें सर्व रोहिलखंड व्यापून टाकिलें होतें. त्यावेळेचा बादशाह शाह आलम ह्यानें आपणास मराठ्यांचा आश्रय करून घेऊन पूर्वीचा इंग्लिशांचा आश्रय होता तो सोडून दिला. बहुत दिवसांपासून बादशाह म्हटला म्हणजे त्याचा सर्व हिंदुस्थानावर अमल असाव-

त्याची दक्षता.

याचा. पुढें तो अमल कमी होत होत शाह आमल ह्याच्या कारकिर्दीस फारच थोडा शिलक राहिला होता, तोही शाह आलम ह्यानें इंग्लिशांस दूर करून मराठ्यांस जवळ केल्यामुळें मराठ्यांस घेण्यास अर्थात साहजिक सापडला. प्र० १४ इ० स० १७७२

राज्यकारभारांत सुधारणा.

माधवराव बल्लाळ ह्यानें राज्यांतील सर्व खात्यांमध्यें थोडीबहुत सुधारणा केली. त्यांत विशेषतः नगदी मुलकीच्या व दिवाणीच्या कामांत केली. इकडील सर्व राज्यांमध्यें लांचाची वहिवाट अतिशय पडून गेली होती, सबब ती मोडणें त्याच्यानें झालें नाहीं. त्यानें शेतकीला मदत फार केली आणि ह्यामुळेंच त्यावेळेस महाराष्ट्र देशांतील शेतकी हिंदुस्थनांतील कोणत्याही शेतकीशीं लावून पाहिली असतां महाराष्ट्र देशांतील चांगली होती. आतां महाराष्ट्र देशांतील जमिनीचा मगदूर कमी हें मात्र मनांत आणून विचार केला पाहिजे. मराठ्यांचा वसूल दहा कोट रुपये होता असें ग्रांतदफ साहेबाचें लिहिणें आहे. परंतु खजिन्यांत सुमारें सात कोटीपेक्षां अधिक वसूल आला नाहीं. फौज पाहिली असतां माधवरावाच्या पदरीं पन्नास हजार स्वार व शिंदे, होळकर व दुसरे सरदार ह्या सर्वांची पन्नास हजार मिळून एकंदर एक लाख होती. ही फौज लढाईवर जाऊं लागली म्हणजे तिजबरोबर पुष्कळ पायदळ जात असे त्या पायदळाची लढाईच्या कामांत माहिती म्हटली म्हणजे हमाल वगैरे इतर चाकर लोक असतात त्याप्रमाणेंच असे. ह्यांखेरीज स्वारीबरोबर पेंढारी लोक असत, ते लुटीच्या कामांत परम निपुण आणि त्यांचा तेवढाच कायतो उपयोग.

त्याची फौज.

नारायण राव.

माधवरावच्या पोटीं संतान न होतां तो सन १७७२ त मरण पावला. तेव्हां त्याचा धाकटा भाऊ नारायणराव गादीवर बसला. त्यावेळेस त्याचें वय सतरा वर्षांचें होतें. तो गादीवर आल्यावर त्याला मोठी अडचण झाली ती अशी कीं, पेशव्यांनीं मागें साताऱ्चें संस्थान मोडून आपलेंच उभारलें होतें, पण ह्यावेळेस तेंही असें मोडूं लागलें होतें. म्हणजे असें कीं नारायण रावाचा चुलता राघोबा दादा ह्याच्यानें आपला पुतण्या इतका लहान असतां त्यास गादी मिळाली आणि आपणास आतां त्याच्या हाताखालीं वागाव-

ग्र० १४ इ० स० १७७२

याचें हें पाहवेना. याशिवाय पेशव्यांच्या दोन दोन तीन तीन कारकिर्दीपाहून सर्व राष्ट्राची ज्यास पुरी माहिती झाली होती असे पेशव्यांच्या पदरचे नानाफडनविसा सारिखे कारभारी होते ते आपल्या हातीं सर्व असावें म्हणून भांडूं लागले होते. असा प्रकार चालला असतां मध्येंच कांहीं वेळपर्यंत बाह्यात्कारें सर्व स्तब्ध होऊन पुन्हा एकदम गडबड झाली. सन १७७२ त आगस्त महिन्याचे ३० वे तारिखेस आपल्या फौजेच्या लोकांमध्यें विलक्षण हालचाल दृष्टीस पडल्यामुळें नारायणरावानें आपल्या एका कारभाऱ्यास खूप सावधगिरी ठेवण्यास सांगितलें पण तिकडे कारभाऱ्यानें लक्ष दिलें नाहीं. दोनप्रहरीं नारायणराव खोलींत निजावयास गेला तों एका चोर वाटेनें कांहीं शिपाई लोक सरकार वाड्यांत घुसले त्यांनीं प्रथमतः असा रंग दाखविला कीं आमच्या रोजमुऱ्याची बाकी थकली आहे ती मिळविण्याविषयीं आम्ही बहुत दिवस झटत आहों तीं आम्हांस मिळाली नाहीं; तर ती मागण्यासाठीं आम्ही आलों आहों. पण मग असें दिसलें कीं त्यांच्या मनांत कांहीं काळेंबेरें आहे. नारायणराव झोपेंतून उठला होता तसाच राघोबा दादाच्या खोलींत पळत गेला आणि त्याच्या गळ्याला मिठी मारून म्हणाला आपण मला वांचवा. राघोबा दादानें प्रथम त्यास पोटाशीं धरिलें; पण त्या मारेकऱ्यांचा मुख्य सुमरसिंग ह्यानांबाचा होता; तो राघोबा दादास म्हणालां, आपल्या हातानें आपला नाश करून घ्यावा इतका शहाणा मी झालों नाहीं, तुम्ही त्यास सोडून द्या नाहीं तर त्याबरोबर तुम्हांसही मारावें लागेल. हें ऐकतांच राघोबा दादानें नारायणरावास झटकन दूर लोटिलें तेव्हां नारायणरावाचा एक मोठा विश्वासुक चाकर होता त्यानें नारायणरावास आपल्या पोटाशीं धरिलें. मारेकऱ्यांनीं एकदम वार करून त्या उभयतांस तत्काल ठार मारिलें.

त्याचें दुर्दैव.

राघोबा.

हा वध करण्याची मसलत राघोबा दादाची असावी असें सर्व लोकांच्या मनांत आलें. कांहीं दिवसपर्यंत राघोबा दादानेंच हें कृत्य केलें ह्याविषयीं पुरावा सांपडला नाहीं. नंतर रामशास्त्री म्हणून सरकारचा दानाध्यक्ष होता तो मोठा प्रतिष्ठित व न्यायी होता त्यानें अनेक प्रमाणें ज-

त्याचा अपराध.

मवून त्यावरून तो दोष राघोबा दादाच्या पदरांत घातला. तेव्हां तोही कबूल झाला कीं नारायणरावास धरण्याच्या हुकुमावर म्यां सही केली आहे; परंतु त्यास मारण्याबद्दलचें मला कांहीं माहीत नाहीं. मोठेमोठे मुत्सद्दी वगैरे लोक राघोबा दादाचें म्हणणें प्रमाण आहे आणि राघोबा दादाच्या पत्रांत "धरावें" असें असातां "मारावें" असें कोणी दुष्टपणानें केलें असें म्हणतात. आणि ह्यापत्रांत धचा मा केलेला दिसत होता असें लोकांचें म्हणणें आहे. सर्व लोकांचें मत पाहिलें असतां पुन्हा असें आहे कीं मारण्याविषयीं राघोबा दादाचें संमत होतें. असो, राघोबा दादानें गादी मिळविण्याचा रस्ता खुला केल्याप्रमाणें त्यास गादी मिळाली. तिकडे हैदरअल्ली हा पूर्वीच्या लढाईंत मराठ्यांनीं कांहीं मुलूख घेतला होता तो परत घेण्याचा यत्न करीत होता सबब राघोबादादा त्याजवर स्वारी करण्यासाठीं गेला. राघोबा दादा विद्यमान नाहीं, लोकांच्या मनांत त्याविषयीं राग आहेच, व आपल्या हातांत सर्व अमल येण्याला ही संधी चांगली आहे असें पाहून कारभारी लोक एक होऊन त्यांनीं ठरविलें कीं मयत पेशव्याची बायको गंगाबाई ही गरोदर आहे त्यापक्षीं तिला जो पुत्र होईल तो पेशावा करावा. व प्रस्तूत त्याच्या नांवानें राज्य चालवावें. नंतर गंगाबाईस पुरंदरच्या किल्ल्यावर नेऊन ठेविलें आणि तिच्या इतकेच दिवस ज्या ब्राह्मणांच्या गर्भार बायकांस झाले होते त्यांस त्या किल्ल्यावर नेऊन ठेविलें, असें म्हणतात कीं असें करण्याचें कारण इतकेंच कीं गंगाबाईस कदाचित् कन्या झाली तर दुसरीस पुत्र होईल तो गंगाबाईस देऊन तिला कन्या द्यावी. राघोबा दादा हैदरावर गेला होता तिकडे त्याची फते झाली. पण पुणें मुकामीं आपणावर मोठें संकट आलें आहे असें समजल्यावरून त्यानें हैदराबरोबर लागलाच तह केला, निजामास पुष्कळ पैसा व प्रांत देऊन त्याच्याशीं सख्य केलें; आणि तो जलदीनें पुण्याकडे निघून आला. पुण्यांतील कारभारी मंडळीनें आपणापेक्षां त्रिंबकराव मामा युद्धाच्या कामांत फार हुशार आहे असें पाहून त्याची रवानगी राघोबा दादावर केली. त्रिंबकराव मामा मोठ्या भरंवशानें गेला होता कीं आपण राघोबा दादाचा प-

प्र० १४ इ० स० १७७२

हैदरावर स्वारी.

त्यास गादीवरून काढण्याचा बेत.

इ० स० १७७२

राभव करूं व तेणेंकरून आपली कीर्त्ति मोठी होईल. पण तसें न होतां त्याचा अगदीं पराजय झाला. राघोबा दादाची फौज त्रिंबकराव मामाच्या फौजे इतकी नव्हती तथापि त्यानें तिजपैकीं दहा हजार लोक निवडले आणि त्यांच्या पुढें होऊन त्यानें स्वतः तोफा सोडिल्या आणि एका घटकेंत त्रिंबकराव मामाची फौज उधळून दिली, आणि त्रिंबकराव मामा अगदीं घायाळ होऊन राघोबा दादाच्या हातीं सांपडला. ही बातमी पुण्यास येतांच जिकडे तिकडे अगदीं घोंटाळा होऊन सर्व भयभीत झाले. सबब राघोबा दादा जर त्याच वेळेस पुण्यास आला असता तर बहुधा अडचण न पडतां त्याचा पूर्वीचा अमल त्यास मिळाला असता. पण तसें न करितां नर्मदेच्या आसपास शिंदा व होळकर हे छावणी देऊन राहिले होते ते आपणास मिळून मदत करतील अशा आशेनें उत्तरेकडे गेला. असें केल्यामुळें त्यानें आपल्या हातची चांगली संधी घालविली. हिकडे पुण्यांतील मंडळींनें पन्नास हजार फौज जमविली. निजामास कांहीं देऊं करून व दुसरी कांहीं कारस्थानें करून त्याला सांगितलें कीं, तुम्ही राघोबा दादाबरोबर केलेला तह मोडून आम्हांस मदत करावी. पुढें दैववशात् गंगाबाईस पुत्रच झाला. तथापि विरुद्ध पक्षाचे लोक होते ते म्हणाले कीं हें कपट केलें आहे. परंतु आतां सर्व असें मानितात कीं तो नारायणरावाचाच पुत्र खरा. तो मुलगा चाळीस दिवसांचा झाल्यावर त्यास चालीप्रमाणें पेशव्याच्या गादीवर बसविलें.

प्र० १४

त्याचा जय.

त्यानें चुकून भलताच माग धरला.

राघोबादादा उत्तरेकडे चालता झाला तेव्हां त्याची स्वतःची फौज कंटाळून हजारों लोक त्याला सोडून गेले. आणि नर्मदा उतरून पलीकडे गेल्यावर तो पाहतो तों जवळ सारे सात हजार स्वार उरले. इंदूर मुकामीं त्याची आणि शिंदा व होळकर ह्यांची भेट झाली. त्यांनीं त्याचें आगत स्वागत फार चांगलें करून आम्ही मदत करूं व तुम्हांस नवी फौज भरणें ती आमच्या प्रांतांत भरावी, आमच्याकडून कांहीं हरकत नाहीं असें सांगितलें. नंतर इंग्लिश सरकारानें आपणास मदत करावी असें बोलणें मुंबईस लाविलें होतें तें पुरें करावें अशा हेतूनें इंग्लिशांची भेट घेण्याकरितां राघोबादादा परत आला.

त्याच्या फौजेनें त्याला सोडिलें.

आपल्या मुंबईच्या ठाण्यास बळकटी यावी ह्यासाठीं वसई बंदर, साष्टी, व जवळ जवळचीं लहान सान कितीं एक बेटें आपल्या ताब्यांत घ्यावीं असा कंपनीचा हेतु ह्यावेळेस फार होता. इंग्लिशांस पुणें मुक्कामीं आपला एक वकील ठेवण्याची पेशव्यांकडून परवानगी मिळाली होती. तेथें जो वकील ठेवावयाचा त्यास इंग्लिशांचें सांगणें असें कीं वर सांगितलेलीं ठिकाणें आपणांस मिळण्याचा प्रसंग केव्हां येईल हें सतत पाहत असावें. आम्हांस पेशव्याचें पद पुन्हा प्राप्त होण्याविषयीं तुम्हीं मदत करावी असें राघोबादादाकडून मुंबई सरकाराकडे बोलणें आलें. तेव्हां त्यांनीं निश्चय केला कीं राघोबा दादास मदत देऊन त्यापासून आपलें कार्य साधावें. नेतीव संस्थानी लोकांच्या तंड्यांत हात घालूं नये असा कोर्ट आफ् दैरेक्तरांचा अभिप्राय होता व त्या अन्वयें त्यांचे हुकूमही आले होते. तशांत पुन्हा, राघोबाचा वारसा नसतां नारायणराव ह्याचा वध करून त्याची गादी आपणास मिळविण्याविषयीं तो मदत मागत होता. ती मदत आपलें कार्य साधण्याकरितां करावयाची ह्यांत इंग्लिशांस भूषण नव्हतें. परंतु मुंबई सरकारानें ह्या गोष्टीकडे लक्षच दिलें नाहीं. आतां ह्या सरकारचा पक्ष घेणारे म्हणतात कीं शेवटल्या गोष्टीविषयीं त्या सरकारास माहिती अगदींच थोडी होती, त्यांची खात्री होती कीं नारायण रावाच्या वधांबद्दल राघोबादादाकडे कांहीं नाहीं. व सवाईमाधवराव हा नारायण रावाचा औरस पुत्र नव्हे. असो इंग्लिशांनीं मदत करण्याबद्दल मोठमोठ्या गोष्टी मागितल्या व विशेषतः वसई व साष्टी हीं दोन ठाणीं मागितलीं. हें ऐकतांच राघोबादादास मोठा अचंबा वाटला. पण शिंदे व होळकर ह्यांजवर त्याचा मुख्य भरंवसा होता, आणि कारभारी मंडळीनें तर त्यांस आपणाकडे वळवून घेतलें, तेव्हां इंग्लिश जें जें मागतील तें तें देणें प्राप्त आहे असें राघोबादादास वाटलें. इतक्यांत इंग्लिश साष्टी व तिजभोंवतालचा प्रदेश आपल्या ताब्यांत घेऊन बसले. त्यांनीं राघोबादादापाशीं द्रव्य पुष्कळ मागितलें होतें त्याविषयीं माझ्या हातून भरणा व्हावयाचा नाहीं असें कबूल करणें त्यास प्राप्त प-

प्र० १४ इ० स० १७७७ कंपनीचे विचार.

नेहमिच्या वहिवाटीमुळें त्यांचा हयगइं.

प्र० १८ इ० स० १७०७

डलें. आणि त्याच्या सर्व गोष्टींचा विचार करितां त्याचें म्हणणें रास्त दिसत होतें. तथापि त्यानें सहा लक्षाचें जवाहीर इंग्लिशांच्या पदरीं घातलें आणि ह्याखेरीज कांहीं प्रांत तोडून घेऊन तुम्ही आपल्या ऐवजाची फेड करून घ्यावी असें इंग्लिशांशीं ठरविलें.

इंग्लिशांची फौज खंबायतेस उतरली.

ह्या कराराअन्वयें तयारी करण्यासाठीं कर्नल किटिंग साहेब अडीच हजार लोक जमवून तेवढ्यांनिशीं खंबायतेस येऊन उतरला. तो तेथून निघाल्यानंतर त्यास वीस हजार लोकांनिशीं राघोबादादा येऊन मिळाला. त्याचे लोक दिसण्यांत मोठे लढाऊ होते परंतु शिकाऊ [illegible]रोवर युद्ध करण्याविषयीं त्यांचा तादृश उपयोग पडेल असें नव्हतें. आपणच पुण्यावर जाऊन एकदम लढाई सुरू करावी असें राघोबादादाच्या मनांत नव्हतें, सबब तो अमळ लांबणीवर टाकीत होता; पण पुण्यावर चाल करून गेले असतांच कायतें निश्चयात्मक कळेल एरव्हीं दुसरा रस्ता नाहीं त्यापक्षीं जावें हेंच प्रशस्त असा इंग्लिशांचा फार आग्रह पडला. तेव्हां ते निघून अरासपर्यंत आले. तों तेथें मराठ्यांची फौज पुष्कळ होती व तींत स्वार बहुत होते त्या फौजेनें त्यांजवर हल्ला केला तो असा कीं ती कैक वेळ त्यांजवर निकरानें चालून गेली आणि ती लढाईही बहुत वेळपर्यंत चालली होती.

मराठ्यांच्या फौजेचा पराजय.

तींत एकदां एका पक्षाचा जय होतोसें वाटावें, एकदां दुसऱ्या पक्षाचा जय होतोसें वाटावें, असें चाललें होतें. तथापि शेवटीं मराठ्यांस इंग्लिशांनीं अगदीं मागें हटविलें. किटिंग साहेबाचे लोक मुळीं थोडेच होते तेवढ्यां पैकींही दोनशें अकरा शिपाई व अकरा सरदार मिळून दोनशें बेवीस असामी पडले, हें मोठेंच नुकसान झालें. सबब त्याच वेळेस पुण्यावर जाण्याचा बेत महकूब करून पावसाळा संपून आपणास दुसरी कुमक येऊन पोहोंचेपर्यंत वाट पहावी असें किटिंग ह्यानें ठरविलें. अरास मुकामीं ब्रिटिशांचा थोडासा जय झाला होता तेवढ्यावरून मराठे लोकांस असें वाटलें कीं राघोबा दादा व ब्रिटिश ह्यांचा चढ होईल. कांहीं रभान्यांचे पक्षाचे लोक कांहीं राघोबा दादाच्या पक्षास मिळाले व

निजामही पुण्याकडे राहण्यास मागें पुढें पाहूं लागला ह्या सर्व गोष्टींवरून पाहतां पुढील मोहीम सुरू झाली म्हणजे इंग्लिशांस खास यश येतें, असें दिसत होतें. इतक्यांत कांहीं चमत्कारिक गोष्टी घडून येऊन तो सर्व रंग अगदीं बदलला. प्र० १४ इ० स० १७७७

कंपनी सरकारानें आज पावेतों बंगाल, मद्रास, व मुंबई हे तीन इलाखे स्वतंत्र ठेविले होते म्हणजे बंगाल्याचें वर्चस्व सर्वांवर नव्हतें पण अशा व्यवस्थेपासून कंपनीस फार गैरसोय झाली सबब तिच्या मनांत तिहींपैकीं एक इलाखा मुख्य करावा व त्याचें वर्चस्व दुसऱ्या दोहोंवर असावें. त्याप्रमाणें तिनें कलकत्त्याचा गवर्नर जनरल व तेथील कौन्सिल ह्यांस दुसऱ्या दोन इलाख्यांवर अमल ठेवण्याचा अधिकार दिला. तथापि मुंबई व मद्रास ह्या दोन्ही ठिकाणच्या अधिकाऱ्यांचें संमत नसल्यामुळें ते कलकत्त्यास तादृश विचारीत नसत. विशेषतां मुंबई सरकारानें मराठ्यांविषयीं ज्या मसलती चालविल्या होत्या त्यांविषयीं कलकत्ता सरकारास बिलकुल विचारिलें नाहीं. पुढें कलकत्ता सरकारास ह्या गोष्टी कळल्यानंतर त्यांनीं मुंबई सरकारावर मोठा ठपका ठेविला, कीं तुम्ही करीत आहां हा केवळ अन्याय आहे व दुसरें असें कीं कंपनीचें जें आजपर्यंत वारंवार लिहून आलें कीं हिंदुस्थानांतील संस्थान्यांच्या घरगुती तंट्यांत हात घालूं नये त्याच्या विरुद्ध तुम्हीं हें काम केलें. बंगाल सरकारानें असें केल्याबद्दल मोठमोठाले इंग्लिश लोक त्यास दोष ठेवितात. परंतु आम्हांस त्याविषयीं कांहीं चांगलें कारण दिसत नाहीं. इतकेंच कीं मुंबई सरकारास ह्या कामांत अगदीं मागें पाडून कर्नल अप्टन ह्यास खुद्द बंगाल्याहून मराठ्यांवरोवर नवीन तह करण्यास कलकत्ता सरकारानें पाठविलें हें मात्र रास्त आहे अगर करूं ह्या गोष्टीचा मात्र विचार आहे. ह्या तजविजीपासून वास्तविक परिणाम असा झाला कीं मुंबई सरकारचें वजन अगदीं कमी होऊन नेटीव लोक त्यास फारच कमी मानूं लागले. एखादी समेटाची किंवा सलग्याची गोष्ट नेटीव संस्थानी लोकांजवळ निघाली म्हणजे ह्यांच्या आंगीं सामर्थ्य नाहीं सबब हे समेटाच्या तजविजी योजिताहेत असा त्यांचा विनोद करून पूर्वापेक्षां जाजती

इंग्लिशांच्या राज्याची व्यवस्था बदलली.

गवरनर जनरल व कौन्सिल.

एकमेकांच्या विरुद्ध वर्तणूक.

म० १४ इ० स० १७७८

फुगत. नानाफडनवीस म्हणून पुण्याच्या दरबारांत एक अधिकारी होता तोच काय तो ह्यावेळेस मुख्य होता, तो इंग्लिशांचें धोरण पाहतांच फुगून गेला. वसई व साष्टी हीं दोन ठाणीं आम्हांस द्यावीं असें इंग्लिश सदोदित मागतच होते. तेव्हां नानाफडनवीस रास्तपणें म्हणाला कीं वसई व साष्टी हीं दोन ठाणीं ज्या कारणांवरून आम्ही मागतों तीं कारणें अप्रयोजक आहेत असें स्वतः कबूल करूनही ते अद्यापि तीं ठाणीं मागतच आहेत. सारांश ह्या तहाच्या कामांत इंग्लिशांचा पक्ष अगदींच कमी पडला. आणि कर्नल अप्तन साहेबानें कलकत्ता व मुंबई ह्या दोनही सरकारांस लिहून पाठविलें कीं हजार वांड्यांनीं मराठ्यांबरोबर तह केला असतां फार चालणार नाहीं. पुढें नानाफडनविसाच्या लक्षांत एकाएकीं आलें कीं लढाई पुन्हा सुरू करण्याचा इंग्लिशांचा बेत खचीत आहे व ते तह करण्यास प्रवृत्त झाले होते ते भीतीमुळें झाले होते असें नाहीं. तेव्हां इंग्लिशांचें जें जें म्हणणें होतें तें तें सर्व त्यानें मान्य केलें. पुरंदर मुकामीं उभयतांचा तह झाला.

पुरंदरचा तह.

त्यांत इंग्लिशांनीं जीं ठाणीं मागितलीं तीं सर्व त्यांस प्राप्त झालीं आणि त्यांजकडून राघोबा दादाचा सर्व फौजफाटा एका महिन्यांत कमी करून आम्ही त्यास जी कांहीं मदत केली असेल ती सर्व रद्द करूं असें कबूल करविलें.

तंट्याचीं नवीन कारणें.

अशा प्रकारें गोडीगुलाबीनेंच हा तंटा मिटला. इतक्यांत दुसरा चमत्कारिकच प्रकार घडून आला. तो असा कीं मुंबई सरकारानें राघोबाबरोबर केलेल्या ठरावाचें वर्त्तमान विलायतेंत कोर्त आफ् दैरेक्तरस् ह्यांस समजाविल्यानंतर त्यांनीं मुंबई सरकारची व्यवस्था मोज्या खुषीनें मान्य केली. आपला नेहमींचा मुख्य उद्देश काय आहे हिकडे तादृश नजर न देतां त्यांनीं प्रस्तुत ह्या गोष्टीपासून आपणास फायदा होईल अशा विचारानें त्यांनां तें मान्य केलें. इकडे पुरंदर मुकामीं तह झाला मात्र आणि लागलाच कोर्त आफ् दैरेक्तरांकडून मान्य केल्याचा हुकूम आला. तेव्हां एवढा झालेला तह एकदम मोडितां कसा येतो? परंतु बंगाल सरकारानें मुंबई सरकारच्या ज्या गोष्टी नापसंद केल्या हो-

मुंबईच्या कौन्सलदारांचें काम.

त्या त्याच विलायतेंत मान्य. झाल्यामुळें बंगाल सरकारची नाचक्की आणि मुंबई सरकारास पराकाष्ठेचा आनंद झाला. आणि पुण्याच्या गादीशीं तंटा करण्याचें निमित्त शोधूं लागले. राघोबास जी मदत दिली होती ती सर्व माघारी घेऊं म्हणून इंग्लिशांची कबुलायत केली असून तिजप्रमाणें त्यांनीं कांहीं केलें नाहीं. राघोबादादास पुन्हा गादी मिळण्याविषयीं इंग्लिशांनीं आंतून खटपट चालविली होती व तिजपासून त्यांस कांहीं लाभही झाला. परंतु नानाफडनवीस अत्यंत शहाणा पडला त्यामुळें त्यांची ती शेवटास गेली नाहीं. नानाफडनवीस ह्यानें सेंट लुबीन म्हणून एक फ्रेंच गृहस्थ पुण्यास आला होता त्याशीं सख्य केलें. यूरोपांतून आमची बहुत फौज इकडे यावयाची आहे अशी आशा ह्या गृहस्थानें नानास लाविली असावी असें वाटतें. ह्या गोष्टीवरून इंग्लिशांनीं असें ठरविलें कीं नानाफडनविसानें इंग्रज सरकारा बरोबर शत्रुत्व दाखविलें. आणि मुंबईचा गवर्नर हार्नबी साहेब ह्यानें मराठ्यांच्या वर्तणुकीबद्दल आपला अभिप्राय लिहिला त्यांत असें साफ लिहिलें होतें कीं मराठ्यांनीं युद्धाची तयारी करण्याकरितां खूपच कारस्थानें चालविलीं आहेत. ह्यामुळें इंग्लिशांसही एखादी चांगली तजवीज करणें भाग पडेल; नाहीं तर पश्चिम हिंदुस्थानांतील आपल्या ठाण्यांचा बंदोबस्त चांगला होईल ही आशा तरी निखालस सोडून द्यावी लागेल. मुंबई सरकारास दोष देण्याविषयीं हेस्तिंगस साहेबाचें मत होतेंच. तथापि हार्नबी साहेबाचें लिहून गेल्यावर त्यास वाटूं लागलें कीं पुरंदर मुक्कामीं जो तह झाला त्यांत जीं कलमें ठरावून घेतलीं त्यांपेक्षां विशेष नफ्याचीं कलमें आपणास ठरवून घेतां आलीं असतीं. मराठ्यांच्या राज्यांतील बखेडे मोडून टाकण्यास तुम्हीं मदत करावी असें हेस्तिंगस् साहेबानें मुंबई सरकारास लिहिलें आणि स्वतः कर्नल लेस्ली साहेबाची पुष्कळ फौजेसुद्धां बंगाल्याहून मुंबईकडे रवानगी केली.

ग्र० १४ इ० स० १७७९

लढाई करण्याचें अगत्य निष्कारण दाखविलें.

आपलें लिहिणें मान्य झालेंसें पाहून मुंबई सरकारास फारच आनंद झाला आणि विचार न करितां अपणाजवळ जेवढी फौज होती तेवढीच घेऊन पुण्यावर स्वारी करावी असें ठरविलें. असें

कामाविषयीं उतावळी.

इ० स० १७८९

करण्याचा हेतु इतकाच कीं लेस्ली साहेबाची फौज आल्यानंतर तिला कांहीं यशाचा वांटा जाईल तो जाऊं नये आपली फौज एकत्र जमेपर्यंत स्वारीला अवकाश करावा असें ड्रेपर साहेबानें कौन्सिलास सांगितलें पण त्याचें कोणी ऐकिलें नाहीं. ह्यावेळेस कौन्सिलांत मुख्य कार्नाक साहेब होता त्यानें मोहीम लागलीच सुरू करण्याचें ठरविलें. नंतर फौजेचें काम पाहणाऱ्या कमेटीचा मुख्य सर्वांनीं त्यासच नेमिलें. सेनापतीचें काम वर्गा वर्गानें कर्नेल इगर्तन साहेब ह्यास मिळालें. पण त्या साहेबाची प्रकृति फार अशक्त झाली होती व त्यानें लष्करीं काम जर्मन देशांत केलें होतें ह्यामुळें तो हिंदुस्थनांतिल युद्धाच्या कामांत अगदीं नवखा होता. अशा सर्व गोष्टी असतांही इंग्लिशांचे ३९०० लोक पनवेलीस येऊन उतरले. त्यांपैकीं ६०० गोरे व बाकीचे काळे होते. नंतर ते सर्व तेथून पुण्यावर हल्ला करण्याकारितां निघाले. ह्या प्रांतांत फौजेचे सामानाचें वगैरे काय ओझें असेल तें बैलावरून न्यावयाचें; सबब तिचें जाणें लौकर होत नाहीं हें तर खरेंच; परंतु ह्यावेळेस जसा उशीर लागला तसा पूर्वीं कधींच लागला नव्हता. अकरा दिवसांत चार कोस जमीन चालले. आणखी एक आठवडा म्हणजे सन १७७९ च्या जानेवारीच्या ९ व्या तारिखेस ते तळेगांवास येऊन पोहोंचले आणि तेथें पाहतात तों पन्नास हजार लोकांचा तळ पुढेंच येऊन पडला होता. ते लोक इंग्लिशांशीं आपल्या रीतीप्रमाणें चकमकीवर आले. त्यांनीं इंग्लिशांवर मोठासा हल्ला केला नाहीं. व पूर्वी लक्षांत आलें नसून त्याच वेळीं कांहीं विलक्षण अरिष्ट इंग्लिशांवर येऊन पडलें असेंही झालें नाहीं. तथापि कार्नाक साहेब व कर्नल कार्कबर्न साहेब ह्या दोघांनीं तत्काल माघारा मुंबईस जाण्याचा निश्चय केला. असें करूं नये म्हणून त्यांस दुसऱ्यांनीं पुष्कळ आग्रह केला पण त्यांनीं ऐकिलें नाहीं. सेनेचें काम इगर्तन साहेबाचें होतें पण तो अजारी पडला ह्यामुळें हे दोघे त्याच्या कामावर झाले होते. मराठ्यांची एवढी सेना पसरलेली; तिजमध्यें घोडेस्वारही पुष्कळच होते सबब अशा प्रसंगास जोरानें तिच्या आंगावर चालून

कामाची साबकाशी.

परत येण्याचा बेडेपणाचा विचार.

गेले असतां एवढें कठीण पडावयाचें नाहीं पण पळ काढावयाचा म्हणजे जिवावरचेंच काम होतें. इंग्लिशांनीं पाय माघारा काढला न काढला इतक्यांत मराठ्यांची सर्व फौज एकदम त्यांच्या पिछाडीवर जाऊन पडली. दैववशांत त्या ठिकाणीं क्याप्तन हार्तली साहेब होता. तो कामगार मोठा हुशार होता. मराठ्यांनीं कैकवेळा मोठ्या सपाट्यानें हल्ला केला; पण तो मोठ्या दमदारीनें सर्व सोसून तेथेंच उभा राहिला. सरते शेवटीं इंग्लिशांच्या फौजेवर हल्ला करण्याचें अवसान मराठ्यांच्या फौजेंत राहिलें नाहीं. इंग्लिशांचे लोक सुमारें तीनशें पडले त्यांपैकीं गोरे ५० होते बाकीचे काळे होते.

प्र० १४ इ० स० १७८९

क्याप्तन हार्तली ह्याचें शुरत्वाचें वर्तन.

हा प्रसंग झाल्यानंतर इंग्लिश अधिकाऱ्यांस वाटलें कीं आतां सुरक्षितपणें माघारां जाणेंही होत नाहीं त्यापक्षीं तहाचें बोलणें लावावें. दुसरा उपाय राहिला नाहीं. ह्यावेळेस तहाची गोष्ट काढणें म्हणजे ह्या तहांत तुम्हीं पाहिजे तें मागून घ्या आणि आम्हास मुंबईस परत जाऊं द्या, असें शत्रूस म्हणण्याप्रमाणेंच होतें. तुम्ही हें अप्रतिष्ठेचें काम करूं नका असें म्हणून हार्तली साहेबानें मुंबईस जाण्याची युक्ति सर्वांस सांगितली, पण उपयोग काय कोणीं ऐकिली नाहीं. अशा रितीनें तह करण्याविषयीं कार्नाक साहेबानेंही पुष्कळ आडफांटे आणिले; त्यानें तादृश आग्रह मात्र धरिला नाहीं. फौजेवरील कामदारांनीं एकदां ज़रब खाऊन भित्रेपणानें जो ठराव केला तो ह्यांचा कांहीं केल्या फिरेचना. राघोबा दादाला स्वाधीन करण्यास देखील इंग्लिश अगदीं तयार झाले होते. परंतु त्यानें आंतून अशी व्यवस्था केली होती कीं आपणच शिंद्याच्या स्वाधीन व्हावें अशी तजवीज केली म्हणून तें राहिलें. इंग्लिशांनींही पुण्याच्या खटपटीबद्दल शिंदे सरकाराशीं तहाचें बोलणें केल्यामुळें कांहींसें त्यांच्या मनाप्रमाणें झालें. तथापि वडगांव मुकामीं पेशव्यांशीं जो तह झाला तो पाहिला असतां हिंदुस्थनांत ब्रितिशांच्या फौजेला अत्यंत कलंक आहे ह्यांत संशय नाहीं. तो असा कीं ज्या गोष्टींविषयीं तंटा होता त्या त्यांनीं मुळींच सोडून दिल्या. पेशव्यांचीं ठाणीं घेतलीं होतीं तीं सर्व परत द्यावीं असें ठरलें, आणि बंगा-

वडगांव येथील अपमानकारक तह.

प्र० १४ इ० स० १७८९ त्यामुळें फार राग आला.

ल्याहून जो फौज येत होती तीस पुढें न येण्याविषयीं हुकूम पाठविला. असा तह केल्यामुळें मुंबई सरकारास फार राग आला व विलायत सरकारासही फार राग आला. कार्नाक साहेब, कर्नल एगबर्तन साहेब, व कर्नल काकबर्न साहेब ह्या तिघांस बरतर्फ केलें. ह्याप्रसंगीं त्या त्रिवर्गांनीं ज्या गोष्टी केल्या त्यांविषयीं त्यांच्या पक्षाचा अनुकूल पुरावा कांहीं होईल असें बिलकुल नव्हतें. मागील प्रसंगीं अत्यंत शौर्य दाखून त्यांनीं मोठा पुढारीपणा केला होता आणि ह्याप्रसंगीं अगदीं त्याच्या उलटें केलें हा कांहीं लहान व सामान्य चमत्कार नाहीं. विशेषतः काकबर्न साहेबानें मोठमोठ्या लढाया मारून फार लौकिक मिळविला होता आणि सर्व लोक त्यास फार हुशार मानीत होते परंतु आज पावेतों दुसऱ्याच्या हाताखालीं त्यानें काम केलें होतें त्यांत त्याचा चांगलेपणा नजरेस आला होता आणि ह्यावेळेस प्रसंग मागल्यापेक्षां विशेष कठीण असून मुख्यत्वें करून त्याच्याच शिरावर पडला ह्यामुळें त्याची सर्व हुशारी अप्रयोजक झाली. असो तो तह सरकारच्या अनुमताखेरीज झाल्यामुळें मुंबई सरकारानें तत्काल रद्द केला. आणि पुण्यावर पुन्हा स्वारी करण्याकरितां बंगाल्याहून कर्नल लेस्ली साहेब फौज घेऊन केव्हां येतो अशी वाट पाहत बसले. हा साहेब फार जलदीनें येऊन दाखल होईल असें वाटलें होतें त्याप्रमाणें झालें नाहीं मार्गांत त्याला रजपूत लोकांकडून फार हरकत झाली आणि तोही ह्याबरोबर लढला त्याबरोबर लढला असें होतां होतां पांच महिन्यांत सुमारें ६० कोस मजल आला. हेस्टिंग्स साहेबानें लेस्ली साहेबास बरतर्फ करून त्याच्या कामावर गोदर्द साहेबास नेमिलें. तो साहेब वीस दिवसांत दिडशें कोस जमीन चालून सुरतेस येऊन पोहोंचला. आणि मार्गांत शत्रूंनीं बहुत अडचणी घातल्या होत्या परंतु तजविजानें आल्यामुळें त्या सर्व त्यानें सहज टाळिल्या.

तो तह रद्द केला.

कर्नल लेस्ली सावकाशीनें चालतो.

गोदर्द साहेबास पाहिजे तशा रितीनें त्यानें व्यवस्था करावी अशी बहुतेक मुखत्यारी होती. तथापि तो मुंबई सरकारच्या अनुमतानेंच सर्व गोष्टी करीत असे. त्यानें प्रथम पुण्याशीं तहाचें बोलणें चालू केलें, पण पेशव्यांनीं नुकताच जय मिळविला होता

करनल गोदर्द.

प्र० १४ इ० स० १७८०

त्यामुळें फुगून जाऊन ते मोठाल्या गोष्टी सांगूं लागले. तेव्हां तहाचें होत नाहीं असें दिसल्यावरून लढाईची सुरुवात झाली. इंग्लिश मागें राघोबादादास मदत होऊन लढत होते तें आतां गेलें आणि स्वतः करितां लढूं लागले. इ० स० १७८० त जानेवारीच्या पहिल्या तारिखेस जनरल गोदर्द साहेबानें तापी नदी उतरून जाऊन महिना अखेर होण्यापूर्वी दुभई शहर खालसा करून घेतलें व अहमदाबादेवर हल्ला करून तें घेतलें. अहमदाबादही गुजराथेंतील जुनी मोठी राजधानी होती; परंतु आलिकडेस मात्र मोडकळीस आलेली होती. नंतर त्यास असें वर्त्तमान कळलें कीं शिंदा व होळकर हे दोन असामी सुमारें वीस हजार घोडेस्वारांनिशीं नर्मदा उतरले आणि आतां आपल्या आंगावर येत आहेत. इंग्रज सरकाराशीं स्नेह ठेवावयाचा असा हेतु दाखवून त्यांनीं गोदर्द साहेब ह्याबरोबर तहाचें बोलणें लाविलें. पण हा सगळा डाव फुरसत मिळण्यासाठीं आहे. असें दृष्टीस पडल्यामुळें गोदर्द साहेबानें बेत केला कीं जमल्यास शिंद्याशीं एकदां चांगला प्रसंग करावा. आणि त्याप्रमाणें रात्रीं शिंद्याच्या छावणीवर हल्ला करून एकाएकीं बाहेरचीं कांहीं ठाणीं घेतलीं. पण इतक्यांत उजाडून फौजेला घोड्यावर बसून लढाईस उभें राहण्याविषयीं अवकाश सांपडला. इंग्लिशांवर एकदम जाऊन पडण्याच्या इराद्यानें ती फौज निघाली होती परंतु इंग्लिशांनीं तोफांचा भडिमार चालविला होता त्यामुळें पळ काढून ती अगदीं दिसेनाशी झाली. नंतर गोदर्द साहेबास वाटलें होतें कीं आपण खचित जय मिळविला. पण कांहींशा अंतरावर जाऊन शिंदा पुन्हा नवी छावणी घालून उमेदीनें राहिला आहे असें कानीं पडतांच त्याला मोठें आश्चर्य झालें. तेथेंही त्याबरोबर लढाई मारण्याकरितां गोदर्द साहेब गेला. परंतु जवळ येऊन पोहोंचतांच त्याजवर दारूच्या बाणांचा एकदम मारा करून शिंद्याची फौज लागलींच दृष्टीआड झाली. अशा लढाईपासून कांहीं हशील न होतां त्रास मात्र उत्पन्न होऊं लागला. सबब पर्जन्य जाईपर्यंत नर्मदेच्या कांठीं छावणी देऊन तेथें आपली फौज घेऊन गोदर्द साहेब राहिला.

अहमदाबाद घेतली.

निरीच फौजेशीं गोठी कटून लढाई केली.

तह करण्याचा निरर्थक प्रयत्न.

म० १४ इ० स० १७८०

अक्तोबर महिन्यांत पर्जन्यकाळ संपून तापी पडूं लागल्यानंतर जनरल गोदर्द साहेबानें वसईला वेढा घातला. कर्नल हार्तली साहेबानें आपली फौज कोंकणाच्या बहुतेक भागावर पसरून देऊन तेथें दाणादुणा व पैसा उत्पन्न केला. आणि अशा प्रकारें गोदर्द साहेबाला मदत केली. ह्या मोहिमेंत इंग्लिशांची फत्ते झाली. दिसेंबराच्या ११ व्या तारिखेस वसई आपोआप स्वाधीन झाली. हिकडे मराठ्यांची सगळी फौज जमवून हार्तली साहेबावर घाला घालण्याच्या बेतांत होती, परंतु त्यानें चांगल्या ठिकाणावर छावणी देऊन सर्व फौज मागें हटविली. अशा रितीनें इंग्लिशांच्या पक्षाचा वर्चस्मा नुकताच होऊं लागला होता, इतक्यांत सरकारचा इरादा मराठ्यांबरोबर लवकर तहाचें बोलणें लावण्याचा आहे असें गोदर्द साहेबास समजलें. आणि त्याप्रमाणें त्यास हुकूमही आला कीं पुण्याकडून तहाचें बोलणें सुरू करण्याच्या मजकुराचें पत्र आल्याबरोबर लढाई वगैरे बंद करण्याविषयीं तुमची अगदीं तयारी असावी. मागील प्रकरणांत उत्तर हिंदुस्थानांतील लढायांविषयीं कांहीं गोष्टी आम्हीं लिहिल्या आहेत त्यांचा आणि सरकारच्या ह्या ठरावाचा संबंध आहे. हैदरअलीं ह्यानें निजाम व माराठे ह्यांस वश करून घेतलें आणि कर्नाटकांत मोठा गदीं उसळून देऊन तो मद्रासेंत ब्रिटिशांचें वास्तव्यच होऊं देणार नाहीं अशी दहशत घालीत होता. अशा प्रसंगीं पुष्कळ नुकसान झालें तरी करून घेऊन मराठ्यांस ह्या भयंकर कटांतून फोडण्याची तजवीज करावी असा इरादा सरकारानें धरिला. मराठ्यांकडून तहाचा निकाल जलदी होईना, तशांत कर्नल वाली साहेबाच्या टोळीची दशा उडाल्याचें वर्त्तमान पोहोंचल्यावर तर भारीच धिमेपणा आरंभिला. तेव्हां या अडचणीच्या प्रसंगीं जनरल गोदर्द साहेबास वाटलें कीं फौजेसुद्धां घाटावर जाऊन तेथून पुण्यावर दहशत पडेल अशा एखाद्या ठिकाणीं उतरलें असतां आपला हेतु सिद्धीस जाईल. आणि त्याप्रमाणें सहा हजार लोकांनिशीं हरकत न होतां तो घाट चढून आला. नानाफडनविसाचें म्हणणें अजून असें होतें कीं आम्ही

वसईचा वेढा.

तहाचें बोलणें.

जनरल गोदर्द ह्याचे निरर्थक प्रयत्न.

हैदरास सोडीत नाहीं. इकडे गोदर्द साहेबाच्या पिछाडीवर हल्ले होत असत. बंदोबस्ताकरितां बरोबर जे लोक वगैरे असत त्यांस पकडून मराठे कैद करीत असत. व त्याच्या छावणी सभोंवतीं जो मुलूख होता तो ओसाड करून टाकीत असत. ह्या सर्व गोष्टींमुळें गोदर्द साहेबास मुंबईस जाणें जरूर पडलें तो मुंबईस निघाल्यानंतर त्याच्या फौजेवर मराठ्यांनीं सपाटून हल्ला करून इंग्लिशांचें बहुत नुकसान केलें. मागील मोहिमेच्या अखेरीस वडगांव हुकमीं मराठ्यांचा व इंग्लिशांचा तह झाला त्या मोहिमेतही एवढें नुकसान झालें नाहीं. ह्या वेळेस विशेष इतकाच कीं जनरल गोदर्द साहेब अप्रतिष्ठा न होतां मुंबईस जाऊन पोहोंचला, आणि मागल्या मोहिमेंत ते कामदार अप्रतिष्ठा पावून गेले.

प्र० १४ इ० स० १७८०

इंग्लिशांचें मोठें नुकसान झालें.

इतक्यांत हेस्तिंग्स साहेबानें बंगाल्याहून मध्य हिंदुस्थानांत म्हणजे ग्वालेर प्रांतांत फौज पाठवून तेथें लढाई सुरू करण्याची तजवीज केली. क्यापतन पोफन साहेबानें २४०० लोकांनिशीं यमुनेच्या आलिकडे येऊन लाहोरच्या किल्ल्यावर हल्ला केला. हा किला इतका बळकट असेल असें त्यास वाटलें नव्हतें. पुढें तेथें आल्यानंतर पाहतो तों किला बळकट व त्याच्याजवळ गरनळाही नव्हत्या ह्यामुळें फार अडचण पडली. तेव्हां त्यानें त्या किल्ल्याला एक लहानसें भोंक पाडिलें. आणि यावर हल्ला नेण्याचा निश्चय केला. नंतर ज्या दोन कामदारांनीं तो हल्ला नेला ते पडले तरी शिपाई लोक अशा हिय्यानें पुढें सरसावले कीं त्यांचे सवाशें लोक पडून त्यांनीं तो किला सर केला. ग्वालेरची जी लढाई झाली ती फारच मोठी झाली. हिंदुस्थानाच्या दक्षिणेस व पश्चिमेस कांहीं डोंगरी किल्ले मोठे बिकट आहेत तसा ग्वालेरचा किला नाहीं तथापि उत्तर हिंदुस्थानांत हा किला म्हणजे सगळ्या राष्ट्राच्या रक्षणाविषयीं एक मोठें भरंवशाचें नाकें आहे असें आम्हीं पुष्कळ वेळ मागें सांगितलें आहे. दोन महिने पावेतों कसें काय करावें काय करावें ह्याविषयीं योजना होऊन सन १७८० त आगस्ताच्या तिसऱ्या तारिखेस रात्रीचा हल्ला करण्याकरितां एक टोळी नेमिली. ते लोक खंदकांत शिड्या लावून खंद-

पुढें लढाई चालविण्याविषयीं हेस्तिंग्स साहेबाचा बेत.

लाहोरचा किल्ला हल्ला करून घेतला.

ग्वाल्हेरचा किला घेतला.

प्र० १४ इ० स० १७८१

कांतून पार पडले नंतर जो तट चढावयाचा त्याची उंची सुमारें वीस हात होती;त्याला दोरांच्या शिड्या लावून ते लोक वर चढले आणि पाहतात तों किल्ल्यांतच गेले. त्यांच्याचपैकीं कांहीं लोकांनीं बंदुका सोडावयाच्या त्या वेळ होण्याच्या अगोदरच सोडिल्या ह्यामुळें त्यांस सर्वांस कांहींसें भय वाटलें तथापि ते धीर धरून ताठून उभे राहिले. किल्लेदाराची सर्व शिबंदी घाबरून गेली आणि सूर्योदय झाला नाहीं तोंच तो किला एवढा नामांकित असतांहीं इंग्लिश त्याचे धनी होऊन बसले, आणि त्यांस कोणी आडहीं आलें नाहीं.

शिंद्याच्या मुलखांत लढाई सुरू झाली.

ज्या उद्देशानें ही मोहीम सुरू केली होती तोच सिद्धीस नेण्यासाठीं, शिंद्याच्या मुलखांत लढाई सुरू करण्याकरितां हेस्टिंग्स साहेबानें कर्नल कामक साहेबास पाठवून दिलें हा साहेब माळवा प्रांतांत येऊन उतरेपर्यंत कांहीं अडचण आली नाहीं. नंतर शिंदा जलदी करून त्याच्या आंगावर आला आणि त्याच्यापाशीं स्वारांची फौज बहुत होती तिजवर चांगल्या रितीची देखरेख वगैरे ठेवून व तिला वळवावयाची तशी वळवून सात दिवस पावेतों एकसारखा तोफांचा भडिमार चालविला होता त्यामुळें इंग्लिश मोठ्या अडचणींत पडले. कर्नल कामक साहेबानें कांहीं वेळपर्यंत अगदीं स्वस्थ राहून आपल्या हातून कांहीं एक होत नाहीं असें शत्रूस भासविलें आणि रात्रीं एकाएकीं छावणींत शिरून त्यानें शत्रूची बहुत नुकसानी करून पराजयही केला. हा जय मिळाल्यावर पुन्हा स्वारी वगैरे करून आपलें कार्य करून घ्यावयाचें तें ह्या सरदाराच्या हातून झालें नाहीं. तथापि तेवढ्यावरूनच इंग्लिशांचा लौकिक बराच झाला. वऱ्हाडचा राजा मुधोजी भोंसला ह्यास पुष्कळ द्रव्य देऊन दुसऱ्या मराठे सरदारांच्या कटांतून तो निराळा केला. अशा रितीच्या अनेक खटपटी केल्यानंतर सन १७८१ त अक्तोबराच्या तेराव्या तारिखेस केवळ शिंद्याशींच तह केला. हा तह प्रथमच झाला. पुढें सन १७८२ त मे महिन्याच्या सातव्या तारिखेस साल्पे मुकामीं सर्व मराठे सरदारांशीं इंग्लिशांनीं एकच तह केला. मागील लढायांमध्यें इंग्लिशांचे जय पराजय वगैरे झाले त्यांच्या अनुमानानें ज्या ज्या गोष्टी तहामध्यें मिळाव्या अशी

कर्नल कामक ह्याचा प्रयत्न सिद्धीस गेला.

मराठ्यांबरोबरची पहिली लढाई शेवटास गेली.

यांची अटकळ होती त्या त्यांस मिळाल्या. सर्वांच्या मुलखांच्या मर्यादा पुरंदर मुक्कामच्या तहांत ठरल्या होत्या त्याप्रमाणेंच बहुतेक ठेविल्या. आणि राघोबादादास २९००० रूपये पेनशन देण्याचा ठराव पेशव्यांनीं कबूल केला. ह्याप्रमाणें मराठ्यांबरोबर प्रहिला प्रसंग झाला. ह्यापासून इंग्लिशांची तादृश प्रतिष्ठा झाली नाहीं व तादृश फायदाही झाला नाहीं; हें खचित आहे. म० १४ इ० स० १७८०

मराठ्यांबरोबर सख्य झालें.

ह्यापुढें बहुत वर्षेपर्यंत मराठे व इंग्लिश ह्या उभयतांचें सख्य राहून ते परस्परांस मदत करीत असत. म्हैसूरकरांचा अमल अतिशय वाढत चालला होता व ते सर्व संस्थानें बळकावीत चालले होते सबब त्यांचें भय मराठे व इंग्लिश ह्या दोघांसही वाटून त्यांचें सख्य जमलें. मराठे ब्रिटिशांच्या पक्षास मिळून त्यांस हमेशा फौजेची मदत करीत गेले आणि ब्रिटिशांनीं टिपूशीं युद्ध करून त्याचें संस्थान आपल्या ताब्यांत घेतलें. ह्याच प्रसंगीं शिंद्याच्या अमलाचा मोठा भरभराट झाला. हीं ह्यावेळच्या इतिहासांतील एक मुख्य गोष्ट होय. मराठ्यांच्या पदरच्या दुसऱ्या सर्व सरदारांत तोच फार डोई जड झाला. त्याच्या मुलखाच्या दक्षिणेस कांहीं संस्थानें होतीं व उत्तरेस बादशाहाचे कांहीं प्रांत होते तीं संस्थानें व ते प्रांत त्यानें आपल्या मुलखास हळू हळू सामील केले. पूर्वेस बुंदेल खंड त्यानें जिंकिलें व पश्चिमेस रजपूत लोकांचीं संस्थानें होतीं त्यांजपासून तीं खंडणी घेऊं लागला. शेवटीं दिल्लीच्या दरबारांत बखेडे होऊं लागले त्यावेळेस शाहआलम हा नामधारी बादशाह होता तोच स्वतः शिंद्याच्या आश्रयानें राहिला. ह्यावेळेस बादशाही म्हणून कांहीं राहिली नव्हती; तरी लोक तेवढ्या नांवालाच मान देत असत. ह्याप्रमाणें आग्रा दिल्ली आणि तेथील आसपासचा मुलूख शिंद्याच्या स्वाधीन झाला आणि बादशाहाचा म्हणून जो कांहीं अमल उरला होता तो सर्व शिंद्याच्याच हातून होत होता. एवढा अमल हातीं आल्यामुळें त्यास मोठा गर्व होऊन त्यानें बंगाल सरकाराबरोबर तुम्हीं आम्हांस आपल्या वसुलाची चवथाई द्यावी असें बोलणें लाविलें. त्यावेळेस बंगालचा गवर्नर माकफर्सन साहेब होता त्यानें रागावून साफ सां-

शिंद्यास वर्चस्व मिळालें.

तो इंग्लिशांस खंडणी मागूं लागला.

ग्र० १८ इ० स० १७८१

गितलें कीं तुमचें मागणें आम्ही कबूल करीत नाहीं. आणि त्यानें शिंद्यापासूम शिरस्त्याप्रमाणें लिहून घेतलें कीं इंग्लिशांकडे आमची चवथाई येणें नाहीं.

शिंद्याची अडचणीची स्थिति.

वर सांगितल्याप्रमाणें शिंद्याचा अमल वाढला होता पण दुसऱ्या कांहीं गोष्टींची त्याला मोठी अडचण येऊन पोहोंचली होती. त्याच्या खजिन्यांत द्रव्याची फार कमताई होती त्यामुळें रजपूत लोकांच्या संस्थानांपासून पुष्कळ खंडणी वगैरे घेणें त्यास प्राप्त झालें. रजपूत लोक मोठे अभिमानी ते सर्व शिंद्यावर उठले; तेव्हां त्यांस महंमदबेग आणि गुलाम कादीर हे दोघे मिळाले. हे दोघे सरदार व बादशाह हे सर्व शिंद्याच्या अमलास फार त्रासले होते. शिंद्यानें राजपुतान्यावर स्वारी केली तींत त्याचा अगदीं पराजय झाला. इकडील चाल अशी होती कीं मुख्य लढाई करूं लागला म्हणजे त्यास त्याचे मोठे मोठे जमीनदार वगैरे असतील त्यांनीं आंगमेहनतीची मदत करावी. त्याप्रमाणें रजपूत लोकांनीं मदत केली. लढाईंत मुख्यास जय मिळाल्यानंतर चालीप्रमाणें ते आपल्या घरीं माघारे गेले. नंतर फक्त मुसलमान राजे राहिले होते त्यांचा देखील पराजय शिंद्याच्यानें करवला नाहीं. पुन्हा आणखी एकवेळ त्याचा पराजय होऊन तो अगदीं जेरीस आला; आणि त्यानें नानाफडनवीस ह्यास विनंती केली कीं कज्जा कफावतीचीं मागील जीं कांहीं कारणें आपल्या मनांत असतील तीं सर्व आपण ह्यावेळेस एकीकडे ठेवून सर्व मराठ्यांचा पक्ष खालीं पडत आहे असें मनांत आणून मला मदत करावी. परंतु नानापासून मदत झाली नाहीं. पुढें दिल्ली व बादशाह हे गुलाम कादीर ह्याच्या हातीं लागल्यानंतर त्यानें बादशाहाचे व त्याच्या कुटुंबाचे व त्याच्या पदरच्या माणसांचे अतिशय हाल केले त्यानें आपल्या हातांत कटार घेऊन तिनें बादशाहाचे डोळे काढले व आशा प्रकारचीं अनेक क्रूरकर्में केलीं त्यामुळें सर्व लोकांस त्याचा त्रास आला. शेवटीं महंमदबेग ह्याच्या जागेवर इस्माएलबेग हा झाला होता. तो गुलाम कादिराच्याच जातीचा असतां त्रासानें शिंद्याकडे गेला. शिंद्यालाही पुण्याकडून कुमक मिळाली तेवढ्यावरून

रजपूत सरदारांनीं त्याचा पराजय केला.

गुलाम कादर ह्याचें कृत्य.

त्यानें दिल्लीवर जाण्याचा हिय्या करून तेथें गुलामकादीर ह्यास पकडून ठार मारिलें. ह्याप्रमाणें पुन्हा बहुतेक सत्ता हातीं येऊन त्यानें अशा युक्तीनें आपल्या फौजेची बळकटी करण्याचा उद्योग आरंभिला कीं ती युक्ति त्याच्या पूर्वजांतून कोणींच केली नव्हती. हिंदुस्थानाच्या उत्तर प्रदेशांत अनेक ठिकाणीं लढाऊ लोक होते त्यांस त्यानें फौजेंत भरलें. त्यांत रजपूत लोक चांगले शूर होते त्यांस घोडेस्वारांत ठेविलें; गोसांवी लोकांस शिपाईगिरीची चाकरी करण्यास ठेविलें. त्यांस हें काम करण्यास धर्माची अडचण नव्हती. मुसलमान लोक मोंगलाच्या चाकरींतून रिकामे झालेले होते त्यांसही ठेविलें. इतकी फौज होती तरी त्याचा मुख्य भरंवसा म्हटला म्हणजे, त्याच्या पदरीं दिब्रोनी म्हणून एक फ्रेंच गृहस्थ होता त्यानें यूरोपखंडांतील रितीप्रमाणें कांहीं पलटणें तयार केल्यीं होतीं त्यांजवर होता. त्या शिकलेल्या फौजेचीं प्रथम दोन पलटणें होतीं, तीं लवकर वाढवून त्यांचे तीन गट केले आणि दर एक गटांत ५६०० शिपाई ५०० स्वार, आणि ४० तोफा इतका सरंजाम ठेविला. ह्याखेरीज एक स्वतंत्र तोफखाना होताच व दुसरें पायदळही पुष्कळ होतें. ह्या पलटणी फौजेच्या खर्चाकरितां पुष्कळ मुलूख अगदीं स्वतंत्र लावून दिला होता. ह्या पलटणांत सर्व राष्ट्रांतील कामगार होते त्यांत इंग्लिश पुष्कळ होते.

प्र० १४ इ० स० १७८१ त्यास धरून ठार मारिलें.

शिंद्याची स्थिति पुन्हा सुधारली.

ह्याप्रमाणें सर्व मराठी संस्थानिकांत शिंद्याचें प्राबल्य जाजती झाल्यानंतर त्याच्या मनांत आलें कीं पुण्याच्या दरबारांत आपला चांगला पगडा पाडावा. त्यानें मोंगलांपासून पेशव्यास "वकीली* मुतलक" असा किताब घेतला होता तो पेशव्यास देण्याकरितां मुद्दाम आपण पुण्यास गेला. ह्या वेळेस शिंद्यानें पुण्यास येऊं नये असें नानाफडनविसाच्या मनांत होतें, सबब त्यानें पुष्कळ उद्योग केला परंतु व्यर्थ गेला. शेवटीं शिंदा जाऊन पोहोंचल्यावर बाह्यात्कारें नानानें त्याचा मोठाच सन्मान केला. एके दिवशीं मोठें दरबार भरून पेशव्यास वकीलीमुतलक हा किताब दिला. पेशवाईचें एक पद होतेंच त्याला आणखी हा एक किताब

शिंद्याचे गैरहजेरीचे हल्ले कांक्षेनविचार.

पुण्याचे दरबारांत त्याचा सत्कार.

* प्रधान.

प्र० १४ इ० स० १७९४

आल्यावर जास्तीच भूषण झालें. पेशव्यानें शिंद्यास नेहमींचींच प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. त्यास आपला वारस नेमण्याचा अधिकार दिला. प्रधानाचा जेवढा अधिकार तेवढा ह्यावेळेस शिंद्यास दिला. माधवराव पेशवा वयानें लहानच होता त्याला तो मोठा समारंभ करून किताब वगैरे दिला त्यावरून तो फार खुष झालाच होता, आणि त्याखेरीज शिंद्यानें स्वारी, शिकारी, घोडे फेरणें, नाच तमाशे वगैरे समारंभास पेशव्याला बोलवून त्याची मर्जी फार चांगली संपादिली. वर सांगितलेल्या प्रकारच्या समारंभास नानाफडनवीस माधवरावाला फारसें जाऊं देत नसे. सारांश शिंदा नानाफडनविसाच्या कामावर होतो असा रंग दिसूं लागला. पण तितक्यांत महादजी शिंद्यास दुखणें लागून सन १७९४ त फेब्रुवारीच्या १२ व्या तारिखेस तो मृत्यु पावला.

शिंदा एकाएकी मृत्यु पावला.

शिंद्याचे गुण.

हिंदुस्थानामध्यें शिंद्याचें घराणें म्हणजे अगदीं पहिल्या प्रतीचें होऊन बसलें. हें सर्व महादजी शिंद्याच्या श्रमाचें फळ होय. हा पुरुष मोठा उद्योगी, चतुर, आणि कामें केलेला असा होता. हा नीतिमानही चांगला होता त्यामुळें त्याच्या हातून मोठासा एखादा अपराध घडेल असें नव्हतें. हिंदुस्थानांतील मोठमोठ्या लोकांच्यापैकीं आंगीं हा गुण थोडाच दृष्टीस पडतो. मराठ्यांच्या राज्यावर एवढें मोठें संकट गुदरलें आणि अशा प्रसंगीं महादजी शिंद्यास मृत्यु आला हेंच प्रायः त्यांच्या राष्ट्राच्या लयास मुख्य कारण झालें असें म्हणण्यास चिंता नाहीं. शिंद्याच्या पोटीं संतान नव्हतें सबब त्यानें आपल्या कनिष्ठ बंधूचा पुत्र दौलतराव ह्यास मांडीवर घेऊन तो आपल्या राज्याचा वारस केला. ह्यावेळेस दौलतरावाचें वय सुमारें १५ वर्षांचें होतें. तो बुद्धिमान व धैर्यशाली होता तरी तो राज्यावर आल्यावर थोड्याच कालानें त्याजवर मोठाच अडचणीचा प्रसंग गुदरला. त्या प्रसंगांतून पार पडण्यापुरतें ज्ञान त्याच्या आंगीं नव्हतें.

राज्याधिकारी दौलतराव.

नानाफडनवीस.

नानाफडनविसाचा प्रतिपक्षी महादजी शिंदा हा मेल्यानंतर पूर्वीप्रमाणें नानाच्या हातीं सर्व कारभाराची मुखत्यारी आली. त्यानें आपला अधिकार मोठ्या ईर्षेनें चालविला होता पण तीच इर्षा

त्याजवर मोठें संकट पडण्यास कारण झाली. नानाफडनविसानें माधवराव पेशवा ह्याजवर रात्रंदिवस नजर ठेविली होती कीं आपणास कळल्या शिवाय कांहीं एक कमजास्त होऊं नये. आणि राघोबा दादाचा पुत्र बाजीराव ह्यास त्यानें कैदेंत ठेविलें होतें. बाजीराव वयांत आला तेव्हां तो मोठा शहाणा व गुणी असा निघाला. त्यामुळें तो सर्व लोकांच्या मनांत भरला. ही गोष्ट विशेषतः माधवरावाच्या मनांत भरून त्यास आनंद झाला. नंतर त्या परस्परांचीं पत्रें परस्परांस जाऊन राज्याच्या संबंधानें ते एकमेकांचे शत्रु असतांही त्यांची पराकाष्ठेची मैत्री जमली. ते आपआपल्या पत्रांत असें लिहीत असत की, ह्याकांचांतून सुटलों म्हणजे आपण साक्षात परस्परांस भेटूं आणि आपल्या पूर्वजांनीं ज्याप्रमाणें मोठालीं कामें केलीं त्याप्रमाणें आपणही करूं. अशा रितीचीं पत्रें आलीं गेलीं ह्यांत पाहूं गेलें असतां तादृश अर्थ नव्हता; परंतु तें वर्त्तमान नानाला कळतांच त्यास फार राग आला. नंतर त्यानें बाजीरावाला पूर्वीपेक्षां अधिक जाच चालविला, आणि इकडे माधवरावास फार अमर्याद दुर्भाषणें केलीं. माधवराव तारूण्याच्या भरांत होता तेव्हां तीं नानाचीं दुर्भाषणें ऐकून त्यास अत्यंत क्रोध आला. आणि त्याच आवेशांत गच्चीवरून खालीं चौकांत त्यानें उडी घेतली आणि दोन दिवसांत मृत्यु पावला. नानाला हें एक मोठें अरिष्टच उत्पन्न झालें. तें असें कीं ज्या बाजीरावाला त्यानें इतकें दुःख दिलें होतें तोच यथार्थ दृष्टीनें पाहिलें असतां राज्याचा वारस होता. बाजीरावाला राज्य मिळूं नये म्हणून नानानें खटपट केली आणि मयत माधवराव नारायण ह्याची पत्नी वयांत आली नसतां तिच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नावें आपण राज्य चालवावें अशी मसलत केली पण लोकांस ही गोष्ट अगदीं आवडेना. आणि शिंदे सरकारचें बाजीरावाला गादीवर स्थापण्याचें मत आहे असें नानास समजल्यावरून त्यानें असा बेत केला कीं आपणही ह्यावेळेस बाजीरावाचा पक्ष धरावा म्हणजे आपल्या अधिकाराला बळकटी येईल. बाजीरावास हें वर्त्तमान हरकाऱ्यानें जाऊन सांगितलें तेव्हां त्यास एकाएकीं मोठा अचंबा वाटून त्यानें त्या हरकाऱ्याकडून गाईची शेपटी हातांत

म० १४ इ० स० १७९८

बाजीराव व माधवराव ह्यांची विलक्षण मैत्री.

नानाफडनवीस अडचणींत पडला.

इ० स० १७९४ बाजीरावास पेशवा केलें.

धरावेली व गंगेची शपथ वाहून घेतली कीं नानाचा खचीत असा उद्देश आहे ह्यांत कांहीं एक कपट नाहीं. नंतर बाजीराव पुण्यास येऊन त्याची राज्यावर स्थापना झाली. नानाशीं बाजीरावाचें बरेंच जमलें होतें. पण तसें फार दिवस चाललें नाहीं. ह्या वेळेपासून पुढें पेशव्याच्या दरबारांत सर्व बंडाळ आणि लबाडी झाली, तीं अशा कीं बाजीराव साहेबाच्या मनांत स्वतः सर्व राज्यकारभार चालवावा; आणि नाना, शिंदा, परशुरामभाऊ व दुसरे सरदार ह्यांच्या मनांतून बाजीरावाच्या नांवानें आपण कारभार चालवावा. ह्या सर्व सरदारांचा तरी एक विचार कोठचा ? त्यांनीं एके दिवशीं सर्व एक होऊन मसलत करावी आणि दुसरे दिवशीं एकमेकांस ठार मारायाचे बेत करावे असें चाललें होतें. आतां ह्याठिकाणीं त्या वेळेस ज्या किरकोळ गोष्टी घडल्या त्या सर्व आम्ही येथें लिहीत नाहीं. ह्या घोंटाळ्याच्या वेळेस पुष्कळ गरीब गुरीब लोकही राज्यकारभारांत ढवळाढवळ करून प्रसिद्धीस येण्याची खटपट करीत होते. तितक्यांचीं नांवें आम्हीं येथें दाखल करीत नाहीं. सातारचे राजे पेशव्यांनीं बहुत वर्षें कैदेंत ठेविले होते तथापि लोकांस त्यांचा मोठा अभिमान होता. तेव्हां त्याला ह्या कामांत हातीं धरून आपलें काम शेवटास न्यावें अशा विषयींही उद्योग करण्यास कमी केलें नाहीं. नानाफडनविसाकडे कधीं अधिकार होता कधीं नव्हता अशा अनेक तऱ्हा झाल्या व पुढें त्याजवर मोठेंच संकट गुदरल्यावर पुन्हा त्यास पूर्वीच्या अधिकारापेक्षां कांहीं थोडासा अधिकार दिला. परंतु त्यानंतर तो लक्करच मृत्यु पावला. राज्यकारभाराच्या कामांत व मुत्सद्दीपणाच्या कामांत नानाफडनविसाप्रमाणें चतुर, हुशार आणि दक्ष असा पुरुष हिंदुस्थानांत पाहतां फार विरळा अशी या मनुष्याची कीर्ति अजूनही जागृत आहे. नानाच्या मार्गें राज्य चालविण्याविषयीं मोठा समजूतदार, भारदस्त, आणि मोठें एखादें काम हातांत घेऊन शेवटास नेणारा अशा मनुष्याची लागलीच गरज पडली पण तसा कोणी एक उरला नाहीं.

नानाचें दुर्दैव.

मराठ्यांच्या दरबाराची स्थिति.

नानाफडनविस मरण्याच्या पूर्वीच पुण्याच्या दरबारावर मोठ्या अडचणीचा प्रसंग येऊन गुदरला होता. इंग्रज व निजाम ह्या

इ० स० १७९४ बाजीरावास पेशवा केलें.

उभयतांचा एकमतें म्हैसूरकराबरोबर लढण्याचा निश्चय झाला त्या कटांत मराठेही मिळाले. नंतर इंग्लिशांनीं त्या संस्थानाबरोबर अनेक वेळ लढाया केल्या त्यांत मराठ्यांनीं त्यांस मदत केली. आतां ती मदत बेताप्रमाणें जशी करावी तशी केली नाहीं हें खरें आहे. त्या लढाईंत मराठ्यांच्या फौजेनें वर्तणूक करावी तशी केली नाहीं. ह्याविषयीं त्यांस दोष देण्यास लार्ड कार्नवालिस साहेबास पुष्कळ जागा होती तथापि तोंडांतून एक अक्षर न काढितां म्हैसूरच्या संस्थानांतून जो मुलूख मिळाला त्याच्या बरोबर तीन वांटण्या करून कंपनीस एक, निजामास एक, व मराठ्यांस एक, अशा वांटून दिल्या. मागाहून मार्क्विस वेलस्ली हा टिपूशीं शेवटची लढाई करण्याकरितां गेला तेव्हां त्यानें मराठ्यांस लिहून पाठविलें कीं तुम्ही आपल्या ठरावाप्रमाणें टिपूबरोबर लढण्याकरितां यावें. परंतु इंग्लिशांचा अमल फार जलद वाढत चालला हीं गोष्ट मराठ्यांच्या हृदयांत फार सलूं लागली. आणि ती सलण्याविषयीं कारणही होतें खरेंच. आणि प्रसंगाप्रमाणें इंग्लिशांशीं वागावें असा मराठ्यांचा इरादा होता तरी म्हैसूरकरांची फत्ते असावी असा त्यांचा मनापासून हेतु होता. आणि नानाचाही अभिप्राय अगदीं सदरहूप्रमाणेंच होता. इंग्लिशांचा अमल फार जबरदस्त आहे त्यापक्षीं त्यांशीं ज्या गोष्टीनें लढाईचा प्रसंग येईल ती सुतराम करूं नये असा नानाचा आग्रह होता. परंतु शिंदा आणि पेशवा हे दोघेही अल्पवयी आणि हूड पडले त्यामुळें त्यांनीं मोठ्या आवेशानें टिपूचा पक्ष उचलून धरिला. ही गोष्ट श्रीरंगपट्टणास पत्रें सांपडलीं त्यांवरून अगदीं सिद्ध झाली. त्या पत्रांत पेशव्यांनीं इंग्लिशांशीं अगदीं उघड रितीनें वैरभाव दाखविला होता. आणि टिपूला दैव अनुकूल झालें असतें तर मराठे खचित त्यास येऊन मिळाले असते ह्यांत संशय नाहीं. परंतु तितक्यांत मराठ्यांस वर्त्तमान लागलें कीं श्रीरंगपट्टण इंग्लिशांच्या हातीं लागलें. टिपू मरण पावला, आणि टिपूचें एवढें मोठें घराणें पण तें अगदीं बसलें, तेव्हां मग त्यांचे सर्व बेत राहिले. त्यानंतर मराठ्यांनीं टिपूशीं शेवटच्या लढाईंत ठरावाअन्वयें बिलकूल मदत

म० १४
इ० स०
१७९४

इंग्लिशांचा द्वेष

केली नाहीं ही गोष्ट इंग्लिशांनीं सर्व प्रकारें पोटांत घातली. पण ज्या ज्या गोष्टींवरून शत्रुत्वाचा वहमा त्यांस आला होता त्या गोष्टी- विषयीं ते मराठ्यांस खणखणून विचारूं लागले.

प्र० १४ इ० स० १७९४

वेल्स्ली साहे- बाची व्यवस्था.

शेवटल्या लढाईंत मराठ्यांकडून खचित मदत झाली नाहीं. तथापि तेवढ्यावरून त्यांजवर वेलस्ली साहेबानें आपला राग अगदीं दाखविला नाहीं. त्यानें उलटें टिपूच्या मुलखापैकीं कांहीं हिस्सा मराठ्यांकरितां काढून ठेविला. वेलस्ली साहेबाचा असा मात्र बेत होता कीं, मराठे सध्यां अपराधांत सांपडले आहेत आणि त्यांचें राज्य मोठें असून ते लोक मोठे दंगेखोर आहेत त्यापक्षीं त्यांजवर आपला अमल बसविण्याचें संधान आपल्या हातून झाल्यास अवश्य करावें. त्यानें पेशव्यास लिहून पाठविलें कीं निजामाचा व आमचा नुकताच ठराव झाला आहे त्याप्रमाणें तुम्हीही आमचीं कांहीं फौज आपलें पदरीं ठेवून तिच्या खर्चापुरता मुलूख तोडून देण्याचें मान्य कराल तर म्हैसूरच्या दौलतीपैकीं वांटा तुम्हांसही मिळेल. ह्या गोष्टीचा विचार कांहींसा लांबणीवर टाकावा कांहीं टाळाटाळ करावी अशांतच कांहीं मास गुदरले. नंतर मराठ्यांनीं साफच सांगितलें कीं आम्ही हा ठराव मान्य करीत नाहीं. एखादें अनिवार संकट येऊन पडल्याखेरीज पेशवा ही गोष्ट कधीं मान्य करणार नाहीं हें स्पष्ट दिसतच होतें. आणि गवर्नर जनरल वेलस्ली साहेबहीं अशा रितीचा संकट समय पेशव्याला येण्याला फार दिवस लागावयाचे नाहींत असा पक्का भरंवसा धरून प्रसंगाची मार्ग प्रतीक्षा करीत टपून बसला होता. त्यानें असें अनुमान करून ठेविलें कीं मराठ्यांच्या दरबारांत वैमनस्यें वाढत जातीलच आणि तीं वाढलीं म्हणजे त्यांच्या बंदोबस्ताकरितां पेशव्यास ब्रिटिशांचें साह्य मागणें जरूर हजार वांध्यांनीं पडेल.

मराठ्यांशीं तहाचें बोलणें.

मराठ्यांत फूट झाली.

बाजीरावाचा एक पक्ष आणि नानाफडनविसाचा एक पक्ष. त्यांत नानाच्या पक्षास कांहीं सरदार व मुत्सद्दी होते त्या सर्वांचा मुख्य नाना होता. नाना हा मोठा छातीचा पुरुष असून आपल्या छातींत सर्वांनीं असावें अशी त्याची इच्छा फार होती. परंतु शिंदा व होळकर ह्या दोघां फौजबंद सरदारांचें प्राबल्य होत जाऊन

नानाचें पारडें दिवसें दिवस हलकें होत चाललें आणि नांवाचा मात्र मुख्य राहिला. पेशव्याच्या फौजेपेक्षां शिंद्याच्या फौजेची तयारी वगैरे विशेष ह्यामुळें बाजीरावासुद्धां नामधारी पेशवा करून ठेवून तो आपणासच स्वतंत्र महाराष्ट्र देशाचा राजा मानूं लागला. होळकरही आपणाजवळ पुष्कळ फौजफांटा व पेंढारी वगैरे जमवून आपणापेक्षां कोणीच जास्ती प्रबल नाहीं असा अभिमान धरून बसला. अशा रितीनें हे दोन सरदार एकमेकांवर चालून न जातां आपल्या ठिकाणीं आंतल्या आंत धुमसत राहिले होते. ह्यामुळें म्हैसूरचें संस्थान घेतल्यावर सुमारें तीन वर्षेंपर्यंत कांहीं गडबड झाली नाहीं. इ० स० १८०३ च्या जानेवारींत विलायतेस जाण्याच्या तयारींत वेल्स्ली साहेब होता, इतक्यांत कांहीं आगा नसतां एकाएकीं गडबडीचें वर्त्तमान येऊन पोहोंचलें, त्यावरून त्यानें राहण्याचा बेत केला. मराठ्यांच्या राज्यांत एवढी मोठी गडबड झाली कीं इंग्लिशांचा आंत पाय शिरण्यास जागा जितकी पाहिजे होती तिजपेक्षां कांकणभर जास्ती झाली. एवढी गडबड होईल असें वेलस्ली साहेबास वाटलें नव्हतें.

प्र० १८ इ० स० १८०३

इच्छिलेला वेळ आली.

शिंदा व होळकर या दोघांचीं घराणीं अत्यंत दारिद्र्यदशेपासून एवढ्या महत्वास चढल्यावर कांहीं दिवस पावेतों बरोबरीचीं होतीं. परंतु शिंद्याचा एकदां भरभराट झाला आणि तेव्हांपासून त्याचें घराणें पुढें पडलें, आणि होळकराचें मध्यें एकवेळ अगदीं आंत आलें. तथापि राखेचा पुत्र यशवंत राव हा गादीवर आल्यानंतर त्याच्या कारकीर्दींत होळकराचें प्राबल्य पुन्हां वाढत चाललें. यशवंतराव हा उद्योगी आणि धैर्यवान होता. ह्याखेरीज देश उद्ध्वस्त करून लढाई वगैरे करण्याच्या कामांत विलक्षण चतुर होता त्यामुळें तो राखेच्या पोटचा हें लांछन एकीकडे राहून होळकराच्या सर्व सेनेचा अधिपति असा होऊन बसला. 'यशवंतराव देश लुटीत गेला तेव्हां त्यानें शिंद्याचाही देश लुटावयास सोडला नाहीं. ह्यामुळें थोड्या दिवसांत शिंद्याचा व त्याचा तंटा सुरू झाला. आरंभीं दोघांच्या इकडे तिकडे कांहीं लढाया झाल्या. नंतर इंदुरा नजीक (होळकराची राजधानी) सेना जमून त्या उभयतांचें युद्ध

यशवंतराव होळकर.

होळकराचा अगदीं मोड झाला.

प्र० १४ इ० स० १८०३

झालें. त्या ठिकाणीं होळकराच्या ९८ तोफा शिंद्याच्या हातीं पडून होळकराच्या फौजेची दाणादाण झाली. होळकराचा अगदीं मोड झाला असें शिंद्यास वाटल्यामुळें त्यानें त्याचा पुढें विशेष पाठलाग वगैरे करावा तो केला नाहीं, हें वेडेपण केलें. फौजेचा भरणा म्हटला म्हणजे फारसे आयास न पडतां हालोहाल होतो असा मराठ्यांचाच, दुसरा कोणाचा होत नाहीं. यशवंतरावाचा मोड झाल्यानंतर त्यानें जवळच्या मुलखांत स्वाऱ्या वगैरे करून आपणापाशीं बहुत लोक जमविले. ते लोक आपणास कामगिरी मिळेल, लूट मिळेल, म्हणून मोठे खुशालले होते. फार काय ? पण शिंद्याच्या फौजे पैकीं देखील हजारो लोक उगीच खावें आणि स्वस्थ पडावें अशा स्थितीस कंटाळून होळकाराच्या फौजेस येऊन मिळाले असें झाल्यानंतर थोडक्याच काळानें त्यास असें वाटलें कीं आतां आपण पुण्यावर स्वारी केली असतां कांहीं चिंता नाहीं. आपणाजवळ तयारी चांगली आहे. होळकरावरोवर टक्कर देण्याकरितां शिंदा व पेशवा ह्या दोघांनीं आपली फौज एकत्र केली. नंतर पुण्याजवळच होळकराचें आणि पेशव्याचें मोठें तुंबळ युद्ध झालें होळकर मोठ्या निकरानें लढला आणि पेशव्याच्या फौजेवर असे हल्ले केले कीं शेवटीं पराजित होऊन चोहींकडे तिनें पळ काढिला. इंग्लिशांचा रेशिदेन्त कर्नल क्लोज साहेब हा लढाई होत असतां आपल्या पलटणीची तयारी ठेवून होता. उभय पक्षांचे लोक त्यास मानीत होते. पेशव्यानें या साहेबास विनंती केली कीं तुम्हीं आमच्या वतीनें होळकराकडे जावें. तो साहेब भेटावयास गेला तों होळकर आपल्या तंबूत होता. तेथें सुमारें पाऊल बुडण्यापुरता चिखल झाला होता, होळकराच्या आंगावर कांहीं तरवारीचे व कांहीं भाल्याचे वार लागले होते. त्यानें साहेबाचा आदर सत्कार फार चांगला केला आणि इंग्लिशांशीं माझी मनापासून दोस्ती आहे असें दाखविलें. शिंदा व पेशवा ह्या उभयतांशीं आमचें वैमनस्य पडलें आहे हें काढून टाकून तंटा मिटविण्याविषयीं इंग्लिश मदत करतील तर वरें होईल असें तो स्पष्ट त्या साहेबाशीं बोलला.

होळकरानें मोठ्या सपाट्यानें चाल केली.

त्याचा जय झाला.

मध्यस्थी करण्याविषयीं इंग्लिशांस विनंती.

पेशव्यानें इंग्लिशांबरोबर बोलणें चालणें पूर्वीच सुरू केलें होतें आणि ह्यावेळेस तर हें संकट अगदीं येऊन ठेपलेंच होतें पण लढाईचा प्रसंग येतांच बाजीरावानें इंग्लिशांशीं बोलणें लाविलें. कीं, आम्हांस मदत करण्याकरितां इंग्लिशांनीं येथें आमच्या खर्चावर आपलीं सहा पलटणें ठेवावीं. तथापि त्याच्या अटी मोठ्या अडचणीच्या होत्या. त्या अशा कीं पलटणांनीं आसपासच्या मुलखांत येऊं नये, तर, हद्दीवर असावें आणि त्यांची गरज लागेल त्यावेळेस त्यांनीं यावें; दरम्यान येऊं नये. असें करण्यांत त्याचा उद्देश इतकाच होता कीं इंग्लिश एवढे प्रबल असतां त्यांस राज्यांत आणून भरले म्हणून सर्व उगीच द्वेष करूं लागतील, तसें होऊं नये; इंग्लिश दूर असले म्हणजे आपणासही भय नाहीं; आणि ते येतील अशा भीतीनें हे सर्व तंटेखोर सरदार दबले जाऊन आपला वर्चस्मा होईल. हें सर्व मान्य करूनही पलटणें ठेवण्याचें वेल्स्ली साहेबाच्या मनांत होतें पण त्या फौजेच्या खर्चाबद्दल जो मुलूख तोडून द्यावयाचा होता त्याविषयीं मोठी लडथड पडली. पेशव्यानें रगड मुलूख देण्याचें कबूल केलें; पण तो सर्व मुलूख उत्तरहिंदुस्थानांत होता आणि त्या ठिकाणीं वास्तविक अमल म्हटला म्हणजे शिंदे व होळकर ह्यांचा असून पेशव्यांचा अमल केवळ नांवाला मात्र होता. शिंदे व होळकर ह्यांच्या अमलांतून पैसा उत्पन्न करणें तो युद्धावांचून व्हावयाचाच नाहीं असें होतें. सबब इंग्लिशांचें मागणें असें पडलें कीं जो मुलूख आमच्याच ताब्यांत राहण्यासारखा असेल तोच आम्हांस द्या. पोत्यांतून पैसा वेळच्या वेळेस मिळावयाचा नाहीं असें होतें तरी इंग्लिश तसा पैसा घेण्यास राजी होते. लढाईच्या अदल्या दिवसापर्यंत ह्याप्रमाणें हा ठरांव लांबवला होता. शेवटीं त्या दिवशीं बाजीरावाच्या नजरेस आलें कीं होळकराचा वर्चस्मा झाला अगर इंग्लिशांचा वर्चस्मा झाला तरी आपण उभयपक्षीं दुसऱ्याचे अंकित होणारच. मग त्यानें इंग्लिशांच्या करारावर सही केली. दुसरे दिवशीं होळकराचा जय होऊन पेशवा सिंहगडास पळून गेला आणि तेथून त्यानें इंग्लिशांस लिहून कळविलें कीं आपण आम्हांस आश्रय द्यावा.

प्र० १४ इ० स० १८०३ पेशव्यांशीं तह.

वेल्स्ली साहेबाचे सोईचे विचार.

प्र० १४ इ० स० १८०२ पेशवा इंग्लिशांशीं सल्लाकरितो.

तुम्ही वसई मुकामीं या म्हणजे तेथें निर्भयपणें सर्व तजवीज केली जाईल. असें इंग्लिशांचें सांगणें आल्यावरून पेशवा सुवर्ण दुर्गास जाऊन तेथें गलबतांत बसून वसईस येऊन उतरला. त्या ठिकाणीं कर्नल क्लोज साहेबाची भेट होऊन सन १८०२ त डिसेंबराच्या ३१ वे तारिखेस तहनामा ठरून त्यावर सह्या झाल्या, त्या तहाची मातबरी विशेष होती आणि ह्याची सर्वांस माहिती आहे. ह्या

वसईचा तह.

तहांतील मजकूर असा कीं पेशव्यानें सव्वीस लाखांचा उत्पन्नाचा मुलूख इंग्लिशांस ६००० फौजेच्या खर्चाबद्दल तोडून दिला होता. तेवढी फौज ठेवण्याचें कबूल करून त्यांनीं आणखी विशेष कबूल केलें कीं, सर्व मराठ्यांवर पेशव्याचें पूर्ण वर्चस्व स्थापण्याकरितां आमच्या अमलांत जेवढी फौज आहे तेवढी सर्व आणून आम्ही उभी करूं.

मराठ्यांशीं मोठें युद्ध.

आतां ज्या लढाईचा वृत्तांत लिहावयाचा आहे ती फारच मोठी होऊन तिजपासून हिंदुस्थानावर इंग्लिशांचा पुरा अमल बसला. ह्या लढाईपासून अनेक गोष्टी घडून आल्या त्यापक्षीं अशा लढाईची आवश्यकता कशी काय आली व कशा शहाणपणानें ही लढाई केली ह्याविषयीं थोडासा विचार केल्यावांचून पुढें जाववत नाहीं.

युद्ध.

मिलसाहेबानें ह्याविषयावर चांगला विचार केला आहे, तो असें म्हणतो कीं ह्या लढाईचें बीज म्हटलें म्हणजे वसई मुकामचा तह होय.

त्याचें अगत्य व कारणें.

आणि हा तह करण्याची मसलत "स्वतःगवर्नर जनरल साहेबाचीच होती हें स्पष्ट आहे. आपणास अमल मिळावा अशा इच्छेनें मराठे सरदार आपापणांत भांडत होते ह्यामुळें त्या वेळेसच इंग्लिश सरकाराशीं युद्धकरण्याचें त्यांच्या मनांत नव्हतें. दर एक

इंग्लिशांचें वर्चस्व झालें ह्यामुळें सर्वांस भीति पडली.

सरदाराचा उद्देश हाच कीं पेशव्यास आपल्या हातांत ठेवून त्याच्या नांवानें सर्व राज्यांत आपण अमल करावा. पण मागें सांगितलेल्या व्यवस्थेपासून असें झालें कीं ते सर्व सरदार अगदीं एकीकडे राहून पेशव्याचा अधिकार व पेशव्याचा मुलूख परदेशस्थ जे इंग्लिश त्यांच्या हातीं आला. ह्या गोष्टीपासून त्या सर्व सरदारांची मानहानी तर झालीच, पण त्या शिवाय अणखी पुढें त्यांचें कार्य सिद्धीस जाण्यास ती मोठी अडचणच झाली. त्यामुळें त्या

सर्वांच्या मनांत ती गोष्ट सारखी जळतच होती. त्या सर्व सरदारांस आपसांत लढूं द्यावयाचे होतें आणि कंपनी सरकारानें स्वस्थ बसून पहावयाचें होतें. असें केलें असतें तर सर्व सरदार कंपनीच्या आंर्जवांत राहून तिला त्यांपासून बहुत नफा झाला असता. आणि तिच्या हातून त्या सरदारांमध्यें कोणी डोईजड न होतां सर्व बरोबरीच्या नात्यानें राहिले असते. असेंही मीलसाहेबाचें ह्मणणें आहे. असो ह्या सर्व ह्मणण्याविषयीं आधारभूत ज्या गोष्टी आहेत त्या फारच थोंटाळ्याच्या आहेत, त्यापक्षीं येथें त्या सांगतां येत नाहींत, आणि विरुद्ध पक्षाचीं प्रमाणें आहेत तीं दिराण्यांत तरी निदान अंशीं च सबळ दिसतात. प्र० १४ इ० स० १८०२

इंग्लिशांनीं मराठ्यांचे कारभारांत मन कां घातलें त्याविषयीं साधारण विचार.

एका राजाच्या शेजारचे दोन राजे परस्परांशीं लढत आहेत तर सत्पक्षास मदत करण्याच्या बुद्धीनें अगर दोघांपैकीं एका राजाचा जय झाला ह्मणजे तोच विलक्षण प्रबल होऊन आपणासही कदाचित उपद्रव करील तो न करावा ह्या हेतूनें तो तिऱ्हाईत राजा तंट्यामध्यें पडल्यास कांहीं चिंता नाहीं असें सर्व मानितात. आतां त्या सर्व सरदारांत हिंदुस्थानाचा कांहीं एक अभिमान होताच, पण त्यापासून त्या प्रत्येकाला आपणास सर्व राज्य मिळावें असें वाटून त्याविषयीं एखादी तजवीज करावी असें त्यांस वाटत असे. आणि ह्याच हेतूनें कैक सरदार मोठे फुरफुरले होते. तशांतून मराठे सरदार परस्परांशीं लढाया करीत त्या ह्मणजे आंतल्या आंत लहान सामान्य होत असत असें नाहीं. तर दोन स्वतंत्र राजांच्या संग्रामाप्रमाणें मोठाले संग्राम होत असत. ह्या सर्व गोष्टींवरून असा संभव बळकट होता कीं त्या सरदारांपैकीं एखादा विजयी होऊन मराठ्यांचा सर्व अमल आपल्या हातीं घेऊन सर्व राज्य बळकावून बसेल. आणि असेंच झालें असतें तर एखादा तरवार बहादूर मनुष्य आपल्या हाताखालीं बहुत मुलूख घालून आपली फौज इंग्लिशांच्या रितीप्रमाणें लढाईच्या कामांत उत्कृष्ट तयार करून उभा राहता तर इंग्लिशांसच भारी झाला असता. असाच एखादा उभा राहता तर त्यास फ्रेंचांची मदत मिळण्याचाही संभव होता. आणि इंग्लिशांस मग निजाम व आपल्या आश्र-

लढाईपासून बहुधा जो परिणाम ह्मणावयाचा तो.

इ० स० १८०२

या खालीं राहणारे दुसरे कांहीं नेतीव संस्थानी ह्यांच्या तोंडांकडे पहावें लागलें असतें. ते तरी इंग्लिशांस विश्वासानें मदत करितें किंवा कसें ह्याविषयीं मोठा संशय होताच.

मार्किस वेलस्ली साहेबास पुढें काय होईल असें वाटलें तें.

मार्किस वेलस्ली साहेबानें जीं पत्रें वगैरे लिहिलीं होतीं तीं अलीकडेच छापून प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांवरून पाहतां असें दिसतें कीं वसई मुकामच्या तहापासून सर्व मराठ्यांच्या संस्थानांत सर्व जिकडे तिकडे स्वस्थता होऊन सगळे समवल होतील ह्याकरितां युद्धें वगैरे करावीं लागणार नाहींत अशी त्याची खात्री होती. शिंद्याची मागील प्रसंगीं अगदीं नाचक्की झाली होती त्यापक्षीं तो इंग्लिश व पेशवा ह्यांशीं मिळेल असें वाटत होतें; तशांत इंग्लिशांनीं आपणावर जिम्मा घेऊन त्यास सांगितलें होतें कीं तुमचा जो मुलूख गेला आहे तो सर्व तुम्हांस प्राप्त होऊन तुमचा तुमच्याकडे राहील, ह्यावरून त्याच्याविषयीं संशय धरण्यासारखें नव्हतें. होळकराचें फौज फांटावगैरे सामान आपलें सरासरीच होतें आणि तेंही आज आहे आणि उद्यां नाहीं असें होतें. तेव्हां त्याच्या हातून ह्या तीन असामींच्या पुढें टिकाव निघेलसें नव्हतें. एक रघोजी भोंसला. भोंसल्याविषयीं मात्र संशय होता; तो वऱ्हाड प्रांताचा राजा होऊन बसला होता. आणि त्याचे वडील पेशव्याच्या अधिकारावर आपला वारसा सांगत होते हें आम्हीं लिहिलेंच आहे. तथापि पेशव्याच्या पक्षांत इंग्लिश वगैरे असल्यामुळें, तो पक्ष प्रबळ झालेला होता सबब त्यासच मिळण्याचा रघोजीचा खास इरादा होतासें दिसत होतें. आणि होळकराचा पक्ष अगदीं पडता होता त्यापक्षीं रघोजी त्याच्या पक्षास अनुसरेल असा संभव नव्हता. सारांश मराठ्यांनीं दूरवर दृष्टी देऊन विचार केला असता तर ते निदान शिंद्याच्या फौजेची अगदीं फाटाफूट झालेली होती ती पुन्हा एकत्र जमेपर्यंत आणि शिंद्याचा प्रतिपक्षी होळकर हा गोदावरी नदीच्या पलीकडे निघून गेला होता, आणि त्याच्या मनांत पुढें एखादी चांगली मसलत करून युद्धं करण्याचेंही नव्हतें, तर तो पुरुष आपणास अनुकूल होईपर्यंत तरी कालावर नदर देऊन चालते.

प्र० १४
इ० स०
१८०२
शिंदा व भोंसला हे इंग्लिशांचा द्वेष करूं लागले.

वेल्स्ली साहेबाला वर सांगितलेल्या गोष्टी होतील असें वाटत होतें तें उगीच वाटत होतें असा अर्थ नाहीं, तर, त्याविषयीं बरोबर आधार होता. तथापि त्या झाल्या नाहींत. शिंदा व रघोजी भोंसला ह्यांस इंग्लिशांची फार भीति वाटून ते त्यांचा अत्यंत द्वेष करूं लागले. तो इतका कीं त्यांनीं तो मनांतल्या मनांत देखील ठेविला नाहीं. तर ज्या करारनाम्याच्या योगानें महाराष्ट्र देशावर इंग्लिशांचा एवढा वर्चस्वा झाला होता त्याला आड येण्याचाच प्रयत्न ते योजण्याच्या तजविजींत एकाएकीं लागले शिंद्याचा पराजय झाल्यानंतर तो जो निघून गेला तो बऱ्हाणपुरास जाऊन वसला होता, आणि तेथें त्यानें पुन्हा फौज जमविली. तथापि आपण म्हणजे लढाई वगैरे कांहीं करणार असें कांहीं एक सांगितलें नाहीं. वसई मुक्कामच्या तहावर मान्यता करा म्हणजे तुम्हांस इंग्रेज सरकारची मदत मिळून तुमचा बंदोबस्त होईल असें इंग्लिशांनीं त्यास सांगून पाठविलें. तेव्हां तो म्हणाला कीं माझ्या मनांत मान्यता करावयाची आहे, परंतु पूर्वी पेशव्यास पत्र पाठवून त्यापासून त्या तहनाम्यांतील कांहीं गोष्टींचा समज घेऊन मग मान्यता करीन. पुढें त्यानें सांगितलें कीं मी मान्यता तर करीत नाहीं, परंतु तो तहनामा तुम्ही अमलांत आणल्यास मजकडून कांहीं एक हरकत नाहीं. शिंद्यानें आपली छावणी बऱ्हाणपूर मुकामींच ठेविली आणि ठेवण्याचा हेतु तरी पुण्यास आपलें बस्तान पूर्वीप्रमाणें बसावें ह्याखेरीज दुसरा कांहीं दिसत नव्हता ह्यावरून साहजिक भय उत्पन्न झालें. सबब शिंद्याच्या छावणींत कोलिन्स साहेब रेसिदेन्त होता त्यानें त्यास तहनामा मान्य करण्याविषयीं आग्रह केला आणि असेंही सांगितलें कीं तुम्ही मान्य नकेल्यास इंग्रेज सरकारास म्हणजे वाईट वाटेल असें नाहीं. त्यानें मान्यता न केली तरी तो लागलाच नर्मदा उतरून पलीकडे आपल्या राज्यांत निघून गेला म्हणजे अर्थात त्याच्या मनांत द्वेषबुद्धि नाहीं असें सिद्ध होईलसें इंग्लिशांस वाटलें होतें. त्यानेंही बोलून दाखविलें कीं इंग्लिशांबरोबर आमची दोस्ती आहे, परंतु हल्लींच्या स्थितींत होळकराच्या दंग्याचा बंदोबस्त करणें मला प्राप्त आहे. वेल्स्ली साहेबानें रे-

शिंद्याची सावधगिरी.

त्यानें आपला बेत लपविला.

प्र० १३ इ० स० १७९९

सिदेन्तास लिहून पाठविलें कीं शिंद्याचें म्हणणें खरेंच असल्यास त्यानें इंग्रेज सरकाराशीं दोस्ती आहे खरी हें दाखविण्याकरितां तहनाम्यावरच्या मान्यते खेरीज दुसरी कांहीं एखादी गोष्ट स्पष्ट प्रमाण धरण्यासारखी केली असतां आम्हांस कबूल आहे. वेलस्ली साहेबास बहुत दिवस पावेतों असें वाटत होतें कीं होळकर व वऱ्हाडचा राजा रघोजी ह्या दोघांच्या संमतीशिवाय शिंदा तहनामा अमलांत आणण्यास अडकाठी कांहीं एक घालणार नाहीं. शिंदा व रघोजी ह्या दोघांसही वेलस्ली साहेबानें लिहिलें कीं तुम्हीं आपापल्या राज्यांत स्वस्थ असावें. तुम्हांस आम्हांकडून तिळमात्र इजा पोंचणार नाहीं ते उभयतां प्रतिकूल आहेत अशा तऱ्हेचें वर्त्तमान त्याच्या कानीं आलें होतें त्यावरून त्यांस असेंही जाहीर केलें कीं वसईचा तहनामा अमलांत आणण्याविषयीं जो संस्थानी अगर राजा आड येईल त्याचें इंग्लिशांशीं वैर होईल. रघोजीनें उत्तर पाठविलें त्यांत लिहिलें होतें कीं माझ्या मनांत इंग्लिशांशीं वैर करण्याचें अगदीं नाहीं. परंतु अजीम उल उमराव ह्या नांवाच्या एक्या सरदारास त्यानेंच पत्र लिहिलें होतें कीं माझ्या मनांत शिंद्याची भेट घेऊन त्याच्या व आपल्या एकोप्यानें वंसई मुक्कामचा तह शेवटास न जाऊं देण्याची तजवीज करावयाची आहे. ही गोष्ट रघोजीनें नाकबूल केली. आणि पुढें दोस्ती दाखल पत्रें वगैरेही जात येत असत. परंतु तिकडे शिंद्याच्या फौजेची तयारी चालली होती, हिकडे रघोजीच्या फौजेची तयारी चालली होती. ह्या दोन गोष्टींचा आणि पत्रांतील मजकुराचा बरोबर ताळा जमला. त्यावरून गवर्नर जनरल साहेबानें आपल्या फौजा नाक्या नाक्याच्या ठिकाणीं ठेवून त्यांची तयारी अशी दाखविली होती कीं सूचना पोंहचतांच एकदम मोठ्या त्वरेनें लढाईचें काम सुरू करण्यास त्यांस ठीक पडेल. म्हैसूर मुकामीं जनरल वेलस्ली साहेब व निजामाच्या हैदराबादेस कर्नल स्लीविन्सन साहेब ह्या उभयतांस पुण्यावर जाण्याचा हुकूम झाला. आणि गुंवईहून कर्नल मरे साहेबाच्या हाताखालीं कांहीं पलटणी देऊन त्यासही सदरहू ठिकाणीं पाठविण्याचा हुकूम झाला. त्याच हुकुमांत असें लिहिलें होतें कीं पुण्यास पेशव्याचा चांगला

मार्किस साहेबाचें लिहिणें.

गवर्नर जनरलाच्या तयारीच्या तजविजी.

बंदोबस्त करून इंग्लिशांस विरुद्ध जे मराठे सरदार आहेत त्यांजवर जाण्याचा प्रसंग पडेल ह्याकरितां तुमची खूप तयारी असावी. बंगाल इलाख्याच्या सरहद्दीवर कानपूरच्या छावणींत लार्डलेक साहेब पुष्कळ फौजेनिशी होता त्यास हुकूम जाऊन पोहोंचला कीं लढाई सुरू झाल्याचें वर्तमान समजतांच तुम्हीं तिकडे जाऊन दाखल व्हावें. त्याचा हेतु असा होता कीं शिंद्याचा उत्तर हिंदुस्थानांतील मुलूख काबीज करावा; दिल्ली व आग्रा हींदोन मोंगलांचीं शहरें घेऊन बादशाहास धरावें आणि रजपूत लोकांशीं स्नेह करण्याची तजवीज करावी. रघोजीच्या अमलांत एक कटक म्हणून शहर होतें त्याजवरही ह्यावेळेस तिकडूनच फौज रवाना करावयाची होती. भडोच व तिच्या आसपासचा मुलूख ह्यांजवर मुंबईहून फौज रवाना करावयाची होती. एवढी कटकची आणि गुजराथची ह्या दोन स्वाऱ्या साधल्या म्हणजे हिंदुस्थानाचा सर्व किनारा कंपनीच्या ताब्यांत येऊन एतद्देशीय शिंदे वगैरे संस्थानी व इकडे येऊन चाकरीस राहिलेले वगैरे फ्रेंच लोक ह्या उभयतांचीही फाटाफूट व्हावी असें होतें.

इ० स० १८०३ च्या मार्च महिन्याच्या ९ वे तारिखेस मेजर जनरल वेल्स्ली साहेब हा हरिहर येथून १२ व्या तारिखेस निघून मराठ्यांच्या मुलखांत शिरला, कर्नल स्टीविनसन हा आपले आठ हजार लोक आणि निजामानें दिलेले सोळाहजार लोक इतक्या फौजेनिशीं त्याचवेळेस हैदराबादेहून निघाला. एप्रिलच्या पंधराव्या तारिखेस पुण्यापासून सुमारें २५ कोसांवर अकळूज म्हणून गांव आहे तेथें ह्या दोन्ही फौजांची गांठ पडली. इकडे होळकर पुण्यास होता त्यास इंग्लिश येत आहेत असें समजल्यावरून तो आपण इंग्लिशांशीं ह्या युद्धप्रसंगांत पडूं नये अशा बेतानें एप्रिलच्या आरंभींच पुण्याच्या उत्तरेस ६०–६५ कोसांवर चांदवड म्हणून गांव आहे तेथें निघून गेला. आणि पाऊलगांवें अमृतरावास पेशव्याचें पद देऊन थोड्याशा फौजेनिशीं त्याला पुण्यास ठेविलें होतें. सर अर्थर साहेब ह्यानें असें मनांत आणिलें कीं पुणें मुकामीं फौजेला सामान सुमान मिळण्याची मोठी अडचण पडेल आणि तेथें आप-

ग्र० १३ इ० स० १७२८.

शिंदे व भोंसले ह्यांशीं युद्धाचा बेत.

मेजर जनरल वेलस्ली हा मराठ्यांच्या मुलखांत शिरला.

होळकर परत गेला.

प्र० १३ इ० स० १७९९

ल्या सर्व फौजेची गरज लागणार नाहीं त्यापक्षीं इतकी नेऊं नये. परंतु कर्नल क्लोज साहेब ह्यानें त्यास सांगितलें कीं पुणें मुक्कामीं बाजीराव साहेबांचें कुटुंब अद्यापि आहे आणि अमृतराव कदाचित त्या शहराला आग लावील असें वाटतें त्यापक्षीं हिकडे फार जलदीनें जावें. ह्यानंतर अर्थर साहेबानें आपल्या निवडक घोडेस्वारांची टोळी आपल्या बरोबर घेऊन एप्रिलच्या विसाव्या तारिखेस एका बत्तीस तासांत ३५ कोसांवरून पुण्यास येऊन पोहोंचला. अमृतराव पुण्यास कांहीं एक अनर्थापात न करितां तेथून पूर्वीच निघून गेला होता. तेव्हां अर्थातच इंग्लिश मालक झाले. अशा रितीनें तेथें इंग्लिशांचा अमल झाल्यानंतर बाजीराव साहेब कर्नल मरेसाहेबास बरोबर घेऊन मुंबईहून पुण्यास येऊन पुन्हा पदारूढ झाले. ह्यावेळेस इंग्लिश व नेटीव ह्या दोन्ही फौजांत आनंद झाला.

सर अरथर वेल्स्ली हा त्वरेनें कूच करितो.

जनरल वेल्स्ली साहेब म्हैसुराहून पुण्यास आला होता तो शिंदा, होळकर, व भोंसला ह्यांचें मानस काय आहे तें समजावें म्हणून तेथें राहिला होता. पुढें तेथून निघावयाचें ते वेळेस त्यास सामान सुमान मिळेना व गाड्या घोडीं बैल वगैरे हींही कांहीं मिळेनात. पेशव्याकडूनही ह्या गोष्टींची तजवीज कांहीं होईना. मग ती त्याच्या हातून होण्यासारिखी नव्हती किंवा ह्या कामाकरितां आपल्या रयतेला तसदी देण्याचें त्याच्या मनांत नव्हतें, कोणजाणें ! परंतु ह्यांपैकीं दुसरेंच प्रायः खरें असावें असें सर्वांच्या मनांत वागलें होतें. तथापि तो जातानें फार हुशार होता व मुंबईहून ही त्यास कांहीं मदत मिळाली. नंतर त्यानें तेथून फौजेची कूच करण्याची तयारी केली.

सामानाची खमताई.

शिंदे होळकर वगैरे मराठे सरदारांच्या वर्तणुकीनीं दिवसंदिवस ज्यास्ती शंशय येत चलाला. तेव्हां गवर्नर जनरल साहेबानें आपला बंधु जनरल वेल्स्ली ह्यास जूनच्या सविसाव्या तारिखेस मराठ्यांच्या मुलखांतलि सर्व फौजेवर मुख्य नेमून लढाई अगर तह वगैरे काय करणें ह्याचा अधिकार त्यास दिला. ह्या व्यवस्थेपासून एवढा फायदा झाला कीं कांहीं एखादी गोष्ट मनांत आली ह्मणजे तिज-

जनरल वेल्स्ली ह्याला फौजेचा मुख्य अधिकार मिळाला.

विषयीं कलकत्त्यास लिहून उत्तर येईपर्यंत वाट पाहण्याची गरज राहिली नाहीं. फौजेच्या कामांत जनरल वेल्स्लीची पायरी लार्डलेक व जनरल स्तुअर्त ह्या दोघांच्या पेक्षां खालची होती. परंतु लार्डलेक साहेब इकडे नव्हता तो दुसरीकडे गुंतला होता. आणि जनरल स्त्युअर्त साहेब तत्काळ कामांत हात घालणार नाहीं असें होतें सबब हें काम जनरल वेल्स्ली साहेबावर सोंपलें. कर्नल कालीन साहेबास सरअर्थर ह्यानें सांगून पाठविलें कीं शिंदे सरकारास विचारावें कीं तुम्ही अशा फौजफांट्याच्या इतक्या तयारीनें राहतां ह्याचें कारण काय तें सांगा आणि अशी विनंती करावी कीं तुम्ही आपल्या मुलखांत निघून जाण्याचें करावें. शिंद्यानें अगदीं निखालस सांगितलें कीं इंग्रेज सरकारास विरुद्ध असें अम्हांस कांहीं एक कर्तव्य नाहीं. आमच्या मनांत वसईचा तह मान्य करण्याचें खास आहे. अशा प्रकारें बोलणें झालें तरी शिंदा आपल्या फौजफांट्या सुद्धां तसाच पडून राहून आपल्या फौजेंतील कामदारांस हुकूम पाठवीत होता कीं सूचना आल्याबरोबर एकदम कूच सुरू करतां येईल इतपत तुम्हां सर्वांची तयारी असावी. ह्या सर्व गोष्टींविषयीं रघोजी त्यास अनुकूल होता. इंग्रेजसरकारास हें सर्व समजल्यानंतर त्यांनीं शिंद्यांशीं बोलणें लाविलें कीं तुम्ही व रघोजी भोंसले ह्यांनीं आपापली फौज आपापल्या राजधानींत नेहमींच्या ठिकाणीं घेऊन जावें व इंग्रेज सरकारही सदरहूप्रमाणें आपली फौज माघारी घेईल. ह्यावर शिंद्यानें उत्तर केलें कीं भोंसल्याची व आमची थोड्या दिवसांत गांठ पडणार आहे ती पडली म्हणजे मग आम्ही इंग्रेजसरकाराबरोबर तह करणार अथवा युद्ध करणार हें कायतें रसिदेन्त साहेबास कळवूं. हें बोलणें शिंद्याचें दुटप्पी होतें आणि तशांत युद्धाचेच ठरविताल असाच संभव बहुधा होता. त्यावरून जनरल वेल्स्ली ह्यास असें वाटलें कीं नगराजवळ जें वाळकी म्हणून एक मजबूत ठाणें आहे तेथें आपल्या फौजेनिशीं आपण जावें म्हणजे तेथून आपणास लढाईची सुरुवात करण्यास सोईचें पडेल.

शिंदा व त्याचे साह्यकारी ह्यांची संशय युक्त वर्तणूक.

शिंद्याचे संशय युक्त बेत.

जूनच्या तिसऱ्या तारिखेस भोंसला येऊन त्याची आणि शिंद्याची भेट तयारे झाली, परंतु मुख्य हांशिलाचें बोलणें होतें तें तारीख लांबणीचे उपाय

प्र० १४ इ०स० १८०३

८ पावेतों झालें नाहीं. पुढें वाराव्या तारिखेस रेसिदिन्त साहेबानें भोंसल्याची भेट घेऊन ठराव काय झाला तें विचारिलें तेव्हां आज सांगतों उद्या सांगतों आशाखालीं शिंदा फक्त चालवण्या दाखवूं लागला त्या दोघांनींही इंग्रेज सरकाराशीं कबूल केलें कीं वसई मुकामच्या. तहांतील गोष्टींपैकीं कांहीं गोष्टी आम्हांस वज्र्या वाटत नाहींत. तथापि त्यांकरितां युद्ध वगैरे करण्याचें आमच्या मनांत नाहीं व आमच्या फौजाही आमच्या मुलखाच्या हद्दीच्या आंतच आहेत. निजामाच्या मुलखावर जाण्याचा आमचा इरादा आहे खरा. असें त्यांनीं सांगितलें. ह्यावरून दुसऱ्या कितीएक गोष्टींवरून वेलस्ली साहेबानें अनुमान केलें कीं ह्या उभयतांचा युद्ध करण्याचा तर निश्चय खास आहे; परंतु आपली सर्व तयारी होऊन होळकराशीं तहाचें बोलणें चाललें आहे त्याचा कायतो शेवट होईपर्यंत अगदीं फोड करूं नये इतकाच ह्यांचा मानस आहे. तस्मात आतां जितका जितका इंग्लिशांकडून विलंब होईल तितका तितका त्या उभयतांच्या पथ्यावरच पडेल. हें सर्व मनांत आणून रेसिदेन्त साहेबास लिहून पाठविलें कीं वऱ्हाडचा राजा रघोजी भोंसला ह्यानें जलदीनें नागपुरास निघून जावें असें तुम्ही त्यास सांगावें. इतकेंच कीं नद्यांनीं मात्र वाट दिली पाहिजे, नद्या भरलेल्या असल्यास निदान बऱ्हाणपुरास तरी निघून गेलें पाहिजे. अशा रितीचा मजकूर लिहून आला होता व जनरल वेलस्ली साहेबाचें पत्रही आलें होतें त्यावरून रेसिदेन्त साहेबाची आणि शिंद्याची भेट तारीख २५ जुलई रोजीं झाली तथापि तारीख ३१ पावेतों शिंदा त्या साहेबाला थापाच देत होता. शेवटीं त्यादिवशीं त्यानें शिंद्यास सांगितलें कीं मी वाट पाहून दमलों आतां साफ निघून जातों. त्यानंतर त्यास रघोजी भोंसल्यास तंबूत बोलावून आणून तेथें त्यास सांगितलें कीं शिंदे व भोंसले हे दोघेही हल्लींच्या ठिकाणापासून सुमारें तीस कोस मागें म्हणजे बऱ्हाणपुरास जाण्याचें मान्य करितात, परंतु इंग्लिश सेनापतीनें आपली फौज जिकडची तिकडे म्हणजे मद्रास इलाख्यांतील मद्रास इलाख्यांत व मुंबई इलाख्यांतील मुंबई इलाख्यांत अशी पाठवून द्यावी. ही गोष्ट इंग्लिश मान्य करते तर मराठ्यांचा मुलूख शिंदे वगैरे सर-

युद्धाविषयीं निश्चित बेत.

सांगणें व विलंब.

शिंदे व भोंसले ह्यांचें अयोग्य सांगणें.

दारांच्या हातीं सांपडला असता सबब रेसिदेन्तानें त्यावेळेस ती गो- इ० स० १८०३
ष्ट नापसंत केली. शेवटीं आम्ही आपापल्या राजधानीस जा-
ण्यास निघूं तेंच दिवशीं इंग्लिशांनीं आपल्या फौजेनिशीं माघारें
निघण्यांचें कबूल करावें म्हणजे आम्ही जाण्यास राजी आहों. ही
गोष्ट जनरल वेलस्ली साहेबाकडे लिहून पाठविण्यास लायकशी दि-
सली, सबब रेसिदेन्तानें त्या उभयतांचें पत्र त्याकडे पाठविलें
आणि त्याच पत्रांत ती गोष्ट लिहावयाचें ठरलें होतें पण पत्र वा-
चून पाहिलें तों त्यांत तें कांहीं एक नव्हतें. इंग्लिश जर आप-
ली मद्रासची फौज मद्रासेस धाडतील तर आम्ही बऱ्हाणपुरास
निघून जाऊं असें त्या उभयतांचें पहिलें बोलणें होतें आणि तें इं-
ग्रेज सरकारानें पूर्वीच नाकारलें होतें त्याच बोलण्याचें चर्वितच-
र्वण ह्या पत्रांत केलें होतें. ह्या सर्व गोष्टींवरून रेसिदेन्त साहे-
बानें जाणलें कीं ह्या उभयतांचा मुख्य हेतु सबब सांपडेल तितकी लढाईचा नि-
करून घ्यावी एवढाच आहे. नंतर तो छावणी सोडून निघून श्चय ठरला.
गेला. आणि लागलीच इंग्लिशांचीं व त्या उभयतांचीं लढाई
सुरू झाली.

जनरल वेलस्ली ह्याच्या खुद्द दिमतीस सात हजार पायदळ, जनरल वेलस्ली
१९०० गोरेस्वार, आणि ५४०० काळेस्वार इतकी फौज होती. ह्याच्या मोठ्या
ह्याखेरीज कर्नल स्तीविनसन ह्याची पुष्कळ फौज निजामाच्या सर शहाणपणाच्या
हद्दीवर पडून राहिली होती ती निराळीच होती. वेलस्ली साहेब तजविजी.
मोठ्या शिताफीनें तेव्हांच अहमदनगरावर गेला. आणि इ. स.
१८०३ त आगस्ताच्या आठव्या तारिखेस तेथील किल्ल्यापुढें छा- अहमदनगर
वणी दिली. दक्षिणेंत हा किल्ला मोठा नामांकित आहे. पहि- घेतलें.
ल्या दिवशीं शहरावर हल्ला केला आणि दहाव्या तारखेस कि-
ल्ल्याच्या तटावर तोफांचा भडिमार चालू केला. आणि बारा-
व्या तारिखेस आंतील शिपाई लोकांनीं किला खालीं करून दिला.
तेथून वेलस्ली साहेब औरंगाबादेवर निघून गेला. इतक्यांत मरा- शिंद्या व भोंस-
ठे आपल्या फौजेनिशीं कर्नल स्तीविनसन ह्याच्या छावणीवरून नि- ला ह्यांचा बेत
घून गेले. त्यांचा निश्चय असा होता कीं गोदावरी नदी उतरून सिद्धीस जाऊं
जाऊन निजामाच्या राजधानीवरच एकदम स्वारी करावी तथापि दिला नाहीं.

ग्र० १४ इ० स० १८०२

वेल्स्ली साहेबानें मोठ्या तजविजींनें उत्तरेकडे माघारें निघून जाण्याचें भाग पाडिलें. मराठ्यांचा इच्छा अशी होती कीं समोर उभें राहून न लढतां आजूबाजूनें येऊन इंग्लिशांवर घाले घालावे. आणि असें केलें असतें तर इंग्लिशांस खरोखर फार त्रास झाला असता. सबब त्या साहेबानें बेत केला कीं कसें तरी करून मराठ्यांस मोरच्या युद्धावर आणावें. ह्या हेतूनें वेल्स्ली साहेबाची एक आणि स्तीविनसन साहेबाची एक अशा दोन्ही फौजा ज्या दोन रस्त्यांनीं मराठे जातीलसें वाटलें होतें त्या दोन रस्त्यांनीं गेल्या. त्या दोन फौजांच्यामध्यें अंतर फारसें नव्हतें.

वेल्स्ली साहेबानें ठरविलें होतें कीं सप्तंबरच्या चोविसाव्या तारिखेस स्तीविनसन साहेबाची व आपली गांठ पडून उभयतांनीं मिळून शत्रूवर हल्ला करावा. मराठ्यांचे स्वार निघाले असें त्यास समजलें तेव्हां त्यांची फौज वगैरे पहावी आणि झाल्यास त्यांच्या जाण्यास आडकाठी घालावी ह्या हेतूनें

अकस्मात शत्रूची गांठ पडली.

तो पुढें सरसावला. ह्या प्रदेशांतील माहिती त्यास अगदींच थोडी होती. त्याला वाटलें कीं मराठे येथून सहा सात कोसांवर बोकर्दन म्हणून गांव आहे तेथें छावणी देऊन राहिले असतील. परंतु तो तीन कोसांवर गेला तों लागलेंच मराठ्यांचें सैन्य त्याच्या दृष्टीस पडलें. त्यांत ३८,००० स्वार १८,००० पायदळ, आणि १०० तोफा इतकें होतें. ही सर्व फौज आसेच्या मैदानांत तयार होऊन राहिली होती. अशा वेळेस वेल्स्ली ह्यानें पळ काढिला असता तर मराठ्यांनीं पाठलाग करून दुर्दशा केली असती. कां कीं मराठ्यांचे घोडेस्वार मनस्वी होते. पळ काढिला असता तर त्याच्या फौजेचें अर्धें धैर्य खचलेंच असतें. तेव्हां आपले लोक शत्रूच्यापेक्षां फारच कमी आहेत वगैरे गोष्टींचा विचार एकीकडे ठेवून त्यानें शत्रूवर हल्ला करण्याचा इरादा केला. इंग्लिशांच्या फौजेसही कांहीं भय न वाटतां तींतील लोक मोठ्या उत्साहानें बोलले कीं काय चिंता आहे आतां शत्रु आमच्या हातून खास सुटत नाहींत. अशा रितीनें त्यांच्या अंगीं उत्साह उत्पन्न झाला होता. तरी ते पुढें सरसावले तेव्हां शत्रूच्या फौजेनें तोफ-

मोठें तुंबल युद्ध.

खाना सुरू केला. आणि तोफखान्यावर यांची तयारी फार चांगली होती सबब यापासून इंग्लिशांचें लोक बहुत मेले. लढाईवरील एका साहेबानें वेलस्ली साहेबास जाहीर केलें कीं माझ्या हाताखालचे बहुत लोक व तोफांचे बैल निकामी होऊन गेले ह्यामुळें आतां पुढें तोफा जात नाहींत. तेव्हां त्यानें सांगून पाठविलें कीं हें काय मला सांगून पाठवावयाचें आहे. त्या माणसांवांचून व त्या बैलांवांचून काम चालवावें. असो, अशा रितीचा तोफांचा भडिमार चालला असतां इंग्लिशांचे लोक नीट तोफांच्या तोंडांवर चाल करून गेले. इंग्लिशांचे लोक पुष्कळ पडलेसे पाहून मराठ्यांचे स्वार त्या लोकांत घुसावें म्हणून पुढें सरसावले तों इंग्लिशांच्या स्वारांनीं एकदम ऐशी फैर झाडली कीं मराठ्यांच्या स्वारांस मागें झटकून परतून आपल्या पायदळांत जाऊन मिळणें जरूर पडलें. ह्याप्रसंगीं इंग्लिशांचाच वरचष्मा झाला होता; पण तितक्यांत कांहीं एक चमत्कारिक गोष्ट होऊन पुढें काय होतें कोणास ठाऊक असें वाटूं लागलें. ती गोष्ट अशी कीं मराठ्यांचे कांहीं लोक मेल्याचें सोंग घेऊन मार्गांत अगदीं निचेष्ट पडले. इंग्लिश ते खरोखर मेले असें समजून तसेच पुढें निघून गेले. नंतर एकाएकीं उठून इंग्लिशांनीं घेतलेल्या तोफा त्यांनीं परत घेतल्या आणि मागून त्यांजवर भडिमार चालू केला. तितक्यांत स्वार पुढें पळत होते त्यांनीं आपली थोडीशी सांवरासांवर केली. तेव्हां इंग्लिशांवर मोठा वक्तच गुदरला. पण वेलस्ली साहेबाचें धैर्य असें होतें कीं कसाही प्रसंग आला तरी न डगतां त्यानें तेथच्या तेथें कांहीं तरी तजवीज करावी. ह्याप्रसंगीं त्यानें पुष्कळ टोळ्या धाडून मागून उठून गोळ्या घालणाऱ्या लोकांचा पराजय केला. नंतर मराठ्यांच्या सैन्यांत पळापळी जांचून बोलणें नाहींसें झालें. त्यांच्या पैकीं जायशें मुडदा आणि ९८ तोफा इतकें तेथें पडलें. इंग्लिशांचेंही नुकसान बहुत झालें. त्यांचे ४०९ शिपाई मेले, आणि १६२२ जखमी झाले. त्यांच्या एका कामदारानें मोठा अविचार केला त्यामुळें त्यांचे लोक फार पडले. तो अविचार असा कीं आसे मुकामीं मराठ्यांचा तोफखाना सुरू झाला असतां

प्र० १४ इ० स० १८०३

असेची लढाई

शत्रूची मोठी धोक्याची युक्ति

शत्रूनीं पळ काढिला.

इंग्लिशांचा मोठा नाश झाला.

प्र० १८ इ० स० १८०३

त्यानें आपले लोक तोफखान्याच्या तोंडावरच नेले. त्यानें दुसऱ्या एखाद्या बाजूवर हल्ला करून तेथें धामधूम केली असती म्हणजे तोफखान्यावरचे लोक अर्थात घाबरून पळाले असते. टिपूच्या पायदळापेक्षां शिंद्याचें पायदळ चांगलें-लढलें आणि त्यांचा तोफखानाही फार चांगला ह्यामुळें इंग्लिशांच्या कामीं पडण्याजोगा होता. म्हैसूरचा तोफखाना घेतला त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

जनरल वेल्स्लीच्या वर्त्तणूकीविषयीं मतें.

अशा प्रकारें आसे मुकामची लढाई होऊन जनरल वेल्स्ली साहेबाची मोठी कीर्त्ति झाली. आणि इंग्लिशांचें सर्व हिंदुस्थावर अधिपत्य स्थापित झालें. तरी ह्यावेळेस त्या साहेबानें केलें तें बरें केलें किंवा करूं ह्याविषयीं बहुत वादविवाद झाले आहेत. ह्याप्रसंगीं शत्रूची फौज मनस्वी असतां धाडस करून त्यानें आपली फौज तिच्यावर नेली हें चांगलें केलें नाहीं असें पुष्कळांचें मत आहे. आतां वेल्स्ली साहेबाचा पक्ष घेणारे म्हणतात कीं त्यानें धाडस करून पुष्कळ फौजेवर थोडे लोक नेले हें खरें; परंतु इंग्लिशांचे थोडे लोक आहेत हें पाहून तरी मराठ्यांनीं समोर उभें राहून लढावें हाच त्याच्या मनांतला अभिप्राय होता. समोर उभें राहून लढण्याचें त्यांच्या मनांत यावें ह्याविषयीं दुसरी कांहीं एक तजवीज नव्हती. परंतु सर थामस मनरो ह्यास वेल्स्ली ह्याचें एक पत्र आलेलें आहे त्यांत तो असें लिहितो कीं, कर्नल स्तीविनसन् ह्यास सोडून लढाई करण्याचें माझें मानस अगदीं नव्हतें, व एका विस्तीर्ण मैदानांत मराठ्यांची फौज तळ देऊन पडलेली माझ्या दृष्टीस पडली, नंतर आमच्या फौजेस तिनें एकाएकीं येऊन गांठिलें. त्यावेळेस मला असें वाटलें कीं अशा स्थितींत माघारें फिरल्यास खचित आपला नाश होईल. मनरो साहेब हा लष्करी कामाचा चांगला विचार करून त्यांत न्यूनाधिक दिसल्यास दोष देण्यास मागें पुढें पहावयाचा नाहीं असा होता. तो ह्या लढाईविषयीं असें म्हणतो कीं "ह्या सर्व गोष्टींचा विचार करून पाहिला असतां असें दिसतें कीं तो लढाई देतांना तर कदाचित चाललें असतें; पण लढाई सुरू झाल्यापासून तों ती संपेपर्यंत सर्व यथास्थित

सर थामस मनरो ह्याचें म्हणणें.

झालें. वेलस्ली साहेबानें आपल्या सर्व लोकांस सारखे श्रम दिले म्हणजे लढाईवर पाठविल्या खेरीज कोणतीही तुकडी ठेविली नाहीं ज्या ज्या ठिकाणीं शत्रूंचा मारा फार होई त्या त्या ठिकाणीं ऐन मोक्याच्या वक्तावर कधीं स्वार कधीं पायदळ ह्यांची बेतानें कुमक पोंचवून तो बंदोबस्त करीत असे. ह्या लढाईच्या परिणामाविषयीं असें म्हणतात कीं शिंद्याचें कांहीं म्हणण्या सारिखें नुकसान झालें नाहीं, ह्यामुळें लढाई होऊन कांहीं नाहीं सारखेंच झालें. परंतु ह्या लढाईंत शिंद्याच्या मनस्वी तोफा इंग्लिशांच्या हातीं लागल्या, त्यांचा थोडासा मोड होऊन फार पळापळ झाली आणि एवढेसे लोक असतां इंग्लिशांस जय मिळाला ह्यामुळें शिंद्याचे लोक फारच चकित झाले. पुष्कळ फौज असून मोठा जय मिळाला असता तरी ते इतके चकित कधीं झाले नसते. इकडच्या लोकांचा एक हा मोठा चमत्कार आहे कीं अकस्मात् एखादी नवीन गोष्ट झाली म्हणजे त्यांच्या मनांत कांहीं विलक्षण तरंग उठतात. ह्यावेळच्या सारखा शौर्याचा प्रकार त्यांच्या दृष्टीस पडून आला म्हणजे ते लागलेच म्हणूं लागतात कीं ह्यांत कांहीं तरी दैविक साह्य आहे. केवळ माणसाच्यानें इतका पराक्रम कधीं व्हावयाचा नाहीं. ह्याच म्हणजे आसे मुक्कामच्या लढाईंतच हिंदूंचें धैर्य अगदीं खचलें. त्या दिवसापासून सर्वांस वाटूं लागलें कीं हिंदुस्थान अगदीं अजिंक्य अशा लोकांच्या हातीं पडलें. लढाईचा परिणाम. इ० स० १८०३ प्र० १४

ह्यानंतर शिंद्यानें इंग्लिशांशीं आपल्या एकट्याच्याच तहाविषयीं बोलणें लाविलें. पण तें घरगुती रितीनें लाविलें होतें आणि ज्या द्वारानें चालविलें होतें त्यावर भरंवसा ठेवण्यासारिखें नव्हतें; सबब त्याकडे इंग्लिशांनीं लक्ष दिलें नाहीं. कर्नल स्टीविनसन ह्यास कमांदर इनचीफ् ह्यानें हुकूम पाठविला कीं बऱ्हाणपूर स्वारी करून घ्यावें व तेथें जवळच अशीरगड म्हणून मोठा नामांकित किल्ला आहे तोही खालीं करून घ्यावा. ह्यांपैकीं बऱ्हाणपूर लढाईखेरीजच हस्तगत झालें आणि किल्ला हातीं येण्यासाठीं इंग्लिशांस फारसें लढावें लागलें नाहीं हा एक मोठा चमत्कार झाला. त्यानंतर शिंद्यानें खास तह करण्याच्या उद्देशानें पुन्हा बोलणें लाविलें. शिंद्याकडील तहाचें बोलणें. अशीरगड व बऱ्हाणपूर घेतलें.

ग्र० १४ इ० स० १८०३

तेव्हां नर्मदेच्या दक्षिणेस जो शिंद्याचा मुलूख आहे त्याजवर इंग्लिशांनीं हल्ला करूं नये असें ठरलें. नंतर जनरल वेलस्ली ह्यानें आपली फाज वऱ्हाड प्रांतांत नेली. तेथें रघोजी भोंसला आपल्या फौजेनिशीं आर गांवच्या मैदानांत तळ देऊन होता. "शिंद्यानें इंग्लिशांशीं कबूल केलें होतें कीं भोंसल्याकडून आम्ही आपले स्वार माघारे आणवूं; परंतु भोंसल्यापाशीं अद्यापि शिंद्याचे पुष्कळ स्वार होते. वेलस्लीनें तत्काळ त्यांजवर हल्ला करून जय मिळविला.

आरगांवची लढाई.

ही लढाई आसे मुकामच्या लढाईप्रमाणें निकराची झाली नाहीं. इंग्लिशांच्या हातीं शत्रूंच्या ३६ तोफा लागल्या. त्यांचे ४६ शिपाई मेले व २०८ जखमी झाले. ह्यानंतर गावलगड म्हणून एक मोठा नागांकित डोंगरी किल्ला आहे त्याला इंग्लिशांनीं वेढा दिला. ह्या किल्ल्याप्रमाणें कोणताही किल्ला लढला नाहीं. ह्या किल्ल्याचा चढाव अगदीं सुलक्याप्रमाणें पडला त्यामुळें त्याच्या बाजूवर तोफा ठेवण्यास फार आयास पडला. पण थोडक्या दिवसांत तटाला एक भोंक पडून बाहेरचा तट हल्ला करून घेतला. अजून आंतल्या आंगास एक तट राहिला होता. तेथें कांहीं वेळ इंग्लिशांचें कांहीं एक चाललें नाहीं. शेवटीं कप्तान कांबेल हा आपल्या कांहीं थोड्याशा लोकांनिशीं शिड्या लावून तट चढून गेला आणि नंतर त्यानें आपल्या बाकीच्या फौजेस दरवाजा उघडला.

गावलगड घेतला.

देवगांव मुकामाचा तह.

ह्यावेळेस वेलस्ली साहेबानें शहरांत जाऊन राजाला जमीनदोस्त केलें असतें; पण राजाचा वकील त्या साहेबाच्या छावणींत येऊन पूर्वीच दाखल झाला होता. राजाच्या मनांतून आपणाशीं तहाचें बोलणें लावावयाचें आहे हें सांगण्याकरितां वकील आला होता. ह्या वकिलाचें म्हणणें होतें कीं इंग्लिश सरकाराशीं वांकडें होण्याचा भोंसल्याचा इरादा बिलकूल नव्हता. ह्याचविषयीं कांहीं वेळपर्यंत व्यर्थ वादविवाद चालला होता. शेवटीं त्यानें वेलस्ली साहेबास विचारिलें कीं आतां आपण तह करण्यास कोणत्या गोष्टींवर राजी व्हाल? तेव्हां वेलस्ली साहेबानें कोरोमांडल किनाऱ्यावरील कटक प्रांत मागितला. कारण त्या किनाऱ्यावरील तेवढाच इंग्लिशांच्या अमलांत नव्हता आणि वर्धा नदीच्या

कांठच्या एका प्रांतांत कांहीं भोंसल्याची सत्ता व कांहीं निजामाची सत्ता असा मोठा घोंटाळा होता, सबब तोही प्रांत वेलस्ली साहेबानें मागितला. आणखीही कांहीं प्रांत वगैरे घेण्याविषयीं बोलणें होतें पण मागून तें सर्व सोडून दिलें. गावलगड इंग्लिशांच्या हातीं लागला होता ह्यामुळें तेव्हांच मान्य केलीं आणि देवगांव मुक्कामीं सन १८०३ च्या दिसेंबराचे १७ वे तारिखेस तहनाम्यावर सह्या झाल्या. प्र० २४ इ० स० १८०३

मध्यहिंदुस्थानांतील भयंकर सैन्य.

इकडे मध्यहिंदुस्थानांत अशीच मोठी धुमश्चक्री चालली होती; शिंद्याच्या पदरीं डीबाइन ह्या नांवाचा एक फ्रेंच गृहस्थ चाकरीस होता. त्यानें युरोपियन लोकांच्या तऱ्हेचीं पलटणें तयार केलीं होतीं पुढें तो फ्रान्स देशांत निघून गेल्यावर त्याच्या जागेवर पेरो हा आला. ह्यावेळेस मध्यहिंदुस्थानांत दीबाइन ह्याच्या हाताखालीं तयार झालेली फौज होती तींत सोळा सतरा हजार पायदळ होतें आणि पंधरा वीस हजार घोडेस्वार होते. ह्यांखेरीज पुष्कळ शिबंदी होती व मोठा तोफखाना होता. शिंद्याशीं तह होणार होता तो झाला नाहीं असें जनरल लेक साहेबास लिहून आल्यावरून तो इ. स. १८०३ च्या आगस्तचे ७ वे तारिखेस कानपुराहून वायव्येकडे निघाला. तारीख २८ रोजीं तो त्या फौजेच्या जवळ जाऊन पोहोंचला आणि दुसरे दिवशीं अंतर्वेदींत कौल गांवाजवळ पेरो ह्याचे सर्व स्वार मोठा मजबूद तळ धरून राहिले होते ते त्यानें पाहिलें आणि लागलीच त्याजवर हल्ल्याची तयारी केली. शिंद्याची फौज त्या डामडौलावरून मोठी भयंकरशी दिसत होती; पण कांहीं वेळपर्यंत इकडे तिकडे कांहीं थोड्याशा तोफा डागून तिनें असा पळ काढला कीं ती इंग्लिशांच्या हातीं लागली नाहीं. आतां अलीगडचा किल्ला इंग्लिशांस घ्यावयाचा राहिला होता आणि शत्रूचा मुख्य तोफखाना वगैरे कायतें ह्याच ठिकाणीं होतें. ह्या किल्ल्याची मजबुदी फार होती. तटाच्या आणि खंदकाच्या मध्यें चोहोंकडच्या बाजूंस उतरतें मैदान होतें. खंदकाची रुंदी पुष्कळ असून खोलीही बरीच होती व त्यामध्यें सर्वदां पाणी भरलेलें असे. काढता घालता पूल तेथें होता. तेवढाच जर

जनरल लेक हा येण्यास निघाला.

शत्रूची फौज अकस्मात पळाली.

अलीगड घेतला.

प्र० १४
इ० स०
१८०३

किल्ल्यांत येण्याजाण्याला रस्ता ठेविला असता तर हा किला कधीं हातीं लागला नसता. पण येण्याजाण्याकरितां वेडेपणानें दुसरा एक रस्ता बांधला होता. ह्या रस्त्यानें आपली फौज जाईल अशी लेक साहेबानें अटकळ बांधिली. हल्ला करण्याचें काम कर्नल मानसन ह्याजवर सोंपलें होतें. तो आपल्या लोकांनिशीं तें गैदान व धका वलांडून पार गेला. पण तटावर भालेवाले लोकांनीं असा बंदोबस्त ठेविला होता कीं तेथें शिड्या वगैरे लावण्याचा कांहीं उपाय चालेना. मानसन साहेबानें किल्ल्याच्या दरवाज्यापुढें एक सहाशेरी तोफ आणून ठेवून दिली. पुढें ती तोफ चालू करावयाची तों इंग्लिशांच्या शिपायांनीं गोळ्यांचा निखालस वर्षावच चालविला. आणि त्या सपाट्यांत खुद्द मानसन साहेबास जखम लागून तो निकामी होऊन पडला. त्याच्या जागेवर मेजर एम. ली. यद, हा आला नंतर पहिला दरवाजा फोडून तो आपल्या लोकांनिशीं आंत गेला. पुढें त्यास एक लांबच लांब आणि वांकडा तिकडा असा रस्ता लागला. तो संपल्यावर एका मागून एक असे दोन दरवाजे लागले. त्यांतून तो पार गेला तों पुढें आणखी एक चवथा दरवाजा लागला. त्याजवरही तोफ लाविली पण तिजपासून कांहीं एक हांशील झालें नाहीं. शेवटीं लियद साहेबानें दरवाज्याची दिंडी तेवढी फोडून आपल्या लोकांस आंत जाण्यास रस्ता खुला करून दिला म्हणूनच बरें झालें नाहीं तर त्यावेळेस इंग्लिशांची पण बुर्दशाच उडाली असती. इंग्लिश आंत शिरतांच सर्व किला त्यांच्या स्वाधीन झाला.

पेरो ह्यानें शिंद्याचा पक्ष सोडला.

पेरो हा शिंद्याच्या चाकरीस फार कंटाळला आहे असें इंग्लिश सरकारच्या समजण्यांत आल्यावरून लार्डलेक ह्यास लिहून गेलें होतें कीं पेरो हा आपल्या हाताखालच्या फौजेनिशीं कंपनी सरकारच्या चाकरीस राहण्याचें कबूल करीत असल्यास त्यास तुम्ही पुष्कळ दरमाहा कबूल करावा. सप्टंबरच्या ७ व्या तारिखेस लेक साहेबास पेरो ह्याचें विनंती पत्र आलें होतें त्यांत मजकूर कीं "मी आपलें कुटुंब व चाकर चुकर ह्यांसुद्धां आपली सर्व चीजवस्त घेऊन लखनूरास जाणार आहें. तर तुम्ही आम्हांस उपद्रव करूं

नये." परंतु त्या पत्रांत शिंद्याच्या चाकरींतून लोक काढून इंग्लिशांच्या चाकरीस ठेवून देण्याबद्दल कांहींएक लिहिलें नव्हतें. त्याची विनंती इंग्लिशांनीं लागलीच मान्य केली. मागून त्यानें असें सांगितलें कीं माझ्या जागेवर दुसरा कामदार नेमल्यामुळें मला तें काम सोडावें लागलें. प्र० १४ इ० स० १७४०

दिल्लीवर स्वारी.

अलीगड हातीं आल्यानंतर लेक साहेब दिल्लीवर गेला. तेथें तट अगदीं नजरेस पडेपर्यंत गेला. तेव्हां शिंद्याची फौज फ्रेंच कामदाराच्या हाताखालीं युद्धाला तयार होती. लेक साहेबापाशीं सारे ४५०० लोक होते आणि शिंद्याचे १९००० लोक होते. तथापि लेक ह्यानें तावडतोब लढाई देण्याचा इरादा धरिला. परंतु तो समोर उभा राहून लढता तर शत्रूला त्या जागेवरून काढून देण्याला फार कठीण पडलें असतें आणि नुकसानही फार झालें असतें. सबब अशी हिकमत सांगितली कीं आपण पळ काढावा म्हणजे शत्रूच्या लोकांस आमचा पराजय झालासें वाटून ते आमचा पाठलाग करण्याकरितां पुढें येतील आणि मग त्यांस चोपावें. ही गोष्ट इंग्लिशांच्या फौजेनें उत्कृष्ट रितीनें पार पाडिली. तेव्हां इंग्लिशांनीं खरोखरच पळ काढलासा वाटून शत्रू आपली छावणी सोडून देऊन खूप आवेशानें पाठलाग करीत सगळे मैदानांत आले. इकडे लार्डलेक साहेबानें सगळे आलेसें पाहतांच माघारी फिरून सपाट्यानें एक फेर झाडली त्या बरोबर शत्रूचे लोक मागें पळालें. त्यापैकीं मेले व जखमी मिळून ३०००पडले व शत्रूचा सगळा तोफखानाही इंग्लिशांच्या हातीं लागला.

जनरल लेक ह्याची युक्ति शेवटास गेली

त्याचा दिल्लींत सत्कार केला.

अशा रितीनें त्या फौजेचा पराजय झाल्यानंतर लार्डलेक ह्यास दिल्लींत जाण्याविषयीं प्रतिबंध कोण करितो? तो खुशालपणें शहरांत गेला; आणि लागलीच बादशाहाची भेट होण्याविषयीं विनंती करून भेट घेतली. बादशाहाशीं लढाईच्या पूर्वीच पत्रव्यवहार इंग्लिशांनीं चालू केला होता. ज्या वंशांत मोठमोठे पराक्रमी आणि नामांकित रांजे होऊन गेले होते त्याच वंशांत हा हल्लींचा बादशाह शाहआलम हा जन्मला होता. पण त्याच्या प्रारब्धीं केवळ विपत्तिच पडली होती. लेक साहेब भेटीला गेला तेव्हां तो

प्र० १४ इ० स० १८०३

सिंहासनावर वसली होता; पण त्याच्या डोईवर चांदवा देखील धड नव्हता. कांहीं म्हातारपणामुळें व कांहीं विपत्तीमुळें त्याचें शरीर अगदीं कृश होऊन गेलें होतें; नेत्र गेले होते त्यामुळें मुख अगदीं विद्रूप दिसत होतें; ह्याखेरीज मुखावर औदासिन्य आणि वार्धक्य ह्यांचीं लक्षणें सर्वदां वासच करीत होतीं. बादशाहानें आपणावर लेक साहेबाचे फार उपकार झालेसें समजून त्यास वीर शिरोमणी, रणसिंह, प्रभु, आणि राज्यरक्षक असे अनेक किताब दिले. ह्यावेळेस बादशाहाच्या पक्षाच्या लोकांत व दिल्लींतील लोकांत मोठा जयजकार झाला. तेथील इतिहासकार वगैरे लोकांनीं अशा अत्युक्तीनें लिहिलें आहे कीं बादशाहास ह्यावेळेस आल्हाद अतिशय होऊन त्याची दृष्टी गेली होती ती आली. मिल साहेबानें ह्या सर्व वर्णनाची थट्टा केली आहे. तो म्हणतो, शाहआलम बादशाहाची ह्यांत कांहीं सुटका झाली नाहीं. तो शुद्ध एकाच्या कैदेंतून सुटून दुसऱ्याच्या कैदेंत पडला. असो, हें म्हणणें खरें आहे तथापि मराठ्यांपासून त्याचे पुष्कळच हाल वगैरे झाले होते, व त्या सर्वांनीं त्याविषयीं हयगयही फार केली होती, ती आतां कमी झाली. तेथील फ्रेंच सरदार त्याचा चांगला मान सन्मान राखीत; परंतु कोरड्या मानाला काय करावें? शिंद्याकडून खर्चाची नेमणूक होती ती फारच थोडी होती. बादशाहाच्या पहिल्या वैभवाची तर छाया देखील इंग्लिशांनीं त्याच्या दृष्टीस पाडली नाहीं पण यांनीं त्याला सरासरी ऐषआरामीनें ठेवून प्राचीन काळचीं जीं राजचिन्हें होतीं त्यांपैकीं कांहीं चिन्हें ठेविलीं. ह्या सर्व उपकाराबद्दल बादशाहानें इंग्लिशांस प्रधानाची पदवी दिली आणि त्याबद्दल अजूनही त्यांची मान्यता आहे. ह्यावेळेस नांवाला मात्र शाहआलम बादशाह झाला होता, परंतु खरोखर पाहतां इंग्लिशच बादशाह झाले.

लेक साहेब आला ह्याचा दिल्लींतील लोकांस आनंद वाटला.

मोंगलाच्या योगानें मोठेपणा मिळाला.

आग्र्याचा किल्ला व आग्रा शहर घेतलें.

ह्यानंतर इंग्लिशांनीं आग्रा शहरावर स्वारी केली. आग्र्याच्या किल्ल्यांत फौज पुष्कळ होती आणि किल्लाही मोठा मजबूद होता. ह्या किल्ल्याच्या योगानें त्या बादशाहास मोठी बळकटी होती पण त्या फौजेंत सगळेच स्वतंत्र; कोणाचाच हुकूम कोणा-

वर नाहीं असा प्रकार झाला होता; फौजेंतील कामदार इंग्लिशांचे वंशज होते सबब त्यांजविषयीं मनांत वहमा येऊन त्यांस कैद केलें होतें. शिंद्याचीं सात पलटणें आलीं त्यांस किल्ल्यांत घेतलें नाहीं. कारण कीं तीं आंत आलीं म्हणजे आंतील दौलतीला वांटेली होतील.' तेव्हां ते लोक शहरांतच राहिले. इंग्लिशांनीं असा विचार केला कीं शहरांतल्या लोकांस अगोदर हांकून लावून मग किल्ल्यावर स्वारी केली पाहिजे. त्याप्रमाणें त्यांनीं त्यांस बाहेर काढिलें; पण ते लोकही मोठ्या शर्तीनें लढून मग निघाले. त्यांच्यापैकीं २५०० लोक तत्काल इंग्लिशांच्या चाकरीस राहिले. इकडे किल्ल्यांतील मराठे सरदारांनीं तहानें किल्ला देण्याचें बोलणें लाविलें. पण तहनाम्यावर मान्यता करण्याची वेळ आली तेव्हां त्यांनीं एकाएकीं पुन्हा तोफा सोडण्यास आरंभ केला. इंग्लिशांनींही तोफखाना सुरू करून आक्तोबरच्या १७ व्या तारिखेस तटाला भोंक पाडिलें; तेव्हां त्याच दिवशीं संध्याकाळीं आंतील लोकांनीं आम्हांस आपली चीजवस्त घेऊन खुशाल जाऊं दिल्यास आम्ही किल्ला खालीं करून देतों अशी बोली करून त्यांनीं त्याप्रमाणें केलें. ह्या किल्ल्यांत सुमारें २८,००,००० रुपयांचा ऐवज इंग्लिशांच्या हातीं सांपडला तो सर्व फौजेला बक्षीस वांटला.

प्र० १४, इ० स० १८०३

अतिशय लूट.

दक्षिणेंतून गेलेली कांहीं फौज अद्यापि रणांत शिलक होतीच. निरनिराळ्या ठिकाणच्या फौजेंतून पळून आलेले वगैरे लोक तींतच मिळाले होते. जनरल लेक साहेब ह्या फौजेच्या पाठीस लागला. वरील कामदारांनीं हांकून दिलेले व पळून आलेले लोक ह्यांत सगळे भरले आहेत, दुसरें आहे काय! असें लेक साहेबास वाटलें होतें. परंतु परिणामीं पाहतां सगळ्या मोहिमींमध्यें हा प्रसंग जबरदस्त झालासें समजलें. ह्या फौजेंत ९००० पायदळ आणि ५००० स्वार होते, आणि तोफाही पुष्कळ होत्या. हे लोक फार मोठ्या जलदीनें पळत होते तों नवंबर महिन्याच्या पहिल्या तारिखेस लेक साहेबानें त्यांस गांठिलें आणि त्यांनीं पुढें जाऊं नये म्हणून त्यांजवर लागलाच हल्ला करण्याचा बेत केला. इतक्यांत वावटळ सुटून मनस्वी धूळ उडाली तेवढ्यानें त्या पळणा-

अद्यापिही रणांत फौज होतीच.

जिचें विलक्षण शौर्य व बल.

म० १२ इ० स० १८०३

त्यांस वरेंच झालें. त्यांनीं चांगल्या ठिकाणावर जाऊन आपला तळ दिला आणि छावणीच्या पुढल्या नदीचें धरण होतें तें मोडून टाकून छावणीला विशेष बळकटी आणिली. लेक साहेब ह्यानें स्वारांची टोळी त्यांजवर नेली, त्या टोळीस जागावगैरे वरेंच सांपडली होती, पण तितक्यांत शत्रूकडून त्यांजवर तोफांचा मारा अशा सपाट्यानें चालला कीं त्यांस मागें घेण्याशिवाय दुसरा उपायच राहिला नाहीं. पुढें पायदळाची कुमक येईपर्यंत वाट पाहिली तों ७६ वी पलटण व दुसऱ्या पलटणींतील कांहीं तुकड्या सर्व पायदळाच्या अगोदर येऊन पोहोंचल्या. तेव्हां त्याच तोंडीं सांपडून त्यांजवर शत्रूचा मारा चालला. नंतर जनरल लेक ह्यानें अशी मसलत केली कीं हे सगळे लोक एकदम हल्ल्यावर न्यावे हेंच उत्कृष्ट आहे. आणि तिजप्रमाणें करतांच ते लोक शत्रूवर चालून गेले. आतां इंग्लिशांचाही त्याप्रसंगीं पुष्कळ नाश झाला हें खरें आहे. इंग्लिशांचे पुष्कळ लोक पडून त्यांच्या रांगा पातळ झाल्यासें पाहून मराठ्यांच्या स्वारांनीं मध्यें शिरण्याकरितां पुढें चाल केली, परंतु गोऱ्या स्वारांनीं तत्काल त्यांस माघारें हांकून लाविलें इतक्यांत इंग्लिशांचें बाकीचें पायदळ येऊन पोहोंचलें. मराठेही खूपंच नेटानें लढले, परंतु अखेरीस कांहीं मारले गेले व कांहीं पाडाव झाले

जनरल लेक साहेबानें अविचारानें चाल केली.

शिंद्याच्या बहुतेक फौजेचा नाश झाला.

मिळून बहुतेक फौजेचा फडशा झाला. तात्पर्य शिंद्याच्या पदरीं राहून ब्रिटिश लोकांनीं जी फौज त्याला तयार करून दिली व जिच्या प्रमाणें हिंदुस्थानांतील कोणत्या संस्थानांत फौज मुळींच नव्हती तिचा ह्या लढाईंत निखालस विध्वंस झाला.

निरानिराळ्या टोळ्यांचीं साहस कृत्यें.

लेक साहेबाखेरीज कर्नल उदिंग्तन ह्याच्या दिमतीस फौज देऊन त्यास गुजराथेंत पाठविलें होतें, कर्नल हेकोंत ह्यास कटक शहरावर पाठविलें होतें, आणि कर्नल पौवेल ह्यास बुंदेल खंडावर पाठविलें होतें. ह्या तीनही ठिकाणीं इंग्लिशांसच जय मिळाला. अशा ह्या फौजेच्या अनेक टोळ्या करून चोहींकडे पाठविल्या त्यापेक्षां लढाईचें एकच ठिकाण करून तेथल्या फौजेला मदत करण्यासाठीं सर्व फौज देविली असती तर तेथें लवकर जय होऊन लागलाच कायतो फाड झाला असता. ही सूचना आम्ही मागें केलीच आहे.

ह्याप्रमाणें शिंद्याचा सर्व ठिकाणीं पराजय झाला, रघोजीनें त्याचा पक्ष सोडिला, आणि त्यांच्या सर्वोत्कृष्ट फौजेचा अगदीं नाश झाला तेव्हां त्याला वाटलें कीं आजपर्यंत हा मानहानिकारक तह करण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून इतकी खटपट केली परंतु आतां ही सर्व सोडल्याशिवांचून उपाय नाहीं. मग इ० स० १८०३ तं दिसेंबराच्या ३० व्या तारिखेस वेलस्ली साहेबाच्या छावणींत तहनाम्यावर सह्या झाल्या. त्या तहांत शिंद्यानें इंग्लिशांस भागीरथी आणि यमुना ह्यांच्या मधला सर्व मुलूख दिला व यमुनेच्या दक्षिणेकडचाही बराच मुलूख दिला, त्यांतच दिल्ली आणि आग्रा हीं मोंगलांचीं प्रख्यात दोन शहरें इंग्लिशांकडे गेलीं. दिल्लींतील नामधारी बादशाहही त्याच्या स्वाधीन झाला. गुजराथेंतील भडोच शहर व समुद्राच्या लगत्याचा दुसरा सर्व मुलूख त्यानें इंग्लिशांस दिला. दक्षिणेंत त्यानें पेशव्यास अहमदनगर दिलें आणि निजामालाही पुष्कळ मुलूख दिला. पण इंग्लिशांनीं त्या मोहिमींत त्यांचीं दुसरीं जीं ठाणीं घेतलीं होतीं तीं त्यांस परत दिलीं. शेवटाखालीं पेशव्याप्रमाणें आमची फौज तुम्ही आपल्या मुलखांत चाकरीस ठेवा म्हणजे तुमच्या संस्थानाकडे कोणी न पाहतां तुमची बहुतेक काळजी दूर होईल. असा इंग्लिशांनीं त्याला फार आग्रह केला; पण त्यानें सांगितलें कीं ही गोष्ट आम्ही करीत नाहीं.

इ० स० १८०२ शिंदे व भोंसले हे इंग्लिशांशीं लढत होते व पराभव पावत होते तें होळकर स्वस्थ बसून पाहत होता. तो इंग्लिशांच्या पक्षास मिळाला नाहीं व मराठ्यांच्याही पक्षास मिळाला नाहीं. दोन्ही पक्षांशीं सारखा वागत होता. आरंभीं त्यानें मराठ्यांस असा रंग दाखविला कीं मी तुम्हांस येऊन मिळेन पण सुरूवात झाल्यावर पाहतात तों तो अगदीं स्वस्थ बसला आणि त्यानें मसलत केली कीं हे सर्व लोक परस्परांशीं लढून थकल्यावर मग आपण मध्यें शिरावें म्हणजे सर्वांवर आपला वरचष्मा राहील. इंग्लिशांस जेव्हां जया मागून जय येऊं लागले तेव्हां तो मनांत चकित होऊन राहिला. इंग्लिशांनीं तर असा झपाटा उडविला कीं होळकर कांहीं एक मसलत करून त्याप्रमाणें करणार तों त्यांनीं आपल्या

प्र० १४ इ० स० १८०३ शिंदा तह करण्यास कबूल झाला.

तहांतील टप्पा.

होळकर कोणासच मिळाला नाहीं.

प्र० १४ इ० स० १८०३

इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी शेवटासही नेल्या. मग शिंद्याचें राज्य अगदीं खलास झालें होतें तेव्हां त्याच्या मुलखांत स्वाऱ्या करून आपल्या राज्याला बळकटी आणावी असें करण्याचा होळकराचा इरादा दिसूं लागला. शिंदा इतका भयाभीत होऊन गेला कीं त्यानें इंग्लिशांची ६००० फौज आपल्या मुलखाच्या सरहद्दीवर ठेवण्याचें आपण होऊन कबूल केलें. ह्या फौजेचा खर्च पूर्वी दिलेल्या मुलखावरच भागवावा असें होतें. इंग्लिशांनीं आपला रस्ता चोहींकडे अगदीं कुंटित केला आणि ते आपल्या मसलती हाणून पाडण्याच्या बेतांत आहेतसें पाहून होळकरानें उतावळेपणानें निश्चय केला कीं इंग्लिशांशीं युद्ध करावयाचें. जयनगरचा राजा इंग्लिशांकडचा होता त्याजवर स्वारी करण्याची दहशत घातली. तो भलतेचें भलतेंच मागूं लागला कीं जेणेंकरून मोठा राग यावा. वेलस्ली साहेबास त्याचें पत्र आलें त्यांत त्यानें असें लिहिलें होतें कीं "हजारों कोस मुलखांत माझी फौज शिरून तो मुलूख अगदीं लुटून फस्त करून टाकील; लार्ड लेक ह्यास हूं कां चूं करायाला एक क्षणभर फुरसत मिळणार नाहीं; आणि एकसारखें युद्ध चाललें म्हणजे माझ्या फौजेच्या हल्ल्यापासून लक्षावधी अनर्थ गुदरतील. माझी फौज म्हणजे शुद्ध समुद्राच्या लाटा आहेत ही ज्यावर पडेल त्याला गडप करून टाकील." शिंदा व दुसरे जे स्वतंत्र संस्थानी होते त्यांस इंग्लिश आपणा सर्वांचेच शत्रु आहेत सबब त्यांजवरोबर लढण्याकरितां यावें म्हणून बोलावणें केलें.

शिंद्यास भय पडलें.

होळकराचा उतावेळपणा.

होळकराबरोबर मोहीम सुरू करावयाची ते वेलेस गवर्नर जनरलं ह्यानें बेत केला कीं इतर राज्याप्रमाणें ह्याचें अर्धें मुर्धें राज्य घेऊन ह्याला आपल्या कह्यांत आणून ठेवण्याचें करूं नये तर ह्याला समूळ नाहींसें करून टाकावें. कारण हा राहिला तर दुसऱ्या राजे रजवाड्यांस अगदीं चैन पडूं देणार नाहीं. तथापि कंपनी सरकार दुसऱ्याचा अपहार करूं इच्छीत नाहीं हें दाखविण्यासाठीं असा बेत केला कीं जिंकलेल्या मुलखांपैकीं मुलूख इंग्लिशांनीं अगदीं ठेवूं नये. तर कंपनीच्या पक्षास जे संस्थानी कायद्याप्रमाणें अनुकूल असतील त्यांस वांटून द्यावा. होळकरचा पराभव करण्या-

जय मिळविण्याविषयीं गवर्नर जनरलाचा योग्य बेत.

च्या कामांत शिंद्यानें मनापासून मदत केल्यास त्यास सर्वांहून मोठा मुलूख द्यावा असें ठरविलें होतें. प्र० १४ इ० स० १८०३

होळकर तरी अगदीं तुच्छ करण्याजोगा शत्रु होता असें नाहीं. दुसऱ्या फौजांची नासाडी होऊन त्यांतले कांहीं लोक ह्याच्या फौजेंत येऊन मिळाले व कांहीं नवीनच येऊन मिळाले आणि तेणेंकरून ह्याच्या स्वारांची संख्या सुमारें ६०००० झाली. ह्याखेरीज पंधरा हजार पायदळ होतें आणि १९२ तोफा होत्या. दक्षिणेंत त्यावेळेस मोठा दुष्काळ पडला होता, त्यामुळें जनरल वेल्स्ली ह्यास तिकडे जातां येईना. लेक साहेब हा रामपूरचा किल्ला घेऊन तेथें कर्नल मानसन ह्यास ५ पलटणें आणि ३००० स्वार एवढ्या फौजेनिशीं होळकराच्या तोंडावर ठेवून आपण निघून गेला. अशी व्यवस्था करण्यांत कांहीं फायदा होतासें आम्हांस दिसत नाहीं. मागून पुढून येऊन छापे वगैरे घालणें ह्या कामांत होळकर म्हणजे दुसरी हैदराचीच प्रतिमा होती. त्यानें मानसनाच्या फौजेवर आपली सर्व फौज आणून उभी केली. असें म्हणतात कीं मानसन हा त्वरा करून आपली फौज जर त्या फौजेवर नेता तर त्याची फौज खुशाल लढली असती. कारण होळकराची फौज पुष्कळ होती पण सगळी अडाणी सबब तिचें कांहीं चाललें नसतें. पण मानसन ह्यानें मागें निघण्याचा बेत केला. मराठ्यांच्या पुढें पळणें फार कठीण. ते पाठलाग करण्यांत मोठे हुशार, तेव्हांच येऊन गांठावयाचे. ह्याखेरीजही सर्व गोष्टी त्याच्या जाण्याला प्रतिकूळ झाल्या. नद्या भरून चालल्या; मार्गांत जिकडे तिकडे पाणी; जिकडे तिकडे दलदली; सामानाचा तोटा; जवळचे काळे शिपाई कांहीं सोड सोडून चालले; कांहीं बांकून वागूं लागले, अशा लोकांपैकीं शिंद्याचे लोक फार होते. ज्या इंग्लिशांस मदत करण्याकरितां ते आले होते त्यांजवरच त्यांनीं संकटसमयीं हत्यार धरिलें. इंग्लिशांची फौज होती तिनें आपणाला कलंक आणिला नाहीं. जेवढा हल्ला आला तेवढा तिनें माघारा लाविला. पण त्यांचा सर्व तोफखाना व सामान गेलें. थकले, अजारी पडले, अगर जखमी झाले ते तेथेंच राहिले; आणि होळ-

होळकराचें सामर्थ्य.

जनरल लेक साहेबानें केलेला व्यवस्था.

कर्नल मानसन मोठ्या संकटानें पळ काढतो.

प्र० १४ इ० स० १८०४

कराच्या फौजेनें त्याचा अगदीं फडशा उडविला. बाकीची फौज गेली ती आगस्तच्या २१ व्या तारिखेला आग्रा मुकामीं पोहोंचली, तों तेथील बहुतेक पलटणी अगदीं अस्ताव्यस्त झाल्या होत्या.

जनरल लेक मोठ्या त्वरेनें निघाला.

होळकरानें मथुरेवर स्वारी करून ती घेतली. जनरल लेक साहेब कानपुराहून मोठ्या जलदीनें निघाला. सिकंदराबाद मुकामीं आपली सर्व फौज जमवून तो होळकराच्या फौजेवर गेला तों ती आपला तळ सोडून निघाली. होळकरानें आपल्या स्वारांनिशीं एकदां मागें गेलेसें करावें, एकदां पुढें सरलेसें करावें, आणि तेणेंकरून लेक साहेबास तेथल्या तेथेंच गुंतवावें असें चालविलें होतें. आणि त्याच्या पायदळानें अक्तोबरच्या चौथ्या तारिखेस दिल्लीवर जाऊन तेथें लागलाच वेढा दिला. दिल्लीचा घेर पांच कोसांचा पडला; भोंवतालची भिंत अगदीं नादान; आणि आंत रक्षणाला पाहिलें असतां थोडकेसे शिपाई लोक होते. तथापि अक्तरलोनी व बर्न ह्या दोन साहेबांनीं हिंमत धरून मोठ्या विचारानें तेवढ्याच शिपाई लोकांच्या हातून शत्रूचे सर्व हल्ले परतविले. शत्रूच्या लोकांनीं सात दिवस पावेतों खूप झटपट केली पण शेवटीं सातवे दिवशीं वेढा उठविणें भाग पडलें.

होळकरानें दिल्लीवर हल्ला केला.

दिल्लीकडील संकटाचें वर्तमान लागतांच लेक साहेब तिकडे निघून गेला तो अक्तोबरच्या सतराव्या तारिखेस तेथें पोहोंचला. होळकर आपल्या स्वारांनिशीं यमुनेच्या कांठच्या मुलखांत धामधूम करीत आहे असें वर्तमान दिल्लीस लागतांच तो त्याजवर गेला. जातां जातां त्यानें भरतपूरच्या राजाचा दिग म्हणून एक मजबूत किल्ला होता तेथें होळकाची फौज राहिली होती तिजवर जनरल फ्रेजर ह्याच्या ताब्यांत आपल्या हाताखालची फौज देऊन त्याला पाठविलें. भरतपुरचा राजा इंग्लिशांचा पक्ष कमती पडलासा पाहतांच होळकराला मिळाला. फ्रेजर साहेब नवंबराच्या १३ व्या तारिखेस तेथें पोहोंचला. तों होळकराची फौज दीगच्या किल्ल्याबाहेर मोरचेबंदी करून तळ देऊन पडली होती. त्याच्या छावणीच्या पुढल्या आंगास एक मोठी दलदल होती; डाव्या बाजूस गांवकुसूं असलेलें खेडें होतें. नंतर नेहमींच्या रीतीप्रमाणें लढाई सुरू झा-

जनरल लेक ह्यानें होळकराचा पाठलाग केला.

दिगची लढाई.

ली तेव्हां तोफांचा एकसारखा भडिमार चालला असतां इंग्लिशां- म० १४
चे लोक त्या तोफांच्या तोंडांवर चालून गेले त्यामुळें त्या फौजेंत इ० स०
घुसेपर्यंत तिचे फार हाल झाले. . एकदां हाताशीं हात मिळतांच १८०४
त्यांनीं संगिनींचा मारा करून होळकराच्या फौजेस पळवून लाविलें. होळकराच्या फौजेनें तोफांच्या एकामागें एक अशा रांगा मांडून ठेविल्या होत्या. तेव्हां पुष्कळ वेळां हल्ला केल्याशिवाय मग- ळ्या हातीं येण्याजोग्या नव्हत्या. फ्रेजर साहेब मोठा शूर होता त्याला ह्याप्रसंगीं जखम लागून तो लढाई सोडून निघाला. पुढें त्याच जखमेनें तो मेला. नंतर कर्नल मानसन ह्यानें लढाई पुढें चालवून पुरता जय मिळविला. आसेच्या लढाईप्रमाणें ह्या लढा- ईंत होळकराच्या कांहीं शिपाई लोकांनीं तशीच हिकमत केली. इंग्लिशांचे लोक पाठलाग करीत पुढें गेले तेव्हां पहिल्या रांगेचे लोक मेल्याप्रमाणें पडले होते त्यांनीं उठून आपल्या तोफा घेऊन इंग्लिशांच्या पिछाडीवर हल्ला करण्याची सुरूवात केली. पण ति- तक्यांत कप्तान नर्फर्ड साहेब ह्यानें ७६ ते पळटणींतील २८असा- मी घेऊन त्यांस पळवून लाविलें. तथापि त्या सपाट्यांत तो क- प्तान जिवानिशीं गेला हें वाईट झालें. इंग्लिशांनीं किल्ल्याच्या तटापावेतों पाठलाग केला. त्यांच्या बहुतेक तोफा इंग्लिशांच्या हातीं लागल्या. रामपूरच्या किल्ल्याजवळून मानसन साहेब आ- पल्या फौजेनिशीं निघून आला तेवेळेस त्याच्या कांहीं तोफा होळकराच्या हातीं लागल्या होत्या त्यांपैकीं कांहीं ह्या तोफांत सांपडल्या.

होळकराचे स्वार पळाले.

इकडे लेक साहेबही होळकराच्या मागें दर रोज सुमारें १२ कोसांची मजल करीत चालला होता. शेवटीं एक दिवस अहो- रात्र चालत होता तेव्हां सत्तावीस कोसांची मजल करून नवंबरा- च्या १७ व्या तारिखेस होळकरास गांठिलें, तेव्हां तो फरकाबादे- च्या बाहेर तळ देऊन पडला होता. हिंदुस्थानच्या स्वारांचा यु- द्धांत कधींच ठिकाव लागत नाहीं. युद्ध सुरू होतांच ते पळाले. त्यांपैकीं ३००० ची अगदीं कत्तल उडविली बाकीचे जे आपला जीव घेऊन खूपच जलदीनें पळाले ते मात्र वांचले. त्यानंतर

इ० स० १८०४

होळकर दीग मुकामीं आपलें पायदळ होतें तिकडे गेला. मागून जनरल लेक साहेबानें तारीख १ दिसेंबर रोजीं तेथें येऊन लागलींच किल्ल्याला वेढा घालण्याचा बेत केला. आग्ऱ्याहून त्या ठिकाणीं तोफखाना आणण्यास १० दिवस लागले आणि तटाला भोंक पाडण्यास सुमारें १३ दिवस लागले. नंतर २३ व्या तारिखेस रात्रीं किल्ल्यावर हल्ला केला. इंग्लिशांचें विलक्षण धारिष्ट पाहून मराठे अगदीं चकित झाले आणि दोन दिवसांत किल्ला व शहर दोन्ही रिकामीं करून देऊन ते भरतपुराकडे निघून गेले.

फर्रकाबाद घेतलें.

होळकराचें नशीब फिरलें.

हा प्रसंग झाल्यावर होळकराचें पारडें अगदीं वसावयाचे लागांत आलें होतें. तें असें कीं इकडे बहुत ठिकाणीं त्याचा पराजय झाला. स्वराष्ट्रांतून जाजती कुमक वगैरे आणावयाची तीं तींही शत्रूच्या (इंग्लिशांच्या) हातीं पडलें. तो प्रकार असा कीं कर्नल वालेस साहेबानें दक्षिणेंतून येऊन त्या प्रांतांतील चांदवड वगैरे ठाणीं घेतलीं. कर्नल मेर साहेबानें गुजराथेंतून येऊन बहुतेक माळवा काबीज केला, इंदुरांत प्रवेश केला आणि होळकर माघारा गेईल त्यास वाटेतच गांठावें ह्याविषयीं तयारी चालविली होती.

भरतपूर.

एक भरतपूर मात्र डोकें देण्यास उरलें होतें. कारण कीं तेथला राजा अजून त्याचाच पक्ष धरून होता. होळकराचा सर्वथा पराजय करण्याकरितां भरतपूर एवढें घेणें इंग्लिशांस प्राप्त होतें. इंग्लिशांनीं मोठमोठे नामांकित किल्ले हां हां म्हणतां घेतले होते सबब हें शहर घेण्याचें प्रथमतः ल्यांस कांहीं तादृश कठीण वाटलें नाहीं. ग्वालेर व अशीरगड ह्या दोन ठिकाणीं भोंवतालीं जसे उंच मोठे बिकट डोंगर आहेत तसे येथें नाहींत. गांवकुंसू मात्र फार उंच होतें आणि खंदक होता तो एकाएकीं उतरून जाण्यासारिखा नव्हता. पण दुसरें असें झालें होतें कीं शहराचा घेर सुमारें तीन चार कोस होता. एवढा मोठा घेर संभाळण्याला फौज कोठें होती. पण तेथल्या राजानें तें काम स्वतः आंगावर घेऊन मोठ्या हुशारीनें चालविलें. तो म्हणाला "मरठ्यांचें राज्य घोड्यावर आहे" ते वर बसले आणि पळाले म्हणजे झालें. पण माझें राज्य ह्या तटाच्या आंत आहे सबब मला नेट देऊन बचाव करणें प्राप्त

तेथील राजाच्या चतुराईच्या तजविजी.

आहे." आज पावेतों मोठमोठाले देखील किल्ले वगैरे घेण्याचें काम एकदां आरंभिलें म्हणजे एकसारखें चाले. म्हणजे प्रथम मोरचे लावून तटाला भोंक पाडावें, मग हल्ला करणारी मंडळी कोणती ती ठरवावी, त्यांनीं मागें पुढें न पाहतां चालून जावें मग त्यांत थोडे बहुत पडतातच आहेत. मग त्यांनीं तेथें जाऊन किल्ला शहरवगैरे काय असेल तें ताब्यांत घ्यावें. भरतपूरचे लोक शौर्यानें लढले आणि त्यांच्यांत विशेष हा कीं आपला बचाव करून शत्रूवर हल्ला वगैरे करण्याचा त्यांचा प्रकार अगदीं निराळा. इंग्लिशांच्या लोकांस तसा प्रकार पूर्वी कोठें आढळला नव्हता. आणि तशा प्रकारापासून आपला बचाव करण्याची त्यांची तयारीही नव्हती. तटाच्या मागल्या अंगास खांबाचे धिरे वगैरे देऊन तटावर किती गोळे येऊन लागले तरी तो पडूंच नये असा बंदोबस्त केला होता. पाणी खंदका बाहेर वाहून जात होतें तें बंद केलें त्यामुळें खंदक भरून जाऊन पलीकडे जाण्यास वाट नाहींशी झाली. इंग्लिशांचे लोक पुढें चालून आले म्हणजे तटावरून तुलया फेंकून द्याव्या. भांड्यांत कांहीं दारू वगैरे पदार्थ भरून तीं फेंकून द्यावीं. कापसाचे गठे तेलांत भिजवून ते पेठवावे आणि इंग्लिशांवर फेंकावे. असें त्या लोकांनीं चालविलें होतें. आणि ह्याप्रमाणें त्यांनीं इंग्लिशांचे एक्का मागून एक असे चार हल्ले परतविले. इंग्लिशांचे जखमी झाले व मेले मिळून एकंदर ३१०३ लोक पडले. ही मोहीम मोठी कठीण झाली; पण इतके लोक दोन लढाया मिळून देखील पडले नव्हते. इंग्लिशांस अखेरीस जय मिळाला पण त्यांत त्यांची तादृश शोभा राहिली नाहीं. ७६ व्या पलटणींतले लोक म्हणजे अत्यंत शूर आणि ज्या त्या लढाईमध्यें अग्रसर पण बंगालच्या १२ व्या पलटणीनें तटावर बावटा नेऊन लाविला. तेव्हां अर्थात इंग्लिशांची सर झाली. असें असतांही त्या ७५ व्या व ७६ व्या पलटणींनीं आपणांवरच्या अधिकाऱ्यांस साफ सांगितलें कीं आम्ही तुम्हांबरोबर किल्ल्यावर येत नाहीं. नंतर लेक साहेबानें, "तुम्हीं हल्ल्याची फार खोटी केली" अशा प्रकारें पराकाष्ठेची त्यांची निंदा केली. तेव्हां ते लोक लाजून म्हणाले कीं आतां कसेंही करून

प्र० १४ इ० स० १७७९ भरतपूरचें रक्षण मोठ्या शर्तीनें केलें.

इंग्लिशांचा फार नाश झाला व ते मागें हटले.

प्र० १४ इ० स० १८०४

आम्हांला हल्ल्यावर न्या. नंतर त्यांस हल्ल्यावर नेलें तेव्हां त्यांनीं शौर्यही खूप केलें; पण मग उपयोग काय ?

इंग्लिशांचे पुष्कळ लोक वगैरे पडून फार नासाडी झाली होती सबब चार दिवस वेढ्याचें काम बंद पाडून पुढें हल्ला करण्याकरितां भरपूर तयारी पाहिजे होती. ह्या लढाईचा परिणाम काय होईल हें त्या राजाच्या लक्षांत आलें आणि आपलें शहर एकदां गेलें म्हणजे मग भलतेंच अरिष्ट उत्पन्न होईल हेंही त्यानें जाणलें आणि इंग्लिशांशीं तहाचें बोलणें लाविलें. त्यांत तह करण्याबद्दल २० लाख रुपये देण्याचें त्यानें कबूल केलें व दुसऱ्याही कांहीं गोष्टी त्यानें पतकरिल्या. त्या सर्व गोष्टी इंग्लिशांस हितावह होत्या. आणि दुसरें त्यांची तादृश तयारीही नव्हती. तेव्हां लेक साहेबानें एप्रिलच्या १० व्या तारिखेस तें बोलणें मान्य करून आणखी सांगितलें कीं ह्या करारापमाणेंच तुम्ही चालल्यास दीगचा किल्लाही तुम्हांस परत मिळेल.

इंग्लिशांस इंकलिश आश्रय मिळतो.

इंग्लिशांचा फायद्याचें राजाकडील नवाबाचें बोलणें.

वेढापडला असताना होळकराचा उद्योग.

भरतपुराला वेढा पडला होता तेव्हां होळकरानें आपल्या स्वारांच्या टोळीनिशीं इंग्लिशांस विघ्नें आणण्याकरितां पुष्कळ प्रयत्न केला. कांहीं अंशीं त्याच्या उद्योगाचें फळ झालें. परंतु त्याचा अमारिखान म्हणून सरदार होता त्याच्या पतकाचा अगदीं फडशा उडाला, आणि दुसऱ्या कितीएक टोळ्यांचीही फार फजिती झाली. शेवटीं तर असें झालें कीं इंग्लिशांस पाहिलें कीं त्यांनीं पळत सुटावें. भरतपूरच्या राजानें आपलें आंग काढून घेतांच होळकराची अगदीं दुर्दशा होऊन तो पळ काढण्याच्या लागांत आला होता. इतक्यांत दैवगत्या शिंद्याकडून त्याला मदत आली.

त्याची संकटावस्था.

होळकरानें इंग्लिशांशीं युद्ध सुरू केलें आणि आरंभींच कांहीं लढायांत त्याला जय आला. हें पाहून शिंद्याचें मन अगदीं विव्हळ झालें आणि लागलेंच त्याच्या मनांत आलें कीं आपणही ह्याप्रसंगीं आपलें कार्य साधून घ्यावें. नंतर इकडील राजे रजवाड्यांच्या चालीप्रमाणें त्यानें हळूहळू सुरूवात केली. तो इंग्लिश लोकांजवळ मुलूख वगैरे पहिल्यापेक्षां जास्ती मागूं लागला. त्याच्या सरहद्दीवर त्यानें आपली फौज रवाना केली; असें करण्याचें

कारण काय ! तुम्ही अशा भलत्याच गोष्टीविषयीं प्रवृत्त होऊं नये. असें इंग्लिशांचें म्हणणें पडलें, त्याचें रास्त उत्तर न देतां भलभलतीं कारणें सांगून त्यानें आपली फौज तशीच तेथें ठेविली. अखेरीस भरतपूरच्या राजावरोवर इंग्लिशांनीं तह केल्यानंतर होळकराची अगदीं दुर्दशा होऊन तो माघारा येत असतां शिंद्यानें त्यास आश्रय दिला. होळकरास आश्रय देण्यापूर्वीच शिंद्यानें रेसिदेन्त साहेबाचा बंगला लुटून फस्त करून त्याला कैद करून ठेविलें होतें. प्र० १४ इ० स० १८०८ शिंद्याचीदगाबाजी.

इतकें होत आहे तों पावसाळा अगदीं येऊन पोहोंचला तेव्हां मग लेक साहेब शिंदे व होळकर ह्यांवर जावो कसा. तशांत ते आपल्या हद्दीच्या आंत होते तेथें त्यांस म्हटलें म्हणजे सर्व गोष्टी अनुकूल. तरी त्यांचा एकेक वेळ धुव्वा उडाला होता. यावरून लेक साहेबाची खात्री होती कीं हात पडेल तेवेळेस त्यांना वांकवीन. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं हिंदुस्थानांतील राज्य चालविण्याच्या पद्धतींत विलायत सरकारानें अत्यंत फेरफार करून टाकिला. हिंदुस्थानांतील राज्य कारभाराच्या पद्धतींत फेरफार झाला.

हिंदुस्थानांतील सर्व मांडलिक राजांच्या दरबारांत रेसिदेन्त ठेवावे आणि त्या त्या राजाच्याच कुमकेस म्हणून कांहीं आपली फौज ठेवावी. अशा रितीनें सगळें हिंदुस्थानचें हिंदुस्थान कंपनी सरकारच्या अमलांत मार्क्विस वेलस्ली साहेबानें आणून घातलें. हिंदुस्थानांत आपला जय होत आहे हें पाहून इंग्लंदांत बहुत लोकांस समाधान वाटलें. तरी कित्येक मुत्सद्दी लोकांचें म्हणणें पडलें कीं हें असें करणें हें नीतिविरुद्ध आहे. असें केल्यास नेहमींच लढाई चालेल. कंपनीनें मोंगलाचें राज्य घेतलें व आणखीही सगळें हिंदुस्थान घेण्याच्या उद्योगांत आहे हें सर्व तिच्या मूळच्या कबुलायतीस अत्यंत विरुद्ध आहे. शिंदे वगैरे सरदारां बरोबरच्या लढाया बंद झाल्या तों पुन्हा होळकरा बरोबर मोठें घणाघोर युद्ध उपस्थित झालें. तेव्हां हें युद्ध सदोदित चालेल असें मनांत येऊन लोकांस मोठें वाईट वाटत होतें. सर्व लोकांचें मत ह्याप्रमाणें एकसारखें होऊन गेलें व हल्लींच्या लढाईंत खर्च मनस्वी झाला होता तेवढ्यावरून डैरेक्तर्स (मुख्य) ह्यांनीं असें लोकांचे विचार.

प्र० १४ इ० स० १८०४

ठरविलें कीं आजपर्यंत ज्या रितीनें आपण हिंदुस्थानचा कारभार चालवीत आलों ती रीत आतां अगदीं उपयोगाची नाहीं. आतां नवीच तजवीज काढली पाहिजे. मार्किस वेल्स्ली ह्याचा लौकिक कच असा होऊन गेला होता कीं हा आपला लढाऊ गवर्नर (कारण ह्याच्या कारकिर्दीत जिकडे तिकडे लढाया झाल्या) आहे. ह्या लढाया करणें जरूर होतें किंवा त्यानें आपण होऊन केल्या ह्या गोष्टीचा विचार आहे, असो वेलस्ली साहेबाच्या जागेवर मार्किस कार्नवालीस ह्याची नेमणूक कंपनी सरकारानें केली. कार्नवालीस साहेबानें तरी मागील कारकिर्दीतील रीत अगदीं सोडून दिली होती असें नाहीं. तरी सर्वांची समजूत अशी होती कीं हा बातावेतानें काम चालविलें. व मोठा मन मिळाऊ आहे. एवढ्या मोठमोठ्या लढाया चालवून प्रांताचे प्रांत काबीज करण्याचें त्याला आवडत नव्हतें. त्याला कंपनी सरकारचें सांगणें होतें तें वेल्स्ली साहेबाच्या रितीच्या अगदीं विरुद्ध होतें. म्हणजे पाहिजे तो खर्च करावा पण तह करावा. कंपनीच्या प्रांताची एक मर्यादा करून तेथें चांगला बंदोबस्त ठेवावा आणि तिच्या पलीकडे इंग्लिशांनीं बिलकूल वघूं नये. इकडील संस्थानिकांनीं तह लढाया वगैरे पाहिजे तसें करावें त्यांत इंग्लिशांनीं अगदीं मन घालूं नये.

मार्किस कार्नवालीस ह्यास गवर्नर नेमिलें.

मार्किस वेलस्ली साहेबानें हिंदुस्थानांतील कामकारभार मोठ्या हुशारीनें व आस्थेनें चालविला त्यांत हयगय अगदीं केली नाहीं. ह्यामुळें ब्रितिशांचा बहुतकरून जय होत गेला. ह्या सर्व कारणांवरून विलायतच्या मुख्य अधिकाऱ्यांनीं अभ्रपत्र देण्याचा ठराव केला. तरी त्या अधिकाऱ्यांचें म्हणणें असें होतें कीं आम्ही अभ्रपत्र देतों हें प्रस्तुत होळकरावरोबर जी लढाई चालू झाली आहे तीं कशापासून झाली वगैरे गोष्टींचा विचार करून देतों असें नाहीं तो विचार अद्यापि होणें आहे. हा संदिग्धलेख वेलस्ली साहेबाच्या मनास मोठा लागला. इकडील फौजेंतल्या कामदारांची वाहवा विलायत सरकारानें केली. हा मजकूर त्या कामदारांस कळवावा म्हणून वेलस्ली साहेबानें सरकारी गॅझिटांतील फौजे प्रकरणीं मजकुरांत दाखल केला व त्याकरितां बुध्या एक पत्र छापून सर्वांस

वेलस्ली साहेबानें उत्तम काम केलें म्हणून त्याची योग्य मान्यता झाली.

तो समजाविला. परंतु त्यास अन्नपत्र आल्याचा मजकूर त्यानें छापिला नाहीं. तो म्हणाला ह्या प्रसंगीं तो मजकूर मीं छापूं नये हेंच चांगलें आहे. त्याला असें वाटलें कीं विलायत सरकारचा लेख छापला म्हणजे इकडील राजांबरोबर तह व दुसरे कितीएक प्रकारचे ठराव केले आहेत ते सर्व नीट चालतात किंवा नाहीं कोणास ठाऊक असा सर्वांस अंदेशा येईल. विलायतेसही त्यानें लिहून पाठविलें कीं सरकारच्या न्यायाची व मोठेपणाची व औदार्याची कीर्ति फार आहे, आणि आम्ही इकडे ज्या गोष्टी केल्या त्यांपैकीं कितीएक सरकारांत अमान्य झाल्या ह्यावरून असें वाटतें कीं आम्हीं जय मिळवून जें कांहीं सरकारच्या अमलांत आणिलें तेंही आपण बिलकूल ठेवणार नाहीं. म० १४ इ० स० १८०४

वेलस्ली साहेबाच्या पक्षाचे लोक त्या साहेबाची राज्यनीति फार चांगली असें म्हणत होते. बरें ती इतकी चांगली नव्हती असें घेऊन आपण चाललों तरी आतां ही एक मोठी अडचण होती कीं राज्य रितीनें पाहतां आतां एकाएकी प्रांत सोडून द्यावे तरी कोणते सोडले असतां इंग्लिश सरकारास नेटीव राजांकडून इजा वगैरे होणार नाहीं हें समजावयाची मोठी पंचाईत होती. मोठ्या राजाला असपासच्या राजेरजवाड्यांच्या तंड्यांतून अगदीं आंग काढून घेणें हें न्याय्य नाहीं. प्रबलापासून दुर्बलाचें रक्षण करण्याचा प्रयत्न करणें अगर दहा पांचापैकीं एखादा सगळ्यांचेंच बळकावून प्रबल होईल त्यास न होऊं देणें हेंच मोठे राजाला उचित होय. खेरीज इकडचे संस्थानी लोक इंग्रेज सरकाराबरोबर प्रामाणिकपणानें वागूं लागतील अगर त्यांशीं मनापसून दोस्ती ठेवितील असें म्हणणें म्हणजे असंभवींच आहे. त्यांजपैकीं बहुतेक बळकावणारेच होते. एक बादशाही मोडल्यावर निजपासून हे अनेक संस्थानी वाढले होते. दुसऱ्याचा नाश करून आपली भरती करावी ह्याविषयीं प्रत्येकाचा उद्योग होता. आणि प्रत्येकाचा इरादा हा कीं सर्व राज्यें आपल्या घरांत येऊन आपण कायतो एकराजा असें असावें. दुसरा कोणी अगदीं कामाचा नाहीं. तर्री कंपनी सरकार मध्यें पडल्या-

त्याचा क्रम बंद केला असतां कदाचित धोका येण्याची भीति.

नेटीव राजांचा वर्त्तणूक.

प्र० १४ इ० स० १८०४

मुळें वर सांगितल्या प्रकारचे यांचे जे उद्देश होते ते सर्व निष्फळ झाले. यांच्या फौजा पराजित झाल्या, आणि त्यांच्या अमलांतले कांहीं कांहीं चांगले प्रांतही गेले ह्यामुळें तें सर्व हततेज झाले होते पण पुन्हा कंपनी सरकारानें आपलें आंग काढून घेऊन त्यांचें त्यांजवर टाकिलें म्हणजे खचित ते सर्व अपसांत लढूं लागतील असा खचित संभव होता. मग त्या सर्वांत जो एक असामी जयी ठरेल तो किंवा सगळे एकत्र मिळून इंग्लिशांवर उठून त्यांजपासून आपले प्रांत वगैरे सर्व परत घेतील असाही संभव होता. आतां वेल्स्ली साहेबाच्या पक्षाच्या लोकांचें म्हणणें असें आहे कीं त्याची रीति फार नर्मा होती. अणखी एक सरदार (म्हणजे होळकर) एवढा पाडला असता म्हणजे हिंदुस्थानांतील सर्व बेंदेखोर लोकांचा बंदोबस्त होऊन जिकडे तिकडे अगदीं स्वस्थता होऊन जाती. इतका घाट त्या रितीच्या योगानें अगदीं जमल्यासारखाच होता. हे सरदार म्हणजे असले होते कीं कोणी जबरदस्त डोक्यावर नाहींसा पाहिला कीं सगळा देशचा देश लुटून ओसाड करून टाकणार. कंपनी सरकारानें ह्यावेळेस आंग काढून घेतल्यानें कंपनी सरकरच्या राज्यांत बहुत अव्यवस्था वगैरे होऊन पुन्हा दुसऱ्या भयंकर युद्धाचा पाया घातल्या प्रमाणेंच झालें.

क्रम बदलला असता भीति.

शरीर प्रकृति निट नसल्यामुळें वेलस्ली साहेबानें सरकारास जाहीर केलें होतें कीं शिंदा व व्हाडंचा राजा ह्या दोघांबरोबरचा तंटा शेवटास गेला म्हणजे लांगलेंच मला बिलायतेस निघून येणें जरूर आहे. पण तो तंटा संपला तों होळकराचा सुरू झाला. तेव्हां त्यानें पुन्हा लिहून कळविलें कीं ह्या तंट्याची कायती अखेर होईपर्यंत माझी राहण्याची खुशी आहे. परंतु विलायत सरकारचें मत अगदीं निराळ्या प्रकारचें होतें. इ. स. १८०५ त जुलईच्या ३० व्या तारिखेस मार्किस कार्नवालीस कलकत्त्यास येऊन पोहोंचला. होळकरावरोबर लढाई अद्यापि चालू आहे असें तेथें त्यास समजल्यावरून त्यानें बेत केला कीं लढाई चालली आहे तिकडे आपण जाऊन सर्व गोष्टींची चौकशी स्वतः करावी.

मार्किस कार्नवालीस आला.

प्र० १४
इ० स०
१८०४

कार्नवालीस ह्यास सरकारी हुद्याची फार हौस होती व विलायत सरकारची इच्छा शेवटास न्यावी हेंही त्याच्या मनांत होतें. त्यामुळें हें गवर्नर जनरलाचें काम त्यानें पतकरिलें; परंतु तो वयानें वृद्ध झाला होता व शरीर प्रकृतीनें अगदीं थकला होता ह्यामुळें तें काम त्याच्या हातून होण्यासारखें नव्हतें. विलायतेहून हिंदुस्थानांत येत असतां त्याची प्रकृति दिवसंदिवस जास्ती बिघडत चालली. शेवटीं गंगेच्या तटाकीं गाझीपूर म्हणून गांव आहे त्या ठिकाणीं आल्यानंतर तेथें त्यास उतरून मुकाम करणें भाग पडलें. पुढें कांहीं दिवस खितपून तो अक्तोबर महिन्याच्या पांचव्या तारिखेस मृत्यु पावला. त्याची शरीर प्रकृति नीट नसल्यामुळें तो अगदीं अशक्त झाला होता व त्याचें चित्तही स्वस्थ नव्हतें. आणि त्यानें ज्या ठिकाणीं जाण्याचा संकेत केला होता तेथें जाणेंही झालें नाहीं, ह्यामुळें त्याला लढाईसंबंधी ज्यास्ती वर्तमान लागून त्याविषयीं त्यानें • विशेष विचार केला नाहीं. त्याच्या जागेवर सर जार्ज बार्लो साहेब झाला हा सुप्रीम कोर्तांतील मुख्य जज्ज होता, आणि मुख्य जज्जाची जागा त्यास पायरी पायरीनें चढतां चढतां मिळाली होती. त्यास जें जें काम मिळालें त्यांत तो आपली हुशारी दाखवीत गेला होता. परंतु हिंदुस्थाना सारख्या राष्ट्राच्या हिताहिताचा विचार सार्वांशिक व मोठे मोठे मुत्सद्दी करितात त्याप्रमाणें करण्याची शक्ति त्याच्या आंगीं नव्हती. कार्नवालीस साहेबाच्या मनांतील विचार बार्लो साहेबास फार पसंत झाला व त्याविषयीं विलायत सरकारचेंही आनुकूल्य होतें त्यामुळें त्या लार्ड लेक साहेबानें तद्विरुद्ध गोष्ट करण्याविषयीं युक्ति प्रयुक्ति सांगितल्या अगर कांहीं कमजास्ती करण्याविषयीं सूचना केली असतां बार्लो साहेब अगदीं ऐकत नसे.

त्याचा मृत्यु.

सरजार्ज बार्लो.

लार्ड लेक साहेबास नवीन राज्यरीति पसंत नव्हती खरी, परंतु तीच अमलांत आणण्याविषयीं वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं ठराव केला त्यापेक्षां अमलांत आणिली पाहिजे असें झालें. तेव्हां आपल्या अकलेच्या योगानें ज्या रितीनें आणिली असतां सरकारचें हित होईल अशा रितीनें अमलांत आणण्याचा यत्न त्यानें चालविला. आ-

लार्ड लेक साहेबाचें शहाणपणाचें वर्तन.

प्रं० १४ इ० स० १८०५

पण शिंद्याशीं तहाचें बोलणें प्रथमतः न काढितां त्यानें होऊन आपणाकडे बोलणें लावावें असा घाट त्यानें मोठ्या चातुर्यानें जमवून आणिला. इंग्लिशांचा असा निश्चय झाला होता कीं ज्या ज्या गोष्टींबद्दल तंटा होता त्या सर्व सोडून द्यावयाच्या. त्यामुळें कांहीं एक अडचण न राहतां सन १८०५ त नवंबराच्या पांचव्या तारिखेस शिंद्याचा व इंग्लिशांचा तह झाला. ह्या तहांत शिंद्यास ग्वाल्हेरचा किल्ला मिळाला तो किल्ला फार चांगला बंदोबस्ताचा होता सबब तेथें त्यानें आपली राजधानी पुढें केली. कंपनी सरकारचा मुलूख व शिंद्याचा मुलूख ह्यांच्या मध्यें चंबळा नदी ही सीमा ठरविली. रजपूत व दुसरे कांहीं राजे शिंद्यांच्या ताब्यांतील होते त्यांचा पक्ष इंग्लिशांनीं सोडून दिला. ही गोष्ट इकडील राज्यकारभार करण्याविषयां कंपनी सरकारच्या म्हणण्याप्रमाणें नवा रिवाज चालू केला त्या करणानें झाली. परंतु बुंदी व जयपूर येथील राजे इंग्रेज सरकारानें त्यांच्याशीं तह करून त्यांचा पक्ष घेतल्यावरून इंग्लिशांच्या उपयोगी फार पडले होते तथापि शिंद्याशीं तह झाला तेव्हां त्याच्या अमलांतील सर्व संस्थानिकां बरोबरचे तह इंग्लिशांनीं मोडावे असें ठरलें. तेव्हां वरील दोन राजांबरोबरचे तह मोडणेंही प्राप्त झालें. परंतु ते इतके आपल्या उपयोगी पडले असतां त्यांस आपण हातचे सोडून देणें ही गोष्ट इंग्लिश सरकारच्या नांवाला कलंक लावण्यासारखी आहे.

शिंद्याशीं तह.

भरतपूरच्या राजानें होळकराचा पक्ष सोडिला. नंतर होळकर पश्चिमेकडील प्रांतांतील शीख लोकांच्या सरदारांकडून आपणास मदत मिळावी ह्या हेतूनें आपल्या बाकीच्या फौजेनिशीं तिकडे निघून गेला. त्यांनीं त्यास मदत देण्याचें नाकबूल केलें. लार्ड लेक साहेबानें फार लगट करून नवीन पाठलाग केला त्यामुळें त्याची तर अगदीं दुर्दशाच होण्याचा प्रसंग आला होता. परंतु नवी राज्यरीति अमलांत येऊन सर्व लष्करी कामदारांस दरोब्बस्त राजांशीं तह करण्याविषयीं एकसाहां हुकूम गेले त्यामुळें त्याचा बचाव सहजच झाला. त्यानें तहाचें बोलणें काढतांच त्याचे

होळकराचा फायदा झाला.

इंग्लिशांकडे गेलेले सर्व प्रांत त्यास परत मिळून इंग्लिशांवरोवर त्याचा तह झाला. प्र० १४ इ० स० १८०५

कंपनी सरकारांतही राज्यकारभार चालविण्याची नवीन रीति निघ~~~यामुळें सर्व राजांवरोवरचे तह मोडण्याचा प्रसंग आला तेव्हां निजा~~~ व पेशवे ह्याजरोवर केलेल्या तहाचा विचार उत्पन्न झाला. वसईच्या तहावरून कंपनी सरकारचें व पेशव्याचें ऐक्य झालें होतें व त्या ऐक्यामुळेंही मागें लिहिलेली लढाई उत्पन्न झाली तें ऐक्य मोडून टाकावें असा कंपनी सरकाराचा इरादा झाला होता. तथापि वार्लो साहेव जेव्हां कंपनी सरकारच्या म्हणण्याचा विचार करूं लागला तेव्हां त्यास वाटलें कीं ह्यापासून कंपनी सरकाराच्या राज्यास मोठा धोका येईल. निजाम व पेशवे ह्यांजवरोवर केलेले तह मोडून त्यांच्या चाकरीस आपली फौज आहे ती काढून घेतली असतांही अनेक राजे ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतून मोकळे केलेसे होतील आणि त्या राजांचें तर कंपनी सरकाराशीं हाडवैर आहे. परंतु त्यांच्या शिरावर फौज आहे तिचा त्यांस धाक आहे. ह्या मोठमोठ्या दोन राजांवरोवरचा तह मोडल्यास अनेक राजांचें ऐकमत्य होऊन पुढें कंपनी सरकारचा हिंदुस्थानांत अगदीं मोड होण्याचाच पाया घातल्याप्रमाणें होईल. पेशव्याच्या मनांतही इंग्लिशांविषयीं इतरांप्रमाणेंच द्वेष होता तथापि त्याच्या राज्यांत सर्व गोष्टींचा नीट बंदोबस्त नव्हता ह्यामुळें निदान तूर्तकाळीं तरी इंग्लिशांनीं वसईच्या तहाप्रमाणें चालावें अशी त्याची फार इच्छा होती.

निजाम व पेशवे ह्यांजवरोवर केलेले तह मोडले असतां मोठें संकट.

इ० स० १८०७ त सर जार्ज बार्लो ह्याच्या जागेवर लार्ड मिंतो साहेब झाला. हा गृहस्थ मोठा शहाणा व बुद्धिमान होता. त्यानें कंपनी सरकारच्या हुकुमाप्रमाणें सर्व स्वस्थता राखिली आणि नेतीव राजांच्या कृतीवरून जेथें जवरीचेंच गोष्ट सांगण्यास अगर तसाच दुसरा एखादा प्रसंग आला असतां तसें वागण्यासही त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं. ह्या साहेबाच्या कारकिर्दीत मोठ मोठ्या संस्थानांची स्थिति बहुतकरून पूर्ववतच राहिली, परंतु मनांत द्वेष सतत वाढत होता आणि तो द्वेष वाढतां वाढतां अतिशय हो-

लार्ड मिन्टो ह्यास गवर्नर नेमिलें.

प्र० १८ इ० स० १८०५. ऊन यापासून हिंदुस्थानांत झिकडे तिकडे तुंबळ युद्धें लागावीं असा ईश्वरी संकेत होता.

(चौदावें प्रकरण समाप्त.)